मराठी माती

REFBK-0007242

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ७०९

सन १९६९

Shree. P. P. Karmarkar.

Lohar - Ali

Chembaroli Thana.

History —

Marathi Granth Sangrahalaya, Thane —

Dang-Khera Scheme —

Note.

Dy
Director
Ratnagiri.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .. .. दि: ....
क्रमांक ... . नों: दि: .....

ब्राह्मण सभेचीं गेलीं साठ वर्षें

ग्रंथ नं. ठा. स्थानक.
अनुक्र. 23002 वि. 5.(1)(5)
क्रमांक 1001 नोंः दिः 3/5/14

लेखक :
वामन रामचंद्र गुळवणे



REFBK-0007242

REFBK-0007242

प्रकाशक :
ज. न. भिडे व
मा. रा. नवांगुळे
चिटणीस, ब्राह्मणसभा
गिरगांव, मुंबई ४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
गिरगांव, मुंबई ४

इतिहास वाचण्यापूर्वीं

ब्राह्मण सभा, मुंबई, या लोकप्रिय संस्थेला दि. १७–६–४८ ला साठ वर्षें पूर्ण झालीं. महायुद्धाच्या धामधुमीमुळें सभेचा सुवर्णमहोत्सव साजरा होऊं शकला नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठीं सभेचा हीरकमहोत्सव मोठ्या थाटामाटानें, उत्साहानें व सभेच्या दर्जाला शोभेल अशा तऱ्हेनें साजरा केला जावा अशी सभेच्या कार्यकर्त्यांनीं, अभिमान्यांनीं व हितचिंतकांनीं आपली मनीषा प्रकट केली. या उत्सवाच्या निमित्तानें ज्या कांहीं विशेष योजनांचा विचार झाला त्यांत संस्थेचा गेल्या साठ वर्षांचा इतिहास सभासदांना पुस्तकरूपानें अर्पण करणें ही एक महत्त्वाची योजना होती.

दि. ५–१–४७ ला भरलेल्या साधारण सभेंत निरनिराळें कार्य करण्यासाठीं ज्या समित्या नेमण्यांत आल्या त्यांत इतिहास ग्रंथ तयार करून प्रसिद्ध करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली होती. या समितीवर नेमण्यांत आलेल्या सदस्यांत जी मंडळी होती तींत सभेचे जुने, निष्ठावंत व कळकळीचे कार्यकर्ते श्री. वामन रामचंद्र गुळवणे हे एक होते. इतिहास हा खरोखर घडलेल्या गोष्टींचा तपशील असतो. हें अत्यंत जोखमीचें काम करण्यास तशाच लायक माणसाची निवड करणें अवघड असतें. इतिहासलेखनाचे कामीं कांहींशी दिरंगाई होत आहे हें पाहून श्री. गुळवणे यांनीं हौसेनें हें काम आपणाकडे घेतलें व आमची काळजी दूर केली.

आरंभीं श्री. वामनरावांना कै. नथूकाका पुणतांबेकरांसारखा खंदा मार्गदर्शक होता. परंतु दुर्दैवानें श्री. पुणतांबेकर इतिहास ग्रंथ पहाण्यास जगले नाहींत. ते दि. ६-११-४७ ला कालवश झाले. त्या गडबडींत जी कांहीं साधनसामग्री जमविण्यांत आली होती ती गहाळ झाली. श्री. पुणतांबेकरांच्या निधनानंतर श्री. गुळवणे यांनीं पुन्हां एकदां सर्व माहिती जुळविली पण दुर्दैवानें तीहि नाहींशी झाली. श्री. वामनरावांसारखा चिकाटीचा मनुष्य होता म्हणूनच त्यांनीं हें काम इतक्या अडचणी आल्या असतांहि नेटानें पुरें केलें. श्री. वामनराव यांनीं आपली कामगिरी किती चोख बजावली आहे हें इतिहासवाचनानंतर सर्वांच्या ध्यानीं येईलच.

लहानशा कुटुंबांत सुद्धां एवढ्या तेवढ्या कारणावरून मतभेद निर्माण होतात. मग मोठ्या संस्थेंत अशा गोष्टी कधीं घडल्या तर त्यांत नवल तें काय ? पण सभेच्या हल्लींच्या कार्यकर्त्यांशीं कांहीं बाबतींत त्यांचे मतभेद असतांहि श्री. वामनरावांनीं हें जिकिरीचें काम पत्करलें यांतच त्यांच्या मनाचा थोरपणा दिसून येतो. त्यांनीं हें इतिहास-लेखनाचें काम, एखादा अपवाद सोडला तर, अत्यंत समतोल बुद्धीनें केलें असून त्यासाठीं पडलेले कष्ट हौसेनें सोसले आहेत. या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल आम्ही श्री. वामनराव यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. आमचें हें करणें त्यांना रुचणें शक्य नाहीं पण या बाबतींत त्यांचा शब्द मानला तर जनतेच्या दृष्टीनें आम्ही दोषी ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

जमा केलेली माहिती दोन वेळां हातोहात नाहींशी झाली हें वर दिलें आहेच. कै. पुणतांबेकर म्हणजे चालता बोलता ३५ वर्षांचा इतिहासच होता. त्यांच्या भाषणांत आलेल्या उल्लेखांवरून किती तरी गोष्टी नव्यानें समजत असत. या इतिहासाच्या बाबतींत सर्व श्रेय श्री. नथूकाकांनाच द्यावें असें श्री. वामनरावांना वाटत असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण श्री. वामनराव यांची त्यांच्यावर

तशीच भक्ति होती. आम्हांलाहि नथूकाकांसंबंधानें अत्यंत आदर वाटत असल्यामुळें आम्हीहि त्यांस आपली स्मृतिसुमनांजलि अर्पण करतों.

माहिती जुळवितांना श्री. वामनरावांना पुष्कळांची मदत झाली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें 'वार्ताहर' पत्राच्या फायली पहाण्यास व त्यांवरून नकला करून घेण्यास परवानगी दिली. फर्ग्यूसन कॉलेजच्या ग्रंथालयाच्या व्यवस्थापकांनीं 'नेटिव्ह ओपिनिअन' या साप्ताहिकाच्या जुन्या फायली वाचण्यास दिल्या. श्री. वि. कृ. जोशी यांनीं कांहीं जुन्या लेखांचीं टांचणें करून दिलीं. श्री. जयवंतराव टिळक यांनीं अत्यंत विश्वासानें 'केसरी'च्या फायली दोन वेळां पहाण्यास दिल्या. श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांच्या 'ब्राह्मणांतील पोटजातींचें एकीकरण' या पुस्तकाचा व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'ज्योतिर्निबंध' या ग्रंथाचा श्री. वामनरावांनीं बराच उपयोग करून घेतला. डॉ. पु. ना. वैद्य यांचे चुलते श्री. गणेश त्र्यंबक वैद्य या सुमारें ८५ वर्षें वयाच्या वृद्ध गृहस्थानें सभेसंबंधानें पूर्वीची बरीच माहिती दिली व त्यांचेकडून कांहीं जुने कागदपत्रहि मिळाले. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर व न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या चरित्रग्रंथांचाहि श्री. वामनरावांस बराच उपयोग झाला. या सर्व व्यक्ती आणि संस्था यांचे आम्ही आभारी आहोंत.

श्री. वामनरावांनीं सर्व मजकूर पेन्सिलीनें लिहिल्यावर विषयाची मांडणी, भाषा, वाक्यरचना वगैरे बाबतींत इष्ट ते फेरफार करून त्या सर्व लिखाणाची शाईची प्रत तयार करण्याचें व छापखान्यास देण्यासाठीं आणखी एक सुवाच्य प्रत लिहून देण्याचें अतिशय जबाबदारीचें काम श्री. नाना अभ्यंकर यांनीं फार चिकाटीनें केलें. श्री. नाना अभ्यंकर यांनीं हें लेखनाचें काम सतत अडीच महिने सकाळीं दहा ते सायंकाळीं साडेपांचपर्यंत मांडी न मोडतां एकटांकी केलें आहे हें कोणाला खरेंहि वाटणार नाहीं. इतकेंच नव्हे तर प्रुफें तपासण्याचें

जिकिरीचें कामहि त्यांनींच एकट्यानें पुरें केलें आहे. श्री. वामनरावांच्या बरोबरीनें जर कोणाचे आभार मानावयाचे असतील तर ते श्री. नाना अभ्यंकर यांचेच मानले पाहिजेत व ते आम्ही मनःपूर्वक मानतों. सभेचे एक स्वयंसेवक श्री. गोविंदराव नामजोशी व सभेचे एक सभासद श्री. गंगाधर सखाराम तथा बाबा करंदीकर यांनींहि लेखनाचे कामीं आपलेपणानें बरीच मदत केली आहे. या सर्व मंडळींनीं आपापली कामगिरी सभेवरील प्रेमानें केलेली आहे. एखाद्याला अपघात झाला तर आपण त्याच्याबद्दल सहानुभूति दाखवितों. परंतु केळ्याच्या सालीवरून पाय घसरून श्री. वामनरावांचा हात दुखविल्यामुळें त्यांना नोकरीवर जाणें अशक्य झालें व इतिहास-लेखनाचें काम मात्र झपाट्यानें झालें, ही इष्टापत्ति नव्हे असें कोण म्हणेल ? इतिहासलेखनाच्या कामास त्यांनीं १९४७ सालीं प्रारंभ केला असला तरी त्यांना झालेल्या अपघातानंतर म्हणजे १९४९ च्या जानेवारीपासून सकाळीं साडेआठ पासून सायंकाळीं पांच वाजेपर्यंत सतत चार पांच महिने चिकाटीनें काम करून ते आपल्या जबाबदारींतून मुक्त झाले.

हल्लींच्या दिवसांत एवढा ग्रंथ प्रसिद्ध करणें किती खर्चाचें आहे हें सर्व जाणतातच. पुण्याचे डेक्कन पेपर मिलचे उत्साही चालक श्री. प्रभुदास यांनीं अत्यंत सवलतीच्या दरानें कागद पुरविला म्हणूनच हा ग्रंथ हातावेगळा झाला व याबद्दल श्री. प्रभुदास यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. छपाईचें काम 'मौज' छापखान्यानें केलें आहे. त्या छापखान्याची निराळी स्तुति काय करावयाची ? मालक, व्यवस्थापक वगैरे सर्वच मंडळी सभेची चहाती असल्यामुळें हा सर्वांगसुंदर इतिहास निर्माण झाला.

आमच्या विनंतीस मान देऊन साधारण सभेचे अध्यक्ष रावसाहेब नागेश महादेव काळे यांनीं या ग्रंथासाठीं विस्तृत प्रस्तावना लिहिली. पण कागदाच्या अडचणीमुळें ती या ग्रंथास जोडणें शक्य झालें नाहीं याबद्दल फार दिलगिरी वाटते.

हा मजकूर लिहीत असतांनाच लोकनायक बापूजी अणे—आजचे बिहारचे गव्हर्नर—यांनीं आमच्या विनंतीला मान देऊन पाठविलेला संदेश आमच्या हातीं आला हें आम्ही आमचें परम भाग्य समजतों. लोक-नायक बापूजींच्या या संदेशाबद्दल ब्राह्मण सभा त्यांची सदैव ऋणी राहील. त्यांचा संदेश पुढें देत आहों:—

GOVERNMENT HOUSE
RANCHI
June 20, 1949

Dear Mr. Bhide,

Your letter of 15th March was received here in due time. I think it was acknowledged by the office. I am glad to read that your Sabha intends to publish a book giving a brief account of the activities of the Sabha in the last sixty years of its existence. It would indeed be a book of great importance for students of history. Your idea to introduce in it a chapter consisting of views of eminent men on the duties of present-day Brahmins is also a very happy one. I believe the question is already answered by our Rishis times out of number in their sacred books which are our heritage, and the answer they have given holds good for Brahmins for all time.

ब्राह्मणस्य च देहोऽयम् क्षुद्रकामाय नेष्यते ।

The body of the Brahmin is not intended to be spent in the achievement of low pursuits. He must always aim high and work for that. That is the object of the Brahmin's life given in our old books, and no amount of writing by modern men can improve upon that. That, in brief, is my view.

Yours sincerely,

V. S. Apte.

आभार मानावयाचें काम पुरें झालें आहे. फक्त ऋण दाखवावयाचें काम बाकी राहिलें असून तें कोणाचें असेल तें न सांगतांहि सभासदांना कळून येण्यासारखें आहे. म. म. पांडुरंग वामन तथा अण्णासाहेब काणे यांची सभेला कायावाचामनानें किती मदत झालेली आहे हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अण्णासाहेब म्हणजे ब्राह्मणसभा व ब्राह्मणसभा म्हणजेच अण्णासाहेब असें समीकरण मांडलें व मानलेंहि जातें. श्री. अण्णासाहेबांनीं छापण्यापूर्वी हा इतिहास बारकाईनें व प्रकृतीची तक्रार न जुमानतां तपासून दिला आहे इतकें सांगितलें म्हणजे त्यांच्या ऋणाची कल्पना येईल.

हें छोटेंसें निवेदन सभासदांपुढें मांडून सभेचा हा साठ वर्षांचा बोलका इतिहास त्यांच्या हातीं देतांना आम्हांस आनंद होत आहे.

द. शं. देवधर, अध्यक्ष
ज. न. भिडे
मा. रा. नवांगुळे } कार्यवाह

दि. २१–६–४९ व्यवस्थापक मंडळ

लेखक व साहाय्यक

श्री. नाना अभ्यंकर, श्री. मा. र. सप्रे, श्री. वा. रा. गुळवणे, श्री. गं. स. करंदीकर

२३५०२ दि. ६।८।४१
७०९ नों. दि. २३।१।५८
दादर ग्रंथ संग्रहालय

(१) मुंबईचा पूर्वेतिहास व ब्राह्मणांचें स्थान

मुंबईतील ' दक्षिणी ब्राह्मणसभा ' या संस्थेच्या हीरकमहोत्सव-प्रसंगीं या संस्थेचें ऐतिहासिक दृष्ट्या सिंहावलोकन करून गेल्या साठ वर्षांतील मुंबापुरीवासीयांतील एका प्रमुख घटकावयवाच्या जीवनांतील स्थित्यंतरांची नोंद करणें जितकें मनोरंजक तितकेंच उद्बोधकहि ठरणार आहे. या कार्याच्या अनुषंगानें कितीतरी सामाजिक घडामोडींवर प्रकाश पडणार आहे. अर्थात्, ब्राह्मणसभा या संस्थेचें ध्येय व तें साध्य करण्यासाठीं करण्यांत आलेले निरनिराळ्या प्रकारचे प्रयत्न यांचें सत्यचित्र वाचकांसमोर रेखाटणें हाच या इतिहासकथनाचा मुख्य हेतु आहे.

१५ ऑगस्ट १९४७ हा दिवस भरतखंडाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखाच आहे. सतत दीडशें वर्षें पारतंत्र्यांत पिचत पडलेला हा देश अनेक हालअपेष्टांतून तावून सुलाखून निघाल्यानंतरच स्वातंत्र्यसूर्याचें दर्शन त्याला वरील दिवशीं घडलें. ब्राह्मणसमाजानें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आकुंचित दृष्टि न धरतां स्वतंत्र राष्ट्राचा एक महत्त्वाचा घटक या नात्यानें योग्य व आवश्यक तेवढाच जात्यभिमान धरून विशाल नजरेनें आपल्या भावि कर्तव्याकडे पहाण्यास समर्थ होण्यासहि या ऐतिहासिक आढाव्याचा उपयोग होण्यासारखा आहे. आनंदाची गोष्ट अशी कीं, ब्राह्मणसभेनें आपल्या बाल्यावस्थेंतहि अगदीं

आकुंचित अशी दृष्टि ठेवलेली नव्हती. आपल्या ध्येयांत निदान पांच पन्नास वर्षें तरी बदल करण्याची पाळी येऊं नये अशीच पुरोगामी दृष्टि सभेनें आपल्या जन्मापासून ठेवली असल्याचें दिसून येतें. या साठ वर्षांच्या अवधींत तर काळ कितीतरी पालटला आहे. त्याच मानानें सभेची पुरोगामी दृष्टीहि अधिक पुरोगामी झाली असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ब्राह्मणसभेला नव्या काळाला अनुसरून नवीन कार्यें करण्यास हुरूप येण्यालाहि या इतिहासकथनाचा खचित उपयोग होण्यासारखा आहे.

ब्राह्मणसभेची स्थापना इ. स. १८८८ मध्यें झाली. अशा प्रकारची सभा स्थापन करण्यास कारणीभूत झालेल्या परिस्थितीची थोडीफार माहिती करून घेणें भाग आहे. अशा प्रकारच्या विशिष्ट ज्ञातिहितवर्धक संस्था मुंबई शहरांत त्या काळीं होत्या, आज आहेत व त्यांचें कार्यहि चालू आहे.

इंग्रजी अंमल चालू झाल्यानंतरच मुंबापुरीचें वैभव वाढीस लागलें. ही वाढ चालू असतांना बदलत्या काळाला यशस्वीपणें तोंड देण्यासाठीं निरनिराळ्या ज्ञातींना आपापली संघटना असणें आवश्यक वाटल्यामुळेंच अशा प्रकारच्या संस्था जन्माला आल्या असल्या पाहिजेत हें उघड आहे.

ख्रिस्ती शकापूर्वी

पुरातन काळापासून मुंबईचा अंतर्भाव उत्तर कोंकण प्रांतांत केला जात असे. मुंबई म्हणजे कोळी लोकांची वस्ती असलेलीं लहान लहान सात बेटें होतीं. आजहि प्रसिद्ध असलेल्या मुंबादेवीच्या नांवावरून 'मुंबई' हें नांव या ठिकाणाला मिळालें. मुंबई हें नांव महा-अंबा-आई या शब्दांचा अपभ्रंश आहे. दुसऱ्याहि कांहीं उपपत्ती या बाबतींत सांगितल्या जातात पण त्या ऐतिहासिक पुराव्याच्या कसोटीला उतरत नसल्यामुळें त्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं.

पुरातन काळीं उत्तर कोंकणाचा 'अपरांत' या नांवानें उल्लेख केलेला आढळतो. अपरांताच्या सरहद्दीवरचा भाग म्हणून हीं सात बेटें ओळखलीं जात. महाभारतांत पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशास 'अपरांत' असें नांव आढळतें. या प्रांताची राजधानी शूर्पारक (हल्लींचें सोपारा) या नांवानें ओळखली जाई. यानंतर सम्राट अशोकानें आपले प्रेषित बौद्धधर्माच्या प्रसारासाठीं खिस्ताब्दपूर्व तिसऱ्या शतकांत राष्ट्रिक (महाराष्ट्र), पेठानिक (प्रतिष्ठान) व अपरांतक (कोंकण) या प्रांतांत पाठविले होते. गिरनार हिमालयांतील खाळसी, अफगाणिस्तानांतील शहावाजगढी या ठिकाणच्या अशोकाच्या शिलालेखांवरून तसेंच रावबहादुर पु. बा. जोशी यांच्या 'उत्तर कोंकणचा प्राचीन इतिहास' या ग्रंथावरून, त्या काळीं या प्रांतावर मौर्यवंशाची सत्ता होती असें दिसून येतें.

खिस्ती शकानंतर

मौर्यांच्या नंतर म्हणजे खिस्ती शकाच्या पहिल्या शतकांत 'अपरांत' शातवाहन राजांच्या आधिपत्याखालीं गेला. इसवी सनाच्या चवथ्या शतकांत कोंकण (अपरांत) कलचुरी घराण्यांतील राजांच्या वर्चस्वाखालीं आला. चालुक्य व शिलाहर या दोन राजवंशांनीं अपरांतावर चारशें वर्षें (८६० ते १२६०) राज्य केलें. याच काळांत सध्यांच्या मलबार हिलवरील वालुकेश्वराचें सुप्रसिद्ध मंदिर बांधलें गेलें. १२६० सालीं कोंकण प्रांत देवगिरीच्या यादव साम्राज्याखालीं आला व तो १३१८ पर्यंत त्यांच्याच सत्तेखालीं होता.

रामदेवराव यादवाच्या कारकीर्दीत, दिल्लीचा बादशहा जो जलालुद्दीन खिलजी त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन यानें देवगिरीवर स्वारी केली तेव्हां पुरेशा सैन्यबळाच्या अभावीं रामदेवरावाला त्याच्याशीं तह करावा लागला. दरम्यान रामदेवरावाचा मुलगा

शंकरदेव यानें अल्लाउद्दिनाला तोंड देण्याचा प्रयत्न केला होता, पण तोहि अयशस्वी झाला. या धामधुमींत रामदेवरावाचा दुसरा मुलगा भीमदेव (बिंबदेव) राजगुरु पुरुषोत्तम कावळे यांसह उत्तर कोंकणांत आला व तेथें त्यानें आपली सत्ता प्रस्थापित केली. माही-माहीम (मुंबईचें माहीम) हें नगर त्यानेंच वसविलें व तेथें आपली राजधानी स्थापन केली. भीमदेवाबरोबर आलेल्या मंडळींत पैठण, मुंगी, पुणतांबें येथील कित्येक ब्राह्मण मंडळी होती.

भीमदेवानंतर त्याचा मुलगा प्रतापदेव व त्याच्या नंतर नागरदेव यांनीं कोंकणच्या या भागावर राज्य केलें. नागरदेवाच्या जुलमी राजवटीला कंटाळून त्याच्या एका सरदारानें गुजराथच्या मुसलमान सुलतानाची मदत घेतली व नागरदेवाचा नाश केला (१३४५). पण त्याचबरोबर हिंदु सत्ताहि नष्ट झाली व या भागावर मुसलमानांचा अंमल चालू झाला.

मुसलमान-पोर्तुगीज-इंग्रज

मुसलमानांच्या अंमलाखालीं मुंबई दोन शतकें राहिली. या अवधींत बहामनी राज्यकर्ते व गुजराथचा बादशहा यांच्यांत मुंबईवरील वर्चस्वासाठीं झगडा चालू होता. त्यावेळीं मुंबईचा उपयोग केवळ एक लष्करी ठाणें म्हणून केला जात होता. या भागावर मुसलमानांचें सार्वभौमत्व असलें तरी प्रत्यक्ष कारभाराचे लगाम हिंदूंच्याच हातीं असत. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला गुजराथच्या बहादुरशहाला वारंवार त्रास देऊन पश्चिम किनाऱ्यावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याची पोर्तुगीजांनीं जोरांत सुरुवात केली. पोर्तुगीजांचें लष्करी सामर्थ्य लक्षांत आल्यावर बहादुरशहानें वसई व त्याच्या आसपासचा मुलुख पोर्तुगीजांना देऊन त्यांच्याशीं मित्रत्व जोडलें व अशा रीतीनें मुंबई पोर्तुगीजांच्या अंमलाखालीं आली (१५३४). त्यावेळीं मुंबईचें स्वरूप एखाद्या लहानशा गांवाप्रमाणेंच होतें. घरें सुमारें ४०० व लोकवस्ती

जवळजवळ ५००० होती. यांत कोळी, भंडारी व पांचकळशी या जाती प्रामुख्यानें होत्या. मुंबई पोर्तुगीज सत्तेखालीं १६६५ पर्यंत होती. १६६१ मध्यें पोर्तुगीज राजकन्येचा विवाह इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स् याच्याशीं झाला व हुंड्याचा एक भाग म्हणून पोर्तुगालच्या राजानें मुंबई हें बेट आपल्या जांवयास दिलें.

मुंबईची वस्ती

निरनिराळ्या राजवंशांच्या कारकीर्दीत मुंबईच्या वस्तींत नवी नवी भर पडत होती. सामवेदी व गोवर्धन ब्राह्मण मुंबईचे पहिले रहिवासी होत. शातवाहनांचे गुरु शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण होते. शिलाहारांच्या कारकीर्दीपासून उत्तर कोंकणांत कायस्थ प्रभु राहात असावे असें दिसतें. यादवांचा कोंकणांतील महाप्रधान कृष्ण कावळे हा भारद्वाज गोत्री यजुर्वेदी ब्राह्मण होता. भीमदेवानें पैठणहून यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचीं ९ ब्राह्मण कुळें आणलीं व त्यांबरोबर आलेल्या इतर लोकांत कुणबी, आग्री, सूर्यवंशी, पांचाळ, लाड इत्यादि लोकांचा उल्लेख आढळतो. शिलाहारांच्या उदार धोरणामुळें पश्चिम किनाऱ्यावर ज्यू, ख्रिश्चन, पारशी वगैरे लोकांची वस्ती झाली. इ. स. १६६९ त मुंबईचा गव्हर्नर म्हणून जेरॉल्ड अँजीर होता व आजच्या मुंबईच्या स्वरूपाचा पाया त्यानेंच घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं. तटबंदीची डागडुजी, टांकसाळ, इस्पितळ व पंचायतीची स्थापना केल्यामुळें लोकसंख्येंत वाढ झाली व व्यापारहि हळुहळू वाढूं लागला. व्यापाराच्या निमित्तानें कांहीं लोक गुजराथेंतून मुंबईंत येऊं लागले. त्या वेळच्या लोकवस्तींत ब्राह्मण, प्रभु, शेणवी, भंडारी, कुणबी, कोळी व बनिया यांचा उल्लेख आढळतो.

पोर्तुगीजांच्या अंमलांत धर्मच्छल होत होता. इंग्रजांनीं धर्माच्या बाबतींत तटस्थपणाचें धोरण आंखलें होतें. शिवाय आपल्या अंमलाखालीं

असलेल्या मुलखांत शांतता, सुव्यवस्था व कोणालाहि न्याय मिळण्याची सोय इंग्रजांनीं केल्यामुळें स्वाभाविकपणेंच शेजारच्या पोर्तुगीज अंमलाखालील लोक मुंबईला अधिकाधिक संख्येनें येऊं लागले.

इंग्रजी अंमलाखालीं

इ. स. १८१८ त पेशवाई नष्ट झाली नि इंग्रजांची सार्वभौम सत्ता प्रस्थापित झाली. शनिवारवाड्यावरील भगवा ध्वज खालीं आला आणि महाराष्ट्राच्या राजधानीचें शहर होण्याचा मान पुण्याहून मुंबईकडे आला.

राज्यकर्त्यांची भाषा अवगत असली म्हणजे नोकरी मिळणें सुलभ होतें असें हळुहळू सर्वांच्या अनुभवास येऊं लागलें. रा. गोविंद नारायण माडगांवकर यांच्या 'मुंबईवर्णन' या पुस्तकांतील पान २३८ वर पुढील वर्णन आहे : 'देशाच्या निरनिराळ्या भागांतील ब्राह्मणांचीं पुष्कळ अनाथ मुलें इंग्रजीचा अभ्यास करण्यासाठीं प्रतिवर्षीं मुंबईस येत असतात. कोणी आचाऱ्याचें, कोणी शागीर्दाचें अशीं कामें पत्करून अवकाश सांपडेल त्यावेळीं शाळेंत जाऊन इंग्रजी शिकतात तर कित्येक भिक्षा किंवा मधुकरी मागून पोट भरतात आणि शाळेंत जाऊन इंग्रजीचें ज्ञान संपादन करतात.'

इ. स. १८२२ च्या सुमारास इंग्रज सरकारनें पाठशाळांकरितां देशी भाषेंत पुस्तकें रचण्याकरितां कित्येक विद्वान लोकांची नेमणूक केली. या कामासाठीं पुष्कळसे विद्वान लोक पुण्याहून मुद्दाम आणण्यांत आले. त्या वेळीं उत्तर कोंकणांतील अष्टागर प्रांतांतूनहि कांहीं विद्वान ब्राह्मण मुंबईस आले.

सरकारनें प्रथमच रा. गंगाधरशास्त्री फडके यांची शाळांवर देखरेख करणारे अधिकारी म्हणून नेमणूक केली. त्याचप्रमाणें त्या वेळच्या प्रमुख मंडळींत सदाशिव काशीनाथ छत्रे (यांनीं इसापनीति, बाळमित्र वगैरे ग्रंथ इंग्रजींतून मराठींत भाषांतरित केले), परशुराम

बल्लाळ गोडबोले (नवनीत वगैरे ग्रंथांचे कर्ते), बाळशास्त्री जांभेकर, माडखोलकर इत्यादि नांवें आढळतात.

सिंधपासून धारवाड–हुबळी–कारवारपर्यंतचा पश्चिम किनाऱ्यावरील मुलुख समाविष्ट असलेल्या मुंबई इलाख्याचें राजधानीचें शहर मुंबई झाल्यामुळें मुंबई शहराची सर्वांगीण भरभराट सुरू झाली. मुंबई शहराची आधुनिक पद्धतीनुसार आंखणी झाली. मोठमोठीं जहाजें धक्क्याला लागूं शकतील अशा रीतीची मुंबई बंदरांत सुधारणा झाली. रेल्वेची सोय करण्यांत येऊन पोस्ट व तारायंत्र हीं खातींहि सुरू झालीं. मुंबई विश्वविद्यालय स्थापन झालें. कापडाच्या गिरण्या व इतर मोठ-मोठे कारखाने यांची उभारणी झपाट्यानें सुरू झाली. हायकोर्ट स्थापन झालें. अत्यंत नमुनेदार अशी नगरपालिका स्थापन झाली. या सर्वांचा परिणाम लोकसंख्या झपाट्यानें वाढण्यांत झाला. अर्थात्, इतर जातींच्या वस्तीप्रमाणें ब्राह्मणांची येथील वस्तीहि वाढूं लागली.

काळबादेवी, विठ्ठलवाडी, फणसवाडी, कांदेवाडी, पालवा रस्ता, गिरगांव वगैरे भागांत ब्राह्मण कुटुंबें राहूं लागलीं. रा. महादेव गोविंद-शास्त्री कोल्हटकर, रावसाहेब भास्कर दामोदर पाळंदे, रा. सा. नारायण विष्णु बापट, रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक, प्रिन्सिपॉल वामन आबाजी मोडक, डॉ. गोपाळ शिवराम वैद्य, डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे, डॉ. विठ्ठल विष्णु गोखले, त्र्यंबकशास्त्री वैद्य, नारायण बाळकृष्ण गोडबोले, गोपाळ मोरेश्वर साठे, विनायक कोंडदेव ओक, गोविंद शंकरशास्त्री बापट, महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर, लोकहित-वादी गोपाळराव देशमुख इत्यादि विद्वान लोक त्यावेळच्या ब्राह्मण मंडळींत दिसून येतात.

(२) ब्राह्मण सभेची स्थापना (१८८८)

इ. स. १८५७ मध्यें, इंग्रजांच्या गुलामगिरींत सडत पडलेला हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून हिंदी देशभक्तांनीं इंग्रजी राज्यसत्तेविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. अर्थात्, आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठीं झालेला तो प्रयत्न अयशस्वी ठरल्यामुळें त्याला 'बंड' असें हिणकस नांव इंग्रजांनीं दिलें; पण तो प्रयत्न यशस्वी झाला असता तर त्याला 'स्वातंत्र्ययुद्ध' हेंच नांव मिळालें असतें! पण दुर्दैवानें म्हणा किंवा अन्य कोणत्याहि कारणानें म्हणा, हिंदी क्रांतिकारकांना त्यांत अपयशाचें धनी व्हावें लागलें. या राजकीय कटाशीं ज्यांचा म्हणून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असल्याचा इंग्रजांना वहीम आला त्यांना त्यांना पुढें कांहीं वर्षें भयंकर हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. सुमारें दहा पंधरा वर्षांनंतर काळ थोडासा बदलला. देशांत निराळ्या विचारसरणीचे प्रवाह वाहूं लागले. इंग्रजांचा इतका जबरदस्त वचक बसला कीं, देव्हाऱ्यांतील देव व राज्यकर्ते इंग्रज या दोघांनाहि सारखेच पूज्य मानण्यापर्यंत कांहीं लोकांची मजल गेली! जो वर्ग बुद्धिमान म्हणून गणला गेला होता त्यांतील बहुतेकांची विचारसरणी अशा प्रकारची झालेली होती. इंग्रजी म्हणजेच पाश्चात्य संस्कृतीनें या लोकांच्या मनाची जबरदस्त पकड घेतली आणि याचा परिणाम म्हणजे प्रत्येक गोष्टीची चिकित्सा

होऊं लागली. इंग्रजांच्या वैभवानें दिपून गेल्यामुळें त्यांनीं पुरस्कारिलेलें तें सर्व चांगलें आणि आपण हिंदी लोक जें जें चांगलें म्हणून आजवर समजलों तें सर्व वाईट असें हा बुद्धिमान वर्ग हिरीरीनें प्रतिपादूं लागला.

वादळानंतर

पण आपल्याहि परंपरेला कांहीं इतिहास आहे, आपली अत्यंत उज्ज्वल आणि स्वतंत्र अशी विशिष्ट संस्कृति आहे, देशकालमानाप्रमाणें त्यांत कांहीं सुधारणा करणें अवश्यच असलें तरी त्या सुधारणा आपल्या आपणच करावयाच्या आहेत—त्यासाठीं आपण आपली केंविलवाणी नजर इंग्रजांकडे कधींहि टाकतां कामा नये—अज्ञानांधःकारांत खितपत पडलेला आपला समाज ज्ञानसंपन्न करण्याची कामगिरी आपणालाच करावयाची आहे—तें काम परकीय सरकारच्या शिक्षणखात्यानें किंवा खिस्ती मिशनऱ्यांनीं चालविलें तर त्याचीं अत्यंत कटु फळें आपणास चाखावीं लागतील—अशाहि विचारसरणीचा संख्येनें लहान पण तेजस्वी वृत्तीचा असा एक वर्गहि देशांत हळुहळू निर्माण होऊं लागला होता, ही त्यांतल्या त्यांत अभिमानाची नि आनंदाची गोष्ट होय. अशा लोकांच्या प्रयत्नांमुळेंच न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज व पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. रा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं पहिल्यानें निबंधमाला व नंतर केसरी आणि मराठा हीं वर्तमानपत्रें सुरू केलीं.

सत्यशोधक समाज

महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर समाजहि जागा होऊन आत्मनिरीक्षण करूं लागला होता. कै. ज्योतिराव फुले यांनीं स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजानें ब्राह्मण समाजावर प्रखर हल्ले सुरू केले होते. वेद, मूर्तिपूजा, चातुर्वर्ण्य आणि पौरोहित्य हीं सर्व झुगारून दिलीं पाहिजेत—किंबहुना यांमुळेंच ब्राह्मणेतर समाज अवनतावस्थेला पोहोंचला अशा

प्रसाराचा सत्यशोधक समाजानें धूमधडाका सुरू केला. राज्यसत्ता सर्वस्वीं इंग्रजांच्या हातीं असली तरी कित्येक महत्त्वाच्या नोकऱ्या पटकावण्यांत ब्राह्मण समाजाला यश मिळाल्यामुळें ब्राह्मणेतर समाजाचा जळफळाट सुरू झाला. महाराष्ट्रांत मराठा समाज बहुसंख्य असल्यामुळें त्या समाजाची धार्मिक गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय त्याची उन्नति होणें शक्य नाहीं अशा मतांचा जोरांत प्रचार चालू झाला. कांहीं तरी करून ब्राह्मण समाजाचें नाक खालीं करावयाचें असा जणूं सत्यशोधक समाजानें विडाच उचलला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ब्राह्मणवर्गाला इशारा

अशा परिस्थितींत जें जें होईल तें तें स्वस्थपणें पहात बसणें ब्राह्मण समाजास शक्य नव्हतें व इष्टहि नव्हतें. आपल्या समाजावर अन्यायानें होणाऱ्या आक्रमणास तोंड देऊन आपली सत्य बाजू जगापुढें मांडली पाहिजे व यासाठीं आपल्या समाजाचा एक संघ स्थापन झाला पाहिजे असें समाजांतील अनेक विचारवंतांस वाटूं लागलें. या संबंधानें जागो-जागीं खलहि सुरू झाले. ब्राह्मण समाजांत जी ही एक प्रकारची खळ-बळ सुरू झाली होती तिचें प्रतीक म्हणजे दि. ३–७–१८८७ च्या 'वार्ताहर' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेला इंग्रजी लेख होय. या साप्ताहिकांत मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांत लेख येत असत. हें वृत्तपत्र मुंबईतील पाठारे प्रभु ज्ञातींतील एक गृहस्थ चालवीत असून त्याच्या संपादनाचें काम श्री. भागवत या नांवाचे गृहस्थ करीत. श्री. भागवत नि श्री. यशवंत वासुदेव आठल्ये यांचा फार स्नेह होता. श्री. भागवतांच्या आग्रहावरून सदर श्री. आठल्ये या वृत्तपत्रासाठीं अधून मधून इंग्रजी लेख देत असत. वर निर्दिष्ट केलेला लेख श्री. आठल्ये यांचाच असल्याचें त्यावेळीं बोलले जात असे. त्या लेखाचा गोषवारा खालीं दिला आहे:—"ब्राह्मणांना

कमी लेखण्याचे इतरांकडून पराकाष्ठेचे प्रयत्न होत आहेत. आपणावर कुत्सितपणें करण्यांत येत असलेल्या आघातांकडे ब्राह्मणांनीं आजपर्यंत तुच्छतापूर्वक दुर्लक्ष केलें आहे. पण अतःपर त्यांनीं असें औदासीन्य न दाखवितां आपला संघ स्थापून समाजाचें हित पाहिलें पाहिजे. ब्राह्मणांवर खोटेनाटे आरोप करून त्यांची बदनामी केली जात आहे, त्यांच्याबद्दल वाटेल तसले गैरसमज पसरविले जात आहेत नि त्यांच्यावर जातीयतेचाहि आरोप केला जात आहे. जातीजातींतील वैमनस्यामुळें राष्ट्रीय प्रगतीस अडथळा होतो हें राष्ट्राच्या प्रत्येक हितचिंतकानें लक्षांत ठेवलें पाहिजे. दहा ते सतरा या शतकांच्या काळांत ब्राह्मणांनीं इतरांना विद्यार्जन करूं दिलें नाहीं हा जो आरोप आहे त्यांत कांहींच अर्थ नाहीं. कारण त्या काळांत ब्राह्मणांच्या हातीं कोणत्याहि प्रकारची सत्ताच नव्हती. सतराव्या शतकानंतरच्या काळांतहि ब्राह्मण कांहीं एकटेच सत्ताधीश नव्हते. ब्राह्मणांप्रमाणेंच मराठेहि तेव्हां सत्ताधीश होते. मग त्यावेळीं ब्राह्मणांनीं आम्हांला विद्या शिकूं दिली नाहीं असा कांगावा करण्यांत काय अर्थ आहे? तो काळच मुळीं क्षात्रवृत्तीचा होता. लोकांचे विनाकारण पाय ओढून आपली उन्नति होत नाहीं. परकीय सत्तेच्या तावडींतून आपला देश मुक्त करण्यांतच सर्व जातींचा मोठेपणा आहे. म्हणून ब्राह्मणांच्या एके काळच्या मोठेपणाबद्दल जातां बोटें मोडीत बसणें इष्ट नाहीं."

योगायोग असा कीं, सन १८९३ मध्यें ब्राह्मणसभेच्या साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून वरील लेखाचे लेखक श्री. यशवंत वासुदेव आठल्ये यांची निवड झाली.

वरील लेख प्रसिद्ध झाला त्याच सुमारास श्री. नारायण हरि भागवत या अत्यंत जिज्ञासु व विद्वान लेखकानें लिहिलेला 'सध्यांचे तट व आमच्यांतील भेद' हा निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाला होता. त्यांत त्या वेळच्या देशस्थितीचें व समाजांच्या एकंदर

परिस्थितीचें चिकित्सक परीक्षण करण्यांत आलेलें होतें. ब्राह्मण-अब्राह्मणांत, ब्राह्मणेतर म्हणून ओळखिल्या जाणाऱ्या मराठ्यांत नि एकंदर हिंदु समाजांत व त्या समाजाचे धर्मगुरु म्हणून समजल्या गेलेल्या श्रीशंकराचार्यांत नित्य चाललेल्या कटकटी, एकमेकांचीं कांहीं तरी खुसपटें काढून करा एकमेकांवर फिर्यादी, काढा एखादें वर्तमानपत्र आणि द्या वाटेल तसल्या खोट्यानाट्या निंदेची झोड उडवून, असल्या प्रकारचे जे देशाच्या नि एकंदर हिंदु समाजाच्या हिताला परम विघातक असे अनिष्ट प्रकार तेव्हां सुरू झाले होते त्यांची या पुस्तकांत मुद्देसूद रीतीनें हजेरी घेण्यांत आली होती. या साऱ्या अनिष्ट प्रकारांतून योग्य मार्ग कसा काढावा, समाजाची बिसकटलेली घडी पुन्हा व्यवस्थित कशी बसवावी, सर्वांची एकी घडवून आणून समाजाची व देशाची उन्नति कशी साधावी याचेंहि या पुस्तकांत मोठ्या कळकळीनें मार्गदर्शन करण्यांत आलें होतें. 'वार्ताहर' पत्राच्या वरील अंकांतच या पुस्तकावरील अभिप्राय प्रसिद्ध झाला होता. त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'आपल्या समाजाची व देशाची उन्नति कशी करावी याचें मार्गदर्शन या पुस्तकांत केलें आहे.' सदर पुस्तकांत, ब्राह्मण समाजानें आपला आळस झाडून टाकून, अंतर्बाह्य परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करून कार्याला लागण्याची वेळ आलेली आहे अशी स्पष्ट सूचना करण्यांत आलेली होती.

अंतर्गत परिस्थिति

ब्राह्मण समाजावर बाहेरील समाजांचे हल्ले सुरू होते नि त्या समाजाची अंतर्गत परिस्थिति फारशी चांगली होती असेंहि नाहीं. ब्राह्मण समाजांतील अनेकांना पाश्चात्य शिक्षणाचा लाभ मिळाला असल्यामुळें त्यांना निरनिराळ्या क्षेत्रांत नोकऱ्या मिळालेल्या होत्या. त्यांपैकीं कांहींना नोकरीनिमित्त परदेशगमनहि करावें लागे. त्या वेळीं

समुद्रयान करणें हें धर्मबाह्य समजलें जात असे. रावसाहेब मंडलीक यांच्या चरित्रांत याबद्दलचीं कांहीं गंमतीचीं उदाहरणें आढळतात. रावसाहेबांच्या एका स्नेह्यानें दि. ४-१-१८६० ला त्यांस एक पत्र लिहिलें होतें. त्याला चीन देशांत जाण्याचा हुकूम मिळाला होता. 'ब्राह्मणाला पतित न होतां परदेशीं जातां येईल काय ?' अशी त्या पत्रांत पृच्छा करण्यांत आली होती. करसनदास मूळजी हे धनाढ्य व्यापारी विलायतेहून परत आल्यावर त्यांस पंक्तिपावन करून घेण्याकरितां राव-साहेबांनीं खूप खटपट केली. वजनदार वाणी लोकांची सभा भरवून करसनदास यांचें कृत्य धर्मबाह्य नाहीं असें त्यांना पटवून दिलें. याचा परिणाम म्हणून या गृहस्थावर पडलेल्या बहिष्काराचें स्वरूप हळुहळू कमी तीव्र होऊं लागलें व कांहीं काळानें तो पंक्तिपावन गणला जाऊं लागला. रावजी भवानराव पावगी हे विद्वान मराठी लेखक कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं एका संस्थानिकाबरोबर विलायतेस गेले होते. ते योग्य प्रकारें स्वधर्म संरक्षून परत आले तेव्हां त्यांच्या विनंतीवरून ब्राह्मण मंडळींनीं त्यांना प्रायश्चित्त दिलें. त्या वेळीं हिंदुधर्मसभा म्हणून एक संस्था अस्तित्वांत होती. त्या सभेनें ठराव केला कीं, श्री. पावगी हे उपरोक्त प्रायश्चित्तानें कर्महि होतील म्हणजे त्यांना स्वतःला जीं स्नानसंध्यादि नित्य कर्में करावयाचीं तीं करण्याचा अधिकार प्राप्त होईल पण ते व्यवहार्य म्हणजे दुसऱ्याबरोबर पंक्तिव्यवहार वगैरे करण्यास अनधिकृतच राहातील. रावसाहेबांना सदर सभेचा वरील ठराव पसंत पडला नाहीं. स्नानसंध्यादि कर्में करण्यांत ज्याला कांहीं आडकाठी उरलेली नाहीं तो व्यवहार्यहि ठरला पाहिजे असें त्यांचें मत होतें. श्रीमंत होळकर सरकार यांचे कामानिमित्त विलायतेस गेलेले श्री. गणेश सीतारामशास्त्री गोळवलकर यांना १८७२ सालीं श्रीमज्जगद्गुरु मठ संकेश्वर यांनीं नामांकित शास्त्रीमंडळीच्या अनुमतीनें प्रायश्चित्त देऊन पंक्तिपावन करून घेतलें, हा आधार देऊन रावसाहेबांनीं श्रींस

संस्कृत भाषेंत एक विज्ञप्तिपत्र लिहिलें. १८८८ मध्यें श्रींनीं आज्ञापत्रक काढलें कीं, प्रायश्चित्त घेतलेला मनुष्य कर्महि व व्यवहार्य होतो. रावसाहेबांना अशा प्रकारें यश आलें.

ब्रह्मपरिषद्

इंग्रजी शिक्षणाचा प्रसार सुरू झाल्यापासून ब्राह्मण ज्ञातींत जातीचीं बंधनें शिथिल होऊं लागलीं. पूर्वी धर्मविषयक प्रश्न शास्त्रीपंडित सोडवीत असत व अखेरचा निर्णय श्रीशंकराचार्य देत. तें बंद झालें. कालमानाप्रमाणें रूढीमध्यें फरक करण्याचें शास्त्रीपंडितांना जमेना. इंग्रजी शिकलेले लोक स्वतःलाच पंडित मानूं लागले व ते शास्त्री-पंडितांचें व शंकराचार्यांचेंहि ऐकेनासे झाले. दोन्ही बाजू हट्टास पेटलेल्या पाहून इंग्रजी शिक्षण व शास्त्राभ्यास या दोहोंतहि पारंगत असलेले लोक अर्थातच मध्यें पडले. इतर जातींमध्यें ज्याप्रमाणें जातिनियमांप्रमाणें आचरण करण्यास त्या त्या जातींतील घटकांस भाग पाडतां येतें तसेंच ब्राह्मण समाजांतहि होण्याकरितां ब्राह्मण ज्ञातीची संघटना करणें आवश्यक आहे हें ज्ञातींतील विचारवंतांस कळून चुकलें. तेव्हां 'ब्रह्मपरिषद' नांवाची संस्था १८८७ सालीं स्थापन करण्यांत आली. जातिविषयक प्रश्न या संस्थेमार्फत किंवा श्री शंकराचार्यांच्या मार्फत सोडवून घ्यावे असें ठरविण्यांत आलें. ब्रह्मपरिषदेच्या सभा-सदांच्या यादींत पुढील नांवें दिसतातः—

(१) रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक
(२) गोविंद जोशी चिपळूणकर
(३) जनार्दन दामोदर ऊर्फ आबासाहेब कोल्हटकर
(४) गोपाळ मोरेश्वर साठे
(५) दाजी आबाजी खरे
(६) बाळ यज्ञेश्वरशास्त्री गुर्जर

(७) डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख
(८) रामचंद्र गणेश मुंडले वकील
(९) नारायण त्र्यंबक वैद्य
(१०) डॉ. गोविंद बाळाजी खेर
(११) गोविंद गंगाधर फडके
(१२) सखाराम धोंडदेव थोरात
(१३) माधवराव वासुदेव पेंडसे वाडीवाले
(१४) नारायण रामचंद्र सोहनी
(१५) धोंडो शामराव गरुड सॉलिसिटर
(१६) दामोदर कृष्ण करंदीकर
(१७) काशीनाथ त्र्यंबक खरे
(१८) गोविंद कृष्ण रानडे
(१९) गोविंद शंकरशास्त्री बापट
(२०) शास्त्री, एल्फिन्स्टन हायस्कूल
(२१) नरहर विष्णु काथवटे
(२२) पांडुरंग हरि वैद्य
(२३) महादेव गोपाळशास्त्री अमरापूरकर
(२४) यशवंत विष्णु नेने
(२५) यशवंत मोरेश्वर केळकर
(२६) राजारामशास्त्री बोडस
(२७) विनायक कोंडदेव ओक
(२८) शिवराम वामन साधले
(२९) प्रो. जिनसीवाले
(३०) हरिबुवा रामदासी
इ. इ.

या परिषदेस श्रीशंकराचार्यांचा आशीर्वाद मिळावा म्हणून राव-

साहेबांनीं त्यांस विनंतीपत्र लिहिलें व रावसाहेबांसारख्या आंग्लविद्या-विभूषित सन्मान्य गृहस्थाकडून अशा प्रकारचा प्रयत्न व्हावा याबद्दल आनंद व्यक्त करून श्रींनीं या परिषदेस आपली मान्यता दिली.

या परिषदेच्या सभा कांहीं दिवस भरत असत. परिषदेमार्फत एका अपंक्त मनुष्याला शुद्ध करून घेण्वांत आलें. पण पुढें स्वतःच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें रावसाहेबांना परिषदेच्या कामांत भाग घेणें अशक्य होऊन बसलें.

अपुरें कार्यक्षेत्र

ब्राह्मण ज्ञातींत उत्पन्न होणारे धार्मिक प्रश्न ज्ञातींतील विचारी माणसांच्या संमतीनें सोडविणें अशा प्रकारचें फारच मर्यादित क्षेत्र सदर परिषदेचें असल्यामुळें त्या परिषदेच्या सभासदांना कालांतरानें तें अपुरें वाटूं लागलें. या ज्ञातींतील धार्मिक कार्यांबरोबरच सामाजिक कार्येंहि करण्याची त्यांना आवश्यकता वाटूं लागली. ब्राह्मणेतर ज्ञातींची कोणत्याहि प्रकारें मानहानि न करतां ब्राह्मण ज्ञातीची संघटना करणें, ब्राह्मण ज्ञातीविरुद्ध विनाकारण करण्यांत येणाऱ्या अपप्रचाररूपी हल्ल्याला तोंड देणें, देशकालवर्तमानानुसार ब्राह्मण ज्ञातीनें स्वतःमधील दोष नाहींसे करून इतर लोकांना त्या ज्ञातीची निंदा करण्याची लाज वाटावी अशा प्रकारचें आचरण ठेवणें, प्रचलित महत्त्वाच्या प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करून ज्ञानप्राप्ति करून घेणें, परस्परांत खेळीमेळीचें वातावरण निर्माण होण्यासाठीं सात्त्विक करमणुकीच्या निमित्तानें ज्ञातिबांधवांनीं वारंवार एकत्र येणें, अशा प्रकारच्या अनेकविध कार्यांच्या कामीं जिचा उपयोग होईल अशा प्रकारची संस्था अस्तित्वांत येणें अत्यंत आवश्यक आहे असें त्यांस वाटूं लागलें.

डॉ. मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमुख यांची १८७९ सालीं केमिकल ॲनलायझर म्हणून नेमणूक झाली. त्याच सुमारास

कै. रावबहादुर य. मो. केळकर

रावबहादुर वापूसाहेब आठल्ये

सर भालचंद्र कृष्ण

रावसाहेब मंडलिक

दाजी आबाजी खरे

श्री. यशवंत वासुदेव आठल्ये हे एल्एल्. बी. झाले. त्यांचे बंधु डॉ. आठल्ये, श्री. दाजी आबाजी खरे, रा. सा. रावजी भवानराव पावगी इ. मंडळी डॉ. नानासाहेबांच्या घरीं रात्रीं बुद्धिबळें वगैरे खेळण्यास जमत असत. त्यावेळीं अनेक विषयांसंबंधानें चर्चा होत. यांपैकीं बहुतेक गृहस्थ रावसाहेब मंडलीक यांच्या नेतृत्वाखालीं सुरू झालेल्या ब्रह्म-परिषदेचे सदस्य होते. व्यापारधंद्यासाठीं किंवा नोकरीच्या निमित्तानें अनेक ब्राह्मण लोक मुंबईंत येतात; पण त्यांना एकत्र येतां येईल अशी एखादी संस्था नाहीं म्हणून या लोकांना बरें वाटेना. अशी संस्था सुरू करण्याबद्दल या लोकांत वारंवार वाटाघाटी चालू असत व त्याप्रमाणें अशी एखादी संस्था स्थापन करण्याच्या दृष्टीनें जागेची शोधाशोध सुरू झाली.

ब्राह्मण सभेची स्थापना

रविवार दि. २२ जानेवारी १८८८ ला काळबादेवी रस्त्यावर सरदार किबे यांच्या वाड्यांत मुंबईंतील ब्रह्मवृंदांची एक सभा झाली. सदर सभेंत, मुंबईंतील ब्राह्मणवर्गाची परिस्थिति व त्या वर्गाच्या गरजा यांसंबंधीं कळकळीनें विचार करणारी एखादी संस्था असणें किती अवश्य आहे यासंबंधीं भाषणें होऊन अशी संस्था अवश्य सुरू करावी असें ठरलें. या संस्थेला नांव काय द्यावें याबद्दलच्या चर्चेला सुरुवात झाली. 'डेक्कन क्लब' हें नांव सुचविण्यांत आलें पण डेक्कनीज म्हणजे नुसते ब्राह्मणच नव्हेत म्हणून तें नांव निकालांत काढण्यांत आलें. नंतर 'ब्राह्मण ऐक्यवर्धक सभा' हें नांव सुचविण्यांत आलें. या नांवाबद्दलहि कांहीं लोकांनीं आक्षेप घेतले. तेव्हां हें नांव तात्पुरतें मान्य करण्यांत येऊन सदर संस्थेला योग्य असें नांव देण्यासाठीं नि त्या संस्थेचे उद्देश व नियम तयार करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली. संस्थेसाठीं सभासद नोंदवून घेण्याचा अधिकारहि या समितीस देण्यांत आला.

संस्थेसाठीं ताबडतोब जागा मिळवून कांहीं तरी कार्य सुरू करण्यांत यावें असाहि सदर सभेनें आदेश दिला. सभेंत सुमारें पन्नास गृहस्थांनीं सभासदाच्या नात्यानें आपलीं नांवें नोंदविलीं.

उपरोक्त समितीनें, त्यावेळीं पालवा रोड या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या रस्त्यावर सारस्वतांच्या वाडींतील एक प्रशस्त अशी खोली सभेसाठीं भाड्यानें घेतली व सभेचें नांव 'ब्राह्मण सभा' असें ठेवलें. ब्राह्मण लोकांत प्रेम व ऐक्य वाढावें, त्यांना करमणूक करतां यावी, त्यांच्यांत ज्ञानाचा प्रसार व्हावा अशा प्रकारचा सभेचा उद्देश असल्याचें ठरविण्यांत आलें. सभेच्या कामाच्या व्यवस्थेकरितां पुढीलप्रमाणें अधिकारी असावेत व त्यांची निवडणूक प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यांत व्हावी असें ठरविण्यांत आलें.

साधारण सभा—

१ अध्यक्ष व १ उपाध्यक्ष

व्यवस्थापक सभा—

१ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, ८ सभासद व एक चिटणीस व खजीनदार.

सभेच्या कार्यव्यवस्थेसंबंधानें नियमांचा मसुदा तयार करण्यांत आला व त्यांत सर्वसाधारण नियमांबरोबर पुढील नियम करण्यांत आले:—

सभासद होऊं इच्छिणारानें स्वतःचें व वडिलांचें नांव, आडनांव, वय, धंदा, राहाण्याचें ठिकाण व व्यवसायाचा पत्ता देऊन सूचक-अनुमोदकांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्या व तें पत्र चिटणीसांकडे द्यावें आणि चिटणीसांनीं तें व्यवस्थापक सभेपुढें पसंतीसाठीं ठेवावें. व्यवस्थापक सभेवर लागोपाठ तीन वेळां निवडून येणाऱ्या गृहस्थानें चवथ्या वर्षीं निवडणुकीस उभें राहूं नये.

येणेंप्रमाणें दि. २२-१-१८८८ च्या प्रकट सभेनें नेमलेल्या समितीनें आपल्या शिफारशींचा वृत्तान्त तयार केला व त्याचा विचार

करण्याकरितां रविवार दि. १७–६–१८८८ ला प्रकट सभा बोलावण्यांत आली. सदर सभेंत, पूर्वी मान्य करण्यांत आलेल्या उद्देशांत कांहीं अधिक शब्द घालून तो पुढीलप्रमाणें असावा असें ठरलें:—'ब्राह्मण लोकांचें आपसांत व इतर लोकांशीं प्रेम व ऐक्य वाढावें, त्यांची करमणूक होऊन त्यांस ज्ञानप्राप्ति व्हावी व त्यांच्याकडून ज्ञानाचा प्रसार व्हावा.' सभेचें नांव व नियम मान्य करण्यांत येऊन 'ब्राह्मण-सभा' स्थापन झाल्याचें घोषित करण्यांत आलें व पहिल्या वर्षाच्या कार्यकारी मंडळासाठीं पुढील गृहस्थांची निवडणूक झाली :—

साधारण सभेचे अध्यक्ष—

रा. ब. यशवंतराव मोरेश्वर केळकर

उपाध्यक्ष—

रा. धोंडो वामन गरुड, सॉलिसिटर

व्यवस्थापक सभेचे अध्यक्ष—

प्रा. श्रीधर गणेश जिनसीवाले

उपाध्यक्ष—

डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख

सभासद—

रा. रा. दाजी आबाजी खरे
,, ,, रामचंद्र गणेश मुंडले
,, ,, पुरुषोत्तम परशुराम खरे
,, ,, लक्ष्मण रामचंद्र वैद्य
,, ,, नारायण रामचंद्र सोहोनी
,, ,, नारायण त्र्यंबक वैद्य

चिटणीस—

रा. रा. जनार्दन दामोदर कोल्हटकर

(३) १८८८ ते १९००

'ब्राह्मणसभा' या संस्थेची याप्रमाणें दि. १७ जून १८८८ रोजीं स्थापना झाली आणि ज्या गृहस्थांस कांहीं तरी सामाजिक कार्य करण्याची हौस व तळमळ होती अशांचाच त्या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळांत समावेश करण्यांत आला. सभेचे अध्यक्ष रावबहादुर यशवंत मोरेश्वर केळकर हे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे निकटचे स्नेही होते. यामुळें सभेला न्यायमूर्तींची सहानुभूति मिळेल असा विश्वास उत्पन्न झाला होता.

तक्रारी व सूचना

थोड्याच दिवसांत निरनिराळ्या प्रकारच्या तक्रारी व सूचना ब्राह्मण सभेकडे येऊं लागल्या. एका चाळींत एक तरुण गतभर्तृका भिक्षा मागतांना आढळली. तिच्या सासरच्या मंडळींनीं तिला विनापराध घराबाहेर काढलें असल्याचें समजल्यावरून अशा दुर्दैवी मुलीस आसरा देणें हें ब्राह्मण सभेचें कर्तव्य आहे अशा अर्थाचें एक प्रकट पत्र एका गृहस्थानें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें. एका गृहस्थानें ब्राह्मण समाजांत असलेल्या पोटजातींतील भेदाभेद नाहींसे करण्याचा प्रयत्न ब्राह्मण सभेनें करावा अशा अर्थाची सूचना मांडली, तर दुसऱ्या एका गृहस्थानें नित्यनैमित्तिक धार्मिक कार्यें कर-

ण्याची हल्लींचे कांहीं ब्राह्मण अळंटळं करतात तरी त्यांस योग्य तें वळण लावण्याचें काम ब्राह्मण सभेनें हातीं घ्यावें असें सुचविलें. तसेंच, ब्राह्मण मनुष्य ब्राह्मणेतरांच्या डोळ्यांत कां खुपतो याबद्दल निःपक्षपात दृष्टीनें विचार करून आपल्या वर्तनांत योग्य तो बदल घडवून आणण्याच्या कामीं ब्राह्मण सभेनें ब्राह्मणवर्गास मार्गदर्शन करावें, ब्राह्मण समाजाचें असें स्वतंत्र ज्ञातिगृह असावें, ब्राह्मणवर्गानें केवळ नोकरी करणें हेंच आपल्या जीविताचें सारसंर्वस्व न मानतां आपली दृष्टि व्यापाराकडेहि वळवावी, गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांची विद्यार्जनाची सोय करावी इत्यादि अनेक सूचना वृत्तपत्रद्वारां प्रसिद्ध होत होत्या. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, १८८८ ते १९०० पर्यंतचे ब्राह्मण सभेचे अहवाल ब्राह्मण सभेच्या दप्तरीं राहिले नाहींत. त्यामुळें या सर्व सूचनांच्या बाबतींत ब्राह्मण सभेनें काय केलें, तिच्या मार्गांत कोणत्या अडचणी उपस्थित झाल्या, त्या अडचणी दूर करण्याबाबत सभेनें कोणत्या दिशेनें प्रयत्न केले हें समजण्यास अत्यंत आवश्यक असलेले अधिकृत कागदपत्र आज उपलब्ध नसल्यामुळें त्या वेळच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरांवरूनच त्या तेरा वर्षांचा इतिहास लिहिणें भाग आहे.

निरनिराळे उपक्रम

इ. स. १८८८ च्या नूतन वर्षोत्सव दिनानिमित्त मुंबईतील एक विद्वान शास्त्री वे. शा. सं. भीमाचार्य झळकीकर यांना सरकारकडून महामहोपाध्याय ही पदवी मिळाली आणि त्याबद्दल ब्राह्मण सभेमार्फत त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यावेळीं म. म. झळकीकर यांच्या प्रमाणेंच विद्येनें विभूषित असलेल्या पुढील चार विद्वानांचा उल्लेख करण्यांत येऊन त्यांनाहि अशाच प्रकारची बहुमानाची पदवी देण्याचा सरकारनें जरूर विचार करावा असें सुचविण्यांत आलें : (१) वे. शा.

सं. रावजीशास्त्री उपासनी (विल्सन कॉलेज), (२) वे. शा. सं. तात्या-शास्त्री टुल्लू (एज्युकेशन सोसायटी), (३) वे. शा. सं. राजाराम-शास्त्री भागवत (सेंट झेविअर कॉलेज), (४) वे. शा. सं. विनायक-शास्त्री कोपरगांवकर (जनरल असेंब्लीज इन्टिटयूशन).

त्या वेळीं सभेच्या जागीं कांहीं मराठी व इंग्रजी दैनिकें व साप्ताहिकें ठेवण्यांत येत असत. कांहीं मासिकेंहि सभा आणवीत असे. पुष्कळसे सभासद यांचा उपयोग करून घेतांना आढळत असत. आपला दैनंदिन कार्यक्रम आटोपल्यावर सायंकाळच्या वेळीं करमणूक व्हावी म्हणून बुद्धिबळासारख्या खेळांची व्यवस्था करण्यांत आली होती. अर्थात्, या करमणुकीच्या प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर साधकबाधक चर्चाहि चालत असे. शनिवार आणि रविवार या दोन दिवशीं तर बहुतेक सभासदांची उपस्थिति असे. त्या वेळीं अनेक उपयुक्त विषयांवर चर्चा होई. या दोन दिवशीं अल्पोपहाराचीहि व्यवस्था असे. परप्रांतांतील अनेक विद्वान, कलावंत, व्यापारी वगैरे लोक कामाकाजानिमित्त मुंबईस आले असतां सभा त्यांचा शक्य तो परामर्श घेई. शक्य झाल्यास त्यांच्यापैकीं कांहीं जणांचीं व्याख्यानेंहि करण्यांत येत. कांहीं उत्सव नियमितपणें साजरे केले जात आणि त्या वेळीं व्याख्यानें, प्रवचनें व कीर्तनें होत.

डॉ. कुंटे यांचीं व्याख्यानें

मुंबईंतील त्या वेळचे सुप्रसिद्ध डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे हे अत्यंत निःस्पृह व बाणेदार म्हणून ओळखले जात. 'आयुर्वेद' या विषयावर त्यांचीं चार व्याख्यानें सभेनें करविलीं. डॉ. कुंटे यांना फक्त इंग्रजी भाषेंतूनच आपले विचार नीटपणें मांडतां येतात, त्यांना मराठी नीट बोलतांच येत नाहीं असा त्या काळीं बऱ्याच लोकांचा जो ग्रह झाला होता तो या व्याख्यानांनीं साफ दूर झाला.

रवि. दि. २९ एप्रिल १८८८ ला त्यांचें पहिलें व्याख्यान 'आयुर्वेदोत्पत्ति—वैद्यशास्त्र' या विषयावर झालें. शास्त्र नि व्यवहार यांचा योग्य तो मेळ न ठेवल्यामुळेंच हल्लींच्या वैद्यकाचें सत्त्व नाहींसें झालें आहे हें त्यांनीं सोदाहरण पटवून दिलें. दि. ६–५–१८८८ ला त्यांचें दुसरें व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय 'आर्यवैद्यक हें शास्त्र आहे' असा होता. या शास्त्राचे शस्त्रक्रिया आणि स्नेहादि क्रिया असे दोन भाग असल्याचें त्यांनीं सांगितलें. आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक अशा तीन प्रकारच्या व्याधी असून त्यांच्या शमनाचे उपाय ज्यांत उपपत्तीसह सांगितले असतील तें शास्त्र. या शास्त्राचा एक काळ होता. हरिश्चंद्राला झालेला जलोदराचा रोग क्रमाक्रमानें नाहींसा झाला हें सांगून ऐतरेय ब्राह्मणांतील एक उतारा त्यांनीं म्हणून दाखविला. पुढें कपिलमुनींचा काळ आला. मोक्षमार्गाचें महत्त्व सुरू झालें आणि मोक्षप्राप्तींतच खरें सुख आहे या विचाराचें प्राबल्य होऊन आयुर्वेदाची प्रगति खुंटली. तो काळ संपल्यावर जनतेचें लक्ष पुन्हा आयुर्वेदाकडे गेलें. चरक–सुश्रुतादि ग्रंथ तयार झाले. पण त्यानंतर काळानें पुन्हा पलटी खाल्ली आणि आज परिस्थिति अशी आहे कीं, आर्यवैद्यक 'मेलेल्या घोड्याप्रमाणें झालेलें दिसत आहे असेंहि व्याख्यात्यांनीं बोलून दाखविलें. तेव्हां म. म. झळकीकर यांनीं सांगितलें कीं, डॉ. कुंटे, डॉ. भाटवडेकर व इतर डॉक्टर मंडळींनीं या मृत घोड्याला संजीवनी देऊन तें शास्त्र पुन्हा ऊर्जितावस्थेस आणण्याचा प्रयत्न करावा.

त्यानंतर डॉ. कुंटे यांचेवर कांहीं कौटुंबिक आपत्ति आल्यामुळें त्यांचीं पुढील व्याख्यानें त्या सालच्या नोव्हेंबरपर्यंत लांबवावीं लागलीं. त्या व्याख्यानांत त्यांनीं आयुर्वैद्यक कोणत्या मार्गांनीं पूर्वस्थितीला आणतां येईल हें सांगितलें. औषधींपैकीं कांहींचीं मूळ द्रव्यें नियमित काळांत मिळविलीं असतां त्यांच्यांत रसवीर्यादि शक्ति मिळूं शकतात हें

सं. रावजीशास्त्री उपासनी (विल्सन कॉलेज), (२) वे. शा. सं. तात्या-शास्त्री टुल्लू (एज्युकेशन सोसायटी), (३) वे. शा. सं. राजाराम-शास्त्री भागवत (सेंट झेविअर कॉलेज), (४) वे. शा. सं. विनायक-शास्त्री कोपरगांवकर (जनरल असेंब्लीज इन्टिटयूशन).

त्या वेळीं सभेच्या जागीं कांहीं मराठी व इंग्रजी दैनिकें व साप्ताहिकें ठेवण्यांत येत असत. कांहीं मासिकेंहि सभा आणवीत असे. पुष्कळसे सभासद यांचा उपयोग करून घेतांना आढळत असत. आपला दैनंदिन कार्यक्रम आटोपल्यावर सायंकाळच्या वेळीं करमणूक व्हावी म्हणून बुद्धिबळासारख्या खेळांची व्यवस्था करण्यांत आली होती. अर्थात्, या करमणुकीच्या प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर साधकबाधक चर्चाहि चालत असे. शनिवार आणि रविवार या दोन दिवशीं तर बहुतेक सभासदांची उपस्थिति असे. त्या वेळीं अनेक उपयुक्त विषयांवर चर्चा होई. या दोन दिवशीं अल्पोपहाराचीहि व्यवस्था असे. परप्रांतांतील अनेक विद्वान, कलावंत, व्यापारी वगैरे लोक कामाकाजानिमित्त मुंबईस आले असतां सभा त्यांचा शक्य तो परामर्श घेई. शक्य झाल्यास त्यांच्यापैकीं कांहीं जणांचीं व्याख्यानेंहि करण्यांत येत. कांहीं उत्सव नियमितपणें साजरे केले जात आणि त्या वेळीं व्याख्यानें, प्रवचनें व कीर्तनें होत.

डॉ. कुंटे यांचीं व्याख्यानें

मुंबईंतील त्या वेळचे सुप्रसिद्ध डॉ. अण्णा मोरेश्वर कुंटे हे अत्यंत निःस्पृह व बाणेदार म्हणून ओळखले जात. 'आयुर्वेद' या विषयावर त्यांचीं चार व्याख्यानें सभेनें करविलीं. डॉ. कुंटे यांना फक्त इंग्रजी भाषेंतूनच आपले विचार नीटपणें मांडतां येतात, त्यांना मराठी नीट बोलतांच येत नाहीं असा त्या काळीं बऱ्याच लोकांचा जो ग्रह झाला होता तो या व्याख्यानांनीं साफ दूर झाला.

रवि. दि. २९ एप्रिल १८८८ ला त्यांचें पहिलें व्याख्यान 'आयुर्वेदोत्पत्ति—वैद्यशास्त्र' या विषयावर झालें. शास्त्र नि व्यवहार यांचा योग्य तो मेळ न ठेवल्यामुळेंच हल्लींच्या वैद्यकाचें सत्त्व नाहींसें झालें आहे हें त्यांनीं सोदाहरण पटवून दिलें. दि. ६–५–१८८८ ला त्यांचें दुसरें व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय 'आर्यवैद्यक हें शास्त्र आहे' असा होता. या शास्त्राचे शस्त्रक्रिया आणि स्नेहादि क्रिया असे दोन भाग असल्याचें त्यांनीं सांगितलें. आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक अशा तीन प्रकारच्या व्याधी असून त्यांच्या शमनाचे उपाय ज्यांत उपपत्तीसह सांगितले असतील तें शास्त्र. या शास्त्राचा एक काळ होता. हरिश्चंद्राला झालेला जलोदराचा रोग क्रमाक्रमानें नाहींसा झाला हें सांगून ऐतरेय ब्राह्मणांतील एक उतारा त्यांनीं म्हणून दाखविला. पुढें कपिलमुनींचा काळ आला. मोक्षमार्गाचें महत्त्व सुरू झालें आणि मोक्षप्राप्तींतच खरें सुख आहे या विचाराचें प्राबल्य होऊन आयुर्वेदाची प्रगति खुंटली. तो काळ संपल्यावर जनतेचें लक्ष पुन्हा आयुर्वेदाकडे गेलें. चरक–सुश्रुतादि ग्रंथ तयार झाले. पण त्यानंतर काळानें पुन्हा पलटी खाल्ली आणि आज परिस्थिति अशी आहे कीं, आर्यवैद्यक 'मेलेल्या घोड्याप्रमाणें झालेलें दिसत आहे असेंहि व्याख्यात्यांनीं बोलून दाखविलें. तेव्हां म. म. झळकीकर यांनीं सांगितलें कीं, डॉ. कुंटे, डॉ. भाटवडेकर व इतर डॉक्टर मंडळींनीं या मृत घोड्याला संजीवनी देऊन तें शास्त्र पुन्हा ऊर्जितावस्थेस आणण्याचा प्रयत्न करावा.

त्यानंतर डॉ. कुंटे यांचेवर कांहीं कौटुंबिक आपत्ति आल्यामुळें त्यांचीं पुढील व्याख्यानें त्या सालच्या नोव्हेंबरपर्यंत लांबवावीं लागलीं. त्या व्याख्यानांत त्यांनीं आयुर्वैद्यक कोणत्या मार्गांनीं पूर्वस्थितीला आणतां येईल हें सांगितलें. औषधींपैकीं कांहींचीं मूळ द्रव्यें नियमित काळांत मिळविलीं असतां त्यांच्यांत रसवीर्यादि शक्ति मिळूं शकतात हें

त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें. या व्याख्यानांचा श्रोत्यांवर फार चांगला परिणाम होऊन आयुर्वेद शाळा सुरू कराव्या अशा सूचना येऊं लागल्या व या सूचनांना मूर्त स्वरूप आल्यास पुण्यांतील व बडोद्यांतील आपलीं घरें या कार्याप्रीत्यर्थ देण्याचें प्रकट आश्वासन डॉ. भाटवडेकर यांनीं दिलें.

आयुर्वैद्यक मोफत दवाखाना ब्राह्मण सभेनें चालवावा या सूचनेचा विचार करण्याकरितां रवि. दि. २ डिसेंबर १८८८ ला ब्राह्मण सभेची साधारण सभा झाली व तींत सभेच्या जागेशेजारींच एक जागा भाड्यानें घेऊन असा दवाखाना चालवावा असा ठराव पास झाला. त्याप्रमाणें हा दवाखाना सुरूहि झाला पण कालांतरानें तो बंद करावा लागला.

न्या. तेलंग यांचा सत्कार

श्री. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांची हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली त्यावेळीं त्यांचा सत्कार करण्याकरितां ब्राह्मण सभेनें एक प्रकट सभा बोलवली. त्या सभेंत न्या. मू. तेलंग यांची विद्वत्ता, त्यांचें वक्तृत्व व अनेक विषयांचा त्यांनीं केलेला सूक्ष्म अभ्यास यांबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. त्याचप्रमाणें त्यांच्या न्यायाधीशत्वाच्या कारकीर्दीत ब्राह्मण समाजाचें नांव अधिक उज्ज्वल होईल असा विश्वासहि प्रकट करण्यांत आला. न्यायमूर्तींनीं आपल्या झालेल्या सत्काराबद्दल सभेचे आभार मानून अशा तऱ्हेनें गुणग्रहण करण्याचा उपक्रम जर इतर समाजांनींहि सुरू केला तर हिंदु समाजाला आपलें उच्च स्थान पुन्हा प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं असा विश्वास प्रकट केला.

रा. ब. बापूसाहेब आठल्ये

ब्राह्मण सभेचे अध्यक्ष रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर यांची प्रकृति याच सुमारास बिघडल्यामुळें डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणें ते

हवापालट करण्यासाठीं महाबळेश्वरीं गेले पण त्याचा फारसा उपयोग न होतां ते तेथेंच १८९२ सालीं कालवश झाले. त्यांच्या कारकीर्दीत अनेक विद्वानांकडून ब्राह्मणवर्गास ज्ञानामृत प्यावयास मिळाल्यामुळें त्यांच्या निधनानें समेला अत्यंत हळहळ वाटली हें सांगणें नकोच.

रा. ब. केळकर यांच्या पश्चात् रा. ब. यशवंत वासुदेव तथा बापूसाहेब आठल्ये यांची अध्यक्षस्थानीं निवड झाली. रा. ब. आठल्ये हे आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षीं मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले होते इतकेंच नव्हे तर जगन्नाथ शंकरशेटची शिष्यवृत्ति मिळविणारेहि ते पहिलेच होते. १८६९ सालीं ते बी. ए. झाले व त्या परीक्षेंत त्यांनीं भगवानदास प्राइझ मिळविलें. १८७० सालीं ते एम्. ए. झाले. न्या. मू. रानडे यांच्या नंतर ते एल्फिन्स्टन कॉलेजांत असिस्टंट प्रोफेसर होते. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांनीं कोल्हापूरचे महाराज श्री शिवाजी महाराज यांचे शिक्षक व गार्डियन म्हणून नोकरी पत्करली. १८७५ सालीं ते एल्एल्. बी. झाले. त्यांचा व रावसाहेब मंडलिकांचा दाट स्नेह होता. १८७५ ते १८८६ पर्यंत त्यांचें वास्तव्य मुंबईसच होतें. ते उत्कृष्ट लेखक नि वक्ते होते. इंग्रजी भाषेवर तर त्यांचें असामान्य प्रभुत्व होतें. मुंबईंत एक केवळ ब्राह्मणांची अशी संस्था असावी याबद्दल त्यांनीं खूपच खटपट केली होती. धार्मिक बाबतींत सरकारनें कोणत्याहि प्रकारें ढवळाढवळ करूं नये असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. सप्टेंबर १८८६ त रा. सा. मंडलीक यांच्या अध्यक्षतेखालीं माधवबागेंत भरलेल्या प्रचंड सभेचे ते सूत्रचालक होते. १८८७ सालीं त्यांना बडोदें संस्थाननें डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून नेमलें. १८९१ त ते बडोद्याचे नायब दिवाण झाले. पण पुढें तेथें त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें बडोदें सोडून ते पुन्हा मुंबईस येऊन राहिले. मुंबईस आल्यावर प्रकृतीस थोडासा आराम वाटतांच ते सार्वजनिक

कामांत लक्ष घालूं लागले आणि यामुळेंच त्यांना अध्यक्ष म्हणून निवडून देण्याची ब्राह्मण सभेस संधि मिळाली.

न्या. मू. रानडे यांचा सत्कार

दि. २३ नोव्हेंबर १८९३ ला रा. ब. महादेव गोविंद रानडे यांनीं हायकोर्टातील न्यायमूर्तीच्या उन्नत शुभासनावर आरोहण केलें. ब्राह्मण सभेमार्फत त्यांचा सत्कार करण्यांत आला त्यावेळीं अध्यक्षस्थान साहजिकपणेंच रा. ब. बापूसाहेब आठल्ये यांनीं भूषविलें होतें. सभेंत न्या. मू. रानड्यांचें गुणवर्णन करण्यांत आलें. उद्योगधंदे, व्यापार, राजकारण, इतिहास, शिक्षण, धार्मिक व सामाजिक सुधारणा अशा बहुविध क्षेत्रांतील त्यांच्या कर्तबगारीचें कौतुक करण्यांत आलें. एका वक्त्यानें त्यांचें अभिनंदन करण्याच्या भरांत न्या. मू. रानडे हे इंग्रजी अमदानींतील पहिलेच ब्राह्मण न्यायमूर्ति होत अशा अर्थाच्या वाक्यानें त्यांचा गौरव केला. पण सत्कारसमारंभाच्या वेळीं आपल्या उत्तरादाखलच्या भाषणांत सदर वक्त्याची चूक त्याच्या पदरांत घालून, इंग्रजी अमदानींत न्यायमूर्तीचा मान पटकावणारे पहिले ब्राह्मण गृहस्थ म्हणजे न्या. मू. काशीनाथ त्र्यंबक तेलंग हे होत असें न्या. मू. रानडे यांनीं सांगितलें. न्या. मू. तेलंग यांचाहि सत्कारसमारंभ ब्राह्मण सभेनें साजरा केलेला होता हें येथें निराळें सांगणें नकोच.

पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, रा. बापूसाहेब आठल्ये यांच्या कर्तृत्वाचा व नेतृत्वाचा लाभ ब्राह्मण सभेस फार काळ मिळाला नाहीं. त्यांची प्रकृति पुन्हा ढांसळत चालली आणि दि. २९ मार्च १८९४ ला त्यांच्यावर कालाचा घाला पडला !

डॉ. भालचंद्र कृष्ण

रा. ब. आठल्ये यांच्या निधनानंतर डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांची ब्रा. सभेच्या अध्यक्षस्थानीं निवड झाली. इ. स. १८९५ मध्यें

झालेल्या कौन्सिलच्या निवडणुकींत ना. बाबासाहेब कुरुंदवाडकर, ना. बाळ गंगाधर टिळक व ना. दाजी आबाजी खरे हे निवडून आल्याबद्दल ब्रा. सभेनें त्यांचा सत्कार केला. सत्कारसमारंभाच्या प्रसंगीं कौन्सिलमध्यें निवडून आलेल्यांचे अधिकार वगैरेसंबंधानें माहिती देण्यांत येऊन निवडणुकींत यशस्वी झालेल्या या पुढाऱ्यांकडून देशोपयोगी अशीं अनेक कामें होतील आणि लोकांना अधिकाधिक अधिकार मिळवून देण्याचा पाया याच लोकांकडून घातला जाईल अशी डॉ. भाटवडेकरांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत आशा व्यक्त केली.

'प्लेग' मधील कामगिरी

इ. स. १८९६ सालीं मुंबई शहरांत 'प्लेग' नें अक्षरशः कहर उडवून दिला होता. हा रोग अपरिचित तर होताच पण शिवाय तो स्पर्शजन्यहि होता त्यामुळें लोक हवालदिल होऊन गेले होते. मुंबई-तील बहुतेक सर्व इस्पितळें प्लेगच्या रोग्यांनीं भरून गेलीं होतीं. नातलगहि एकमेकांस ओळख देण्यास टाळूं लागले. ब्रा. सभेच्या ध्येयाला अनुसरून ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांनीं अखिल हिंदु समाजातर्फे एक इस्पितळ काढण्याचें ठरविलें. डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, डॉ. खेर, श्री. ना. व्यं. वैद्य यांनीं या बाबतींत पुढाकार घेतला. यासंबं-धींची हकीकत दि. २५ मे १८९७ च्या केसरींत प्रसिद्ध झाली आहे. वरील पुढारी मंडळीबरोबर श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर यांचेंहि नांव प्रसिद्ध करण्यांत आलें. जी. आय. पी. रेल्वेंतील एका कारकुनानें आपल्या जिवाचीहि पर्वा न बाळगतां घरोघर जाऊन वर्गणी जमा करण्याची पराकाष्ठा केली आणि जवळ जवळ सात हजार रुपये जमा केले असें त्या अंकांत त्यांचें वर्णन करण्यांत आलें होतें. श्री. पुणतांबेकर हे एवढेंच काम करून थांबले नाहींत. प्लेगनें पछाडलेल्या ब्राह्मण रोग्यांना औषधपाणी पुरवणें वगैरे कामेंहि त्यांनीं कसोशीनें

सुरू केलीं. इतकेंच नव्हे तर ब्राह्मण समाजांतील या रोगाला बळी पडलेल्यांची दहनक्रिया वगैरे नीटपणें पार पाडण्यासाठीं त्यांनीं एक लहानसें मंडळहि स्थापलें. अशा प्रकारें त्या विकट काळांत त्यांनीं ब्राह्मण समाजाची फार मोठी सेवा केली.

निरनिराळे सत्कार

इ. स. १८९६ सालीं डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर व श्री. गोकुळदास कहानदास पारख यांची मुंबई कौन्सिलसाठीं निवड झाली. तेव्हां या उभयतांचाहि सत्कार ब्रा. सभेनें केला. डॉ. भाटवडेकर हे सरकारनियुक्त होते व श्री. गोकुळदास पारख हे लोकनियुक्त होते. शक्य असेल तेथें सहकार आणि अशक्य होईल तेथें विरोध असें धोरण आपण ठेवणार असल्याची डॉ. भाटवडेकर यांनीं ग्वाही दिली. श्री. पारख हे सर फिरोझशहा मेथा यांचे कट्टे अनुयायी असल्यामुळें जनतेचीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानापर्यंत पोहोंचविण्याची कामगिरी ते चोखपणें बजावतील अशी आशा सदर सत्कारसभेंत व्यक्त करण्यांत आली.

त्यानंतरची एक महत्त्वाची घटना म्हणजे श्री. बद्रुद्दीन तय्यबजी यांची हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली त्यावेळची. त्यांचा सत्कारसमारंभ साजरा करण्याच्या कामीं मुंबईंतील 'हिंदु यूनिअन' या संस्थेनें पुढाकार घेऊन मुंबईंतील बहुतेक हिंदु संस्थांना या समारंभांत भाग घेण्याची विनंती केली होती. ब्राह्मण सभेनें हें आमंत्रण आनंदानें स्वीकारलें आणि सत्कारसमारंभाच्या प्रसंगीं ब्रा. सभेतर्फे पुष्पहार अर्पण करण्याकरितां आपला प्रतिनिधि पाठविला. या प्रतिनिधीनें त्या प्रसंगीं समयानुरूप भाषण करून न्यायमूर्तींच्या सत्कारसमारंभांत भाग घेण्यांत ब्रा. सभेस अभिमान वाटतो असें सांगितलें. न्यायमूर्तींनीं आपल्या उत्तरादाखलच्या भाषणांत सर्व हिंदु बांधवांचे आभार मानले

आणि न्यायदानाच्या कामीं जातिभेदातीत राहून निःपक्षपातीपणें वागण्यास आजच्या या समारंभानें आपणाला विशेष धीर येईल असें सांगितलें.

१८९८ सालीं ब्रा. सभेनें श्रीशिवजयंत्युत्सव साजरा केल्याचें आढळतें. त्या उत्सवाच्या कार्यकर्त्यांत श्री. धोंडो पांडुरंग किर्लोस्कर, रा. सा. विनायक कोंडदेव ओक, श्री. पुणतांबेकर, श्री. जोशी व श्री. साधले हीं नांवें आढळतात. याच सालीं ब्रा. सभेनें महाजनवाडीकरितां जी खटपट केली तिची हकीकत 'शंकरवाडी' या शीर्षकाखालीं वाचावयास मिळेल.

ब्रा. सभेचे पदाधिकारी

इ. स. १८८८ ते १९०० पर्यंतच्या काळांत ब्रा. सभेकडे पाहिलें तर असें दिसतें कीं, पहिलीं पांच वर्षें रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर हे अध्यक्ष, नंतर एक वर्ष रा. ब. यशवंत वासुदेव आठल्ये हे अध्यक्ष आणि त्यानंतरचीं सात वर्षें डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे अध्यक्ष होते. उपाध्यक्षाच्या जागीं रा. रा. धोंडो शामराव गरुड हे सहा वर्षें व त्यानंतर डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख हे होते. व्यवस्थापक सभेचे अध्यक्ष डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, प्रा. श्रीधर गणेश जिनसीवाले, डॉ. विठ्ठल विष्णु गोखले, ना. दाजी आबाजी खरे इ. गृहस्थ होते. चिटणीस म्हणून रा. जनार्दन दामोदर कोल्हटकर, रा. रावजी जनार्दन पावगी, रा. वामनरावजी भिडे व रा. दामोदर रामचंद्र बापट हे गृहस्थ होते. ब्रा. सभेचें ध्येय मुळांत ठरवितांना जी परिस्थिति होती ती या काळांत बरीच सुधारली होती.

क्लबाची कल्पना

१८८७ सालीं रा. ब. रानड्यांनीं 'हिंदु यूनिअन' क्लबनें दिलेल्या पानसुपारीच्या प्रसंगीं 'Club-life in India' या विषयावर

दिलेल्या व्याख्यानाची ब्राह्मण सभेवर फारच मोठी छाप बसलेली दिसून येते. १८९० सालीं पुण्यास 'यूनिअन क्लब' या संस्थेची स्थापना झाली. त्या प्रसंगीं रा. ब. महादेवराव रानड्यांनीं याच विषयाचा पुन्हा एकदां ऊहापोह केला होता. तो असाः—"अशा प्रकारच्या क्लबाचे बरेचसे उपयोग आहेत. क्लबामुळें बरोबरीच्या मंडळींत बसून एकमेकांच्या गुणदोषांची प्रांजलपणें व प्रेमळपणें स्पष्ट चर्चा करतां येते. आपल्या अंगीं जे दोष असतील ते दोष आपल्यास दिसत नाहींत व यामुळें अंगांत खोटा अहंकार वाढीस लागलेला असतो. हा दोष खेळीमेळीच्या वातावरणामुळें आपल्या नजरेस आणणारा क्लबामध्यें कोणीतरी भेटतोच भेटतो. अर्थात्, दुसऱ्यांचे दोष दाखवितांना ते गोड शब्दांत दाखविले गेले पाहिजेत." अशा प्रकारचे विचार रा. ब. रानड्यांसारख्यांनीं पुढें मांडल्यामुळें ब्राह्मणांचाहि असा एखादा क्लब असावा असें ब्राह्मणांस वाटूं लागलें. १८८८ सालीं ब्रा. सभेची स्थापना झाली त्याच वेळीं सभेच्या सभासदांत दोन विचारप्रवाह सुरू होते. ब्राह्मणांची संघटना करावी, इतर समाजांशीं ब्राह्मणांचे संबंध खेळीमेळीचे असावेत, ब्राह्मण समाजांतील दोष दूर करण्याची खटपट करावी आणि अशा प्रकारें केवळ कार्य करीत रहावें अशा विचारांचा एक वर्ग होता तर दिवसभर श्रम केल्यानंतर कांहीं करमणुकीचें साधन असावें आणि अशा करमणुकीचा लाभ घेत असतांनाच जमल्यास कांहीं कार्यहि करावें अशा विचारांचा दुसरा एक वर्ग होता. आनंदाची गोष्ट ही कीं, या दोन्ही वर्गांचा हळुहळू समन्वय होत गेला आणि या तेरा वर्षांच्या अवधींत दोन्ही वर्ग खेळीमेळीनें काम करूं लागले.

(४) १९०१ ते १९१७

१९०१ ते १९०३ चा ब्राह्मण सभेचा अधिकृत अहवाल पाहिला कीं, मागील प्रकरणाच्या शेवटीं म्हटल्याप्रमाणें ब्राह्मण सभेस ब्राह्मण 'समूहाचें' (क्लबचें) स्वरूप आल्याचें स्पष्ट दिसतें. सदर अहवालांत पुढील अर्थाचा मजकूर आढळतोः—

"ब्राह्मण लोकांत ऐक्य व प्रेम वाढावें, करमणूक व ज्ञानप्राप्ति व्हावी, तसेंच ज्ञानाचा प्रसारहि व्हावा याकरितां एके ठिकाणीं जमण्यासाठीं ही सभा स्थापन झालेली आहे. एका मताच्या किंवा एका धंद्याच्या अथवा ज्यांच्या विचारसरणींत व आचरणांत बरेंचसें साम्य असून जे सलगीनें वागूं शकतात अशा लोकांच्या सभांना 'क्लब' ही संज्ञा आहे. अशा प्रकारचे 'क्लब' यूरोप अमेरिकेंत खूपच आहेत, अशा क्लबांत झालेल्या विचारविनिमयाचा उपयोग करून मोठमोठीं कार्यें केलेल्या व्यक्तींचीं उदाहरणें कांहीं थोडींथोडकीं नाहींत. अशाच सभांच्या धर्तीवर ब्राह्मणसभा स्थापन झाली आहे."

यावरून न्या. मू. रानडे यांनीं Club-life या विषयावर जीं व्याख्यानें दिलीं त्यांचा ब्राह्मण सभेच्या चालकांवर पुष्कळच चांगला परिणाम झालेला दिसून येतो.

पहिल्या तेरा वर्षांत सभासदांची संख्या शंभराच्या आंत होती ती पुढील सतरा वर्षांत जवळ जवळ दीडशें पर्यंत गेल्याचें दिसतें.

नवे पदाधिकारी

१९०१ च्या प्रारंभीं सभेचे अध्यक्ष सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनीं अध्यक्षपदाचें त्यागपत्र दिलें व तें गौरवपूर्वक स्वीकारण्यांत आलें. त्यांच्या जागीं डॉ. मोरेश्वर गोपाळ तथा नानासाहेब देशमुख यांची निवड झाली व ते १९१७ अखेरपर्यंत अध्यक्ष म्हणून राहिले. उपाध्यक्षाचे जागीं, प्रथम चिटणीस व नंतर व्यवस्थापक सभेचे अध्यक्ष म्हणून काम केलेले श्रीयुत (आतां रावसाहेब) जनार्दन दामोदर ऊर्फ आबासाहेब कोल्हटकर यांची निवड झाली. व्यवस्थापक सभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून श्री. गोविंद कृष्ण रानडे व श्री. श्रीनिवास अयंगार सेटलूर यांची निवड झाली. चिटणीसाचे जागीं श्री. महादेव राजाराम बोडस हे निवडले गेले.

सत्कारसमारंभ

रँग्लर परांजपे स्वदेशीं परत आल्यावर त्यांनीं मिळविलेल्या महनीय यशाबद्दल ब्रा. सभेनें मोठ्या थाटाचा सन्मानसमारंभ केला. तसेंच, श्री. हरि गणेश घारपुरे हे आय. सी. एस. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल व श्री. हरि सीताराम दीक्षित सॉलिसिटर यांची मध्यभागातर्फे कौन्सिलांत सभासद म्हणून निवड झाल्याबद्दल ब्रा. सभेनें त्यांचा सत्कारसमारंभ साजरा केला.

इतर उपक्रम

दररोज सायंकाळीं सुमारें दहाबारा सभासद सभेच्या जागीं खेळण्यासाठीं जमत. शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशीं ही संख्या पंचवीसच्या आसपास होत असे. सभेचें वार्षिक उत्पन्न एक हजार रुपयांच्या आसपास असे व सभेचा खर्च मात्र थोडा अधिकच होई. ही तूट जादा वर्गणीच्या रूपानें भरून काढण्यांत येई. सभा कांहीं उत्सव साजरे करी व करमणुकीचेहि कांहीं कार्यक्रम करी. साधारण

कै. डॉ. मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमुख

लो. बाळ गंगाधर टिळक

न्यायमूर्ति रानडे

न्यायमूर्ति तेलंग

न्यायमूर्ति बद्रुद्दीन तय्यबजी

23607 दि. ३।१।१५
१९०१ ते १९१७ ५०२ नों. दि. २३।१।१५

सभा दर वर्षी बोलावण्यांत येत असल्याचें दिसत नाहीं. कधीं दोन, कधीं तीन तर कधीं चारहि वर्षांनीं साधारण सभा बोलावून निवडणुकी करण्यांत येत. या सतरा वर्षांत साधारण पुढीलप्रमाणें व्याख्यानांचे व इतर कार्यक्रम झाले—

१९०१ ते १९०९

व्याख्याते—	विषय—
श्री. ना. रा. घमंडे	योगशास्त्र
,, शाळिग्राम	जपानची माहिती
वे. शा. सं. गोविंदशास्त्री बापट	सनातन मानवधर्म
श्री. के. एन्. आठल्ये	मलबारचा व्यापार
,, ल. रा. पांगारकर	मुक्तेश्वर
रा. सा. गोपाळ अनंत भट	समोष्णीकरण
प्रा. श्री. ग. जिनसीवाले	उपनिषद्
श्री. वासुदेव हरि खरे	वेदांत व दिनचर्या
प्रा. चिंतामण गंगाधर भानू	गीतेंतील एक श्लोक
श्री. हरकचंद शहा	मलायांतील हिंदु
प्रा. दांडेकर	हिप्नॉटिझम
श्री. निगुडकरशास्त्री	वेदांतील एक सूत्र
प्रो. बेहेरे	हिप्नॉटिझम
विदुषी भवानीबाई रहाणार कन्याकुमारी	उपासनाकांड, कर्मकांड व वर्णाश्रमधर्म

तसेंच, या काळांत श्री. बाळासाहेब गुरुजी ग्वाल्हेरकर, श्री. एकनाथ-बुवा ग्वाल्हेरकर, श्री. शंकरबुवा हारदेकर व पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या गायनांचे कार्यक्रमहि झाले.

१९१० व १९११ या सालीं व्याख्यानांचे वगैरे कार्यक्रम फारसे झाले नाहींत. नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांच्या खुनाचा निषेध करण्यासाठीं एक सभा घेण्यांत आली होती. तसेंच, श्री. हरि नारायण नेने व श्री. दामोदर रावजी महमदपूरकर यांना 'रावबहादुर' ही पदवी मिळाल्याबद्दल सभेनें त्यांचा सत्कार केला होता. या सालांतील बाकीचे विशेष उल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे वे. शा. सं. कृष्णशास्त्री बापट यांचे शतावधानीपणाचे व ज्योतिषाचे प्रयोग, श्री. भीमराव साळगी यांचे जादूचे प्रयोग, ह. भ. पं. श्री. मोरगांवकर बुवा, ह. भ. प. श्री. श्रीधरशास्त्री मांडवकर, श्री. पंचवाडकर बोवा यांचीं कीर्तनें व श्री जयराम स्वामींचे तेरावे शिष्य ह. भ. प. ब्रह्मचारी श्री कृष्णस्वामी यांचें 'भक्तिमार्ग' या विषयावर प्रवचन हे होत.

१९१३ ते १९१७ या सालांतहि ह. भ. प. श्री. गोविंदबुवा पिंपळनेरकर, ह. भ. प. श्री. ढोले बुवा, ह. भ. प. श्री. आत्मारामबुवा श्रीगोंदेकर, श्री. गोविंदबुवा बावडेकर यांचीं कीर्तनें व श्री. सूर्यनारायणराव यांचें गायन एवढेच विशेष महत्त्वाचे असे कार्यक्रम दिसून येतात.

एकीकरणाची योजना

१९१६ व १९१७ च्या दरम्यान सभेची सांपत्तिक परिस्थिति फारच खालावली. त्या वेळेपर्यंत जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं जादा वर्गणी गोळा करण्यांत येत असे ती जमा करणेंहि कठीण होऊं लागलें. येणारी तूट डॉ. नानासाहेब देशमुख यांना एकट्यांनाच भरून काढण्याची पाळी येऊं लागली. याच वेळीं ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ व ब्राह्मण हितवर्धिनी सभा अस्तित्वांत येऊन त्यांचें कार्यहि बऱ्याच जोरानें चालू झालें होतें. ब्रा. सभेचे चिटणीस श्री. सीताराम दिनकर जोगळेकर यांचें व सभेचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब देशमुख यांचें सभेच्या कामासंबंधानें बोलणें चालू असतांना ब्राह्मण

हितवर्धिनी सभेचे एक कार्यकर्ते श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर त्या ठिकाणीं गेले होते. डॉ. नानासाहेबांनीं श्री. पुणतांबेकरांस असें सुचविलें कीं, एक तर ब्राह्मणसभा यापुढें बंद करावी किंवा सर्व ब्राह्मण संस्थांचें एकीकरण करून तीं कामें 'ब्राह्मणसभा' या नांवाखालीं चालवावीं. श्री. पुणतांबेकर यांनीं आपल्या सहकाऱ्यांशीं विचारविनिमय केला आणि मोठ्या प्रयत्नानें ब्राह्मण हितवर्धिनी सभेमार्फत एकीकरणाच्या योजनेस मूर्त स्वरूप आणलें. अशा प्रकारें १८८८ सालीं स्थापन झालेली ब्राह्मण सभा १९१८ पासून पूर्वीच्याच नांवावर पण नवीन जोमानें कार्य करूं लागली.

(५) ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ

'ह्रस्व स. १९०८' हा काळ नजरेसमोर उभा राहतांच कितीतरी संकटांचीं दृश्यें दिसूं लागतात. दुबळीं माणसें संकटांनीं चिरडून जातात पण ज्यांच्या अंगांत लवमात्रहि पराक्रम असतो ते संकटांना शरण न जातां आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून संकटांवरच मात करतात. त्या काळांत कोणत्याहि क्षेत्रांत समाजानें डोकें म्हणून वर काढूं नये असे प्रयत्न चाललेले होते. शिक्षणक्षेत्रहि या जाचापासून अलित होतें असें मुळींच नाहीं. शिक्षणरूपी झाडाला आलेलीं पानें अधिकारी छाटून टाकतील, कळी दिसली कीं कुसकरून टाकतील, फूल दिसलें तर त्याला नख लावतील, फळ पाहिलें तर त्याला झोडपल्याशिवाय रहाणार नाहींत, ही वस्तुस्थिति तेव्हां सर्वांना दिसत होती. पण त्यामुळें सर्वच कांहीं हातपाय गाळून स्वस्थ बसले नाहींत. पानें ओरबाडून काढलीं म्हणून झाडाला नवी पालवी फुटत नाहीं असें थोडेंच आहे ? एक फूल खुडलें तर दुसरें अधिक सुवासिक फूल येणार नाहीं कशावरून ? फळें झोडपल्यामुळें ज्या बिया खालीं पडतील त्यांचे नवीन वृक्ष निर्माण होणार नाहींत असें कोण छातीठोकपणें म्हणूं शकेल ?

प्राप्त परिस्थितींतून योग्य तो मार्ग शोधून काढण्यासाठीं कांहीं समाजसेवक आपल्या बुद्धीला ताण देत होते. इतर क्षेत्रांप्रमाणेंच शिक्षणाच्या बाबतींतहि बाकीच्या ज्ञातींशीं तुलना करतां ब्राह्मण

ज्ञातीची परिस्थिति अधिक केंविलवाणी झालेली दिसत होती. मुंबईंतील सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळ, कायस्थ प्रभु शिक्षण संस्था, अशांसारख्या संस्था आपापल्या ज्ञातींचें काम चांगल्या रीतीनें करीत होत्या. कायस्थ प्रभूंच्या शिक्षणनिधीचा फायदा त्या ज्ञातींतील शेंकडा ऐशीं विद्यार्थ्यांनीं घेतला असून सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळानेंहि अनेक विद्यार्थ्यांना मदत केलेली होती. हीं प्रत्यक्ष उदाहरणें पाहून पुष्कळ ब्राह्मण गृहस्थांच्या मनांत आपल्याहि ज्ञातीसाठीं अशी एखादी संस्था असावी अशा प्रकारचे विचार घोळूं लागले. पण या विचारांचें शक्य तितक्या लौकर कृतींत रूपांतर करण्याची ज्यांना आत्यंतिक तळमळ लागून राहिली होती ते गृहस्थ म्हणजे श्री. मारुति लक्ष्मण तथा मामा मराठे हे होत.

श्री. मामा मराठे

श्री. मामा मराठे हे जे. जे. हॉस्पिटलमध्यें औषधें देण्याचें काम करीत. त्या रुग्णालयाला जोडून असलेल्या मेडिकल कॉलेजांतील ब्राह्मण विद्यार्थ्यांना पदोपदीं येणाऱ्या अडचणी दूर करण्यांत त्यांना आनंद वाटत असे. ते त्यांना यथाशक्ति इतर बाबतींतहि साहाय्य करीत. ब्राह्मण विद्यार्थ्यांना साहाय्य करणारें एकादें मंडळ असावें ही जी मामांना लागलेली तळमळ ती त्यांना स्वस्थ बसूं देईना. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना करून लौकरच ती संस्था नांवारूपाला आणणाऱ्या श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकरांजवळ एक दिवस सहज हा विषय मामांनीं काढला. सुपीक जमिनींत पडलेलें बीं जसें फुकट जात नाहीं तसेंच सच्चा समाजसेवकाच्या कानीं पडलेला समाजसेवेचा विचारहि सहसा वायां जात नाहीं. मामांचा हा विचार पुणतांबेकरांना एकदम पसंत पडला आणि या कल्पनेचें महत्त्व ब्राह्मण समाजांतील थोर थोर लोकांस पटवून देण्याच्या उद्योगाला प्रारंभ झाला. श्री. मामा

मराठे व श्री. अं. गो. पुणतांबेकर यांची ही कल्पना अनेक विचारवंतांना पसंत पडली आणि डॉ. काशीनाथ नारायण गोखले व श्री. अनंत गणेश साठये यांनीं त्यांस या कामीं शक्य ती मदत करण्याचें आश्वासन दिलें. डॉ. गोखले यांचा वैद्यकीय धंदा त्या वेळीं अत्यंत यशस्वी रीतीनें चाललेला होता; आणि त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळें समाजांत त्यांस मोठा मान होता. श्री. साठये हे तरुण आणि हुषार वकील असून समाजांत चांगले लोकप्रिय होते.

पहिली सभा

आपली कल्पना मूर्तस्वरूपांत उतरण्यासारखी भूमि तयार झाली अशी मनाची खात्री पटतांच श्री. पुणतांबेकर व श्री. मामा मराठे यांनीं १९०८ च्या प्रारंभीं डॉ. गोखले यांचे घरीं निमंत्रित मंडळीची एक सभा भरविली. या सभेस डॉ. वि. ना. भाजेकर, श्री. गणेश विष्णु भाटवडेकर, श्री. अनंत गणेश साठये, श्री. कृष्णाजी पांडुरंग फडके, श्री. गोविंद हरि मोडक, श्री. वासुदेव हरि खरे, श्री. कृष्णाजी नीलकंठ साने, श्री. हरि पांडुरंग लेले, डॉ. का. ना. गोखले, श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. मामा मराठे इ. गृहस्थ उपस्थित होते.

या सभेंत 'ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ' स्थापन करावें असें ठरलें पण विद्यार्थ्यांना मदत कशी करावयाची, विशेषतः कोणता विद्यार्थी मदतीस पात्र समजावयाचा यासंबंधीं तीव्र मतभेद दिसून आला. गरीब स्थितींतील बुद्धिमान व होतकरू विद्यार्थी मदतीस योग्य समजावा यासंबंधीं एकवाक्यता होती. पण त्या विद्यार्थ्याला अमुक इतकें ब्रह्मकर्म अवगत असलें पाहिजे कीं काय व तें तो नित्य आचरीत असला पाहिजे कीं काय, तसेंच, या सर्वांचें प्रतीक म्हणून त्याचा पोशाख अमुकच तऱ्हेचा असला पाहिजे किंवा काय याबद्दल तीव्र मतभेद माजून ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ स्थापन करण्याचें काम तात्पुरतें स्थगित करावें असें ठरलें.

ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाची स्थापना

यानंतर लौकरच डॉ. काशीनाथपंत गोखले यांचेवर निर्घृण काळानें झडप घातली व ब्रा. वि. सहाय्यक मंडळाचा एक निस्सीम पुरस्कर्ता नाहींसा झाला. त्यांच्या निधनामुळें श्री. मामा मराठे व श्री. पुणतांबेकर यांचा एक मोठाच आधार तुटल्यासारखा झाला. पण तरीहि त्यांनीं उमेद सोडली नाहीं. पूर्वी झालेल्या सभेवरून योग्य तो बोध घेऊन ज्यांच्या आग्रहामुळें हें मंडळ स्थापण्याचें स्थगित करावें लागलें होतें त्यांना बगल देऊन या दोघां कर्मवीरांनीं शके १८३० च्या विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर (दि. ५–१०–१९०८) श्रीमंत यशवंत विष्णु तथा अण्णासाहेब नेने यांच्या घरीं कांहीं प्रतिष्ठित ब्राह्मण गृहस्थांची सभा बोलावली. या सभेस डॉ. नानासाहेब देशमुख, प्रा. हरि महादेव भडकमकर, श्री. कृष्णाजी पांडुरंग फडके, श्री. अण्णासाहेब नेने, डॉ. वि. ना. भाजेकर, श्री. कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे, श्री. वा. रा. जोशी, श्री. विठ्ठल नारायण वेलणकर, श्री. महादेव विष्णु मराठे, डॉ. वि. ग. दाबके, डॉ. गणेश विष्णु भाटवडेकर, श्री. अनंत गणेश साठये, श्री. अ. नी. पिटकर, श्री. रा. रा. गाडगीळ, श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. मारुति लक्ष्मण मराठे इत्यादि मंडळी उपस्थित होती. डॉ. नानासाहेब देशमुख यांची सभेच्या अध्यक्षस्थानीं योजना झाली. सभेंत डॉ. भाजेकर, श्री. साठये, श्री. वा. रा. जोशी, श्री. पुणतांबेकर इत्यादींचीं भाषणें झालीं. गरीब होतकरू विद्यार्थ्यांस प्राथमिक, मध्यम व उच्च शिक्षणाचे कामीं मदत करण्याची आवश्यकता प्रतिपादण्यांत आली. तसेंच, औद्योगिक शिक्षणाची समाजास किती जरूरी आहे हेंहि विशद करण्यांत आलें. विशेष प्रकारचें शास्त्रीय शिक्षण मिळविण्यासाठीं समाजांतील कांहीं विद्यार्थी परदेशीं पाठविणेंहि किती आवश्यक आहे या संबंधींहि ऊहापोह झाला. नंतर अध्यक्षांनीं 'ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक

मंडळ ' सर्वानुमतें स्थापन झाल्याचें घोषित केलें. या मंडळाचा उद्देश पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आला :—

" ब्राह्मण ज्ञातींतील म्हणजे देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, देवरुखे व इतर कोणी कीं, ज्यांच्याशीं संप्रदायानुसार प्रसिद्धपणें रोटीव्यवहार होतो अशा पंचद्रविड ब्राह्मण ज्ञातींतील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांस विद्यार्जनाच्या कामीं मदत करणें हा या संस्थेचा उद्देश आहे. "

पहिलें व्यवस्थापक मंडळ

या उद्देशानुसार ब्रा. वि. स. मंडळाच्या कार्यास त्वरित प्रारंभ व्हावा या हेतूनें एका वर्षाकरितां पुढीलप्रमाणें व्यवस्थापक मंडळ नेमण्यांत येत आहे असें अध्यक्षांनीं सांगितलें.

(१) डॉ. वि. ना. भाजेकर	(अध्यक्ष)
(२) श्री. कृष्णाजी पांडुरंग फडके	(खजीनदार)
(३) प्रा. हरि महादेव भडकमकर	(परीक्षक)
(४) श्री. वामन रामचंद्र जोशी	(परीक्षक)
(५) ,, वासुदेव हरि खरे	(चिटणीस)
(६) ,, अनंत गणेश साठये	(सभासद)
(७) ,, कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे	(सभासद)
(८) डॉ. गं. बा. पटवर्धन	,,
(९) श्री. यशवंत विष्णु नेने	,,
(१०) ,, गोविंद नारायण सोहनी	,,
(११) ,, केशव बाळकृष्ण जोशी	,,
(१२) ,, महादेव विष्णु मराठे	,,
(१३) ,, अं. गो. पुणतांबेकर	,,

याच सभेंत चार गृहस्थांची एक समिति नेमण्यांत आली व या

समितीनें नियम तयार करावे व त्यांस या सभेच्या अध्यक्षांची संमति घ्यावी असें ठरलें. या नियमसमितीनें नियमांचा खर्डा तयार केला व ते संमत असल्याबद्दल दि. १२–१०–१९०८ ला डॉ. नानासाहेब देशमुख यांनीं त्यावर स्वाक्षरी केली.

मंडळाचे नियम वगैरे छापवून घेणें, विद्यार्थ्यांना कोणत्या अटींवर मदत करावयाची हें ठरविणें वगैरे प्राथमिक कार्यांतच मंडळाचें पहिलें वर्ष संपलें. पहिली वार्षिक सभा रवि. दि. ३०-११-१९१० ला झाली. त्या वेळीं श्री. सखाराम गणेश फडके यांनीं रु. ५०० व डॉ. काणे यांचे स्मरणार्थ एका गृहस्थानें रु. १०० मंडळास देण्याचें आश्वासन दिलें. खर्च वजा जातां पहिल्या वर्षीं मंडळाजवळ रु. ३०० शिल्लक असल्याचें चिटणीसांनीं सांगितलें. विद्यार्थ्यांना मदत करणें ती परत-फेडीचे अटीवर करण्यांत यावी या सूचनेवर या सभेंत बराच जोर देण्यांत आला. तसेंच, ज्या विद्यार्थ्यांना मदत करावयाची त्यांचा अभ्यास, त्यांची वर्तणूक वगैरेकडे कसोशीनें लक्ष पुरविण्याबद्दलहि सभेंत सूचना आल्या. अध्यक्ष डॉ. भाजेकर यांनीं आपल्या भाषणांत, मदतीच्या अभावीं बुद्धिमान मुलांचीं आयुष्यें कशीं फुकट चाललीं आहेत याचें हृदयस्पर्शी वर्णन करून समाजानें मंडळाला नुसती शाब्दिक अगर हार्दिक सहानुभूति दाखवून स्वस्थ न बसतां प्रत्यक्ष आर्थिक साहाय्य करावें अशी कळकळीची विनंती केली.

कार्यारंभ

दुसऱ्या वर्षीं मंडळाकडे बाहेरगांवच्या बऱ्याच विद्यार्थ्यांकडून मदतीसाठीं अर्ज आले. परंतु मंडळाची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेऊन फक्त मुंबईच्याच विद्यार्थ्यांना मदत करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें सहा विद्यार्थ्यांना मिळून रु. ३३८–१२–० मदत देण्यांत आली; व रु. ५०० गंगाजळी म्हणून बाजूला ठेवण्यांत आले. मंडळाच्या कार्याचें

महत्त्व लक्षांत घेऊन ब्राह्मण समाजांतील धनिकांस मंडळाला मदत करण्याची प्रेरणा व्हावी असे प्रयत्न सारखे चालू होतेच.

सन १९०८ ते १९१२ या चार वर्षांत मंडळ फारसें मोठें कार्य करूं शकलें नाहीं. अनेक बुद्धिमान मुलांचें आंयुष्य द्रव्याच्या अभावामुळें फुकट जात आहे हें ज्यांना पटत होतें असे पुष्कळ लोक होते पण त्यांपैकीं फारच थोडे खिशांत हात घालीत. या चार वर्षांत मंडळाकडे रु. १८५५-१५-० इतकी रक्कम जमा झाली व बारा विद्यार्थ्यांना मिळून रु. ११८९-४-० शिष्यवृत्त्यांच्या रूपानें देण्यांत आले. श्री. वि. कृ. भाटवडेकर रु. १९५, श्री. स. ग. फडके रु. १६०, श्री. ना. बा. भालेराव रु. १००, कै. डॉ. काणे यांचे स्मरणार्थ रु. १००, डॉ. नानासाहेब देशमुख रु. १०० या मंडळाला मिळालेल्या मुख्य देणग्या होत. एकंदर देणगीदारांकडे पाहिलें तर रु. १०० ते २०० पर्यंत देणारे पांच, रु. ५० ते ९६ पर्यंत देणारे तीन व रु. २५ ते ४८ पर्यंत देणारे आठ व ०-४-० ते २५ रुपये देणारे १५६ अशी वर्गवारी आढळते.

येणेंप्रमाणें एकंदर १७२ सभासद होते. दात्यांकडून रक्कम जमा करून ती मंडळाच्या खजीनदाराकडे आणून भरण्याचें काम एकच एक स्वयंसेवक करीत असे. तो स्वयंसेवक म्हणजे श्री. मारुति लक्ष्मण तथा मामा मराठे हे गृहस्थ होत. तहाहयात सभासद मिळविण्याचा भार श्री. अण्णासाहेब साठये व श्री. अं. गो. पुणतांबेकर यांनीं मुख्यतः उचलला होता.

१९१३ साल उजाडलें. श्री. मामा मराठे यांच्या मनाचें अजून खरें समाधान झालें नव्हतें. कोणाशींहि भेट झाली कीं, त्याच्याजवळ ते हा विषय काढीत. मामांचें बोलणें अंतःकरण पिळवटून येत असल्यामुळें ऐकणारावर त्याचा तत्काळ परिणाम होत असे. अशा प्रकारें झालेल्या

परिणामामुळेंच या सालीं श्री. चिंतामण जनार्दन खेर व श्री. वामन रामचंद्र गुळवणे हे दोन नवीन स्वयंसेवक मंडळाला लाभले. या सालीं रु. ४३८-२-० जमा झाले व नऊ विद्यार्थ्यांना मिळून रु. ७३७-१२-० मदत देण्यांत आली. "द्रव्याभावामुळें कित्येक होतकरू तरुणांस शिक्षणाचा लाभ घेतां येत नाहीं. मंडळासारख्या संस्थांकडून संघटनात्मक कर्तृत्वशक्ति वाढनितां येते. अशी शक्ति वाढविणें म्हणजे प्रत्येकाकडून द्रव्याची यथाशक्ति मदत मिळविणें होय. पगारी नोकर ठेवल्यास खर्च फार येतो व त्या मानानें वर्गणीहि जमा होत नाहीं, तरी मंडळासाठीं स्वयंसेवकाचें कार्य करण्यास तरुणांनीं पुढें यावें," अशी विनंती मंडळातर्फे करण्यांत आली.

१९१४ व १९१५ हीं दोन वर्षें मंडळाच्या आयुष्यांतील थोडींफार क्रांतीचीं वर्षें ठरलीं. १९१४ च्या आरंभीं दोन उत्साही व विद्वान गृहस्थांचा लाभ मंडळाला झाला. ते दोन गृहस्थ म्हणजे श्री. पांडुरंग वामन काणे, एम्. ए.,एल्एल्.एम्. व श्री. गोविंद हरि मोडक, बी. ए., हे होत. हे दोघे गृहस्थ हिशेबतपासनीस या नात्यानें मंडळाला मिळाले. याच वेळीं श्री. जगन्नाथ नारायण वैद्य, बी. ए., हे गृहस्थ मंडळाचें कार्य करण्यासाठीं पुढें सरसावले. त्यांच्या अंगच्या संघटनाचातुर्याचा लाभ त्यांनीं मंडळास दिला. मंडळाच्या कार्यासंबंधीं त्यांना वाटत असलेली कळकळ स्पृहणीय होती. पावती पुस्तकें घेऊन ते चाळी-चाळींतून फिरूं लागले. मंडळासाठीं सभासद मिळवितां मिळवितां एखाद्या तरुण माणसाची गांठ पडली कीं, त्याच्यावर आपल्या वक्तृत्वाची मोहिनी घालून ते त्याला मंडळाचा स्वयंसेवक बनवीत. अशा रीतीनें त्यांनीं एका १९१५ सालांत दहाबारा स्वयंसेवक मिळविले.

१९१५ च्या अहवालांत स्वयंसेवक व त्यांची कामगिरी यांबद्दल असा उल्लेख आहेः—"एकदां संस्था निर्माण झाली म्हणजे तिच्या हेतूप्रमाणें

सर्व कामें तडीस न्यावयास उत्साही व तरुण मंडळी आत्मस्फूर्तीनें वा परप्रेरणेनें पुढें आली पाहिजे. वृद्ध मामा आपल्या अंगच्या उत्साहानें तरुणांनींहि घडा घ्यावा अशी कामगिरी करीत आहेत. मंडळाचें सुदैव हें कीं, त्यांना मदत करण्यास या वर्षीं कांहीं तरुण आणि उत्साही स्वयंसेवक लाभलेले आहेत. या साऱ्या स्वयंसेवकांच्या परिश्रमांमुळेंच चालू सालीं रु. १४०० ची रक्कम मंडळाकडे जमा झालेली आहे. या नवीन कार्यकर्त्यांत श्री. ज. ना. वैद्य व श्री. द. पु. छत्रे हे दोन पदवीधर आहेत. तसेंच, नवीन आलेल्या स्वयंसेवकांपैकीं दोघां तरुणांनीं मंडळाच्या शिपायाचें काम करण्याचें स्वखुषीनें मान्य केलें आहे. दरमहा आठ रुपये पगार देऊनहि शिपायांकडून जीं कामें व्यवस्थित होत नसत तीं हे स्वयंसेवक विनावेतन करीत आहेत. संस्थेचे हेतू समजावून देऊन समाजाची सहानुभूति वाढविण्याचें कार्य श्री. वैद्य हे निरलसपणें करीत आहेत. त्यांच्या आगमनानें संस्थेंत एक निराळेंच उत्साहाचें वारें संचरूं लागलें आहे यांत शंका नाहीं. स्वयंसेवकांची दर महिन्याला एक सभा भरत असल्यामुळें कामांत उत्पन्न होणाऱ्या अडचणी दूर कशा कराव्या यासंबंधानें विचारविनिमय करून उपाययोजना करतां येते. तसेंच, श्री. माधव लक्ष्मण आपटे व त्यांचे बंधु श्री. शंकर लक्ष्मण आपटे हे दोघे स्वतः तर स्वयंसेवक झालेच पण त्यांनीं आणखीहि दहाबारा तरुण स्वयंसेवक मंडळाला मिळवून दिले हें त्यांस निस्संशय भूषणास्पद आहे. आपटे बंधू नियमितपणें वर्गणीवसुलीचें काम तर करतातच पण मंडळांतील इतरहि कामें वेळोवेळीं करतात. श्री. पांडुरंग चिंतामण दामले हे हिशेब लिहिण्याचें काम करतात. या वर्षाअखेर मंडळाच्या पटावर ३२ स्वयंसेवक आहेत. "

याच वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यांत ब्राह्मण हितवर्धिनी सभा स्थापन झाली. या सभेनें मंडळाला कशा प्रकारें साह्य केलें याची माहिती त्या सभेच्या हकीकतींत येणारच आहे.

या द्विवार्षिक इतिवृत्ताच्या वेळीं पूर्वीच्या सात व नवीन एकवीस मिळून अठ्ठावीस विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या.

डॉ. मॅकिकन यांचें औदार्य

श्री. पां. वा. काणे व श्री. गो. ह. मोडक हे हिशेबतपासनीसांचें काम करीत होते त्याऐवजीं त्यांच्याकडे अर्जदार विद्यार्थ्यांपैकीं लायक विद्यार्थी निवडून काढण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली. व्यवस्थापक मंडळांतहि डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर, एम्. ए., एम्. डी., या विद्वान व उत्साही तरुणाचा समावेश करण्यांत आला. स्वयंसेवकांचेंहि कार्यकारी मंडळ निवडण्यांत येऊन त्याच्या अध्यक्षस्थानीं डॉ. भडकमकर यांची योजना झाली. श्री. दत्तात्रय पुरुषोत्तम छत्रे हे स्वयंसेवकांच्या कार्यकारी मंडळाचे चिटणीस म्हणून निवडले गेले. या अवधींत स्वयंसेवकांची संख्या ३९ झाली असून जमा झालेल्या वर्गणीचा आंकडा रु. २७५१-९-८ पर्यंत गेला. त्यांपैकीं रु. १२६२-०-० शिष्यवृत्त्यांच्या रूपानें देण्यांत आले. प्राथमिक व मध्यम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस परतफेडीच्या अटीशिवाय शिष्यवृत्त्या देण्यास सुरुवात झाली. याच अवधींत शिल्लक रकमेपैकीं रु. २००० गंगाजळी म्हणून समजावे असें ठरलें. मंडळाची नियमावली छापून घेण्यांत आली. अहवालासोबत सर्व वर्गणीदारांचीं नांवें छापण्याची आजवरची प्रथा बंद पाडण्यांत आली. श्री. पां. वा. काणे मंडळाच्या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेऊं लागले होते आणि त्यांच्याच विनंतीवरून विल्सन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. मॅकिकन यांनीं ब्रा. वि. स. मंडळाकडून शिष्यवृत्त्या घेणाऱ्या विद्यार्थ्यांस फीच्या रकमेंत शेंकडा पंचवीस टक्के सूट देण्याचें मान्य केलें होतें. या औदार्याबद्दल मंडळानें डॉ. मॅकिकन साहेबांचे आभार मानले.

संस्थेचे पहिले आश्रयदाते

याच वेळीं डॉ. कृ. श्री. म्हसकर, एम्. ए., एम्. डी., हे आपण होऊन रु. १०० देऊन मंडळाचे तहाहयात सभासद झाले इतकेंच

नव्हे तर आणखी रु. ४०० देऊन मंडळाचे पहिले आश्रयदाते झाले. हा वेळपर्यंत अशी देणगी देण्याचें ब्राह्मण समाजास अपरिचितच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या या देणगीनें मंडळाचा उत्साह वाढला आणि आणखीहि कांहीं दाते मंडळाला अशा प्रकारची मदत करतील अशी आशा वाटूं लागली. या आशेंतूनच, एक मोठा निधि जमवून ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह बांधावें अशी कल्पना निघाली. असें वसतिगृह झाल्यास विद्यार्थ्यांवर नजर ठेवणें सहज शक्य होईल आणि ब्राह्मण समाजांत उत्तम नागरिक तयार होण्यास मदत होईल अशी मंडळाच्या चालकांना खात्री वाटत होती. याच वेळीं ब्राह्मण समाजाची शिरगणती करण्याची ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें आंखणी केलेली होती; तें काम त्या संस्थेनें तावडतोब सुरू करावें अशी मंडळातर्फे विनंती करण्यांत आली.

सन्माननीय तहाहयात सभासद्

याच सुमारास कल्याणच्या एका महिलेनें आपल्या मृत्युपत्रांत मंडळास रु. १२०० ची देणगी दिली असल्याचें समजलें. या बाईंचे व त्यांच्या सल्लागारांचे आभार मानण्यांत आले. या अहवालाचे वर्षीं सभासदांची संख्या १७०० पर्यंत गेली यावरून स्वयंसेवकांनीं किती उत्साहानें काम केलें हें सहज समजण्यासारखें आहे. स्वयंसेवकांस कार्य करण्यास अधिक उत्साह वाटावा अशा हेतूनें स्वयंसेवक शाखेला आपणांतून दोन स्वयंसेवक व्यवस्थापक मंडळाचे सदस्य म्हणून निवडून देतां येतील अशी व्यवस्था करण्यांत आली. ब्राह्मण हितवर्धिनी सभेची मंडळाला बरीच मदत झाली हें लक्षांत घेऊन त्या सभेचा एक प्रतिनिधि आपल्या व्यवस्थापक मंडळावर घेण्याचें मंडळानें ठरविलें. स्वयंसेवक या नात्यानें श्री. मामा मराठे यांनीं मंडळाचें जें बहुमोल कार्य केलें त्याची जाणीव म्हणून मंडळानें त्यांस सन्माननीय तहाहयात सभासद करून घेतलें.

नव्हे तर आणखी रु. ४०० देऊन मंडळाचे पहिले आश्रयदाते झाले. हा वेळपर्यंत अशी देणगी देण्याचें ब्राह्मण समाजास अपरिचितच होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या या देणगीनें मंडळाचा उत्साह वाढला आणि आणखीहि कांहीं दाते मंडळाला अशा प्रकारची मदत करतील अशी आशा वाटूं लागली. या आशेंतूनच, एक मोठा निधि जमवून ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह बांधावें अशी कल्पना निघाली. असें वसतिगृह झाल्यास विद्यार्थ्यांवर नजर ठेवणें सहज शक्य होईल आणि ब्राह्मण समाजांत उत्तम नागरिक तयार होण्यास मदत होईल अशी मंडळाच्या चालकांना खात्री वाटत होती. याच वेळीं ब्राह्मण समाजाची शिरगणती करण्याची ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें आंखणी केलेली होती; तें काम त्या संस्थेनें तावडतोब सुरू करावें अशी मंडळातर्फे विनंती करण्यांत आली.

सन्माननीय तहाहयात सभासद

याच सुमारास कल्याणच्या एका महिलेनें आपल्या मृत्युपत्रांत मंडळास रु. १२०० ची देणगी दिली असल्याचें समजलें. या बाईंचे व त्यांच्या सल्लागारांचे आभार मानण्यांत आले. या अहवालाचे वर्षीं सभासदांची संख्या १७०० पर्यंत गेली यावरून स्वयंसेवकांनीं किती उत्साहानें काम केलें हें सहज समजण्यासारखें आहे. स्वयंसेवकांस कार्य करण्यास अधिक उत्साह वाटावा अशा हेतूनें स्वयंसेवक शाखेला आपणांतून दोन स्वयंसेवक व्यवस्थापक मंडळाचे सदस्य म्हणून निवडून देतां येतील अशी व्यवस्था करण्यांत आली. ब्राह्मण हितवर्धिनी सभेची मंडळाला बरीच मदत झाली हें लक्षांत घेऊन त्या सभेचा एक प्रतिनिधि आपल्या व्यवस्थापक मंडळावर घेण्याचें मंडळानें ठरविलें. स्वयंसेवक या नात्यानें श्री. मामा मराठे यांनीं मंडळाचें जें बहुमोल कार्य केलें त्याची जाणीव म्हणून मंडळानें त्यांस सन्माननीय तहाहयात सभासद करून घेतलें.

मुंबई शहरांतील बहुतेक विद्यार्थी बाहेरगांवचे असतात तसेंच मुंबई-बाहेरील कॉलेज विद्यार्थ्यांसहि मंडळाकडून शिष्यवृत्त्या दिल्या जातात म्हणून द्रव्य व इतर प्रकारें मदत करण्यासंबंधानें मुंबईबाहेरील ज्ञाति-बांधवांस विनंती करण्यांत आली. या कामासाठीं मंडळाच्या बाहेरगांवींहि शाखा काढाव्यात असा विचार चालू झाला.

मंडळाला अनेक उत्साही स्वयंसेवक लाभलेले पाहून श्री. मामा मराठे यांना अतिशय आनंद झाला. मंडळासाठीं मदत मिळविण्याची त्यांनीं आतां एक नवीनच क्लृप्ति काढली. लग्नमुंजीसारख्या मंगल प्रसंगीं व दीपावलीसारख्या मोठ्या सणाच्या वेळीं गरीब ब्राह्मण विद्यार्थ्यांना मदत म्हणून कांहीं तरी देणगी बाजूस काढण्याची लोकांना संवय लागावी म्हणून मंडळाच्या कार्याची माहिती पुरवीत ते ठिक-ठिकाणीं हिंडूं लागले. या उपक्रमांतहि ते बरेच यशस्वी झाले.

पुढील योजना

१९१६ साल संपत आलें होतें. पुढील सालीं स्वयंसेवकांची संख्या दीडपट करावी, सभासदांची वर्गणीवसुली दुपटीवर न्यावी, ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृहाच्या कल्पनेस मूर्तस्वरूप देण्याची खटपट करावी, सर्व महाराष्ट्रभर मंडळाच्या शाखा काढाव्या, वाङ्मयीन शिक्षणाप्रमाणेंच औद्योगिक शिक्षणाप्रीत्यर्थ शिष्यवृत्त्या द्याव्या, मोठ्या प्रमाणावर निधि जमवून निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण घेण्यासाठीं कांहीं विद्यार्थ्यांना परदेशींहि पाठवावें अशा प्रकारचे उत्साही विचार मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या डोक्यांत येऊं लागले.

नवीन देणग्या

दि. १ जानेवारी १९१७ उजाडला. पावतीपुस्तकें हातीं घेऊन साठांहून अधिक स्वयंसेवक बाहेर पडले. रा. मामा मराठे यांचा उत्साह ओसंडून जात होता. रा. चिंतामण जनार्दन खेर दरमहा

दोनशें सभासदांची वर्गणी वसूल करूं लागले. श्री. वैद्य व श्री. छत्रे स्वतः वर्गणी वसूल करून इतर स्वयंसेवकांच्या मनांत अधिकाधिक हुरूप उत्पन्न करूं लागले. आपटे बंधू हिशेबाचें काम पाहून वर्गणी-वसुलीचेंहि काम करीत. श्री. गुळवणे, श्री. भागवत, श्री. अंतरकर वगैरे स्वयंसेवक प्रत्येकीं शंभर सभासदांकडून वर्गणी वसूल करीत होते. डॉ. म्हसकरांचें अनुकरण करून श्री. वामन श्रीधर आपटे रु. ५०० देऊन मंडळाचे आश्रयदाते झाले. तसेंच, गं. भा. गंगाबाई जनार्दन मोडक रु. १२०, डॉ. महादेव गोविंद खेर रु. १०४, श्री. पांडुरंग गंगाधर नामजोशी रु. १०२-८-०, डॉ. चिंतामण रामकृष्ण आठवले रु. १०१-४-०, श्री. पांडुरंग वामन काणे रु. १००, डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर रु. १००, सॉ. बाळ गंगाधर खेर रु. १००, श्री. अनंत गणेश साठे रु. १०० येणेंप्रमाणें रकमा मंडळाकडे जमा होऊन हे आठ तहाहयात सभासद मंडळास लाभले.

नवे पदाधिकारी

या वर्षाअखेर वर्गणी व देणग्या मिळून रु. ५१७१-२-९ जमा झाले. मंडळाचा दि. ३०-१-१९१० ला जो पहिला अहवाल प्रसिद्ध झाला होता त्याच्याशीं मंडळाच्या या सालच्या कार्याची तुलना केली तर कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं. या सालीं पुढीलप्रमाणें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें:—

(१) डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख-अध्यक्ष
(२) ,, कृ. श्री. म्हसकर-उपाध्यक्ष
(३) ,, वि. ना. भाजेकर-चेअरमन
(४) ,, रा. ह. भडकमकर-कार्याध्यक्ष
(५) श्री. कृ. त्र्यं. डोंगरे-खजिनदार
(६) ,, पां. वा. काणे-परीक्षक

(७) श्री. गो. ह. मोडक
(८) ,, ज. र. घारपुरे
(९) ,, अ. नी. पिटकर
(१०) ,, अं. गो. पुणतांबेकर
(११) ,, वि. का. शौचे
(१२) ,, अ. ग. साठ्ये–मुख्य चिटणीस
स्वयंसेवक शाखेचे प्रतिनिधी (२)
(१३) श्री. ज. ना. वैद्य–मदत चिटणीस
(१४) ,, द. पु. छत्रे
ब्राह्मण हितवर्धिनीचे प्रतिनिधि
(१५) डॉ. ल. नी. पुरोहित
शिवाय
(१६) श्री. भा. म. केळकर–हिशेबतपासनीस
(१७) ,, त्र्यं. भा. खरे ,,

१९१६ अखेर मंडळापुढें आलेल्या अनेक विधायक सूचना कशा अंमलांत आणावयाच्या याचा विचार सुरू झाला. १९१७ सालीं जमा झालेल्या वर्गणीचा व देणग्यांचा विचार करतां हा आंकडा १९१८ सालीं दहा हजारांपर्यंत जाणें शक्य आहे असा विश्वास वाटूं लागला. शिष्यवृत्त्यांच्या रूपानें निदान रु. ४००० तरी देतां येतील अशी आशा मंडळाला वाटूं लागली.

एकीकरणाची योजना

याच सुमारास ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें एकीकरणाची योजना पुढें आणली. त्या संबंधींची सर्व हकीकत पुढें येणारच आहे. ही योजना ब्राह्मण ज्ञातींतील पुढारी मंडळीला पटत चालली आणि ते या योजनेचा जोरानें पुरस्कार करूं लागले. पण मंडळाच्या कार्याच्या

दृष्टीनें ही योजना कितपत यशस्वी होईल याबद्दल या मंडळाचे कांहीं कार्यकर्ते साशंक होते. डॉ. भाजेकर, श्री. अण्णासाहेब साठये व स्वयंसेवकांपैकीं श्री. वैद्य, श्री. चिं. ज. खेर व श्री. गुळवणे यांनीं या योजनेबाबतचा आपला विरोध उघड रीतीनें प्रकट केला. श्री. खेर व श्री. गुळवणे यांनीं तेव्हांच्या 'सूर्य' नांवाच्या वर्तमानपत्रांत "तुमचे पोहे व आमचा कोंडा मिसळून फुंकून फुंकून खाऊं या" अशा शब्दांत या योजनेचें वर्णन केलें होतें. पण ज्ञातींतील पुढारी वर्गाला ही योजना इतकी मान्य होत चालली कीं, आपल्या कांहीं कार्यकर्त्यांच्या प्रामाणिक विरोधाला बगल देऊन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाला ती मान्य करावी लागली. या योजनेप्रमाणें ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ हें नांव नाहींसें होऊन मंडळाचें कार्य ब्राह्मण सभेच्या शिक्षण शाखेनें करावयाचें ठरलें. मंडळाचें दप्तर व शिल्लक संयुक्त ब्राह्मण सभेच्या हवालीं करण्यांत आली. ही अंगिकारलेली योजना मंडळाच्या मूळ हेतूस पोषक अशी व्हावी म्हणून एकीकरणाच्या योजनेंत पुढील अटींचा समावेश करण्यांत आलाः—

(अ) विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या बाबतींत मंडळाचे सर्व नियम—परतफेडीच्या तत्त्वासह—मान्य करण्यांत यावे.

(ब) ब्राह्मणसभेच्या एकंदर उत्पन्नांतून ब्राह्मण सभेची गंगाजळी म्हणून $\frac{१}{१०}$ रक्कम निराळी काढल्यावर उरलेल्या रकमेचा कमींत कमी $\frac{१}{३}$ भाग विद्यार्थ्यांना मदत करण्याकडेच खर्च करण्यांत यावा.

(क) ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाकडे दि. ३१-१२-१९१७ रोजीं जी शिल्लक होती ती सर्व गंगाजळी म्हणून समजण्यांत यावी. शिक्षणशाखेच्याच खातीं म्हणून जमा होणाऱ्या रु. ५० पेक्षां ज्यास्त रकमेच्या सर्व देणग्या व विद्यार्थ्यांकडून परतफेडीच्या रूपानें येणाऱ्या रकमा सदर गंगाजळींतच सामील करण्यांत याव्या.

(इ) सन १९१७ अखेर मंडळाचे असलेले सर्व आश्रयदाते व तहाहयात सभासद संयुक्त ब्राह्मणसभेचे आश्रयदाते व तहाहयात सभासद समजले जावे.

(ई) ब्राह्मणसभेचे वर्गणीदार होऊन शिवाय केवळ शिक्षण-शाखेला म्हणून कोणीं देणगी अगर वर्गणी दिली तर ती शिक्षण-शाखेच्या खात्यांतच जमा करण्यांत येऊन त्या रकमेचा विनियोगहि विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठींच व्हावा.

विलीनीकरण

वरील अटींवरून हें दिसून येईल कीं, एकीकरणानंतर मंडळाचें कार्य ब्राह्मणसभेनें अंगिकारलें. अर्थात् ब्राह्मणसभेच्या उत्कर्षावरच मंडळाचे मूळ हेतू सफल होणें अवलंबून आहे हें लक्षांत घेऊन मंडळाच्या सर्व स्वयंसेवकांनीं ब्राह्मणसभेचे स्वयंसेवक व्हावें असें ठरविण्यांत येऊन मंडळाच्या वर्गणीदारांनीं ब्राह्मणसभेचे वर्गणीदार व्हावें अशी त्यांस विनंती करण्यांत आली. याच वेळीं ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें सुरू केलेलें शिरगणतीचें काम पुरें झालें आणि त्यावरून मुंबई शहरांत सुमारें पंधरा हजार ब्राह्मण वस्ती असल्याचें आढळून आलें. ब्राह्मण ज्ञातींतील कोणतीं मिळवतीं माणसें वर्गणीदार झालेलीं नाहींत याची छाननी करावी व त्यांना सभासद करून घेण्याचा प्रयत्न करावा व स्वयंसेवकांनीं आणि प्रचारकांनीं ब्राह्मणसभेचा सर्व बाजूंनीं उत्कर्ष होईल अशा प्रकारच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असें ठरलें.

एवंच, ब्राह्मण सभेकडून या शाखेची चांगली जोपासना व्हावी आणि ब्राह्मण समाजांतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस विद्यामृत पाजण्याचें काम अव्याहत चालू रहावें आणि मंडळाचे सर्व मनोरथ ब्राह्मण सभेकडून पूर्ण व्हावे अशी परमेश्वराची प्रार्थना करून मंडळानें आपल्या नऊ वर्षांच्या स्वतंत्र कार्याची रजा घेतली व मंडळ ब्राह्मणसभेंत विलीन झालें.

(६) शंकरवाडी

हररोज संध्याकाळीं पक्ष्यांचे थवेच्या थवे पश्चिमेकडून पूर्वेकडे झपाट्यानें उडत जातांना दिसतात. याचा सरळ अर्थ असा कीं, त्यांचें दाणापाणी मिळविण्याचें ठिकाण आणि विश्रांतीचें स्थळ हीं कधींहि एकच नसतात. ज्या ठिकाणीं दाणे टिपायचे त्याच ठिकाणीं विश्रांति घ्यायची हें त्यांच्या मनाला निसर्गतःच मानवत नाहीं. माणसांनाहि हाच नियम लागू आहे.

पण निरनिराळ्या गांवांहून चरितार्थासाठीं वा उद्योगधंद्यासाठीं मुंबईस आलेल्या ब्राह्मण समाजाची स्थिति साठसत्तर वर्षांपूर्वी अगदींच केंविलवाणी होती. नोकरीच्या किंवा उद्योगधंद्याच्या ठिकाणीं विश्रांतिस्थळाचा प्रश्नच उद्भवत नव्हता; आणि राहण्याचें ठिकाण इतकें लहान आणि गलिच्छ असावयाचें कीं, त्या ठिकाणीं आल्यावर, नोकरीधंद्याच्या ठिकाणीं होतों तेच बरे होतों असें बहुतेकांना वाटूं लागायचें ! मनुष्यमात्राला बुद्धि ही एक विलक्षण चीज लाभली असल्यामुळें असल्या अडीअडचणी तो पार पाडल्याशिवाय रहात नाहीं. जें कार्य एकट्यादुकट्याला पार पाडणें शक्य नाहीं असें त्याला पटतें तें पुरें करण्यासाठीं तो संघशक्तीचा आधार घेतो आणि एक ना एक दिवस आपला हेतु तडीस नेतोच नेतो.

सबंध दिवस काबाडकष्ट केल्यावर तास दोन तास मनाची सात्त्विक करमणूक करतां येईल अशी एखादी जागा नसावी म्हणून पुष्कळ

ब्राह्मण लोकांना विषाद वाटत असे. पण हें काम एका दोघांचें नसून सर्व ब्राह्मण समाजानें मनावर घेतलें तरच तें होण्यासारखें आहे हेंहि त्यांना कळत होतें. पण प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी कशी ?

महाजनवाडीची आवश्यकता

अखेर दि. १५ जानेवारी १८८७ ला एका महाराष्ट्रीय ब्राह्मणानें एक पत्रक प्रसिद्ध करून या विचारांना वाचा फोडली. त्या पत्रकाचा सारांश असा :—" पूर्वी मुंबईत ब्राह्मण वस्ती कमी असे. बायकोमुलांसह राहणारे ब्राह्मण लोक तर फारच कमी असत. त्या वेळीं मुंबईत अतिशय घाण असे. कापाच्या मैदानांतून पिण्याचें पाणी आणतांना स्पर्शास्पर्शाचा प्रतिबंध राखतां येत नसे. वर्षांतून एकदां तरी महामारीची सांथ उद्भवेच. परंतु त्या बहुतेक अडचणी आतां दूर झाल्या असून सोयीहि पुष्कळच वाढल्या आहेत. म्हणून आतांशा ब्राह्मणांचीं कुटुंबेंच्या कुटुंबें मुंबईत आढळतात. मुंबईची आजची ब्राह्मणांची वस्ती पंधरा हजारांच्या घरांत असावी. असें असूनहि त्या सर्वांना आपलें वाटण्यासारखें असें एखादें सार्वजनिक स्थळ नसावें याचा विषाद वाटतो. हें दैन्य घालविण्याची सोपी व सरळ युक्ति म्हणजे प्रत्येक ब्राह्मण कुटुंबानें यथाशक्ति द्रव्यसाहाय्य करावें आणि अशा रीतीनें महाजनवाडी तयार करावी. "

याच पत्रकांत, ही वर्गणी कशी जमवावी, कोणीं, कोणतीं व कशीं कामें करावीं याबद्दलहि एक योजना सादर करण्यांत आलेली होती. या कामीं चाळीसपन्नास हजार रुपये लागतील असा अंदाज व्यक्त करण्यांत आला असून श्रीमंतापासून अगदीं सामान्य माणसापर्यंत सर्वांना या कामीं हातभार लावतां येईल असें त्या योजनेचें स्वरूप होतें.

पण या योजनेचें पुढें काय झालें ? प्रत्यक्ष असे कांहीं प्रयत्न झाले कीं नाहींत ? कीं तें पत्रक म्हणजेच या योजनेचा प्रारंभ नि शेवट ?

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें अशीं कांहीं पत्रकें एकत्र करून त्यांचें एक पुस्तक बांधलें म्हणून १८८७ सालची योजना आज इतक्या वर्षांनीं वाचावयास तरी मिळाली ! नाहींतर त्या काळीं कोणीं काय योजना आंखल्या किंवा कोणी काय प्रयत्न केले या साऱ्या गोष्टी काळाच्या उदरांत गडप होऊन आज त्यांचा मागमूसहि उरला नसता !

दि. २८-१२-१८९७ च्या 'मुंबई वैभव 'च्या अंकांत "मुंबईत ब्राह्मणांची महाजनवाडी" असा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखावरून त्या वेळच्या ब्राह्मण समाजानें केलेल्या अशा प्रकारच्या प्रयत्नांवर थोडाफार प्रकाश पडतो. सन १८८७ मध्यें कै. त्र्यंबक-भटजी वैद्य यांचे वाडींत कै. रा. ब. गोपाळराव हरि देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली. त्यावेळीं महाजनवाडीसंबंधानें बरीच वाटाघाट होऊन वादीवर आंकडेहि पडले. पण हा सारा खटाटोप करणारे जे उत्साही गृहस्थ होते ते एकाएकीं आजारी पडल्यामुळें त्यांना मुंबईबाहेर जावें लागलें आणि तें काम तात्पुरतें स्थगित झालें. १८८७-१८९७ या दहा वर्षांत मुंबईंत बरीच सुधारणा झाली. रहाण्यासाठीं सोईस्कर अशा जागांचा पूर्वी अभाव असल्यामुळें व्यव-सायासाठीं मुंबईस येणाऱ्या गृहस्थांना सडें रहावें लागे. पण आतां कुटुंबवत्सलांसाठीं रहाण्यास योग्य अशा जागा मिळूं लागल्या होत्या. तसेंच, मुंबईंत वारंवार उद्भवणाऱ्या साथींचेंहि प्रमाण कमी होत चाललें होतें. पाण्याची सोय दिवसेंदिवस अधिक चांगली होत होती. या अवधींत फ्रेंच व केनेडी पुलापलीकडे ब्राह्मण वस्ती बरीच झाली होती. तसेंच, गिरगांव, कांदेवाडी, ठाकुरद्वार, मुगभाट, पालवाचा रस्ता, झावबाची वाडी, फणसवाडी, काळबादेवी रोड, विठ्ठलवाडी, लोहार चाळ इ. ठिकाणीं ब्राह्मण वस्ती मोठ्या संख्येनें झालेली होती. त्याशिवाय भायखळा, जुना व नवा नागपाडा, ग्रँटरोड, माझगांव, परळ इ. ठिकाणींहि ब्राह्मण वस्ती होऊं लागली होती. साधारण मानानें

विचार केल्याम १८९७ मध्यें मुंबईंत दहापंधरा हजार ब्राह्मण लोक रहात असावेत. एवढ्या मोठ्या समुदायास सार्वजनिक जागेची अडचण निवारण करतां येऊं नये याबद्दल सदर लेखांत हळहळ प्रदर्शित करण्यांत आली होती.

पूर्वतयारी

मध्यंतरीं एक घटना झाली. १८८७ सालीं महाजनवाडीसंबंधानें खटपट करणारे गृहस्थ आजारी पडल्यामुळें बाहेरगांवीं गेले होते ते १८९५ मध्यें परत आले व त्यांनीं आपल्या कार्यास पुन्हा प्रारंभ केला. १८९५ च्या जानेवारी महिन्यांत गिरगांवांत आंग्र्यांचे वाडीमध्यें ना. दाजी आबाजी खरे यांच्या प्रशस्त दिवाणखान्यांत सभा भरविण्यांत आली. त्यावेळीं ब्राह्मणांकरितां महाजनवाडी बांधणें आवश्यक आहे असें ठरून तिच्यासंबंधींची सविस्तर योजना तयार करण्याकरितां सहा गृहस्थांची एक समिति नेमण्यांत आली. या समितीचे अध्यक्ष म्हणून रा. सा. गोपाळराव मोरेश्वर साठे व कार्यवाह म्हणून रा. सा. आबासाहेब कोल्हटकर यांची निवड झाली. पण दुर्दैव असें कीं, हा सारा प्रयत्न करणारे ते गृहस्थ पुन्हा आजारी पडले आणि त्यांना मुंबई सोडणें भाग पडलें. तरी पण रा. सा. साठे यांनीं ब्राह्मण कुटुंबांची नांवनिशीवार व स्थलवार माहिती गोळा करण्याकरितां एक पत्रक तयार केलें व स्नेही मंडळीच्या मार्फत सात आठ ठिकाणच्या याद्याहि तयार करविल्या. पण त्या वेळीं तें काम एवढ्यावरच थांबलें. आजारी पडून बाहेरगांवीं गेलेले ते गृहस्थ १८९७ मध्यें पुन्हा मुंबईस आले व रावसाहेब साठे यांनीं सुरू केलेलें पण मध्यंतरीं स्थगित झालेलें तें काम त्यांनीं पुन्हा सुरू केलें. चाळीचाळींतून पोटसमित्या नेमण्यांत आल्या. ब्राह्मण रहिवाशांच्या याद्या तयार करणें, त्या रहिवाशांच्या मासिक उत्पन्नाचा कांहीं ठराविक हिस्सा किंवा ते भरीत

असलेल्या मासिक भाड्याइतकी रक्कम जमा करणें वगैरे कामें त्या पोट-समित्यांकडे सोंपविण्यांत आलीं होतीं.

१८९५ सालीं नेमण्यांत आलेल्या समितीनें एक इतिवृत्त सादर केलें त्याचा सारांश असाः— (१) जागा घेणें ती ठाकूरद्वारनजीक असावी. (२) रुपये पन्नास हजारांचा निधि जमा करावा. यासाठीं डॉ. नाना-साहेब देशमुख, श्री. आबासाहेब कोल्हटकर, श्री. दाजी आबाजी खरे यांच्यासारख्या प्रतिष्ठित नि वजनदार गृहस्थांनीं समाजांत फिरावें. (३) दहा हजार रुपये जमा झाले म्हणजे महाजनवाडीसाठीं जागा खरेदी करणें वगैरे कामांस प्रारंभ करावा. (४) सर्वांनीं विनामूल्य कामें करावीं. (५) हें सर्व काम ब्राह्मण सभेमार्फत चालू आहे अशा प्रकारचें कामाचें स्वरूप असावें,

तसेंच, महाजनवाडीसाठीं एक हजार वार जागा मिळूं शकेल अशा हिशेबानें इमारतीच्या नकाशाचीहि आंखणी करण्यांत आली.

१८९८ च्या मे महिन्यांत "महाजनवाडी संबंधीं थोडक्यांत हकीकत" म्हणून एक पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें. त्याचा सारांश असाः—(१) या कामाचा प्रारंभ डिसेंबर १८९७ मध्यें झाला. (२) निरनिराळ्या सव्वीस विभागांतून ८६४ ब्राह्मण कुटुंबांकडून माहिती आली. (३) फेब्रुवारी १८९८ मध्यें मुंबईंत प्लेगनें कहर केला त्यामुळें पुष्कळ कुटुंबें बाहेरगांवीं गेलीं. फेब्रुवारी रु. २००२, मार्च रु. २३६५, एप्रिल रु. ५७ व मे रु. ५६८–८–० याप्रमाणें निधि जमा करण्यांत आला. (४) महाजनवाडीप्रीत्यर्थ जमा करण्यांत येत असलेल्या निधीसाठीं पुढीलप्रमाणें ठळक आश्वासनें मिळालीं :—

रु. १००१ न्या. मू. महादेव गोविंद रानडे
,, १००१ ना. डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर
,, १००१ डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख

रु. १००१ डॉ. सदाशिव वामन काणे
,, ५०१ श्री. रामचंद्र गोविंद तळवलकर
,, ४०१ रा. सा. नारायण त्र्यंबक वैद्य
,, २०१ श्री. जनार्दन दामोदर कोल्हटकर
,, २०१ श्री. पुरुषोत्तम विष्णु गोडबोले
,, १०१ रा. सा. गोपाळ मोरेश्वर साठे
,, ५१ श्री. गणेश कृष्ण आपटे
,, ५१ श्री. गोविंद कृष्ण रानडे

प्रत्येक महिन्याचें इतिवृत्त 'मुंबई वैभव' पत्रांत प्रसिद्ध करण्याचें ठरलें होतें.

प्राथमिक व्यवस्थापक मंडळ

जून १८९८ मध्यें महाजनवाडीसंबंधानें एक सभा होऊन पुढील पंधरा गृहस्थांचें व्यवस्थापक मंडळ नेमण्यांत आलें व जरूर वाटल्यास आणखी गृहस्थ संयोजित करून घेण्याचा अधिकार त्यांस देण्यांत आलाः—

(१) डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख (२) रा. सा. गोपाळ मोरेश्वर साठे (३) रा. सा. नारायण त्र्यंबक वैद्य (४) रा. रा. जनार्दन दामोदर कोल्हटकर (५) रा. रा. पुरुषोत्तम विष्णु गोखले (६) रा. रा. नरहर विष्णु काथवटे, एल्. सी. ई. (७) रा. रा. नारायण रामचंद्र सोहनी (८) रा. रा. हरि विष्णु लेले, एल्. सी. ई. (९) रा. रा. पांडुरंग विष्णु अभ्यंकर (१०) रा. रा. विनायक कोंडदेव ओक (११) रा. रा. गोविंद हरि देव (१२) रा. रा. काशीनाथ त्र्यंबक खरे (१३) रा. रा. दामोदर रामचंद्र बापट (१४) रा. रा. सदाशिव कृष्ण जोशी (१५) रा. रा. कृष्णाजी नीलकंठ साने.

महाजनवाडी निधीची जी रक्कम जमा होईल ती श्रीमंत हरि जनार्दन देव यांचे पेढीवर ठेवावी असें ठरविण्यांत आलें.

एक मननीय पत्र

डॉ. सदाशिव वामन काणे हे नाशिक येथें असतांना महाजनवाडी-प्रीत्यर्थ त्यांनीं कांहीं देणगी द्यावी अशी विनंती करण्यासाठीं रा. सा. विनायक रावजी ओक व श्री. काशीनाथपंत खरे यांनीं त्यांस पत्रें लिहिलीं. दि. २-३-१८९८ ला डॉ. काणे यांनीं श्री. काशीनाथपंत खरे यांस उत्तर पाठविलें. पन्नास वर्षांपूर्वी एका सुविचारी ब्राह्मण गृहस्थाची विचारसरणी समजण्यास या पत्राचा फार चांगला उपयोग होण्यासारखा असल्यामुळें त्यांतील महत्त्वाचा भाग प्रसिद्ध करणें औचित्यपूर्ण वाटतें. तो भाग असा:—"आपलें ता. २३ फेब्रुवारीचें पत्र पोहोंचलें. आपण वयानें व तपानें वृद्ध आहांत. आपण आपलें बरेंच आयुष्य लोकसेवेंत घालविलें आहे यामुळें आपण पुण्यपुरुष आहांत असें म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या कल्याणकारक इच्छेस फल यावयाचेंच आणि आपले आशीर्वादहि सफल व्हावयाचेच अशी माझी दृढ श्रद्धा असल्यामुळें आपल्या आशीर्वादांचा मीं आदरबुद्धीनें स्वीकार केला आहे. परंतु खरोखर जो आशीर्वाद मला पाहिजे होता व जो आपणासारख्या मनुष्यानें द्यावयासहि पाहिजे होता तो मला मिळाला नाहीं याबद्दल माझ्या मनाला जरा वाईट वाटतें. मला पुत्र-प्राप्तीची इच्छा आहे असें समजून जर आपण मला तसा आशीर्वाद दिला असला तर मला पाहिजे असलेला आशीर्वाद आपणांकडून मला मिळाला नाहीं असेंच म्हणणें मला भाग आहे. मला कन्या झाल्या, नि एक पुत्रहि होता. आतां फक्त एक कन्या आहे. ती दीर्घायु होवो म्हणजे झालें. मला पुत्राचें सुख नाहीं म्हणून मी हळहळत असून तो होण्याविषयीं देवाला मी नवस बोललों आहें असें जर आपणास

वाटत असेल तर तो आपला भ्रम आहे, हें मी आपणास मनःपूर्वक सांगतों. मला कशाबद्दल हळहळ वाटत असेल तर जें मला होतें व जें फार प्रिय होतें तें माझें नाहींसें झाल्याबद्दलची आहे. आज आपली परिस्थिति काय आहे ? देशांत दारिद्र्य व पारतंत्र्य यांवांचून कांहीं नाहीं. आपण दास बनलों असून हीनदीनपणें वागत आहोंत. या सर्व गोष्टींचे विचार ज्याच्या डोक्यांत घोळत आहेत त्याला पुत्र नाहीं म्हणून हळहळ वाटेल व त्यासाठीं तो देवाला नवस करील हें शक्य तरी आहे काय ? आपण स्वतः दास असतांना आणखी नवीन दासांची कां भर घालावयाची ?"

डॉ. काणे यांनीं पुढील तीन अटींवर देणगी देण्याचें कबूल केलें. (१) कोणाहि पुरुषाचें (मग तो प्रथम वर असो वा बिजवर असो) त्याच्या वयाच्या चाळीस वर्षांच्या पुढें लग्न होऊं नये. (२) कोणाहि मुलीचें दहा वर्षांच्या आंत लग्न होऊं नये. (३) ऋतुमती होण्यापूर्वीच ज्या मुलीवर विधवा होण्याचा दुर्धर प्रसंग आला असेल त्या मुलीचा ब्राह्मणाशीं पुनर्विवाह होण्यास महाजनवाडींत परवानगी असावी.

डॉ. काणे यांच्या आश्वासनास ज्याअर्थीं महाजनवाडी व्यवस्थापक मंडळानें प्रसिद्धि दिली त्याअर्थी या प्रगतिपर विचारांशीं महाजनवाडी व्यवस्थापक मंडळ सहमत होतें असें धरून चालण्यास हरकत नाहीं.

खटपट कोणाची ?

जुलै १८९८ मध्यें श्रीमंत महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांचा मुक्काम मुंबईस होता. रा. सा. विनायक कोंडदेव ओक आदिकरून बारा सन्माननीय ब्राह्मण सद्गृहस्थांनीं ब्राह्मण महाजनवाडीस साहाय्य मिळविण्याबद्दल त्यांस विनंतीपत्र लिहिलें. पण या प्रयत्नास यश आल्याचें दिसत नाहीं. निधीसाठीं ज्या मानानें आश्वासनें मिळालीं त्या मानानें तीं फलद्रूप झाल्याचें दिसत नाहीं. कारण रा. देव यांच्या पेढीवर

रु. ८००० पेक्षां अधिक रक्कम जमा झाल्याचें दिसून येत नाहीं. खटपटीची पराकाष्ठा करून प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें पुन्हा पुन्हा ज्या गृहस्थांना बाहेरगांवीं जावें लागे ते १८९७ मध्यें पुन्हा मुंबईस आले व या कामाच्या पायीं त्यांनीं अक्षरशः जिवाचें रान केलें. 'एक खटपटी गृहस्थ' म्हणून आतांपर्यंत ज्यांचा अनेक वेळां उल्लेख केला गेला त्यांचें नांव काशीनाथ त्र्यंबक खरे हें होय. १८९८ सालीं त्यांनीं श्रीमंत सरदार बाळासाहेब व तात्यासाहेब नातू यांस लिहिलेलें एक पत्र उपलब्ध झाल्यामुळेंच 'त्या' गृहस्थांच्या नांवाचा तरी पत्ता लागला. यांचें १८५५ ते १८८५ या काळांत पुण्यास स्टेशनरी वगैरे सामानाचें दुकान होतें. १८८५ च्या सुमारास ते मुंबईस आले. पुण्यास असतांना लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दींत स्थानिक स्वराज्याचे अधिकार लोकांस देण्याची वाटाघाट चालू होती. त्या वेळीं हातीं येणाऱ्या अधिकारांचा ज्यास्तींत ज्यास्त उपयोग कसा करून घेतां येईल या संबंधींची चौकशी करण्याकरितां पुण्याच्या सार्वजनिक सभेनें जिल्हानिहाय कांहीं प्रचारक पाठविले होते. त्याप्रमाणें श्री. खरे यांच्याकडे सोलापूर, विजापूर, बेळगांव, धारवाड, पुणें असे पांच जिल्हे व गुजराथेंतील सुरत, खेडा, भडोच आणि अहमदाबाद असे चार मिळून नऊ जिल्ह्यांची पहाणी करण्याचें काम आलें होतें व तें त्यांनीं उत्कृष्ट प्रकारें पार पाडलें. आपलें सार्वजनिक कार्याचें व्रत त्यांनीं आपल्या वयाच्या ६७ व्या वर्षींहि मुंबई येथें सुरू ठेवलें. त्यांच्या या निरलस समाजकार्याबद्दल त्यांस अत्यादरानें अभिवादन करण्याचीच्छे काम करतां येण्यासारखें

सारा खटाटोप फुकट

अधिक निधि जमा होण्याचा रंग दिसेना. कोणीच जबाबदारीनें पुढें होईना. तेव्हां रा. देव यांच्या सूचनेवरून महाजनवाडीच्या

आश्रयदात्यांची सभा भरविण्यांत येऊन ज्याची रक्कम त्यास परत करण्यांत आली.

एवढा सारा खटाटोप फुकट गेला याबद्दल ज्यांच्या मनाला अत्यंत क्लेश झाले त्यांपैकीं श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर हे एक गृहस्थ होत. त्यांनीं १९०५ चे सुमारास महाजनवाडीसाठीं पुन्हा प्रयत्न करण्यास आरंभ केला. त्यावेळीं ठाकूरद्वारनजीक धसवाडींत 'अग्निहोत्र्याचें घर' या नांवानें प्रसिद्ध असलेलें एक घर होतें. हें घर महाजनवाडीसाठीं मिळविण्याची खटपट चालू झाली.

अग्निहोत्र्याचें घर

सुमारें नव्वद वर्षांपूर्वी कै. श्रीमंत नाना शंकरशेट यांनीं मुंबईंत अग्निहोत्र असावें म्हणून वे. शा. सं. दामोदरशास्त्री हातवळणे अग्निहोत्री यांस मुद्दाम बारामतीहून बोलावून आणून सदर घर त्यांच्या हवालीं केलें. रा. दामोदरशास्त्री अग्निहोत्री यांनीं होमकुंडें वगैरे तयार करवून तेथें अग्निहोत्र सुरू केलें. घराचा बाकीचा भाग भाड्यानें देऊन दरमहा ७५ रुपये भाडें येण्याची व्यवस्था करण्यांत आलेली होती. सदरहू दामोदरशास्त्री हे कांहीं वर्षांनीं दिवंगत झाले. दामोदरशास्त्र्यांना मूलबाळ नव्हतें. त्यांचे धाकटे बंधु नारायणशास्त्री, नारायणशास्त्र्यांचा मुलगा बळवंत व दामोदरशास्त्र्यांची पत्नी त्या घरांत राहूं लागलीं. पण कांहीं दिवसांनीं त्यांचें परस्परांशीं पटेनासें झाल्यामुळें दामोदरशास्त्र्यांच्या कुटुंबास अन्नवस्त्रासाठीं घराचा कांहीं भाग तोडून देऊन बाकीच्या जागेंत नारायणशास्त्र्यांनीं अग्निहोत्राचें काम चालू ठेवलें. पुढें कांहीं वर्षांनीं नारायणशास्त्री निवर्तले व दामोदरशास्त्र्यांचें कुटुंबहि कालवश झालें. तेव्हां बळवंत हातवळणे हाच सर्व घराचा मालक झाला. बळवंत अशिक्षित असून शिवाय व्यसनीहि होता. अग्निहोत्रामुळें ज्या जागीं पवित्र अग्नीचें दर्शन घडावयाचें त्या ठिकाणीं

बळवंत व त्याचे स्नेहीसोबती यांनीं ओढलेल्या विड्यांचा धूरच फक्त दिसूं लागला. व्यसनांमुळें बळवंताची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली. पण मौज ही कीं, ज्या नातेवाईकांनीं त्याची पूर्वी कधीं वास्तपुस्तहि केली नव्हती तेच आतां त्याच्या भोंवतीं जमा होऊं लागले. अर्थात्, त्या सर्वांची दृष्टि त्या घरावर खिळलेली होती हें सांगावयास नकोच. बळवंतराव हातवळणे यांच्या मालकीचें हें घर त्यांच्या पश्चात् चोरापोरांच्या हातीं जाण्यापेक्षां ब्राह्मणांच्या ज्ञाति-कार्यासाठीं मिळाल्यास बरें असे विचार साहजिकपणेंच कांहीं कार्य-कर्त्यांच्या मनांत घोळूं लागले. याप्रमाणें श्री. अं. गो. पुणतांबेकर यांनीं बळवंतरावांची भेट घेतली व अत्यंत सहानुभूतिपूर्वक त्यांची विचारपूस केली. तसेंच, तुमच्या औषधपाण्याची व जेवणाखाण्याची व्यवस्था आपण करूं असेंहि रा. पुणतांबेकरांनीं त्यांस आश्वासन दिलें. सर भालचंद्र यांना बळवंतरावांची प्रकृति दाखवून पुणतांबेकरांनीं औषधाची व्यवस्था केली व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था स्वतः पाहूं लागले. हळुहळू पुणतांबेकरांनीं बळवंतरावाजवळ घराचा विषय काढला. त्यांनीं बळवंतरावाला समजावून सांगितलें कीं, तुझ्या चुलत्याला एका पवित्र कार्यासाठीं मिळालेलें हें घर कोणातरी सोळभोकाच्या हातांत जाणें कांहीं इष्ट नाहीं. त्यापेक्षां आपल्या ब्राह्मण ज्ञातीच्या एखाद्या कार्याकाठीं तें देऊन टाकलें तर त्याचें योग्य चीज केलें असें होईल. यावर बळवंतरावानें अशी अडचण उपस्थित केली कीं, या घराच्या बाबतींत हजार पंधराशें रुपयांचा बोजा आहे आणि शिवाय आपलें कुलदैवत जें 'खंडोबा' त्याची पूजाअर्चा कधींहि अंतरतां कामा नये. तेव्हां श्री. पुणतांबेकरांनीं सर भालचंद्र भाटवडेकर, डॉ. नानासाहेब देशमुख, श्रीमंत वासुदेव बळवंत सोमण वगैरेंशीं या संबंधानें विचारविनिमय केला. त्याप्रमाणें श्री. पुणतांबेकरांनीं घरावरचा बोजा दूर करण्याचें आश्वासन दिलें व हातवळण्यांच्या कुलदैवताची

बळवंत व त्याचे स्नेहीसोबती यांनीं ओढलेल्या विड्यांचा धूरच फक्त दिसूं लागला. व्यसनांमुळें बळवंताची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली. पण मौज ही कीं, ज्या नातेवाईकांनीं त्याची पूर्वी कधीं वास्तपुस्तहि केली नव्हती तेच आतां त्याच्या भोंवतीं जमा होऊं लागले. अर्थात्, त्या सर्वांची दृष्टि त्या घरावर खिळलेली होती हें सांगावयास नकोच. बळवंतराव हातवळणे यांच्या मालकीचें हें घर त्यांच्या पश्चात् चोरापोरांच्या हातीं जाण्यापेक्षां ब्राह्मणांच्या ज्ञाति-कार्यासाठीं मिळाल्यास बरें असे विचार साहजिकपणेंच कांहीं कार्य-कर्त्यांच्या मनांत घोळूं लागले. याप्रमाणें श्री. अं. गो. पुणतांबेकर यांनीं बळवंतरावांची भेट घेतली व अत्यंत सहानुभूतिपूर्वक त्यांची विचारपूस केली. तसेंच, तुमच्या औषधपाण्याची व जेवणाखाण्याची व्यवस्था आपण करूं असेंहि रा. पुणतांबेकरांनीं त्यांस आश्वासन दिलें. सर भालचंद्र यांना बळवंतरावांची प्रकृति दाखवून पुणतांबेकरांनीं औषधाची व्यवस्था केली व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था स्वतः पाहूं लागले. हळुहळू पुणतांबेकरांनीं बळवंतरावाजवळ घराचा विषय काढला. त्यांनीं बळवंतरावाला समजावून सांगितलें कीं, तुझ्या चुलत्याला एका पवित्र कार्यासाठीं मिळालेलें हें घर कोणातरी सोळभोकाच्या हातांत जाणें कांहीं इष्ट नाहीं. त्यापेक्षां आपल्या ब्राह्मण ज्ञातीच्या एखाद्या कार्यासाठीं तें देऊन टाकलें तर त्याचें योग्य चीज केलें असें होईल. यावर बळवंतरावानें अशी अडचण उपस्थित केली कीं, या घराच्या बाबतींत हजार पंधराशें रुपयांचा बोजा आहे आणि शिवाय आपलें कुलदैवत जें 'खंडोबा' त्याची पूजाअर्चा कधींहि अंतरतां कामा नये. तेव्हां श्री. पुणतांबेकरांनीं सर भालचंद्र भाटवडेकर, डॉ. नानासाहेब देशमुख, श्रीमंत वासुदेव बळवंत सोमण वगैरेंशीं या संबंधानें विचारविनिमय केला. त्याप्रमाणें श्री. पुणतांबेकरांनीं घरावरचा बोजा दूर करण्याचें आश्वासन दिलें व हातवळण्यांच्या कुलदैवताची

पूजाअर्चा नियमानें होण्यासंबंधानेंहि हमी घेतली. तेव्हां बळवंतरावानें त्या घरासंबंधाचें मृत्युपत्र करण्याची तयारी दर्शविली व सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, श्रीमंत वासुदेव बळवंत सोमण, रा. सा. नारायण त्र्यंबक वैद्य, डॉ. नानासाहेब देशमुख व रा. पुरुषोत्तम परशुराम खरे (हायकोर्ट वकील) यांस पंच नेमण्यासहि आपली मान्यता दिली. परंतु बळवंतरावांच्या भोंवतीं खुशालचेंडूंचा जो एक गट जमत असे त्याला रा. पुणतांबेकरांची ही योजना पसंत नव्हती. या मोठमोठ्या लोकांना जर ज्ञातीची खरोखरच इतकी कळकळ वाटत असती तर त्यांनीं आपापल्या खिशांतून रकमा काढून एखादें ज्ञाति-गृह नसतें का बांधलें? अशा युक्तिवादानें तें टोळकें बळवंतरावाला बिथरवीत असे. डॉ. भालचंद्र यांचा औषधोपचार व रा. पुणतांबेकर यांनीं चालविलेली शुश्रूषा यांमुळें बळवंतरावाच्या मनांत एक प्रकारची कृतज्ञताबुद्धि उत्पन्न झाली होती आणि म्हणूनच त्यांच्या योजनेला त्यानें मान्यताहि दिली होती. पण त्याच्या मित्रमंडळींनीं उलट बाजूनें उठाव केला कीं, बळवंतरावाचें मन द्विधा होऊन जाई. तेवढ्यांत कांहीं निकडीच्या कामासाठीं रा. पुणतांबेकरांना नाशकास जावें लागलें. ही संधि साधून त्या स्नेह्यांनीं एका वकिलाच्या मदतीनें बळवंतरावाकडून मृत्युपत्र तयार करविलें आणि त्या स्नेह्यांपैकींच दोघे त्या घराचे विश्वस्त म्हणून नेमण्यांत आले. मुंबईस आल्यावर रा. पुणतांबेकरांना ही हकीकत समजली. ते ताबडतोब बळवंतरावाकडे गेले पण बळवंतराव बेशुद्धावस्थेंत पडलेले होते. तेव्हां पुणतांबेकरांनीं त्या वकिलाची भेट घेतली. पण त्याचा आतां कांहींच उपयोग होण्यासारखा नव्हता. श्री. पुणतांबेकरांनीं या बाबतींत केलेले सारे प्रयत्न फुकट गेले. त्यांना आर्थिक झीज मात्र सोसावी लागली आणि महाजनवाडीचा योग कांहीं वर्षें तरी दुरावला!

नागचांफ्याचा अनुभव असा सांगतात कीं, जोंपर्यंत त्याचें मूळ जमिनींत शिल्लक आहे तोंपर्यंत तें फूलझाड मरत नाहीं. पाऊस पडला

कीं त्याचें रोपटें दिसूं लागतें आणि नंतर चौदा वर्षांनीं त्याच्यावर फुलें दिसूं लागतात. असाच कांहींसा प्रकार महाजनवाडीच्या बाबतींत घडला असें म्हणावयास हरकत नाहीं. ब्राह्मण महाजनवाडी ही फार कठीण गोष्ट आहे हें तर दिसतच होतें. पण या महाजनवाडीच्या कल्पनेनें समाजाच्या अंतःकरणांत फार खोलवर प्रवेश केला होता. अडचणीच्या डोंगराखालीं ती चिरडली गेली असली तरी मेली नव्हती. योग्य संधि दिसूं लागतांच या कल्पनेनें पुन्हा डोकें वर काढलें.

फेब्रुवारी १९१३ च्या सुमारास श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठ संकेश्वर व करवीर यांची स्वारी संचारार्थ चौल, अलिबाग या भागांत होती. श्रींचें आपल्या परिवारासह जेथें वास्तव्य होई तेथील स्थानिक मंडळींनीं जागेची व इतर सर्व खर्चाची व्यवस्था करण्याचा प्रघात होता. श्रीसंस्थानचे व्यवस्थापक श्री. सोनोपंत पंचनदीकर मुंबईस आले व कांहीं ठळक गृहस्थांच्या भेटी घेऊन मुंबईस भेट देण्याचा श्रींचा मानस असल्याचें सांगितलें. श्रींनीं मुंबईस येण्यापेक्षां ज्यांना त्यांची संभावना करण्याची इच्छा असेल त्यांनीं मुंबईत एक निधि जमवून तो श्रींकडे पाठवून द्यावा असें मत कांहींनीं प्रतिपादिलें. पण डॉ. नानासाहेब देशमुख व सर भालचंद्र कृष्ण यांनीं मात्र श्रींनीं मुंबईला अवश्य दर्शन द्यावें अशीच इच्छा प्रदर्शित केली. शहरांतील दक्षिणी हिंदूंची सभा भरवून अशा सभेची या कार्यासाठीं संमति मिळविणें हें काम स्थानिक पुढाऱ्यांनींच केलें पाहिजे असें श्री. पंचनदीकर यांनीं सुचविल्यावरून डॉ. भालचंद्र यांनीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे एक संस्थापक व चिटणीस श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर यांचें नांव व पत्ता देऊन श्री. पंचनदीकर यांस त्यांचेकडे पाठविलें. श्रीमच्छंकराचार्यांची स्वारी मुंबईस येत आहे तेव्हां त्यांच्या स्वागतार्थ स्वागतसमिति स्थापणें व श्रींचें वास्तव्य मुंबईत असेपर्यंत श्रीसंस्थानची देवता श्रीचंद्रमौलेश्वर व श्रींचा परिवार यांना उतरण्यास

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य मठ संकेश्वर

श्रीमंत अण्णासाहेब नवरे

कै. श्रीमंत हरि केशव
तथा भाऊसाहेब गोखले

कै. डॉ. रा. ह. भडकमकर

कै. डॉ. चिं. रा. आठवले

योग्य अशी जागा पाहून भोजनादि सर्व व्यवस्था करणें इत्यादि गोष्टी मुंबईकरांच्या लौकिकास शोभतील अशा प्रकारें करावयाच्या असें ठरलें. या सर्व गोष्टींचा यथासांग विचार करण्याकरितां मुंबईतील दक्षिणी हिंदूंची एक सभा भरविण्याविषयीं सरसाहेबांनीं श्री. पुणतांबेकर यांस सुचविलें. या सर्व कामीं उपस्थित होणाऱ्या अडचणी व मुंबईतील एकंदर परिस्थिति निवेदन करून मुंबईकरांतर्फे श्रींना पाचारण करण्याच्या पत्रकाचा मसुदा तयार करण्यांत आला. त्यावर डॉ. भालचंद्र कृष्ण, डॉ. नानासाहेब देशमुख आदिकरून अनेक थोर थोर लोकांच्या स्वाक्षऱ्या होत्या. खर्चाची तरतूद करण्याकरितां पावतीपुस्तकें छापण्यांत आलीं. निधि जमविण्यासाठीं स्वयंसेवकांचें पथक तयार करण्यांत आलें. या कामीं डॉ. लक्ष्मण नीलकंठ पुरोहित व डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर यांनीं पहिल्यापासून उत्कृष्ट मार्गदर्शन केलें. शेट विश्वनाथ मदन, शेट तुकाराम जावजी, श्री. रामचंद्र भास्कर मंत्री, श्री. गणपत सदाशिवराव इ. गृहस्थांनींहि या कामीं मनापासून साहाय्य केलें. श्रींच्या वास्तव्यासाठीं शेट नेमाणी यांची वाडी मुक्रर करण्यांत येऊन निरनिराळ्या ठिकाणीं श्रींची पाद्यपूजा होण्यासंबंधीं योजना आंखण्यांत आली.

श्रींचा आशीर्वाद

शेट नेमाणी यांची वाडी कांहीं मुदतीपुरतीच मिळालेली असल्यामुळें त्यानंतर सोईस्कर जागा मिळविणें फार कठीण झालें. मोठ्या प्रयत्नानें कावसजी पटेल तलावानजीक काशीबाग ही जागा मिळाली. त्या जागेसंबंधानें वाटाघाटी चालू असतांना ब्राह्मण महाजनवाडीसंबंधानें आजपर्यंत झालेले प्रयत्न कसे वायां गेले हें श्री. पुणतांबेकरांनीं श्रींना निवेदन केलें. समाजाला श्रीजगद्गुरूंबद्दल जो आदर वाटतो त्याकडे पाहतां या संबंधांत श्रींनीं जर आपला शब्द खर्च केला तर त्याचा फार मोठा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं व ब्राह्मण महाजनवाडीची

कल्पना प्रत्यक्षांत उतरून समाजाची एक मोठी गैरसोय दूर होईल अशी श्री. पुणतांबेकर यांची दृढ श्रद्धा होती. तेव्हां श्री. पुणतांबेकर यांनीं आपणाला अशी संधि आणून द्यावी असें श्रींनीं आपलें मत व्यक्त केलें. चौदा वर्षें जी कल्पना रात्रंदिवस अंतःकरणांत जागृत होती तिला मूर्तस्वरूप येण्याची थोडीशी संधि दिसतांच आपल्या प्रयत्नांची पुन्हा एकदां शिकस्त करण्याचा रा. पुणतांबेकरांनीं निश्चय केला.

श्रींची देणगी

चिंचपोकळीस रहात असलेले श्रीमंत वासुदेव बळवंत सोमण यांचेकडून होणारी पाद्यपूजा श्रींच्या निवासस्थानीं व्हावी अशी रा. पुणतांबेकर यांनीं योजना केली. या प्रसंगीं उपस्थित रहाण्याबद्दल मुंबईतील प्रतिष्ठित ब्राह्मण गृहस्थांना मुद्दाम निमंत्रणें पाठविण्यांत आलीं. हा पाद्यपूजासमारंभ चैत्र शु. १ शके १८३५ या दिवशीं झाला. समारंभ यथासांग पार पडल्यावर श्री. पुणतांबेकरांनीं श्रीमंत सोमण व इतर उपस्थित सद्गृहस्थ यांची श्रींना माहिती करून दिली. तेव्हां इतके थोर थोर व कर्तृत्ववान् ब्राह्मण गृहस्थ मुंबईत वास्तव्य करीत असतांना या ठिकाणीं ब्राह्मणांचें एखादें ज्ञातिगृह असूं नये याबद्दल श्रींनीं आश्चर्य व्यक्त केलें व असें ज्ञातिगृह असण्याची आवश्यकता सर्वांस पटवून दिली. पूर्वी केलेले प्रयत्न यशस्वी झाले नाहींत म्हणून हातपाय गाळून स्वस्थ न बसतां फिरून जोराचा प्रयत्न करा आणि यश मिळवा असा सर्व उपस्थितांना श्रींनीं आशीर्वाद दिला आणि या आशीर्वादाबरोबर या कार्यासाठीं आपण स्वतः एक हजार रुपयांची देणगी देणार असल्याचें घोषित केलें. योग्य वेळीं श्रींनीं आपली देणगी डॉ. नानासाहेब देशमुख यांजकडे पाठवूनहि दिली. हाच शुभ शकुन असें समजून डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखालीं पुन्हां कांहीं मंडळी महाजनवाडीच्या उद्योगाला लागली.

पुन्हा जोराचे प्रयत्न

बुधवार दि. १३ एप्रिल १९१८ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां श्री जगद्गुरूंच्या इच्छेनुसार त्यांच्या निवासस्थानीं म्हणजे खत्तरगल्ली-समोरील महाजनवाडींत मुंबईतील अखिल ब्रह्मवृंदांची प्रकट सभा भरविण्यांत आली. श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. प्रथम डॉ. नानासाहेब देशमुख यांनीं महाजनवाडीसाठीं पूर्वी झालेल्या प्रयत्नांची थोडक्यांत माहिती सांगून श्रीजगद्गुरूंचा यावेळीं आशीर्वाद मिळाला असल्यामुळें आपलें कार्य सफल झाल्या-शिवाय राहणार नाहीं असा आपला विश्वास प्रकट केला. यानंतर श्री. पुणतांबेकर, श्री. नारायण शिवराम बर्वे, श्री. विठ्ठल सदाशिव फाटक व श्री. सदाशिवराव परांजपे यांचीं महाजनवाडीच्या आवश्य-कतेसंबंधानें भाषणें झालीं. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, डॉ. नाना-साहेब देशमुख, श्री. वासुदेव बळवंत सोमण, श्री. यशवंत विष्णु नेने आणि श्री. जगन्नाथ रामचंद्र घारपुरे यांस महाजनवाडीप्रीत्यर्थ जमा होणाऱ्या निधीचे विश्वस्त म्हणून निवडण्यांत आलें. तसेंच, एक कार्य-कारी मंडळहि निवडण्यांत येऊन श्री. कृष्णाजी पांडुरंग फडके (अध्यक्ष), प्रो. हरि महादेव भडकमकर (उपाध्यक्ष), डॉ. लक्ष्मण नीलकंठ पुरोहित, श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. अ. नी. पिटकर (चिटणीस) असे पदाधिकारी निवडण्यांत आले. निधीसाठीं आंकडे मिळविण्याचें काम सभेच्या जागींच सुरू झालें. श्रीजगद्गुरूंनीं आपली रु. १००१ ची देणगी पूर्वीच डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या हवालीं केली होती. त्याशिवाय डॉ. नानासाहेब देशमुख, सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, श्री. अप्पाजी खंडेराव कुळकर्णी, श्री. कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे, श्री. कृष्णनाथ विनायक दिमोटे यांनीं प्रत्येकीं रु. १००१ देण्याचें आश्वासन दिलें. सात गृहस्थांनीं प्रत्येकीं रु. ५०१ व कांहींनीं रु. १०१ देण्याचें आश्वासन दिलें. जागच्या जागीं रु. १४००० चे

आंकडे पडले. महाजनवाडीप्रीत्यर्थ घ्यावयाची जागा व बांधावयाची इमारत यांप्रीत्यर्थ एक लाखाचा अंदाज सभेंत व्यक्त करण्यांत आला. कार्यकारी मंडळानें ताबडतोब कामास लागावें आणि महाजनवाडीच्या योजनेस शक्य तितक्या लौकर मूर्तस्वरूप द्यावें असें ठरलें. तसेंच, या कार्यासाठीं श्रीजगद्गुरु शंकराचार्यांनीं आपले शुभाशीर्वाद देऊन रु. १००१ ची देणगीहि दिली म्हणून ब्राह्मण महाजनवाडीला 'श्री शंकरवाडी' असें नांव देण्याचेंहि ठरविण्यांत आलें.

यानंतर श्रीशंकरवाडीप्रीत्यर्थ निधि जमा करण्यासाठीं जोराचे प्रयत्न सुरू झाले. मुंबईंतील धनिक ब्राह्मण गृहस्थांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांस या कार्याचें महत्त्व समजावून देऊन त्यांच्याकडून देणग्यांचीं आश्वासनें मिळविण्यांत येऊं लागलीं. चाळीचाळींतून सभा भरविण्यांत येऊन समित्या नेमण्यांत आल्या. जमा झालेला निधि श्री. यशवंत विष्णु नेने यांच्या स्वाधीन केला जात असे. कांहीं दिवसांनीं श्रीशंकरवाडी ही संस्था सोसायटीच्या कायद्याप्रमाणें नोंदविण्यांत आली.

अखेर निराशा

इतका प्रचार व इतके प्रयत्न करूनहि निधीचा आंकडा फारसा वाढेना. श्रीशंकरवाडीकरितां जागा अगर इमारत प्रथम खरेदी करावी आणि मग निधि जमविण्याची खटपट करावी अशा सूचना कांहीं लोक करूं लागले. पण निदान रु. २५०० हातांत असल्याशिवाय जागा अगर इमारत खरेदी करण्याच्या भानगडींत पडूं नये असें कार्यकारी मंडळाचें मत होतें. पण इतके परिश्रम करूनहि प्रत्यक्ष हातीं आलेला निधि रु. १२००० वर झाला नाहीं. कार्यकर्त्यांचा उत्साहहि हळुहळू कमी होत चालला आणि कालांतरानें निधि जमविण्याचें हें काम स्थगित करण्यांत आलें. जमा झालेली रक्कम विश्वस्त मंडळींनीं सरकारी रोख्यांत गुंतवून टाकली.

एकीकरण

चार संस्थांचें एकीकरण करावयाचें ठरलें तरी श्रीशंकरवाडी ही संस्था नोंदली गेली असल्यामुळें या विलीनीकरणांत ती सामील होण्याच्या बाबतींत कायद्याची हरकत आली. पुढें दि. २६–९–१९२५ रोजीं ब्राह्मण सभा रजिस्टर झाली. सोसायटीच्या कायद्याच्या वाराव्या कलमांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें श्रीशंकरवाडी फंडाच्या दोन जादा साधारण सभा होऊन श्रीशंकरवाडी फंड ही संस्था ब्राह्मण सभेंत कायमची सामील करावी असें ठरलें. पहिली जादा साधारण सभा दि. २८-९-२५ रोजीं डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन तींत पुढील प्रस्ताव सर्वानुमतें पसार झाला.

" श्री शंकरवाडी फंड ज्या उद्देशांनीं उभारण्यांत आला ते व तशाच प्रकारचे आणखी कांहीं उद्देश योजून ब्राह्मण सभेनें ब्राह्मण ज्ञातिगृहाकरितां घर खरेदी करण्याचें साटेंखत केलें आहे. सबब ही सभा असा ठराव करते कीं—(१) श्रीशंकरवाडी फंडाचे व ब्राह्मण सभेचे उद्देश एकच असल्यामुळें 'श्रीशंकरवाडी फंड' ही संस्था निराळी असण्याचें कारण नाहीं. (२) 'श्रीशंकरवाडी फंड' ही संस्था ब्राह्मणसभेंत विलीन करण्यांत यावी. (३) 'श्रीशंकरवाडी फंडा' ची शिल्लक असलेली सर्व रक्कम ब्राह्मणसभेच्या स्वाधीन करण्यांत यावी. (४) ब्राह्मण सभेच्या घटनेच्या नंबर ५ मध्यें निर्दिष्ट केल्याप्रमाणें 'श्रीशंकरवाडी फंडा' चे आश्रयदाते व तहाहयात सभासद यांस ब्राह्मणसभेचे आश्रयदाते व तहाहयात सभासद समजावें. (५) पुढील दुसरी जादा साधारण सभा रवि. दि. १-११-२५ ला सायंकाळीं ब्राह्मणसभेच्या जागीं भरावी.

त्याप्रमाणें दुसरी जादा साधारण सभा दि. १-११-२५ ला श्री. महादेव वामन भट यांच्या अध्यक्षतेखालीं झाली व तींत पहिल्या

जादा साधारण सभेंत मान्य करण्यांत आलेले ठराव रीतसर कायम करण्यांत आले आणि 'श्रीशंकरवाडी फंड' ही संस्था ब्राह्मणसभेंत कायमची सामील झाली. श्रीशंकरवाडी फंडाची सर्व शिल्लक म्हणजे रु. १७८०३-९-३ (व्याजासह) ब्राह्मणसभेच्या स्वाधीन करण्यांत आली.

(७) ब्राह्मण हितवर्धिनी सभा

जो समाज अव्यवस्थित, असंघटित आणि फुटीर असेल त्याची उन्नति तर होऊं शकत नाहींच पण शिवाय इतर समाजांकडून त्याच्यावर आक्रमण होण्याचीहि भीति असते. याचाच सरळ आणि सोपा अर्थ असा कीं, ज्या समाजाला यथार्थानें जगण्याची इच्छा आहे त्यानें सुसंघटित असलेंच पाहिजे. अर्थात् समाजांतील घटकांची दृष्टि एकाद्या विशिष्ट ध्येयावर केंद्रित झाली तरच अशा प्रकारची प्रबल संघटना निर्माण होऊं शकते हें उघड आहे.

मुंबई नगरपालिकेंतील आपल्या नोकरीचें काम आटोपून घरीं परत येत असलेल्या दोन कारकुनांच्या मनांत वरील प्रकारचे विचार स्फुरत होते. याच विचारांना वाचा फुटली आणि त्या वाचेचें प्रत्यक्ष कृतींत पर्यवसान झालें. हे दोन कारकून म्हणजे श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर आणि श्री. वासुदेव वामन गद्रे हे होत.

ब्राह्मणज्ञातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या ब्राह्मण सभेस पंचवीस वर्षें होऊन गेलीं होतीं. ब्राह्मण विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य करण्यासाठीं स्थापन झालेल्या ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाचें काम सहा वर्षें चालू होतें. ब्राह्मण ज्ञातीच्या मालकीची महाजनवाडी असावी म्हणून परमपूज्य श्रीशंकराचार्यांच्या आशीर्वादानें श्रीशंकर-

वाडी निधि जमविण्याची खटपट झाली होती. पण तें कार्य पुढें स्थगित झालें होतें.

एक नवा उपक्रम

ब्राह्मणज्ञातीच्या हिताचें कोणतेंहि काम करण्यास तत्पर असणाऱ्या स्वयंसेवकांची संघटना करावी व उपरिनिर्दिष्ट संस्थांना त्यांच्या विवक्षित कार्यांत साह्य करून त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरीलहि कामें यावच्छक्य करावीं अशा उद्देशानें आश्विन शुद्ध १० शके १८३७ (ता. १७-१०-१९१५) या दिवशीं श्री. विठ्ठल काशीनाथ शौचे यांच्या टाइपरायटिंग कंपनीच्या जागेंत एक सभा बोलावण्यांत आली. आठवड्यांतून नियमितपणें कांहींतरी कार्य करण्याची ज्यांची तयारी होती अशांनाच सभेचें निमंत्रण पाठविण्यांत आलें होतें. याच सभेंत वरील उद्देशानुरूप 'ब्राह्मण हितवर्धिनी सभा' स्थापन करण्यांत आली व खालील प्रमाणें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें :—

(१) डॉ. ल. नी. पुरोहित (अध्यक्ष)
(२) श्री. अं. गो. पुणतांबेकर
(३) ,, वि. का. शौचे } चिटणीस
(४) ,, वासुदेव वामन गद्रे
(५) ,, वि. भि. निवर्गी
(६) ,, त्र्यंबकशास्त्री धामणकर
(७) ,, ग. शि. रानडे
(८) ,, मो. बा. मुळेकर
(९) ,, न. म. जोशी
(१०) ,, वि. रा. टुल्लू
(११) ,, द. ल. शिलेदार
(१२) ,, सी. श्री. जांभेकर

(१३) श्री. पु. के. मोटे
(१४) ,, दा. ग. रबडे.

संस्थेची नियमावली तयार करण्यांत येऊन सभासदांस मासिक दोन आणे वर्गणी ठेवण्यांत आली.

मदत व सत्कारसमारंभ

संस्थेसाठीं सभासद मिळविणें व ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे स्वयंसेवक द्रव्य जमा करण्यासाठीं चाळीचाळींतून हिंडत त्यांना मदत करणें हीं कामें या संस्थेनें प्रथम सुरू केलीं. ब्रा. हितवर्धिनी सभेच्या कार्यकर्त्यांच्या खटपटीमुळें ललितकलादर्श नाटक मंडळीनें 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हा आपला अत्यंत लोकप्रिय खेळ करून खर्च वजा जातां उरलेलें उत्पन्न २०१ रुपये विद्यार्थी सहाय्यक मंडळाकडे पाठविले.

एकमेकांचा परिचय व्हावा, ऐक्य व प्रेम वाढावें, ज्ञातिहितासाठीं कांहीं तरी कार्य करण्याची सर्वांना प्रेरणा व्हावी म्हणून शके १८३७ च्या मकरसंक्रांतीच्या दिवशीं ब्राह्मण ज्ञातीचें संमेलन भरविण्यांत आलें. श्रीशंकरवाडी निधीसाठीं खटपट करण्याचें ठरवून केवळ ब्राह्मण समाजासाठींच म्हणून किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीकडून 'सं. मानापमान' या नाटकाचा प्रयोग दि. १० एप्रिल १९१६ ला करविण्यांत येऊन खर्च वजा जातां राहिलेलें उत्पन्न रु. ५८४-२-० श्रीशंकरवाडी निधीचे खजिनदार श्री. अण्णासाहेब नेने यांच्या सुपूर्द करण्यांत आलें. याशिवाय घरोघर हिंडून रु. ७४८-१-० याच निधीसाठीं जमविण्यांत आले. ज्ञातींतील होतकरू तरुणांपैकीं श्री. म. वि. गोखले यांचें सॉलिसिटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल, प्रा. दि. ब. देवधर व श्री. स. म. जोशी यांचें त्यांनीं चौरंगी सामन्यांत प्रकट केलेल्या अप्रतिम कौशल्याबद्दल, व श्री. भावे यांचें विलायतेहून सिव्हिल एंजिनिअरिंगची

परीक्षा उत्तीर्ण होऊन आल्याबद्दल सभेमार्फत प्रकट अभिनंदन करण्यांत आलें. याप्रमाणें पहिल्या वर्षांत सभेकडून कामें झालीं. सभेनें पुढें ठेवलेल्या उद्देशानुरूप ज्ञातींतील बंधु-भगिनींचें लक्ष आकर्षित करून त्यांच्या मनांत सहानुभूति उत्पन्न करण्याच्या बाबतींत सभेस बऱ्याच प्रमाणांत यश आलें.

इतर उपक्रम

दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभीं मकरसंक्रमणानिमित्त संमेलन झालें त्या प्रसंगीं ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर यांचें 'वाङ्मयतप' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झालें. वर्षप्रतिपदेनिमित्त दि. २४-३-१९१७ ला श्री. जनार्दन विनायक ओक यांचें 'ब्राह्मण समाजाच्या उन्नतीची दिशा' या विषयावर डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं गांधर्व महाविद्यालयाच्या सभागृहांत फार मोठ्या व प्रतिष्ठित श्रोतृसमुदायापुढें व्याख्यान झालें. "ब्राह्मण ज्ञाति ही अखिल भारतीय समाजाचाच एक घटक असून ब्राह्मण ज्ञातींत जन्म लाभला म्हणून अभिमान वाटण्याचें कारण नाहीं. अखिल भारतीय समाजाचें हित साधण्याचें कर्तव्य हातून घडत असेल तरच जगण्यांत कांहीं अर्थ आहे. जन्मसिद्ध श्रेष्ठपणा मानावयाचा तर ज्ञान, गुण आणि कृति यांनीं तो सिद्ध करण्याची हिंमत असली पाहिजे. साऱ्या हिंदु समाजालाच कीड लागली असल्यानें ब्राह्मण ज्ञातीनें आपल्या पुरतीच सुधारणा करून भागणार नाहीं," इ. मुद्दे व्याख्यात्यांनीं श्रोत्यांपुढें मांडले. व्याख्यान आटोपल्यावर डॉ. पुरोहित, डॉ. भडकमकर, श्री. रबडे व श्री. पाठक हे प्रत्येकीं रु. ५१ देऊन सभेचे आजीव सभासद झाले.

श्रीमत् जगद्गुरु आद्य शंकराचार्य यांचा उत्सव झाला त्या प्रसंगीं प्रा. महादेव मल्हार जोशी यांचें, विचारांस चालना देणारें व ज्ञातीस मार्गदर्शन करणारें प्रवचन झालें. पुण्याच्या सोशल क्लबाकडून

'सत्त्वपरीक्षा' नाटकाचा प्रयोग करविण्यांत आला व त्याचें उत्पन्न रु. ६०० उपरिनिर्दिष्ट संस्थांना सारखें वाटून देण्यांत आलें. प्रो. चोळकर यांचे अचाट शक्तीचे प्रयोग सर भालचंद्र यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत येऊन त्यांचा गौरव करण्यांत आला.

दक्षिणी ब्राह्मण ज्ञातीची शिरगणती

मुंबईंत ब्राह्मण समाज किती आहे, तो कोठें कोठें पसरला आहे, त्याची स्थिति फारच खालावली असल्याबद्दल जो प्रवाद कानीं येतो त्यांत किती तथ्य आहे, याबद्दल संपूर्ण माहिती जमा करण्याच्या हेतूनें येथील ब्राह्मण ज्ञातीची शिरगणती करावी असें ब्रा. हितवर्धिनी सभेनें ठरविलें व त्यासाठीं पुढील समिति नेमण्यांत आली:—

डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर (अध्यक्ष), श्री. पां. वा. काणे, डॉ. ल. ग. दाते, डॉ. ल. नी. पुरोहित, श्री. सी. दि. जोगळेकर, प्रा. वा. ना. गोडबोले, श्री. गो. ह. मोडक, प्रा. ह. दा. वेलणकर, श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. न. म. जोशी, श्री. अ. नी. पिटकर, श्री. वि. भि. निवर्गी, श्री. वि. का. शौचे, श्री. शं. रा. जोशी, श्री. रा. वि. वेलणकर, श्री. मो. बा. मुळेकर, श्री. ग. शि. रानडे (चिटणीस).

सदर समितीच्या पुढें पहिला बिकट प्रश्न उभा राहिला तो 'ब्राह्मण' या वर्गांत कोणकोणत्या ज्ञातींचा समावेश करावा हा होय. कार्यकर्त्यांचें संख्याबल, द्रव्यबल, तसेंच त्या वेळीं प्रचलित असलेले निरनिराळे मतप्रवाह यांचा विचार करून कमींत कमी आक्षेपार्ह अशी मर्यादित व्याख्या या बाबतींत करण्यांत आली. ती येणेंप्रमाणें:— " देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे व देवरुखे (ज्यांच्यामध्यें प्रसिद्धपणें व सर्वसामान्य रोटीव्यवहार होत आहे) या ब्राह्मणवर्गाची शिरगणती करावी. "

'सत्त्वपरीक्षा' नाटकाचा प्रयोग करविण्यांत आला व त्याचें उत्पन्न रु. ६०० उपरिनिर्दिष्ट संस्थांना सारखें वाटून देण्यांत आलें. प्रो. चोळकर यांचे अचाट शक्तीचे प्रयोग सर भालचंद्र यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत येऊन त्यांचा गौरव करण्यांत आला.

दक्षिणी ब्राह्मण ज्ञातीची शिरगणती

मुंबईंत ब्राह्मण समाज किती आहे, तो कोठें कोठें पसरला आहे, त्याची स्थिति फारच खालावली असल्याबद्दल जो प्रवाद कानीं येतो त्यांत किती तथ्य आहे, याबद्दल संपूर्ण माहिती जमा करण्याच्या हेतूनें येथील ब्राह्मण ज्ञातीची शिरगणती करावी असें ब्रा. हितवर्धिनी सभेनें ठरविलें व त्यासाठीं पुढील समिति नेमण्यांत आली:—

डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर (अध्यक्ष), श्री. पां. वा. काणे, डॉ. ल. ग. दाते, डॉ. ल. नी. पुरोहित, श्री. सी. दि. जोगळेकर, प्रा. वा. ना. गोडबोले, श्री. गो. ह. मोडक, प्रा. ह. दा. वेलणकर, श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. न. म. जोशी, श्री. अ. नी. पिटकर, श्री. वि. भि. निवर्गी, श्री. वि. का. शौचे, श्री. शं. रा. जोशी, श्री. रा. वि. वेलणकर, श्री. मो. बा. मुळेकर, श्री. ग. शि. रानडे (चिटणीस).

सदर समितीच्या पुढें पहिला बिकट प्रश्न उभा राहिला तो 'ब्राह्मण' या वर्गांत कोणकोणत्या ज्ञातींचा समावेश करावा हा होय. कार्यकर्त्यांचें संख्याबल, द्रव्यबल, तसेंच त्या वेळीं प्रचलित असलेले निरनिराळे मतप्रवाह यांचा विचार करून कमींत कमी आक्षेपार्ह अशी मर्यादित व्याख्या या बाबतींत करण्यांत आली. ती येणेंप्रमाणें:— " देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे व देवरुखे (ज्यांच्यामध्यें प्रसिद्धपणें व सर्वसामान्य रोटीव्यवहार होत आहे) या ब्राह्मणवर्गाची शिरगणती करावी. "

सर भालचंद्र, डॉ. नानासाहेब देशमुख इ. माननीयांच्या स्वाक्षरीनें विनंतीपत्रक काढण्यांत आलें. दि. ४-११-१९१७ च्या केसरींत यासंबंधीं एक स्फुट आलें व त्यानंतर देशस्थ शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखीय ब्राह्मण वर्गाचा वरील चौकडींत समावेश करावा किंवा काय या संबंधांत बराच वादविवाद झाला.

एक नवा वाद

शिरगणतीच्या प्रसिद्धिपत्रकांत 'देशस्थ' हा शब्द लिहिण्यांत आला आहे. देशस्थांत दोन पोटजाती मोडतात. एक ऋग्वेदी व दुसरी यजुर्वेदी. 'या यजुर्वेदी ज्ञातींत शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिनांचा समावेश होत असल्याकारणानें त्यांना या शिरगणतींत स्थान न देणें म्हणजे मुंबईंतील स्थायिक वृत्त्यंशी अशा या समाजावर अन्याय केल्यासारखें होईल. तेव्हां खऱ्या समाजहितचिंतकांनीं आपलीं मनें शुद्ध ठेवून उदार अंतःकरणानें समाजांतील दुही मोडण्याचा प्रयत्न करावा. ब्राह्मणांशीं प्रसंग आल्यास इतर सर्व ज्ञाती एक होतात असा प्रत्यक्ष अनुभव येत असूनसुद्धां आपसांतील भेदभाव मोडण्याचा किंवा कमी करण्याचा प्रयत्न ब्राह्मण वर्ग न करील तर त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल ठरणार नाहीं. रोटीव्यवहारासंबंधानें पाहूं गेलें असतां असें सिद्ध करतां येण्यासारखें आहे कीं, काशी, त्र्यंबक वगैरे क्षेत्रांहून अनेक यजुर्वेदी ब्राह्मण चातुर्मास्यांत मुंबईंतील स्थायिक माध्यंदिन शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांच्या घरीं भिक्षुकीसाठीं येऊन राहात असतात व त्यांच्यांत रोटीव्यवहारहि राजरोस होत असतो. इतकेंच नव्हे तर अशा प्रकारचे बेटीव्यवहारहि झालेले आहेत, अशी एक विचारसरणी या वेळीं अनेकांकडून मोठ्या हिरीरीनें मांडण्यांत आली; तर शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन (पळशीकर) ब्राह्मण हे यजुर्वेदी ब्राह्मणवर्गांत मोडत नाहींत किंवा मान्य असलेल्या कोणत्याहि ब्राह्मणाचे आपण वंशज आहोंत

असें त्यांना सिद्ध करतां येत नाहीं असें विरुद्ध बाजूकडून प्रतिपादण्यांत येऊं लागलें, इतकेंच नव्हे तर या विरुद्ध बाजूकडून आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ न्यायालयांतील कांहीं निवाडेहि दाखविण्यांत आले.

या वादांत सुवर्णमध्य निघून सामोपचारानें हें प्रकरण मिटण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां ज्यास्तींत ज्यास्त 'बहुमतानें वागण्याचें ठरवून शिरगणती समितीचे चिटणीस श्री. रानडे यांनीं 'संदेश' पत्राच्या दि. ३०-११-१७ च्या अंकांत पुढील अर्थाचा खुलासा प्रसिद्ध केला:— "आरंभिलेलें शिरगणतीचें कार्य जितकें व्यापक असावयास पाहिजे तितकें नाहीं. ब्रा. हितवर्धिनी सभा ब्राह्मणांत क्रांति करूं इच्छीत नाहीं. या चौकडीच्या बाहेरच्या ब्राह्मणांस ती मानीत नाहीं असें नाहीं. ब्राह्मण कोणास म्हणावें हा प्रश्न फार व्यापक आहे. सर्व ब्राह्मण समाजाच्या संमतीनें तो प्रश्न सोडवावा व जो काय निर्णय ठरेल तो स्वीकारण्यास ब्रा. हितवर्धिनी सभा मोठ्या आनंदानें तयार होईल."

शिरगणतीची पूर्वतयारी

या शिरगणतीच्या कार्यासाठीं मुंबईचे बावीस विभाग पाडण्यांत येऊन त्यासाठीं बावीस व्यवस्थापक, एकवीस निरीक्षक व १४० स्वयंसेवक यांची योजना करण्यांत आली. शिरगणतीच्या कामाबरोबरच डॉ. वेलणकर व डॉ. दाते यांच्या सूचनेवरून आरोग्यविषयक माहिती जमा करण्यासाठीं ब्राह्मण समाजाला स्वतंत्र तक्ते पुरविण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली.

शिरगणतीचा अहवाल

शिरगणतीचें व आरोग्यविषयक प्रश्नांचीं उत्तरें मिळविण्याचें काम दोन महिने चाललें. या उपक्रमाशीं $\frac{3}{4}$ ब्राह्मण समाजानें सहकार केला असें म्हणावयास हरकत नाहीं. हें काम संपल्यावर मिळालेल्या माहितीची वर्गवारी वगैरे करून एकंदर ब्राह्मण समाजाच्या परिस्थितीचें यथार्थ

23607 हिंदी
93/545

ज्ञान व्हावें म्हणून एक अहवाल तयार करण्याचें ठरविण्यांत येऊन ही कामगिरी अजमीरचे प्रा. वामन नारायण गोडबोले यांच्यावर सोंपविण्यांत आली. त्यांच्या सूचनेप्रमाणें श्री. न. म. जोशी, श्री. निवर्गी, श्री. गुळवणे, श्री. हरिभाऊ साठे इ. १८ स्वयंसेवकांनीं सर्व माहिती पद्धतशीर रीतीनें जुळवून अनेक तक्ते तयार केले. प्रा. गोडबोले यांनीं अत्यंत मेहेनतीनें अहवाल तयार केला पण तो फारच विस्तृत झाल्यामुळें श्री. अण्णासाहेब काणे व श्री. म. वि. नामजोशी यांनीं त्यावरून ७७ पानांचा अहवाल तयार करून तो प्रसिद्ध केला.

१९१८ सालच्या शिरगणतीच्या परिशिष्टांतील त्रोटक माहिती पुढीलप्रमाणें आहे.

लोकसंख्या

एकंदर कुटुंबें ३४०२ व लोकसंख्या १४४९९. पैकीं पुरुष ८४३६ व स्त्रिया ६०६३. सांपत्तिक परिस्थिति बरी नसल्यामुळें बऱ्याच पुरुषांना बिऱ्हाड करून स्वतंत्रपणें राहतां येत नाहीं. शिवाय विद्यार्जनासाठीं बाहेरगांवचे अनेक मुलगे व तरुण मुंबईस येऊन एकटेच राहातात. या ३४०२ कुटुंबांत कोंकणस्थ १८७२, देशस्थ ७९१, कऱ्हाडे ५३३ व देवरुखे २०६ अशी वर्गवारी पडते.

८४३६ पुरुषांपैकीं ३२२३ विवाहित, ४०१३ अविवाहित व ५०० विधुर आहेत तर ६०६३ स्त्रियांपैकीं ३२७२ विवाहित, १८४४ अविवाहित व ९४७ विधवा आहेत. ६० वर्षांच्या वरील वयाचे पुरुष १४८ व स्त्रिया १५१ आहेत.

शिक्षण

१४४९९ लोकसंख्येंत ९७५३ शिक्षित असून त्यांत २३५ पदवीधर आहेत. म्हणजे शेंकडा १·६२ इतके पदवीधर आहेत. स्त्रियांत एकहि पदवीधर नाहीं.

व्यवसाय

या एकंदर लोकसंख्येंत ४८९९ मिळवतीं माणसें असून त्यांपैकीं ४०६२ कारकुनी पेशा करणारीं व बाकीचीं म्हणजे ८३७ स्वतंत्र व्यवसाय करणारीं आहेत.

सांपत्तिक परिस्थिति

उपरोक्त मिळवत्या माणसांपैकीं दरमहा साठ रुपयांच्या आंत प्राप्ति असणारांची संख्या ४०४२, रु. ६१ ते २०० पर्यंत प्राप्ति असणारांची संख्या ७७६, रु. २०१ ते ४०० मिळविणारे ५२ व रु. ४०० चे वर प्राप्ति असलेले २९ असा एकंदर आढावा निघतो.

रहाणीचें मान

१८२१ कुटुंबें दहा रुपयांपेक्षां कमी भाड्याच्या जागेंत राहतात. ११९८ कुटुंबें रु. १० ते २० भाड्याच्या जागेंत राहतात. रु. ५१ ते १०० भाडें भरूं शकणारीं कुटुंबें २९ असून शंभराचे वर भाडें भरणारीं कुटुंबें फक्त १३ आहेत. ६६ कुटुंबें सरकारी जागेंत अगर सार्वजनिक संस्थांनीं दिलेल्या घरांत राहतात.

आरोग्यविषयक अहवाल

मधुमेहानें आजारी ५६, स्प्रू अथवा संग्रहणी व पंडुरोग ४५, ॲनीमिया ३४, प्रसूतिज्वर १०६, कफक्षय पुरुष १०६, कफक्षय व बाळंतरोग स्त्रिया २०३.

वरील रोगांचीं कारणें देऊन त्यांसंबंधीं अनेक सूचना अहवालांत देण्यांत आलेल्या आहेत. त्या अहवालाच्या उपसंहाराचा गोषवारा असा :—

"पूर्वी जीं कामें एक व्यक्ति करूं शकत असे तीं करून घेण्यास आतां समुदायाची जरुरी भासूं लागलेली आहे. हल्लींचे दिवस

संघटित प्रयत्नांचे असल्यामुळें ब्राह्मणांनीं इतरांशीं सहानुभूतीची वृत्ति ठेवली पाहिजे. मुंबईंतील ब्राह्मणवर्गाच्या सांपत्तिक, सामाजिक व बौद्धिक परिस्थितीचें जें चित्र प्रत्यक्ष आंकड्यांवरून दिसतें तें मुळींच स्पृहणीय नाहीं. आपल्या ब्राह्मण समाजाची ही अवनत स्थिति सुधारावयाची असेल तर खालीं दिलेल्या बाबतींत संघटित व हेतुपुरस्सर असे जोराचे प्रयत्न झाले पाहिजेत.

(१) समाजांतील गरीब लोकांसाठीं धर्मादाय म्हणून किंवा सहकारी पतपेढ्यांचे तत्त्वावर स्वच्छ, हवाशीर व सोईस्कर अशीं थोड्या भाड्यांत मिळणारीं घरें व चाळी बांधल्या पाहिजेत.

(२) निरनिराळ्या धंद्यांचें ज्ञान समाजांतील तरुण स्त्रीपुरुषांस देऊन त्यांची सांपत्तिक परिस्थिति सुधारली पाहिजे. मिळवत्या पुरुषांपैकीं शेंकडा ८३ केवळ कारकुनीचा पेशा करणारे असणें हें समाजाच्या स्वातंत्र्यप्रीतीस, बुद्धिमत्तेस व कर्तृत्वशक्तीस खात्रीनें भूषणावह नाहीं. म्हणून स्वतंत्र धंदा करणारांनीं अधिकाधिक लोक आपल्या धंद्यांत तयार करावे.

(३) आरोग्यविज्ञान, मुलांची जोपासना, क्षय, मलेरिया, टायफॉइड, देवी, गोंवर वगैरे संबंधींचें ज्ञान समाजाला मिळावें म्हणून मॅजिक लँटर्न, व्याख्यानें इ. साधनांनीं प्रयत्न करण्यांत यावेत. तसेंच, प्रसूतिसमयीं स्त्रियांची जी हेळसांड होते ती न व्हावी म्हणून प्रसूतिगृहांची सोय करण्यांत आली पाहिजे.

(४) धार्मिक दृष्ट्याहि समाजाची स्थिति खालावलेली आहे. त्यासाठीं संस्कृत भाषेचें व धर्मपुस्तकांचें अध्ययन करण्याची लोकांनां संधि मिळेल अशी व्यवस्था करणें, वेदशास्त्र पठन करतां येईल अशा शाळा काढणें किंवा असलेल्या शाळांतून अधिक सोयी करणें याहि अत्यंत आवश्यक अशाच बाबी आहेत.

ब्राह्मण हितवर्धिनी सभेच्या कार्यकर्त्यांचें स्नेह-संमेलन

ब्राह्मण सभेचें प्रारंभींचें कार्यकारी मंडळ

सदर अहवालांत ब्राह्मणांच्या चार पोटजातींची जी स्थिति वर्णिली आहे ती कोणाला हेवा वाटावा अशी मुळींच नाहीं. सांपत्तिक दृष्ट्या तर ब्राह्मण संमाजाची स्थिति कींव येण्यासारखीच आहे. विद्येच्या बाबतींतहि ब्राह्मण समाजानें प्राथमिक शिक्षणाच्या पलीकडे फारशी उडी घेतलेली दिसत नाहीं. इतर समाजांच्या मानानें ब्राह्मण समाजांत विद्याभिरुचि थोडीफार अधिक असली तरी सांपत्तिक परिस्थितीमुळें उच्च शिक्षणाचा लाभ त्यास फारसा घेतां येत नाहीं.

ही सर्व विपन्नावस्था दूर होऊन ब्राह्मण समाज स्वतःच्या, एकंदर समाजाच्या व राष्ट्राच्या अभ्युदयाला अंशतः तरी कारणीभूत होईल तो सुदिन होय."

विलीनीकरण

ब्रा. हितवर्धिनी सभेचें सर्व आयुष्य म्हणजे फक्त सव्वा दोन वर्षांचा काळ होय. पण एवढ्या अल्प अवधींतहि तिला ब्राह्मण समाजांत एक प्रकारचें नवचैतन्य निर्माण करतां आलें. १८८८ सालीं स्थापन झालेल्या ब्राह्मण सभेला सायंकाळच्या क्रीडामंडळाचें स्वरूप येऊं पहात होतें आणि ती सभा आतां बंद करावी अशा कित्येकांकडून सूचनाहि येऊं लागल्या होत्या. या सर्व सूचनांचा विचार करून ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें एकीकरणाची एक योजना तयार केली आणि त्या योजनेस सर्वांचा पाठिंबा मिळाला. त्या योजनेचें पर्यवसान म्हणजे १९१८ सालीं ब्राह्मण हितवर्धिनी सभा ब्राह्मणसभेंत विलीन झाली.

(८) एकीकरण योजना

ब्राह्मण समाजाच्या हिताचीं निरनिराळीं कामें करणाऱ्या चार संस्था त्या वेळीं अस्तित्वांत होत्या. ब्राह्मण सभेची स्थापना होऊन जवळ जवळ तीस वर्षें लोटलीं असलीं तरी तिची सांपत्तिक परिस्थिति स्पृहणीय नव्हती; व त्यामुळें ही संस्था बंद करावी कीं काय अशा प्रकारचे निराशेचे विचार तिच्या चालकांच्या डोक्यांत येऊं लागले होते. ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ ही संस्था १९०८ मध्यें स्थापन झाली असून त्या संस्थेला बरेच तरुण स्वयंसेवक लाभले असल्यामुळें तिचें काम चांगल्या रीतीनें चाललेलें होतें. श्रीशंकरवाडी फंड ही संस्था १९१३ मध्यें स्थापन झाली होती व थोडाफार निधि जमविल्यानंतर त्या संस्थेचें काम स्थगित झालें होतें. ब्राह्मण हितवर्धिनी सभा १९१५ मध्यें स्थापन झाली होती व ब्राह्मण समाजांत जागृति निर्माण करण्याचें कार्य त्या संस्थेमार्फत बऱ्या प्रकारें चाललें होतें. या चारहि संस्थांच्या कार्यकारी मंडळांत बऱ्याच अंशीं तीच तीच मंडळी असत. त्यामुळें त्यांच्या मनांत या चारहि संस्थांचें एकीकरण झाल्यास कार्याच्या दृष्टीनें तर सुलभ होईलच पण सर्वच कामें अधिक जोमानें सुरू करतां येतील अशा प्रकारचे विचार घोळूं लागले. पण या विचारांना प्रत्यक्ष अशी जोराची चालना देण्याचें श्रेय ब्राह्मण हित-वर्धिनी सभेच्या कार्यकारी मंडळाकडेच बऱ्याच अंशीं आहे. त्या

(८) एकीकरण योजना

ब्राह्मण समाजाच्या हिताचीं निरनिराळीं कामें करणाऱ्या चार संस्था त्या वेळीं अस्तित्वांत होत्या. ब्राह्मण सभेची स्थापना होऊन जवळ जवळ तीस वर्षें लोटलीं असलीं तरी तिची सांपत्तिक परिस्थिति स्पृहणीय नव्हती; व त्यामुळें ही संस्था बंद करावी कीं काय अशा प्रकारचे निराशेचे विचार तिच्या चालकांच्या डोक्यांत येऊं लागले होते. ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ ही संस्था १९०८ मध्यें स्थापन झाली असून त्या संस्थेला बरेच तरुण स्वयंसेवक लाभले असल्यामुळें तिचें काम चांगल्या रीतीनें चाललेलें होतें. श्रीशंकरवाडी फंड ही संस्था १९१३ मध्यें स्थापन झाली होती व थोडाफार निधि जमविल्यानंतर त्या संस्थेचें काम स्थगित झालें होतें. ब्राह्मण हितवर्धिनी सभा १९१५ मध्यें स्थापन झाली होती व ब्राह्मण समाजांत जागृति निर्माण करण्याचें कार्य त्या संस्थेमार्फत बऱ्या प्रकारें चाललें होतें. या चारहि संस्थांच्या कार्यकारी मंडळांत बऱ्याच अंशीं तीच तीच मंडळी असत. त्यामुळें त्यांच्या मनांत या चारहि संस्थांचें एकीकरण झाल्यास कार्याच्या दृष्टीनें तर सुलभ होईलच पण सर्वच कामें अधिक जोमानें सुरू करतां येतील अशा प्रकारचे विचार घोळूं लागले. पण या विचारांना प्रत्यक्ष अशी जोराची चालना देण्याचें श्रेय ब्राह्मण हितवर्धिनी सभेच्या कार्यकारी मंडळाकडेच बऱ्याच अंशीं आहे. त्या

संस्थेच्या कार्यकारी मंडळांतील प्रमुख गृहस्थांनीं बाकीच्या तीन संस्थांच्या कार्यकारी मंडळांशीं विचारविनिमय केला व त्याचप्रमाणें एकीकरणाची ही कल्पना ब्राह्मणज्ञातींतील प्रमुख गृहस्थांपुढेंहि मांडली. आपली ही कल्पना दिवसेंदिवस अधिकाधिक लोकांना पटत व रुचत चालली असल्याचाहि त्यांना अनुभव येऊं लागला.

शंका व त्यांचें निरसन

ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाकडून मात्र या एकीकरणाच्या योजनेस फारसा पाठिंबा मिळत नव्हता. कारण या योजनेनें विद्यार्थी सहाय्यक मंडळाच्या कार्याची प्रगति कुंठित होईल अशी भीति त्या संस्थेला वाटत होती. त्याचप्रमाणें ज्या नवीन योजना त्या संस्थेनें अंमलांत आणावयाचें ठरविलें होतें त्यांना मूर्तस्वरूप येण्याऐवजीं त्या योजना कायमच्या दृष्टिआडच केल्या जातील अशीहि त्या संस्थेच्या चालकांना भीति वाटत होती. यामुळें या संस्थेची एकीकरणाला संमति मिळविणें कठीण जात होतें. पण एकीकरणाच्या योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं ब्राह्मण समाजांतील नेत्यांची अनुमति मिळविण्याचें आपलें काम जोरानें चालू ठेवलें आणि त्यांत त्यांना उत्तम प्रकारचें यश मिळून विद्यार्थी सहाय्यक मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर यांनीं या एकीकरणाच्या योजनेस आपली मान्यता दिली. अर्थात् त्यामुळें विद्यार्थी सहाय्यक मंडळाच्या विरोधाचा पायाच ढांसळल्यासारखा झाला. एकीकरणाचे पुरस्कर्ते या विरोधकांची तात्त्विक भूमिका जाणत होते. विद्यार्थी सहाय्यक मंडळानें चालविलेल्या कार्याची हानि होऊं नये म्हणून शक्य ती काळजी घेण्याचा त्यांचा निश्चय झालेला होता. वि. स. मंडळानें शेवटच्या वर्षी म्हणजे १९१७ सालीं जी मदत विद्यार्थ्यांना दिली किंवा त्या सालीं त्या मंडळानें जो निधि जमविला व त्याला अनुसरून

१९१८ सालाकरितां जितकी रक्कम विद्यार्थ्यांना देण्याचें ठरविलें तितकी तरी किमान रक्कम संयुक्त ब्राह्मण सभेनें दिली पाहिजे अशी अट एकीकरणाच्या योजनेंत सामील करण्यांत आली. शिवाय, केवळ विद्यार्थी सहाय्यक शाखेला म्हणून जी मदत लोकांकडून मिळेल ती सर्व त्याच शाखेच्या कार्याप्रीत्यर्थ खर्च व्हावी असेंहि ठरविण्यांत आलें.

चारहि संस्थांच्या विचारविनिमयानंतर एकीकरणाची योजना तयार करण्यांत आली आणि तिला चारहि संस्थांच्या कार्यकारी मंडळांची संमति मिळाल्यानंतर ब्राह्मण ज्ञातींतील त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या सर्व संस्थांस उद्देशून एक विनंतीपत्रक काढण्यांत आलें. त्या विनंतीपत्रकांत, पूर्वकालीं ब्राह्मणांचें कोणतें स्थान होतें व सध्यां त्यांचें स्थान काय आहे व ही परिस्थिति सुधारण्यासाठीं काय केलें पाहिजे, तसेंच एकमुखी कार्य करणें कसें आवश्यक आहे याचें विवेचन करण्यांत आलें होतें.

संयुक्त ब्राह्मणसभा

या चारहि संस्थांच्या विद्यमानें दि. १४ जानेवारी १९१८ ला सर्व ब्राह्मणज्ञातीची एक प्रचंड सभा हिराबागेंत बोलावण्यांत आली.अध्यक्षस्थानीं डॉ. नानासाहेब देशमुख यांची योजना करण्यांत आली. एकीकरणाच्या योजनेवर या सभेंत विचारविनिमय झाला. निरनिराळ्या वक्त्यांच्या भाषणांनंतर अध्यक्षांनीं पुढील अर्थाचा प्रस्ताव सभेपुढें मांडला :—

" ब्राह्मणज्ञातीच्या हिताच्या दृष्टीनें मुंबई शहरांत ब्राह्मण सभा, ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, श्रीशंकरवाडी फंड व ब्राह्मण हितवर्धिनी सभा अशा चार संस्था कार्य करीत आहेत. या चारहि संस्थांचें कार्य यापुढें 'ब्राह्मण सभा' या नांवानें चालणाऱ्या संस्थेच्या विद्यमानें चालावें म्हणजे या चारहि संस्थांना यापुढें 'ब्राह्मण सभा' या

नांवानें संबोधावें. या चार संस्थांचें कार्य करण्याकरितां विद्यार्थी सहाय्यक शाखा, शंकरवाडी समिति, समारंभ समिति व करमणूक शाखा अशा चार शाखा असाव्यात."

हा प्रस्ताव सर्वानुमतें संमत झाल्यानंतर या एकीकरणानुरूप कार्यारंभ करण्याकरितां पुढील कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें :-

सल्लागार मंडळ

सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर
डॉ. विनायक नारायण भाजेकर
श्री. वासुदेव बळवंत सोमण

साधारण सभा

डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख (अध्यक्ष)
रा. महादेव वामन भट वकील
,, कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे
,, भास्कर अनंत बोरवणकर
,, विश्वनाथ विनायक पाठक
} (उपाध्यक्ष)

व्यवस्थापक सभा

श्री. पांडुरंग वामन काणे (अध्यक्ष)
डॉ. लक्ष्मण नीलकंठ पुरोहित (उपाध्यक्ष)
डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर (अध्यक्ष, स्व. से. संघ)
श्री. यशवंत विष्णु नेने
,, हरि केशव गोखले
} (खजीनदार)
,, सीताराम दिनकर जोगळेकर
,, नरहर महादेव जोशी
,, अनंत नीलकंठ पिटकर
,, अनंत गणेश साठये
,, अंबादास गोपाळ पुणतांबेकर
} (चिटणीस)

सभासद

रा. सदाशिव गणेश परांजपे, रा. त्र्यंबक गणेश पानवलकर, रा. गोविंद हरि मोडक, रा. विठ्ठल काशीनाथ शौचे, रा. विष्णु गदाधर गानू, रा. विनायक भिकाजी निवर्गी, रा. मारुति लक्ष्मण मराठे, रा. रामचंद्र विश्वनाथ वेलणकर, रा. कृष्णाजी आत्माराम पातकर, रा. गणेश शिवराम रानडे.

विद्यार्थी सहाय्यक मंडळ व श्री शंकरवाडी फंड या दोन्ही संस्थांची शिल्लक यापुढें त्या नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या शाखेची गंगाजळी म्हणून समजावी तसेंच चारहि संस्थांचे आश्रयदाते किंवा आजीव सभासद हे ब्राह्मण सभेचे आश्रयदाते व आजीव सभासद समजावे असें ठरलें. ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ ज्या अटींवर ब्राह्मण सभेंत विलीन झालें त्या अटींना संमति देण्यांत आली (या अटी वि. स. मं. च्या यापूर्वी लिहिलेल्या इतिहासांत नमूद केल्या आहेत.) त्याचप्रमाणें एकीकरणाच्या योजनेचा एक वर्ष अनुभव घेऊन मग ही योजना कायम समजावी असेंहि ठरविण्यांत आलें.

एकीकरणाचे हेतू योग्य रीतीनें सिद्धीस जावे म्हणून सभेचा उद्देश व तिचे नियम खालील समितीनें तयार करून ते कार्यकारी मंडळास सादर करावे व कार्यकारी मंडळानें साधारण सभा बोलावून ते संमत करून घ्यावे असें ठरलें:—

श्री. पां. वा. काणे (अध्यक्ष), श्री. अ. ग. साठये व रा. सी. दि. जोगळेकर (चिटणीस), डॉ. रा. ह. भडकमकर, श्री. वि. ग. गानू, श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. गो. ह. मोडक, श्री. वा. रा. गुळवणे व श्री. ग. शि. रानडे.

याप्रमाणें कामें झाल्यावर अध्यक्षांनीं, मागील अनुभवावरून योग्य तो बोध घेऊन कार्यकर्त्यांनीं जोरानें कामास लागावें व सभेचें कार्य यशस्वी करावें अशा अर्थाचा समारोप केला व सभेचें काम संपलें.

२

(१) संयुक्त ब्राह्मण सभा

उद्देश व नियमावली

शेंकडों नि हजारों लोकांचें भविष्यकाळांतील विश्रांतिस्थान अशा सोज्वळ हेतूनें वृक्षारोपणसमारंभ करावा आणि त्या रोंपट्याचा वृक्ष बनण्याऐवजीं तें रोंपटें सुकून जात चालल्याचें केंविलवाणें दृश्य पहाण्याचा प्रसंग यावा अशीच कांहींशी स्थिति ब्राह्मण सभेची झाली होती. पण तशाहि परिस्थितींत निराश न होतां सुजाण लोक त्या रोंपट्या-भोंवतालची माती वगैरे खणून, त्यांत खतपाणी घालून, ज्याप्रमाणें त्याला नवा जोम आणून देतात त्याचप्रमाणें ब्राह्मण सभेच्या रोडावत चाललेल्या स्वरूपानें निराश न होतां अगर भांबावून न जातां ब्राह्मण समाजांतील सुजाण लोकांनीं ब्राह्मण ज्ञातीच्या हितार्थ झटणाऱ्या चारी संस्थांचें एकीकरण करून ब्राह्मण सभेला नवीन तेज प्राप्त करून दिलें.

ब्राह्मण वर्गाला हांक

एकीकरण झाल्याबरोबर सभेच्या चिटणीसांनीं 'उद्धरेदात्मनात्मानम्' या शीर्षकाखालीं एक विनंतीपत्रक प्रसिद्ध केलें. त्यांतील विचारसरणी आजहि मार्गदर्शक होण्यासारखी आहे. त्या पत्रकाचा सारांश असाः—

"एके वेळीं ब्राह्मण ज्ञाति ही व्यवहारचक्राच्या मध्यभागीं होती. आपली नजर समाजाच्या परिघांतील एकंदर घटकावयवांकडे

एकसमयावच्छेदेंकरून पोहोंचवून समाजचक्राला सुलभ व योग्य रीतीनें गति देण्याचें सामर्थ्य तिच्यांत होतें. पण आतां देशकालवर्तमानानुसार आपणांस जी स्थिति प्राप्त झाली आहे तिचा नीट विचार करून या स्थितींतून वर निघण्याचा मार्ग आपला आपणच शोधून काढणें भाग आहे. दैवगतीनें एकंदर समाजाचीच घडी कांहींशी विस्कळित झालेली आहे. जीवनकलह दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत चाललेला आहे. व्यावहारिक बाबतींत निरनिराळ्या पेशांची कांस धरणें भाग पडत आहे. राष्ट्रीय उत्कर्षाचें निशाण हातीं घेऊन पुढें पुढें धांव घेणाऱ्या जनतेचे आपण एक महत्त्वाचे घटक आहोंत हें सर्वांच्या प्रत्ययाला आणून देण्याची सुसंधि ब्राह्मण ज्ञातीला लाभलेली आहे. सर्वच मनु पालटला असल्यामुळें या नव्या काळांत ब्राह्मण सभेनेंहि आपल्या नौकेचें सुकाणूं फिरवून प्रगतिसूर्यानें दाखविलेल्या पूर्वेकडे जाण्याचा निश्चय केलेला आहे. स्वतःच्या जरुरीच्या खर्चांत सुद्धां काटकसर करून संस्थेस साहाय्य करणें हें आजच्या ब्राह्मणाचें कर्तव्य आहे. ब्राह्मणांनीं असें साहाय्य केल्यास सहस्रावधि अनाथांचें जीवित 'ब्राह्मण' या नांवाला साजेसें करण्याचें श्रेय त्यांना लाभणार आहे."

या विनंतीपत्रकाचा ब्राह्मण समाजावर फार चांगला परिणाम झाला आणि स्वयंसेवक प्रचारार्थ फिरूं लागल्यावर सभासदांची संख्या वाढूं लागली. व्यवस्थापक सभेच्या सभा वारंवार होऊं लागून एकंदर कार्यास जोराची चालना मिळूं लागली. एकीकरणाचें महत्त्व सर्वांसच पटल्यामुळें एकीकरण झालेल्या संस्थांचे कागदपत्र, हिशेब वगैरे एकत्र करणें व त्या त्या संस्थांच्या कार्यकर्त्यांना ब्रा. सभेकडे आपुलकीच्या भावनेनें पहावयास लावणें या गोष्टी बऱ्याच सुकर झाल्या.

ब्राह्मण सभेचे उद्देश

दि. १४ जानेवारी १९१८ ला चारी संस्थांच्या विद्यमानें झालेल्या प्रकट सभेंत नेमण्यांत आलेल्या नियमसमितीच्या सभा डॉ. भडकमकर

यांच्या लॅमिंग्टन रोडवरील दवाखान्याच्या जागेंत भरत असत. या सभांतून चारहि संस्थांच्या उद्देशांचा विचार झाला. त्या सर्वांचा समावेश होईल अशा प्रकारची शब्दरचना ब्रा. सभेच्या उद्देशांची असावी असें ठरविण्यांत आलें. तसेंच या बाबतींत २५–३० वर्षें आलेला अनुभव, चालू परिस्थिति आणि नजीकचा भविष्यकाळ यांचाहि योग्य तो विचार करण्यांत यावा असें ठरलें. त्याप्रमाणें श्री. पांडुरंग वामन काणे यांनीं ब्राह्मण सभेच्या उद्देशांचा खर्डा तयार केला व तो समिती-पुढें ठेवतांना सांगितलें कीं, उद्देशांतील शब्दरचना अशी असावी कीं, पुढील निदान पन्नास वर्षें तरी त्यांत फरक करण्याची आवश्यकता भासूं नये. अर्थात्, हीच दृष्टि ठेवून ब्राह्मण सभेचा उद्देश ठरविला गेला. "ब्राह्मण लोकांचें आपसांत व ब्राह्मण लोकांचें इतर लोकांशीं प्रेम व ऐक्य वाढावें," अशी शब्दरचना उद्देशांत आढळते यांतील रहस्यहि हेंच आहे. ब्राह्मण सभा ही ब्राह्मणांकरितांच असली तरी तिचे कार्यक्रम असेच असावेत कीं, ज्या योगानें ब्राह्मण लोकांचें इतर लोकांशीं प्रेम व ऐक्य निर्माण व्हावें व वाढीस लागावें अशा अर्थाचा खुलासा करून श्री पां. वा. काणे यांनीं उद्देशाचा पुढील खर्डा वाचून दाखविला.

"ब्राह्मण लोकांत प्रेम व ऐक्य वाढावें, करमणूक व्हावी, ज्ञानप्राप्ति व ज्ञानप्रसार व्हावा, हरएक प्रसंगीं परस्परांस व इतरांस साहाय्य करतां येऊन ज्ञातीची उन्नति करतां यावी व ज्ञातींतील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांस विद्यार्जनाच्या कामीं मदत करतां यावी व ज्ञाती-संबंधीं सामाजिक व धार्मिक बाबतींत जीं जीं कामें (राजकीय बाबी-खेरीज करून) वेळोवेळीं निघतील तीं करतां यावीं या सर्व उद्देशांनीं ही संस्था स्थापन झालेली आहे."

हा उद्देश समितीनें संमत केला. सभेचे नियम समितीनें तयार केले. त्यांपैकीं ज्या कांहीं नियमांसंबंधानें मतभेद होऊन त्यांवर बरीच चर्चा झाली त्यांचा उल्लेख या ठिकाणीं करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

ब्राह्मण सभेचा सभासद कोणाला होतां येईल याबद्दल पहिला मतभेद झाला. १८८८ सालीं याबद्दल 'अठरा वर्षांहून अधिक वयाचे दक्षिणी ब्राह्मण मात्र या सभेचे सभासद होण्यास योग्य आहेत' असा नियम होता. तरीहि श्री. श्रीनिवास अय्यंगार, सेटलूर सारखे म्हैसूर-कडील ऋग्वेदी ब्राह्मण सभेचे नुसते सभासदच नव्हे तर व्यवस्थापक सभेचे अध्यक्ष व उपाध्यक्षहि झाले, यावरून 'दक्षिणी' या शब्दाचा आकुंचित अर्थ करण्यांत येत नव्हता हें सहज सिद्ध होतें.

ब्राह्मण सभेचे नियम

ब्राह्मण हितवर्धिनी सभेमार्फत नुकतीच शिरगणती झाली होती आणि शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन (पळशीकर) ब्राह्मणांना या शिरगणतींत समाविष्ट करावें कीं नाहीं याबाबत तीव्र मतभेद निर्माण झाले होते. ब्रा. सभेंतील पुष्कळशा विद्वान मंडळीस जरी या बाबतींत कांहीं हरकत दिसत नव्हती तरी या वादग्रस्त प्रश्नाला बगल देऊन शिरगणतीचा प्रश्न निकालांत काढावा लागला होता. ब्राह्मण ज्ञातींत पुनर्विवाहाची प्रथा वाढत चालली होती. अशा पुनर्विवाहित व्यक्तींवर प्रसिद्धपणें बहिष्कार घालणें ही गोष्ट सोपी राहिली नव्हती. ही परिस्थिति लक्षांत घेऊन व भावि काळांत रोटीव्यवहाराचीं कडक बंधनें रहाणें अशक्य आहे हें जाणून ब्रा. सभेचा सभासद कोणास होतां येईल याबद्दल अगदीं कांटेकोर नियम न करतां तो खालीलप्रमाणें करण्यांत आला:-

'सभेच्या नियमास अनुसरून लायक असलेल्या ब्राह्मण ज्ञातींतील देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे व देवरुखे व इतर कोणी कीं, ज्यांच्याशीं संप्रदायानुसार प्रसिद्धपणें रोटीव्यवहार होतो व ज्यांच्यावर प्रसिद्धपणें बहिष्कार टाकलेला नाहीं अशा पंचद्रविड ज्ञातींतील अठरा वर्षांहून अधिक वयाच्या कोणाहि इसमास या सभेचा सभासद होतां येईल.'

नुसत्या पंचद्रविड ज्ञातींत २५-२६ पोटजाती आहेत. त्यांपैकीं चार

पोटजातींचा उल्लेख नियमांत आहे. ज्या जातींतील व्यक्तीला त्या-वेळीं (१९१८) सभेचा सभासद होतां येत नव्हतें त्या जातीशीं प्रसिद्धपणें रोटीव्यवहार होऊं लागला कीं, त्या जातींतील व्यक्तीला ब्रा. सभेचा सभासद होण्याची संधि मिळणार होती. अशा रीतीनें निदान दहा तरी पोटजातींचा समावेश आतांपर्यंत ब्राह्मण सभेंत झाला असल्याचें दिसून येतें.

व्यवस्थापक मंडळाची रचना

व्यवस्थापक मंडळाच्या रचनेसंबंधानेंहि बराच वादविवाद झाला. आश्रयदाते, तहाहयात सभासद व वर्गणीदार असे सभासदांचे तीन वर्ग करण्यांत आले. व्यवस्थापक सभेच्या सभासदांची संख्या या तीन वर्गांत सारखी वाटावी व अशा वाटपानंतर त्या त्या वर्गांतील सभासदांनीं आपापलीं माणसें निवडून द्यावीं अशी एक सूचना पुढें आली होती. पण ती संमत झाली नाहीं. यानंतर व्यवस्थापक सभेच्या सभासदांची संख्या तीन वर्गांत सम प्रमाणांत असावी पण त्यांची निवड मात्र सर्व सभासदांनीं मिळून करावी अशी दुसरी एक सूचना पुढें आली पण तीहि नापास झाली. शेवटीं व्यवस्थापक सभेकरितां कोणाहि सभासदाला उमेदवार म्हणून उभें राहतां येईल व सर्व सभासदांना निवडणुकीचा सारखाच अधिकार राहील असा नियम संमत झाला.

यानंतरचा वादग्रस्त प्रश्न म्हणजे स्वयंसेवकांना सभासद समजावें कीं नाहीं हा होय. तसेंच, स्वयंसेवक-सभासद असा एक निराळा वर्ग असावा कीं काय, स्वयंसेवकांना व्य. मंडळावर प्रतिनिधित्व मिळावें किंवा नाहीं याबद्दलहि तीव्र मतभेद झाले.

एका पक्षाचें म्हणणें असें कीं, आश्रयदाते, तहाहयात सभासद वगैरेंना प्रमाणशीर प्रतिनिधित्व अमान्य करण्यांत आलें मग स्वयंसेवक

पोटजातींचा उल्लेख नियमांत आहे. ज्या जातींतील व्यक्तीला त्या-वेळीं (१९१८) सभेचा सभासद होतां येत नव्हतें त्या जातीशीं प्रसिद्धपणें रोटीव्यवहार होऊं लागला कीं, त्या जातींतील व्यक्तीला ब्रा. सभेचा सभासद होण्याची संधि मिळणार होती. अशा रीतीनें निदान दहा तरी पोटजातींचा समावेश आतांपर्यंत ब्राह्मण सभेंत झाला असल्याचें दिसून येतें.

व्यवस्थापक मंडळाची रचना

व्यवस्थापक मंडळाच्या रचनेसंबंधानेंहि बराच वादविवाद झाला. आश्रयदाते, तहाहयात सभासद व वर्गणीदार असे सभासदांचे तीन वर्ग करण्यांत आले. व्यवस्थापक सभेच्या सभासदांची संख्या या तीन वर्गांत सारखी वाटावी व अशा वाटणीनंतर त्या त्या वर्गांतील सभासदांनीं आपापलीं माणसें निवडून द्यावीं अशी एक सूचना पुढें आली होती. पण ती संमत झाली नाहीं. यानंतर व्यवस्थापक सभेच्या सभासदांची संख्या तीन वर्गांत सम प्रमाणांत असावी पण त्यांची निवड मात्र सर्व सभासदांनीं मिळून करावी अशी दुसरी एक सूचना पुढें आली पण तीहि नापास झाली. शेवटीं व्यवस्थापक सभेकरितां कोणाहि सभासदाला उमेदवार म्हणून उभें राहतां येईल व सर्व सभासदांना निवडणुकीचा सारखाच अधिकार राहील असा नियम संमत झाला.

यानंतरचा वादग्रस्त प्रश्न म्हणजे स्वयंसेवकांना सभासद समजावें कीं नाहीं हा होय. तसेंच, स्वयंसेवक–सभासद असा एक निराळा वर्ग असावा कीं काय, स्वयंसेवकांना व्य. मंडळावर प्रतिनिधित्व मिळावें किंवा नाहीं याबद्दलहि तीव्र मतभेद झाले.

एका पक्षाचें म्हणणें असें कीं, आश्रयदाते, तहाहयात सभासद वगैरेंना प्रमाणशीर प्रतिनिधित्व अमान्य करण्यांत आलें मग स्वयंसेवक

वर्गणी वसूल करितात म्हणून त्या कामाबद्दल त्यांना प्रतिनिधित्व देणें म्हणजे वर्गणी प्रत्यक्ष देणारांच्या हक्कावर कांहीं प्रमाणांत धाड घालण्यासारखें आहे.

दुसऱ्या बाजूनें असें सांगण्यांत आलें कीं, स्वयंसेवकांचे अभावीं सभेला सभासद मिळणें कठीण किंवहुना अशक्य आहे. तसेंच, वर्गणीदार सभासदांची विचारसरणी कळण्यासहि स्वयंसेवक हें एक साधन आहे. व्य. मं. चें कार्य ज्या प्रमाणांत सभासदांच्या मतानुरूप चालेल त्या प्रमाणांत सभेला अधिकाधिक सभासद मिळत जातील. म्हणून व्यवस्थापक सभेंत स्वयंसेवक असणें अवश्य आहे. तसेंच, कोणता स्वयंसेवक अधिक कार्य करणारा आहे आणि कोणता स्वयंसेवक व्य. सभेंत उत्तम प्रकारचें कार्य करूं शकेल हें स्वयंसेवकांसच पुरतेपणीं माहीत असणें शक्य असल्यामुळें स्वयंसेवकांचे प्रतिनिधी स्वयंसेवकांनींच निवडून देणें योग्य आहे. विद्यार्थी सहाय्यक मंडळाला जें स्वरूप प्राप्त झालें होतें त्याचें श्रेय स्वयंसेवकांनाच असून स्वयंसेवकांचे प्रतिनिधी व्य. सभेवर घेण्याचें तत्त्व त्या संस्थेनें मान्य केलें होतें.

याप्रमाणें दोन्ही बाजूंचा विचार केल्यावर समितीनें ठरविलें कीं, व्य. सभेवर एकंदर वीस सभासद असाव्हेत. त्यांपैकीं चौदा सभासद सर्व सभासदांनीं साधारण सभेंत निवडून द्यावेत व उरलेले सहा सभासद स्वयंसेवक मंडळानें आपल्यांतून निवडून द्यावेत. हें प्रमाण दर पांच स्वयंसेवकांस एक असें होतें.

याप्रमाणें नियमावली तयार करण्यांत आली व ती कांहीं किरकोळ दुरुस्त्यांसह दि. १ एप्रिल व दि. १३ व २० जुलै १९१९ या दिवशीं झालेल्या तीन साधारण सभांतून संमत करण्यांत आली.

(२) व्यवस्थापक सभा
व
ब्राह्मणसभेचें सर्वसामान्य कार्य

१९१८ ते १९२९

दि. १४ जानेवारी १९१८ च्या प्रकट सभेंत नेमलेल्या व्यवस्थापक मंडळाची सभा दि. १९ जानेवारी १९१८ ला झाली. संयुक्त ब्राह्मण सभेच्या पुढील कार्याचा आढावा घेण्यांत आला आणि कामाच्या सोयीच्या दृष्टीनें व्यवस्थापक मंडळानें श्रीशंकरवाडी फंड, शिक्षणशाखा, समारंभ समिति व करमणूक शाखा अशा चार पोटसमित्या नेमल्या. एक तात्पुरती अशी शिरगणती समितीहि स्थापन करण्यांत आली. ब्राह्मण सभेचा सभासद होऊं इच्छिणाऱ्या गृहस्थानें करावयाच्या अर्जाचा नमुना तयार करण्यांत आला. वर्षांत कोणकोणते उत्सव व समारंभ साजरे करावयाचे हें ठरविण्यांत आलें.

विलीन झालेल्या संस्थांनीं आपापले कागदपत्र, हिशेबाचीं पुस्तकें व असलेली शिल्लक सभेच्या चिटणीसांच्या स्वाधीन करावी अशा अर्थाचीं पत्रें त्या त्या संस्थांना लिहावीं असें ठरलें. ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक

मंडळानें जरी विलीनीकरणाला आपली संमति दिली असली तरी त्यांतील श्री. चिंतामण जनार्दन खेर, श्री. वामन रामचंद्र गुळवणे इत्यादि मंडळींनीं याबाबत आपला असंतोष प्रकट करून, या एकीकरणामुळें गरीब होतकरू विद्यार्थ्यांस मिळावयाच्या मदतींत बरीच काटाकाट करावी लागेल अशा प्रकारचीं आपलीं मतें वर्तमानपत्रद्वारां समाजापुढें मांडलीं. त्यामुळें थोडीफार खळबळ झाली पण हें वादळ हळुहळू शांत झालें व ब्राह्मणसभेचें काम व्यवस्थितपणें सुरू झालें.

इन्फ्लुएन्झाची सांथ व ब्राह्मण सभेचें कार्य

ब्रा. सभेचें कार्य उत्साहानें सुरू होतें न होतें तोंच सर्व मुंबई शहर 'इन्फ्लुएन्झा' तापाच्या सांथींत सांपडलें. हा रोग तेव्हां अगदीं नवीनच होता. विद्वान व संशोधक डॉक्टरांच्याकडून या रोगाचें निदान होऊन त्यावरील त्यांची उपाययोजना निश्चित होईपर्यंत असंख्य लोक मृत्यूच्या भक्ष्यस्थानीं पडले. दर दिवशीं मृत्यूचें प्रमाण वाढतच होतें. त्यापूर्वी व त्यानंतर मुंबईनें एका दिवसांत एवढी मृत्युसंख्या पाहिलेली नाहीं. स्वयंसेवकांचीं पथकेंच्या पथकें संकटग्रस्तांस साहाय्य करण्याचें कार्य करूं लागलीं. संयुक्त ब्राह्मण सभाहि या वेळीं कर्तव्यबुद्धीनें पुढें सरसावली.

१९१८ च्या ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभीं व्यवस्थापक मंडळाची सभा झाली आणि डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर यांच्या नेतृत्वाखालीं एक रुग्णालय समिति नेमण्यांत आली. डॉ. नानासाहेब देशमुख, तसेंच डॉ. वेलणकर, डॉ. दाते, डॉ. दाबक, डॉ. भडकमकर, डॉ. डोंगरे, डॉ. पुरोहित, डॉ. मंडलीक, डॉ. म. गो. खेर, डॉ. ग. वि. खेर, डॉ. केतकर इत्यादि सुप्रसिद्ध डॉक्टर मंडळी परोपकार बुद्धीनें विनामूल्य काम करण्यास पुढें सरसावली. श्री. पुणताबेकर, श्री. शौचे, श्री. पातकर, श्री. नामजोशी, श्री. गुळवणे, श्री. साठे, श्री. गोगटे, श्री. मोडक इ.

चाळिसांहून अधिक मध्यमवर्गीय गृहस्थ स्वयंसेवकाचें काम करण्यास पुढें आले.

ब्रा. सभेचे चिटणीस श्री. सीताराम दिनकर जोगळेकर यांनीं सर्वांच्या माहितीसाठीं एक हस्तपत्रक काढलें व तें मुंबईच्या निरनिराळ्या भागांत वाटण्याची व्यवस्था केली. शहरांतील निरनिराळ्या भागांत व्यवसाय करणाऱ्या व विनामूल्य काम करण्यास तयार असलेल्या १०–१५ डॉक्टरांचीं नांवें प्रसिद्ध करण्यांत आलीं व जरूर तर डॉ. नानासाहेब देशमुख व डॉ. भडकमकर यांचेंहि साहाय्य मिळण्याची सोय करण्यांत आली. डॉ. भडकमकर यांनीं या रोगाची चिकित्सा करून त्यावर द्यावयाच्या औषधाचीं मिश्रणें तयार केलीं. स्वयंसेवकांनीं निरनिराळ्या भागांत फिरून आपद्ग्रस्तांची माहिती मिळवून ती सर्व नोंद श्री. शौचे यांच्या टाइपरायटिंगच्या कचेरींत करावयाचें ठरलें. गरजूंना मोफत दूध देण्यांत येऊं लागलें. अंत्यविधीसाठीं द्रव्यसाहाय्य त्याचप्रमाणें प्रेतयात्रेसाठीं स्वयंसेवक मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली. श्री. शौचे यांची टाइपरायटिंगची कचेरी चोवीस तास उघडी ठेवण्यांत येऊन त्या ठिकाणीं उपस्थित रहाण्यासाठीं स्वयंसेवकांच्या पाळ्या ठरविण्यांत आल्या.

पण थोड्याच दिवसांत रोग्यांना अत्यंत आवश्यक असलेलें दूध मिळविणें कठीण जाऊं लागलें. हें पाहून श्रीमंत दानशूर वामनराव आपटे यांनीं स्वतः होऊन रोज सुमारें दीड मण दूध पुरविण्याची व्यवस्था केली. त्याचप्रमाणें कोणीं अर्धा मण, कोणीं दहा शेर दूध देण्याचीं आश्वासनें दिलीं. मध्यमवर्गीयांना पहिल्यापहिल्यानें मोफत दूध घेणें प्रशस्त वाटेना पण स्वयंसेवकांनीं त्यांची समजूत घातली. परंतु पुढें पुढें असें दूध पोहोंचतें करणेंहि कठीण झालें. स्वयंसेवकांनीं पहांटे दुधाचे हंडे घेऊन लोकांना दूध घालावयाचें, नंतर त्या भागांत

जरूर त्या लोकांना औषधें नेऊन पोहोंचवावयाचीं, मृतांच्या अंत्यविधीची व्यवस्था करावयाची ! एकेका दिवशीं तीन तीन नि चार चार वेळां सोनापूरची यात्रा करण्याचा प्रसंग स्वयंसेवकांवर येऊं लागला ! !

शिवाय या सर्व कामांना द्रव्याची तर जरूरी होतीच. तेव्हां डॉ. नानासाहेब देशमुख, डॉ. भडकमकर, श्री. पां. वा. काणे, श्री. कृ. व्यं. डोंगरे, श्री. अं. गो. पुणतांबेकर इत्यादींच्या स्वाक्षऱ्यांनिशीं "किती अंत पहासी देवा ?" या शीर्षकाखालीं एक विनंतीपत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें. धनिकांनीं गरिबांस, सशक्तांनीं अशक्तांस, ज्ञान्यांनीं अज्ञान्यांस साहाय्य करण्याची हीच वेळ आहे हें समाजाला त्यामुळें पटूं लागलें व थोड्याच अवधींत तीन हजार रुपये जमा झाले. अर्थात् ते सर्व लौकरच खर्चहि झाले. या हस्तपत्रिकेंत वर्णन करण्यांत आलेली त्या वेळची परिस्थिति खरोखरच हृदयद्रावक आहे. त्या वेळच्या मध्यम स्थितींतील लोकांची परिस्थिति फारच केंविलवाणी झालेली होती. गरिबांप्रमाणें याचना करण्यास त्यांना संकोच वाटत होता आणि श्रीमंतांप्रमाणें व्यवस्था करून घेण्यास तर ते असमर्थ होते. कित्येकांना तर उत्तरक्रियेसाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चाची काय व्यवस्था करावी या काळजीपुढें मृताबद्दल दुःख करायलाहि सवड मिळत नव्हती. निःस्त्राण शरीरानें, शोकाकुल मनानें आणि निराश अंतःकरणानें 'सहाय दुसरा नसे तुजविणें प्रभो धांव गा' अशी परमेश्वराची प्रार्थना करण्यापलीकडे त्यांच्या हातीं कांहीं उरलें नव्हतें.

टीकाकारांचें समाधान

याप्रमाणें ब्राह्मण सभा आपलें सर्वस्व पणाला लावून समाजाची सेवा करीत असतांना कांहीं लोकांनीं, 'ब्रा. सभेनें चालविलेलें हें कार्य जातीय आहे. ब्राह्मणांनीं यापेक्षां विशाल दृष्टि ठेवावी. हा संकटकाल सर्वांनाच भोगावा लागत आहे,' अशा प्रकारची टीका सुरू केली.

'सुबोध पत्रिका' हें वृत्तपत्रहि अशा टीकेंत सामील झालें होतें. ब्रा. सभेच्या चिटणीसांनीं या पत्राच्या संपादकाची भेट घेतली आणि त्यांना 'ब्राह्मण सभेचें केंद्र—श्री. शौचे यांची टाइपरायटिंगची कचेरी—कोणालाहि चोवीस तास उघडी आहे. कोणत्याहि जातीसंबंधींचा विचार न करतां आपद्ग्रस्तांची नोंद करून घेऊन त्यांना योग्य ती डॉक्टरी सल्ला व मोफत औषधें मिळण्याची व्यवस्था तेथें केली जाते. कोणाहि गरजूनें दूध मागितलें तर तें त्याला दिलें जातें. सभेचे स्वयंसेवक मात्र चाळीचाळींतून हिंडून ब्राह्मण रोग्यांसच आवश्यक ती मदत करतात. सर्वांना साहाय्य करण्यास आवश्यक इतकें द्रव्यबळ व मनुष्यबळ ब्रा. सभेला मिळेल तर ती स्वतःला खरोखरच भाग्यवान समजेल,' असें सांगून त्यांना वस्तुस्थिति समजावून दिली. पत्रिकेच्या संपादकांनीं आपलें समाधान झालें असल्याचें सांगितलें व त्याप्रमाणें आपलें मत 'सुबोध पत्रिके'च्या द्वारें प्रसिद्ध केलें.

ब्राह्मण सभेनें हें कार्य संकुचित दृष्टीनें चालविलेलें आहे अशी टीका करणारांचा आणखीहि एक वर्ग होता. वैद्यतीर्थ अप्पाशास्त्री साठे हे या दुसऱ्या वर्गापैकीं होते. हे मुंबईंतील एक प्रसिद्ध वैद्य होते. ते आचरणानें पूर्ण सनातनी असून ब्राह्मण समाजांत त्यांच्याकडे एका विशिष्ट प्रकारच्या आदरानें पहाणारा एक मोठा वर्ग होता. मुंबईंतील सुप्रसिद्ध डॉक्टरांच्या नेतृत्वाखालीं ब्रा. सभेनें कार्य चालविलें आहे, सभेनें याबाबत वैद्यमंडळीला डावललें आहे असा त्यांचा सभेवर आक्षेप होता. त्या वेळच्या 'संदेश' पत्रांत त्यांनीं यासंबंधानें एक लेखहि लिहिला तेव्हां कार्यकारी मंडळाच्या सभासदांनीं वैद्यतीर्थांची भेट घेऊन त्यांचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. पण वैद्यतीर्थांनीं अशी भेट घेण्याचें टाळलें. तेव्हां ब्राह्मण सभेच्या एका सभासदानें वैद्यतीर्थांनीं उपस्थित केलेल्या आरोपांचें खंडन करणारा

लेख त्याच वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केला. डॉक्टर लोक ज्याप्रमाणें या रोगाचें निवारण करण्यासाठीं आपण होऊन पुढें सरसावले त्याप्रमाणें वैद्यकी करणारे लोक सरसावले नाहींत असें त्या लेखांत म्हटलें होतें. पण समाधानाची गोष्ट ही कीं, सभेचें हें कार्य एवढ्या धडाडीनें चाललें होतें कीं, वैद्यतीर्थांच्या असल्या टीकांकडे लक्ष देण्यास ब्राह्मण समाजाचेंहि मन घेईना !

या सांथीच्या तापांतील दिवसांत ब्रा. सभेनें व तिच्या स्वयंसेवकांनीं जें महनीय कार्य केलें त्यामुळें सभेच्या भावि उत्कर्षाचा पायाच घातला गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सभेकडे पहाण्याची समाजाची दृष्टि साफ बदलली. ब्रा. सभा म्हणजे बुद्धिबळें नि पत्ते खेळून करमणूक करून घेणारांचीच सभा नसून ज्ञातीसाठीं व शक्य तर सर्व समाजासाठीं कांहीं तरी कार्य करूं इच्छिणारांची व करणारांची ती एक सभा आहे अशी सर्वांची खात्री होऊन चुकली. सभेला आतां 'चहा–चिवडा–चिरूट' म्हणून हिणविण्यास कोणी धजेना. यावेळीं स्वयंसेवकांनीं जें स्पृहणीय कार्य केलें त्याबद्दल त्यांचा गौरव करण्यासाठीं ब्रा. स. व्य. मं. नें गांधर्व महाविद्यालयाच्या जागेंत सर्व सभासदांचें एक स्नेहसंमेलन भरविलें आणि तें अत्यंत यशस्वी झालें.

मोफत रुग्णालय

संकटकाळीं काम करणें सुलभ जावें म्हणून रुग्णालय समितीच्या कार्यास कायम स्वरूप देण्याचा व्य. मं. नें विचार केला व त्या वर्षीच्या दिवाळीच्या दिवसांत अनाथांकरितां म्हणून एक निधि जमविण्याचें ठरविलें. त्यासाठीं एक हस्तपत्रक काढून तें ब्राह्मण वस्तींत वाटण्यांत आलें. याहि कामीं स्वयंसेवकांची चांगली मदत झाली. या साहाय्याच्या आधारावर डॉ. भडकमकर यांनीं सुरू केलेल्या हॉस्पिटलमध्यें या समितीच्या तर्फे आठ सामान्य रोगी व दोन सूतिका यांची

रहाण्याची, औषधाची व पथ्यपाण्याची सोय विनामूल्य होण्याची व्यवस्था करण्यांत आली. या समितीनें या कामासाठीं जो निधि जमविला तो समितीनें याच कामासाठीं खर्च करावा असें ठरविण्यांत आलें. शिवाय ब्रा. सभेनें आपल्या चालू खर्चांतून या कार्यासाठीं एक हजार रुपयांची देणगी दिली. हें रुग्णालय निव्वळ ब्राह्मणांसाठींच चालविणें समितीला प्रशस्त वाटेना. तेव्हां या समितीचें रूपांतर 'हिंदु रुग्णालय समिति' म्हणून करण्यांत आलें. या कार्यासाठीं स्वतंत्र अशी वर्गणी प्रथम ब्रा. सभेमार्फतच गोळा करण्यांत आली होती आणि मुंबईतील कांहीं प्रसिद्ध व धनिक व्यापारी लोकांनीं या कामीं वार्षिक देणग्या देण्याचेंहि कबूल केलें होतें.

१९१९ अखेरपर्यंत या रुग्णालयाची सर्व व्यवस्था ब्रा. सभेच्या व्य. मं. तील कांहीं गृहस्थांकडेच होती. कारण अशा मोठ्या जबाबदारीची व खर्चाची संस्था प्रत्यक्ष चालवून दाखविल्याशिवाय समाजाकडून तिला सढळ हातानें मदत मिळणार नाहीं ही खात्री होती. या कामाप्रीत्यर्थ पहिल्यानें हनुमान बिल्डिंगमध्यें दरमहा रु. १५० ची भाड्याची जागा घेऊन रुग्णालयाची स्वतंत्र रीतीनें सुरुवात केली. हें रुग्णालय सुमारें सात महिने चालविण्यांत आलें. या अवधींत या रुग्णालयांत एकंदर एकवीस रोगी येऊन राहिले होते. त्यांत १४ पुरुष व ७ स्त्रिया होत्या. त्यांपैकीं १५ दक्षिणी ब्राह्मण, १ सारस्वत, १ गुजराथी, ३ प्रभु व १ मुसलमान अशी जातवारी होती. यांपैकीं १६ रोगी बरे होऊन गेले, ३ मृत्यु पावले व २ अजून रुग्णालयांत होते. या रुग्णालयांत डॉ. भडकमकर, डॉ. आठवले यांच्यासारख्या विद्वान व अनुभवी डॉक्टरांकडून रोगचिकित्सा व औषधयोजना होत असल्यामुळें पुष्कळ रोगी त्या ठिकाणीं येण्यास उत्सुक असत. पण जागेच्या अभावीं नियमित रोग्यांचीच सोय;

23502 दि. 8/6/54
409 नों: दि. 23/8/54

करण्यांत येत असे. जागा अपुरी व इतरहि हव्या तशा सोई नाहींत म्हणून सदर जागा सोडणें भाग पडलें व नंतर सोईस्कर जागा न मिळाल्यामुळें रुग्णालय बंद करावें लागलें.

या अनुभवावरून अशी संस्था चालविणें हें ब्रा. सभेसारख्या संस्थेला कठीण आहे हें कळून चुकलें. अशी संस्था चालविण्यास सर्वतोपरी लायक अशीं माणसें त्या वेळच्या ब्राह्मण समाजांत नव्हतीं असें नाहीं पण अशा कामासाठीं आवश्यक असणारें आर्थिक बळ त्यांच्याजवळ नव्हतें.

एक दुःखद प्रसंग

ब्रा. सभेच्या अनेकविध कार्यांचा इतिहास त्या त्या शीर्षकाखालीं यापुढें निवेदन केला आहे. या द्वादशवार्षिक कारकीर्दीच्या अखेरी-अखेरीला ब्रा. सभेवर एक मोठा दुःखद प्रसंग आला. तो म्हणजे डॉ. नानासाहेब देशमुख यांचें निधन हा होय. दि. १६ जुलै १९२८ ला डॉ. मोरेश्वर गोपाळ तथा नानासाहेब देशमुख कैलासवासी झाले!

ज्यांच्या स्फूर्तीनें ही ब्राह्मणसभा १८८८ सालीं अस्तित्वांत आली त्या सन्माननीय गृहस्थांत डॉ. नानासाहेब यांचें स्थान पहिलें होतें. १८८८ ते १८९२ पर्यंत ते ब्रा. सभेच्या व्यवस्थापक सभेचे उपाध्यक्ष होते. १८९३ सालीं ते व्य. सभेचे अध्यक्ष झाले आणि १८९४ ते १९०१ पर्यंत ते ब्रा. सभेच्या साधारण सभेचे उपाध्यक्ष होते. १९०१ ते १९१७ ते ब्रा. सभेचे अध्यक्ष होते व एकीकरणानंतर १९१८ ते १९२८ पर्यंत संयुक्त ब्रा. सभेच्या अध्यक्षस्थानीं त्यांची योजना झालेली होती. समाजाच्या-कल्याणाविषयीं त्यांना अत्यंत कळकळ वाटत असे. त्यांची विद्वत्ता, त्यांचें दातृत्व व त्यांची कर्तबगारी यांमुळें मुंबई शहरांत त्यांना एक विशिष्ट मानाचें स्थान प्राप्त झालेलें होतें. महाराष्ट्राच्या पुढारी वर्गांतहि त्यांची प्रामुख्यानें गणना होत असे. मुंबईतील बहुतेक

लहानमोठ्या संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता व त्या सर्वांना ते आपल्या बुद्धिमत्तेचा ब सक्रिय सहानुभूतीचा लाभ देत असत.

एकीकरणाच्या योजनेचें बहुतेक श्रेय त्यांनाच दिलें पाहिजे. समाजांत त्यांना असामान्य असें वजन प्राप्त झालेलें असल्यामुळेंच या योजनेला मूर्तस्वरूप येऊं शकलें. एकीकरणानंतर ब्रा. सभेनें जीं जीं कामें हातीं घेतलीं त्या सर्व कामांत सभेला त्यांचें मार्गदर्शन लाभत असे.

मुंबईंत ब्राह्मण समाजाचें असें एक स्वतंत्र ज्ञातिगृह असावें या कल्पनेला त्यांनीं प्रथमपासूनच सक्रिय सहानुभूति दाखविली होती व त्यासाठीं वेळोवेळीं परिश्रमहि केले होते. सन १८८८, १८९८ व १९१३ मध्यें महाजनवाडीप्रीत्यर्थ जे जे प्रयत्न झाले त्या त्या वेळीं डॉ. नानासाहेबांइतके श्रम कोणींच घेतले नव्हते. त्यांच्याच प्रेरणेनें व त्यांनीं दिलेल्या आश्वासनामुळें ब्रा. सभेनें १९२५ सालीं शंकरवाडी-गृह खरेदी करण्याचें धाडस केलें. कित्येक वर्षें आपल्या हृदयांत बाळगलेलें ध्येय सिद्धीस गेल्याबद्दल डॉ. नानासाहेबांनाहि त्यावेळीं आनंद झाला. ब्रा. विद्यार्थी सहाय्यक मंडळ व शंकरवाडी निधि यांचेहि ते अध्यक्ष होते.

या सर्व कामीं अत्यंत यशस्वी होऊन व आपलीं हीं कामें पुढें चालविण्यास डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर व श्री. पांडुरंग वामन काणे यांच्यासारखी कर्तबगार व उत्साही मंडळी मिळालेली आहे हें पाहून त्यांना आपण कृतकृत्य झालों असें वाटलें व त्यांनीं आपली दीर्घ जीवनयात्रा संपविली ! त्यांच्या निधनामुळें आपल्या एका थोर, अनुभवी, विद्वान व प्रेमळ अशा पूजनीय कार्यकर्त्यास ब्राह्मण सभा मुकली !!



श्री. माधवराव भट

डॉ. नानासाहेबांच्या निधनामुळें रिकाम्या झालेल्या साधारण सभेच्या अध्यक्षाच्या जागीं श्री. माधव वामन भट यांची निवड झाली. माधवराव भट मुंबईच्या उच्च न्यायालयांतील प्रमुख वकिलांपैकीं एक असून ब्रा. सभेच्या कार्यांत मनापासून लक्ष घालीत असत. ब्रा. सभेचे ते प्रारंभापासून उपाध्यक्ष होते व अध्यक्षांच्या गैरहजेरींत त्यांनीं अनेक वेळां अत्यंत यशस्वी रीतीनें सभा चालविल्या होत्या.

म. म. श्रीधरशास्त्री पाठक

सन १९२८ व १९२९ या दोन वर्षीं वेदांतवागीश श्रीधरशास्त्री पाठक हे व्य. मं. ला एक सदस्य म्हणून लाभले. भरतखंडांतील पहिल्या श्रेणींतील पांचदहा विद्वान व शास्त्री मंडळींत त्यांची गणना होत असे. शास्त्रीबुवा जरी जुन्या पद्धतीनें अध्ययन केलेले व जुन्या पिढींतील होते तरी देशकालवर्तमानाला अनुसरूनच शास्त्रवचनांचा अर्थ केला पाहिजे असें त्यांचें मत होतें. सभेच्या जागीं त्यांनीं कठोपनिषदावर अनेक प्रवचनें दिलीं होतीं. काशींतील ब्राह्मण महासंमेलनास ते ब्रा. सभेचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहिले होते. गीतारहस्यावरहि त्यांचीं अनेक प्रवचनें झालीं. ब्रा. सभेपुढें उपस्थित होणाऱ्या कठीण प्रश्नांवर ज्यांचें मत घेणें अवश्य असें ब्रा. सभेस वाटत असे अशांपैकीं शास्त्रीबुवा हे एक होते. त्यांचें शास्त्राध्ययन, त्यांची विद्वत्ता व संस्कृत भाषेवरील त्यांचें असामान्य प्रभुत्व पाहून त्यांना महामहोपाध्याय ही पदवी सरकारकडून मिळाली होती. ते एल्फिन्स्टन कॉलेजांत संस्कृत शिकवीत. मुंबईहून त्यांची बदली झाल्यामुळें ब्रा. सभेला त्यांच्या अमोल मार्गदर्शनाला मुकावें लागलें !

(३) स्वयंसेवक शाखा

१९१८ ते १९२९

ब्राह्मणसभेच्या कार्याचें सिंहावलोकन केलें तर असें दिसून येतें कीं, त्यांत स्वयंसेवकांनीं केलेल्या श्रमांचा फार मोठा भाग आहे. ब्रा. सभेच्याच नव्हे तर मुंबई शहराच्या एकंदर सार्वजनिक जीवनांतच एक काळ असा होता कीं, पैसा, बुद्धि आणि श्रम हीं तिन्ही एकत्र झाल्याखेरीज यश मिळण्याची आशा करणेंच खुळेपणाचें ठरावें ! मग तें सार्वजनिक काम धार्मिक असो, ज्ञातिविषयक असो, सामाजिक असो किंवा राजकीय असो !

ब्राह्मण सभेचा पहिला स्वयंसेवक

ब्राह्मण सभा, विद्यार्थी सहाय्यक मंडळ व श्रीशंकरवाडी निधि हीं स्थापन होऊन बरींच वर्षें लोटल्यानंतरहि त्या बाबतींत फारशी प्रगति झाल्याचें दिसून येत नाहीं. याचें मुख्य कारण म्हणजे त्या त्या संस्थेचें कार्य करण्यास आवश्यक तेवढें स्वयंसेवकांचें बळ लाभलेलें नव्हतें हें होय. १८९० सालीं एक स्वयंसेवक जणूं कांहीं निसर्गानेंच निर्माण केला. स्वतःला एखाद्या सार्वजनिक कार्याला वाहून घेऊन त्या कार्याचें महत्त्व सर्व समाजाला—विशेषतः त्यांतील धनिक वर्गाला—पटवून देऊन देणग्या मिळवावयाच्या व आपलें अंगीकृत कार्य यशस्वी

करावयाचें हा या स्वयंसेवकाचा खांक्या होता. अगदीं सामान्य परिस्थितींतील मनुष्यहि आपल्या सेवाबुद्धीच्या बळावर कोणतेंहि सार्वजनिक कार्य यशस्वी करूं शकतो हें या स्वयंसेवकानें स्वतःच्या उदाहरणानें जगाला दाखवून दिलें. हे गृहस्थ म्हणजे ब्रा. सभेचे आद्य स्वयंसेवक श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर हे होत.

श्री. मामा मराठे

त्यानंतर थोड्याच काळांत ब्राह्मण समाजांत आणखी एका स्वयंसेवकाचा उदय झाला. घरची स्थिति अगदीं गरिबीची. नोकरी हॉस्पिटलमध्यें. नोकरीची वेळ सकाळीं ८ ते सायंकाळीं ४ पर्यंत ! अशा परिस्थितींतहि या गृहस्थानें अनेक विद्यार्थ्यांस—विशेषतः वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस—मदत करण्याचा उपक्रम केला व ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाची कल्पना काढून त्या कल्पनेला मूर्त स्वरूप आणण्यासाठीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. नोकरीवरून सुटल्याबरोबर विद्यार्थी सहाय्यक मंडळाचीं पावती पुस्तकें कांखोटीस मारून, निरनिराळ्या भागांतील ब्राह्मण वस्तींत फिरून, लहान अगर मोठी जी कांहीं मदत मिळेल ती मिळविण्याचा धडाका त्यांनीं सुरू केला. फक्त श्रीमंत लोकच नाहीं तर मध्यम स्थितींतील व गरीब लोकहि एखाद्या सार्वजनिक कार्याला यथाशक्ति मदत करूं शकतात हें या स्वयंसेवकानें सर्वांना दाखवून दिलें. या गृहस्थानें समाजांतील सर्वसामान्य माणसांत सार्वजनिक कार्यांत मदत करण्याची बुद्धि निर्माण केली असेंहि म्हटलें तरी चालेल. हे गृहस्थ म्हणजे श्री. मारुति लक्ष्मण तथा मामा मराठे हे होत.

त्रिवेणीसंगम

याखेरीज आणखी एक कार्यक्षेत्र एका गृहस्थानें निर्माण केलें. एखाद्या सार्वजनिक संस्थेचे हिशेब ठेवण्याचें काम व शारीरिक

श्रमांचीं कामें विनावेतन करणें हें तें कार्यक्षेत्र होय. या क्षेत्राचे निर्माते श्री. विनायक भिकाजी निवर्गी हे होत.

प्रयाग क्षेत्रांत गंगा, यमुना व गुप्त सरस्वती यांचा संगम होऊन एक मोठा प्रवाह निर्माण होतो त्याप्रमाणें वरील तीन कार्यकर्त्यांपासून तीन प्रवाह निर्माण होऊन ते एकरूप झाले. त्या एकरूपतेचें प्रत्यक्ष प्रत्यंतर म्हणजे आजची स्वयंसेवक शाखा होय.

स्वयंसेवक संघटनेचा निर्माता

श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. मामा मराठे व श्री. निवर्गी यांनीं जरी आपापलें क्षेत्र निर्माण केलें आणि इतरांना काम करण्याची दिशा दाखविली तरी अनेकांकडून एकच कार्य यशस्वीपणें करून दाखविण्यांत जें संघटनाचातुर्य लागतें तें मात्र श्री. ज. ना. वैद्य यांनींच दाखविलें. श्री. मामा मराठे यांचें कार्य सुरू असलें व त्यांचें अनुकरण करून श्री. चिंतामण जनार्दन खेर व श्री. वामन रामचंद्र गुळवणे यांनीं काम करण्यास प्रारंभ केला असला तरी १९१४ सालीं श्री. ज. ना. वैद्य विद्यार्थी सहाय्यक मंडळाला मिळून त्यांनीं स्वयंसेवकांचा समूह निर्माण करीपर्यंत हीं कामें संघटनेनें कितीतरी अधिक यशस्वी होऊं शकतात ही कल्पना कोणासहि शिवलेली नव्हती.

श्री. ज. ना. वैद्य

श्री. ज. ना. वैद्य हे विश्वविद्यालयाचे पदवीधर असून कस्टम कचेरींत नोकरीला होते. त्या कचेरींतील कारकुनांना एक परीक्षा द्यावी लागे नि यासाठीं थोड्याफार कायद्याच्या ज्ञानाची आवश्यकता असे. या परीक्षेस बसूं इच्छिणारांसाठीं श्री. वैद्य यांनीं एक वर्ग चालविला होता. दहाबारा ब्राह्मण तरुण या वर्गाचा लाभ घेत असत. श्री. मामा मराठे यांच्या कार्यामुळें श्री. वैद्य यांना समाजसेवा करण्याची स्फूर्ति मिळालेली होती. श्री. वैद्य यांनीं आपल्या तरुण

विद्यार्थ्यांच्या मनावर समाजसेवेचें महत्त्व बिंबविलें आणि त्या सर्वांना ते रहात असलेल्या विभागांतून ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळासाठीं वर्गणी गोळा करण्यास प्रवृत्त केलें. हेंच स्वयंसेवक शाखेचें मूळ होय.

ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें शिरगणतीचें कार्य नुकतेंच केलें होतें. त्यावेळीं निरनिराळ्या भागांतून काम करण्यासाठीं जे स्वयंसेवक पुढें आले होते त्यांचीं नांवें व रहाण्याचे पत्ते मिळवून श्री. वैद्य यांनीं त्यांच्याशीं ओळख करून घेतली व त्यांपैकीं अनेकांस ब्रा. वि. स. मंडळासाठीं काम करण्यास प्रवृत्त केलें. १९१६ साल अखेर त्या मंडळाचें काम करणारे चाळीस स्वयंसेवक होते व ही संख्या हळुहळू वाढतच होती. या यशाचें बहुतेक सारें श्रेय श्री. वैद्य यांच्या संघटना-चातुर्यालाच आहे. चारी संस्थांच्या एकीकरणानंतर या सर्व स्वयं-सेवकांचें साह्य संयुक्त ब्राह्मण सभेस लाभलें हें सांगावयास नकोच.

प्रतिनिधित्वांत वाढ

स्वयंसेवकांच्या कार्याचें महत्त्व लक्षांत घेऊन ब्रा. वि. स. मं. नें त्यांना व्यवस्थापक मंडळावर आपले दोन स्वतंत्र प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार दिलेला होता व एकीकरणानंतर सर्वच संस्थांचे स्वयंसेवक एकत्र आल्यामुळें त्यांची संख्या साहजिकच वाढली. तेव्हां 'ब्राह्मण सभे'च्या कार्यकारी मंडळावर आपले सहा प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार स्वयंसेवकांना असावा असें स्वयंसेवक शाखेला वाटूं लागलें. ब्रा. सभा व्य. मं. चा याला विरोध होता. आतांप्रमाणें तेव्हांहि, लक्ष्मी-सरस्वतीची—या दोहोंपैकीं निदान एकीची तरी—कृपा असल्याशिवाय निवडणुकींत यशस्वी होणें कोणालाहि बहुधा अशक्य असे ! १९१९ च्या आरंभीं ब्रा. सभेच्या साधारण सभेनें स्वयंसेवकांच्या या नवीन प्रमाणांतील प्रतिनिधित्वाला आपली मान्यता दिली व स्वयंसेवक शाखेचें काम व्यवस्थितपणें सुरू झालें.

स्वयंसेवकांची कामगिरी

१९१८ च्या 'इन्फ्लुएन्झा'च्या सांथींत ब्रा. सभेच्या स्वयंसेवकांनीं जी बहुमोल कामगिरी केली तिचा उल्लेख अन्यत्र आलेलाच आहे. मुंबई शहराचे निरनिराळे विभाग कल्पून, प्रत्येक विभागासाठीं स्वतंत्र स्वयंसेवकांची योजना करण्यांत आली. शिरगणतीच्या अहवालांत मुंबईतील मिळवत्या माणसांची नोंद झालेलीच होती. अशांपैकीं जे गृहस्थ ब्रा. सभेचे सभासद झालेले नव्हते त्यांना सभासद करून घेण्याचें काम स्वयंसेवक करूं लागले. या कामीं त्यांना डॉ. भडकमकर, श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. शौचे यांची फार मदत झाली. वर्गणी जमविण्याच्या कामाशिवाय सभेचें दप्तरी काम करण्यासाठींहि स्वयंसेवकांची जरूरी भासूं लागली तेव्हां श्री. महादेव विष्णु नामजोशी व श्री. कृष्णाजी गणेश पणशीकर हे भी. निवर्गी यांस मदत करण्यास पुढें आले.

स्वयंसेवकांच्या निरपेक्ष कामगिरीकडे पाहून वर्गणीदारांनीं त्यांना विनाकारण पुन्हा पुन्हा फेऱ्या मारावयास लावूं नयेत अशा अर्थाची विनंती व्यवस्थापक मंडळातर्फे सर्व सभासदांस करण्यांत आली. तसेंच, संस्थेचें कार्य दिवसेंदिवस वाढत जाणार व संस्थेला अधिकाधिक स्वयंसेवकांची आवश्यकता वाटणार हें लक्षांत घेऊन समाजांतील गृहस्थांनीं सभेचें अल्पस्वल्प तरी कार्य करण्यास पुढें यावें अशीहि व्य. मं. तर्फे सूचना करण्यांत आली.

स्वयंसेवक शाखेची सभा साधारणपणें प्रत्येक महिन्यांत भरत असे. सभेंत विचारविनिमय होऊन कामाची व्यवस्था करण्यांत येई. १९२९ अखेर स्वयंसेवकांची संख्या ८० पर्यंत गेली. प्रत्येक स्वयंसेवकानें कमींत कमी वीस सभासदांची वर्गणी वसूल केली पाहिजे किंवा

सभेच्या कचेरींत आठवड्यांतून निदान दोन तास तरी काम केलें पाहिजे असा नियम करण्यांत आला.

दि. ११ सप्टेंबर १९२५ ला ब्रा. सभेकरितां महाजनवाडी म्हणून चर्नीरोडवरील सध्यांची शंकरवाडीची जागा ७१००० रुपयांस खरेदी करण्याचें ठरलें आणि त्याच दिवशीं त्याचें साटेंखतहि झालें. त्या-अन्वयें ही रक्कम चार महिन्यांच्या आंत पुरी करावयास पाहिजे होती. ही रक्कम जमविण्यासाठीं ब्रा. सभेचें व्यवस्थापक मंडळ खटपट करीत होतें. स्वयंसेवकांनींहि या कामीं आपला योग्य तो वांटा उचलण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सर्व स्वयंसेवकांनीं आपापल्या विभागांतील मिळ-वत्या माणसांची यादी तयार केली आणि त्या विभागांत सभा घेऊन सभेला जास्तींत जास्त माणसें उपस्थित रहातील अशी व्यवस्था केली. सभेच्या जागीं श्री. पां. वा. काणे किंवा दुसरे कोणी वजनदार गृहस्थ उपस्थित रहात व श्रोत्यांना या कार्याचें महत्त्व समजावून सांगत. सभेंत देणग्यांचीं आश्वासनें मिळत आणि त्या वसूल करण्याचें काम स्वयंसेवक करीत. त्याचप्रमाणें आपापल्या विभागांतून ब्रा. सभेचे आश्रयदाते आणि तहाहयात सभासद होण्यासारखे जे गृहस्थ असतील त्यांची यादी करून त्यांच्याकडे ब्रा. सभेंतील प्रमुख गृहस्थांचें शिष्टमंडळ नेण्याचें काम स्वयंसेवक करीत. अशा प्रकारें वर्गणी वसुलीखेरीज सुमारें तीस हजार रुपयांपर्यंत रक्कम स्वयंसेवकांनीं जमविली आणि शंकरवाडीचें काम ठरलेल्या मुदतीच्या आंतच पुरें झालें.

१९१८ ते १९२९ या बारा वर्षांच्या अवधींत स्वयंसेवकांनीं वर्ग-णीच्या रूपानें जवळ जवळ पन्नास हजार रुपये जमविले असल्याचें दिसून येईल. १९२९ सालीं सभेच्या पटावर ५४ आश्रयदाते, २३३ तहाहयात सभासद व १८९४ सामान्य सभासद अशी एकूण २१८१ सभासदांची संख्या होती.

वर्गणीवसुलीखेरीज ब्रा. सभेमार्फत वेळोवेळीं होणारे उत्सवादि समारंभ, जादा साधारण सभा, व्याख्यानें वगैरेंचीं हस्तपत्रकें वाटण्याचें काम स्वयंसेवक करीत. तसेंच, जुने सभासद कायम टिकविणें, नवीन सभासद मिळविणें, सभासदांच्या मनांत कांहीं गैरसमज असल्यास ते दूर करणें हीं कामें सर्वसाधारणपणें तेच करीत असत. आपल्या चरितार्थाचा उद्योगधंदा सांभाळून ब्राह्मण सभेचें काम स्वयंसेवकांकडून निरलसपणें होत असे. मध्यम व गरीब स्थितींतील लोकांना अशा प्रकारें समाजसेवा करण्याची संधि ब्रा. सभेनें मिळवून दिली हें आपलें भाग्य होय असेंच ही स्वयंसेवक शाखा समजते.

याच काळांत उत्सवादि समारंभप्रसंगीं ब्रा. सभेनें अस्पृश्यांना सभेच्या जागीं येऊं द्यावें किंवा नाहीं यासंबंधीं बराच वादविवाद झाला. अर्थात् या बाबतींत कमालीचे मतभेद झाले. पण वा मतभेदांची झळ स्वयंसेवक शाखेनें आपणाला लागूं दिली नाहीं. व्यक्तिशः कोणाचें कांहींहि मत असलें तरी सभेचें काम हें मतभेदातीत आहे या तत्त्वाचा कोणत्याहि स्वयंसेवकानें विसर पडूं दिला नाहीं व आपलें अंगिकारलेलें कार्य अव्याहत चालू ठेवलें.

या द्वादशवार्षिक काळाच्या प्रारंभीं स्वयंसेवकसमूहाचे जनक श्री. ज. ना. वैद्य यांनीं ब्रा. सभेच्या स्वयंसेवक शाखेची संघटना केली. पण या कार्याला मूर्त स्वरूप येण्याच्या पूर्वीच त्यांच्या प्रकृतीनें त्यांना दगा दिला. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें स्वयंसेवक शाखेच्या कार्यवाहपदाचें त्यांनीं त्यागपत्र दिलें व त्यांच्या जागीं श्री. गोविंद हरि मोडक यांची निवड झाली. पण कार्यबाहुल्यामुळें श्री. मोडक हे फार दिवस काम करूं शकले नाहींत व १९२१ च्या प्रारंभीं हें कार्य श्री. वामन रामचंद्र गुळवणे यांनीं आपल्या हातीं घेतलें. त्यांनीं चार वर्षें निरलसपणें काम करून शाखेला चांगलें स्वरूप प्राप्त करून दिलें. त्यांच्या

नंतर श्री. हरि श्रीधर साठे व श्री. रा. वि. वेलणकर यांनीं हें काम पुढें चालविलें. १९२७ सालीं अस्पृश्य मेळ्यामुळें ब्रा. सभेंत जें वादळ झालें त्याचा थोडाफार परिणाम स्वयंसेवक शाखेवरहि झाला म्हणून श्री. गुळवणे यांनीं शाखेचें काम पुन्हा हातीं घेतलें आणि मतभेदातीत राहून सभेचें काम करण्यास स्वयंसेवकांना प्रवृत्त केलें. श्री. चिंतामण जनार्दन खेर, श्री. ल. ग. जोशी, श्री. ग. र. बर्वे, श्री. मारुति लक्ष्मण मराठे, श्री. वा. रा. गुळवणे, श्री. वि. ग. गानू व श्री. हरि श्रीधर साठे यांपैकीं प्रत्येकानें महिना शंभर सभासदांची वर्गणी वसूल करण्याचें काम केलें. विशेषतः श्री. खेर यांनीं नोकरीच्या वेळेखेरीज बाकीच्या सर्व वेळ सभेच्या कामास वाहिला.

या सर्व स्वयंसेवकांच्या परिश्रमांचें चीज म्हणजे ब्रा. सभेला मोठ्या संख्येनें मिळालेला सभासदांचा पाठिंबा होय.

(४) ब्राह्मण ज्ञातिगृह व श्रीशंकरवाडी फंड

मुंबईतील ब्राह्मण ज्ञातीकरितां एक महाजनवाडी असावी म्हणून पूर्वी जे प्रयत्न झाले होते त्यांची माहिती पूर्वी आलेलीच आहे. १९१३ सालीं स्थापन झालेली ' श्रीशंकरवाडी फंड ' ही संस्था रजिस्टर होऊन त्या निधीचे विश्वस्तहि नेमण्यांत आले होते. या निधीची रक्कम सुमारें तेरा हजार रुपये होती. तसेंच, इमारत खरेदी करण्याच्या बाबतींत या संस्थेचे कांहीं नियम होते. त्या नियमांप्रमाणें कांहीं विशिष्ट रक्कम हातांत जमा झाल्याखेरीज शंकरवाडीकरितां घर खरेदी करण्याची स्वतंत्रता या विश्वस्तांना नव्हती. त्यामुळें ही शंकरवाडीची कल्पना दप्तरींच राहिली होती. संयुक्त ब्रा. सभेनें पूर्वी झालेल्या प्रयत्नांचा इतिहास आपल्या डोळ्यांसमोर ठेवून या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याची खटपट करण्याचें ठरविलें.

पोटसमिति

पहिल्या दोन वर्षांत स्थावर मिळकतीच्या किंमतींत फारच झपाट्यानें वाढ होत होती. त्यामुळें एखाद्या जागेच्या किंवा घराच्या किंमतीसंबंधानें अंदाज काढावा नि त्यासंबंधीं विचारविनिमय करून सौदा पटविण्यास जावें तर किंमतींत पूर्वीच्याहून कांहीं हजारांनीं तरी वाढ झाली असल्याचा प्रत्यय यावयाचा ! किंवा मधल्या काळांत

आपण पूर्वी ऐकलेल्या किंमतीपेक्षां अधिक किंमत देऊन ती जागा किंवा तें घर दुसराच कोणी खरेदी करून गेला असल्याचें वृत्त कानीं पडावयाचें ! सभेच्या मंडळीला अशा प्रकारचा अनुभव चार वेळां आला. तेव्हां साटेंखत करतांनाच बयाणा देऊन व्यवहार बांधून घेतां यावा म्हणून ब्रा. सभेच्या व्य. मं. नें एक लहानशी पोटसमिति नेमली व ज्ञातिगृह खरेदी करण्याच्या कामींचे सर्व अधिकार तिला दिले.

या समितीनें आपल्या कामास सुरुवात केली पण योग्य जागा त्वरित आढळली नाहीं. श्रीशंकरवाडी निधि कायदेशीर रीतीनें ब्रा. सभेंत सामील झालेला नव्हता म्हणून ब्रा. सभेला शंकरवाडीची रक्कम आपल्या ज्ञातिगृहासाठीं खर्च करतां येत नव्हती. तेव्हां शंकरवाडी ही संस्था तूर्त तशीच स्वतंत्र राहूं द्यावी व शंकरवाडी संस्थेच्या उद्देशास पोषक अशी इमारत खरेदी करण्याचें नक्की करावें आणि अशा पद्धतीनें काम झाल्यास श्रीशंकरवाडी निधींत शिल्लक असलेली रक्कम खर्च करण्यास ब्रा. सभेस अडचण पडणार नाहीं अशा प्रकारची योजना आंखण्यांत आली.

जागेसाठीं शोधाशोध

श्रीमंत भाऊसाहेब गोखले हे ब्राह्मणसभा व श्रीशंकरवाडी यांच्या उद्देशांना पोषक अशा घराचा शोध करूं लागले. असें घर त्यांना आढळल्यास रु. ५००० पर्यंत बयाणा देऊन कांहीं महिन्यांच्या मुदतीचा घरखरेदीचा करार करण्याचा अधिकार त्यांस देण्यांत झाला. पुढें थोड्या दिवसांनीं श्रीमंत भाऊसाहेबांना अशी एक सोईस्कर इमारत आढळली. या इमारतीची किंमत ८०–८५ हजार रुपयांपर्यंत होती. ही रक्कम जमा करण्याचे प्रयत्नहि सुरू झाले. ही इमारत म्हणजे ठाकूरद्वार येथील धसवाडींत 'मंडलिकांचें' म्हणून प्रसिद्ध असलेलें घर होय. सदर घराच्या लिलांवाचें काम कोर्टामार्फत होणार

स्थापना
१८८८

ॐ

दक्षिणी ब्राह्मणसभा.

श्री शंकर वाडी.

पुनर्घटना
१९१८



श्री शंकरवाडीच्या मूळ इमारतीचें छायाचित्र

सभागृहाचि दुरुस्त्या झाल्यानंतरची शंकरवाडी

होतें. व्यवस्थापक मंडळानें मिळालेलीं आश्वासनें ध्यानांत घेऊन, समाजांत चळवळ करून आणखी निधि जमविण्याचें ठरविलें व या घराच्या बाबतींत लिलांवाची रक्कम रु. ८१००० पर्यंत सॉलिसिटरांच्या मार्फत चढविली पण घराच्या हिस्सेदारांनींच ही रक्कम त्याहून अधिक वाढविली आणि लिलांव पुरा झाला ! ब्राह्मण सभेला हें घर मिळूं शकलें नाहीं !

यानंतर ठाकूरद्वारच्या धसवाडीच्या पिछाडीला असलेल्या दोन चाळी लिलांवांत निघाल्या. त्या वेळींहि त्या घेण्याबाबत ब्रा. सभेनें प्रयत्न करून पाहिला. पण लिलांवाच्या वेळीं रक्कम भलतीच वाढल्या-मुळें ब्रा. सभेला यश आलें नाहीं.

ठिकाण सांपडलें

पण या अपयशामुळें निराश न होतां समितीनें आपलें काम वाढत्या उत्साहानें चालू ठेवलें. अखेर चर्नीरोडवरील प्रार्थना समाजाजवळील (हल्लींची इमारत) घर श्री. बाबूराव दलाल या गृहस्थानें समितीस दाखविलें. समितीस हें घर पसंत पडलें. भर वस्तींतील जागा, पुढें चर्नीरोडसारखा मोठा रस्ता व पाठीमागें बनामहॉल लेनपर्यंत जागा व या जागेंत एक मोठें घर, एक सुंदर विहीर, अशा एकंदर गोष्टीं-मुळें हें घर सर्वांना पसंत पडलें. तेव्हां तें एंजिनियरला दाखविण्यांत येऊन त्याच्या मजबुतीसंबंधानें वगैरे खात्री करून घेण्यांत आली. सभेच्या कार्याला तें उपयुक्त असल्याबद्दलची पूर्वीच खात्री झालेली होती. व्यवस्थापक मंडळानें हें घर घेण्याचें निश्चित केलें.

एक शंका

यावेळीं सभेजवळ सुमारें २१ हजार रुपये होते. खटपट केल्यानंतर शंकरवाडीचे १७ हजार मिळूं शकतील असें वाटत होतें. तरी सुद्धां आणखी निदान ४० हजार रुपये तरी जमविणें भाग होतें; आणि

याला मुदत फक्त दोन किंवा तीन महिन्यांची ! ज्ञातिगृहासंबंधीं पूर्वी आलेले अनुभव पाहतां याहि प्रसंगीं आपली फसगत होणार नाहीं ना, अशी शंका कित्येकांना व्याकुळ करीत होती. १८९८ सालीं ज्ञाति-गृहाची आवश्यकता सर्व समाजास पटली असतांना प्रयत्नांची शिकस्त करूनहि प्रत्यक्ष हातीं आलेली रक्कम ८ हजार रुपयांपेक्षां अधिक वाढूं शकली नव्हती. १९१३ सालीं श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं सभा होऊन अत्यंत कळकळीचीं भाषणें झालीं. श्रीशंकराचार्यांनीं त्या वेळीं उपस्थित असलेल्या गृहस्थांत केवळ एकेकटाहि असें ज्ञातिगृह घेऊं किंवा बांधूं शकेल असे सधन गृहस्थ असल्याचा निर्वाळा दिला होता. पण त्यानंतर दीड वर्षपर्यंत या कामासाठीं जीवापाड प्रयत्न करूनहि ही रक्कम १३ हजार रुपयांच्या वर जाऊं शकली नाहीं. तेव्हां त्यानंतर बाराच वर्षांनीं जवळजवळ तीच मंडळी प्रयत्न करीत असतांना दोनतीन महिन्यांच्या छोट्या अवधींत ४० हजार रुपयांची रक्कम जमा होणें कठीणच असें कांहीं लोकांना वाटल्यास त्यांत नवल तें काय ?

श्री. नवरे यांचें आश्वासन

ब्रा. सभेचें हित चिंतणारांत, इतकेंच नव्हे तर ब्रा. सभेच्या व्य. मंडळांतहि, हा घरखरेदीचा उपद्व्याप मूर्खपणाचा आहे असें म्हणणारे कांहीं गृहस्थ होते. सभेचे कार्यकर्ते अशा चमत्कारिक मनः-स्थितींत असतांना ब्राह्मण समाजांतील प्रसिद्ध व्यापारी श्री. गणपतराव नवरे यांनीं व्यवस्थापक मंडळास असें आश्वासन दिलें कीं, 'कार्य-कर्त्यांनीं देणग्या मिळविण्याचे शिकस्तीचे प्रयत्न करावे. बहुधा त्यांच्या या प्रयत्नांना यश येईलच. पण तसें तें न आल्यास जितकी रक्कम कमी पडेल तेवढी कर्जाऊ मिळवून देण्याची मी हमी घेतों.' या आश्वासनानें कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण झाला आणि व्य. मं. नें

साटेंखत करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें दि. ११ सप्टेंबर १९२५ ला रु. ७१००० चें हें साटेंखत उपरोक्त श्री. नवरे यांच्या नांवानें करण्यांत येऊन इसारादाखल रु. ७'५०० भरण्यांत आले.

याच घराच्या बाबतींत श्री. केशव रामचंद्र दिवेकर सॉलिसिटर यांनीं दुसऱ्या एका गृहस्थाकरितां काम केलें असल्यामुळें व सभेला दुबार खर्च पडूं नये म्हणून श्री. बाळासाहेब खेर यांच्या संमतीनें हें घर खरेदी करण्याच्या बाबतींत करावें लागणारें काम सॉ. दिवेकर यांचेवरच सोंपविण्यांत आलें.

प्रयत्नांची पराकाष्ठा

साटेंखत झाल्याबरोबर व्य. मं. नें तांतडीची सभा घेऊन निधि जमविण्याचें कार्य सुरू केलें व या कामाकरितां स्वयंसेवक संघांतील निरनिराळ्या माणसांचे गट तयार करण्यांत आले. हा निधि जमा करण्याच्या कामीं श्री. पां. वा. काणे व डॉ. रा. ह. भडकमकर या दोघांबद्दल ब्राह्मण समाजांत असलेल्या आदरबुद्धीचा फार मोठा उपयोग झाला. या दोघांनीं अशा प्रकारचा उपयोग सभेस होऊं दिला हें तिचें भाग्यच होय. श्री. बाळासाहेब खेर, डॉ. पुरोहित, श्रीमंत भाऊसाहेब गोखले, श्री. नामजोशी इत्यादि व्य. मंडळांतील गृहस्थांनींहि आपला सर्व वेळ या कार्यासाठीं खर्च करण्याचा निश्चय केला. तसेंच, स्वयंसेवक संघांतील श्री. चिं. ज. खेर, श्री. ग. र. बर्वे, श्री. रा. वि. वेलणकर, श्री. ह. श्री. साठे, श्री. विष्णुपंत भागवत व श्री. वामनराव गुळवणे इत्यादींनीं स्वयंसेवक संघाचे ब्राह्मण वस्तीप्रमाणें गट करून व्य. मंडळांतील गृहस्थांना त्या त्या ठिकाणीं नेऊन—सभा भरवून किंवा खाजगी रीतीनें फिरवून—प्रचार करण्याचें कार्य अविरतपणें केलें. एरवींच्या गोष्टींत ज्यांना कांटेतोल नियमितपणा ठेवणें अशक्य होतें असे डॉ. भडकमकर अगदीं नियमित वेळीं निमंत्रित ठिकाणीं उपस्थित राहात

आणि सभेच्या निधिसमितीबरोबर देणग्या मिळविण्यास जात व त्यासाठीं आपला अमूल्य वेळ खर्च करीत. श्री. पां. वा. काणे हे हायकोर्टमधील सर्वांत प्रमुख वकिलापैकीं एक होते. आपल्या अशिलांचीं कामें वेळच्या वेळीं पार पाडण्याची त्यांच्यावर जबाबदारी असे. शिवाय मुंबई विश्वविद्यालयासारख्या अनेक मोठ्या संस्थांशीं त्यांचा संबंध असल्यामुळें त्यांच्या सभांना त्यांना उपस्थित राहावें लागे. यांइतकेंच, किंबहुना याहूनहि अधिक महत्त्वाचें, असें त्यांचें ग्रंथलेखनाचें कार्य नेहमींच सुरू असे. अशा स्थितींतहि आपला रोजचा सकाळचा वेळ आणि सुट्टीच्या दिवशीं तर आठ आठ तास ते ब्रा. सभेच्या या कार्यासाठीं देत. श्री. बाळासाहेब खेर, श्रीमंत भाऊसाहेब गोखले इत्यादि व्य.मं.तील गृहस्थहि या कामीं अगदीं मनोभावें झटत होते. त्यांचें प्रत्येक मिनिट मोलाचें होतें. तरीहि त्यांनीं या कामीं अतिशय मेहनत घेऊन, कांहीं वेळां तर आपला धंदा बाजूस सारूनहि, हें कार्य करण्याचें ठरविलें. इन्फ्लुएन्झाच्या सांथींत ब्रा. सभेनें अप्रतिम कार्य करून समाजाची सहानुभूति मिळविलेलीच होती. गणेशोत्सवादि कार्यक्रमांमुळें समाजांतील बंधुभगिनींचें लक्ष सभेनें आपल्याकडे आकर्षून घेतलें होतें. अनेक गरीब विद्यार्थ्यांना सभेकडून होत असलेली मदत पाहून सभेसंबंधानें अनेकांच्या मनांत आदराची व आपुलकीची भावना निर्माण झालेली होती. या साऱ्या गोष्टींचाहि या कामीं चांगला उपयोग झाला.

श्री. पुणतांबेकर व श्री. पातकर हे या निधिसमितिरूपी नौकेचे कर्णधार होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. या समितीनें केव्हां, कोठें व कोणाकडे जावयाचें, कोणाकडून किती देणगी मिळवावयाची याचे नकाशे तयार करून हे दोघे या समितीस पुरवीत असत. या सर्व गोष्टींचा फायदा ब्रा. सभेस एकसमयावच्छेदेंकरून मिळाला.

निधिसमितीचे सदस्य, श्री. काणे किंवा डॉ. भडकमकर विशिष्ट

स्थळीं जाण्यापूर्वी, या ज्ञातिगृहाच्या योजनेची सर्व माहिती व ब्राह्मण गृहस्थांकडून कोणत्या प्रकारच्या साहाय्याची अपेक्षा आहे यासंबंधीं या गृहस्थांकडून विवेचन केलेलीं हस्तपत्रकें स्वयंसेवकांनीं मुंबई व उपनगरांतील सर्व ब्राह्मण वस्तींत पोहोंचतीं केलेलीं होतीं. या सर्व परिश्रमांचें ब्राह्मण समाजांतील लहान थोर व्यक्तींनीं आपल्या सक्रिय सहानुभूतीनें चीज केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

विलेपार्लेकरांची देणगी

यांपैकीं एकच उदाहरण दिल्यास त्यावेळीं झालेल्या कार्याची वाचकांस नीट कल्पना येईल. व्यवस्थापक मंडळांतील कांहीं गृहस्थ कांहीं स्वयंसेवकांसह एका रविवारीं सकाळीं विलेपार्ले येथें गेले आणि संध्याकाळीं चार वाजेपर्यंत त्यांनीं रोकड रु. ६००० व रु. ३००० चीं आश्वासनें मिळवून रु. ९००० देणगीरूपानें जमा केले ! या एकाच गोष्टीवरून ब्राह्मणसभा ही समाजाची उन्नति करण्यास झटणारी संस्था आहे यावद्दल ब्राह्मण समाजास पुरेपूर विश्वास वाटूं लागला होता ही गोष्ट सहज सिद्ध होण्यासारखी आहे.

शंकरवाडीची खरेदी

साटेंखताप्रमाणें पूर्वीच्या घरमालकास द्यावयाचे रु. ७१०००, दलाली म्हणून रु. १४०० व सॉलिसिटरचा खर्च मिळून या कामीं रु. ७५००० ची आवश्यकता होती. हें घर खरेदी केल्यानंतर श्री. पुण-तांबेकर यांनीं श्रीशंकरवाडीची सभा त्या संस्थेच्या नियमाप्रमाणें बोलावली आणि त्या निधीची रक्कम कायदेशीर रीतीनें ब्रा. सभेस मिळेल अशी व्यवस्था केली. या कामीं त्यांना डॉ. नानासाहेब देशमुख यांचें मार्गदर्शन तसेंच त्यांचें ब्राह्मण समाजांतील वजन यांचा फार उपयोग झाला.

व्य. मंडळांतील सभासद व स्वयंसेवक यांनीं जे परिश्रम केले त्यांमुळें ज्ञातिगृहाप्रीत्यर्थ सभेला पुढीलप्रमाणें देणग्या मिळाल्या :—

१९२५	सालीं	रु. ३९२१५–५–०
१९२६–२७	,,	,, ३००४९-१०-६
१९२८–२९	,,	,, २६२४९–३–१
		एकूण रु. ९५५१४–२–७

एवढी रक्कम जमा झाल्यामुळें व्य. मं. ला वाटत असलेली भीति नाहींशी झाली आणि सभेमार्फत जीं जीं कामें सुरू होतील त्या त्या कामांना समाजाकडून सक्रिय सहानुभूति मिळेल असा भरंवसा वाटूं लागला. श्री. पुणतांबेकर यांच्या खटपटीला यश येऊन श्रीशंकरवाडी फंड या संस्थेंतील जमा रु. १७८०३–९–३ (मूळ निधि व त्यावरील व्याज मिळून) ब्राह्मण सभेस मिळाले.

आतां संस्थेची स्वतःची महाजनवाडी झाली हें खरें पण तींत अनेक सुधारणा करणें आवश्यक होतें. मुख्य घराच्या मागें असलेले तबेले काढून टाकून त्या ठिकाणीं दोनतीनमजली इमारत बांधल्यास सभेनें जीं अनेकविध कार्यें अंगावर घेतलीं होतीं आणि आणखीहि कांहीं घेणार होती त्यांची सोय करणें शक्य होणार होतें. शिवाय महाजनवाडींत भांडीं व इतर सामान वगैरेंचा पुरवठा करण्यासहि द्रव्याची आवश्यकता होतीच.

शंकरवाडीगृहांत योग्य त्या दुरुस्त्या करण्यांत येऊन पहिल्या मजल्यावर एक प्रशस्तसा दिवाणखाना तयार करण्यांत आला. येथपर्यंतचें स्थापत्यविशारदाचें काम श्री. टेंबे एंजिनियर यांनीं अगदीं काळजीपूर्वक केलें आणि त्यांच्या बहुमोल साहाय्यामुळेंच सभेला हें काम हातीं घेतां आलें.

हरि केशव गोखले हॉल

श्रीमंत हरि केशव तथा भाऊसाहेब गोखले यांचा ब्राह्मण सभेवर अतिशय लोभ होता व सभेच्या कार्याकडे ते सहानुभूतिपूर्वक पहात असत. सभेनें ज्ञातिगृह खरेदी केलें आणि त्यामध्यें सभेच्या कार्याला उपयुक्त अशा प्रकारच्या सुधारणाहि केल्या हें पाहून त्यांनीं सभेला एका रकमेनें रु. १०००० ची देणगी दिली आणि ज्ञातींतील धनिकांस उत्तम उदाहरण घालून दिलें. या त्यांच्या औदार्याचा यथायोग्य गौरव करण्याचें सभेनें ठरविलें आणि शंकरवाडींतील पहिल्या मजल्याच्या प्रशस्त दिवाणखान्याला त्यांचें नांव देण्याचें निश्चित केलें. दि. २८–८–२७ ला श्रीमंत वासुदेव बळवंत सोमण यांच्या अध्यक्षतेखालीं या दिवाणखान्याला 'श्रीयुत हरि केशव गोखले हॉल' हें नामाभिधान करण्याचा समारंभ मोठ्या थाटानें करण्यांत आला. श्रीमंत भाऊसाहेब गोखले यांच्या मागोमाग श्रीमंत नारायण विश्वनाथ मंडलिक यांनीं आपल्या मृतपत्नीच्या–सौ. इंदिराबाई मंडलिक यांच्या–स्मरणार्थ सभेला रु. ५००० ची देणगी दिली व या देणगीचा विनियोग शंकरवाडीच्या कार्यांत व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली. याप्रमाणें सभेला धनिकांची सक्रिय सहानुभूति लाभूं लागल्यामुळें सभेच्या कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

श्री. भाऊसाहेब तांबे

शंकरवाडींतील पहिल्या मजल्यांत दुरुस्ती करून एक प्रशस्त सभागृह तयार करण्यांत आलें पण त्याच्या वरच्या मजल्यावर जाण्याकरितां असलेले दोन जिने या सभागृहाच्या आंतील बाजूनें होते. हे जिने बाहेरून घेणें फार कठीण आहे असें आतांपर्यंत ज्या स्थापत्यविशारदानें शंकरवाडीचें काम केलें होतें त्याचें मत पडलें. इमारत–शाखेचे कार्यवाह श्री. रानडे यांना स्वस्थ बसवेना व हे जिने बाहेरून

घेणें अशक्य आहे याबद्दल त्यांची खात्री पटेना. म्हणून त्यांनीं श्री. केशव गणेश तथा भाऊसाहेब तांबे या स्थापत्यविशारदाला मुद्दाम शंकरवाडींत आणून या जिन्यांच्या प्रकरणीं त्यांचें मत घेतलें. तेव्हां इमारतीच्या बळकटीच्या दृष्टीनें कांहीं मूलग्राही फरक केल्यास हे जिने बाहेरून घेणें शक्य आहे असें आपलें मत त्यांनीं व्यक्त केलें. तसेंच, वरील मजला बांधण्याच्या दृष्टीनेंहि या मजबुतीचा चांगला उपयोग होईल असें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या या मताप्रमाणें त्यांच्याच प्रत्यक्ष देखरेखीखालीं मजबुतीच्या दृष्टीनें अवश्य ते बदल करण्यांत आले. श्री. भाऊसाहेबांनीं अत्यंत कौशल्यानें बाहेरील सज्जाची आंखणी केली आणि मोठ्या दक्षतेनें जिने बाहेरून घेतले. सभेमार्फत चाललेलें एकंदर कार्य पाहून व सभेच्या कार्यकर्त्यांशीं प्रत्यक्ष परिचय झाल्यामुळें श्री. भाऊसाहेबांच्या मनांत सभेसंबंधानें आत्मीयता उत्पन्न झाली व दिवसांतील कांहीं वेळ तरी सभेंत घालविण्याचा त्यांनीं निश्चय केला. यामुळें सभेला एक अतिशय कल्पक आणि विनावेतन काम करणारा असा स्थापत्यविशारद सहजासहजीं लाभला. यानंतरचीं शंकरवाडीचीं सर्व कामें सभेनें श्री. भाऊसाहेब तांबे यांच्याच नजरेखालीं करवून घेतलीं.

साळवेकर व्यायामशाळा

वर उल्लेख केल्याप्रमाणें देणग्या मिळाल्यामुळें सभेच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि शंकरवाडीच्या पिछाडीस असलेले तबेले काढून टाकून त्या जागीं एक चारमजली इमारत बांधण्याचें दि. २४-७-२७ ला व्य. मं. नें ठरविलें. तळमजल्याच्या कामाप्रीत्यर्थ येणाऱ्या खर्चाची जबाबदारी डॉ. चिंतामण रामकृष्ण आठवले यांनीं घेतली. ४४ फूट लांब, ३२ फूट रुंद व ४७ फूट उंच अशी इमारत तयार करण्याचा नकाशा नगरपालिकेकडून पास करून घेण्यांत आला.

या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ आश्विन शुद्ध १० (विजयादशमी) शके १८४९ या दिवशीं श्रीमंत लक्ष्मण बळवंत फाटक यांच्या हस्तें झाला. या इमारतीचा तळमजला व्यायामशाळेला सोईस्कर होईल अशा पद्धतीनें बांधला. त्याची उंची १७ फूट ठेवून मधोमध १८ फूट × १३ फूटचा हौदा तयार केला. हौद्यांतील कुस्त्यांचे वगैरे खेळ पहातां येतील अशा प्रकारची त्याला चौफेर गॅलरी ठेवण्यांत आली. या इमारतीचें वास्तुपूजन श्रीयुत नीलकंठरावजी महाजन यांच्या हस्तें दि. २९–६–२९ ला झालें. श्रीमंत तात्यासाहेब साळवेकर यांचे चिरंजीव श्रीमत गजानन विश्वनाथ तथा बाबूराव साळवेकर यांनीं आपल्या वडिलांचे स्मरणार्थ व्यायामशाळेप्रीत्यर्थ रु. १०००० ची देणगी दिली. या त्यांच्या औदार्याबद्दल सभेला वाटत असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं या व्यायामशाळेला 'साळवेकर व्यायामशाळा' असें नांव देण्याचें सभेच्या व्य. मं. नें ठरविलें. साळवेकर व्यायामशाळेचा उद्घाटन व नामाभिधान समारंभ दि. २९-७-२९ ला श्रीमंत सर गंगाधरराव तथा बाळासाहेब पटवर्धन, अधिपति संस्थान मिरज, यांच्या हस्तें झाला.

आश्वासन

दुसऱ्या मजल्यावर धर्म व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथालयाकरितां उपयोगीं पडेल असा सुंदर दिवाणखाना बांधलेला आहे. ब्रा. सभेनें जर धर्म व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथालय सुरू केलें तर त्याप्रीत्यर्थ आपण आणखी रु. ५००० ची देणगी देऊं असें डॉ. चिंतामण रामकृष्ण आठवले, श्री. नरहर विठ्ठल भावे व श्री. काशीनाथ विष्णु खानविलकर यांच्या मार्फत श्री. बाबूराव साळवेकर यांनीं सभेच्या व्यवस्थापक मंडळास आश्वासन दिलें. तसेंच, त्यांनीं एक पत्र लिहून असें ग्रंथालय सभेनें सुरू केल्यास त्या ग्रंथालयासाठीं कोणाची तरी मोठी

देणगी येऊन ग्रंथालयास दात्याचें नांव देण्याची सूचना आल्यास तसें प्रथम आपणाला कळविण्यांत यावें अशी व्य. मं. स. सूचना केली व व्य. मं. नेंहि ती मान्य केली.

अशा तऱ्हेचें ग्रंथालय सुरू करावयाचें तर त्यासाठीं एक स्वतंत्र निधि जमविणें भाग होतें. ब्रा. समेच्या व्य. मं. नें शंकरवाडी गृहांतील अत्यंत निकडीचीं व जरुरीचीं कामें आधींच अंगावर घेतलेलीं असल्यामुळें तीं पुरीं झाल्याशिवाय ग्रंथालयाच्या कामाला हात घालणें शक्य नव्हतें आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं, थोड्याच अवधींत श्री. बाबूराव साळवेकर हे एकाएकीं कालवश झाले आणि ग्रंथालयाची योजना स्थगित झाली.

शंकरवाडी गृहाची रचना

शंकरवाडी गृहाचा दुसरा व तिसरा मजला कांहीं विशिष्ट हेतूनें बांधले गेले. ते हेतू सिद्धीला जाण्यापूर्वी सभेच्या चालू खर्चासाठीं मदत व्हावी म्हणून ते मजले भाड्यानें देण्याचें ठरविण्यांत आलें. या दोन्ही इमारतींस जोडणारी एक लहानशी तिमजली इमारत बांधलेली आहे. तिचा तळमजला लग्नमुंजींच्या सारख्या प्रसंगीं स्वयंपाकगृह म्हणून उपयोगांत आणला जातो. पहिल्या मजल्यावर सभेच्या कचेरीची व्यवस्था करण्यांत आली असून दुसऱ्या मजल्यावर शंकरवाडीवर देखरेख ठेवण्याकरितां नेमलेल्या गृहस्थांच्या रहाण्याची सोय केलेली आहे.

या नवीन इमारतीप्रीत्यर्थ एकंदर रु. ४५००० पर्यंत खर्च यावा असा अंदाज होता व एंजिनिअर श्री. भाऊसाहेब तांबे यांच्या शिफारसीप्रमाणें या द्वादशवार्षिक काळाच्या शेवटीं रु. २९४१४ कॉंट्रॅक्टरला देण्यांत आले होते. अशा तऱ्हेनें इमारती तयार झाल्यानंतर स्वयंपाकाला लागणारीं भांडीं आणि इतर कांहीं किरकोळ वस्तू डॉ. विनायक कृष्ण डोंगरे यांनीं सभेस देणगी म्हणून दिल्या. श्री. काशी-

नाथ नारायण दातार यांनीं सभेस चांदीच्या भांड्यांचा एक संच देणगीदाखल दिला. तरीहि आणखी ज्या वस्तूंची उणीव होती त्या सभेनें खरेदी केल्या.

हरि केशव गोखले सभागृहाच्या आंत असलेले जिने बाहेरच्या बाजूनें काढण्यापासून पुढें झालेल्या सर्व सुधारणा, मागील बाजूची चार-मजली इमारत, सभेच्या विहिरीवरील जागीं दोन्ही इमारतींना जोड-णारी इमारत हीं सर्व कामें श्री. भाऊसाहेब ताबे यांनीं अगदीं आपुल-कीच्या भावनेनें केलीं व करून घेतलीं व त्यामुळें या कामासाठीं होणाऱ्या सभेच्या खर्चांत खूपच बचत झाली अशी दुसऱ्या अनेक स्थापत्यविशारदांनीं ग्वाही दिलेली आहे. श्री. भाऊसाहेब तांबे यांच्या या बहुमोल कार्याची जाणीव म्हणून व्य. मं. नें त्यांच्या नांवाचा शिलालेख पहिल्या मजल्यावरील गॅलरींत प्रमुख द्वारानजीक लावलेला आहे.

श्री. ग. शि. रानडे यांनीं शंकरवाडीच्या चिटणीसाचें काम करून आपल्या व्यवहारतत्परतेचा व संघटनकौशल्याचा भरपूर लाभ संस्थेस करून दिला.

(५) शिक्षणशाखा

१९१८ ते १९२९

एकीकरणानंतर ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळाचें कार्य ब्राह्मण सभेची शिक्षणशाखा करूं लागली. कुटुंबांतील इतस्ततः विखुरलेल्या माणसांचा जमाव एके ठिकाणीं आल्यावर त्या एकत्र कुटुंबाचा भार एकाच मिळवत्या माणसावर पडावा अशीच कांहींशी स्थिति ब्रा. वि. स. मंडळाची या एकीकरणानंतर झाली. ब्राह्मण सभेजवळ शिल्लक कांहीं नाहीं पण करमणुकीसाठीं येणाऱ्या मंडळीप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाची व्यवस्था मात्र संयुक्त ब्राह्मण सभेला करावी लागावयाची ! ब्राह्मण हितवर्धिनी संस्थेचा खिसा रिकामा पण प्रचार, उत्सव, समारंभ वगैरे कार्य ब्रा. सभेनें करावयाचें ! श्री शंकरवाडी संस्थेजवळ निधि होता पण ती संस्था रजिस्टर झाली असल्यामुळें त्या निधीचा उपयोग शंकरवाडीच्या कामाशिवाय इतरत्र करणें बेकायदेशीर होतें ! ब्रा. वि. स. मंडळाजवळ १९१७ अखेर रु. ५७०७-७-१० इतकी शिल्लक होती. पण तीहि एकीकरणाच्या वेळीं मान्य करण्यांत आलेल्या अटींप्रमाणें गंगाजळी म्हणून राखण्यांत आलेली होती. तरीहि आपल्या कार्याचा आराखडा आंखतांना ब्रा. सभेस या रकमेचा अतिशय उपयोग झाला.

ब्रा. सभेच्या व्य. मं. नें पुढें परत करण्याच्या अटीवर या गंगाजळीचा उपयोग चालू खर्चासाठीं करावयाचें ठरविलें. या वेळीं ही रक्कम जर ब्रा. सभेला मिळाली नसती तर काय झालें असतें याची कल्पनाच केलेली बरी ! या रकमेबरोबरच ब्रा. वि. स. मंडळाचे चाळीस स्वयंसेवकहि ब्रा. सभेला मिळाले. हे स्वयंसेवक निरनिराळ्या भागांत राहात होते आणि त्यांच्या मार्फत वर्गणीच्या रूपानें येणाऱ्या पैशांचा सतत वाहणारा शुद्ध पाण्याचा प्रवाह ब्रा. सभेच्या उपयोगीं पडला. हा प्रवाह पुन्हा असा होता कीं, ज्या मानानें अधिक प्रयत्न होईल त्या मानानें हा प्रवाहहि अधिकाधिक जोरदार व्हावा !

शाखेचे पदाधिकारी

शिक्षणशाखेच्या अध्यक्षांच्या जागीं श्री. पांडुरंग वामन काणे यांची योजना झाली. ब्रा. वि. स. मं. च्या प्रारंभापासून त्या मंडळाचें विलीनीकरण होईपर्यंत त्या संस्थेंत काम केलेले श्री. अनंत गणेश साठये यांची शिक्षणशाखेच्या चिटणीसाचे जागीं निवड झाली. शिक्षणशाखेच्या त्या वेळच्या नियमांप्रमाणें शाखेला मिळणारी वर्गणी, ५० रुपयांहून कमी असलेली देणगी आणि विद्यार्थ्यांकडून होणारी परतफेड या रकमांचा विनियोग त्या शाखेच्या कामाप्रीत्यर्थच केला जात असे व रु. ५० किंवा त्याहून अधिक रकमेची देणगी मिळाल्यास ती रक्कम या शाखेच्या गंगाजळींत सामील करण्यांत येई. गंगाजळीवर येणाऱ्या व्याजाचा मात्र उपयोग शाखेच्या चालू खर्चाला होत असे. श्री. अण्णासाहेब साठये यांनीं या शाखेच्या कार्यवाहाचें काम दोन वर्षें केलें व त्यांच्या नंतर श्री. गोविंद हरि मोडक हे शाखेचे चिटणीस झाले. श्री. मोडक यांनीं परतफेडीच्या बाबतींत बरीच मेहनत घेतली. १९२२-२३ पासून ही परतफेडीची रक्कम रु. १३०० पासून वाढत वाढत रु. १५०० पर्यंत जमा होऊं लागली. श्री. मोडक

यांनीं या शाखेच्या चिटणीसाचें काम १९२० सालापासून सतत आठ वर्षें केलें. त्यांच्या कारकीर्दीत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्त्या व विद्यार्थ्यांकडून होणारी परतफेड या दोनहि बाबतींत पुष्कळच प्रगति झाली. ब्रा. वि. स. मंडळ ब्रा. सभेंत विलीन झाल्यामुळें मंडळाच्या हेतुपूर्तीविषयीं कांहीं लोकांच्या मनांत जी साशंकता निर्माण झाली होती ती हळुहळू कमी होऊं लागली. १९२८-२९ या वर्षीं या शाखेचे कार्यवाह म्हणून प्रा. ह. दा. वेलणकर यांची निवड झाली. प्रा. वेलणकर यांचें विद्यार्थिवर्गावर अतिशय प्रेम असे आणि विद्यार्थ्यांच्या गरजांचीहि त्यांना पुरेपूर जाणीव असे. तसेंच, विद्यार्थ्यांत असणाऱ्या दोषांचीहि त्यांना अचूक माहिती असल्यामुळें शिष्यवृत्त्या देतांना व परतफेडीच्या वेळीं ते फार जागरूक असत.

ब्रा. वि. स. मंडळ विलीन झालें त्या वेळीं, १९१८ सालीं आपण रु. ४००० वर रक्कम जमवूं शकूं आणि तेवढे पैसे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यांच्या रूपानें देतां येतील असा मंडळाचा अंदाज होता. म्हणून दि. ९-६-१९१८ ला झालेल्या शिक्षणशाखेच्या सभेंत त्या वर्षीं रु. ४००० शिष्यवृत्त्यांकरितां खर्च करावे असें ठरलें. पण ब्रा. स. व्य. मं. नें रु. २००० च खर्च करावे असें ठरविलें व त्या वर्षाचा कार्यक्रम त्याप्रमाणें आंखण्यांत आला.

शिक्षणशाखेकडे प्रारंभीं अनेक सूचना आल्या. कांहींनीं चालू शिक्षणाचा पुरस्कार केला तर कांहींनीं धंदेशिक्षणाचें महत्त्व प्रतिपादिलें. कित्येक धार्मिक प्रवृत्तीच्या आश्रयदात्यांनीं वेदविद्येच्या अध्ययनाची शिफारस केली आणि कांहींनीं परदेशांत जाऊन विविध कलांचें ज्ञान संपादण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

या सर्व सूचनांचा व आपल्या हातीं असलेल्या निधीचा विचार करून व्यवस्थापक मंडळानें आपला आराखडा तयार केला.

शाखेनें केलेली कामगिरी

एकंदर ब्राह्मण समाजाची आर्थिक परिस्थिति व उच्च शिक्षण घेण्यास होणारा खर्च यांचा विचार करतांना कित्येक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आपलें विद्यार्जनाचें काम द्रव्याभावीं सोडून द्यावें लागतें असें व्य. मं. ला आढळून आलें. तेव्हां पहिल्या प्रथम उच्च शिक्षण घेणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनाच मदत करण्याचें व्य. मं. नें ठरविलें. त्याला अनुसरून आलेल्या अर्जांचा विचार करतांना शेंकडा ५५ पेक्षां कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना मदत करणें अशक्य ठरलें. शिष्यवृत्त्यांप्रीत्यर्थ आलेल्या अर्जांची कसोशीनें व निःपक्षपातीपणें छाननी करून योग्य त्या विद्यार्थ्यांना परतफेडीच्या अटीवर पुढीलप्रमाणें मदत देण्यांत आली :—

साल	विद्यार्थ्यांची संख्या	दिलेली मदत
१९१८–१९	३७	रु. ५९८३
१९२०–२१	४१	रु. ५४४९
१९२२–२३	३६	रु. ५५६९
१९२४–२५	४५	रु. ५७६४
१९२६–२७	५२	रु. ६४०३
१९२८–२९	५५	रु. ६३१२

मदतीचें चीज झालें

मदत दिलेल्या वरील विद्यार्थ्यांपैकीं १९२०–२१ सालीं अनुक्रमें श्री. पुरुषोत्तम अनंत तुळपुळे व श्री. विनायक अनंत गाडगीळ हे बी. ए. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. श्री. तुळपुळे यांना विल्सन कॉलेजांत फेलोशिप मिळाली व श्री. गाडगीळ यांना

त्याच कॉलेजांत दक्षिणा फेलोशिप मिळाली. १९२२–२३ या सालीं श्री. गोविंद बळवंत बापट व श्री. शंकर नीलकंठ जामदार हेहि बी. ए. च्या पहिल्या वर्गांत पास होऊन त्यांना अनुक्रमें सेंट झेविअर व जुनागड कॉलेजमध्यें फेलो नेमण्यांत आलें. श्री. बापट हे डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या विश्वभारती संस्थेमधून शिष्यवृत्ति संपादन करून शांतिनिकेतनांत एक वर्ष अभ्यास करून परत आले. श्री. विष्णु विठ्ठल ओक व श्री. अनंत केशव जोशी हे आपल्या स्वतःच्या हिंमतीवर–स्वावलंबनाच्या मार्गानें–अभ्यासासाठीं अमेरिकेला गेले. श्री. रामचंद्र परशुराम सबनीस अमेरिकेस गेले त्यावेळीं सभेनें त्यांस थोडी मदत केली होती.

यांपैकीं श्री. सबनीस हे तेथील एका विश्वविद्यालयांतून एम्. एस्सी. होऊन आले. श्री. गोडबोले यांनीं तेथें होमिओपथीचा अभ्यास सुरू केला. श्री. ओक हे कॅलिफोर्निया विश्वविद्यालयांतून एम्. ए. झाले. ऑरेगान विश्वविद्यालयांत संपादनशास्त्रांतील बी. एस्सी. ही पदवी त्यांनीं मिळविली व वूर्सेस्टर विश्वविद्यालयांतून ते पीएच्. डी. झाले. १९२२-२३ या द्विवार्षिक काळांत श्री. दत्तात्रय लक्ष्मण गोखले हे मुंबई विश्वविद्यालयाच्या एम्. ए. च्या परीक्षेंत तसेंच श्री. गणेश निळकंठ कात्रे हे एल्एल्. बी. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. श्री. विनायक अनंत गाडगीळ व श्री. गोविंद अनंत बापट हेहि एम्. ए. च्या परीक्षेंत दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले.

उच्च शिक्षणाप्रीत्यर्थ देण्यांत येणाऱ्या मदतीच्या वेळीं वाङ्मयीन शिक्षणापेक्षां औद्योगिक शिक्षणाकडे अधिक लक्ष दिलें जातें; आणि त्याला अनुसरून स्थापत्यशास्त्र, वैद्यकीय शास्त्र, व्यापारी शास्त्र संपादन करून तसेंच धंदेशिक्षणांत उच्च शिक्षण घेऊन आज स्वावलंबनानें चरितार्थ चालवीत असलेले त्यावेळचे अनेक विद्यार्थी दिसून येतील.

मध्यम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीहि स्थिति तितकीशी समाधानकारक होती असें नाहीं. पालकांची आर्थिक परिस्थिति अत्यंत बिकट असल्यामुळें कांहीं बालविद्यार्थ्यांना शिक्षण मिळणें अशक्य होत असल्याचें पाहून अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या मासिक फी इतकी रक्कम शिष्यवृत्ति म्हणून देण्याचा प्रघात सभेनें सुरू केला.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परतफेडीच्या अटीवर मदत करण्यांत येते. या अटीचा उद्देश उघड आहे. विद्यार्थीदशेनंतर तो मनुष्य मिळवता झाला आणि त्यानें स्वीकारलेल्या मदतीची परतफेड केली म्हणजे त्या रकमेचा उपयोग दुसऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठीं होतो आणि हें चक्र असेंच चालू रहातें.

एक नवा उपक्रम

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन मदत करण्याशिवाय आणखी एका प्रकारें त्यांना विद्यार्जनाच्या कामीं साहाय्य करण्याचा उपक्रम शिक्षणशाखेनें केला. या द्वादशवार्षिक काळाच्या प्रारंभीं मॅट्रिकच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं कांहीं विषयांपुरते रात्रींचे मोफत वर्ग सुरू करण्यांत आले. प्रा. पां. वा. काणे, प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर, श्री. वि. ग. गानू, श्री. वि. अ. गाडगीळ इत्यादि अनेक नामवंत गृहस्थ हे वर्ग चालवीत असत. वे. शा. सं. सेतुमाधवाचार्य गजेंद्रगडकर, वे. शा. सं. श्रीनिवासशास्त्री कूर्माचार्य कट्टी इ. पंडित संस्कृत विषयाचें अध्यापन करीत. या वर्गांत ब्राह्मण–ब्राह्मणेतर असा भेद केला जात नसे. कोणालाहि या वर्गांत दाखल होण्याची मुभा होती. या वर्गांचा लाभ विद्यार्थ्याप्रमाणेंच कांहीं विद्यार्थिनींनींहि घेतला.

धार्मिक शिक्षण

वरील प्रकारच्या शिक्षणकार्याबरोबरच वेदविद्येचें अध्ययन ब्राह्मणांनीं करणें आवश्यक आहे अशा अर्थाच्या आलेल्या सूचनेकडे

लक्ष पुरवून ब्रा. सभेच्या जागेंत व इतर ब्राह्मण वस्तींत, हें शिक्षण घेण्यासाठीं जेथें कमींत कमी १५ विद्यार्थी उपस्थित राहतील त्या ठिकाणीं, संध्या, पूजा, रुद्र वगैरे शिकविण्याची व्यवस्था सभेमार्फत करण्यांत आली. धार्मिक विषयांच्या शिक्षणाचा समाजांत जास्त प्रचार व्हावा म्हणून लहान मुलांकरितां असे कांहीं विषय ठेवून त्यांची परीक्षा श्रीगणेशोत्सव, श्रीशंकराचार्य जयंती अशा प्रसंगीं घेण्याचा प्रघात १९२१ सालीं सुरू करण्यांत आला. परीक्षेसाठीं रुद्र, अथर्वशीर्ष, त्रिसुपर्ण, गीतेंतील कांहीं अध्याय, मनाचे कांहीं श्लोक, बृहत्स्तोत्ररत्नाकरांतील कांहीं स्तोत्रें हे विशेष विषय म्हणून ठेवण्यांत येत. तसेंच, संध्या, देवपूजा यांचा अर्थ सांगणें हाहि एक विषय ठेवलेला होता. या परीक्षांचे वेळीं वे. शा. सं. गोविंदभटजी पराडकर, वे. शा. सं. फडके, इ. विद्वान वैदिक मंडळींनीं परीक्षक म्हणून काम केलें. या परीक्षेसाठीं विद्यार्थ्यांच्या वयाची मर्यादा 'अठरा वर्षांच्या आंत' अशी ठेवलेली होती. हा उपक्रम बराच यशस्वी ठरला. प्रारंभीं फक्त ४० विद्यार्थी या परीक्षेस बसले तर या बारा वर्षांच्या काळाच्या अखेरीला ही संख्या २०० पर्यंत गेली. स्त्रियांना शिवणकामाचें शिक्षण देण्याचा वर्गहि शिक्षणशाखेनें सुरू केला.

सांगलीचे सुप्रसिद्ध वैद्य श्री. ग. पां. परांजपे हे १९२६-२७ सालच्या गणेशोत्सवांत नमस्कारांचे प्रकार, त्यांची आवश्यकता आणि उपयुक्तता पटविण्यासाठीं मुंबईस आले होते. त्यांचीं ब्रा. सभेंत व्याख्यानें झालीं आणि तीं अत्यंत परिणामकारक ठरलीं. तेव्हां गणेशोत्सवांत नमस्कारांच्या चढाओढी ठेवून सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांस बक्षिसें देण्याचा उपक्रम सभेनें सुरू केला.

या बारा वर्षांच्या अखेरीला या शाखेजवळ कायम निधि म्हणून रु. १०७५५-७-७ एवढी रक्कम होती. विद्यार्थ्यांकडून परतफेडीच्या

रूपानें रु. १७५४६-१-६ इतकी रक्कम जमा झाली होती व नियमाप्रमाणें ब्रा. सभेकडून रु. १२०१०-७-८ चालू खर्चाप्रीत्यर्थ शाखेला मिळालेले होते.

या बारा वर्षांत ब्रा. सभेच्या शिक्षण शाखेनें जें कार्य केलें त्याकडे पाहतां ब्रा. वि. स. मं. नें जे जे उपक्रम प्रत्यक्ष सुरू केले होते ते ते सर्व यशस्वी रीतीनें पुढें चालू राहिले इतकेंच नव्हे तर बाल विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें ज्या गोष्टी करणें हितावह वाटलें त्यांपैकीं बऱ्याच गोष्टी करण्यांत आल्या असेंच दिसून येतें.

(६) उत्सव–समारंभ शाखा

१९१८ ते १९२९

सर्व समाजास ब्राह्मण सभेची माहिती व्हावी, ब्राह्मण वर्गाला त्याच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, ब्राह्मणांत जागृति व्हावी, अशा हेतूंनीं ब्रा. सभेनें उत्सवसमारंभ समिति स्थापन केली. या समितीनें प्रथमच गांधर्व महाविद्यालयाच्या श्रीराम चौकांत वर्षप्रतिपदेच्या उत्सवानिमित्त दि. ११–४–१९१८ ला प्रो. शिवराम महादेव परांजपे यांचें 'ब्राह्मणांनीं आज कसें वागावें?' या विषयावर डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान करविलें. संयुक्त ब्रा. सभेच्या स्थापनेनंतर हें पहिलेंच व्याख्यान होय. व्याख्यात्यांना हा विषय मुद्दामच देण्यांत आला होता. ब्रा. सभेचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. नानासाहेब देशमुख यांनीं आपण व्याख्यात्यांच्या विचारांशीं पूर्णपणें सहमत असल्याचें सांगितलें आणि ब्रा. सभेनेंहि अशाच प्रकारचा उद्देश पुढें ठेवून आपलें धोरण आंखलें असल्याची ग्वाही दिली. म्हणून दे. भ. शिवरामपंत परांजपे यांच्या त्या भाषणाचा गोषवारा येथें दिल्यास तें अप्रस्तुत खास होणार नाहीं.

दे. भ. शिवरामपंतांचें व्याख्यान

"जातिभेद बरा असो वा वाईट असो, तो मोडावा असें पुष्कळ लोक बोलतात. वर्णभेद व जातिभेद वेदकालापासून आपण ऐकतों.

परंतु आतांप्रमाणें जातिभेदांचा तीव्रपणा पूर्वी केव्हांहि भासत नव्हता. जैन व बौद्धधर्मीय राजे या देशांत होऊन गेले. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन मुसलमान मक्केहून निघाले. त्यांनीं अनेक हिंदूंना बाटवून मुसलमान धर्माची दीक्षा दिली पण हिंदूंच्या जातींत वैमनस्य पाडलें नाहीं. पेशवे हे ब्राह्मण होते, ते राजे नव्हते पण राज्यकर्ते होते. ब्राह्मणांनीं आपल्या कर्तव्याला जागलें पाहिजे. त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग देशाच्या कल्याणार्थ झाला पाहिजे. पूर्वकाळच्या ऋषींनीं जे अमोल धर्मग्रंथ लिहून ठेवले त्यांचें ज्ञान सर्व जगाला करून देणें हें ब्राह्मणांचें कर्तव्य होय. अस्पृश्य वर्गाला वर आणणें हें ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. ब्राह्मणांनीं स्वतः अस्पृश्य बनावयाचें नाहीं पण अस्पृश्यांना ब्राह्मण करणें हें खऱ्या व तेजस्वी ब्राह्मणाचें कर्तव्य होय. परिस्थित्यनुरूप कार्याचें धोरण ठेवलें पाहिजे. क्षमाशीलता हा गुण ब्राह्मणांत असला पाहिजे आणि या गुणाच्या योगानेंच जातीजातींतील द्वेष नाहींसे केले पाहिजेत. क्षमाशीलतेनें द्वेषाग्नि नाहींसा होऊन त्याची जागा प्रेमभाव घेतो. राष्ट्रांतील संघशक्ति मोडेल असें कोणतेंहि काम ब्राह्मणांनीं करूं नये. ब्राह्मणाचें ध्येय व वासना हीं कधींहि हलक्या प्रतीचीं असतां कामा नयेत. आपली बुद्धिमत्ता सत्कार्याकरितां व परोपकार करण्यांत खर्च केली पाहिजे."

दे. भ. शिवरामपंत परांजपे यांच्या व्याख्यानाच्या वरील गोषवाऱ्यावरून ब्रा. सभेचें ध्येय व धोरण यांची कोणालाहि पूर्ण कल्पना येईल.

समारंभाच्या जागा

ब्रा. सभेच्या या शाखेमार्फत श्रीशंकराचार्य जयंती व श्रीगणेशोत्सव करण्याचें ठरलें. मुंबईंत येणाऱ्या विद्वान लोकांना मुद्दाम निमंत्रण करून त्यांचे विचार लोकांना समजावे म्हणून त्यांचीं व्याख्यानें करण्यांत येत. तसेंच, अशा उत्सवांतून प्रवचनें नि कीर्तनेंहि होत.

श्रीशंकराचार्य जयंतीनिमित्त प्रो. महादेव मल्हार जोशी यांचें सांख्य व वेदान्त या विषयावर व्याख्यान झालें. पहिल्या वर्षाचा गणेशोत्सव ठाकूरद्वार येथें गिरगांव रस्त्यावर असलेल्या सभेच्या लहानशा जागेंतच झाला. प्रसिद्ध वक्त्यांच्या व्याख्यानप्रसंगीं व सुप्रसिद्ध गवई गायनाचार्य भास्करबुवा बखले यांच्या गायनाच्या कार्यक्रमाच्या वेळीं अतिशय गर्दी झाली आणि त्यामुळें झालेली गैरसोय लक्षांत घेऊन पुढील दोन वर्षें हा उत्सव सभेनें वाडेकर बिल्डिंगमधील चवथ्या मजल्यावरील प्रशस्त दिवाणखान्यांत साजरा केला. पण ही जागाहि अपुरी पडूं लागल्यामुळें त्यापुढील दोन वर्षें हा उत्सवसमारंभ गांधर्व महाविद्यालयाच्या श्रीराम सभागृह या प्रशस्त दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. त्यानंतरचीं तीन वर्षें हे समारंभ खत्तरआळी-तील मुरारबागेंत झाले व त्यानंतर हे उत्सव स्वतःच्या जागेंत कर-ण्याचें भाग्य सभेला लाभलें. या उत्सवसमारंभाप्रीत्यर्थ व्याख्यात्यांची व विषयांची निवड करतांना कोणत्याहि प्रकारचा पंक्तिप्रपंच सभेकडून केला जात नसे.

भास्करबुवांची लोकप्रियता

श्रीगणेशोत्सवांतील अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम म्हणजे गायनाचार्य श्री. भास्करबुवा बखले यांच्या गायनाचा होय. सभेबद्दलची बुवांची आपलेपणाची भावना आणि सभेंतील श्रोत्यांचें बुवांवरील प्रेम या दोन्ही गोष्टी एकत्र झाल्यामुळें, बुवांच्या गायनाच्या कार्यक्रमाशिवाय गणेशोत्सव साजरा करणें ही गोष्ट लोकांना बरी वाटेनाशी झाली. बुवासाहेब कोठेंहि असोत, ब्रा. सभेचें निमंत्रण त्यांना आगाऊ मिळालेलें असो किंवा नसो, ते अनंतचतुर्दशीच्या आदल्या दिवशीं ब्रा. सभेच्या गणेशोत्सवाच्या जागीं येत आणि आपल्या गायनाचा कार्यक्रम करीत. एकदां तर ते काश्मीरसारख्या अतिशय दूर प्रांतांत

असतांना या कार्यक्रमासाठीं मुद्दाम मुंबईस आले आणि हा कार्यक्रम आटोपून पुन्हां काश्मीरला परत गेले. बुवांच्या पश्चात् त्यांचेच पट्टशिष्य मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या गायनाचे कार्यक्रम ब्रा. सभेच्या बहुतेक गणेशोत्सवांत होत असतात व त्यांनींहि कमालीची लोकप्रियता मिळविलेली दिसून येते.

व्याख्याते

या उत्सवांतून होणाऱ्या व्याख्यानांच्या प्रसंगीं सभेनें नेहमींच संग्राहक बुद्धि दाखविलेली दिसून येते. निरनिराळ्या विचारसरणीच्या व्याख्यात्यांनीं अशा प्रसंगीं व्याख्यानें दिलेलीं आहेत हें पुढील यादीवरून सहज लक्षांत येईल. रावबहादुर चिंतामण विनायक वैद्य, श्री. शिवराम महादेव परांजपे, श्री. सीताराम केशव दामले, श्री. बाळ गंगाधर खेर, श्री. शंकर श्रीकृष्ण देव, श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, वीर वामनराव जोशी, श्री. नर्मदाशंकर देवशंकर मेहता, बॅ. बाबासाहेब जयकर, प्रो. पांडुरंग वामन काणे, प्रो. वामन मल्हार जोशी, प्रा. दत्तो वामन पोतदार, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, प्रा. श्रीपाद महादेव माटे, प्रो. रा. द. रानडे, प्रो. विश्वनाथ बळवंत नाईक, श्री. ज. स. करंदीकर, श्री. नरसिंह चिंतामण केळकर, श्री. जम्नादास मेहता, पंडित मदनमोहन मालवीय, पं. दिनकरशास्त्री कानडे, डॉ. दि. स. सरदेसाई, गुरुवर्य श्री. धोंडो केशव कर्वे, रावबहादुर सी. के. बोले, रँगलर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे, श्री. स. ल. सिलम, श्री. नारायणराव बामणगांवकर, श्रीजगद्गुरु श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, श्री. रंगाचार्य शास्त्री रड्डी, श्री. लक्ष्मणशास्त्री लेले, श्री. महादेवशास्त्री दिवेकर, श्री. नारायणशास्त्री मराठे, विद्यावाचस्पति श्री. सदाशिवशास्त्री भिडे, श्री. दादासाहेब करंदीकर, वेदान्तवागीश श्री. श्रीधरशास्त्री पाठक इ. इ.

केवळ स्त्रियांसाठीं म्हणून स्वतंत्र असे कार्यक्रम करण्याची प्रथा ब्रा. सभेनें टेवली होती. त्या प्रसंगीं पुढील स्त्रियांचीं व्याख्यानें झाल्याचें दिसून येतें. श्री. सौ. सरोजिनी नायडू, सौ. अवंतिकाबाई गोखले, सौ. गिरिजाबाई केळकर, श्रीमती कमलाबाई देशपांडे, श्रीमती सौ. कमला नेहरू, सौ. डॉ. इंदुमती नाईक, श्री. सौ. चंद्रकलाबाई हाटे, कु. मथुराबाई केतकर, सौ. सरस्वतीबाई गाडगीळ, सौ. यमुनाबाई हिर्लेकर, कु. बाळूताई खरे, कु. कृष्णाबाई खरे, इ. इ.

पहिल्या दोन वर्षांत श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी व श्रीद्वारकामठाधीश श्रीशंकराचार्य या थोर विभूतींनीं ब्रा. सभेस दर्शन दिलें. त्या वेळचा सर्वांचा उत्साह आणि या दोन विभूतींचीं त्या वेळीं झालेलीं भाषणें ब्रा. सभेच्या स्मरणांतून कधींहि जाणार नाहींत.

१९२२–२३ या वर्षीं श्रीमंत राजेसाहेब बाळासाहेब पंतप्रतिनिधि व श्री. शंकरराव किर्लोस्कर यांना पानसुपारी देण्याचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला. त्या प्रसंगीं त्या दोघांनीं समयोचित अशीं भाषणें करून ब्राह्मण समाजाला अतिशय कळकळीचा उपदेश केला.

श्री. केळकर व श्री. खाडीलकर

१९२३ सालीं ब्राह्मण सभेंतील सर्व कार्यकर्त्यांचें दि. ७ व ८ एप्रिलला खत्तर आळींतील मुरारबागेंत एक स्नेहसंमेलन भरविण्यांत आलें. केसरी पत्राचे संपादक श्री. नरसिंह चिंतामण केळकर व नवाकाळचे संपादक श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर हे सभेच्या निमंत्रणास मान देऊन सदर संमेलनास उपस्थित राहिले होते. ब्राह्मण सभेकडून होत असलेल्यीं कामें व परिस्थितीला अनुसरून सभेनें हातीं घेण्याचीं कार्यें यांसंबंधीं सदर प्रसंगीं विचारविनिमय झाला आणि त्या वेळीं या दोन्ही सन्मान्य पाहुण्यांनीं आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा

लाभ सभेस दिला. सभेच्या कार्याच्या प्रगतीच्या दृष्टीनें या संमेलनाचा फार मोठा उपयोग झाला. त्या प्रसंगाचें एक छायाचित्रहि घेण्यांत आलें.

सत्कार समारंभ

१९२६–२७ या द्विवार्षिक काळांत ग्रँट मेडिकल कॉलेजच्या डीनच्या जागीं डॉ. नाडगीर यांची नेमणूक झाल्याबद्दल सभेनें त्यांचें अभिनंदन केलें. तसेंच, प्रो. डी. बी. देवधर यांच्या नेतृत्वाखालीं हिंदु खेळाडूंनीं जो पराक्रम गाजविला त्याबद्दल त्या सर्व खेळाडूंचा सभेमार्फत सन्मान करण्यांत आला व त्या प्रसंगीं प्रो. देवधर यांना क्रिकेटची बॅट अर्पण करण्यांत आली. श्री. रामचंद्र हरि लिमये हे सँढर्स्ट कॉलेजांत लष्करी शिक्षण घेण्याच्या बाबतींत निवडून आल्याबद्दल त्यांचें व कॅ. अच्युत दामोदर पटवर्धन वैमानिक यांचें ब्राह्मण तरुणांना कर्तृत्वाचें एक नवीन दालन दाखवून दिल्याबद्दल सभेनें अभिनंदन केलें. प्रा. ग. स. महाजनी यांनीं गणित विषयांत विलायतेंत 'स्मिथ प्राइझ' मिळविलें त्याबद्दल प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. हा विक्रम हिंदुस्थानांत एकदोनच विद्यार्थ्यांकडून घडला आहे.

श्रीमंत सरदार बाबासाहेब इचलकरंजीकर, श्रीमंत सरकार सर गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन अधिपति संस्थान मिरज, श्रीमंत सरदार विनायक धुंडिराज ऊर्फ बाबासाहेब बिवलकर, श्रीमंत सरकार रामराव व्यंकटराव भावे रामदुर्गचे अधिपति, श्रीमंत सरकार रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासाहेब पंतसचिव संस्थान भोर आणि नामदार श्रीपाद बळवंत तांबे या थोर गृहस्थांनीं ब्रा. सभेस भेट दिली व त्यावेळीं त्यांचा यथोचित सत्कार करण्यांत आला.

सन १९२८–२९ या दोन वर्षांत श्रीमंत आबासाहेब पंतप्रतिनिधि संस्थान विशाळगड, श्रीमंत सरदार मुतालिक व श्री. जगन्नाथ महा-

राज यांनीं ब्रा. सभेच्या विनंतीस मान देऊन सभेस भेट दिली व त्यावेळीं त्यांचा यथोचित सत्कार करण्यांत आला. याच दोन वर्षांत ब्रा. सभेच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखे दोन संस्मरणीय प्रसंग घडले. यापैकीं पहिला प्रसंग म्हणजे नेक नामदार श्री. श्रीनिवास शास्त्री यांनीं सभेस भेट देऊन केलेलें उत्कृष्ट भाषण. दुसरा प्रसंग म्हणजे प्रातःस्मरणीय पं. मदनमोहन मालवीय हे मुंबईस आलेले असतांना विविध कार्यक्रमांच्या गर्दीत असूनहि ब्रा. सभेच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं सभेला भेट दिली तेव्हांचा ! त्या वेळीं सभेनें त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत केलें. त्या प्रसंगीं पंडितजींनीं 'ब्राह्मणांचीं सद्यःकालीन कर्तव्यें' या विषयावर आपल्या अधिकारवाणीनें एक तास भाषण केलें. या दोन वर्षांत देवासचे महाराज, राजा धनराजगीरजी, श्रीमंत वामनराव नाईक आणि श्रीदत्तभक्त नारायण महाराज केडगांवकर यांनीं सभेस भेट देऊन त्यांच्याबद्दल वाटत असलेला आदर व्यक्त करण्याची सभेला संधि दिली.

ब्रा. सभेकडून होत असलेल्या कार्यक्रमांची विविधता या माहितीवरून कळून येईल. या कार्यक्रमांच्या योगानें मुंबईतील व मुंबईबाहेरच्या ब्राह्मण समाजांत ब्रा. सभेनें एक आदराचें स्थान मिळविलें.

संयुक्त जलसा

ब्रा. सभेनें श्रीशंकरवाडी खरेदी केल्यानंतर गंधर्व नाटक मंडळीचे मालक श्री. नारायण श्रीपाद राजहंस तथा बालगंधर्व यांच्याकडे इमारतनिधीच्या मदतीकरितां सभेनें मागणी केली व त्यांनीं ती उदार मनानें मान्य केली. सोलापूरहून आपल्याबरोबर मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, श्री. विनायकबुवा पटवर्धन व श्री. माधवराव वालावलकर या गायकांना त्यांनीं मुंबईस आणलें व दि. ४–७–२९ ला येथील बालीवाला ग्रँड थिएटरांत गायनाचा संयुक्त जलसा करून जलशाचें सर्व उत्पन्न

रु. ३३७४–८–० सभेस दिलें. हा जलशाचा कार्यक्रम फारच चांगला झाला होता.

अनावरण समारंभ

सन १९२०–२१ या काळांत राष्ट्रसूत्रधार लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ ब्रा. सभेनें डॉ. नाना-साहेब देशमुख यांच्या हस्तें केला होता.

विलेपार्ले येथील कै. न्यायमूर्ति रानडे यांचे भाचे श्री. बाबूराव ठोसर यांनीं न्यायमूर्तींचें तैलचित्र ब्रा. सभेस अर्पण केलें व त्याचा अनावरण-समारंभ गोखले सभागृहांत दे. भ. न. चिं. केळकर यांच्या हस्तें करण्यांत आला.

कार्यकर्त्या भगिनी

श्रीगणेशोत्सवाच्या प्रसंगीं केवळ स्त्रियांसाठीं म्हणून कांहीं कार्यक्रम असत. त्याचप्रमाणें या उत्सवांत स्वतंत्र वर्गणी ठेवून महाप्रसादाचा कार्यक्रम करण्यांत येत असे. शिवाय वासंतिक हळदीकुंकूं इ. स्त्रियांचे कार्यक्रमहि असत. असल्या सर्व कार्यक्रमांची व्यवस्था कांहीं भगिनीच अत्यंत परिश्रमपूर्वक व नियमितपणें करीत असत. अशा भगिनीवर्गांत सौ. गंगाबाई काणे, सौ. सत्यभामाबाई वैद्य, सौ. जानकीबाई साठे, सौ. राधाबाई केळकर, सौ. इंदिराबाई लिमये, सौ. अन्नपूर्णाबाई पुणतांबेकर, सौ. मथुराबाई बर्वे, सौ. पार्वतीबाई नामजोशी, सौ. इंदिराबाई गुळवणे इ. भगिनी प्रामुख्यानें असत.

श्री. साळवेकरांचें साहाय्य

ब्रा. सभेच्या विनंतीस मान देऊन बाहेरगांवचे सुप्रसिद्ध व्याख्याते मुंबईस येत पण येथें आल्यानंतर त्यांच्या रहाण्याची वगैरे व्यवस्था

करण्याची ब्रा. सभेस पंचाईत पडे. पण सरदारगृहाचे मालक श्रीमंत तात्यासाहेब साळवेकर यांनीं अशा पाहुण्यांची सर्व व्यवस्था विनामूल्य करण्याचें आश्वासन देऊन तें अखेरपर्यंत पाळलें इतकेंच नव्हे तर कित्येकदां या पाहुण्यांच्या दिमतीला आपली मोटारहि दिली व सभेची ही एक मोठी अडचण दूर झाली.

(७) अस्पृश्यता–निवारण

पंचद्रविडांतील पोटजातींतील एकीकरणासंबंधीं मतपरिवर्तनाच्या द्वारां कार्य करण्याचें ब्रा. सभेचें धोरण होतें. तसेंच, अस्पृश्यता-निवारणाचें आपलें ध्येयहि अशाच मार्गानें साध्य करण्याचा सभेचा हेतु होता. याच दृष्टीनें अधिकारी व्यक्तींचीं या विषयावरील व्याख्यानें सभेमार्फत झालेलीं आहेत. कोणत्याहि बाबतींत समाजावर जबरदस्ती न करतां त्याचें मतपरिवर्तन करूनच कार्यभाग साधला तर अधिक श्रेयस्कर असेंच ब्रा. सभेचें निश्चित धोरण होतें.

अस्पृश्य मेळा

अस्पृश्य मानल्या गेलेल्या मुलांसाठीं कुमार विनय मंदिर या नांवाची शाळा माटुंगा येथें होती. त्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. विश्वनाथ गोपाळ शेटये यांनीं या शाळेंतील मुलांचा एक मेळा तयार केला. सन १९२७ च्या श्रीगणेशोत्सवांत या मेळयाचा एक कार्यक्रम ठेवावा अशीं पत्रें त्यांनीं सार्वजनिक गणेशोत्सवांच्या कार्यकर्त्यांस पाठविलीं. त्याप्रमाणें दि. ११ ऑगस्ट १९२७ चें एक पत्र ब्रा. सभेस आलें. निदान अहिंदूंना ज्या जागेपर्यंत जाऊं दिलें जातें तेथपर्यंत तरी या मेळ्याला जाऊं देण्यांत यावें आणि पत्राचें उत्तर न आल्यास ती संमति आहे असें समजून श्रीगजाननाच्या मूर्तीपुढें

करण्याची ब्रा. सभेस पंचाईत पडे. पण सरदारगृहाचे मालक श्रीमंत तात्यासाहेब साळवेकर यांनीं अशा पाहुण्यांची सर्व व्यवस्था विनामूल्य करण्याचें आश्वासन देऊन तें अखेरपर्यंत पाळलें इतकेंच नव्हे तर कित्येकदां या पाहुण्यांच्या दिमतीला आपली मोटारहि दिली व सभेची ही एक मोठी अडचण दूर झाली.

(७) अस्पृश्यता–निवारण

पंचद्रविडांतील पोटजातींतील एकीकरणासंबंधीं मतपरिवर्तनाच्या द्वारां कार्य करण्याचें ब्रा. सभेचें धोरण होतें. तसेंच, अस्पृश्यता-निवारणाचें आपलें ध्येयहि अशाच मार्गानें साध्य करण्याचा सभेचा हेतु होता. याच दृष्टीनें अधिकारी व्यक्तींचीं या विषयावरील व्याख्यानें सभेमार्फत झालेलीं आहेत. कोणत्याहि बाबतींत समाजावर जबरदस्ती न करतां त्याचें मतपरिवर्तन करूनच कार्यभाग साधला तर अधिक श्रेयस्कर असेंच ब्रा. सभेचें निश्चित धोरण होतें.

अस्पृश्य मेळा

अस्पृश्य मानल्या गेलेल्या मुलांसाठीं कुमार विनय मंदिर या नांवाची शाळा माटुंगा येथें होती. त्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. विश्वनाथ गोपाळ शेटये यांनीं या शाळेंतील मुलांचा एक मेळा तयार केला. सन १९२७ च्या श्रीगणेशोत्सवांत या मेळ्याचा एक कार्यक्रम ठेवावा अशीं पत्रें त्यांनीं सार्वजनिक गणेशोत्सवांच्या कार्यकर्त्यांस पाठविलीं. त्याप्रमाणें दि. ११ ऑगस्ट १९२७ चें एक पत्र ब्रा. सभेस आलें. निदान अहिंदूंना ज्या जागेपर्यंत जाऊं दिलें जातें तेथपर्यंत तरी या मेळ्याला जाऊं देण्यांत यावें आणि पत्राचें उत्तर न आल्यास ती संमति आहे असें समजून श्रीगजाननाच्या मूर्तीपुढें

हजेरी देण्यास मेळा येईल असें त्या पत्रांत म्हटलें होतें. हा प्रश्न साधारण समेच्या अनुमतीनें सोडवावा असें व्य. मं. नें ठरविलें. त्याप्रमाणें दि. २८ ऑगस्ट १९२७ ला सभेचे उपाध्यक्ष श्री. माधव वामन भट यांच्या अध्यक्षतेखालीं साधारण सभा घेण्यांत आली. अस्पृश्य मेळ्याला सभागृहांत येऊं द्यावें कीं नाहीं या विषयावर दोन्ही पक्षांतील निवडक वक्त्यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं अनुकूल व प्रतिकूल मतें अजमावून अस्पृश्य मेळ्यास सभागृहांत येऊं द्यावें या मताचा प्रचंड बहुमतानें विजय झाल्याचें जाहीर केलें. या प्रस्तावाची अंमलबजावणी होण्यापूर्वी सर्व सभासदांना सभागृहांत जागा मिळाली नाहीं, सभासद कोण आहेत व कोण नाहींत याची नीटशी छाननी करण्यांत आलेली नव्हती, इत्यादि कारणें देऊन दि. २८ ऑगस्ट १९२७ च्या सभेंत पसार झालेल्या प्रस्तावाचा फेरविचार करण्यांत यावा अशा अर्थाचें शंभराहून अधिक स्वाक्षऱ्यांचें पत्र व्य. मं. च्या अध्यक्षांकडे आलें. त्या पत्राप्रमाणें दि. ९ सप्टेंबरला पुन्हा जादा साधारण सभा भरविण्यांत आली. ह्या मधल्या काळांत अशी लेखी मागणी करणारांपैकीं एक श्री. नारायण बाबाचार्य काळे, व श्री. वासुदेव वामन परचुरे यांनीं दि. ३–९–२७ ला ब्रा. स. व्य. मं. चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, दोन चिटणीस व दोन सभासद यांच्या विरुद्ध मुंबई हायकोर्टांत फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादी अर्जांत अस्पृश्य मेळा सभागृहांत येऊं देणें सभेच्या उद्देशांस धरून नाहीं, त्या योगानें ब्राह्मण समाजांतील व्यक्तींच्या धार्मिक भावना दुखविल्या जाणार आहेत, इ. तक्रारी करून तशा अर्थाचा ठराव पुन्हा बोलावलेल्या साधारण सभेंत पास न करण्याबद्दल कोर्टानें हुकूम व ताकीद द्यावी अशी विनंती करण्यांत आली होती. ताकिदीचा प्रश्न अत्यंत जरुरीचा म्हणून न्या. मू. माडगांवकर यांनीं दि. ७-९-२७ ला दोन्ही बाजूचें म्हणणें ऐकून अशी ताकीद देण्याचें नाकारलें. पूर्वी ठरल्या-

प्रमाणें दि. ९ सप्टेंबरला रामबागेंत साधारण सभा भरली. अध्यक्ष-स्थानीं डॉ. वि. ना. भाजेकर यांची योजना झाली होती. त्या सभेंत अध्यक्षांनीं एक तडजोडीचा ठराव मांडला. तो ठराव असाः–' कुमार विनय मंदिर मेळ्यास शंकरवाडीच्या अंगणांत बोलवावें. कार्यक्रम झाल्यावर मेळ्यांतील मुलांस गॅलरींतून श्रीगजाननाचें दर्शन करवावें व प्रसाद द्यावा. '

अस्पृश्य मेळ्यास प्रसाद

या तडजोडीच्या ठरावावर अनुकूल प्रतिकूल भाषणें झाल्यावर मतें देण्याच्या व मतें मोजण्याच्या कामीं गोंधळ झाला आणि अध्यक्षांनीं सभा बरखास्त केली. व्य. मं. चे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब काणे यांनीं व्य. मं. ची तांतडीची सभा बोलावली. वरील तडजोडीच्या ठरावाप्रमाणें करण्याचा सर्वाधिकार श्री. काणे यांस देण्यांत आला. त्याप्रमाणें मेळ्यांतील मुलांस श्रीगजाननाचें दर्शन घडविण्यांत येऊन त्यांना प्रसाद देण्यांत आला. येथेंच या अंकाचा पडदा पडावयास पाहिजे होता पण तसें झालें नाहीं.

पुराणमतवादी आणि प्रागतिक या दोन्ही टोंकांच्या पक्षांहून निराळी दृष्टि ठेवून निःस्पृहपणें कार्य करणें आणि अस्पृश्य मेळ्यास ब्रा. सभेंत बोलवावें कीं काय, अशांसारखे विवादक प्रश्न ब्रा. सभेच्या कार्यांत उपस्थित होऊं न देणें अशा उद्देशानें १९२८ च्या मे महिन्यांत 'ब्राह्मणसभा मध्यवर्ति मंडळ' म्हणून एक संस्था स्थापन झाली. या संस्थेनें मध्यवर्ति मंडळ असें सोज्वळ नांव धारण केलें असलें तरी वर दिलेल्या तिच्या उद्देशाकडे पाहातां ती पुराणमतवाद्यांची पुरस्कर्ती होती हें स्पष्ट होतें. आपलीं खासगी भांडणें व उखाळ्या-पाखाळ्या यांस वर्तमानपत्रांतून प्रसिद्धि मिळावी हें अनिष्ट आहे असें मत प्रतिपादून या मंडळानें हस्तपत्रकें काढून व वर्तमानपत्रांतूनहि

आपल्या उद्देशाचा प्रचार चालविला. तेव्हां व्य. मं. लाहि नाइलाजानें त्याला उत्तर देणें भाग पडलें. दि. १५–९–२८ ला व्य. मं. च्या अध्यक्षांनीं एक हस्तपत्रक प्रसिद्ध केलें आणि मध्यवर्ति मंडळाकडून हेंच धोरण चालविलें गेल्यास समाजांत जूट घडवून आणण्याचे त्याचे प्रयत्न फुकट जाऊन फूट मात्र पडण्याचा संभव आहे असें त्या मंडळास बजावलें आणि अशा फुटीचा परिणाम ब्रा. सभेच्या व समाजाच्या दृष्टीनें अनिष्ट होईल हेंहि त्यांच्या निदर्शनास आणलें.

ब्राह्मण सभेला धाक

दि. १९–१२–२८ ला "नाक दाबा म्हणजे तोंड उघडेल" अशा अर्थाचें एक पत्र प्रसिद्ध झालें. त्यावेळीं शंकरवाडीच्या पिछाडीला एक इमारत बांधण्याचें काम चालू असून त्यासाठीं देणग्या मिळविण्याची खटपट चालू होती. महार मेळ्याचें आगमन हें सभेच्या वाढत्या झाडास लागलेलें बांडगूळ आहे व हें तोडलें तरच वृक्षाची वाढ होईल असें प्रतिपादन त्या पत्रांत केलेलें होतें—म्हणजेच पर्यायानें ब्रा. सभेनें आपलें मतपरिवर्तनाचें काम सोडून द्यावें असा धाक घातलेला होता !

ब्रा. सभेला किती अडचणींतून आपला मार्ग काढावा लागला व आपलें मतपरिवर्तनाचें काम किती सावधगिरीनें करावें लागलें याची कल्पना येण्यासाठींच या गोष्टींचा उल्लेख वर केला आहे.

दि. १४-९.२९ च्या व्य. मं. च्या सभेंत त्या सालींहि कुमार विनय मंदिर मेळ्याला बोलावण्यांत यावें व त्यांचा कार्यक्रम झाल्यावर त्यांना प्रसाद देण्यांत यावा असा प्रस्ताव फार मोठ्या बहुमतानें पसार झाला होता.

श्रीशंकराचार्यांकडे तक्रार

सन १९२७ च्या श्रीगणेशोत्सवांत कुमार विनय मंदिर मेळ्याच्या कार्यक्रमाच्या वेळीं वादविवादाचा जो धुरळा उडाला होता तो शांत



साळवेकर व्यायाम शाळेंतील शिक्षक व छात्रवर्ग

म्हसकर सूतिकागृहांतिल सेविका

होतो न होतो तोंच ब्रा. स. व्य. मं. स आणखी एका प्रसंगाला तोंड देण्याची वेळ आली. एका ब्राह्मण जोडप्यानें दोन मुली झाल्यानंतर ख्रिश्चन धर्म स्वीकारला. सुमारें १५ वर्षें त्या धर्मांत राहिल्यावर उपरति होऊन शुद्धिसमारंभानें तें कुटुंब पुन्हा हिंदुधर्मांत आलें. त्यानंतर त्यांच्या एका मुलीचा विवाह विलेपार्ले येथील एका ब्राह्मण गृहस्थाशीं झाला. विवाहानंतर श्रीसत्यनारायणाची पूजा झाली त्या वेळीं तेथील बरीच ब्राह्मण मंडळी तीर्थप्रसादास गेली. कांहीं गृहस्थांनीं हें त्यांचें कृत्य बहिष्काराई आहे अशा अर्थाचा श्रीशंकराचार्य (संकेश्वर मठ) यांच्याकडे अर्ज केला. याप्रमाणेंच अस्पृश्य मेळ्याविषयींचीहि तक्रार श्रींच्याकडे गेलेली असल्यामुळें या गोष्टींची चौकशी करण्यासाठीं श्रींची स्वारी मुंबईस आली.

श्रीशंकरवाडीच्या जागेंत अस्पृश्य मेळा येऊन गेला असल्यामुळें तें गृह शुद्ध करून घेतल्याखेरीज श्रींनीं तेथें वास्तव्य करूं नये व त्या जागीं पाद्यपूजा स्वीकारूं नये असा कांहीं मंडळींनीं त्यांस सल्ला दिला.

ब्राह्मणसभा स्वाभिमानास जागली

श्रीमच्छंकराचार्यांच्या आशीर्वादानें श्रीशंकरवाडी निधि जमविण्याचा प्रयत्न १९१३ सालीं झाला. ब्रा. सभेनेंहि कृतज्ञताबुद्धि ठेवून ब्रा. सभेच्या इमारतीस 'महाजनवाडी' न म्हणतां 'श्रीशंकरवाडी' हें नांव दिलें. त्यानंतर श्रींचें मुंबईस हें प्रथमच आगमन झालें होतें. तेव्हां त्यांनीं आपलें वास्तव्य श्रीशंकरवाडींतच करावें अशी ब्रा. सभेची साहजिकच इच्छा होती. पण आग्रही मंडळीच्या भिडेखातर जागा शुद्ध करून घेण्याकरितां चालविलेल्या दुरभिमानासाठीं आपलें प्रामाणिक मत बाजूला ठेवावें असें ब्रा. स. व्य. मं. ला वाटलें नाहीं. श्रींच्या समवेत आलेल्या म. म. अनंत कृष्ण व म. म. राजेश्वरशास्त्री

द्रविड यांच्यासारख्या त्रिखंड पंडितांचाहि सत्कार करावा असें व्य. मं. स वाटत होतें. पण या पंडितश्रेष्ठांनीं या आग्रही मताप्रमाणेंच वागण्याचें ठरविलें. या कारणांमुळें श्रीशंकरवाडी गृह अपवित्र झालें असें म्हणण्याची श्रीशंकराचार्यांना संधीच देऊं नये म्हणून ब्रा. सभेच्या निमंत्रणाचा त्यांच्याकडून स्वीकार होईल अशी खात्री होईपर्यंत व्य. मं. नें श्रींस रीतसर निमंत्रण देऊंच नये असें ठरलें आणि अत्यंत परिश्रमानंतर ब्रा. सभेचें स्वतःचें गृह झालेलें असतांना सभेमार्फतची पाद्यपूजा अन्य ठिकाणीं जाऊन करण्यांत येऊं नये असें दि. १८-१-१९२८ च्या व्य. मं. च्या सभेंत ठरविण्यांत आलें.

परस्पर गमन

उपर्युक्त पंडितश्रेष्ठांनीं पूर्वपक्ष केल्यावर उत्तरपक्ष करण्यासाठीं वेदांतवागीश म. म. श्रीधरशास्त्री पाठक, वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे, वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री जोशी, वे. शा. सं. पांडुरंगशास्त्री काणे (श्री. पांडुरंग वामन काणे यांनीं त्या वेळीं असें नांव सुद्धां दिलें होतें. कारण उत्तरपक्ष करणारी शास्त्री मंडळीच असली पाहिजे असा श्रींचा कटाक्ष होता.) या विद्वानांचीं नांवें श्रींना सादर करण्यांत आलीं होतीं. श्रींच्या बरोबर आलेल्या पंडितश्रेष्ठांनीं श्रीगणपतिमंदिरांत अस्खलित संस्कृत भाषेंत भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्म अशांसारख्या विषयांवर व्याख्यानें दिलीं पण ज्या वादाचा निकाल लावण्याच्या कामीं श्रींना मदत करावी अशा हेतूनें पूर्वपक्ष करण्यासाठीं ते मुंबईस आले होते त्या बाबतींत त्यांनीं कांहींच केलें नाहीं. अर्थात् उत्तरपक्षाचा प्रश्नच उद्भवला नाहीं. श्रींनींहि हा प्रश्न बेमुदत लांबणीवर टाकून मुंबईहून आपलें वास्तव्य हालविलें.

(८) साळवेकर व्यायामशाळा

समाजांतील बालांना व तरुणांना व्यायामशाळेची अत्यंत जरुरी होती याची जाणीव ब्रा. सभेस प्रारंभापासूनच होती. श्रीशंकर-वाडीच्या पिछाडीस असलेल्या इमारतीचा तळमजला तेथें एक नमुनेदार व्यायामशाळा चालवितां यावी अशा दृष्टीनेंच बांधण्यांत आलेला होता हें वाचकांना माहीतच आहे. साळवेकर व्यायामशाळेला साजेशी बजरंगबली श्रीहनुमानाची सुंदर मूर्ति सुप्रसिद्ध चित्रकार श्री. रघुनाथ कृष्ण फडके यांनीं तयार करून व्यायामशाळेंत स्थापण्यासाठीं देणगी म्हणून दिली. त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, अर्चा वगैरे धार्मिक विधि श्रीमंत बाबूराव साळवेकर यांच्या हस्तें दि. २९-६-२९ ला प्रातः-काळीं करण्यांत आला. त्याच दिवशीं सायंकाळीं मिरज संस्थानचे अधिपति श्रीमंत सर गंगाधरराव तथा बाळासाहेब पटवर्धन यांच्या हस्तें व्यायामशाळेचा अनावरण विधि होऊन दि. १ जुलै १९२९ पासून प्रत्यक्ष व्यायामशिक्षणास सुरुवात करण्यांत आली. व्यायामतज्ज्ञ या नात्यानें श्री. कृ. द. बाक्रे यांची व्यायामशाळेवर शिक्षक या नात्यानें निवड झाली.

व्यायामशाळेचें प्रत्यक्ष काम सुरू झाल्याबरोबर बाल व तरुण मिळून ३७२ मंडळी व्यायामशाळेंत शिक्षण घेऊं लागली. व्यायाम-शाळेंत जोर, बैठका, जोडी, मल्लखांब, कुस्ती, लंगडी, लाठी, लेजीम,

फरीगदगा वगैरे विषय शिकविण्यांत येत. या मोठ्या संख्येमुळें तळ-मजल्याची जागा अपुरी वाटून धर्म व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथालयासाठीं राखून ठेवलेला दुसरा मजला व्यायामशाळेच्या मुलांस वापरण्यास द्यावा लागला.

याच वर्षीं चातुर्मासांत सव्वा लक्ष सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प करण्यांत आलेला होता. नमस्काराचार्य श्री. ज. का. सोमण (विलेपार्ले) यांनीं सूर्यनमस्कारांचें शिक्षण देण्याचें मान्य करून या उपक्रमास प्रारंभ केला. वरील संकल्प सिद्धीस नेण्याकरितां ९५ लहानमोठ्या मंडळींनीं भाग घेतला व त्यांनीं दाखविलेल्या उत्साहामुळें सूर्य-नमस्कारांची संख्या संकल्पापेक्षां दुप्पट झाली.

मंडळीच्या एकंदर उत्साहावरून या व्यायामशाळेची उपयुक्तता लोकांना अधिकाधिक पटून ब्रा. सभेनें सुरू केलेलें हें कार्य यशस्वी रीतीनें चालेल अशी व्यवस्थापक मंडळास खात्री वाटूं लागली.

(९) करमणूक शाखा

'ब्राह्मण सभा' असावी अशी इच्छा असणाऱ्या गृहस्थांत दोन वर्ग होते. एका वर्गाचें म्हणणें असें कीं, ब्राह्मण समाजाच्या अडीअडचणी दूर करण्यासाठीं अशा प्रकारची मध्यवर्ति संस्था असावी आणि त्या संस्थेमार्फत ब्राह्मणवर्गानें समाजसेवेचीं कामें पार पाडावीं. दुसऱ्या वर्गाची विचारसरणी अशी कीं, सबंध दिवस उदर-निर्वाहाच्या उद्योगाचे कष्ट केल्यानंतर मनाला थोडाफार विरंगुळा वाटून केलेल्या कष्टांचा परिहार व्हावा म्हणून सायंकाळच्या वेळीं एके ठिकाणीं जमून सांघिक करमणूक करतां यावी अशासाठीं एखादी मध्य-वर्ति संस्था असणें आवश्यक आहे.

न्यायमूर्ति रानडे यांनीं 'Club-life in India' या विषयावर मुंबई व पुणें येथें व्याख्यानें देऊन त्याचें महत्त्व समजावून सांगितल्या-मुळें ब्राह्मण समाजांतहि अशा प्रकारचा क्लब काढण्यांत यावा असें पुष्कळ लोकांना वाटूं लगलें. एकीकरणाच्या पूर्वीहि सायंकाळच्या वेळीं कांहीं मंडळी ब्रा. सभेच्या जागीं जमत व खेळून आपली करमणूक करीत. एकीकरणानंतर 'करमणूक शाखा' स्थापन करण्यांत येऊन हा उपक्रम चालू ठेवण्यांत आला. ही शाखा सुरू करतांना करमणुकीच्या निमित्तानें ब्राह्मण गृहस्थांनीं एकत्र यावें, परस्परांशीं खेळीमेळीच्या वातावरणांत विचारविनिमय करावा, एकमेकांच्या अडीअडचणी

पहाव्या, परस्परांत अधिकाधिक प्रेमभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करावा हाच सभेचा हेतु होता. पोटासाठीं कष्ट करावयाचे, त्यानंतर आपल्या कुवतीप्रमाणें समाजकार्यहि करावयाचें, विश्रांतीची किंवा करमणुकीची मुळीं गरजच नाहीं, अशा वृत्तीचीं सर्वच माणसें असणें शक्य नाहीं हें सभेच्या कार्यकर्त्यांस माहीत होतें. तेव्हां करमणुकीसाठीं कां होईना, पण निरनिराळ्या मनोवृत्तीच्या व निरनिराळे व्यवसाय करणारांच्या एकत्र जमण्यालाहि कांहीं महत्त्व आहे हें लक्षांत घेऊन या स्वतंत्र शाखेची स्थापना करण्यांत आली. या शाखेप्रीत्यर्थ येणाऱ्या खर्चाचा भार मात्र ब्रा. सभेवर पडूं नये म्हणून त्या शाखेची अशी स्वतंत्र वर्गणी ठेवण्यांत आली. अर्थात्, ब्रा. सभेचे जे वर्गणीदार असतील त्यांनाच या करमणूक शाखेचे सभासद होतां येत असे.

बुद्धिबळपटू

या शाखेंत त्यावेळीं बुद्धिबळांचा खेळ प्रामुख्यानें चालत असे. या खेळांत ज्यांनीं अखिल हिंदुस्थानांत लौकिक मिळविला होता असे कांहीं खेळाडू त्यावेळीं करमणूक शाखेचे सभासद होते. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटु मि. बोरिक कॉस्टिक हा खेळ खेळण्यासाठीं हिंदुस्थानांत आलेला असतांना, त्याच्या मुंबई येथील मुक्कामांत, करमणूक शाखेचे दोन बुद्धिबळपटु प्रो. अल्लूरकर व श्री. शेंडे यांना त्याच्याशीं सामना देण्याची संधि मिळाली होती. या सामन्यांत त्या दोघांनींहि आपलें जें क्रीडाकौशल्य प्रकट केलें त्याबद्दल मि. बोरिक कॉस्टिक यानें त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें आणि त्यांचीं छायाचित्रें तो आपल्याबरोबर घेऊन गेला.

या शाखेमार्फत कांहीं प्रसंगीं अल्पोपहाराचे कार्यक्रम होत. या शाखेचीं स्वतंत्र अशीं वार्षिक संमेलनेंहि भरत व त्या वेळीं गायनादि कार्यक्रम करण्यांत येत.

सदाशिवराव परांजपे

या शाखेचें स्मरण झालें कीं, श्री. सदाशिवराव परांजपे यांची मूर्ति डोळ्यासमोर उभी राहाते. ब्राह्मण ज्ञातींतील सधन, मध्यम, निर्धन, सर्व परिस्थितींतील गृहस्थ एकत्र यावेत, त्यांची सात्त्विक करमणूक व्हावी, सधनांनीं आपल्या द्रव्याचा कांहीं भाग या कामीं खर्च करून गरिबांना त्याचा फायदा घेऊं द्यावा अशासाठीं ते मनोभावें प्रयत्न करीत.

ब्राह्मण सभेंत जीं अनेक संमेलनें झालीं, महाप्रसादाचे कार्यक्रम झाले, त्या सर्व प्रसंगीं आपल्या वृद्धापकाळींहि ते हौशीनें श्रम करीत. ब्राह्मण सभेला धनिकांची जी सहानुभूति मिळाली तिचें अल्प तरी श्रेय रा. सदाशिवराव परांजपे यांना देणें चुकीचें ठरणार नाहीं.

(१०) द्वादशवार्षिक वृत्तान्ताचें समालोचन

सन १९१८ च्या प्रारंभीं ब्राह्मण सभा, ब्रा. विद्यार्थी सहाय्यक मंडळ व ब्रा. हितवर्धिनी सभा या संस्था संयुक्त करण्यांत आल्या त्यावेळीं ब्रा. सभेची शिल्लक रु. ३०-११-६, ब्रा. हितवर्धिनी सभेची ७४५-१-० व ब्रा. विद्यार्थी सहाय्यक मंडळाची रु. ६४८३-४-४ मिळून एकंदर रु. ७२५९-०-१० संयुक्त ब्राह्मण सभेच्या हातीं होते. त्यापैकीं ब्रा. वि. स. मं. ची शिल्लक ही गंगाजळी म्हणून समजावयाची असें ठरलेलें होतें. अर्थात्, अशा जवळजवळ निर्धन परिस्थितींत ब्रा. सभेला कार्य करावयाचें होतें. पण हेतु उच्च व निश्चित असला व तो साध्य करण्यास आवश्यक असलेल्या उत्साहाची वाण नसली म्हणजे परमेश्वर यश देतोच देतो हें हा द्वादशवार्षिक अहवाल वाचल्यावर पटल्याशिवाय रहात नाहीं. या बारा वर्षांत ब्रा. सभेच्या वर्गणीच्या रूपानें रु. ५०००, शिक्षण शाखेसाठीं सुमारें रु. ३५००, श्री शंकरवाडी-प्रीत्यर्थ मिळालेल्या देणग्या म्हणून रु. ९६९२६-१५-२॥, करमणूक शाखेचे रु. ९६८-२-०, उत्सवसमारंभाकरितां रु. १३७३-१२-०, याप्रमाणें एकंदर रु. २०६१९७-१२-२॥ इतकी रक्कम प्रत्यक्ष जमा झाली. शंकरवाडी घरखरेदी व त्या घराची दुरुस्ती व वाढ यांसाठीं रु. १४१९८६-४-२, विद्यार्थ्यांना मदत रु. ४०३१२-९-९, ब्राह्मण सभेचा विविध रूपानें होणारा खर्च रु. ३१३३४-६-८॥ व उत्सव,

करमणूक इत्यादींकरितां रु. ६३४७-३-९ असा खर्च झाला आणि रु.१२७५०-७-८ इतकी रक्कम पुढील सालाच्या खर्चाकरितां सभेजवळ शिल्लक राहिली. याखेरीज सांथीच्या तापाच्या काळांत व त्यानंतर सुरू केलेल्या रुग्णालयाकरितां रु. १५००० सभेनें जमविले व ते सर्व त्याच कार्यांत खर्च केले.

चार संस्थांच्या एकीकरणानंतरच्या पहिल्या बारा वर्षांतील कार्याकडे पाहिलें तर ज्या ऋषितुल्य डॉ. नानासाहेब देशमुखांच्या पवित्र वाणींतून ही एकीकरणाची कल्पना निघाली आणि प्रथम श्री. पुणतांबेकर व नंतर ब्रा. हितवर्धिनी सभा यांनीं तिचा पुरस्कार केला ती मूर्तस्वरूपांत येऊन अत्यंत यशस्वी झाली आणि 'संहतिः कार्यसाधिका'. या सनातन तत्त्वाचा विजय झाला असेंच दिसून येतें. ही संघशक्ति ज्यांनीं निर्माण केली आणि ज्यांनीं आपली बुद्धि नि कार्यतत्परता ब्राह्मण सभेच्या कार्याला विशेष रीतीनें वाहिली त्यांचा नामोल्लेख करणें अपरिहार्य आहे.

सभेचे पदाधिकारी

साधारण सभेचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब देशमुख यांनीं सभेला वेळोवेळीं मार्गदर्शन केलें. समाजांत त्यांच्या शब्दाला फार मोठा मान असे. आपणाला पटो वा न पटो, डॉ. नानासाहेब म्हणतात तेंच बरोबर व परिणामीं हितावह असलें पाहिजे अशीच सर्वांची श्रद्धा असे.

'नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने' या उक्तीप्रमाणेंच श्री. पांडुरंग वामन काणे यांची थोर व स्वतंत्र योग्यता आहे. ब्रा. सभेच्या व्य. मं. च्या अध्यक्षपदासाठीं असा थोर पुरुष दहा वर्षें मिळाला यांत ब्रा. सभेचाच खरोखर गौरव आहे. दहा वर्षांनंतर मात्र व्य. मं. च्या अध्यक्षपदासाठीं आपलें नांव कोणीं सुचवूं नये असें त्यांनीं अगदीं निक्षून सांगितलें.

स्वयंसेवक संघाच्या अध्यक्षपदीं डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर यांच्यासारखा विद्वान व वजनदार कार्यकर्ता मिळाला आणि त्यामुळें ब्रा. सभेचा कल्पनातीत फायदा झाला.

श्री. अण्णासाहेब काणे यांच्यानंतर श्री. केशव रामचंद्र दिवेकर सॉलिसिटर हे व्य. मं. चे अध्यक्ष झाले. श्री. यशवंत विष्णु तथा अण्णासाहेब नेने व श्री. हरि केशव गोखले हे कोषाध्यक्षाचें काम पहात असल्यामुळें सभेकडे जमा झालेल्या पैशांचा योग्य विनियोग होईल असा विश्वास समाजांत उत्पन्न झाला. श्री. सीताराम दिनकर जोगळेकर हे चिटणीसाचें काम पहात असत. हे उत्तम वक्ते व खंदे लेखक होते. चिटणीसाचें काम त्यांनीं तीन वर्षें केलें. श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर हे हीं बाराहि वर्षें एक चिटणीस म्हणून काम करीत होते. त्यांच्या कार्यासंबंधानें बोलावयाचें झाल्यास 'स्तुति करुनि तुझी तुजला आम्ही अज्ञान काय वा रिझवूं। गावुनि अमित गुणातें हृदयींचे ताप आपुले रिझवूं॥' असेंच म्हणावें लागेल! श्री. अण्णासाहेब नेने यांच्या नंतर श्री. हरि केशव गोखले यांचे सहकारी म्हणून श्री. विनायक भिकाजी निवर्गी यांची निवड झाली व त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे दि. १३-१०-१९२५ पर्यंत त्यांनीं हें काम केलें. श्री. निवर्गी हे दसरी कामासाठींच जणूं अवतरले होते असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. श्री. जोगळेकर यांच्यानंतर श्री. महादेव विष्णु नामजोशी हे चिटणीस झाले व हें काम त्यांनीं सुमारें सहा वर्षें केलें. कोणत्याहि प्रकारें गाजावाजा न करतां कचेरींतील लेखी काम करीत बसण्याचा त्यांचा बाणा असे. त्यांच्या नंतर श्री. कृष्णाजी आत्माराम पातकर हे सभेचे चिटणीस झाले. नोकरीच्या कामाखेरीज बाकी सर्व वेळ ब्रा. सभेच्या कार्याला वाहाणारे जे कांहीं कार्यकर्ते सभेला लाभले त्यांपैकीं श्री. पातकर हे एक होत. श्री. निवर्गी यांच्या नंतर

त्यांना पूर्वी मदत करणारे श्री. कृष्णाजी गणेश पणशीकर हे कोषाध्यक्ष झाले. श्री. निवर्गी यांची प्रथा त्यांनीं उत्तम प्रकारें पुढें चालविली एवढें म्हटलें म्हणजे पुरे.

ब्रा. सभेच्या कार्यांत उपाध्यक्ष म्हणून व व्य. मं. चे सभासद म्हणून करावें लागणारें काम करणारांत डॉ. लक्ष्मण नीलकंठ पुरोहित यांच्या नांवाचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. डॉ. पुरोहित हे शंकरवाडी निधीचे चिटणीस होते आणि त्या निधीची रक्कम ब्रा. सभेस मिळावी म्हणून श्री. पुणतांबेकर यांनीं केलेल्या प्रयत्नांत त्यांनीं फार मोलाची मदत केली. ते अगदीं कट्टे धार्मिक वृत्तीचे होते. पण देशकालपरिस्थितीला अनुसरून मनाचा जो मोठेपणा व उदारपणा असावा लागतो तो त्यांच्यामध्यें भरपूर प्रमाणांत होता.

३

(१) ब्राह्मण सभा व्यवस्थापक मंडळ

१९३० ते १९४१

१९३० ते १९४१ या द्वादशवार्षिक इतिहासाच्या प्रारंभीं श्री. मोरेश्वर भालचंद्र भाटवडेकर यांची व्य. मं. च्या अध्यक्षस्थानीं निवड झाली आणि प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर हे उपाध्यक्ष झाले. कार्यवाह म्हणून श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. र. सो. सप्रे यांची योजना होऊन डॉ. सी. का. गोखले व श्री. कृ. ग. पणशीकर यांच्याकडे खजीनदाराचें काम आलें.

पोटसंघ

व्य. मं. पुढें श्रीशंकरवाडीची दुरुस्ती, नवीन इमारतीचें काम, शिक्षण-शाखा, नवीनच सुरू केलेली व्यायामशाळा इत्यादि कामें होतीं. विशेषतः— शंकरवाडीप्रीत्यर्थ मोठा निधि जमविणें हें काम तर फारच निकडीचें होतें. १९२७ सालचें वादळहि अजून पूर्णपणें शांत झालेलें नव्हतें. मधूनमधून तें आपलें डोकें वर काढीच. त्यांतच भर म्हणून कऱ्हाडे व देशस्थ या पोटजातींनीं आपले असे निराळे पोटसंघ काढून स्वतंत्रपणें आपले संसार थाटले होते आणि चित्पावनांतील कांहीं लोकांच्या मनांत, आपला सुद्धां असा पोटसंघ असावा असे विचार येऊं लागले होते. अशा

परिस्थितींत सभेचा गाडा प्रगतिपथानें चालविणें किती कठीण गेलें असेल याची कल्पनाच केलेली बरी.

डॉ. वि. ना. भाजेकर

ब्रा. सभेच्या प्रारंभापासूनचे उपाध्यक्ष व सन १९२८ ते १९३१ पर्यंतचे साधारण सभेचे अध्यक्ष श्री. माधवराव भट हे वयोमानाप्रमाणें कार्यनिवृत्त होऊन पुण्यास रहावयास गेले आणि डॉ. विनायक नारायण भाजेकर यांची साधारण सभेचे अध्यक्ष या नात्यानें निवड झाली. डॉ. भाजेकर हे मुंबईतील प्रसिद्ध शस्त्रवैद्य असून ब्रा. वि. स. मं. चे ते एक मोठे पुरस्कर्ते होते. विद्यार्जनाच्या कामांत विद्यार्थ्यांना वारंवार येणाऱ्या अडचणींची त्यांना पूर्ण कल्पना असल्यामुळें शिक्षणशाखेच्या कामासंबंधानें त्यांना विशेष आस्था वाटत असे. श्री. मामा मराठे यांच्याकडून विद्यार्थ्यांना अनेक प्रकारें साहाय्य होत असल्यामुळें त्यांच्या विषयीं डॉक्टरसाहेबांना फार आदर वाटत असे. डॉ. भाजेकर हे दि. १२-४-१९३४ ला कालवश झाले.

साधारण सभेचे अध्यक्ष

सन १९३४–३५ करितां श्रीमंत हरि केशव तथा भाऊसाहेब गोखले यांची साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. ब्राह्मणांची अशी स्वतंत्र महाजन वाडी असावी म्हणून त्यांनीं फार खटपट केली आणि सध्यांचें श्रीशंकरवाडीगृह ब्रा. सभेच्या मालकीचें झाल्याबरोबर रु. १०००० ची देणगी त्यांनीं ब्रा. सभेस दिली. इतकेंच नव्हे तर त्यांनीं शंकरवाडीप्रीत्यर्थ निधि जमविण्याच्या कामीं आपल्या सौजन्यानें ब्रा. सभेस मदत केली. ब्रा. सभेसंबंधीची त्यांची ही भावना लक्षांत घेऊनच साधारण सभेच्या अध्यक्षाच्या जागीं त्यांची निवड झाली होती. दि. ५-१२-१९३६ ला ते इहलोक सोडून गेले व त्यांच्या जागीं

श्री. केशव रामचंद्र दिवेकर सॉलिसिटर यांची साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. सॉ. दिवेकर यांनीं व्य. मं. चे अध्यक्ष या नात्यानें दोन वर्षें काम केलेलें होतें. पक्षाघातानें आपले पाय अधू झालेले असतांनाहि सभेचें काम करून आपल्या ज्ञानाचा फायदा त्यांनीं सभेस करून दिला. कोणासहि न दुखवितां सभेचें काम चालविण्याची त्यांची शैली स्पृहणीय होती. सहनशीलता हा तर त्यांचा मोठा गुण. दि. ३०-६-३८ ला त्यांच्यावर काळानें आकस्मिक झडप घातली आणि साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून श्री. श्रीपाद यशवंत अभ्यंकर यांची निवड झाली. श्री. अभ्यंकर हे मुंबईच्या उच्च न्यायालयांत वकिली करीत असून तेथील प्रमुख वकिलांत त्यांची गणना होत असे. ब्राह्मण सभेच्या व्य. मंडळांत त्यांनीं कित्येक वर्षें काम केलेलें असल्यामुळें सभेच्या कामाशीं ते अगदीं निगडित झालेले होते. सन १९१८ पासून ब्राह्मण सभेच्या साधारण सभेचे उपाध्यक्ष असलेले श्री. अनंत गणेश ऊर्फ अण्णासाहेब साठ्ये हे दि. २८-३-३९ ला निधन पावले. ब्रा. वि. स. मं. चे ते एक संस्थापक होते. त्या मंडळावरील त्यांच्या निस्सीम निष्ठेमुळें एकीकरणाची कल्पना त्यांना फारशी रुचली नव्हती पण यामुळें ब्राह्मण ज्ञातीची उन्नति होण्यास मदत होईल अशा भावनेनें त्यांनीं त्या योजनेस संमति दिली होती. साधारण सभेच्या अध्यक्षांच्या अनुपस्थितींत त्यांनीं कित्येक खळबळ उडणाऱ्या सभांच्या अध्यक्षाचें काम केलेलें होतें. वादविवाद आटोपते घेण्यास लावण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांच्या या विशेष गुणामुळें सभेचें काम लौकर आटोपे. त्यांनीं दिलेल्या निर्णयावर सर्व सभासद खूष असत. सभेच्या साधारण सभेचीं इतिवृत्तें लिहून काढून आठ दिवसांच्या आंत त्यावर त्या सभेच्या अध्यक्षांची स्वाक्षरी घ्यावी असा नियम त्यांनींच १९३२ मध्यें घालून दिला व तो निष्ठेनें पाळला जात आहे.

आणखी एक पोटसंघ

१९३२–३३ सालीं व्य. मं. च्या पदाधिकाऱ्यांची पुन्हा निवड झाली. बहुतेक सर्व पूर्वीचेच पदाधिकारी निवडून आले. फक्त कार्यवाह श्री. र. सो. सप्रे यांच्या ऐवजीं श्री. का. वि. खानविलकर यांची दुसरे कार्यवाह म्हणून निवड झाली. यापूर्वी डॉ. कृ. श्री. म्हसकर यांनी सभेस दोन मोठ्या देणग्या दिल्या होत्या. त्यांची हकीकत पुढें येणारच आहे. रा. ब. करंदीकर व श्रीमंत डोंगरे बंधू यांच्या दोन मोठ्या देणग्या सभेस मिळाल्या. कांहीं चित्पावन मंडळींच्या मनांत बरेच दिवस धुमसत असलेल्या विचारांना प्रत्यक्ष फळ येऊन त्यांचाहि संघ अस्तित्वांत आला. त्याबरोबर पोटसंघांचें एकीकरण करण्याचा प्रयत्नहि सभेकडून सुरू झाला.

नवे पदाधिकारी

ब्रा. सभेच्या खजिनदाराचें काम अनेक वर्षें केलेले श्री. कृ. ग. पणशीकर १९३२ अखेर नोकरीनिमित्त पुण्यास गेले आणि त्यांच्या जागीं श्री. परशुराम पांडुरंग महाजन हे खजिनदाराचें काम पाहूं लागले.

१९३४-३५ मध्यें सोळा वर्षेंपर्यंत कार्यवाहाची धुरा वहाणारे श्री. अं. गो. पुणतांबेकर यांनीं या कार्यांतून निवृत्त होण्याची इच्छा दर्शविली आणि त्यांच्या जागीं कार्यवाहाच्या कामांत बरींच वर्षें मदत करणारे श्री. वामन रामचंद्र गुळवणे हे कार्यवाह झाले. यापूर्वी पदाधिकाऱ्यांची निवड एकमतानें होण्याचा प्रघात असे. हा प्रघात मोडून श्री. ह. श्री. साठे यांचें नांवहि या जागेसाठीं सुचविण्यांत आलें होतें. पण श्री. गुळवणे हे बहुमतानें निवडून आले. खजिनदाराच्या जागीं श्री. गणेश श्रीपत म्हसकर यांची निवड झाली. पण श्री. प. पां. महाजन यांना विरोध करून श्री. द. कृ. निमकर यांचें नांव सुचविण्यांत आलें पण श्री. महाजन यांची बहुमतानें निवड झाली.

नियमांत दुरुस्त्या

१९१८ सालीं ब्रा. सभेचे नियम तयार झाले होते. त्यांत या काळांत थोडेफार फेरफारहि झाले होते. सभेच्या कार्याचा व्याप पुष्कळच वाढलेला असल्यामुळें सर्व नियमांचा फेरविचार करून त्यांची मांडणीहि पद्धतशीर होण्याची आवश्यकता वाटूं लागली होती. या सोळा वर्षांच्या काळांत समाजाच्या एकंदर परिस्थितींत व विचारसरणींत बराच फरक झालेला असल्यामुळें ही नियमावली तयार होत असतांना अनेक मतभेद उत्पन्न झाले. पूर्वीच्या नियमांचा विचार करून, ब्रा. सभेच्या कार्याचा वाढता व्याप लक्षांत घेऊन, एक नवीन नियमावली तयार करण्याकरितां १९३४ सालीं ब्रा. सभेनें एक समिति नेमली. या समितीनें सुमारें एक वर्षपर्यंत विचार करून नियमांचा आराखडा तयार करीत आणला होता. या कामासाठीं समितीच्या पंचविसाहून अधिक सभा झाल्या होत्या. १९३४ अखेर या समितीवर आणखी दोन नवीन सभासदांची निवड झाली. त्यामुळें सर्व नियमांचा फेर विचार झाला. त्यासाठीं पुन्हा जवळजवळ पूर्वीच्या इतक्याच सभा झाल्या. नियमांचा मसुदा तयार होऊन तो व्यवस्थापक मंडळाकडे पाठविण्यांत आला. व्य. मं. च्या चार सभा होऊन ही नियमावली पास झाल्यानंतर साधारण सभेच्या मान्यतेकरितां ती छापून घेण्यांत आली. या कामाकरितां दि. ३, ४, ५, १४ व १५ एप्रिलला पांच साधारण सभा झाल्या व ही नियमावली मान्य झाली. १९१८ सालीं नियमावली तयार करतांना व्य. मं. वर स्वयंसेवकांना स्वतंत्र प्रतिनिधित्व असावें कीं नाहीं यावर बराच वादविवाद झाला होता. यावेळीं म्हणजे १९३६ सालीं या बाबतींत तीन विचारप्रवाह दिसत होते. (१) स्वयंसेवकांना स्वतंत्र नियमित प्रतिनिधित्व असावें. त्यांना सर्वसाधारण जागांसाठीं उभें रहाण्याचा हक्क असूं नये. (कारण ज्या विभागांत ते वर्गणी वसूल करतात त्या

कै. भाऊसाहेब तांबे

कै. डॉ. ग. बा. गोळे

डॉ. सी. का. गोखले

श्री. प्र. स. जोशी

कै. श्री. चिं. ह. पटवर्धन

कै. श्री. र. सो. सप्रे

श्री. का. वि. खानविलकर

डॉ. वि. ज. भिडे

ठिकाणच्या सभासदांशीं ते चांगले परिचित असतात. तेव्हां चारपांच स्वयंसेवकांनीं आपला गट केल्यास आणि असे चारपांच गट एकत्र झाल्यास सर्वसाधारण सभासदास निवडून येणें अशक्य होईल.) (२) स्वयंसेवकांना स्वतंत्र प्रतिनिधित्व असूं नये. सर्वसाधारण सभासदाप्रमाणें तो मतदार सभासद असेल तर त्याला निवडणुकीला उभें रहाण्याचा हक्क असावा व त्यासाठीं प्रचार नि संघटन करण्यालाहि त्याला परवानगी असावी. (३) स्वयंसेवकास स्वतंत्र प्रतिनिधित्व असावें. शिवाय तो जर मतदार सभासद असेल तर त्याला सर्वसाधारण सभासदाचे हक्क नाकारूं नयेत.

या वरील तीन विचारप्रवाहांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास व साधक-बाधक विचार केल्यास कोणत्या प्रणालीमार्गे काय हेतु असावा हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं.

फेर दुरुस्ती

१९३६ च्या एप्रिलमध्यें झालेल्या साधारण सभेंत पहिला विचार-प्रवाह यशस्वी झाला आणि त्या वर्षीं छापून तयार झालेली नियमावली साधारण सभेनें मान्य केली त्यामुळें वरील क्रमांक २ व ३ मध्यें सांगितल्याप्रमाणें ज्यांचीं मतें होतीं ते नाखूष झाले आणि त्या विचार-सरणीच्या स्वयंसेवकांनीं आपल्या स्वयंसेवकत्वाचे राजीनामे दिले. पण नंतर कांहीं जणांनीं ते परत घेतले आणि नियमाप्रमाणें नियमावलींत पुन्हा दुरुस्त्या सुचविल्या. या दुरुस्त्यांचा विचार करण्याकरितां दि. १७-१२-१९३९ ला भरलेल्या साधारण सभेंत चार तास काम चाललें. सभेंत खूपच वादविवाद झाला, सभातहकुबीच्या सूचना आल्या आणि सभा बरखास्त करण्याच्या अध्यक्षांच्या अधिकाराचाहि विचार झाला. शेवटीं वरील दुसऱ्या विचारप्रवाहाची सरशी झाली आणि त्या अर्थाच्या नियमांतील दुरुस्त्याहि पास झाल्या. इतिहासाच्या भागेंत

बोलावयाचें तर १९१८ मध्यें अधिकारावर आलेल्या पिढीचें आयुष्य संपून १९४०–४१ नंतर दुसऱ्या पिढीची कारकीर्द सुरू झाली.

नवे पदाधिकारी

१९३६-३७ च्या प्रारंभीं श्री. गणेश श्रीपत म्हसकर यांनीं खजिनदाराचें काम करण्यास आपणास पुरेसा वेळ नसल्याचें सांगितल्यावरून त्यांच्या ठिकाणीं श्री. नरहर विठ्ठल भावे यांची खजिनदाराचे जागीं निवड झाली. श्री. नानासाहेब म्हसकर यांनीं खजिनदाराचें प्रत्यक्ष काम दोनच वर्षें केलें असलें तरी या कामांत त्यांनीं १९३२ च्या प्रारंभापासून लक्ष घातलें. हिशेबतपासनिसांशीं विचारविनिमय करून सभेच्या हिशेब ठेवण्याच्या बाबतींत त्यांनीं आमूलाग्र बदल केला आणि पायाशुद्ध अशा आधुनिक पद्धतीनें हिशेब ठेवण्याची पद्धत सुरू केली. १९३४–३५ चे बाकीचे सर्व पदाधिकारी १९३६–३७ सालाकरितां निवडण्यांत आले.

१९३८–३९ सालीं प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांची व्य. मं. च्या अध्यक्षस्थानीं निवड झाली. श्री. चिंतामण हरि पटवर्धन उपाध्यक्ष झाले. डॉ. का. ल. ओक व श्री. मा. र. सप्रे खजिनदार होऊन चिटणीसांचे जागीं श्री. का. वि. खानविलकर यांच्या जोडीला श्री. वासुदेव रामचंद्र दिवेकर आले.

सुवर्णमहोत्सवाची कल्पना

दि. १७ जून १९३८ ला ब्रा. सभेला पन्नास वर्षें पूर्ण होतात तेव्हां सभेचा सुवर्णमहोत्सव साजरा करावा या हेतूनें व्य. मं. वरील अठरा सभासदांची डॉ. सीताराम काशीनाथ गोखले यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक समिति नेमण्यांत आली. हा सुवर्णमहोत्सव दि. १५ डिसेंबर १९३९ च्या आंत साजरा करावा असें ठरविण्यांत आलें. या समितीची सभा होऊन सुवर्णमहोत्सवानिमित्त पुढीलप्रमाणें योजना आंखण्यांत आली:—

(१) ब्रा. सभेच्या प्रारंभापासूनचा इतिहास लिहिणें. (२) सुवर्ण-महोत्सवाचें यथार्थ स्मरण म्हणून निदान रु. ५१००० चा निधि जमविणें व या महत्कार्याच्या जाणीवेचें प्रतीक म्हणून व्य. मं. वरील प्रत्येक सदस्यानें व सभेच्या प्रत्येक स्वयंसेवकानें आपली मासिक प्राप्ति या निधीला अर्पण करणें. सभेच्या कार्यकर्त्यांनीं व्यक्तिशः किंवा संघशः लहान-मोठ्या देणग्या मिळविणें. (३) हस्तकला, भरतकाम व चित्रकला यांचें प्रदर्शन भरविणें. (४) पोटजातींचे असलेले स्वतंत्र संघ सभेंत विलीन करण्याचा प्रयत्न करणें. (५) ब्राह्मण तरुणांचें लक्ष स्वतंत्र उद्योगधंद्यांकडे आकर्षित करण्याची योजना आंखणें.

अशाच प्रकारच्या आणखीहि कांहीं योजना या समितीकडून आल्या होत्या आणि त्यांचा विचारहि चालू होता. पण तितक्यांत युरोपांतील महायुद्ध सुरू झालें तेव्हां सर्व परिस्थितीचा विचार करून योग्य व अनुकूल वातावरण निर्माण होतांच व्य. मं. नें या योजनेचा विचार करावा असें ठरविलें.

अस्पृश्यांचा प्रश्न

सन १९३९ च्या श्री गणेशोत्सवांत अस्पृश्यांना उपस्थित रहातां यावें अशा अर्थाच्या प्रस्तावावर साधारण सभेच्या अध्यक्षांनीं नियम-बाह्यतेचा निर्णय दिल्यामुळें मुळांतच घाव बसल्यासारखें झालें व सभासदांच्या मताचा कौल घेणें अशक्य झालें. ब्रा. सभेनें या प्रश्ना-संबंधीं कांहीं तरी निश्चित धोरण ठरवून त्याप्रमाणें आचरण करावयास पाहिजे असें व्य. मं. वरील ज्या पंचवीस सभासदांचें मत होतें त्यांचा यामुळें कोंडमारा झाला आणि व्य. मं. वरील आपल्या सदस्यत्वाची त्यांनीं त्यागपत्रें दिलीं इतकेंच नव्हे तर त्यांच्यापैकीं कित्येकांनीं ब्रा. सभेच्या होणाऱ्या पुढील निवडणुकींत भाग न घेण्याचें ठरविलें.

देणग्या दूर गेल्या

कै. श्रीमंत धुंडिराज गोविंद गोरे यांनीं गरीब ब्राह्मण कुटुंबियांस वैद्यकीय उपचार सुलभतेनें मिळावे या हेतूनें मृत्युपत्रान्वयें रु. ५०००० राखून ठेवले. मृत्युपत्राचे व्यवस्थापक श्री. जनार्दन गोविंद गोरे, श्री. नारायण रघुनाथ गोगटे, श्री. ना. भा. गोरे व श्री. कृष्णाजी गोपाळ गोडबोले यांनीं ही रक्कम दात्याच्या इच्छेप्रमाणें ब्रा. सभे-मार्फत औषधालय चालवावें म्हणून देऊं केली. श्री. खानविलकर यांनीं श्री. नारायण रघुनाथ गोगटे आदिकरून व्यवस्थापकांची भेट घेऊन ही देणगी ब्रा. सभेकडे आल्यास ज्ञातीला किती उपयोग होईल यासंबंधींची खात्री पटविली पण त्या बाबतींत कांहीं कायदेशीर अडचण उपस्थित झाल्यामुळें कै. श्री. गोरे यांच्या मृत्युपत्रांतील शब्दरचनेचा न्यायालयामार्फत अधिकृत अर्थ करून घेणें मृत्युपत्राच्या व्यवस्थापकांस आवश्यक वाटलें. त्याप्रमाणें निवाडा झाला आणि न्यायाधीशांनीं केलेल्या शब्दरचनेच्या अर्थाप्रमाणें ही देणगी फक्त चित्पावन ब्राह्मणांकरितांच होणें योग्य आहे असें ठरलें. या कामीं ब्राह्मण सभेनें कायदेशीर इलाज कांहींहि केला नाहीं किंवा करण्याचा प्रयत्नहि केला नाहीं. मात्र हें काम न्यायालयांत जाण्यापूर्वी मृत्यु-पत्राच्या व्यवस्थापकांना ब्राह्मण सभेमार्फत होणाऱ्या कार्याची माहिती देऊन, कोणत्याहि प्रकारचा पक्षपात न करतां या देणगीचा ज्ञातीला जास्तींत जास्त उपयोग करून देण्याचा प्रयत्न सभा करील अशी त्यांची खात्री पटविण्यांत आली होती. ब्राह्मण सभा ही सभेंत समाविष्ट झालेल्या सर्व पोटजातींची सभा आहे आणि सभेमार्फत होणारीं कामें प्रेमळ एकत्र कुटुंबाप्रमाणें या सर्व पोटजातींकरितां होतात, एकाला मिळावयाचा पैसा दुसऱ्याच्या उपयोगाकडे वळविण्याचा प्रयत्न सभे-कडून केला जात नाहीं, कोणाहि विवेकी माणसाला सभेच्या कार्यांत

दोष दिसूं नये अशी काळजी सतत घेतली जाते अशा प्रकारची त्या व्यवस्थापकांची खात्री करून देण्यांत आलेली होती.

श्री. पाटणकर नांवाच्या गृहस्थानेंहि रु. ५०००० ची देणगी ज्ञातिकार्यार्थ देण्याची इच्छा प्रकट केली होती. त्या गृहस्थांचे स्नेही व ब्राह्मण सभेचे सहृदय हितचिंतक श्री. नीळकंठराव महाजन यांनीं ही देणगी ब्राह्मण सभेस मिळण्याबद्दल खटपट केली व त्यांच्या त्या खटपटीला यशहि आलेलें होतें. ब्राह्मण सभेच्या दुर्दैवानें त्या गृहस्थाच्या अखेरच्या आजारांत त्याचें मत बदललें आणि त्याप्रमाणें आपल्या मृत्युपत्रांत त्यानें बदल केला. ब्राह्मण सभा या दुसऱ्या मोठ्या देणगीसहि अंतरली !

श्री. का. वि. खानविलकर

१९३८–३९ अखेर ज्या गृहस्थांनीं ब्रा. सभेच्या कार्यापासून अलिप्त रहाण्याचें ठरविलें त्यांत प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर व श्री. का. वि. खानविलकर यांची प्रामुख्यानें गणना होते. प्रा. गजेंद्रगडकर ही केवळ एक व्यक्ति नसून समाजाला पुरोगामी करणारी अशी ती एक शक्ति होती. ब्राह्मणसमाज सर्व बाजूंनीं समर्थ व्हावा म्हणून अहर्निश काळजी वहाणारे असे ते गृहस्थ होते. श्री. का. वि. खानविलकर यांची ब्रा. सभेची सेवा अनुपमेय आहे. शंकरवाडीगृह खरेदी केल्यापासून ते ब्रा. सभेच्या कार्यांत लक्ष घालूं लागले. व्यवस्थापक मंडळांत अगर स्वयंसेवक शाखेंत नसूनहि शंकरवाडी निधि जमविण्याच्या कामीं त्यांनीं पुष्कळच खटपट केली. १९२७ च्या कुमार विनय मंदिर मेळ्याच्या संबंधांत जो वादविवाद झाला त्यांत पुरोगामी मताच्या मंडळींत ते आघाडीवर होते. ब्रा. सभेच्या चिटणीसाचे जागीं १९३२ सालीं त्यांची निवड झाली. हें काम त्यांनीं आठ वर्षें केलें. ब्रा. सभेच्या कामांत त्यांनीं अनेक सुधारणा केल्या. भरतखंडांतील

विद्वान व निरनिराळ्या विचारसरणीच्या प्रणेत्यांचीं व्याख्यानें ब्रा. सभेंत व्हावींत व त्यांचे विचार समाजाला कळावेत याबद्दल ते फार दक्ष असत. त्यांचें वक्तृत्वहि मोठें परिणामकारक असे. कित्येक खळबळजनक प्रसंगींहि ब्रा. सभेचें व्यासपीठ त्यांनीं शुद्ध राखलें आणि सभेची प्रतिष्ठा व लौकिक यांत भर घातली. ब्रा. सभेसाठीं शारीरिक, बौद्धिक व आर्थिक झीजहि त्यांनीं सोसली. ब्रा. सभा व तेथील श्रोते यांचा जो एक विशेष लौकिक झाला आहे–या लौकिकाचा उल्लेख नेक नामदार बॅ. बाबासाहेब जयकरांनींहि इतरत्र केलेला आहे–त्याचें बरेंचसें श्रेय श्री. खानविलकरांना आहे असें म्हणायला कांहींच हरकत नाहीं. निधि जमविण्याच्या कामीं तर त्यांची बरोबरी करील असा कार्यकर्ता सांपडणें कठीण आहे. त्यांची सेवानिवृत्ति ही ब्राह्मण सभेवरील एक आपत्तीच होय.

नवें व्यवस्थापक मंडळ

१९४०-४१ मध्यें व्यवस्थापक मंडळांत बरेंच स्थित्यंतर झालें. व्य. मं. च्या अध्यक्षस्थानीं पुन्हा श्री. मो. भा. तथा बापूसाहेब भाटवडेकर यांची निवड झाली. उपाध्यक्षाचें स्थान डॉ. वि. ज. भिडे यांच्याकडे आलें. खजिनदारांच्या जागीं श्री. प. पां. महाजन व डॉ. का. ल. ओक यांची योजना होऊन बॅ. वि. वि. ओक व श्री. शं. वि. काणे व श्री. काण्यांच्या नंतर श्री. कृ. सी. पिटकर यांची चिटणीस म्हणून निवड झाली.

नवा नियम

संयुक्त ब्रा. सभेंत समाविष्ट झालेल्या चारी संस्थांपैकीं निदान एका संस्थेच्या व्यवस्थापक मंडळांत सतत पंधरा किंवा अधिक वर्षें काम करीत असलेल्या गृहस्थांस ब्रा. सभेचे सन्मान्य आश्रयदाते व ब्रा. सभेच्या व्यवस्थापक मंडळाचे तहाहयात सभासद समजलें जाईल

असा नियम ब्रा. सभेच्या दि. ५–४–१९३६ च्या साधारण सभेंत पास झाला. या नियमाप्रमाणें श्री. पांडुरंग वामन काणे व श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर हे दोघे ब्रा. सभेचे सन्मान्य आश्रयदाते व व्य. मं. चे तहाहयात सभासद झाले. या उभय कार्यकर्त्यांचें १९३६–३७ च्या ब्रा. सभेच्या अहवालांत अभिनंदन करण्यांत आलें आहे. इतिहासलेखनाच्या या प्रसंगीं या दोन्ही कार्यकर्त्यांची अल्प चरित्रें देणें योग्यच होईल.

महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे

म. म. पांडुरंग वामन तथा अण्णासाहेब काणे यांचा जन्म दि. ७ मे १८८० ला झाला. मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रीव्हिअसपासून एम्. ए. पर्यंत झालेल्या सर्व परीक्षांतील संस्कृत विषयाचीं अत्युच्च पारितोषकें त्यांनीं मिळविलीं. एल्एल्. बी. व नंतर एल्एल्. एम्. या कायद्याच्या परीक्षा ते उत्तम रीतीनें पास झाले. त्यांनीं प्रथम शिक्षक व नंतर प्राध्यापकाचा पेशा पत्करला. श्री. अण्णासाहेब जितके प्रेमळ व विनयशील तितकेच स्वाभिमानी असल्यामुळें त्यांना हा पेशा पुढें सोडावा लागला. ज्ञानार्जन व संशोधन यांतच आपल्या जीविताची इतिकर्तव्यता आहे असें मानणाऱ्या या पंडिताला निर्वाहाचें साधन म्हणून उच्च न्यायालयांतील वकिलीचा पेशा पत्करावा लागला. लोकमान्यांना त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीविरुद्ध राजकारणांत पडावें लागलें तसेंच श्री. अण्णासाहेबांना वकिलीच्या धंद्यांत पडणें भाग पडलें होतें. अर्थात्, आपल्या बुद्धिमत्तेचें प्रखर तेज त्यांनीं या व्यवसायांतहि दाखविलें. वकिली उत्तम रीतीनें चालत असली म्हणजे आपल्या अशिलाची बाजू समजावून घेतांना, त्याचे कागदपत्र पहातांना आणि नंतर त्यांतील मुद्द्यांसंबंधीं कायद्याच्या बाजूचा विचार करतांना किती वेळ घालवावा लागतो याची, त्या धंद्याची माहिती असणारांखेरीज,

इतरांना कल्पना येणें शक्य नाहीं. पण वेळांत वेळ काढून वाचनाचा आपला आवडता व्यवसाय ते करीत. मुंबईच्या लॉ कॉलेजांत त्यांनीं सहा वर्षें प्राध्यापकाचें काम केलें. मुंबई विश्वविद्यालयाच्या एम्. ए. पर्यंतच्या संस्कृत विषयाच्या परीक्षांत त्यांनीं तेरा वर्षें परीक्षकाचें काम केलें. एल्एल्. बी. व एल्एल्. एम्. यांच्या परीक्षकाचें कामहि त्यांनीं अनेक वर्षें केलें. मद्रास, बनारस, नागपूर, डाक्का इ. विश्वविद्यालयांत एम्. ए., पीएच्. डी. आणि डी. लिट्. च्या परीक्षकाचें काम त्यांनीं पुष्कळ वर्षें केलें. मुंबई विश्वविद्यालयाचे निवडून आलेले फेलो म्हणून नऊ वर्षें व फॅकल्टी ऑफ आर्ट्स् अँड लॉ चे सदस्य म्हणून त्यांनीं पंधरा वर्षें काम केलें.

त्यांची प्रकृति कांहीं सुदृढ नाहीं. शिवाय त्यांना पोटदुखीची व्यथा आहे. पण नियमित आहार व अखंडितपणें नियमित फिरण्याचा व्यायाम या योगानें त्यांनीं आपली प्रकृति व उत्साह हीं टिकवून धरलीं आहेत.

सर्व युरोपखंडाचा प्रवास करून व तिकडील सर्व प्रमुख विश्वविद्यालयांना भेट देऊन त्यांच्या वैशिष्ट्यांचा त्यांनीं अभ्यास केला. पॅरिसमध्यें जी आंतरराष्ट्रीय प्राच्य विद्या संशोधक पंडित परिषद १९४७ सालीं भरली होती त्या परिषदेसाठीं सर राधाकृष्णन्, म. म. अण्णासाहेब काणे व श्री. चॅटर्जी यांची भारताचे प्रतिनिधी म्हणून हिंदुस्थान सरकारनें निवड केली आणि त्या निमित्तानें त्यांनीं युरोपचा दुसऱ्यानें प्रवास केला.

एखादें काम सुरू करण्यापूर्वी किंवा एखाद्या सार्वजनिक कामाला हात घालण्यापूर्वी ते विचार करतील पण त्यांनीं एकदां काम सुरू केलें किंवा सार्वजनिक काम करण्याचें मान्य केलें कीं त्या कामासाठीं लागणाऱ्या वेळेचा ते आपल्या वेळापत्रकांत समावेश करतील आणि

त्या संबंधीं एकहि गोष्ट किंवा बाब आपल्या तीक्ष्ण नजरेंतून सुटूं देणार नाहींत. आपल्या वेळेप्रमाणेंच दुसऱ्यांच्याहि वेळेची किंमत ते पुरेपूर जाणतात.

अलंकारशास्त्रावरील त्यांचा ग्रंथ सर्वमान्य असून त्याबद्दल त्यांना मंडलिक सुवर्णपदक मिळालें. धर्मशास्त्रावरील निबंधामुळें त्यांना मंडलिक पारितोषक मिळालें. मुंबई विश्वविद्यालयानें त्यांना विल्सन फायलालॉजिकल व्याख्यानमाला गुंफण्याची विनंती केली त्या वेळीं त्यांचें वय ३३ वर्षांचें होतें. इतक्या तरुण विद्वानाला हा मान त्यापूर्वी केव्हांहि मिळालेला नव्हता. त्यांनीं निर्माण केलेली ग्रंथसंपत्ति इतकी विविध, विपुल, आकर्षक व मोलाची आहे कीं, एका मनुष्यानें ती सर्व निर्माण केली असेल हें संभवनीय सुद्धां वाटत नाहीं. कदाचित् भविष्यकाळांत, 'अलंकारशास्त्राचा इतिहास' व 'धर्मशास्त्राचा इतिहास' लिहिणारे 'काणे' निरनिराळे असले पाहिजेत आणि मुंबईच्या उच्च न्यायालयांतील एक प्रमुख वकील 'काणे' हे कोणी तिसरेच काणे असावेत असाहि वाद उत्पन्न होणें अशक्य नाहीं.

त्यांच्या ग्रंथलेखनाची विविधता आणि त्याचा विस्तार हीं इतकीं अफाट आहेत कीं, त्यामुळें विद्वानांचीहि मति गुंग होऊन जावी! History of Sanskrit Poetics, Vedic Basis of Hindu Law, History of Dharma Shastra इ. ग्रंथ त्यांनीं इंग्रजींत लिहिले असून मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषेंत त्यांनीं ७५ वर प्रबंध लिहिले आहेत. याशिवाय त्यांचे अनेक निबंध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना त्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय व युरोपियन पंडितांनीं भारतीय संस्कृतीचें व्यापक स्वरूप अशा अर्थाचा ग्रंथ समर्पण केला. त्यांत म्हटल्याप्रमाणें न्या. मू. काशीनाथ त्र्यंबक तेलंग, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि लो.

बाळ गंगाधर टिळक यांची प्राच्यविद्यासंशोधनाची परंपरा श्री. काणे यांनीं पुढें चालविली आहे. आपल्या आयुर्मर्यादेचा अंदाज आपल्या मनाशीं बांधून धर्मशास्त्राच्या इतिहासाचे तीन खंड लिहिण्याचें काम ३५ वर्षांत पुरें करण्याचा आराखडा त्यांनीं तयार केला आणि त्याप्रमाणें त्यांनीं तीन भाग पुरे केले. चवथा खंड तयार होत आहे. हा चवथा खंड पुरा होण्यास जितका जास्त वेळ लागेल तितका वेळ अनपेक्षितपणें उपस्थित झालेल्या कार्यानें घेतला असें धरून चालण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या विद्वत्तेनें व संशोधन-कार्यानें जगांतील विद्वान मंडळींत भारतीय विद्वानांचें नांव उज्ज्वल केलें आणि जगाच्या पाठीवर त्यांना मानाचें स्थान मिळवून दिलें.

या ग्रंथलेखनाच्या कामाबरोबर मुंबई विश्वविद्यालय, रॉयल एशियाटिक सोसायटी, भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन मंदिर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ब्राह्मण सभा अशांसारख्या अनेक संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. ज्या ज्या संस्थेंत त्यांनीं काम करण्याचें ठरविलें त्या त्या संस्थेचें काम करतांना त्यांच्या हातून कधींहि कुचराई झाली नाहीं.

ब्रा. सभेचें भाग्य थोर म्हणूनच त्यांनीं या संस्थेंत काम करण्याचें मनांत आणलें आणि सभेला एक मानाचें स्थान मिळवून दिलें. १९१४ सालीं ते ब्रा. वि. स. मंडळाचे परीक्षक झाले. त्यानंतर त्यांची कार्यकारी मंडळावर निवड झाली. ब्रा. हितवर्धिनी सभेच्या कार्यकारी मंडळावरहि ते होते. त्या सभेनें केलेल्या शिरगणतीचा अहवाल त्यांनींच लिहिला. मूळ ब्रा. सभेचेहि ते सभासद होते. चार संस्थांचें एकीकरण झाल्यानंतर संयुक्त ब्रा. सभेच्या कार्यकारी मंडळाचे ते अध्यक्ष झाले. हें काम त्यांनीं दहा वर्षें केलें. या अवधींत सभेनें केलेली प्रगति १९२९ च्या द्वादशवार्षिक समालोचनावरून दिसून

येईल. ते वीस वर्षें सभेचे विश्वस्त होते आणि व्य. मं. चे ते आजीव सदस्य आहेत. त्यांनीं आपल्या बुद्धीचा, कर्तृत्वाचा आणि वक्तृत्वाचा पूर्ण फायदा ब्रा. सभेस घेऊं दिला. शंकरवाडीची इमारत खरेदी केल्यानंतर जो इमारत निधि जमविला त्या कामीं त्यांनीं घेतलेले परिश्रम आणि खर्चीं घातलेला वेळ यांकडे पाहिलें तर कृतज्ञतेनें अंतःकरण भरून येतें. ठराविक वेळीं आणि नेमल्या ठिकाणीं उपस्थित होण्यास ते कधींहि चुकत नसत. पं. मदनमोहन मालवीय यांनीं ब्रा. सभेस भेट दिली त्यावेळीं त्यांनीं श्री. अण्णासाहेब काणे यांचा 'अर्वाचीन व्यास ऋषि' असा उल्लेख केला होता.

धर्मशास्त्राचा विचार केवळ समन्वय पद्धतीनें करून भागणार नाहीं तर देशकालवर्तमानानुसार बुद्धीला प्राधान्य देऊन धर्मशास्त्रदृष्ट्या ऐतिहासिक पद्धतीनें आचारधर्मांत बदल करणें अवश्य आहे, तसेंच समाजाच्या धारणेला व उत्कर्षाला पोषक असा हा हिंदुधर्म परिवर्तनशील आहे असें त्यांचें मत आहे. मुंबईतीलच नव्हे तर सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मण समाजांत जी प्रगमनशीलता दिसून येते त्याचें श्रेय पुष्कळ अंशीं अण्णासाहेबांनाच दिलें पाहिजे. त्यांची गाढ विद्वत्ता पाहून परकीय सरकारनेंहि त्यांना महामहोपाध्याय ही पदवी अर्पण केली. त्यांच्या वक्तृत्वाची छाप मुंबईकरांवर कायमची पडलेली आहे. नुसते आभार मानण्यासाठीं ते उभे राहिले तरी सुद्धां श्रोत्यांना त्यांच्या तोंडून कांहीं तरी नवीन ऐकायला मिळतें.

रॉयल एशियाटिक सोसायटी Indian Antiquities संबंधीं संशोधनात्मक कार्य करणाऱ्या विद्वानांना दर तीन वर्षांनीं कँबेल पारितोषक देत असते. १९४४ सालीं हें पारितोषक श्री. अण्णासाहेबांना मिळालें आणि त्याच वेळीं, १९४६ सालीं नागपूर येथें होणाऱ्या प्राच्यविद्यासंशोधक पंडित परिषदेच्या अध्यक्षस्थानीं त्यांची निवड

झाली. हें कँबेल पारितोषक जागतिक असून तें मिळविणारे विद्वान हिंदुस्थानांत फार थोडे आहेत.

त्यांच्या विद्वत्तेची माहिती असणारा त्यांचा एक शिष्य—दे. भ. बाळासाहेब खेर—मुंबई प्रांताचा मुख्य प्रधान झाला आणि आपल्या गुरूची मुंबई विश्वविद्यालयाच्या उपकुलगुरु पदासाठीं त्यानें निवड केली व त्या स्थानाला भूषण आणलें. श्री. अण्णासाहेबांचें तैलचित्र आपल्या सभागृहांत ठेवून ब्रा. सभेनें त्यांच्याविषयींचा आपला आदर व्यक्त केला आहे.

दि. ७–१–१९४० ला त्यांच्या वयाला साठ वर्षें पूर्ण झालीं त्या-निमित्त त्यांचा सत्कारसमारंभ करावा असें त्यांच्या चहात्यांनीं व मित्रमंडळींनीं ठरविलें. त्याप्रमाणें तो सत्कारसमारंभ वागळे हॉलमध्यें करण्यांत आला. त्या समारंभांत ब्रा. सभेच्या वतीनें भाग घेण्याचें ब्रा. स. व्य. मं. नें ठरविलें. तसेंच, ब्रा. सभेनेंहि स्वतंत्र रीतीनें त्यांचा षष्ट्यब्दपूर्ति समारंभ साजरा करावा असें व्य. मं. च्या सभेंत ठरलें आणि त्यासाठीं एक समितीहि नेमण्यांत आली. व्य. मं. च्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळ श्री. अण्णासाहेबांस भेटण्या-साठीं गेलें. हा सत्कार स्वीकारण्याचें श्री. अण्णासाहेबांनीं मान्य केलें. पण नंतर श्री. अण्णासाहेबांनीं व्य. मं. स एक पत्र लिहून आपण सदर सत्कार स्वीकारण्यास तयार नसल्याचें कळविलें. याचीं त्यांनीं जीं कारणें दिलीं त्यांचा सारांश असा :—

'(१) प्रचलित जातिभेदांमुळें हिंदु समाजाचें फार नुकसान झालें आहे. हे जातिभेद नाहींसे करणें कोणाहि एका माणसाच्या शक्ती-बाहेरचें काम आहे. पण या हेतूच्या सिद्धयर्थ प्रथम प्रयत्न म्हणून दक्षिणी ब्राह्मण समाजांतील जितक्या पोटजाती एकत्र आणतां येतील तितक्या आणण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करूनहि—आणि सर्व

ब्राह्मणांच्या उन्नतीचे प्रयत्न अत्यंत निःपक्षपातानें व कसोशीनें ब्राह्मण सभेकडून होत असतांना—पोटसंघांच्या स्वतंत्र संस्था अस्तित्वांत आल्या आणि दिवसेंदिवस बळावत चालल्या हें दृश्य पाहून निराशा वाटते. एवढी परिमित विचारसरणीहि ब्रा. समाजांतील मोठमोठ्या विद्वानांना पटूं नये याबद्दल दुःख होतें.

'(२) ब्राह्मण सभेंत किंवा इतर सार्वजनिक ठिकाणीं जेथपर्यंत अहिंदूंना येऊं दिलें जातें तेथपर्यंत तरी अस्पृश्यांना येऊं देण्यास मुभा असावी हेंहि ब्रा. सभेंतील कांहीं प्रमुख व्यक्ती मान्य करायला तयार नाहींत आणि अस्पृश्यांच्या बाबतींतील आपल्या अत्यंत अनुदार अशा धोरणालाच त्या चिकटून बसूं पाहतात याबद्दल मनाला विषाद वाटतो.'

श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर

श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर यांचें सामाजिक कार्य, ब्राह्मण समाजाची त्यांनीं केलेली अमोल सेवा व त्यांचा वृद्धापकाळ यांचा विचार करून दि. २९-११-३५ च्या व्य. मं. च्या सभेंत त्यांचा सत्कारसमारंभ करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें तो दि. १५-३-१९३६ ला दे. भ. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

आपल्या कडकडाटानें व लखलखाटानें गगनमंडळ दुमदुमणाऱ्या विजेला आपली दासी बनवून तिच्याकडून प्रचंड शक्तीचीं कामें करवून घेणारे ज्याप्रमाणें सामान्य नव्हेत त्याचप्रमाणें बुद्धिमानांचें बुद्धिवैभव आणि धनिकांचें धन समाजकार्यासाठीं राबवून घेण्याचें कठीण कार्य करणारीं माणसेंहि सामान्य खास नव्हेत. श्री. अं. गो. पुणतांबेकर ही दुसऱ्या कोटींतील एक असामान्य व्यक्ति होऊन गेली.

त्यांचा जन्म १८७० सालीं नाशिक येथें झाला. लहानपणीं त्यांना

'नथू' म्हणत व मोठेपणीं ते सर्वांचे 'नथूकाका' झाले. त्यांच्या प्रचंड समाजसेवेचीं चिन्हें त्यांच्या विद्यार्थीदशेंतच दिसूं लागलीं होतीं.

खिश्चन मिशनऱ्यांनीं 'ज्ञानोदय' वर्तमानपत्रांत श्रीकृष्णाची निंदा केली. तेव्हां नथूकाकांनीं महाराष्ट्रीयांची सभा भरविली आणि त्या सभेंत त्या पत्राचा व ज्या छापखान्यांत तें पत्र छापलें जात असे त्याच्या मालकाचा तीव्र निषेध करण्यांत आला. या त्यांच्या सभेकडे पोलीस अधिकाऱ्यांचें लक्ष वेधण्यांत आलें असल्यामुळें ही सभा कशासाठीं आहे, सभेच्या वेळीं शांतता राखली जाईल कीं नाहीं वगैरेंबद्दल चांचणी करण्यासाठीं नथूकाकांना पोलीस कचेरींतून पाचारण आलें होतें. तेथें त्यांनीं साहेबाच्या प्रश्नांना धीटपणें उत्तरें दिलीं व सभेंत दंगाधोपा होणार नाहीं अशी त्याची खात्री करून दिली.

असल्या प्रकारच्या भानगडींमुळें नथूकाका १८९० सालीं मॅट्रिकच्या परीक्षेंत नापास झाले व त्यांनीं जी. आय. पी. रेल्वेंत दरमहा २० रुपये पगारावर कारकुनाची नोकरी धरली. थोड्याच दिवसांत त्यांनीं समाजसेवा करण्याच्या उपयोगीं पडणाऱ्या स्वयंसेवकांची एक संस्था स्थापन केली. १८९६ मध्यें मुंबईला प्लेगचा कहर उसळला. डॉ. भालचंद्र प्रभृतींनीं 'हिंदु प्लेग हॉस्पिटल' स्थापन केलें पण पैशाच्या अभावीं तें दैन्यावस्थेंत होतें. नथूकाका आपल्या स्वयंसेवकांसह डॉ. भालचंद्रांना भेटले व एखाद्या वाडींतील शुश्रूषेचें काम आपणाकडे देण्याबद्दल त्यांना विनंती केली. शुश्रूषेच्या कामापेक्षांहि द्रव्याची आवश्यकता अधिक असल्याचें सांगून डॉक्टरांनीं नथूकाकांना तें काम करण्याचा उपदेश केला. तेव्हां डॉक्टरांच्या आदेशाप्रमाणें हें काम करण्याचा चंग बांधून नथूकाकांनीं त्यावेळीं रु. ७०० जमवून दाखविले असल्याचा त्या वेळच्या केसरींत उल्लेख आहे. पुस्तकांचा संग्रह करण्याचा त्यांना नाद होता. सुमारें ७०० पुस्तकें जमवून त्यांनीं 'श्रीशिवाजी

वाचनालय ' स्थापन केलें. पुढें त्यांनीं आपल्या मित्रमंडळीशीं विचारविनिमय करून मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापन करण्याचें ठरविलें व दि. १-८-१८९८ ला त्या ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. हेंच सुप्रसिद्ध ' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' होय. आपल्या वाचनालयांतील सर्व पुस्तकें नथूकाकांनीं त्या संग्रहालयाला अर्पण केलीं. या ग्रंथ-संग्रहालयाकरितां पुढें त्यांनीं एक तपाच्या वर अविश्रांतपणें काम करून त्याला भव्य व रमणीय स्वरूप प्राप्त करून दिलें. तसेंच, १८९८ सालीं ब्राह्मण ज्ञातीच्या महाजनवाडीकरितां जे प्रयत्न झाले त्यांतहि नथूकाकांनीं मोठ्या उत्साहानें भाग घेतला होता. यशापयशाची पर्वा न करतां काम करीत रहाणें हा त्यांचा स्वभावधर्मच होता. श्रीशंकर-वाडी निधि, ब्रा. हितवर्धिनी सभा व ब्रा. वि. स. मंडळ या संस्थांचें जनकत्व त्यांचेंच होतें. या सर्व संस्थांसाठीं त्यांनीं जे परिश्रम केले त्याची माहिती इतरत्र आलेली आहेच.

चारहि संस्थांचें एकीकरण झाल्यानंतर ब्रा. सभेनें जीं कामें आरंभिलीं आणि यशस्वी रीतीनें तडीस नेलीं त्याच्या श्रेयाचा मुख्य वांटा नथूकाकांना दिला पाहिजे. लोकसेवा हें त्यांना व्यसनच होतें. आपल्या एखाद्या व्यसनासाठीं एखादा मनुष्य आपल्या फायद्यावरहि पाणी सोडावयास तयार होतो तसेंच विनाप्रयत्न ऑफिसांतील सुपरिंटेंडेंटची जागा मिळत असूनहि ती जागा आपण स्वीकारल्यास आपणास समाजसेवेला पुरेसा वेळ मिळणार नाहीं म्हणून नथूकाकांनीं ती जागा स्वीकारली नाहीं !

मिळविलेलें धन लोकसेवेसाठीं खर्च करणारे ज्याप्रमाणें मोठे त्याप्रमाणें लोकसेवेंत अंतर पडूं नये म्हणून धन मिळविण्याचें नाकारणारेहि थोरच होत. कोणाशींहि गरिबीनें बोलावें, दात्यांच्या घरीं लीनपणें जावें, ते कामांत असल्यास पुन्हा एखादे वेळीं येईन असें त्यांस नम्रपणें सुचवावें, साहेब कामांत आहेत अशी देवडीवाल्यानें शिताफी केल्यास

बाहेरच्या बांकावरच बसून रहावें पण अपेक्षित देणगी हातीं पडेपर्यंत पिच्छा सोडूं नये हें नथूकाकांचें व्रत होतें.

स्वयंसेवकास अवश्य ती निरपेक्षता, अंगीकृत कार्याचा अखंड ध्यास, विनय, मनमिळाऊ व गोड स्वभाव या त्यांच्या गुणांमुळें ते एक आदर्श स्वयंसेवक होते असेंच कोणालाहि म्हणावें लागेल.

१९१८ च्या सांथीच्या प्रसंगीं त्यांनीं जें कार्य आरंभिलें आणि आपल्या मित्रमंडळींच्या सहकार्यानें तडीस नेलें त्याचा ब्राह्मण ज्ञातीलाच केवळ नव्हे तर मुंबईंतील कोणालाहि विसर पडणें शक्य नाहीं. श्रीशंकरवाडी गृह घेतांना " तुम्ही ठराविक मुदतीपर्यंत निधि जमविण्याची शिकस्त करा. जेवढी रक्कम कमी पडेल तेवढी सभेस कर्जाऊ मिळवून देण्याची मी हमी घेतों," असें श्री. नवरे यांनीं सभेच्या कार्यकर्त्यांस जें आश्वासन दिलें होतें त्याच्या मुळाशीं श्री. नवरे यांना नथूकाकांच्या कर्तृत्वाबद्दल वाटत असणारा विश्वासच होता. त्यानंतरहि सभेला ज्या ज्या मोठ्या देणग्या मिळाल्या त्याला नथूकाकांची कल्पकता, आर्जवशक्ति व विनयशीलता याच गोष्टी प्रामुख्यानें कारणीभूत झाल्या आहेत.

मुंबईंतीलच नव्हे तर महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व प्रतिष्ठित मंडळींशीं त्यांचा परिचय होता व त्या मंडळीलाहि नथूकाकांच्या समाजसेवेबद्दल कौतुक व आदर वाटे. नेक नामदार डॉ. बाबासाहेब जयकर एका काळीं संस्कृत विषय शिकवीत असत. एकदां ते भर्तृहरीचा

परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यम्।
निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः॥

हा श्लोक शिकवीत असतां, या काळांत असा एखादा संत आहे काय, असा त्यांना एका विद्यार्थ्यानें प्रश्न केला. तेव्हां तसा एक संत मला माहीत आहे असें बाबासाहेबांनीं उत्तर दिलें. त्यावर 'तो कोण'

कै. श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर

श्री. वा. रा. गुळवणे

श्री. शं. म. सिधये

श्री. सी. ना. भातखंडे



श्री. स. वा. टिल्लू

श्री. वा. ग. जोशी

असा प्रश्न येतांच बाबासाहेबांनीं 'श्री. अंबादास गोपाळ पुणतांबेकर' असें उत्तर दिलें.

साधारण स्थितींतील माणसालाहि सार्वजनिक कार्य करण्याचें क्षेत्र नथूकाकांनीं निर्माण केलें. मुंबईचे आपले आजचे पंतप्रधान दे. भ. बाळासाहेब खेर हेहि 'सार्वजनिक काम करण्याची स्फूर्ति आपणाला श्री. नथूकाका पुणतांबेकर यांच्याकडूनच मिळाली' असें मोठ्या अभिमानानें सांगतात. नथूकाका हे एका स्वयंसेवकीय मार्गाचे जसे प्रणेते तसेच सार्वजनिक कामासाठीं नाटकें, सर्कशी वगैरे मार्गांनीं निधि जमा करण्याच्या मार्गाचेहि प्रणेते होत. धर्मार्थ खेळ घेण्याची प्रथा नथूकाकांच्या पूर्वी माहीत नव्हती. देवल सर्कसच्या व्यवस्थापकाचें काम केलेले श्री. रामभाऊ पटवर्धन यांच्यासारखीं माणसें आज सुदैवानें हयात असल्यामुळेंच नाटक कंपनी किंवा सर्कस यांच्या चालकांना ही कल्पना पटवून देण्याच्या बाबतींत नथूकाकांना किती कष्ट पडले याची माहिती मिळूं शकते.

ब्रा. सभेनें दि. १५-३-१९३६ ला त्यांचा सत्कार करून त्यांना रु. ३३४५-४-० अर्पण केले. या सत्कारसमारंभाचें प्रतीक नथूकाकांजवळ कायमचें रहावें या हेतूनें रौप्यकरंडकांतून मानपत्र व सुवर्णाची प्रतिमा अर्पण करण्यांत येऊन रु. २००० ची थैली त्यांना देण्यांत आली. त्या प्रसंगीं श्री. पां. वा. काणे, डॉ. कृ. श्री. म्हसकर, श्री. बापूसाहेब भाटवडेकर, रा. ब. दा. गो. पाध्ये, रा. ब. पटवर्धन व श्री. वा. रा. गुळवणे यांचीं नथूकाकांच्या गुणवर्णनपर भाषणें झाल्यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणांत दे. भ. तात्यासाहेब केळकर म्हणाले:—

" या समारंभाचा अध्यक्ष होण्याची संधि मला मिळाली हें मी माझें भाग्य समजतों. श्री. पुणतांबेकर यांनीं ४८ वर्षें समाजाची अखंड

सेवा केली पण त्याबद्दल सन्मान फक्त एकाच दिवशीं झाला. श्री. पुणतांबेकरांनीं केलेल्या निरपेक्ष कार्याला उपमाच द्यावयाची तर ती पावसाचीच देतां येईल. बिचारा रात्रीं अपरात्रीं, कोणाचेंहि दर्शन होणार नाहीं अशा वेळीं व अशा ठिकाणीं पडतो व जिकडे जिकडे पाणीच पाणी करून शेतकऱ्याची जमीन तयार करून देतो. सकाळीं शेतकरी उठला कीं, कृतज्ञताबुद्धीनें पावसाचे आभार मानण्यासाठीं पुढें येतो पण तो तर केव्हांच दूर निघून गेलेला असतो."

कोणतेंहि काम निघालें किंवा कोणावरहि कसलीहि आपत्ति आली कीं, नथूकाका तेथें धांवून जायचेच ! नथूकाकांची कार्यपद्धति अखिल समाजाला मार्गदर्शक होण्यासारखी होती यांत कांहींच शंका नाहीं.

(२) स्वयंसेवक शाखा

१९३० ते १९४१

गेल्या बारा वर्षांच्या अहवालावरून स्वयंसेवक शाखेची संघटना उत्तम प्रकारें होऊन सभेच्या प्रचाराच्या कार्मीं या शाखेचें उत्कृष्ट साहाय्य झाल्याचें वाचकांना माहीतच आहे. दुसऱ्या बारा वर्षांच्या मुदतींत या शाखेचें काम वाढत्या प्रमाणावर झाल्याचें दिसून येईल. शाखेच्या वर्गणीवसुलीची रक्कम वाढत वाढत जाऊन १९४० व १९४१ या दोन वर्षांत ती रु. १२८२५ चे वर गेली. या बारा वर्षांच्या अवधींत ही वट रक्कम रु. ६२१८५–४–० इतकी झाली. या अवधींत ८८ आश्रयदाते, ४०३ तहाहयात सभासद व २१८५ वर्गणीदार सभासद सभेला मिळाले.

वर्गणीवसुली

पहिलीं चार वर्षें स्वयंसेवकांचें वर्गणीवसुलीचें काम धिमेपणानें चाललेलें होतें. पण पांचव्या वर्षीं स्वयंसेवकांनीं कंबरा कसल्या आणि त्या वेळेपर्यंत एका वर्षाच्या अवधींत केव्हांहि जमा न झालेली अशी रु. ६०७०–८–० एवढी रक्कम वर्गणीच्या रूपानें गोळा करून दाखविली.

ब्रा. सभेनें नेमलेल्या नियमदुरुस्ती समितीनें १९३६ सालीं नियमांचा मसुदा तयार केला व थोड्याफार फरकानें तो व्यवस्थापक मंडळांत व साधारण सभेंत पसारहि झाला. या बाबतींत उत्पन्न झालेल्या मतभेदाची झळ स्वयंसेवक शाखेला लागली व कित्येक वर्षें काम केलेल्या कांहीं स्वयंसेवकांनीं शाखेकडे आपले राजीनामे पाठविले. कांहीं कार्यकर्त्यांनीं त्यांच्याशीं विचारविनिमय केल्यानंतर त्यांतील कांहीं जणांनीं आपले राजीनामे परत घेतले पण बाकीच्यांची समजूत न पडल्यामुळें सभेला त्यांच्या कर्तृत्वास मुकावें लागलें. कांहीं जुने स्वयंसेवक कमी झाल्यामुळें शाखेला विशेष जोरानें काम करावें लागलें व असलेल्या स्वयंसेवकांनीं श्रमांची पराकाष्ठा करून वर्गणीवसुलीचा आंकडा रु. ६१७९-४-० पर्यंत नेला. या दुसऱ्या बारा वर्षांच्या अखेरीला तर वार्षिक वर्गणीवसुलीचा आंकडा रु. ७०६३ पर्यंत गेलेला दिसतो. एकंदरीनें वर्गणीवसुलीच्या दृष्टीनें पहिल्या बारा वर्षांच्या मानानें दुसऱ्या बारा वर्षांत शाखेचें पाऊल पुष्कळच पुढें पडलें आणि या शाखेचें सभेस किती साह्य होतें हें चांगलें दिसून आलें.

चिकाटीचे कार्यकर्ते

वर्गणीवसुलीखेरीज इतर अनेक कामें स्वयंसेवक करीत. साधारणपणें प्रत्येक वर्षीं ३०–३५ कार्यक्रमांचीं हस्तपत्रकें वाटणें, सभेमार्फत होणाऱ्या सर्व कार्यक्रमांची सभासदांना समाधान वाटेल अशा रीतीनें व्यवस्था करणें, हीं कामें त्यांना असतच. या दुसऱ्या बारा वर्षांच्या अवधींत ज्या स्वयंसेवकांनीं सभेची उत्कृष्ट सेवा केली त्यांचा उल्लेख केल्याशिवाय पुढें जावयत नाहीं.

पहिलीं दोन वर्षें या शाखेचें कर्णधारित्व श्री. दत्तोपंत अभ्यंकर यांजकडे होतें. त्यानंतर हें कार्य विशेष जोरानें पुरस्कृत करण्याचें काम श्री. आत्माराम अनंत मावळंकर यांनीं केलें. त्यांनीं व त्यांचे सहकारी

श्री. शं. वि. काणे, श्री. भा. ज. आठवले, श्री. मा. र. सप्रे व शाखेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मणराव जोशी यांनीं अत्यंत चिकाटीनें व कौटुंबिक आपत्तींनाहि न जुमानतां जें काम केलें त्याचेंच प्रत्यक्ष फळ म्हणजे शाखेनें वर्गणीवसुलीच्या बाबतींत १९३५ सालीं गांठलेला पहिला उच्चांक होय.

यानंतर मतभेदाच्या खडकावर आपटून स्वयंसेवक संघाची ही नौका दुभंगते कीं काय अशी साधार भीति वाटूं लागली असतांना ती सुरक्षित राखून पैलतीरीं नेण्याची जबाबदारी श्री. वा. स. भावे व श्री. रा. दि. राईलकर यांच्यावर पडली व या बाबतींत त्यांना शाखेचे अध्यक्ष श्री. टिल्लू तसेंच श्री. द. कृ. निमकर, श्री. कृ. सी. पिटकर, श्री. ग. र. बर्वे यांनीं साह्य केलें. या प्रसंगीं या सर्वांनाच श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. वा. रा. गुळवणे यांनीं फार मदत केली. किंबहुना यांच्या मदतीशिवाय त्या बिकट परिस्थितींतून मार्ग काढणें सुतराम् अशक्य झालें असतें. त्यामुळें १९३६ सालींहि १९३५ सालीं मिळविलेल्या यशाला कमीपणा न येईल अशा प्रकारें शाखेनें वर्गणीवसुलीचें काम करून दाखविलें. १९४०–४१ मध्यें श्री. द. मो. सहस्रबुद्धे व श्री. अ. के. बर्वे यांनीं या शाखेचें कार्य यशस्वी रीतीनें केलें व त्यांच्या कार्यांत शाखेचे अध्यक्ष श्री. कृ. सी. पिटकर व श्री. द. कृ. निमकर यांचें त्यांना बहुमोलाचें साह्य झालें. त्यापूर्वीच्या कोणत्याहि दोन वर्षांच्या अवधींत वर्गणीवसुली झालेली नव्हती इतकी रक्कम शाखेनें या शेवटच्या दोन वर्षांत जमविली व प्रगतीचा मार्ग चालू ठेवला.

सन्मान्य आश्रयदाते

सभेच्या नियमानुसार ज्या स्वयंसेवकानें स्वयंसेवकाच्या नात्यानें सतत पंधरा वर्षें काम केलेलें असतें तो सभेचा सन्मान्य आश्रयदाता होतो. मात्र तो स्वयंसेवक सन्मान्य आश्रयदाता ठरविण्यास पात्र आहे अशी स्वयंसेवक शाखेची शिफारस असावी लागते. हा नियम ब्रा.

सभेच्या दि. १-७-१९३४ च्या साधारण सभेंत पसार झालेला होता. या नियमानुसार स्वयंसेवक शाखेनें शिफारस केल्यावरून श्री. ल. ग. जोशी, श्री. ह. श्री. साठे, श्री. ग. र. बर्वे हे तीन स्वयंसेवक सभेचे सन्मान्य आश्रयदाते झाले.

श्री. ल. ग. जोशी हे १९२० सालीं ब्रा. सभेचे स्वयंसेवक झाले. तेव्हांपासून साधारणपणें साठ सभासदांची वर्गणी ते वसूल करीत. तसेंच वर्गणीवसुलीच्या कामांत ते इतर स्वयंसेवकांसहि साह्य करीत. कांहीं वर्षें ते शाखेचे अध्यक्षहि होते.

श्री. ह. श्री. साठे हे संयुक्त ब्रा. सभेच्या प्रारंभापासून स्वयंसेवक म्हणून सुमारें पन्नास सभासदांची वर्गणी वसूल करीत. याशिवाय दुसरी कामांतहि सभेला त्यांचें चांगलें साह्य होत असे. हीं दोन्ही कामें संभाळून ब्रा. सभेच्या उत्सवसंमेलनादि कार्यांत अक्षरशः पडेल तें काम ते करीत असत. त्यांनीं केलेल्या कामाला उपमा द्यावयाची तर ती त्यांच्याच कामाची द्यावी लागेल. शाखेचे चिटणीस या नात्यानें त्यांनीं दोन वर्षें काम केलें होतें. शंकरवाडी गृहाची व्यवस्था ते फार बारकाईनें पहात. तसेंच, सामानसुमान, भांडीं वगैरेंची ते अतिशय काळजी घेत. नोकरीची वेळ सोडल्यास बाकीचा सर्व काळ ते सभेच्याच कामाला लावीत असत. साधारण सभेच्या उपाध्यक्षापासून सभेच्या शिपायापर्यंतचीं सर्व कामें त्यांनीं आपुलकीच्या भावनेनें केलेलीं आहेत. प्रसिद्धिपराङ्मुखता, सौजन्य, उद्योगप्रियता वगैरे गुणांनीं परिपूर्ण असा हरिभाऊ साठ्यांसारखा स्वयंसेवक आढळणें कठीणच !

श्री. ग. र. बर्वे हेहि सभेच्या प्रारंभापासून स्वयंसेवकाचें काम करीत. साधारणपणें साठ पांसष्ट सभासदांची वर्गणी ते वसूल करीत असत. शाखेच्या अध्यक्षाचें काम त्यांनीं कांहीं काळ केलें असून ते सर्वांशीं खेळीमेळीनें वागत असत.

नामफलक अनावरण समारंभ

ब्रा. स. व्य. मं. नें दि. ३०–११–३५ च्या सभेंत झालेल्या ठरावा-प्रमाणें एक सुंदर नामफलक तयार करून "ज्यांनीं आमरणान्त बहुमोल व निरपेक्ष सेवा केली" अशा गृहस्थांचीं नांवें त्यावर लिहून ठेवावीं असा प्रस्ताव संमत केला व त्याप्रमाणें श्री. मारुति लक्ष्मण तथा मामा मराठे, श्री. गोविंद हरि मोडक, श्री. विनायक भिकाजी निवर्गी व श्री. चिंतामण जनार्दन खेर यांचीं नांवें त्या फलकावर लिहून त्यांचा अनावरणसमारंभ श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्तें दि. १४–३–३७ ला साजरा केला. त्यावेळीं श्री. वा. रा. गुळवणे यांनीं नामफलकावर लिहिलेल्या चारी स्वयंसेवकांची पुढीलप्रमाणें माहिती सांगितली.

श्री. मामा मराठे हे ब्रा. वि. स. मं. चे प्रारंभापासून स्वयंसेवक होते. एकीकरणानंतर ते ब्रा. सभेचे स्वयंसेवक झाले. ब्रा. वि. स. मं. चे ते एवढे एकनिष्ठ स्वयंसेवक होते कीं, वर्गणी मागतांना ते नेहमीं शिक्षण शाखेकरितांच मागत. मात्र एखाद्यानें ब्रा. सभेचा सभासद होण्याची इच्छा दर्शविली तर ते वर्गणी घेत असत. समाजोपयोगी असें कोणतेंहि काम करण्याची त्यांची केव्हांहि तयारी असे. विशेष गर्दीच्या कार्यक्रमांच्या प्रसंगीं तृषार्तांना पाणी पुरविण्यासाठीं खांद्यावर घागर घेऊन इकडे तिकडे धांवपळ करतांना मामांना कित्येकांनीं पाहिलेलें असेल.

श्री. गोविंद हरि मोडक हे बी. ए. होते. ब्रा. वि. स. मंडळातर्फे निघालेल्या वर्गांत ते संस्कृत शिकवीत असत. एकीकरणानंतर ते वर्गणी-वसुलीचें काम करूं लागले. तहाहयात सभासद व आश्रयदातेहि ते सभेसाठीं मिळवीत असत. ज्यांना शिष्यवृत्त्या द्यावयाच्या अशा विद्यार्थ्यांची निवड करण्याकरितां श्री. पां. वा. काणे यांच्याबरोबर श्री. मोडक यांचीहि योजना झालेली होती. दोन वर्षें ते स्वयंसेवक शाखेचे चिटणीस होते.

श्री. विनायक भिकाजी निवर्गी यांनीं ब्रा. हितवर्धिनी सभेंत आपल्या सार्वजनिक कामाला सुरुवात केली. शक्य तों लोकांच्या नजरेस न पडतां काम करीत रहाणें हें त्यांचें वैशिष्ट्य होतें. एकीकरणानंतर अत्यंत नीरस आणि अतिशय जिकिरीचें असें हिशेब लिहिण्याचें काम ते मोठ्या कसोशीनें करीत. ते स्वभावानें मोठे प्रेमळ असून स्वयंसेवकांना कोणत्याहि प्रकारची मदत करण्यास ते नेहमीं तयार असत.

श्री. चिंतामण जनार्दन खेर हे १९१४ सालीं ब्रा. वि. स. मं. चे स्वयंसेवक झाले. तेव्हांपासून ते शंभराच्या वर लोकांकडून वर्गणी वसूल करीत. एकीकरणानंतर ते ब्रा. सभेचे स्वयंसेवक झाल्यावर दोनशेंच्या वर सभासदांकडून वर्गणी जमा करण्याचें काम त्यांनीं सुरू केलें. १९३२ सालीं ते निधन पावले. आपल्या मृत्यूपूर्वी फक्त सातच दिवस काय तें त्यांनीं काम केलें नाहीं. ब्रा. वि. स. मं. व ब्राह्मण सभा यांच्यासाठीं त्यांनीं १९ वर्षें स्वयंसेवकाचें काम केलें व त्या अवधींत त्यांनीं रु. २५००० वर्गणीच्या रूपानें जमविले.

श्री. वा. रा. गुळवणे यांच्या नंतर डॉ. म्हसकर, श्री. पां. वा. काणे व श्री. अं. गो. पुणतांबेकर यांचीं या चार स्वयंसेवकांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. श्रींनीं श्रीमारुतिरायाचें उदाहरण देऊन आदर्श स्वयंसेवक कसा असावा हें सांगितलें व ज्यांना स्वयंसेवकाचें काम करावयाचें आहे त्यांनीं अभिमानापासून अलिप्त राहिलें पाहिजे असा उपदेश केला.

शाखेचीं संमेलनें

दि. १७–१२–१९३३ ला सौ. बाळ गंगाधर खेर यांच्या अध्यक्षतेखालीं स्वयंसेवक शाखेचें संमेलन झालें. तसेंच १९३८ सालीं श्री. अफझुलपूरकर यांच्या अध्यक्षतेखालीं शाखेचें संमेलन झालें. ब्रा. सभेच्या कार्यास प्रोत्साहन देण्यास या दोन्ही संमेलनांचा फार उपयोग

झाला. १९३९ सालीं श्री. ना. वि. मोडक सिटी एंजिनिअर यांच्या अध्यक्षतेखालीं शाखेचें संमेलन होऊन पोटसंघांचें एकीकरण वगैरे विषयांवर चर्चा करण्यांत आली.

सन्मान्य आश्रयदाते

या दुसऱ्या बारा वर्षांच्या काळांत आणखी पांच स्वयंसेवक सन्मान्य आश्रयदाते झाले. श्री. वा. रा. गुळवणे, श्री. म. वा. टिल्लू, श्री. वा. ग. जोशी, श्री. शं. म. सिधये व श्री. सी. ना. भातखंडे हे ते पांच स्वयंसेवक होत.

श्री. वा. रा. गुळवणे हे १९१३ सालीं ब्रा. वि. स. मं. चे स्वयंसेवक झाले व एकीकरणानंतर ब्रा. सभेचे स्वयंसेवक झाल्यावर ते सुमारें शंभर सभासदांची वर्गणी वसूल करीत. या शाखेचे चिटणीस म्हणून त्यांनीं सहा वर्षें काम केलें. दप्तरी कामांत त्यांची फार मदत होत असून व्य. मं. लाहि त्यांचा फार उपयोग होत असे.

श्री. म. वा. टिल्लू हे १९२० सालापासून ब्रा. सभेचे स्वयंसेवक झाले. प्रथम २५ व नंतर कांहीं वर्षांनीं ५५ सभासदांची वर्गणी ते वसूल करीत. चार वर्षें ते स्वयंसेवक शाखेचे अध्यक्ष होते.

श्री. वा. ग. जोशी हे १९२२ सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. हे सुमारें २५–३० सभासदांची वर्गणी वसूल करीत. त्यांची रहाणी अतिशय साधी असून स्वभाव फार प्रेमळ होता.

श्री. शंकर महादेव सिधये हे १९२० सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. ते दादर–माटुंगा विभागांतील २०–२५ सभासदांची वर्गणी वसूल करीत असत.

श्री. सी. ना. भातखंडे हे १९२१ सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. ते विलेपार्ले येथील ३०–३५ सभासदांची वर्गणी वसूल करीत. स्वभावानें ते अतिशय मनमिळाऊ होते.

(३) श्रीशंकरवाडी

१९३० ते १९४१

मुंबईसारख्या ठिकाणीं ब्राह्मणांची अशी एक महाजनवाडी पाहिजे ही कल्पना श्री. काशीनाथ त्र्यंबक खरे यांच्या डोक्यांत प्रथम आली नि त्यानंतर चाळीस वर्षांनीं ती महाजनवाडी मुंबईंतील ब्राह्मण वस्तीच्या प्रमुख भागांत 'शंकरवाडी' हें नांव धारण करून दिसूं लागली !

जुन्या घरांत योग्य त्या दुरुस्त्या करून लग्नमुंजीसारख्या कार्यांकरितां तळमजला तयार झाला. पहिल्या मजल्याचें रूपांतर एका सुंदर दिवाणखान्यांत झालें. एका मोठ्या विहिरीनें अडविलेल्या जागेवर श्री. भाऊसाहेब तांबे यांच्यासारख्या स्थापत्यशास्त्रविशारदानें आपल्या कल्पकतेनें दोन्ही इमारतींना जोडणारी अशी एक तीनमजली छोटीशी इमारत उभारली. अशा रीतीनें मुंबईंतील कोणाहि ब्राह्मणानें 'हें माझें ज्ञातिगृह' म्हणून अभिमानानें म्हणावें असें स्थान निर्माण झालें.

आणखी एक इमारत ?

सन १९३२ च्या अखेर श्रीशंकरवाडी गृहाच्या पश्चिम बाजूची इमारत विक्रीस निघाल्याचें समजलें. श्री. भाऊसाहेब तांबे व श्री. हरि

मोरेश्वर अभ्यंकर या स्थापत्यविशारदांनीं त्या इमारतीची पहाणी केली. त्या इमारतीची त्या वेळची स्थिति, जागेचें क्षेत्रफळ, येणारें मासिक भाडें वगैरेंचा विचार करून ती सभेनें जास्तींत जास्त रु. ५५००० पर्यंत खरेदी करावी अशी त्या दोन तज्ज्ञांनीं शिफारस केली. त्याप्रमाणें सभेच्या सांपत्तिक परिस्थितीचा विचार करून दि. १५-११-३२ ला व्य. मं. नें एक योजना तयार केली. या इमारतीच्या खरेदीसंबंधीं सर्व व्यवस्था करण्याकरितां वरील दोन तज्ज्ञ, श्री. पां. वा. काणे, व्य. मं. चे अध्यक्ष व चिटणीस यांची समिति नेमण्यांत आली. या समितीनें घरमालक व त्यांचे कायद्याचे सल्लागार यांच्याशीं विचारविनिमय केला आणि रु. ६५००० पर्यंत ती जागा व तीवरील इमारत खरेदी करण्याचें बोलणें केलें. याहून अधिक किंमत देणें अव्यवहार्य वाटल्यावरून सांगितलेल्या किंमतीसच तें घर मिळविण्याची या मंडळींनीं शिकस्त केली. पण त्या घर-मालकाला याहून अधिक किंमत देणारें एक गिऱ्हाईक मिळालें आणि त्यानें या समितीला न कळवितां त्या गिऱ्हाइकाशीं सौदा कायम केला. अर्थात् समितीचा हेतु सिद्धीस गेला नाहीं.

खर्च कमीच आला

पहिल्या बारा वर्षांच्या इतिहासांत मागील बाजूची इमारत पुरी होत आल्याचा उल्लेख आलेला आहे. या चारमजली इमारतीला रु. ४५००० खर्च येईल असा अंदाज होता. नेहमींच्या व्यवहारांतील अनुभवाप्रमाणें हा खर्चाचा आंकडा वाढावयाचा पण सर्व इमारत पुरी होऊन कंत्राटदाराचें अखेरचें बिल आल्यावर इमारतीस रु. ४१३२२ खर्च आल्याचें कळलें. याचें कारण म्हणजे श्री. भाऊसाहेब तांबे यांना ग्रा. सभेबद्दल वाटत असलेली आत्मीयताच होय. या खर्चापैकीं बरीचशी रक्कम पूर्वीच पोहोंचलेली होती. १९३१ सालीं

रु. ५९१६ व बाकीची सर्व रक्कम १९३३ अखेर देऊन टाकण्यांत आली.

विद्यार्थिनींची सोय

सूतिकागृहातर्फे (या संस्थेचा इतिहास स्वतंत्र शीर्षकाखालीं देण्यांत येणार आहे.) चालविण्यांत येणाऱ्या बी. पी. एन्. ए. च्या वर्गास योग्य रीतीनें मान्यता मिळाल्यामुळें त्या वर्गांतील विद्यार्थिनींची रहाण्याची सोय व्हावी म्हणून शंकरवाडींतील मागील बाजूच्या इमारतीवर आणखी एक मजला बांधण्याचें ठरलें. त्याप्रीत्यर्थ एकंदर रु. १०८५२-०-३ इतका खर्च आला. या प्रीत्यर्थ डॉ. म्हसकरांनीं रु. ६२८७ ची आणखी एक मोठी देणगी सभेस दिली व भगिनी समाजानें अर्पण केलेल्या निधींतून रु. ३६१६-११-० देणगीदाखल सभेस दिले. यामुळें या मजल्याप्रीत्यर्थ सभेच्या कायम निधींतून फक्त रु. ९४४-५-९ एवढीच रक्कम खर्च करावी लागली. या मजल्यामुळें विद्यार्थिनींना राहण्याची चांगली सोय झाली.

रु. १०००० च्या दोन देणग्या

शंकरवाडींतील दर्शनी इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचें लांकूडकाम खराब झाल्याचें आढळलें व त्यास जास्त मजबुती व उठावदारपणा आणण्यासाठीं बरीच दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचें स्थापत्यविशारदांचें मत पडल्यावरून या नवीन कामासाठीं श्री. भाऊसाहेब ताबे यांनीं एक नकाशा तयार करून या कामासाठीं येणाऱ्या रु. १०००० च्या खर्चाचें अंदाजपत्रक व्य. मं. स सादर केलें. पण द्रव्याभावीं तें काम थोडें लांबणीवर पडलें.

श्री. पांडुरंग वामन काणे यांचे नातलग रा. ब. बाळकृष्ण परशुराम करंदीकर, माजी सर न्यायाधीश संस्थान बडोदें, यांच्या मनांतून कांहीं तरी देणगी ब्राह्मण ज्ञातिकार्यासाठीं द्यावयाची आहे हें समजल्या-

बरोबर, श्री. पां. वा. काणे यांनीं ब्रा. सभेचें कार्य रावबहादुरांच्या निदर्शनाला आणून त्यांच्या देणगीचा ओघ ब्रा. सभेकडे वळविला. ही देणगी मिळाल्याबरोबर दुसऱ्या मजल्याच्या कामाला सुरुवात झाली. तसें करतांना आणखी एक मजला बांधणेंहि कदाचित् सभेला शक्य होईल अशा धोरणानेंच इमारतीचें साहित्य श्री. भाऊसाहेब तांबे यांनीं खरेदी केलें आणि दुसऱ्या मजल्याचें काम अर्धेअधिक झाल्याबरोबर तिसऱ्या मजल्यासंबंधींचे आपले विचार श्री. रानडे यांना कळविले. श्री. रानडे यांनीं थोडी विशेष जबाबदारी पत्करून श्री. भाऊसाहेबांच्या या विचारास पाठिंबा दिला व त्यांनींहि तिसरा मजला उभारण्याच्या दृष्टीनें साहित्यखरेदीच्या कामास सुरुवात केली. व्य. मं. पुढें या अधिक खर्चाचा विचार येतांच थोडा मतभेद उत्पन्न झाला. पण अशा खर्चाची तजवीज एका विशिष्ट देणगीनें होईल असें श्री. अं. गो. पुणतांबेकर यांच्याकडून आश्वासन मिळतांच व्य. मं. नें या नवीन कामास आपली संमति दिली व श्री. अं. गो. पुणतांबेकर हे आश्वासन पूर्ण करण्याच्या प्रयत्नाला लागले.

कै. श्री. कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे यांना महाजनवाडीसंबंधीं किती आस्था होती हें श्री. पुणतांबेकर यांना माहीत होतें. म्हणून त्यांनीं डॉ. आठवले, श्री. का. वि. खानविलकर व श्री. पातकर यांच्या सहकार्यानें डोंगरे बंधूंना या कार्याचें महत्त्व पटवून दिलें व त्यांच्याकडून रु. १०००० ची देणगी सभेकरितां मिळविली आणि व्य. मं. स दिलेलें आश्वासन पूर्ण केलें. या दोन देणग्यांमुळें 'हरि केशव गोखले हॉल'च्या वर दोन मजले उभारण्याचा व्य. मं. चा संकल्प सिद्धीस गेला.

पुणतांबेकर मठी

श्री. भाऊसाहेब तांबे यांनीं सर्व इमारतीची कसून तपासणी केली आणि वरील दोन्ही मजल्यांची उभारणी भक्कम पायावर व्हावी या

दृष्टीनें आवश्यक त्या सर्व सुधारणा केल्या. श्री. भाऊसाहेबांनीं हें सर्व काम आपल्या नजरेखालीं करून घेतल्यामुळें सर्व इमारत आमूलाग्र नवीनच दिसूं लागली. १९३३ सालची शंकरवाडी आणि १९३९ ची शंकरवाडी या दोन चित्रांकडे पाहतां शंकरवाडीस नवीन प्राप्त झालेल्या भव्य व रमणीय स्वरूपाबद्दल कोणालाहि साभिमान आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं. ज्या दोन दात्यांच्या औदार्यामुळें सभेला हें काम इतक्या त्वरित करतां आलें त्यांच्या औदार्याचें स्मृति-चिन्ह रहावें व त्यापासून धनिकांना स्फूर्ति मिळावी म्हणून या दोन मजल्यांना अनुक्रमें 'करंदीकर हॉल' व 'श्री. रखमाबाई डोंगरे हॉल' अशीं नावें देण्यांत आलीं. या मजल्यांचें काम चालू असतांना श्री. भाऊसाहेब तांबे यांनीं ब्रा. सभेंतच आपला मुक्काम ठेवला होता व त्यांच्याबरोबर श्री. अं. गो. पुणतांबेकर यांचें वास्तव्यहि सभेंतच होतें. श्री. पुणतांबेकर कर्मठ वृत्तीचे असल्यामुळें त्यांचीं संध्यादि आन्हिकें असत. त्यांना तीं स्वस्थ मनानें उरकतां यावींत म्हणून करंदीकर हॉलच्या गॅलरींत एका बाजूला श्री. भाऊसाहेब तांबे यांनीं एक लहानशी खोली तयार केली व त्या खोलीला ते विनोदानें 'पुणतांबेकर मठी' असें म्हणत.

या दोन्ही मजल्यांप्रीत्यर्थ रु. २५००० खर्च येईल असा अंदाज होता पण प्रत्यक्ष खर्च रु. २२४४७-१०-११ इतकाच आला. यावरून श्री. भाऊसाहेब तांबे यांची कल्पकता व ते घेत असलेली दक्षता व परिश्रम यांची कोणालाहि सहज कल्पना येईल.

शंकरवाडीचें मूल्य

१९३५ अखेर श्रीशंकरवाडी गृहाच्या जागेची किंमत रु. ३५००० आणि त्यावरील इमारतीची किंमत रु. १२६८३८-१०-११ मिळून एकंदर रु. १६१८३८-१०-११ इतकी होती. या इमारतींत कांहीं कायम

स्वरूपाच्या दुरुस्त्या वगैरे होऊन १९३९ अखेर या सर्व इमारतीची किंमत रु. १७३४४२-८-११ इतकी झाली होती. या कार्याप्रीत्यर्थ निधिरूपानें रु. १५८४४१-८-११ जमा झाले. शिक्षणशाखेच्या ठेवींतील रु. २००० व व्यायामशाळेच्या ठेवींतील रु. ६००१ मिळून रु. १५००१ या कामाप्रीत्यर्थ सभेनें उपयोगांत आणले होते. ब्राह्मण सभा व तिच्या शाखा यांचा परस्पर संबंध लक्षांत घेऊन व सभेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून शिक्षणशाखा व व्यायामशाखा या दोन्ही शाखांच्या शिफारसीप्रमाणें या शाखांच्या वरील रकमांच्या ठेवी ब्रा. सभेस देणग्या म्हणून समजाव्या असें ठरलें; व याप्रमाणें श्रीशंकरवाडीची जागा व त्यावर असलेल्या सर्व इमारती सन १९३९ अखेर अगदीं निष्कर्ज स्थितींत ब्रा. सभेच्या मालकीच्या झाल्या. मात्र त्यावरील घसारा इमारतशास्त्राच्या नियमाप्रमाणें वेळोवेळीं होणाऱ्या उत्पन्नांतून भरून काढावा असें त्याच वेळीं ठरविण्यांत आलें.

सर्व समाजाला उपयोग

श्रीशंकरवाडी गृह व त्या गृहांतील हरि केशव गोखले हॉल व करंदीकर हॉल यांचा उपयोग ब्राह्मणांप्रमाणेंच इतर जातींच्या व अनेक संस्थांच्या समारंभांसाठीं होतो. अशा समारंभांच्या प्रसंगींहि ब्राह्मण-अब्राह्मण अशा प्रकारचा भेदभाव करण्यांत येत नाहीं.

श्रीशंकरवाडी गृह भर रस्त्यावर व मध्यभागीं असून आंतील स्वच्छ व प्रशस्त दिवाणखाने, विजेची रोशनाई व पंखे यांमुळें सार्वजनिक समारंभ करणारे व त्या समारंभास येणारे सर्व लोक शंकरवाडी गृहाबद्दल प्रशंसोद्गार काढतात. सभागृहांचें क्षेत्रफळ व इतर सुखसोई लक्षांत घेतल्यास त्यांसाठीं ठेवण्यांत आलेलें भाडें फारच अल्प असल्याचें कोणालाहि मान्य करावें लागेल. या उत्पन्नांतूनच नगरपालिकेचा कर, विजेचें बिल वगैरे गोष्टी भागविल्या जात असल्यामुळें निव्वळ

उत्पन्नाकडे नजर न ठेवतां ब्रा. सभा सर्व समाजाच्या सुखसोईंकडेच अधिक लक्ष पुरवीत असते हेंच दिसून येतें.

दर्शनी इमारतीवरील सर्व तिसरा मजला, पिछाडीच्या इमारतीवरील चारहि मजले व या दोन इमारतींस जोडणाऱ्या मधल्या लहान इमारतीचे अगदीं वरचे दोन मजले सूतिकागृहाच्या उपयोगाकरितां सभेनें राखून ठेवलेले असूनहि सूतिकागृहाला ती जागा पुरेशी होत नाहीं असा कार्यकर्त्यांना १९४१ अखेर अनुभव आला.



१९३० सालचें कार्यकारी मंडळ

डोंगरे सभागृहाचा उद्घाटनसमारंभ

श्री. तात्यासाहेब डोंगरे, श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, डॉ. दादासाहेब डोंगरे

(४) शिक्षणशाखा

१९३० ते १९४१

एकीकरणानंतर ब्रा. वि. स. मं. चें रूपांतर ब्रा. सभेच्या शिक्षण-शाखेंत झालें आणि या शाखेचें कार्य प्रगतीच्या मार्गानें चालू असल्याचें वृत्त पहिल्या बारा वर्षांच्या इतिहासांत आलेलेंच आहे. दुसऱ्या बारा वर्षांच्या प्रारंभींच्या काळांत श्री. पां. वा. काणे यांच्या सूचनेवरून श्री. चिंतामण हरि पटवर्धन वकील यांची या शाखेवर संयोजित सभासद या नात्यानें निवड झाली. श्री. पटवर्धन यांना शिक्षणशाखेच्या कार्यासंबंधानें किती आस्था होती हें ब्रा. सभेच्या व्य. मं. वरील बऱ्याच सदस्यांना माहीत असल्यामुळें श्री. पटवर्धन यांची शाखेच्या चिटणीसाचे जागीं निवड झाली. हें काम त्यांनीं सतत आठ वर्षें अत्यंत परिश्रमपूर्वक केलें. ते स्वतः वकील असल्यामुळें परतफेडीच्या अटीवर देण्यांत येणाऱ्या शिष्यवृत्त्यांसंबंधीं सर्व योजना कायदेशीर करून घेण्याची त्यांनीं काळजी घेतली. विद्यार्थ्यांना जास्तींत जास्त शिष्यवृत्त्या देतां याव्यात म्हणून शाखेच्या प्रत्येक व्यवहारा-बाबत ते डोळ्यांत तेल घालून जागरूक असत. १९३८ च्या प्रारंभीं ते व्य. मं. चे उपाध्यक्ष झाले आणि त्यांच्या जागीं श्री. प्र. स. जोशी हे या शाखेच्या चिटणीसाचें काम पाहूं लागले. सन १९४० मध्यें

श्री. प्र. स. जोशी या शाखेचे अध्यक्ष झाले व चिटणीसाचे जागीं श्री. मा. रा. नवांगुळे यांची निवड झाली.

शाखेला देणग्या

या बारा वर्षांच्या प्रारंभींच्या काळांत रा. ब. सीताराम गणेश परांजपे यांनीं रु. १११७-८-० ची देणगी या शाखेला दिली व त्या रकमेचे रु. २००० च्या दर्शनी किंमतीचे रोखे घेण्यांत येऊन त्यांवरील व्याजाचा उपयोग शिष्यवृत्त्या देण्याच्या कामीं करण्याचें ठरलें.

माधवाश्रमाचे मालक श्री. धोंडोपंत सावले यांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं म्हणजे दि. १-२-१९३० ला त्यांच्या नांवें रु. ३००० ची देणगी त्यांचें कुटुंब श्रीमती गोदावरीबाई, त्यांचे पुतणे श्री. रामचंद्र विठ्ठल सावले व श्री. अच्युत गोपाळ सावले व त्यांचे भाचे श्री. परशुराम पांडुरंग महाजन यांनीं शिक्षणशाखेसाठीं म्हणून जाहीर केली. मात्र ही रक्कम न देतां या रकमेचें व्याज दरसाल रु. १५० प्रमाणें द्यावयाचें व शाखेनें त्यांचा उपयोग औद्योगिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत करावयाचा असें या उपर्युक्त मंडळींनीं ठरविलें.

सन १९३२ च्या प्रारंभीं डॉ. कृ. श्री. म्हसकर या उदारधी गृहस्थाचें लक्ष या शाखेच्या कार्याकडे वेधलें आणि या कार्याचें महत्त्व लक्षांत घेऊन त्यांनीं रु. २०००० ची महनीय देणगी या शाखेला दिली. या रकमेवर येणाऱ्या व्याजांतून शिष्यवृत्त्या द्याव्यात अशा हेतूनें रु. २२००० दर्शनी किंमतीचे रोखे घेण्यांत आले आणि असें करतांना कमी पडलेली रक्कम रु. २८७ हि डॉक्टरसाहेबांनीं दिली. अशा प्रकारें रु. २०२८७ ची देणगी त्यांनीं ब्रा. सभेस दिली. एवढी मोठी देणगी एका रकमेनें ब्रा. सभेस देणारे डॉ. म्हसकर हेच पहिले गृहस्थ होत. याच वर्षी श्रीमंत केशव विष्णु गोखले यांनीं औद्योगिक किंवा धंदेशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यासाठीं रु. ५००० ची देणगी ब्राह्मण सभेस दिली.

त्यानंतर श्री. केशव श्रीधर गोखले यांनीं मृत्युपत्रान्वयें नेमलेल्या विश्वस्तांकडून रु. ११०० व श्री. कृष्णाजी शिवराम सोमण यांच्याकडून रु. १००० अशा दोन देणग्या शाखेच्या कार्यासाठीं मिळाल्या.

१९४०–४१ या वर्षीं श्रीमंत वामन श्रीधर ऊर्फ तात्यासाहेब आपटे यांनीं आपले बंधु कै. गोविंद श्रीधर आपटे यांचें स्मारक म्हणून नाविक, वैमानिक व लष्करी शिक्षण घेणें ज्ञातींतील विद्यार्थ्यांना सुलभ जावें म्हणून रु. १२५०० ची देणगी सभेस दिली; ती देणगी 'आपटे शिष्यवृत्ति' या नांवानें देण्याचें व्य. मं. नें ठरविलें.

एकूण मदत

या शिष्यवृत्त्या देतांना शाखेकडून औद्योगिक व धंदेशिक्षण यांचा विशेष रीतीनें विचार केला गेला असल्याचें दिसून येतें. बी. एस् सी. चें, व एंजिनिअरिंग कॉलेज, व्हिक्टोरिया ज्युब्रिली टेक्निकल इन्स्टिटयूट, बडोदें कलाभुवन, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स्, मेडिकल कॉलेज, व्हेटरिनरी कॉलेज इ. ठिकाणीं शिक्षण घेणाऱ्या व लहानमोठ्या इतर धंद्यांचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष पुरविलेलें दिसून येतें. शास्त्राभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनाहि शिष्यवृत्त्या देण्यांत येत असत. पुढील तक्त्यावरून या बारा वर्षांत शाखेकडून कोणत्या व किती विद्यार्थ्यांना कशासाठीं मदत झाली हें दिसून येईल.

वर्ष	उच्च शिक्षण परतफेड अट रु.	उच्च शिक्षण विनापरतफेड रु.	शाळाविद्यार्थी रु.	एकूण रु.
१९३०–३१	६७३१–११–६		९७३–०–०	७७०४–११–६
१९३२–३३	६०८४—८–०	४९०–०–०	७८२–८–०	७३५७—०–०
१९३४–३५	५५४६—६–६	७५०–०–०	९७२–३–०	७२६८—९–६
१९३६–३७	६३७५—४–०	७३५–०–०	१६४०–०–०	८७५०—४–०
१९३८–३९	५७५४—८–०	५७५–०–०	१२७२–८–०	७६०२—०–०
१९४०–४१	५४४७—०–०	७२५–०–०	१९२९–८–०	८१०१—८–०
	३५९३९–६–०	३२७५–०–०	७५६९–११–०	४६७८४–१–०.

एका संस्थेची देणगी

१९३४–३५ या काळांत शिष्यवृत्त्यांसाठीं सभेकडे बरेच्च अर्ज आले पण त्या प्रमाणांत शिष्यवृत्त्या देतां आल्या नाहींत. प्रधान चॅरिटी या नांवाची संस्था गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मदत करीत असते. डॉ. कृ. श्री. म्हसकर त्या संस्थेच्या व्यवस्थापक समितींत होते. ब्रा. सभेकडे आलेल्या अर्जांच्या मानानें शिष्यवृत्त्या देण्यास सभा असमर्थ असल्याचें त्यांनीं त्या संस्थेच्या विश्वस्तांच्या नजरेस आणून दिलें. तेव्हां त्या संस्थेनें उदार बुद्धीनें रु. २००० विद्यार्जना-साठीं मदत मागणाऱ्या विद्यार्थ्यांना विना परतफेड देण्यासाठीं ब्रा. सभेस देणगी म्हणून दिले.

स्वयंसेवकांच्या मुलांमुलींसाठीं

१९३६–३७ सालीं ब्रा. सभेचें आमरणान्त एकनिष्ठेनें काम करणारे स्वयंसेवक श्री. चिं. ज. खेर यांचे चिरंजीव श्री. रामकृष्ण चिंतामण खेर यांनीं ब्राह्मण सभेकडे शिष्यवृत्तीसाठीं अर्ज केला. श्री. खेर हे बी. ए. असून आर्यन एज्युकेशन सोसायटींत शिक्षकाचें काम करीत. त्यांना बी. टी. चा अभ्यास करावयाचा होता. सभेमार्फत द्यावयाच्या शिष्यवृत्त्या देऊन झालेल्या होत्या व त्यावेळीं श्री. खेरांना देण्या-सारखी शिल्लक रक्कम शिक्षणशाखेजवळ नव्हती. हें पाहून डॉ. कृ. श्री. म्हसकर यांनीं या शाखेला आणखी रु. ५०० ची देणगी दिली व ही रक्कम श्री. खेर यांना परतफेडीच्या अटीवर द्यावी असें सुचविलें. त्याचप्रमाणें ही रक्कम परतफेडीच्या रूपानें शाखेकडे जमा झाल्यावर ब्रा. सभेच्या स्वयंसेवकाच्या मुलाला अगर मुलीला जरूर पडेल तेव्हां या रकमेचा परतफेडीच्या अटीवर विनियोग करावा असाहि आपला मनोदय त्यांनीं शाखेस कळविला. ब्रा. सभेनें ही अट मान्य केली.

परतफेड व मदत

या बारा वर्षांत परतफेडीच्या रूपानें सभेकडे पुढीलप्रमाणें रकमा जमा झाल्याः—

वर्षें	रक्कम
१९३०–३१	रु. ४७१२–१२–६
१९३२–३३	रु. ३७७४– २–०
१९३४–३५	रु. ६०७२– ८–०
१९३६–३७	रु. ४६५०– ८–०
१९३८–३९	रु. ५१३८– ८–०
१९४०–४१	रु. ६७८०– ८–०
एकूण	रु. ३११२८–१४–६

१९४०–४१ सालीं आपटे शिष्यवृत्त्यांकरितां मिळालेल्या निधींतून डफरिन बोटीवरील तीन विद्यार्थ्यांना मिळून रु. ११४५ देण्यांत आले. धंदेशिक्षणासाठीं एका विद्यार्थ्याला रु. ३०० व एंजिनिअरिंग कॉलेजमधील एका विद्यार्थ्याला रु. १०० मिळून रु. १५४५ देण्यांत आले.

धार्मिक शिक्षण

शिक्षणशाखेच्या कार्याबरोबर नित्य ब्रह्मकर्माचा वर्गहि चालू केला होता, तो सुमारें दोन वर्षें चालू होता. जितक्या विद्यार्थ्यांनीं त्याचा फायदा घ्यावा अशी सभेची इच्छा होती तितक्या विद्यार्थ्यांनीं तो न घेतल्यामुळें दोन वर्षांनंतर तो बंद करण्यांत आला.

ब्राह्मण समाजांत ज्ञानप्रसार व्हावा या हेतूनें वे. शा. सं. वैजनाथशास्त्री आठवले यांचीं पातंजल योगशास्त्रावर दर सोमवारीं प्रवचनें होत. त्याचा लाभ डॉ. भाजेकरांसारख्या थोर गृहस्थांनींहि घेतला. स्त्रियांसाठीं शिवणकामाचा वर्गहि या शाखेमार्फत चालविण्यांत येत असे व त्यासाठीं अल्पशी फीहि ठेवण्यांत आलेली होती.

एक नवा उपक्रम

सेंट झेविअर कॉलेजमधील सुप्रसिद्ध शास्त्री वे. शा. सं. भवानी-शंकर सुखटणकर हे एक संस्कृतचा वर्ग सारस्वत ब्राह्मण समाजाच्या दिवाणखान्यांत चालवीत असत. अशा तऱ्हेचा वर्ग ब्रा. सभेंतहि चालविण्यांत यावा अशी ब्रा. स. व्य. मं. ची इच्छा होती व तो योग लौकरच जुळून आला.

ब्रा. सभेकडून शिष्यवृत्ति मिळालेले श्री. वासुदेव दामोदर गोखले हे उपर्युक्त शास्त्रीबुवांच्या छात्रवर्गांपैकीं एक असून एम्. ए., एस्. टी. सी. होते. त्यांनीं आपल्या गुरुजींची परंपरा ब्राह्मण सभेच्या जागीं चालविण्याची इच्छा प्रदर्शित केली. ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांच्या मनांत हा विचार होताच. त्याप्रमाणें वर्ग सुरू झाला.

या वर्गाचा फायदा १२६ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनीं घेतला. श्री. गोखले हे नामवंत शिक्षक असून संस्कृत भाषेवरील त्यांचें प्रभुत्व, त्यांची कळकळ व नियमितपणा या त्यांच्या गुणांमुळेंच या वर्गांत एवढ्या मोठ्या संख्येनें विद्यार्थी आले हें उघड आहे. हा वर्ग चाल-विणारांत किंवा वर्गांत उपस्थित रहाणाऱ्या विद्यार्थ्यांत कोणताहि ज्ञातीसंबंधीं भेदभाव मानला जात नसे. या संस्कृत वर्गाशिवाय श्री. गोखले यांनीं श्री. अनंत महादेव जोशी, एम्. ए., यांच्या सहकार्यानें वाङ्मय अभ्यास वर्ग सुरू केला व या अभ्यासासाठीं ज्ञानेश्वरीचा वारावा अध्याय व प्रा. फडके यांची प्रतिभासाधन ही कादंबरी अशी निवड करण्यांत आली. मुलांना स्वतंत्र लेखन करण्याची संवय लागावी म्हणून त्यांच्याकडून निबंध, कविता, पोवाडे, लघुकथा वगैरे लिहवून घेण्यांत येऊन त्यावर चर्चा करण्यांत येई. याच वर्गामार्फत आचार्य काकासाहेब कालेलकर यांचें 'नागरी लिपी व सुधारणा' या विषयावर व्याख्यान झालें. या वर्गाचा समारोप सॉ. बाळ गंगाधर खेर यांच्या

अध्यक्षतेखालीं झाला व त्यावेळीं प्रा. मा. दा. आळतेकर यांचें 'ध्येयवाद व वास्तववाद' या विषयावर सुंदर व्याख्यान झालें.

हा संस्कृत व वाङ्मय-अभ्यास वर्ग १९३६-३७ सालींहि चालू राहिला. १९३६ साल अखेर श्री. गोखले हे पुण्यास रहावयास गेल्यामुळें त्यांचें काम श्री. दत्तात्रय धोंडो गाडगीळ यांनीं पुढें चालविलें. वाङ्मय-अभ्यास वर्गांत प्रा. वामन मल्हार जोशी यांच्या ग्रंथांचा अभ्यास झाला. वरील दोन वर्गांबरोबरच इंग्रजीचाहि वर्ग श्री. श्रीधर गणेश चितळे, एम्. ए., एल्एल्. बी., यांनीं सुरू केला. श्री. चितळे यांचें आंग्ल भाषेवरील प्रभुत्व व सुलभतेनें शिकविण्याची त्यांची हातोटी यांमुळें फार मोठ्या संख्येनें विद्यार्थीवर्ग उपस्थित रहात असे. या वर्गांतहि कसल्याहि प्रकारचा ज्ञातिप्रपंच करण्यांत येत नसे. १९३८ सालींहि हे वर्ग कांहीं काळ चालू राहिले. पण श्री. गोखले हे पुण्याचे कायमचे रहिवासी झाल्यामुळें व श्री. चितळे यांना कार्यबाहुल्यामुळें वर्ग घेणें अशक्य झाल्यामुळें हे वर्ग बंद करावे लागले.

बारा वर्षांतील आढावा

या बारा वर्षांच्या अवधींत शाखेच्या कायम निधीप्रीत्यर्थ सुमारें रु. ४५००० जमा झाले व सभेनें रु. ४६७८४-१-० शिष्यवृत्त्यांसाठीं खर्च केले. ज्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असून त्यांच्याकडून परतफेड व्हावयाची आहे असे १३७ विद्यार्थी असल्याचें व ती रक्कम रु. १८८०८-४-३ असल्याचें या कालखंडाच्या अखेरीस दिसून येतें. ज्यांचा अभ्यासक्रम या काळांत पुरा झाला नाहीं अशा विद्यार्थ्यांकडून यावयाच्या परतफेडीची रक्कम रु. ५२७७ इतकी आहे. डॉ. म्हसकर यांची शिष्यवृत्ति परतफेडीच्या अटीवर दिलेल्या व ज्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या ३७ असून त्यांच्याकडून रु. ३३६७ येणें आहेत व ही शिष्यवृत्ति

परतफेडीच्या अटीवर दिलेल्या पण अभ्यासक्रम पुरा न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १९ असून त्यांच्याकडून रु. २०४९ येणें आहेत. एकंदर आढावा घेतां १९४१ अखेर या शाखेसाठीं रु. ३१०४६–४–३ एवढी रक्कम वसूल व्हावयाची आहे.

१९३९ सालीं श्रीशंकरवाडी गृहाची जागा व त्यावरील इमारतीं-प्रीत्यर्थ झालेला खर्च यांची भरपाई करण्यासाठीं शिक्षण शाखेनें आपल्या कायम निधींतील रु. ९००० ची देणगी ब्रा. सभेस दिली असल्याची माहिती पूर्वी आलेलीच आहे.

(५) उत्सव समारंभ

१९३० ते १९४१

श्रीगणेशोत्सवास निदान महाराष्ट्रांत तरी राष्ट्रीय महोत्सवाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. धर्मबुद्धि जागृत होऊन नैतिक, सामाजिक व राजकीय शिक्षण आबालवृद्धांस सहजासहजीं मिळावें व राष्ट्रांतील उत्तमोत्तम विचार व मनोवृत्ती उन्नत व्हाव्यात याच हेतूनें हा उत्सव सुरू झालेला आहे. शक्य तों या हेतूला अनुसरूनच या उत्सवासाठीं कार्यक्रम केले जातात. ब्रा. सभेमार्फत साजरा होणाऱ्या या उत्सवाकडे पाहिलें तरी याचाच प्रत्यय येतो. १९३०-४१ या काळांत या सभेनें केलेल्या या उत्सवांकडे पाहिलें तर व्याख्यानें, प्रवचनें व कीर्तनें करणारांच्या यादींत पुढील नांवें प्रामुख्यानें दिसतातः—

पं. श्री. सातवळेकर (ब्राह्मणांचें कर्तव्य), श्री. ना. गो. चाफेकर (कायदा), श्री. गो. कृ. देवधर (यो भुङ्क्ते स्तेन एव सः), कुलगुरु चिंतामणराव वैद्य (आचारधर्म), डॉ. कृ. श्री. म्हसकर (आयुर्वेदाची सद्यःस्थिति), प्रा. श्री. म. माटे (बंदिवासांतील हरिहर), श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी (गीता), श्रीसमर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव (समर्थांचें कार्य), दे. भ. श्री. माधवरावजी अणे (ब्राह्मणांचें कर्तव्य).

याशिवाय श्री. नरसिंह चिंतामण केळकर, वीर वामनराव जोशी, बॅ. रामराव देशमुख, बॅ. बाबासाहेब जयकर, महर्षि धोंडो केशव कर्वे, श्री. न. वि. गाडगीळ, पं. महादेवशास्त्री दिवेकर, श्रीमंत सौ. कमलाबाईसाहेब किवे, सौ. गिरिजाबाई केळकर, सौ. चंद्रकलाबाई हाटे, श्री. ग. वि. मावळंकर, रा. सा. गो. स. सरदेसाई, आचार्य प्र. के. अत्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. जम्नादास मेहता, श्री. ल. ब. भोपटकर, श्री. र. रा. बखले, श्री. वा. ल. चिपळूणकर, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, श्री. यादवराव काळे, रावसाहेब पटवर्धन, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, जनरल नानासाहेब शिंदे, श्री. त्र्यं. र. देवगिरीकर, श्रीमंत बाबासाहेब देशपांडे, श्री. कन्हय्यालाल मुनशी, श्री. सुशीलराव कवळेकर, कॉ. श्री. अ. डांगे, कॉ. सरदेसाई, श्री. य. गो. जोशी, श्री. ज. स. करंदीकर इ. व्याख्यात्यांचींहि निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें झालीं.

या काळांत डॉ. दत्तोपंत पटवर्धन, ह. भ. प. कवीश्वरबुवा, ह. भ. प. निजामपूरकर, ह. भ. प. ढोलेबुवा इत्यादींचीं कीर्तनें व ह. भ. प. नरहरशास्त्री गोडसे, ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, ह. भ. प. सदाशिवशास्त्री कान्हेरे, विद्यावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे इत्यादींचीं प्रवचनें झालीं.

या उत्सवांत स्त्रियांसाठींच म्हणून स्वतंत्र असे कार्यक्रम ठेवण्याची सभेची प्रथा असल्यामुळें त्यांच्यासाठीं दुपारच्या वेळीं व्याख्यानें, मेळे, हस्तकलांचें प्रदर्शन वगैरे कार्यक्रम या काळांत ठेवलेले दिसून येतात. मुलांना उत्तेजन मिळण्यासाठीं जे कार्यक्रम पहिल्या बारा वर्षांत करण्यांत येत असत तेच बहुतेक या कालखंडांतहि चालू असल्याचें दिसून येतें.

गणेशोत्सवाप्रमाणेंच मकर संक्रांत, दास नवमी, लो. टिळक पुण्यतिथि, विजयादशमी संमेलन, गीता जयंती, श्रीशंकराचार्य जयंती

वगैरे उत्सवहि सभेनें नेहमींच्या उत्साहानें पार पाडले. या काळांत नैमित्तिक समारंभ पुढीलप्रमाणें करण्यांत आले:–

अनावरण समारंभ

दि. २९–११–३१ ला कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले व कै. डॉ. गोविंद बाळाजी खेर यांच्या तैलचित्रांचा अनावरण समारंभ दे. भ. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. ना. गोखले यांचें वक्तृत्व, त्यांचा गाढ अभ्यास आणि त्यांची सौजन्यशील वृत्ति यांचें त्यांनीं अतिशय सुंदर विवरण करून त्यांच्या बहुविध कामगिरीची श्रोत्यांना माहिती करून दिली. तसेंच, डॉ. खेर यांनीं प्लेगच्या दिवसांत ' हिंदु हॉस्पिटल 'ला जें साह्य केलें त्याचेंहि त्यांनीं श्रोत्यांना निवेदन केलें.

धर्मवीर डॉ. मुंजे यांचें हिंदु महासभा व गोलमेज परिषद या विषयावर विचारपरिप्लुत असें भाषण झालें.

सत्कार समारंभ

कु. भा. ल. सोमण यांचें, रॉयल इंडियन मरीनचें शिक्षण घेण्यासाठीं ते विलायतेला गेले त्यावेळीं, अभिनंदन करण्यांत आलें. त्या समारंभाचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव देशमुख यांनीं आरमारी विद्येचें महत्त्व सांगून असें शिक्षण घेणारे घाडसी तरुण जास्तींत जास्त निर्माण व्हावेत अशी इच्छा प्रदर्शित केली.

रँग्लर वि. बा. नारळीकर हे बी स्टार रँग्लरची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचें प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखालीं अभिनंदन करण्यांत आलें.

गजानन मिलचे धनी श्रीमंत विष्णुपंत वेलणकर व त्यांचे स्नेही सांगलीचे श्री. विठ्ठलराव जोशी हे उद्योगधंद्याच्या दृष्टीनें जपानचा प्रवास करून आले म्हणून त्यांचें सभेनें अभिनंदन केलें.

१९३८ सालीं ब्रा. सभेचे एक उपाध्यक्ष सॉ. बाळ गंगाधर खेर हे मुंबई इलाख्याचे मुख्य प्रधान, श्री. ग. वि. मावळंकर हे मुंबई विधिमंडळांत नियुक्त अध्यक्ष व श्री. रा. ग. सोमण हे त्याच विधिमंडळांत नियुक्त उपाध्यक्ष झाल्याबद्दल या तिघां माननीयांचा सन्मान समारंभ ब्रा. सभेनें केला. त्या प्रसंगीं डॉ. म्हसकर, श्री. पां. वा. काणे व श्री. बापूसाहेब भाटवडेकर यांचीं या त्रिवर्गाच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं व त्या भाषणांत त्यांनीं या तिघांची थोर योग्यता विशद रीतीनें श्रोत्यांना पटवून दिली.

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्यानंतर ब्रा. सभेंत ज्यांचा समावेश झालेला आहे अशा ब्राह्मणवर्गांतील गृहस्थ श्री. नारायणराव एस. लोकूर यांची उच्च न्यायालयांत न्यायाधीशाच्या जागीं नेमणूक झाली याबद्दल त्यांचा डॉ. कृ. श्री. म्हसकर यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार करण्यांत आला.

४०–४१ धर्ममणि बालस्वामी यांचीं हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व या विषयावर उद्बोधक अशीं प्रवचनें झालीं.

याशिवाय इतर विशेष महत्त्वाचे असे जे समारंभ झाले त्यांची हकीकत निरनिराळ्या शीर्षकांखालीं अन्यत्र दिलेली आहे.

कार्यकर्त्या भगिनी

ब्रा. सभेच्या गणेशोत्सवांत महाप्रसाद व केवळ भगिनींसाठीं म्हणून मकर संक्रांत, वासंतिक हळदीकुंकूं वगैरे कार्यक्रम असत. त्यांची सर्व व्यवस्था भगिनी वर्गच करीत असे. या दुसऱ्या बारा वर्षांच्या अवधींत पहिल्या बारा वर्षांच्या इतिहासांत नमूद केलेल्या भगिनींना सौ. यशोदाबाई भाटवडेकर, सौ. इंदिराबाई खानविलकर, सौ. सरस्वतीबाई कावनईकर, सौ. कमलाबाई भावे वगैरे भगिनींचें साह्य या बाबतींत मिळाल्याचें दिसून येतें. यांपैकीं सौ. सरस्वतीबाई

कावनईकर यांचा सभेंत भाषण करण्याच्या बाबतींतहि फार उपयोग होत असे. या सर्व भगिनींनीं अशा समारंभांची ठेवलेली व्यवस्था व पाळलेली शिस्त फारच स्पृहणीय असे.

बाहेरगांवांहून आलेल्या पाहुण्यांची रहाण्याची व भोजनाची व्यवस्था पूर्वीप्रमाणें या काळांतहि सरदारगृहांत होत असेच पण त्याच्या जोडीला या काळांत माधवाश्रम ही संस्थाहि पुढें आली. माधवाश्रम ब्रा. सभेच्या जागेच्या अगदीं नजीक असल्यामुळें ब्रा. सभेची विशेष सोय झाली.

(६) म्हसकर सूतिकागृह

मुंबईतील ब्राह्मण समाजाची स्थिति किती निकृष्टावस्थेला पोहोंचली आहे हें १९१८ सालीं करण्यांत आलेल्या शिरगणतीच्या अहवालावरून चांगलेंच दिसून येतें. ब्राह्मण समाजांत मिळवत्या माणसांपैकीं शेंकडा ८० माणसांना महिना साठ रुपयांहून अधिक पैसे मिळत नसल्याचें दिसून येतें. १९३० सालीं ही परिस्थिति थोडीफार सुधारली असल्याचें गृहीत धरलें तरी ती अशी कितीशी सुधारलेली असणार ? शेंकडों ब्राह्मण कुटुंबांना अधिक भाडें भरण्याची ऐपत नसल्यामुळें कोंदट नि अगदीं अपुऱ्या जागेंत रहावें लागतें. अशा कुटुंबांत प्रसूतीचा प्रसंग आला म्हणजे त्यांची काय दैना होत असेल याची कल्पनाच केलेली बरी !

४१००० रुपयांची देणगी

ब्रा. सभेला या अडचणींची कल्पना असल्यामुळें कांहीं तरी मार्ग काढण्याची तळमळ लागलेली होती. १८८८ सालीं एक मोफत आयुर्वेद दवाखाना काढण्याचा प्रयत्न सभेनें केला होता. मुंबईत प्लेगनें कहर केला त्यावेळीं एक तात्पुरतें हिंदु हॉस्पिटल काढून तें सभेनें कांहीं दिवस चालविलें होतें. १९१८ च्या सांथीच्या तापानंतर एक रुग्णालय प्रत्यक्ष चालविलें होतें. पण अशा कार्यांसाठीं लागणाऱ्या द्रव्यनिधीच्या अभावीं हे सारे प्रयत्न अल्पजीवि ठरले होते. पण

अनुकूल काल आला म्हणजे सर्व गोष्टी आपोआप जुळून येतात असें म्हणतात तसेंच कांहींसें १९३० सालीं झालें. त्या वर्षाच्या श्रीगणेशोत्सवांत डॉ. कृष्णराव श्रीपतराव म्हसकर यांचें 'आयुर्वेदाची सद्यःस्थिति' या विषयावर अत्यंत विद्वत्ताप्रचुर आणि सुश्राव्य असें व्याख्यान झालें. व्याख्यानानंतर डॉ. म्हसकरांनीं ब्रा. सभेच्या सर्व इमारतीची पहाणी केली. सभेमार्फत चाललेल्या सर्व कार्यांची माहिती त्यांना सांगण्यांत आली. यानंतर दोनच दिवसांनीं ब्रा. सभेच्या व्य. मं. चे एक सभासद श्री. ग. शि. रानडे यांच्याजवळ आपली परलोकवासी झालेली एकुलती एक कन्या कै. सौ. कमलाबाई जोशी यांच्या स्मरणार्थ गरीब ब्राह्मण कुटुंबांतील स्त्रियांकरितां सूतिकागृह काढण्यासाठीं रु. ४१००० ची देणगी ब्रा. सभेस देण्याविषयींचा आपला मनोदय डॉ. म्हसकर यांनीं व्यक्त केला व श्री. ग. शि. रानडे यांनीं ही देणगी ब्रा. सभेकडेच आल्यानें तिचा ब्रा. समाजास किती योग्य रीतीनें उपयोग होईल हें त्यांना निवेदन केलें.

दि. १३-९-३१ ला हा आपला मनोदय डॉ. म्हसकर यांनीं ब्रा. सभेच्या व्य. मं. स पत्रद्वारें कळविला. त्यावेळीं गणेशोत्सव चालूच होता. ब्रा. सभेचे एक विश्वस्त श्री. पां. वा. काणे यांनीं हें पत्र दि. २०-९-३१ ला उत्सवाच्या कार्यक्रमासाठीं आलेल्या मंडळीस वाचून दाखविलें. ही ब्राह्मण समाजांतील असामान्य अशी पहिलीच देणगी होय.

सूतिकागृहाची योजना

दि. ११-१०-१९३१ ला व्य. मं. ची सभा भरून डॉ. म्हसकर यांच्या देणगीचा साभार स्वीकार करण्यांत आला. याच सभेंत सूतिका-गृहाच्या योजनेसंबंधीं विचार करून अहवाल सादर करण्यासाठीं तज्ज्ञ डॉक्टर मंडळींचीं एक समिति नेमण्यांत आली. दि. २४-१०-३१ ला

व्य. मं. चे सभासद, ब्रा. सभेचे विश्वस्त, साधारण सभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सल्लागार यांची एक संयुक्त सभा होऊन समितीनें सादर केलेल्या अहवालाचा विचार झाला व सूतिकागृहासंबंधींची योजना निश्चित करण्यांत आली.

वरील उदार देणगीबद्दल दि. १०-११-१९३१ ला मुंबई शहराचे माजी मेयर डॉ. गोपाळराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं ब्रा. सभा व ब्राह्मण भगिनी समाज यांच्या वतीनें सभा होऊन डॉ. म्हसकर यांचें अभिनंदन करण्यांत आलें.

या सूतिकागृहाच्या योजनेसंबंधीं ब्रा. सभेचे विश्वस्त व सभेच्या चालकांपैकीं एक सॉ. बाळ गंगाधर खेर व डॉ. कृ. श्री. म्हसकर यांच्यामध्यें रीतसर करार होऊन विश्वस्तपत्राचा नमुना तयार करण्यांत आला व हें विश्वस्तपत्र फेब्रुवारी १९३२ मध्यें सर्वांच्या स्वाक्षऱ्या होऊन पूर्ण झालें; आणि त्याप्रमाणें डॉ. म्हसकर यांनीं रु. ३५००० चे दरसाल दर शेंकडा ५ व ६ टक्के व्याज येणारे रोखे व रु. ६००० रोख ब्रा. सभेच्या स्वाधीन केले. या सूतिकागृहाची व्यवस्था पहाण्याकरितां डॉ. सी. का. गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं एक पोटसमिति नेमण्यांत आली.

विश्वस्तपत्राची माहिती

हें विश्वस्तपत्र दि. २५-२-१९३२ ला डॉ. कृष्णराव श्रीपत म्हसकर व ब्रा. सभेचे विश्वस्त श्री. गणपतराव गोविंद नवरे, श्री. पांडुरंग वामन काणे व श्रीमंत गजानन विश्वनाथ साळवेकर यांच्यामध्यें झालें. या विश्वस्तपत्रान्वयें रु. ३५००० चे रोखे व रु. ६००० रोख या रकमेचा विश्वस्तनिधि म्हणून समजावयाचा आहे; व ब्रा. सभेच्या विश्वस्तांनीं कै. सौ. कमलाबाई जोशी यांचे स्मरणार्थ एक सूतिकागृह चालवावयाचें आहे. विश्वस्तांनीं हा निधि योग्य काळपर्यंत कायद्याप्रमाणें योग्य अशा

डॉ. कृ. श्री. म्हसकर

कै. श्री. मामा मराठे

कै. श्री. चिं. ज. खेर

कै. श्री. ल. ग. जोशी

श्री. ग. र. बर्वे

रोख्यांत गुंतवावा. सभेनें हें सूतिकागृह आपल्या जागेंत किंवा वाटेल त्या योग्य जागेंत चालवावयाचें आहे. मात्र अशा रीतीनें चालविलेल्या सूतिकागृहास भाडें द्यावें लागल्यास तें ब्रा. सभेनें द्यावयाचें आहे. ब्रा. सभेचे सभासद होण्यास पात्र अशा पोटजातींतील सूतिकांकरितां हें सूतिकागृह चालावयाचें आहे. या सूतिकागृहाची व्यवस्था व्यवस्थापक मंडळानें नेमलेल्या समितीकडेच राहील. या विश्वस्तनिधीचे निर्माण-कर्ते डॉ. कृ. श्री. म्हसकर हे आजीव या समितीचे सदस्य राहतील. ब्राह्मण भगिनी समाजाच्या अध्यक्ष अगर त्या समाजाच्या प्रतिनिधि या समितीचे सदस्य म्हणून राहतील. सूतिकागृहांतील प्रवेश फी रु. १० पर्यंत असावी आणि अशा तऱ्हेनें जमा झालेल्या फीचा उपयोग सूतिकागृहाप्रीत्यर्थंच व्हावा. याप्रमाणें या विश्वस्तनिधीच्या मुख्य अटी आहेत.

सूतिकागृहाची व्यवस्था

सूतिकागृहाच्या व्यवस्थेसंबंधीं नियम करण्यांत आले व सूतिका-गृहास योग्य अशा तऱ्हेचे फेरफार इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर करण्यांत आले. सूतिकागृहावर देखरेख ठेवण्यासाठीं डॉ. भा. दि. पटवर्धन यांना विनंती करण्यांत आली आणि त्यांनीं ऑनररी मेडिकल ऑफिसरचें काम करण्याचें मान्य केलें. तसेंच, डॉ. ह. वि. टिळक व डॉ. गाडगीळ यांस जरूर त्या प्रसंगीं विशेष वैद्यकीय सल्लागार म्हणून काम करण्याची सभेनें विनंती केली आणि त्यांनींहि विनावेतन काम करण्याचें कबूल केलें. शंकरवाडीच्या मागील इमारतीचा दुसरा मजला मोकळा करण्यांत आला व सूतिकागृहाकरितां त्याची योजना झाली. या व्यवस्थेमुळें सभेचें दरमहा रु. १०५ चें भाड्याचें उत्पन्न कमी झालें. याच वेळीं कदाचित् तिसरा मजलाहि सूतिकागृहाला द्यावा लागेल असें वाटूं लागलें. त्या मजल्याचें दरमहा रु. १८० भाडें येत होतें.

सूतिकागृहाची योजना निश्चित झाली त्याच वेळीं असा अंदाज करण्यांत आला होता कीं, सूतिकागृहाला दरमहा सुमारें ६०० रुपयांचा खर्च येईल. डॉ. म्हसकर यांनीं दिलेल्या देणगीचें व्याज रु. २०० व ब्रा. सभेनें या कार्याप्रीत्यर्थ जागा दिली त्यामुळें बचत झालेले रु. १०५ मिळून रुपये ३०५ झाले तरी दरमहा रु. ३०० ची तूट पडणार असें दिसूं लागलें. दरमहा तीनशें रुपये व्याजाच्या रूपानें मिळतील एवढा निधि जमवावयाचा तर त्याला कालावधि लागणार आणि अशा अत्यंत उपयुक्त व आवश्यक कार्याला ब्राह्मण समाजाकडून एवढा निधि वर्ष सहा महिन्यांत नक्की मिळेल अशा विश्वासानें डॉ. म्हसकरांनीं सूतिकागृहाच्या पहिल्या वर्षाच्या चालू खर्चांत (सुमारें रु. ८०००) जी तूट पडेल ती आपण देऊं असें अभिवचन दिलें. या आश्वासनामुळें दि. ११-२-३२ पासून म्हणजे वसंतपंचमीच्या शुभ मुहूर्तावर ब्रा. सभेला हें सूतिकागृह सुरू करतां आलें.

प्रारंभ व प्रगति

सुरुवातीला जागेच्या मानानें तीनच बाजा ठेवण्यांत आल्या. म्हणजे दर महिन्यास ८।९ सूतिकांची सोय करण्यांत आली. सूतिकेचें बाळंतपण करण्याची जबाबदारी ज्या व्यक्तीवर असेल तिचें मासिक उत्पन्न रु. १५० च्या वर नसल्यास त्या सूतिकेची व्यवस्था या सूतिकागृहांत करण्यांत येत असे. प्रवेश मिळण्याकरितां करावयाच्या अर्जाबरोबर रुपये ५ व प्रवेश मिळाल्यानंतर रु. ५ असे दहा रुपये प्रत्येक सूतिकेकरितां द्यावे लागत. सूतिकागृह सुरू झाल्याबरोबर प्रसूतीकरितां आलेल्या अर्जांची संख्या पाहून ही जागा अगदींच अपुरी वाटूं लागली आणि सूतिकागृहाच्या वतीनें आणखी एका मजल्याची मागणी करण्यांत आली. परिस्थिति लक्षांत घेऊन

व्य. मं. नें दरमहा १८० रुपये भाडें येणारा मजला रिकामा करून तो सूतिकागृहास देण्याचें दि. १५–४–३२ च्या सभेंत ठरविलें आणि त्याप्रमाणें तो मजलाहि सूतिकागृहाच्या स्वाधीन करण्यांत आला.

आतां दहा बाजांची म्हणजे दरमहा पंचवीस सूतिकांची सोय होऊं लागली. इतकें करूनहि पुष्कळ स्त्रियांना जागेच्या अभावीं प्रवेश देतां येईना. त्यामुळें सूतिकागृहास अधिक जागेची आवश्यकता भासूं लागली व ती दूर करण्याकरितां ब्रा. सभेनें करंदीकर हॉलवर गच्ची करण्याऐवजीं एक मजलाच करण्याचें ठरविलें. या मजल्याच्या प्रीत्यर्थ येणाऱ्या खर्चाची जबाबदारी श्रीमंत डोंगरे बंधू यांचेकडून वेळींच मिळालेल्या देणगीमुळें कमी झाली. या त्यांच्या देणगीबद्दल ब्रा. सभेनें या मजल्यास 'श्रीमती रखमाबाई डोंगरे हॉल' असें नांव देऊन तो सूतिकागृहाच्या उपयोगासाठीं देऊन टाकला. त्यामुळें दरमहा ४० सूतिकांची सोय करतां येऊं लागली.

सूतिकागृहांत सूतिकांना १० दिवस ठेवण्यांत येतें व त्या अवधींत औषधपाणी, कपडालत्ता, खाण्यापिण्याची सोय वगैरे सर्व गोष्टी करण्यांत येतात. अर्जदाराची आर्थिक परिस्थिति फारच हलाखीची असल्यास व त्यानें तशी विनंती केल्यास नोंद फी वगैरे माफ करण्यांत येते. प्रसूतीच्या दहा दिवसांखेरीज अगोदर किंवा नंतर एखाद्या स्त्रीस सूतिकागृहांत ठेवणें जरुरीचें आहे असें डॉक्टरांचें मत पडल्यास त्या स्त्रीस त्याप्रमाणें ठेवून घेण्यांत येतें. प्रसूति होऊन घरीं गेल्यावरहि कांहीं काळपर्यंत मातेस व बालकास कांहीं आजार झाल्यास सूतिकागृहातर्फे फुकट औषध देण्यांत येतें. नीलातीत किरणांचीहि व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

उद्घाटनसमारंभ दि. १२–२–३२ ला श्रीमंत सौ. राणीसाहेब संस्थान सांगली यांच्या हस्तें व्हावयाचा होता पण त्यांना त्यावेळीं

सवड न झाल्यामुळें हा समारंभ दि. २८-८-१९३२ ला करण्यांत आला. १९३२ ते १९४१ या अवधींत पुढीलप्रमाणें सूतिकांची सोय करण्यांत आली:—

साल	प्रवेश अर्ज	प्रवेश मिळाला
१९३२-३३	८३८	७३६
१९३४-३५	११२८	१०१०
१९३६-३७	१२१६	१०८५
१९३८-३९	११९५	११२५
१९४०-४१	११२२	११०७

बी. पी. एन्. ए. चा वर्ग

सुईणकामाची व सूतिकेस उपचार करण्याची शास्त्रीय माहिती असलेल्या स्त्रिया ब्रा. समाजांत फार कमी आहेत असें निदर्शनास आल्यामुळें अशा प्रकारचें शिक्षण देण्याचा उपक्रम डॉ. म्हसकरांनीं जून १९३२ पासूनच सुरू केला व या वर्गाच्या शिक्षणाचें काम ते स्वतः व डॉ. गोळे करीत. या वर्गांतून शिक्षण पुरें झालेल्या स्त्रियांना बाहेरील समाजाकडूनहि मान्यता मिळावी म्हणून बी. पी. एन्. ए. या असोसिएशनकडून मान्यता मिळविण्यांत आली. हें शिक्षण मोफत देण्यांत येतें.

ही मान्यतेची मुदत १९४२ पर्यंतची आहे. दर तीन वर्षांनीं त्यांची परीक्षा होत असते. कौन्सिलनें दर वर्षीं दहा विद्यार्थिनींना शिकविण्याची परवानगी दिलेली आहे. विद्यार्थिनींकरतां बांधलेल्या नवीन मजल्यावरील वसतिगृहामुळें त्यासंबंधींच्या बहुतेक अडचणी दूर झाल्या आहेत. १९४१ अखेरपर्यंत सुमारें ७५ विद्यार्थिनींनीं हें प्रवीणतापत्रक मिळविलें असल्याचें दिसून येतें.

डॉक्टर मंडळींची मदत

डॉ. भा. दि. पटवर्धन यांनीं सुमारें दीड वर्ष सूतिकागृहाचें काम फार आस्थेनें व कळकळीनें केलें. त्यांच्या नंतर डॉ. ग. ब. गोळे यांनीं हें काम जवळजवळ सहा वर्षें केलें. त्यांना डॉ. सौ. काशीबाई साठे व डॉ. कु. शांताबाई सप्तर्षि यांची बहुमोल मदत झाली. डॉ. गोळे यांच्या मृत्यूनंतर डॉ. शि. वि. टिळक, डॉ. शं. ज. जोगळेकर व डॉ. रा. मो. कोटस्थाने हे सूतिकागृहांतील प्रसूतीसंबंधीं येणारीं सर्व वैद्यकीय कामें करूं लागले.

एक नवी योजना

१९३६ च्या प्रारंभीं सूतिकागृहाच्या व औषधालयाच्या व्यवस्थेच्या बाबतींत एक विशेष योजना ब्रा. सभेच्या विश्वस्तांच्या अनुमतीनें करण्यांत आली. या योजनेंतील विशेष हा कीं, या दोन शाखांपुरतीच पोटसमित्यांची प्रथा बंद करण्यांत आली.

सूतिकागृह व औषधालय यांचें अंदाजपत्रक तयार होऊन तें साधारण सभेंत मान्य झाल्यानंतर त्या अंदाजपत्रकाच्या चौकटींत बसेल अशा रीतीनें कार्याची अंतर्व्यवस्था करण्याचा पूर्ण अधिकार डॉ. म्हसकर यांस देण्यांत आला. सूतिकागृह व औषधालय सल्लागार समिति म्हणून डॉ. म्हसकर यांनीं ब्रा. सभेच्या व्य. मं. त असलेल्या सात सभासदांचीं नांवें सुचवावीं व ही योजना दि. २५-२-३६ पासून पांच वर्षेंपर्यंत अंमलांत आणावी आणि जरूर तर या योजनेचा पुरस्कार त्या नंतरच्या पांच वर्षेंपर्यंतहि करावा असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें दि. १७-१-४१ च्या व्य. मं. च्या सभेंत ही मुदत आणखी पांच वर्षांनीं म्हणजे दि. २५-२-४६ पर्यंत वाढविण्यांत आली. अर्थात् पहिल्या पांच वर्षांच्या काळांत डॉ. म्हसकर यांनीं सूतिकागृह व औषधालय यांचें जें कार्य केलें तें सुव्यवस्थितपणें व समाधानकारक रीतीनें झालें

असल्याची व्य. मं. नी खात्री पटल्यामुळेंच ही मुदत आणखी पांच वर्षांनीं वाढविण्यांत आली.

वाढता व्याप

सूतिकागृहाची सुरुवात करतांना दरमहा प्रत्यक्ष खर्च अंदाजें रु. ३०० येईल अशी कल्पना होती पण लौकरच सूतिकागृहांतील बाजांची संख्या वाढवावी लागली. तीनच महिन्यांत बाजांची संख्या ३ वरून १० वर न्यावी लागली. एवढ्यानेंहि काम भागेना म्हणून डोंगरे हॉल देऊन २५ बाजांची व्यवस्था करण्यांत आली. अगदींच नाइलाज झाल्यास ३० बाजाहि तेथें ठेवतां येतात आणि दरमहा ९०–९५ सूतिकांची सोय होऊं शकते. अर्थात् याच प्रमाणांत सूतिकागृहाचा खर्चहि वाढूं लागला. विशेषतः जागतिक महायुद्ध सुरू झाल्यामुळें तर खर्चाची रक्कम फारच वाढूं लागली. याचा विचार करून १९४० सालापासून नोंद फी रु. १० च्या ऐवजीं रु. १५ करण्यांत आली. खर्चहि दरमहा रु. १५०० ते २००० पर्यंत येऊं लागला. ज्यांना नोंद फी देण्याचें सामर्थ्य नाहीं अशांना नोंद फी माफ करण्याची प्रथा मात्र बंद करण्यांत आली नाहीं.

सूतिकागृहास देणग्या

डॉ. म्हसकर यांनीं दिलेल्या देणगीबरोबर आणखी बराच मोठा निधि जमविणें आवश्यक झालें आणि त्या दृष्टीनें शिकस्तीचा प्रयत्न केल्यानंतर पहिल्या दोन वर्षांत रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांनीं सूतिकागृहास रु. २००० ची देणगी दिली. सात गृहस्थांनीं प्रत्येकीं रु. १००० हून अधिक देणगी दिली तर रु. ५०० हून अधिक देणारे सहा, २५० रु. हून अधिक देणारे चौदा, १०१ रु. हून अधिक देणारे बेचाळीस व पन्नासांहून अधिक देणारे पंधरा दाते मिळाले. याशिवाय रु. १० पासून २५ पर्यंत अनेकांनीं देणग्या दिल्या. याप्रमाणें

रु. २५००० पर्यंतचा कायमनिधि जमविण्यांत आला. दरसाल याप्रमाणें आश्रयदाते व आजीव सभासद मिळविण्याचें काम सुरू ठेवण्यांत आल्यामुळें १९४१ च्या अखेरीला सूतिकागृहाचा कायमनिधि म्हणून रु. ८०००० च्या वर जमा झाल्याचें दिसतें. ही सर्व रक्कम कर्जरोख्यांत गुंतविण्यांत आलेली आहे.

या सूतिकागृहाच्या इतिहासाच्या प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें त्याच्या चालू खर्चांत तूट येणार होती व ती तूट करून काढण्याचें डॉ. म्हसकर यांनीं आश्वासन दिलेलें होतें पण हा बोजा डॉ. म्हसकर यांच्यावर पडूं न देण्याचा ब्राह्मण ज्ञातींतील भगिनींनीं संकल्प केला. ब्राह्मण भगिनी समाजानें दिवाळीच्या दिवसांत भाऊबीज म्हणून मोठी रक्कम जमविण्याचा प्रयत्न केला आणि १९३३ सालीं रु. ५२९१ व १९३४ सालीं रु. ५२९८ मिळून रु. १०५८९ जमा करून ते चालू खर्चाप्रीत्यर्थ डॉ. म्हसकरांच्या स्वाधीन केले.

औषधालय

सूतिकागृहांत येणाऱ्या स्त्रियांना डॉ. म्हसकर यांचें वैद्यशास्त्रांतील प्रावीण्य, त्यांचा प्रेमळ स्वभाव आणि प्रत्येक भगिनीबद्दलची त्यांची आस्था यांचा अनुभव आल्यामुळें कोणत्याहि आजाराच्या परिहारार्थ डॉ. म्हसकरांकडेच जावें असें वाटूं लागलें आणि त्या तसें करूंहि लागल्या. डॉ. म्हसकरहि या कामाप्रीत्यर्थ आपला बराच वेळ देऊं लागले. अशा भगिनींना शक्य तितक्या कमी किंमतींत औषधें मिळावींत अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनीं रु. १०००० ची आणखी एक मोठी देणगी सभेस देण्याचा संकल्प केला व तो दि. ४-१२-३४ च्या पत्रानें व्यवस्थापक मंडळास कळविला. व्य. मं. नें या देणगीचा साभार स्वीकार केला आणि दि. ८-१२-३४ च्या सभेंत यासंबंधीं विचार-विनिमय करून निश्चित योजना करण्यासाठीं एक समिति नेमली. या

समितीनें शिफारस केल्याप्रमाणें दि. १०-२-३५ ला 'डॉ. म्हसकर औषधालय' या नांवानें औषधालय सुरू करावें व त्यासाठीं व्यायाम-शाळेच्या वरील पहिल्या मजल्याच्या जागेपैकीं ३५० चौरस फूट जागा या कामाकरितां द्यावी असें व्य. मं. नें ठरविलें. पण ठराविक मुदतींत सर्व सोई होऊं न शकल्यामुळें हें औषधालय दि. ४-४-१९३५ ला सुरू करण्यांत आलें. ब्रा. सभेचा सभासद होण्यास पात्र परंतु ज्याचें उत्पन्न दरमहा रु. ७५ पेक्षां अधिक नाहीं अशा गृहस्थाच्या कुटुंबांतील स्त्रियांना व १० वर्षांच्या आंतील मुलांना या औषधालयाचा लाभ घेतां येतो. दरमहा रु. १५० हून कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील ज्या स्त्रियांनीं सूतिकागृहाचा फायदा करून घेतला असेल त्यांना प्रसूतीपूर्वी तीन महिने व प्रसूतीनंतर एक वर्षपर्यंत कमी दरानें औषधें मिळण्याची सोय हें औषधालय करतें. औषधालयांतील खर्चाची येणारी तूट भरून निघावी म्हणून लहान मुलांना एक आणा व स्त्रियांना दोन आणे याप्रमाणें फी ठेवण्यांत आली. पुढील आंकड्यांवरून औषधालयानें किती अमोल काम केलें याची कल्पना येईल.

वर्ष	किती वेळां औषध दिलें
१९३२	९२१
१९३३	११०३
१९३४	१८७७
१९३५	४८७१
१९३६	६१०४
१९३७	१२४५८
१९३८	२०४०१
१९३९	२३६१३

औषधालयाचा कायम निधि रु. १०१०० चा असून तोहि कर्ज-रोख्यांत गुंतविण्यांत आलेला आहे.

म्हसकर सूतिकागृहाच्या उद्घाटन समारंभाच्या प्रसंगींचें छायाचित्र (अध्यक्ष श्रीमंत सौ. रागीसाहेब सांगली)

म्हसकर सूतिकागृहाचे प्रारंभींचे कार्यकर्ते

सूतिकागृह व औषधालय यशस्वी रीतीनें चालावें व समाजांतील मध्यम व गरीब लोकांची सोय व्हावी म्हणून डॉ. म्हसकरांनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या. पण केवळ देणग्या देऊनच स्वस्थ न बसतां त्यांनीं त्यासाठीं अतिशय खडतर परिश्रम घेतले आणि म्हणूनच ब्रा. सभेनें पूर्वी केलेले प्रयत्न जसे फसले तसें यावेळीं झालें नाहीं. उलट १९४१ अखेरपर्यंत या दोन्ही संस्थांचें काम प्रगतिपर रीतीनेंच चाललेलें दिसून येतें. डॉ. म्हसकरांच्या सौजन्यामुळें सुदैवानें त्यांना डॉ. पटवर्धन व डॉ. गोळे यांच्यासारखे कर्तव्यनिष्ठ सहकारी भेटले. तसेंच, डॉ. सौ. काशीबाई साठे व डॉ. कु. शांताबाई सप्तर्षि यांनींहि सूतिकागृहाच्या कामाच्या बाबतींत आपलेपणानें खूपच साह्य केलें. तसेंच, विलेपार्ले येथें रहात असूनहि डॉ. शि. वि. टिळक यांनीं सूतिकागृहास आपला फायदा करून दिला. डॉ. जोगळेकरांनीं औषधालयाच्या कामीं बहुमोलाचें साह्य केलें. सूतिकागृहाच्या सुदैवानें श्री. दुर्गाबाई पेंडसे या मेट्रन म्हणून लाभल्या. त्यांचें सौजन्य आणि कर्तव्यदक्षता हीं वाखाणण्यासारखींच असल्याचें दिसून येतें.

क्वचित् प्रसंगीं सूतिकागृहाचा व बरेच वेळां औषधालयाचा उपयोग ब्राह्मणेतरांनाहि होतो. सूतिकागृहासाठीं कायमनिधि जमवितांना ब्राह्मणेतर धनिकांनीं या कार्याचें महत्त्व जाणून उदार बुद्धीनें बऱ्याच देणग्या दिलेल्या आहेत आणि त्यांचा स्वीकार ब्रा. सभेनें केलेला आहे. अशा उदार गृहस्थांची यादीहि ब्रा. सभेच्या अहवालांबरोबर प्रसिद्ध झालेली असून ते अहवाल साधारण सभेंत मान्य झालेले आहेत.

डॉ. कृ. श्री. तथा बापूसाहेब म्हसकर यांनीं देणगी देतांना म्हटलें होतें कीं, ' सूतिकागृहाच्या व औषधालयाच्या कार्याचे समाजांत एकी वाढविणें, समाजास शारीरिक, मानसिक व आर्थिक सुख देणें हे उद्देश असून ते जर मला साध्य करतां आले नाहींत तर ही देणगी

अनाठायींच पडली असें मला वाटेल. कोणतीहि आपद्ग्रस्त स्त्री आढळली आणि सूतिकागृहांत किंवा औषधालयांत तिची शुश्रूषा करण्यांत आली तर आपण तें आपलें कर्तव्यकर्मच केलें असें समजण्यास कोणालाहि अडचण वाटूं नये.'

या द्वादशवार्षिक काळांत डॉ. बापूसाहेब म्हसकर यांनीं सूतिकागृह व औषधालय यांप्रीत्यर्थ देणग्या म्हणून जवळजवळ रु. ८०००० वेळोवेळीं दिले. या त्यांच्या औदार्यास तोड नाहीं असेंच कोणालाहि म्हणावें लागेल. त्यांनीं आपलें तनमनधन अक्षरशः या कार्यासाठीं वाहिलें असल्याचें स्पष्ट दिसतें.

(७) ब्राह्मणसभा समारंभ

म्हसकर सूतिकागृह उद्घाटनसमारंभ

म्हसकर सूतिकागृह उद्घाटनसमारंभ ब्रा. सभेच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं अपूर्व असा होता. सूतिकागृहाचें कार्य व त्याकरितां डॉ. म्हसकर यांनीं दिलेली रु. ४१००० ची अमोल देणगी यांचा विचार करून ब्रा. सभेनें या समारंभासाठीं श्रीमंत सौ. राणीसाहेब संस्थान सांगली यांची अध्यक्षस्थानीं योजना केली. परंतु सूतिकागृहाचें कार्य ज्या दिवशीं सुरू झालें त्या दिवशीं कार्यबाहुल्यामुळें त्यांना येतां आलें नाहीं. श्रीमंत राणीसाहेबांची विद्वत्ता व त्यांचें प्रजावात्सल्य यांमुळें हा समारंभ त्यांच्याच अध्यक्षतेखालीं पार पडावा अशी सभेची इच्छा होती. म्हणून सूतिकागृहाचें काम ठरल्या दिवशीं सुरू करण्यांत आलें व राणीसाहेबांच्या सोईसाठीं हा समारंभ पुढें ढकलण्यांत आला.

हा समारंभ दि. २८-८-३२ ला झाला. प्रथम सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख व सौ. सरस्वतीबाई भाजेकर यांचीं राणीसाहेबांच्या स्वागतपर भाषणें झालीं. नंतर डॉ. सी. का. गोखले यांनीं सूतिकागृहाबद्दल सर्व माहिती सांगितली व श्री. अण्णासाहेब काणे व श्री. अं. गो. पुणतांबेकर यांनीं राणीसाहेबांस सूतिकागृहाचें उद्घाटन करण्याची विनंती करून सूतिकागृहाची आवश्यकता व त्यासाठीं ब्रा. सभेनें केलेले प्रयत्न यांचें

विवेचन केलें. तसेंच, ज्यांच्या स्मरणार्थ डॉ. म्हसकर यांनीं ही बहुमोल देणगी दिली त्या कै. सौ. कमलाबाई जोशी यांच्या तैलचित्राचें अनावरण करण्याचीहि राणीसाहेबांस विनंती करण्यांत आली.

मुंबईंतील ब्राह्मण समाजांतील स्त्रियांच्या कल्याणासाठीं स्थापन झालेल्या सूतिकागृहाचें कार्य व व्यवस्था पहाण्याची आपणाला संधि लाभली याबद्दल आनंद व्यक्त करून राणीसाहेबांनीं डॉ. म्हसकर यांच्या औदार्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. त्या पुढें म्हणाल्या कीं, प्रत्येक समाजानें आपल्या परीनें समर्थ व स्वावलंबी होण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे व असें करीत असतांना त्याचें धोरण राष्ट्रहिताला पोषक असेंच असलें पाहिजे. ही संस्था एका दृष्टीनें ज्ञातिविशिष्ट असली तरी तिचें धोरण राष्ट्रहिताला पोषक असेंच ठेवण्याचा चालकांचा कटाक्ष असल्याबद्दल राणीसाहेबांनीं समाधान व्यक्त करून डॉ. म्हसकरांनीं सूतिकागृहास बहुमोल देणगी दिली व त्यासाठीं जबरदस्त परिश्रमहि घेतले म्हणून त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. सूतिकागृहाचें कार्य यशस्वी रीतीनें चालेल अशी आपणास खात्री वाटत असल्याचाहि त्यांनीं निर्वाळा दिला.

आपल्या उत्तरादाखलच्या भाषणांत डॉ. म्हसकर यांनीं, ज्या विद्येच्या योगानें आपणास द्रव्याचा लाभ झाला, त्याच विद्येच्या प्रसारासाठीं त्याचा विनियोग करण्याचा आपला उद्देश सफल झाल्याचें पाहून आपल्या मनाला सात्त्विक समाधान लाभल्याचें सांगितलें.

राणीसाहेबांनीं सूतिकागृहास रु. ५०० ची देणगी दिली.

करंदीकर हॉल उद्घाटनसमारंभ

रावबहादुर बाळकृष्ण परशुराम करंदीकर यांनीं रु. १०००० ची उदार देणगी ब्रा. सभेस दिली आणि त्यामुळें सभेला दुसरा मजला बांधण्याचें काम तावडतोब हातीं घेतां आलें. हें काम पूर्ण झाल्यावर

नवीन सभागृहाला 'करंदीकर सभागृह' असें नामाभिधान करण्याचा समारंभ डॉ. म्हसकर यांच्या अध्यक्षतेखालीं दि. १४–१०–३३ ला करण्यांत आला.

प्रथम श्री. मो. भा. भाटवडेकर यांनीं सभेची उत्तरोत्तर झालेली वाढ, घडलेलीं स्थित्यंतरें व सभेला प्राप्त झालेलें स्वरूप यांची माहिती सांगितल्यावर श्री. पां. वा. काणे व प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांनीं सभेला मिळालेल्या मोठमोठ्या देणग्यांची माहिती सांगितली व या सभागृहांचा ज्ञातिहिताच्या कामीं कसा उपयोग होतो हेंहि विशद करून सांगितलें. अध्यक्ष डॉ. म्हसकर यांनीं 'करंदीकर सभागृह' हें नांव कोरलेल्या शिलेचें अनावरण करून सभागृहाचें तें नांव जाहीर केलें. रा. ब. करंदीकर यांना दीर्घायुरारोग्य चिंतिण्यांत येऊन पुष्पहार अर्पण करण्यांत आला.

श्री. रखमाबाई डोंगरे हॉल नामाभिधानसमारंभ

कै. कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे यांनीं ब्रा. सभेस भांड्यांचा मोठा संच देणगीदाखल दिलेला होता. त्यानंतर डॉ. विनायक कृष्ण व दिनकर कृष्ण डोंगरे या बंधुद्वयानें त्या भांड्यांच्या संचाची किंमत धरून रु. १०००० ची देणगी पुरी केली आणि त्यामुळें मुख्य इमारतीवर तिसरा मजला उठविणें सभेला शक्य झालें. सभेनें या मजल्यास 'श्री.रखमाबाई डोंगरे सभागृह' असें नांव देण्याचें ठरविलें. श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांचेबद्दल डोंगरे बंधूंना नितांत आदर वाटत असल्यामुळें या नामाभिधानाच्या समारंभाला अध्यक्ष म्हणून त्यांचीच योजना करण्यांत आली. हा समारंभ दि. १२–११–३३ ला साजरा करण्यांत आला.

श्री. पुणतांबेकरांनीं आपल्या भाषणांत, ब्राह्मण ज्ञातीसाठीं सर्व साधनांनीं युक्त अशी महाजनवाडी असावी अशी कै. कृष्णाजी त्र्यंबक डोंगरे यांची मनापासून इच्छा असल्याचें सांगितलें. ती त्यांची इच्छा

पूर्ण करण्याच्या कामीं त्यांचे सुपुत्र मदत करीत असल्याबद्दल त्यांचें अवश्य अभिनंदन केलें पाहिजे असें सांगितलें. श्रींनीं शिलेचें अनावरण करून सभागृहाचें 'श्री. रखमाबाई डोंगरे हॉल' हें नांव जाहीर केलें. ब्राह्मण भगिनी समाजानें त्याच वर्षी भाऊबीज म्हणून जमविलेली रक्कम रु. ५२९१ कु. सुशीला म्हसकर यांनीं श्रींच्या हस्तें सूतिकागृहाच्या चालू खर्चासाठीं डॉ. म्हसकर यांना अर्पण केली. श्रींनीं आपल्या आशीर्वादपर भाषणांत सांगितलें कीं, प्राप्त होणाऱ्या श्रेष्ठत्वाबरोबर जबाबदारीहि वाढते. स्वतःची उन्नति करीत असतां ब्राह्मण सभेनें इतर समाजांच्या उन्नतीकडेहि लक्ष पुरविलें पाहिजे. नंतर श्रींनीं सामाजिक विषमतेमुळें झालेल्या हानीचें दिग्दर्शन करून भारतवर्षाचा उत्कर्ष होईल अशीं कार्यें ब्रा. सभेच्या हातून घडोत असा सभेस आशीर्वाद दिला.

डॉ. म्हसकर औषधालय उद्घाटनसमारंभ

ब्राह्मण समाजाची सांपत्तिक हलाखीची परिस्थिति लक्षांत घेऊन त्या समाजांतील स्त्रिया व मुलें यांना अगदीं अल्प किंमतींत औषधपाणी मिळावें या सद्धेतूनें डॉ. म्हसकर यांनीं रु. १०००० ची देणगी ब्रा. सभेस दिली व सभेनें या औषधालयास डॉ. म्हसकर औषधालय हें नांव देण्याचें ठरविलें.

या औषधालयाचा उद्घाटनसमारंभ दि. ४-४-३५ ला सुप्रसिद्ध विदुषी श्रीमती सौ. गिरिजाबाई केळकर यांच्या हस्तें झाला. याच समारंभाबरोबर म्हसकर सूतिकागृहाचा वार्षिक दिनोत्सव, शिशु अर्धसप्ताह आणि ब्राह्मण भगिनी समाजाचें हस्तकौशल्याचें प्रदर्शन हे कार्यक्रमहि ठेवण्यांत आलेले होते.

श्री. पां. वा. काणे यांनीं आपल्या भाषणांत सभेच्या उत्क्रांतीची माहिती सांगितली. शंभरांत एखादाच शूर आढळतो, हजारांत

एखादाच ज्ञानी सांपडतो पण दाता तर अगदींच क्वचित् दिसतो आणि असा दाता डॉ. म्हसकरांच्या रूपानें सभेला लाभलेला आहे असें सांगून ब्रा. सभेला आज जें महनीय स्वरूप प्राप्त झालेलें आहे त्याचें अर्धें श्रेय त्यांनाच असल्याचा श्री. काणे यांनीं निर्वाळा दिला.

अध्यक्ष सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं औषधालय तसेंच हस्त-कौशल्याचें आणि आरोग्यविषयक प्रदर्शन उघडल्याचें जाहीर केलें आणि आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषणांत सांगितलें कीं, उत्तम माणसांनीं केलेलीं सत्कृत्यें पाहून माणसाची सदाचाराकडे प्रवृत्ति होते. कोण किती पैसा मिळवतो यावर त्याचें मोठेंपण नसून तो मनुष्य मिळ-विलेल्या पैशाचा विनियोग कसा करतो यावर त्याचा मोठेपणा अव-लंबून असतो. अंगांतील सर्व सामर्थ्य एकवटून माणसानें विद्यार्जन व धनार्जन करावें आणि संपादन केलेल्या विद्येचा व धनाचा डॉ. म्हसकरांनीं केला त्याप्रमाणें विनियोग करावा असें त्यांनीं अत्यंत कळकळीनें सांगितलें.

श्री. पांडुरंग वामन काणे यांच्या दोन व्याख्यानमाला

ब्रा. सभेच्या बुद्धिकेंद्राच्या ठिकाणीं असलेले श्री. पांडुरंग वामन काणे यांनीं हिंदुधर्मशास्त्राच्या इतिहासाचा पहिला भाग लिहिला असून पुण्याच्या 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर'नें तो प्रसिद्ध केला असल्याचें वृत्त सभेच्या कार्यकर्त्यांस समजलें होतें. हा ग्रंथ विद्वन्मान्य झाला होता. या ग्रंथाची माहिती व्हावी व त्यांत प्रदर्शित केलेले विचार मुंबईतील बहुजनसमाजास कळावे म्हणून या विषयावर एक व्याख्यानमाला गुंफण्याबद्दल सभेच्या कार्यकर्त्यांनीं श्री. काणे यांस विनंती केली. ही विनंती मान्य करून त्यांनीं १९३४ सालीं 'हिंदुधर्मशास्त्राचा इतिहास' या विषयावर २१ व्याख्यानें दिलीं.

धर्म म्हणजे काय, आपल्या धर्माचीं प्रधान तत्त्वें कोणतीं, आचार-

धर्मांत परिवर्तन झालें कीं नाहीं, असल्यास कोणत्या पद्धतीनें झालें, समन्वय पद्धति म्हणजे काय व ती अमान्य कां, ऐतिहासिक पद्धति म्हणजे काय व तिचीं मूलतत्त्वें कोणतीं, हल्लीं प्रचलित झालेला साम्यवाद व त्याचा आपल्या धर्माशीं असलेला विरोध, सनातनी म्हणून समजली जाणारी विचारसरणी कशी दूषित आहे, आजच्या परिस्थितींत मतपरिवर्तन कसें झालें पाहिजे, या सर्व विषयांचें सम्यक् ज्ञान सर्व-सामान्य माणसालाहि व्हावें हाच या व्याख्यानमालेचा हेतु होता.

श्री. पांडुरंग वामन काणे यांच्या गाढ विद्वत्तेची पूर्ण कल्पना असलेले त्यांचे बालपणापासूनचे मित्र श्री. के. ल. ओगले हे या व्याख्यानांना उपस्थित राहिले आणि त्या व्याख्यानांचीं टांचणें घेऊन त्यांनीं तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं.

या व्याख्यानमालेंत श्री. पां. वा. काणे यांनीं अनेक शास्त्रीय, पारमार्थिक व ऐतिहासिक विषयांची तर छाननी केलीच पण ज्या सामाजिक व धार्मिक प्रश्नांनीं आजच्या समाजांत खळबळ उडवून दिलेली आहे असे प्रचलित विषय घेऊन अस्पृश्यता-निवारण, लग्नविषयक शारदा कायदा, परदेशगमन, मिश्रविवाह, पतितपरावर्तन, स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, आधुनिक साम्यवाद इत्यादि विषय पौर्वात्य व पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथांच्या आधारें सांगोपांग चर्चिले. या व्याख्यानां-वरून श्री. ओगले यांनीं तयार केलेलें पुस्तक हें मराठी भाषेंतील एक संग्राह्य पुस्तक म्हणून गणलें जातें. सुप्रसिद्ध प्राध्यापक वामन मल्हार जोशी यांना, एकदोन वर्षांतल्या मराठी वाङ्मयांतील चिरकालीन वाङ्मय कोणतें असा प्रश्न विचारला असतां, त्यांनीं या पुस्तकाचें नांव घेतलें होतें.

या व्याख्यानमालेचा समारोप भारतवर्षांतील पहिल्या श्रेणींतील शास्त्री मंडळींत जवळ जवळ पहिलें स्थान असलेले वेदान्तवागीश म. म. श्रीधरशास्त्री पाठक यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे



श्री. ज. र. घारपुरे

कै. श्री. मो. भा. भाटवडेकर

श्री. प. पां. महाजन

कै. श्रीमंत ग. वि. साळवेकर

श्री. पां. वा. काणे यांनीं गुंफिलेली दुसरी व्याख्यानमाला

हिंदुधर्मशास्त्राचा इतिहास यावरील व्याख्यानमाला चालू असतांना व्याख्याते वारंवार ऋग्वेदांतील अवतरणें सांगत. त्यामुळें श्री. अण्णासाहेबांनीं वेदासंबंधीं जर व्याख्यानें दिलीं तर तीं फार श्रवणीय व मननीय होतील असें सभेच्या कार्यकर्त्यांस वाटलें व त्याप्रमाणें श्री. अण्णासाहेबांकडे विनंति करण्यांत आली. या विनंतीस मान देऊन श्री. पां. वा. काणे यांनीं 'ऋग्वेदपरिचय' या विषयावर १९३५ सालीं २२ व्याख्यानें दिलीं.

प्रथम ऋग्वेदांतील निवडक २८ सूत्रें घेऊन त्यांचा अर्थ विस्तृत रीतीनें आणि मनोरंजक पद्धतीनें सांगण्यांत आला. त्याचप्रमाणें वैदिक व्याकरणसार देण्याची पद्धति, वेदाचा अर्थ करण्याच्या निरनिराळ्या पद्धती, वेदांतील देवता व तत्त्वज्ञान, वेदकालीन निर्णय, लोकमान्यांचें ओरायन व उत्तर ध्रुवावरील आर्यांचें वसतिस्थान यांतील सिद्धान्त व त्यांवर घेतले जाणारे आक्षेप इत्यादींचें सामान्य विवरण चार व्याख्यानांत करण्यांत आलें. नंतर प्रत्येक सूत्रांतील ऋचांचा अर्थ सांगण्यांत आला. हीं व्याख्यानें अतिशय गहन अशा विषयावर असूनहि फारच मनोरंजक झालीं.

या व्याख्यानमालेचा समारोप केसरी पत्राचे विद्वान संपादक श्री. तात्यासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला. श्री. करंदीकरांनीं श्री. अण्णासाहेब काण्यांच्या बुद्धिमत्तेचें व परिश्रमांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

वरील दोन्ही प्रसंगीं श्री. अण्णासाहेब काणे यांना महावस्त्र व हारतुरे अर्पण करून सभेनें त्यांचा गौरव केला.

या दोन्ही व्याख्यानमालांच्या प्रसंगीं सभागृह श्रोतृवर्गानें अथांग भरून जाई. श्रोतृवर्गांत कॉलेज विद्यार्थी व प्राध्यापक यांची फार मोठ्या

प्रमाणावर उपस्थिति होत असे. श्री. पां. वा. काणे यांची भाषणपद्धति इतकी आकर्षक असे कीं, जमलेला श्रोतृवर्ग अगदीं मंत्रमुग्ध होऊन जाई. ब्राह्मण सभेसंबंधानें त्यांना वाटत असलेल्या आत्मीयतेमुळेंच त्यांनीं व्याख्यानमालेसाठीं आपला बहुमोल वेळ दिला हें उघड आहे. सॉ. बाळ गंगाधर खेर व प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांनीं म्हटल्याप्रमाणें पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानांचा श्री. काण्यांइतका खोल अभ्यास फार थोड्या लोकांनीं केलेला असेल. मुंबईच्या ब्राह्मण समाजाचें हें भाग्य होय कीं, त्याला श्री. अण्णासाहेब काणे यांच्यासारखा प्रवक्ता मिळाला.

१९३४ व १९३५ या दोन वर्षीं दोन व्याख्यानमाला झाल्यामुळें आणखी एक व्याख्यानमाला गुंफविण्यासंबंधानें १९३६ सालीं सभेकडे मागणी आली. तो योग १९३७ सालीं आला. या वर्षीं श्री. अण्णासाहेब यूरोपचा प्रवास आटोपून परत आले होते. त्यांच्या सहज बोलण्यांत या प्रवासवर्णनाचा भाग येई आणि तो इतका मनोवेधक असे कीं, श्री. अण्णासाहेब काणे यांस 'यूरोपचा प्रवास' या विषयावर व्याख्यानें देण्याची विनंती करावी असें सभेच्या कार्यकर्त्यांस वाटूं लागलें. त्याप्रमाणें विनंती करण्यांत आल्यावर श्री. अण्णासाहेबांनीं ती मान्य करून त्या विषयावर सहा व्याख्यानें दिलीं. या व्याख्यानमालेंत अनेक चित्रें एपिडायास्कोपच्या साहाय्यानें दाखविण्यांत आलीं होतीं. श्री. अण्णासाहेब यांची विद्वत्ता, विवेचनशक्ति, प्रतिपादनकौशल्य व तारतम्यबुद्धि या सर्वांचा प्रत्यय या व्याख्यानांच्या वेळीं आला. तसेंच, त्यांची निरीक्षणशक्ति किती तीव्र आहे हेंहि सर्वांना समजून आलें. प्रवासांत रोजच्या रोज जें जें कांहीं ते पहात त्याची ते नोंद करून ठेवीत. प्रवास अवघा १०३ दिवसांचा पण सहस्रावधि तपशिलांची नोंद त्यांच्या स्मरणवहींत केलेली होती. नद्या, सरोवरें, राजधान्या, युद्धक्षेत्रें इत्यादींची ओळख करून देतांना

गंमतीचे संदर्भ, ऐतिहासिक प्रसंग, थोर लोकांचीं चरित्रें, अशा प्रकारचीं विशेष निवेदनें व्याख्याते करीत आणि त्यामुळें पाश्चात्यांच्या जीवनोपवनांत आपण प्रत्यक्ष प्रवास करीत आहोंत असाच श्रोत्यांना भास होई. पाश्चात्यांची ज्ञानलालसा, उद्योगप्रियता, चिकाटी, शिस्त व संघटना, स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणची सौंदर्योपासना इत्यादि गुणांबरोबरच त्यांचा जाज्वल्य देशाभिमान हा गुणहि घेण्यासारखा आहे असें सांगून दुसऱ्या राष्ट्रांना तुच्छ लेखणें, स्त्रीस्वातंत्र्याचा अतिरेक, धार्मिक प्रवृत्तीचा अभाव, विवाहाविषयीं अनिच्छा, अत्यंत खर्चाची रहाणी, नोकरांचें बक्षिस मागण्याचें बंड इत्यादि दोषांचें विवरणहि व्याख्यात्यांनीं मनोरंजक पद्धतीनें केलें.

डॉ. म्हसकर सत्कारसमारंभ

ब्रा. सभेच्या कोणत्याहि हेतूसाठीं रु. २५००० अगर त्याहून मोठी देणगी दिल्यास दाता हा ब्रा. सभेच्या व्य. मं. चा आजीव सभासद समजला जाईल असा सभेचा एक नियम आहे. या नियमाप्रमाणें डॉ. कृ. श्री. म्हसकर हे १९३५ अखेर ब्रा. सभा व्य. मं. चे आजीव सभासद झाले. डॉ. म्हसकर हे सभेच्या हृदयस्थानीं आहेत असें ब्रा. सभेच्या इतिवृत्तांत त्यांचें वर्णन आलेलें आहे. स्वकष्टार्जित संपत्तीपैकीं जवळ जवळ एक लाख रुपये या दानशूर गृहस्थानें ब्रा. सभेला देणगीदाखल दिलेले आहेत. या दातृत्वाचें मूळ त्यांच्या दयाशील अंतःकरणांतच आहे.

डॉ. म्हसकर यांचा जन्म दि. २८-११-१८७९ ला झाला. विद्यार्थिदशेंत एक अत्यंत हुशार व खिलाडू विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याति असे. १९०६ सालीं ते एम्. डी. झाले.

डॉ. म्हसकर हे उच्च दर्जाचे संशोधक आहेत. धंद्यांतील लोकोत्तर प्रतिष्ठा व लक्ष्मीची कृपा या दोन्ही गोष्टी प्राप्त झालेल्या डॉ. म्हसकरांनीं

सर्वसाधारण जनतेच्या हिताची व सुखदुःखांची काळजी वहावी हें दृश्य खरोखरच अत्यंत मनोरम आहे. कांहीं श्रीमंत लोक देणग्या देतात आणि कित्येक गरीब लोक देहाला कष्टवून समाजसेवा करतात हें आपण पुष्कळदां पहातों. पण द्रव्य व शारीरिक कष्ट या दोन्ही प्रकारांनीं पराकाष्ठेची झीज सोसणारा डॉ. म्हसकरांसारखा दानशूर मात्र सहसा आढळत नाहीं. मोठाल्या देणग्या देणारा दाता व आपल्या उच्च दर्जाच्या वैद्यकीय ज्ञानानें आपद्ग्रस्तांच्या दुःखांचा परिहार करणारा स्वयंसेवक या दुहेरी नात्यानें सभेला डॉ. म्हसकरांचा लाभ झाला हें ब्राह्मण ज्ञातीचें परम भाग्य होय. डॉ. म्हसकर यांचें सौजन्य व रोग्यांविषयींची त्यांची आस्था व कळकळ हीं खरोखर वर्णनातीत आहेत. त्यांच्या त्यागबुद्धीविषयीं नितांत आदर वाटत असल्यासुळें ब्रा. स. व्य. मं. नें त्यांचा सत्कारसमारंभ करण्याचें ठरविलें.

हा गुणगौरव समारंभ दि. १८–४–३७ ला श्रीमंत राजेसाहेब बाबासाहेब घोरपडे–इचलकरंजी संस्थानचे अधिपति–यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला.

'डॉक्टरसाहेबांनीं सार्वजनिक सेवेच्या कामाला आपल्या समाजापासून सुरुवात केली. अनन्यसाधारण दातृत्व दाखवूनहि लक्ष्मीसुलभ असा अहंकार त्यांनीं आपणास शिवूं दिला नाहीं. प्रत्येक सूतिकेला म्हसकर सूतिकागृह हें आपलें माहेरचें घर वाटतें याला डॉ. म्हसकरांचें त्यांच्याशीं पित्यासारखें असलेलें वर्तन हेंच कारण आहे. आपल्या संशोधक बुद्धीनें त्यांनीं समाजाचें वैगुण्य शोधून काढलें व तें आपल्या दातृत्वानेंच दूर केलें. एकेका क्षेत्रांतील मोठ्या व्यक्तीला जें काम सर्व आयुष्यांतहि होणें कठीण अशा चार व्यक्तींचीं कामें त्यांनीं करून दाखविलीं आहेत,' अशा आशयाचीं सॉ. केशव रामचंद्र दिवेकर, प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर, प्रा. घारपुरे, श्री. पां. वा. काणे इत्यादि वक्त्यांचीं डॉक्टरसाहेबांच्या गुणवर्णनपर भाषणें या समारंभांत झालीं.

नंतर अध्यक्षांनीं सुप्रसिद्ध चित्रकार श्री. वेलणकर यांनीं तयार केलेल्या डॉक्टरसाहेबांच्या तैलचित्राचें अनावरण केलें व डॉक्टर-साहेबांना खालील अर्थाचें मानपत्र रौप्यकरंडकांतून सभेतर्फे अर्पण करण्यांत आलें.

"मुंबई विश्वविद्यालयाच्या एम्. ए., एम्. डी. यांसारख्या पहिल्या प्रतीच्या शैक्षणिक पदव्या संपादून व विलायतेस शास्त्रीय संशोधनाची परीक्षा देऊन प्रावीण्य मिळविलें व हाफ्किन् प्रयोगशाळेंत सर्पविषा-वरील व आर्यऔषधांवरील संशोधन, कारवार जिल्ह्यांतील मलेरिया-वरील संशोधन व कराची येथील पीतज्वराबद्दल शास्त्रीय शोध, बेळगांव येथील देवींच्या लशीसंबंधीं चिकित्सा, हूकवर्मचे बाबतींत संशोधन करून आपल्या बुद्धीची तीक्ष्णता प्रकट केली व सर्व ब्राह्मण समाजाला जें काम करतां आलें नाहीं तें सूतिकागृहाचें काम आपल्या असामान्य देणगीमुळें ब्रा. सभेस करतां आलें. संकटग्रस्तांची आत्मीयतेनें विचार-पूस करणें, निरपेक्षपणें व निरलसपणें सेवा करीत रहाणें इत्यादि आपले गुण अनुपमेय आहेत. आपणाला दीर्घायुरारोग्य लाभो अशी आमची परमेश्वराच्या चरणीं प्रार्थना आहे."

या मानपत्रास उत्तर म्हणून डॉ. म्हसकर यांनीं जें भाषण केलें तें अत्यंत सौजन्यपूर्ण होतें. ते म्हणाले, 'हा समारंभ केवळ डॉ. म्हसकर या व्यक्तीचा नसून जे गुण ब्राह्मण जातींत निर्माण व्हावे व वाढीस लागावे असें ब्रा. सभेस वाटतें त्या गुणांचाच हा गौरवसमारंभ होय.' नंतर आपण ब्राह्मण ज्ञातीपुरतेंच सार्वजनिक काम करण्यास कां प्रवृत्त झालों हें सांगून ते म्हणाले, 'पाश्चात्य प्रकारचा हा माझा चतुर्थाश्रम आहे. जनताजनार्दन हाच माझा देव अशी माझी भावना आहे आणि त्याच्याच सेवेंत माझें उर्वरित आयुष्य व्यतीत होवो अशीच त्या देवाच्या पायाशीं माझी नम्र प्रार्थना आहे.' नंतर ज्या

आपल्या प्रिय कन्येच्या स्मरणार्थ त्यांनीं ब्रा. सभेस देणगी दिली त्या कन्येचा उल्लेख करून ते म्हणाले, 'ईश्वरानें माझी एक कन्या नेऊन मला अनेक कन्या दिल्या हें मी मोठें परम भाग्य समजतों.'

या समारंभाचा समारोप करतांना अध्यक्षांनीं सूतिकागृहासाठीं आपली रु. ५०० ची देणगी जाहीर केली.

(८) साळवेकर व्यायामशाळा

१९३० ते १९४१

दि. १-७-१९२९ ला साळवेकर व्यायामशाळा सुरू झाल्याचें वृत्त पूर्वी आलेलेंच आहे. व्यायामशाळेंत देशी पद्धतीच्या सर्व व्यायामांचें शिक्षण मिळे व सवडीनुसार त्यांतील विद्यार्थ्यांना चौपाटीवर नेऊन पोहण्याचें शिक्षणहि देण्यांत येई. व्यायामशाळेंत येणाऱ्या मुलांच्या वयोमानाप्रमाणें चार गट करून प्रत्येक गटाला योग्य असें शिक्षण दिलें जाई. सभेच्या सवडीनुसार हरि केशव गोखले हॉल व करंदीकर हॉल व्यायामशाळेंतील मुलांच्या सांघिक व्यायामाकरितां देण्यांत येत. व्यायामाचें शिक्षण देण्यासाठीं मुख्य एक व त्याला मदतनीस दोन मिळून तीन शिक्षक नेमण्यांत आलेले होते. पहिलीं दोन वर्षें व्यायाम-शाळेच्या पटावर २४० विद्यार्थी असून रोजच्या उपस्थितीचें प्रमाण १५० पर्यंत असे.

व्यायामशाळेचा मेळा

शाळेचें प्रत्यक्ष कार्य समाजाच्या नजरेंत भरावें म्हणून त्यांतील मुलांचा एक मेळा तयार करण्यांत आला. या मेळ्याबरोबर श्री. का. वि. खानविलकर, श्री. धोंडोपंत तथा अण्णा कोपर्डेकर व श्री. हरिभाऊ साठे हे ठिकठिकाणीं जात असत. व्यायामासाठीं येणाऱ्या मुलांची

वैद्यकीय तपासणी डॉ. गोळे, डॉ. आठवले, डॉ. भिडे, डॉ. गोखले इत्यादि डॉक्टर मंडळी करीत.

१९३२-३३ या दोन वर्षांत पटावरील संख्या २१५ झाली व रोजच्या उपस्थितीचें प्रमाणहि पूर्वीपेक्षां कमी आलें. या वर्षांत शाळेसाठीं आणखी एका शिक्षकाची नेमणूक करण्यांत आली. या वर्षीहि व्यायामशाळेच्या मेळ्याचे ठिकठिकाणीं कार्यक्रम झाले व त्या बाबतींत श्री. हरिभाऊ भागवत व श्री. विष्णुपंत कर्वे यांनीं बरीच मेहनत घेतली.

देणग्या

या शाळेला हा वेळपर्यंत कायमनिधि मिळालेला नव्हता. व्यायामशाळेचे उत्साही चिटणीस श्री. नीलकंठराव तथा दादा महाजन यांनीं रु. ५०० देऊन या निधीला प्रारंभ केला. त्यानंतर श्री. एस्. आर. पळसुले एंजिनिअर यांनीं रु. १००० ची देणगी या निधीसाठीं दिली. तसेंच, श्री. शिवराम विष्णु परचुरे यांनीं व्यायामशाळेस रु. १०१ ची देणगी दिली. यामुळें १९३१ अखेर हा निधि रु. १६०१ इतका झाला.

सामने व बालवीर पथक

१९३४-३५ सालीं पटावरील संख्या आणखी कमी झाली. व्यायामाच्या दृष्टीनें खुल्या जागेची सोय झाल्याशिवाय मुलांची उपस्थिति वाढविणें कठीण वाटूं लागलें. या दोन वर्षांतील विशेष गोष्ट म्हणजे मुलांचे मैदानी व मर्दानी खेळांचे सामने ही होय. हे सामने स्वस्तिक लीगचें मैदान व ग्रँट मेडिकल कॉलेजचा जिमखाना या ठिकाणीं झाले. विजयी खेळाडूंना उत्तेजन म्हणून रु. ८० पर्यंत पारितोषकें देण्यांत आलीं. या दोन वर्षांच्या काळांत व्यायामशाळेला जोडून एक बालवीर पथक सुरू करण्यांत आलें. शारीरिक व शीलशिक्षण ब्राह्मण कुमारांना मिळावें म्हणूनच हा नवीन उपक्रम करण्यांत आला. या पथकांत प्रारंभीं २४ मुलें आलीं. कांहीं जणांकडून गरिबीची सबब सांगण्यांत

आल्यामुळें गणवेष विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यांत आली. तरीहि ही संख्या फारशी वाढण्याचें चिन्ह दिसेना. सुट्टीच्या दिवशीं या मुलांच्या छावण्या बाहेरगांवीं काढण्यांत येत व त्यावेळीं स्वावलंबनाचे विविध कार्यक्रम ठेवण्यांत येत. स्काऊट इन्स्पेक्टर श्री. थदाणी व श्री. भोसेकर हे पथकांची पहाणी करीत असत.

१९३६-३७ या वर्षीं श्री. रघुनाथ मोरेश्वर तथा दादा पेंडसे हे विनामूल्य शिक्षकाचें काम करण्यासाठीं व्यायामशाळेस लाभले. त्यामुळें विद्यार्थ्यांची संख्या थोडीशी वाढली व. रोजची उपस्थितिहि अधिक प्रमाणांत होऊं लागली. श्री. दादा पेंडसे हे आपलें अत्यंत आवडतें असलेलें कुस्तीचें शिक्षण मुलांना देऊं लागले.

नथूकाकांची देणगी

व्यायामशाळेंतील मुलांची प्रगति ब्रा. सभेच्या सभासदांच्या नजरेस यावी म्हणून या दोन वर्षांच्या काळांत या मुलांचे कार्यक्रम सभेच्या श्रीगणेशोत्सवांत ठेवण्यांत आले. व्यायामशाळेची अडचण लक्षांत आल्यामुळें आजीव स्वयंसेवक श्री. अं. गो. पुणतांबेकर यांनीं सभेकडून मिळालेली थैली व्यायामशाळेला देणगी म्हणून देऊन टाकली व मुलांकरितां उघड्या जागेची व्यवस्था करण्याबद्दल चालकांना विनंती केली.

या काळांत शाखेचा कायम निधि म्हणून रु. ६००१ होता व तो शंकरवाडीच्या इमारतीच्या कामीं ब्रा. सभेकडून वापरण्यांत आला होता. ब्रा. सभेचें सूर्यपथकहि या काळांतच काढण्यांत आलें होतें, व श्री. शामराव वैद्य त्या पथकाचें मार्गदर्शन करीत असत.

कुस्त्यांचे सामने

१९३८-३९ या दोन वर्षांच्या काळांत व्यायामशाळेंतील मुलांचे सभेच्या व इतर ठिकाणच्या गणेशोत्सवांत कार्यक्रम करण्यांत आले.

यंग मेन्स हिंदु असोसिएशन मार्फत होणाऱ्या गोकुळाष्टमी व विजया-दशमी या उत्सवांच्या वेळीं होणाऱ्या सामन्यांतहि भाग घेऊन मुलांनीं आपलें प्रावीण्य दाखविलें व चांदीचा पेला मिळविला. तसेंच, कुस्त्यांच्या चढाओढींतहि बऱ्याच विद्यार्थ्यांनीं पारितोषकें मिळविलीं. कुस्त्यांच्या या सामन्यांत ब्राह्मणांचीं मुलें अशीं या व्यायामशाळेंतूनच गेलेलीं होतीं. हें दृश्य कुस्तीगीरांस कांहींसें नवीनच होतें. त्यामुळें ते लोक या मुलांकडे मोठ्या कौतुकानें पहात. कु. बाळ खानविलकर, वाठारे व डिके यांनीं फारच उत्कृष्ट कुस्त्या केल्या व गुरुवर्य माणिक-राव आणि गुरुवर्य दामूअण्णा भिडे यांच्याकडून प्रशंसोद्गार मिळविले.

व्यंकप्पा बुरूड यांचे धन्योद्गार

कुस्तीच्या बाबतींत अखिल भारतवर्षांत कीर्ति मिळविलेले पेहेलवान व्यंकप्पा बुरूड हे कुस्त्यांच्या सामन्यांसाठीं मुंबईस आलेले असतांना त्यांनीं आपल्या मेहेनतीसाठीं पांचसहा व्यायामशाळा पाहिल्यावर शेवटीं ही साळवेकर व्यायामशाळा पसंत केली व त्याप्रमाणें ते महिना दीड महिना या व्यायामशाळेंत मेहेनतीसाठीं येत असत. या व्यायामशाळें-तील स्वच्छता व उत्कृष्ट व्यवस्था पाहून त्यांनीं धन्योद्गार काढले होते.

ब्रा. सभेस शाखेची देणगी

१९४०-४१ या वर्षीं पटावरील विद्यार्थ्यांचें प्रमाण आणखी रोडावलें व रोजच्या उपस्थितीवरहि प्रतिकूल परिणाम झाल्याचें दिसून आलें. या शाखेचा कायमनिधि सहासात हजार रुपयांहून फारसा पुढें गेल्याचें या काळांत तरी दिसत नाहीं. शाखेच्या कायमनिधींतून शंकर-वाडीच्या कामासाठीं ब्रा. सभेनें रु. ६००१ घेतले होते ते ब्रा. सभेस देणगी म्हणून समजण्याचें या काळांत ठरलें आणि उघड्या जागेची जी अडचण व्यायामशाळेस भासते ती दूर करण्यासाठीं मदत करण्या-बद्दल समाजाला विनंती करण्यांत आली.

ही व्यायामशाळा स्थापन होऊन बारा वर्षें होऊन गेलीं पण त्या मानानें तिनें विशेष प्रगति केल्याचें दिसत नाहीं. समाजाला मुलांच्या व्यायामाचें महत्त्व ज्या प्रमाणांत पटायला पाहिजे त्या प्रमाणांत पटलेलें दिसत नाहीं हें खरोखर दुर्दैव होय.

(९) करमणूक शाखा

१९३० ते १९४१

प्रारंभ. सभेच्या करमणूक शाखेचें स्वरूप पहिल्या बारा वर्षांप्रमाणेंच दुसऱ्याहि बारा वर्षांच्या कालखंडांत असल्याचें दिसून येतें. पहिल्या बारा वर्षांत या शाखेतर्फे फक्त बुद्धिबळें खेळण्याची व्यवस्था होती तींत दुसऱ्या बारा वर्षांच्या काळांत कॅरम या खेळाची भर पडली. या शाखेचा खर्च या शाखेसाठीं जमा होणाऱ्या वर्गणीतूनच भागविण्यांत यावा असें ब्राह्मण सभेचें धोरण होतें. या शाखेंत दररोज सायंकाळीं ७ ते ९ खेळ खेळले जात. शनिवारीं रात्रीं करमणूक शाखेचे सभासद अल्पोपहाराचा कार्यक्रम करीत व त्यासाठीं होणारा खर्च आळीपाळीनें करण्याची प्रथा असे.

या बारा वर्षांतील पहिल्या दोन वर्षांत या शाखेतर्फे श्री. रामभाऊ कुंदगोळकर तथा सवाई.गंधर्व व श्री. वामनराव पाध्ये यांच्या गायनाचे कार्यक्रम करण्यांत आले.

१९३४-३५ या दोन वर्षांत या शाखेच्या सभासदांची संख्या वाढली व प्रो. नारायणराव व्यास व श्री. सवाई गंधर्व यांच्या गायनाचे कार्यक्रम झाले.

१९३६–३७ या दोन वर्षांत श्री. मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या गायनाचा कार्यक्रम होऊन शाखेंतील सभासदांचें संमेलनहि करण्यांत आलें. या संमेलनांत श्री. वासुदेवराव दिवेकर व श्री. विठ्ठलराव तथा अण्णा देशमुख यांचें गायन झालें.

त्यानंतर शाखेंतील बरीचशी मंडळी बाहेरगांवीं रहावयास गेल्यामुळें या शाखेंतील सभासदांची संख्या खूपच घटली आणि म्हणून १९३८ ते १९४१ या काळांत या शाखेतर्फे विशेष उल्लेखनीय असा कार्यक्रम झालाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

या शाखेच्या सभासदांच्या ओळखीमुळें बाहेरगांवची व परप्रांतीलहि कांहीं थोर व विद्वान मंडळी या शाखेंत गप्पागोष्टी करण्यासाठीं येत असत व त्यामुळें पुष्कळदां सभेच्या कार्यकर्त्यांशीं त्यांचा परिचय होऊन उत्सवादि समारंभांच्या वेळीं त्यांचा उपयोग करून घेणें सभेला सुकर होई.

(१०) पोटसंघांचें विलीनीकरण व ब्राह्मणसभांचें एकसूत्रीकरण

'राष्ट्रीय उत्कर्षाचें निशाण हातीं घेऊन धांवणाऱ्या तमाम जनतेचे आपणहि एक महत्त्वाचे घटक आहों आणि आमचें पूर्वीचें तेज लुप्तप्राय झाल्यासारखें दिसत असलें तरी तें अगदींच नष्ट झालेलें नाहीं हें ब्राह्मणांनीं दाखविण्याची वेळ आलेली आहे,' अशा अर्थाचें एक वाक्य संयुक्त ब्राह्मणसभेच्या वतीनें १९१८ सालीं प्रसिद्ध झालेल्या विनंतीपत्रकांत होतें. हें दिव्य करून दाखवावयाचें तर ब्राह्मण समाज एकमुखी होणें अवश्य होतें आणि असें एकमुखी व्हावयाचें तर ब्राह्मण समाजानें आत्मनिरीक्षण करणें जरूर होतें.

पंचद्रविडांतहि पंचवीस पोटजाती आहेत. आपापसांत ऐक्य व प्रेम उत्पन्न झाल्याशिवाय इतर समाजांशीं आपलें ऐक्य व प्रेम उत्पन्न होणें शक्य नाहीं. यासाठीं पूर्वपरंपरा व सद्यःस्थिति यांचा समन्वय करण्यांत आला पाहिजे. समाजांत सामर्थ्य उत्पन्न होण्यासाठीं जो उपाय सुचवायचा तो अगदीं परकाहि वाटतां उपयोगी नाहीं आणि लोकांना आचरण्यास कठीणहि वाटून भागणार नाहीं.

विचारांना चालना देणारीं व्याख्यानें

ब्रा. हितवर्धिनी सभेमार्फत जी शिरगणती झाली त्यावेळीं ब्राह्मण समाज कांहीं परंपरा चुकीच्या असल्याबद्दलची खात्री पटल्यानंतर

सुद्धां त्या सोडून देण्यास तयार नसल्याचा अनुभव आला. तसेंच, शैक्षणिक दृष्ट्याहि नवीन विचार ग्रहण करण्यास समाज समर्थ केला पाहिजे या तत्त्वाची खूणगांठ बांधून ब्राह्मण सभेनें अत्यंत सावधगिरीनें आपलीं पावलें टाकण्याचें ठरविलें याच दृष्टीनें प्रा. वामन मल्हार जोशी, रा. ब. चिंतामणराव वैद्य, वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री लेले, वे. शा. सं. महादेवशास्त्री दिवेकर, प्रा. पांडुरंग वामन काणे इत्यादींचीं ब्राह्मण समाजाच्या विचारांना चालना देणारीं व्याख्यानें झालीं. समाजाचें मनोदौर्बल्य नाहींसें करण्याचाच हा एक उपाय होता.

अनेक वर्षांची निरलस सेवा पाठीशीं असल्याशिवाय नुसत्या मतप्रतिपादनाचें तेज पडत नाहीं हें ओळखूनच ब्रा. सभेनें आपला कार्यक्रम आंखला होता. हळुहळू ब्रा. सभेच्या सेवेची जाणीव ब्रा. समाजाला होऊं लागली. १९२५ च्या उत्सवांतील व्याख्याते व त्यांनीं घेतलेले विषय पाहिले कीं, ब्रा. सभेनें समाजाच्या मतपरिवर्तनाचें काम किती सावधगिरीनें आणि कौशल्यानें चालविलें होतें हें दिसून येतें. हे कार्यक्रम ठरविण्याच्या कामींहि सभेच्या चालकांना किती कष्ट पडले असतील याची कोणालाहि कल्पना करतां येण्यासारखी आहे. ते कार्यक्रम असेः—

श्री. न. चिं. केळकर (ब्राह्मण संघटनाची आवश्यकता), प्रा. रा. द. रानडे (वेदांत), डॉ. श्री. व्यं. केतकर (ब्राह्मणांचा इतिहास), प्रा. श्री. म. माटे (अस्पृश्यतानिवारण), श्री. महादेवशास्त्री दिवेकर (हिंदु समाजघटना), रा. ब. सी. का. बोले (ब्राह्मणब्राह्मणेतर वाद), सौ. गिरिजाबाई केळकर (ब्राह्मण स्त्रिया).

या व्याख्यानांशिवाय त्या उत्सवांत वे. शा. सं. सदाशिवशास्त्री भिडे यांचें प्रवचन व ह. भ. प. डॉ. पटवर्धन यांचें कीर्तन हे कार्यक्रमहि ब्राह्मण समाजाच्या विचारांना नवीन चालना देण्यासारखेच झाले.

संघटनाची आवश्यकता

याच वर्षीं ज्ञातिगृह घेण्यांत आलें आणि त्या वेळीं सभेला ब्राह्मण समाजाकडून जें बहुमोलाचें आर्थिक साहाय्य मिळालें त्यावरून त्या समाजाला सभेची सेवा पटत असल्याचें अनुभवाला आलें. वे. शा. सं. महादेवशास्त्री दिवेकर यांनीं 'ब्राह्मणांतील पोटजातींचें एकीकरण' या पुस्तकांत ग्रथित केल्याप्रमाणें तुल्याचार, तुल्यसंस्कार अशा ज्ञातींनीं धर्मशास्त्रदृष्ट्या एकरूप कसें व्हावें याविषयींचें मार्गदर्शन नामांकित अधिकारी व्यक्तींमार्फत ब्राह्मण सभेनें चालविलें होतें. अशाच प्रकारच्या प्रयत्नांनीं पूर्वपरंपरा व सद्यःस्थिति यांचा योग्य समन्वय करून आजचा ब्राह्मण समाज सुवर्णमध्य साधण्यास समर्थ होईल अशी ब्राह्मण सभेस खात्री वाटत होती. धर्मरक्षण, समाजरक्षण व राष्ट्ररक्षण यांकरितां संघटित होऊन इतरांना ज्यांनीं कित्ता घालून द्यावा त्या ब्राह्मण वर्गांतच इतक्या जाती आणि त्या प्रत्येक जातीबद्दल इतक्या चमत्कारिक समजुती आहेत कीं, त्या पाहिल्यावर मनाला उद्वेग वाटल्याशिवाय रहात नाहीं. ब्राह्मणांच्या मागें त्याग, तप, विद्या व उद्योग या साधनचतुष्टयाची उज्ज्वल परंपरा आहे. ब्राह्मणांनीं आपली बुद्धि पोटजातींच्या एकीकरणाच्या प्रयत्नांत कामीं लावावी आणि त्याला आवश्यक असें वातावरण ब्राह्मण समाजांत निर्माण व्हावें अशाच प्रकारच्या प्रचारतंत्राचा अवलंब ब्रा. सभेनें केलेला होता.

शंकरवाडी निधीकरितां द्रव्य जमविण्याचें कार्य उत्साहानें सुरू होतें, ज्ञातींतील व्यक्तींकडून सढळ हातानें देणग्याहि मिळूं लागल्या होत्या, तोंच ब्राह्मण सभेंत ज्या चार प्रमुख पोटजातींचा समावेश झालेला आहे त्यांपैकीं एका पोटजातीनें—कऱ्हाडे ज्ञातींतील कांहीं मंडळींनीं—आपला स्वतंत्र संसार थाटण्याचें ठरविलें.



१९३८–३९ चें कार्यकारी मंडळ



ब्राह्मण सभेच्या कार्यकर्त्यांचें श्री. मोडक एंजिनिअर यांच्या अध्यक्षतेखालीं झालेलें स्नेहसंमेलन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ

त्याप्रमाणें दि. १-११-१९२५ ला सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या घरीं 'कऱ्हाडे ब्राह्मण संघ' स्थापनेकरितां सभा बोलावण्यांत आली. कऱ्हाडे बंधूंनीं अशा विघटीकरणास प्रारंभ करूं नये म्हणून ब्रा. सभेच्या व्य. मंडळांतील सदस्यांनीं त्यांना खासगी रीतीनें भेटून त्यांच्या संकल्पित योजनेपासून त्यांना परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण हा प्रयत्न यशस्वी होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां ब्राह्मण ज्ञातींतील कांहीं कार्यकर्त्यांनीं एक पत्रक तयार केलें. त्या पत्रकांत ब्राह्मण सभेचा उद्देश, सभेकडून होत असलेलें कार्य, यांसंबंधानें माहिती देऊन, ब्राह्मण समाजांत निरनिराळ्या पोटसंस्था निघणें हितावह तर नाहींच पण त्यामुळें अपाय होण्याचा मात्र जबरदस्त संभव आहे हें स्पष्टपणें दाखवून देण्यांत आलें होतें. कऱ्हाडे ब्राह्मणांची स्वतंत्र संस्था सुरू होण्यापूर्वी ब्राह्मण समाजांतील पुढारी मंडळीची एक सभा बोलावून त्या सभेंत या प्रश्नाचा साधकबाधक रीतीनें विचार करण्यांत यावा आणि मग कऱ्हाडे बंधूंनीं काय ठरवावयाचें असेल तें ठरवावें अशाहि अर्थाचें पत्रक काढण्यांत आलें व त्या पत्रकावर डॉ. भडकमकर, डॉ. सरदेसाई, डॉ. पुरोहित, डॉ. खेर, सॉ. बाळासाहेब खेर इत्यादींच्या बरोबर ब्राह्मण समाजांतील ३५० सद्गृहस्थांनीं आपल्या स्वाक्षऱ्या केल्या. हें पत्र दि. १–११–१९२५ च्या कऱ्हाडे बंधूंच्या सभेच्या अध्यक्षांच्या हातीं देण्यांत आलें. पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं आणि त्याच दिवशीं कऱ्हाडे ब्राह्मण संघाची स्थापना झाली. यानंतर दि. १–१२–१९२५ ला कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या अध्यक्षांचें, कऱ्हाडे ब्राह्मण संघ. ब्रा. सभेशीं संलग्न करून घ्यावा अशा अर्थाचें पत्र ब्राह्मण सभेकडे आलें. त्या पत्राला ब्रा. सभा व्य. मंडळातर्फे पुढील अर्थाचें उत्तर देण्यांत आलें:—

'कऱ्हाडे ब्राह्मण संघ स्थापन होण्यापूर्वी ब्राह्मण सभेस कोणतीहि सूचना देण्यांत आली नव्हती. ज्ञातिगृह खरेदी करण्याचा करार झाला

असून त्यासाठीं लागणारा निधि जमविण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत व या कामीं कऱ्हाडे बंधू आपले हात आंखडते घेत आहेत असा कटु अनुभव येत आहे. संस्था संलग्न करून घेण्यासाठीं स्वतंत्र नियम नाहींत. कऱ्हाडे संघाकडून कांहीं निश्चित सूचना आल्यास ब्रा. सभेकडून त्यांचा अवश्य विचार होईल. '

व्याख्यानें व परिषदा

दि. २१ व २२ नोव्हेंबरला वांई येथें ब्राह्मण परिषद झाली. या परिषदेस श्री. सीताराम दिनकर जोगळेकर व श्री. गोविंद हरि मोडक यांना ब्राह्मण सभेनें आपले प्रतिनिधी म्हणून पाठविलें होतें.

१९२६-२७ या सालांतील श्रीगणेशोत्सवांत याच दृष्टीनें कार्यक्रम आंखण्यांत आले. श्री. न. चिं. केळकर (ब्राह्मण्य), बॅ. बाबासाहेब जयकर (सद्यःस्थिति), प्रा. श्री. म. माटे (जातिभेद मोडणें म्हणजे काय ?), श्री. ना. रा. बामणगांवकर (ब्राह्मण-ब्राह्मणेतर), श्री. स. ल. सिलम (ब्राह्मण-ब्राह्मणेतर), वे. शा. सं. महादेवशास्त्री दिवेकर (अकोला परिषदेचें कार्य), याप्रमाणें व्याख्यानें झालीं.

दि. ९, १० व ११ डिसेंबर १९२७ ला अकोला येथें वृहन्महाराष्ट्र परिषद झाली. या परिषदेला श्री. पांडुरंग वामन काणे व श्री. परशुराम पांडुरंग महाजन यांना ब्रा. सभेनें आपले प्रतिनिधी म्हणून पाठविलें. या प्रतिनिधींना, देशस्थ, चित्पावन, कऱ्हाडे व देवरुखे या पोटजातींतील विवाह रूढ व्हावेत असा ठराव मांडण्याचा आदेश देण्यांत आला होता.

श्रीक्षेत्र काशी येथें १९२८ अखेर भरणाऱ्या ब्राह्मण महासंमेलनास वेदान्तवागीश श्रीधरशास्त्री पाठक, श्री. पांडुरंग वामन काणे व वे. शा. सं. दामोदरशास्त्री भानोसे असे तीन प्रतिनिधी सभेमार्फत पाठवावयाचें ठरलें. हें संमेलन झाल्यानंतर वे. शा. सं. रंगाचार्य रड्डीशास्त्री

यांचें श्री. पां. वा. काणे यांच्या अध्यक्षतेखालीं दि. ५-१-२९ ला त्या संमेलनासंबंधीं व्याख्यान झालें.

सर्व पोटजातींचे स्वतंत्र संघ

कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा कित्ता गिरवून ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणांपैकीं कांहींनीं आपला निराळा संघ काढण्याचें ठरविलें. लौकरच हा संघ स्थापनहि झाला. त्याच्याच मागोमाग चित्पावन ब्राह्मण समाजापैकीं कांहींनीं आपलाहि निराळा संसार थाटला. हे संघ निघूं नयेत म्हणून ब्राह्मण सभेनें दोन्ही प्रसंगीं प्रयत्नांची शिकस्त केली पण कऱ्हाडे ब्राह्मण संघाप्रमाणेंच याहि दोन्ही प्रसंगीं ते प्रयत्न फुकट गेले ! देवरुखे मंडळींची एक स्वतंत्र संस्था पूर्वीच अस्तित्वांत होती; आणि शेवटीं यजुर्वेदी ब्राह्मण मंडळींनींहि आपली एक संस्था स्थापन केल्यामुळें विघटनाचें हें वर्तुळ पूर्ण झालें ! !

दोन दगडींवर पाय

पोटसंघांचें कार्य कोणास आवडो वा न आवडो, तें चालूच रहाणार हें स्पष्ट दिसूं लागलें. तेव्हां निदान ब्राह्मण सभेच्या कार्यकर्त्यांची तरी द्विधा वृत्ति होऊं नये म्हणून दि. २४-१-३२ च्या ब्राह्मण सभेच्या व्य. मंडळाच्या सभेंत असा ठराव मांडण्यांत आला कीं, ब्राह्मण संभेंत ज्या पोटजातींचा समावेश झाला आहे अशा ज्ञातींतील कोणत्याहि एका अगर अनेक ज्ञातींच्या त्या ज्ञातीपुरत्याच मर्यादित असलेल्या सभेच्या व्य. मंडळांतील सभासदत्व अगर अशा मंडळांतील अगर बाहेरील कोणतीहि हुद्द्याची जागा ब्रा. सभा व्य. मंडळावरील सभासदांनीं स्वीकारूं नये. यावेळीं हा ठराव अध्यक्षांच्या जादा मतानें नापास झाला.

डोळे उघडेनात

१९३२ च्या प्रारंभीं श्री. का. वि. खानविलकर यांची ब्रा. सभेचे चिटणीस म्हणून निवड झाली व पोटसंघांनीं ब्रा. सभेंत विलीन व्हावें

असे बरेच प्रयत्न झाले. १९३२-३३ च्या द्विवार्षिक अहवालांत, असे पोटसंघ निर्माण झाल्यानें समाजकार्य दुर्घट होऊं पहात आहे व भविष्यकाळच्या जीवनकलहांत ब्राह्मण समाज सुसंघटित होईल तरच निभाव लागेल अशी धोक्याची सूचना देऊन ठेवण्यांत आलेली आहे.

वरील धोक्याच्या सूचनेनें उद्दिष्ट साध्य होण्याचा रंग दिसेना. तेव्हां ब्रा. सभेनें निःपक्षपातीपणानें चालविलेल्या कार्यामुळें ब्राह्मण समाजाचें हित, अल्प प्रमाणांत कां होईना, होऊं शकतें हें १९३४-३५ च्या अहवालांत दाखविण्यांत आलें. विशेष जोराचा विरोध न होतां जितक्या ब्राह्मण पोटजाती एकत्र आणतां आल्या तितक्या ब्रा. सभेनें आणल्या पण उरलेल्या ब्राह्मण पोटजाती उत्तरोत्तर पोटांत घेण्याच्या ऐवजीं एकत्र आलेल्यांतूनच कांहीं जाती फुटून आपले स्वतंत्र संघ स्थापूं लागल्या याबद्दल उद्विग्नता प्रकट करून, आपसांतील भेदभाव विसरून आणि आकुंचित दृष्टि सोडून सर्वांनीं समान भूमिकेवर यावें अशी विनंती करण्यांत आली.

एकीकरणाचा प्रयत्न

१९३६-३७ च्या अहवालांत, ब्राह्मण समाजाच्या हजारों घरांतलें द्रव्य पैपैशानें जमा करून त्याची ब्रा. सभेनें रास जमविली आणि आपलें म्हणून कोणी आहे असें विश्वासस्थान सभेनें ब्राह्मण समाजाकरितां निर्माण केलें असें कथन करून ऐक्याची स्थापना करण्याची तीव्र जाणीव उत्पन्न करून देण्यांत आली.

दि. १३ व १४ मार्च १९३७ ला ब्राह्मण सभेच्या कार्यकर्त्यांचें संमेलन झालें. ब्रा. सभेंत समावेश झालेल्या पोटजातींचे निघालेले स्वतंत्र संघ ब्राह्मण सभेंत कसे विलीन होतील, निदान या संघांचें कार्य ब्रा. सभेच्या कार्याला विरोधक तरी कसें होणार नाहीं अशाबद्दलची योजना व्यवस्थापक मंडळानें तयार करावी असें या संमेलनांत सुचवि-

ण्यांत आलें. त्याप्रमाणें ब्रा. सभा व्य. मंडळानें एक समिति नेमली. या समितीच्या चिटणिसांनीं सर्व पोटसंघांना पत्रें लिहून विचारविनिमयाकरितां पांच प्रतिनिधी पाठविण्याची विनंती केली. दरम्यान १०-४-३७ ला ब्रा. सभेची साधारण सभा झाली व त्या सभेंतहि वरील अर्थाचा प्रस्ताव संमत झाला. तेव्हां तोहि या समितीकडे पाठविण्यांत आला.

सर्व पोटसंघांच्या प्रतिनिधींची सभा दि. ६–३–१९३८ ला झाली. सभेंत ब्रा. सभेच्या नऊ प्रतिनिधींशिवाय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, चित्पावन ब्राह्मण संघ, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मण मंडळ व देवरुखे ब्राह्मण संघ या पांच संस्थांचे प्रत्येकीं पांच असे पंचवीस प्रतिनिधी उपस्थित होते.

एकीकरणाच्या सभेचा वृत्तान्त

सर्वानुमतें डॉ. वि. कृ. डोंगरे यांची अध्यक्षस्थानीं निवड झाली. श्री. पांडुरंग वामन काणे यांनीं ब्राह्मण सभेतर्फे सर्व उपस्थितांचें स्वागत करून ब्रा. सभेचा प्रारंभापासून इतिहास सांगितला आणि ब्राह्मण सभेचा कारभार कसा निःपक्षपात रीतीनें आणि कांटेकोरपणानें चाललेला आहे हें सप्रमाण दाखविलें. एकोप्यानें कार्य चालल्यास ब्राह्मण समाजाची निःसंशय प्रगति होईल अशी आपली खात्री असल्याचें त्यांनीं सांगितलें. १९२६ सालीं सभेला मोठाल्या देणग्या मिळाल्या पण त्यापूर्वी कार्यकारी मंडळांतच मोठा निधि जमा करण्याचा प्रयत्न करावा लागला आणि ब्रा. सभेचें स्थायिक स्वरूप व कार्य पाहिल्यानंतरच बाहेरून देणग्या मिळूं लागल्या हें त्यांनीं विशद केलें. या सर्व देणग्यांतून चाललेल्या कार्याचा फायदा सर्वांना सारखाच मिळत आहे असें सांगून श्री. काणे पुढें म्हणाले कीं, पोटसंघ आपापल्या पुरतें कार्य करूं लागल्यामुळें ब्रा. सभेचें नुकसान होत आहे. या आपल्या म्हणण्याच्या सिद्ध्यर्थ त्यांनीं त्यावेळीं सर्वांस

परिचित असलेलीं दोन उदाहरणेंहि दिलीं आणि सर्वांच्या विचारा-करितां म्हणून ब्रा. सभेच्या वतीनें त्यांनीं पुढील सूचना मांडल्या:—

(१) निरनिराळे पोटशाखांचे संघ बंद करावे.

(२) अगर ब्रा. सभेला विघातक होणार नाहीं असें कार्य पोटसंघांस कसें करतां येईल याची त्यांनीं योजना तयार करावी.

(३) ब्रा. सभा जीं कामें करीत आहे तीं पोटसंघांनीं करूं नयेत.

(४) पोटसंघांच्या व्य. मं. वरील सभासद ब्रा. सभेच्या व्य. मं. वर असूं नयेत.

सर्व पोटसंघांच्या प्रतिनिधींनीं या सभेंतील वादविवादांत भाग घेतला आणि आपापले विचार पुढें मांडले. पोटसंघ बंद करावेत ही सूचना कोणींहि मान्य केली नाहीं. ब्राह्मण सभा जें कार्य करीत आहे तें पोटसंघांनीं करूं नये ही सूचना अंमलांत आणणें कठीण असल्याचें सांगण्यांत आलें. मोठमोठ्या देणग्या मिळविण्यासाठीं ज्या शाखेचा दाता असेल त्या शाखेच्या पोटसंघाकडून खटपट केली जाणें अगदीं स्वाभाविक आहे असाहि युक्तिवाद करण्यांत आला. शक्य तर सर्व संघांच्या ' फेडरेशन 'ची योजना तयार करावी अशी एक सूचना पुढें मांडण्यांत आली.

अशा प्रकारच्या विचारविनिमयानंतर श्री. अण्णासाहेब काणे यांनीं ब्राह्मण सभेंत ज्या पोटजातींचा समावेश होऊं शकतो त्या पोटजातींनीं मुंबईत आपापल्या पोटजातीपुरते स्वतंत्र संघ चालवूं नयेत, पोट-जातींच्या संघांनीं जे निधी जमविले आहेत त्यांची स्वतंत्र पंच नेमून व्यवस्था करावी अशा अर्थाचा ठराव मांडला. हा ठराव प्रत्येक पोटसंघाकडे पाठवावा व त्या प्रत्येक संघानें आपलें मत ब्रा. सभेस कळवावें असें ठरलें आणि या सभेचें काम संपलें.

प्रयत्न निष्फळ ठरले ?

वरील सभेंत ठरल्याप्रमाणें श्री. काणे यांनीं मांडलेला प्रस्ताव सर्व पोटसंघांकडे पाठविण्यांत आला. एकंदर रंगावरून पोटसंघ बंद करण्यास तयार होण्याइतकी मनोभूमिका अद्यापि तयार झाली नसल्याचें दिसून आलें. १९३८-३९ च्या ब्राह्मण सभेच्या अहवालांत याच विषयाकडे सभासदांचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. ब्राह्मण सभेचें धोरण प्रगमनशील व प्रसरणशील आहे म्हणजे ब्राह्मण सभेच्या अंतर्भूत झालेल्या पोटजातींनीं एकत्र राहून पंचद्रविडांतील ज्या ब्राह्मण जातींना विशेष विरोध नाहीं अशांचा उत्तरोत्तर सभेंत अंतर्भाव करावा आणि ब्राह्मण समाज एकरूप होऊन संघटना वाढावी अशी ब्राह्मणं सभेची इच्छा असल्याचें त्या अहवालांत नमूद करण्यांत आलें असून अशा प्रकारचे सवते सुभे नाहींसे करण्याच्या बाबतींत ब्राह्मण सभेस अद्यापि यश लाभलें नसल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यांत आलेली आहे. प्रत्येक जातीनें संघटित व्हावें म्हणजे सर्व जातींची संघटना आपोआप होईल या म्हणण्याचा फोलपण दाखविण्यांत येऊन अशा सवत्या सुभ्यांचे दुष्परिणाम कोठवर जातील याचा अंदाज करणें कठीण आहे अशा प्रकारची धोक्याची सूचनाहि या अहवालांत स्पष्टपणें दिलेली होती. निदान पोटजातींतील पुढाऱ्यांनीं तरी पोटसंघांच्या कल्पनेचा पुरस्कार व अंगीकार करूं नये आणि स्वकीयांस या कल्पनेची बाधा न होण्याची काळजी घ्यावी म्हणजे पोटसंघांच्या एकीकरणाच्या प्रयत्नांस यश येण्यास मदत होईल नि या एकोप्याचीं मधुर फळें भावि पिढीला तरी चाखावयास मिळून ब्राह्मण समाजाला आपलीं पावलें उन्नतिपथावर पडत आहेत हें दृश्य पहाण्याचें भाग्य लाभेल अशी आशाहि त्या अहवालांत प्रकट करण्यांत आलेली होती.

एकसूत्रीकरणाचे प्रयत्न

दि. १ व २ एप्रिल १९३९ ला ब्राह्मण सभेंतील कार्यकर्त्यांचें एक संमेलन झालें. या संमेलनांत शंभराहून अधिक कार्यकर्त्यांनीं भाग घेतला. अध्यक्षस्थानीं श्री. नारायण विनायक मोडक होते. त्या वेळीं अनेक उपयुक्त विषयांवर चर्चा झाली. त्यांत खालील दोन सूचनांसंबंधीं व्यवस्थापक मंडळानें विचार करून योजना तयार करावी असें ठरलें.

(१) मुंबई व उपनगरांतील या सभेच्या धर्तीवर काम करणाऱ्या संस्थांत एकसूत्रीपणा आणण्याचा प्रयत्न करणें.

(२) माध्यंदिन (पळशीकर) ब्राह्मणांचा समावेश ब्राह्मण सभेंत करणें.

व्य. मं. नें ब्राह्मण संस्थांच्या एकसूत्रीकरणाची सूचना मान्य केली व त्यासंबंधीं योजना तयार करण्याकरितां एक समिति नेमली. ब्राह्मण सभेशीं साद्दश्य असणाऱ्या अनेक संस्था महाराष्ट्रांत आहेत. या सर्वांचें एकसूत्रीकरण झालें तर सर्व ब्राह्मण समाजाच्या दृष्टीनें तें फारच हितावह होईल. पण एवढें प्रचंड काम हातीं घेण्यापूर्वी मुंबई व उपनगरें यांत असलेल्या अशा संस्थांचें एकसूत्रीकरण करण्याचा प्रयत्न करावा व तो यशस्वी झाल्यास आणखी पुढें पाऊल टाकावें असें या समितीनें ठरविलें. त्याप्रमाणें ब्राह्मण सहाय्यक संघ, ब्राह्मण सेवा मंडळ दादर, ब्राह्मण सभा मालाड, ब्राह्मण सभा कुर्ला, ब्राह्मणसेवा संघ ठाणें, ब्राह्मण सभा कल्याण, दक्षिणी ब्राह्मण संघ नायगांव, या संस्थांना आपापले प्रतिनिधी पाठविण्याबद्दल निमंत्रणें पाठविण्यांत आलीं. दि.९–३–४१ ला अशा सर्व प्रतिनिधींची सभा झाली. अध्यक्षस्थानीं श्री. ग. शि. रानडे यांची सर्वानुमतें निवड झाली. त्यांनीं सांगितलें कीं, ब्राह्मण समाजाची सर्वांगीण उन्नति व्हावी यासाठीं या सर्व संस्था आपापल्या परीनें झटत आहेत. त्या संस्थांचें स्थानिक कार्य व स्थानिक प्रश्न सोडून ज्या सर्वसाधारण योजनांच्या बाबतींत एकवाक्यता असेल त्या एकसूत्रीपणानें

अंमलांत आणण्याचा प्रयत्न केल्यास यश मिळणें कठीण नाहीं. अशा प्रकारच्या प्रयत्नामुळें एकंदर समाजांतहि जागृति होईल आणि या जागृतीचा उपयोग समाजकार्याकडे करून घेतां येईल. या दृष्टीनें औद्योगिक व व्यापारी शिक्षण, उच्चशिक्षणनिधि, बेकारीनिवारण इत्यादि विषय सुचविण्यांत आले व उपस्थित प्रतिनिधींनींहि या उपक्रमास सर्वसाधारणपणें संमति दर्शविली. पण या बाबतींत स्थानिक संस्थांस कितपत स्वातंत्र्य राहील व या उपक्रमाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाचें काय हे प्रश्न उपस्थित होऊन पुढील अर्थाचा प्रस्ताव सर्वानुमतें संमत करण्यांत आला.

'मुंबई, उपनगर व ठाणें जिल्ह्यांत ब्राह्मण समाजाच्या हितासाठीं सर्वसाधारण कार्य करीत असलेल्या संस्थांच्या प्रयत्नांचें एकसूत्रीकरण करण्याकरितां एक केंद्रमंडळ असावें.'

शेवटीं ऑफस्

सर्व संस्थांच्या प्रतिनिधींची सभा बोलावून या केंद्रमंडळाची घटना व नियम तयार करण्यांत यावेत असें ठरलें. त्याप्रमाणें वरील प्रस्ताव सर्वांकडे पाठविण्यांत आला. यानंतर जागतिक महायुद्धानें अतिविक्राळ स्वरूप धारण केलें आणि या सर्व योजना स्थगित झाल्या.

(११) अस्पृश्यतानिवारण

श्री. ना. बा. काळे व श्री. वा. वा. परचुरे यांनीं मुंबईच्या उच्च न्यायालयांत ब्रा. सभा व्य. मं. चे अध्यक्ष, चिटणीस व एक सभासद यांच्या विरुद्ध १९२७ सालीं दाखल केलेली फिर्याद पुढें न चालविण्याची इच्छा प्रदर्शित केल्यामुळें ती निकालांत काढली गेली आणि त्यामुळें या वादविवादात्मक प्रश्नाचा तेवढ्यापुरता निकाल लागला.

१९३९ च्या श्रीगणेशोत्सवांत नामदार पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखालीं प्रा. श्रीपाद महादेव माटे यांचें 'ब्राह्मण समाज व अस्पृश्यतानिवारण' या विषयावर व्याख्यान झालें. या सभेला ब्रा. सभेच्या कार्यकारी मंडळांतील बहुतेक सर्व सदस्य उपस्थित होते. व्याख्यान व त्यावरील अध्यक्षांचा समारोप हीं दोन्ही अत्यंत विचार-परिप्लुत झालीं.

जादा साधारण सभा

व्याख्यानानंतर ब्राह्मणसभेच्या कार्यकारी मंडळांतील उपस्थित सभासदांत चर्चा होऊन ब्रा. सभेनें आपलें अस्पृश्यतानिवारणाचें धोरण स्पष्ट करणें आवश्यक आहे असें ठरलें आणि त्याप्रमाणें व्यवस्थापक मंडळाला सूचनाहि करण्यांत आली. या सूचनेप्रमाणें व्य. मं. च्या अध्यक्षांनीं व्य. मं. ची जादा सभा दि. २३-८-३९ ला बोलाविली. बऱ्याच

विचारविनिमयानंतर 'ब्राह्मण सभेचे सार्वजनिक स्वरूपाचे उत्सव व व्याख्यानें अशा समारंभांच्या वेळीं अस्पृश्य समाजाला सभेंत येण्यास मोकळीक असावी' अशा अर्थाचा प्रस्ताव सभेंत संमत झाला. हा प्रश्न साधारण सभेपुढें विचारासाठीं ठेवावा व सभेच्या निर्णयाप्रमाणें करावें असें ठरलें. दि. ८-१०-२९ ला ब्रा. सभेची जादा साधारण सभा बोलावण्यांत आली. व्य. मं. चे अध्यक्ष यांनीं व्य. मं. नें संमत केलेला तो प्रस्ताव सभेपुढें मांडला. म. म. श्रीधरशास्त्री पाठक, पंतप्रधान बाळ गंगाधर खेर व श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं या प्रस्तावाला यश चिंतिलें असल्याबद्दल त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. प्रस्तावास योग्य तें अनुमोदन मिळाल्यानंतर श्री. चिंतामण हरि पटवर्धन यांनीं ब्रा. सभेची घटना, नांव, उद्देश व हेतु यांपैकीं कोणत्याहि प्रकारांत या प्रस्तावाचा अंतर्भाव होत नसल्यामुळें तो नियमबाह्य आहे असा पॉइंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला. अध्यक्षांनीं या पॉइंट ऑफ ऑर्डर-वर सभेचे विचार ऐकण्याची इच्छा दर्शविली. त्याप्रमाणें दोन्ही बाजूंचे विचार सभेपुढें मांडण्यांत आल्यानंतर श्री. पां. वा. काणे यांनीं हा पॉइंट ऑफ ऑर्डर कसा योग्य नाहीं हें, नियम व् त्यांतील विशेष महत्त्वाचे शब्द दाखवून, सांगितलें. अध्यक्षांनीं सर्व म्हणणें ऐकून घेऊन 'ज्ञातिसंबंधीं' हे शब्द विशेष महत्त्वाचे आहेत; जातीच्या हिताहिताचा ज्या कामांत संबंध येतो तीं सर्व कामें इतका व्यापक अर्थ न धरतां ज्ञातीचीं अंतर्गत सामाजिक व धार्मिक कामें असाच अर्थ करणें योग्य होईल असें सांगून श्री. पटवर्धन यांनीं उपस्थित केलेला पॉइंट ऑफ ऑर्डर बरोबर आहे व सभेपुढें आलेला प्रस्ताव सभेच्या उद्देशा-बाहेरचा आहे असा आपला निर्णय दिला. अर्थात् सभेचें काम संपलें !

व्य. मं. च्या सभासदांचीं त्यागपत्रें

अध्यक्षांच्या या निर्णयामुळें मोठी चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाली व ब्रा. सभेच्या कार्यकारी मंडळांतील २५ सदस्यांनीं आपल्या

जागांचीं त्यागपत्रें अध्यक्षांकडे पाठविलीं. त्या त्यागपत्रांत पुढील मुख्य कारणें देण्यांत आलीं होतीं:—

'गेलीं बावीस वर्षें सभेचें काम एका विशिष्ट ध्येयानुरूप चाललेलें होतें. देशांतील वातावरण, समाजाचें धोरण आणि कायदेहि बदलले असतां ब्रा. सभेंत प्रतिगामी विचारसरणी प्रभावी ठरावी ही दुःखद गोष्ट होय. सभेच्या उद्दिष्टांत बदल करून घेणें फार अडचणीचें आहे. प्रतिगामी विचारसरणी जर प्रभावी ठरत असेल तर व्यवस्थापक मंडळावर काम करणें आपणांस शक्य नसून ब्रा. सभेच्या कार्यांशीं स्वतःस निगडित करून घेणें आपणास अशक्य आहे.'

ब्रा. सभा व्य. मं. चे ३३ सदस्य असतात. त्यांपैकीं २५ सदस्यांनीं आपलीं त्यागपत्रें सादर केल्यामुळें सभेच्या नियमाप्रमाणें आपणास पुढें काम करणें अशक्य आहे म्हणून उरलेल्या ८ सदस्यांनींहि आपलीं त्यागपत्रें अध्यक्षांकडे पाठविलीं. हीं त्यागपत्रें योग्य रीतीनें मान्य करण्यांत येईपर्यंत व्य. मंडळावरील सर्व सदस्यांनीं आपापलीं कामें पूर्ववत् चालू ठेवावीं अशी अध्यक्षांनीं सर्व सदस्यांना व्यक्तिशः विनंती केली.

ब्राह्मण कायदेपंडितांचा अभिप्राय

दि. ८–१०–३९ ला साधारण सभेच्या अध्यक्षांनीं जो निर्णय दिला त्यामुळें ब्रा. सभेच्या सभासदांचीं त्या प्रस्तावासंबंधानें काय मतें आहेत हें अजमावण्याचा मार्गच बंद झाला. तसेंच, सभेच्या उद्देशांतील शब्दरचनेवर अध्यक्षांनीं जें भाष्य केलें आणि कांहीं शब्दांचा जो अर्थ लावला त्याची अंमलबजावणी करतांना पदोपदीं अडचण भासूं लागली. या प्रश्नासंबंधानें आपलें मत प्रदर्शित करणारें एक पत्र पांच नामवंत ब्राह्मण कायदेपंडितांनीं दि. १७–११–३९ ला ब्राह्मण-सभेच्या अध्यक्षांना लिहिलें. त्या पत्रांत पुढील महत्त्वाचे मुद्दे होते:—

" दि. ८-१०-३९ च्या सभेंत रा. पटवर्धन यांनीं उपस्थित केलेला मुद्दा पॉइंट ऑफ ऑर्डर होऊं शकत नाहीं असें आम्हांला वाटतें. ब्राह्मण सभेच्या घटनेंतील नियम ६७ (११) अन्वयें असें स्पष्ट ठरविण्यांत आलें आहे कीं, सभेच्या हेतूंत अंतर्भाव न झालेलें एखादें सार्वजनिक काम सभेच्या उद्देशाविरुद्ध नसल्यास व तें काम करणें जरूर वाटल्यास त्या संबंधानें सभेचें मत घेण्याची व्यवस्थापक मंडळास पूर्ण स्वतंत्रता आहे आणि प्रस्तुतचा ठराव ब्रा. सभेच्या मूळ उद्देशांशीं अगर हेतूंशीं विरोधी आहे अशी रा. पटवर्धनांची तक्रार नाहीं. तसेंच, ब्रा. सभेच्या हेतूप्रमाणें गायनाचा कार्यक्रम करतां येतो. गाणारी व्यक्ति कोण, तिचे साथीदार कोण वगैरे गोष्टींना आजपर्यंत सभेनें महत्त्व दिलेलें नाहीं. तेव्हां व्याख्यान वगैरे प्रसंगींहि कोणास येऊं द्यावें हा प्रश्न गौण समजला पाहिजे. ब्रा. सभेमार्फत होणाऱ्या गोष्टींचा फायदा फक्त सभासदांसच व्हावा असा सभेचा उद्देश नाहीं तर त्याचा फायदा अखिल ब्राह्मण समाजास मिळावा असाच तिचा उद्देश आहे. हा उद्देश साधण्यास अब्राह्मणांचें साह्य घेण्यास ब्रा. सभेची तयारी आहे (नियम १६). तेव्हां ब्राह्मण सभा अब्राह्मणांचें साहाय्य घेणार पण अब्राह्मणांना स्वतः साहाय्य करणार नाहीं असें म्हणणें म्हणजे ब्रा. सभेवर कृतघ्नतेचा आरोप करणें आहे. निदान सार्वजनिक उत्सव व व्याख्यानें अशा प्रसंगीं तरी ब्राह्मण ज्ञातीनें आपल्या सभागृहांत अस्पृश्यता न मानणें ही ब्राह्मण ज्ञातीची धार्मिक व सामाजिक उन्नतीच आहे. न्यायमूर्ति रानडे, श्री. गोपाळराव आगरकर अशांसारख्या, अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे असें जन्मभर अट्टाहासानें प्रतिपादणाऱ्या, समाजसुधारकांचीं छायाचित्रें ब्राह्मण सभेच्या सभागृहांतून दिमाखानें भूषण म्हणून लावण्यांतील दुसरें स्वारस्य काय आहे ? नियम ७२ प्रमाणें चिटणीसांना व्याख्यान, प्रवचन, कीर्तन, गायन वगैरे समारंभ करण्याचा अधिकार देण्यांत

आलेला असून वक्ता, प्रवचनकार, कीर्तनकार व गायक ब्राह्मणच असला पाहिजे असा निर्बंध घातलेला नाहीं. अर्थात्, श्रोत्यांच्या बाबतींतहि असा निर्बंध असण्याचें कारण नाहीं. तात्पर्य, केवळ कायदेशीर दृष्टीनें पाहिलें असतां रा. पटवर्धन यांचा मुद्दा फोल ठरतो. पण शेवटीं आम्हांला एवढेंच सुचवावयाचें आहे कीं, कायदेबाजी करतांना सारासारविवेक व औचित्यबुद्धि सोडून देणें ब्रा. सभेच्या हिताच्या दृष्टीनें देखील अवश्य व इष्ट नाहीं."

सदर पत्र पाठविणारांचीं नांवें पुढीलप्रमाणें:— (१) श्री. रं. ग. जहागीरदार, एम्. ए., एल्एल्. बी., सरकारी वकील, हायकोर्ट (२) श्री. का. न. धारप, बी. ए., एल्एल्. बी. (३) श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर, एम्. ए., एल्एल्. बी. (४) श्री. शं. ग. पटवर्धन, बी. ए., एल्एल्. एम्. (५) श्री. गु. र. मदभावी, बी. ए., एल्एल्. बी.

येणेंप्रमाणें आपलें मत व्यक्त करून त्यांनीं असें सुचविलें होतें कीं, अध्यक्षांचा तो निर्णय योग्य रीतीनें बदलून घेईपर्यंत त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. हा निर्णय बदलून घेण्याचे तीन मार्ग आहेत. (१) अध्यक्षांवर निंदाव्यंजक प्रस्ताव आणून तो योग्य रीतीनें बोलाविल्या गेलेल्या साधारण सभेंतील उपस्थित सभासदांकडून संमत करून घेणें. (२) योग्य न्यायालयांतून हा निर्णय चुकीचा आहे असा निवाडा करून घेणें. (३) साधारण सभेचें अध्यक्ष बदलले गेल्यानंतर अशाच अर्थाचा प्रस्ताव आणून तो उद्देश व नियमांतर्गत आंहे असा निर्णय घेणें.

यांतील पहिल्या दोन मार्गांपेक्षां तिसराच मार्ग पत्करणें प्रागतिक मताच्या मंडळींना योग्य वाटलें असें दिसतें.

भगिनीवर्गांत खळबळ !

यानंतर वर्तमानपत्रांतूनहि या निर्णयास अनुकूल व प्रतिकूल असे लेख प्रसिद्ध झाले. डॉ. कृ. श्री. तथा बापूसाहेब म्हसकर हे त्यागपत्र

देणाऱ्या २५ सभासदांत असल्यामुळें व त्यांनीं सूतिकागृहाशीं असलेला आपला संबंध सोडण्याचें जाहीर केल्यामुळें भगिनीवर्गांत मोठी खळबळ उडाली व त्यांनीं या आपल्या विचारापासून परावृत्त व्हावें म्हणून अनेक भगिनींचीं त्यांच्याकडे पत्रें आलीं. त्यांना व्यक्तिशः उत्तरें न देतां त्यांनीं एक हस्तपत्रक काढून वर्तमानपत्रांतहि तें प्रसिद्ध केलें. त्यांतील विचार डॉ. म्हसकरांच्या थोर अंतःकरणाची साक्ष देणारे आहेत.

'भगिनीवर्गाची औषधालयांतील अस्पृश्यांशीं मोकळेपणाची वागणूक व ब्रा. सभेच्या पुढील सभागृहांत अस्पृश्यांच्या प्रवेशाला विरोध अशीं कटु दृश्यें टाळून, देव सर्व ठिकाणीं आहे हें प्रल्हादाचें वाक्य आचरणांत आणून आणि आपणां सर्वांच्या देवापुढें अस्पृश्य बंधूंना उभें राहून प्रार्थना करण्याच्या त्यांच्या धर्मभावनेचा भगिनीवर्गाकडून अव्हेर होऊं नये,' असा त्या पत्रकाचा सारांश होता.

विश्वस्त व सल्लागारांची सभा

ब्रा. सभेचे विश्वस्त, सल्लागार, साधारण सभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि व्य. मं. वरील सर्व सभासद यांची एक सभा दि. २८-१०-३९ ला श्रीमंत तात्यासाहेब आपटे यांच्या बंगल्यावर भरली. उपस्थितांत पंतप्रधान नामदार बाळासाहेब खेर हेहि होते. सदर सभेंत व्य. मं. चा प्रस्ताव आपणास मान्य असल्याचें सल्लागार मंडळांतील तीनहि गृहस्थांनीं सांगितलें. विचारविनिमय होऊन (१) अध्यक्षांनीं राजीनामा द्यावा व नवीन अध्यक्षांकडून निर्णय फिरवून घेण्यांत यावा. (२) साधारण सभा बोलावून व्यवस्थापक मंडळांतील सदस्यांचीं त्यागपत्रें मान्य करण्यांत येऊन विशिष्ट तत्त्वावर नवीन निवडणूक करावी. (३) निर्णयविरोधी व निर्णयानुकूल या उभयतांना मान्य असलेल्या लवादाकडून निकाल लावून द्यावा. (४) व्यवस्थापक मंडळानें द्विवार्षिक निवडणुकी-

पर्यंत काम करावें वगैरे अनेक सूचना सदर सभेंत करण्यांत आल्या. यांवर बराच वादविवाद झाला पण तडजोडीचा सर्वसंमत मार्ग सांपडेना. प्रिन्सिपॉल ज. र. घारपुरे, श्री. मो. भा. भाटवडेकर व अध्यक्ष श्री. अभ्यंकर यांच्या मतें व्य. मं. नें अध्यक्षांचा निर्णय मानावा व पुढील निवडणुकीपर्यंत सभेचें कार्य पुढें चालवावें तर श्री. पां. वा. काणे, ना. खेर, डॉ. भडकमकर इ. मंडळींच्या मतें हें अशक्य होतें. प्राचार्य श्री. नानासाहेब घारपुरे यांनीं सांगितलें कीं, अध्यक्ष श्री. अभ्यंकर यांनीं या सभेंतील सर्व चर्चा ऐकली आहे व योग्य त्या मार्गाचें ते अवलंबन करतील.

पुन्हा जादा साधारण सभा

ब्रा. सभेच्या नियमाप्रमाणें व्य. मंडळांतील सदस्यांच्या राजीनाम्यांचा विचार करण्याकरितां ब्रा. सभेची जादा साधारण सभा अध्यक्षांच्या आज्ञेवरून दि. १९-११-३९ ला बोलावण्यांत आली. सभेपुढें मांडण्यासाठीं आलेले ठराव व उपसूचना यांचा विचार करून अध्यक्षांनीं श्री. जहागीरदार यांना पुढील प्रस्ताव सभेपुढें मांडण्यास सांगितलें. 'श्री. काणे, डॉ. म्हसकर, प्रा. गजेंद्रगडकर आदि व्य. मं. च्या राजीनामा देणाऱ्या पंचवीस सभासदांवर सभेचा पूर्ण विश्वास असल्यामुळें सदर सदस्यांनीं आपले राजीनामे परत घ्यावे, अशी या सभेची आग्रहाची विनंती आहे.'

या प्रस्तावास श्री. शं. ग. पटवर्धन यांनीं अनुमोदन दिल्यानंतर सॉ. के. वी. जोशी यांनीं, या प्रस्तावानें दि. ८-१०-३९ च्या अध्यक्षांच्या निर्णयावर आक्षेप घेतला जात आहे असा पॉइंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला. त्यावर अध्यक्षांनीं श्री. जहागीरदार यांचा ठराव नियमबाह्य ठरविला. त्यानंतर श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर यांनीं पुढील प्रस्ताव सभेपुढें मांडला.

ब्राह्मण सभा म्हसकर सूतिकागृह

श्री. दुर्गाबाई पेंडसे

डॉ. सौ. शांताबाई समर्पि (दोश

डॉ. का. ल. ओक

श्री. ज. न. भिडे

'श्री. काणे प्रभृति व्य. मं. चा राजीनामा देणाऱ्या सभासदांच्या अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतींत ब्राह्मण समाजानें पुढाकार घेणें अवश्य आहे या धोरणावर या सभेचा पूर्ण विश्वास असल्यामुळें सदर सभासदांनीं आपले राजीनामे परत घ्यावे अशी त्यांना आग्रहाची विनंती आहे.'

या प्रस्तावास अनुमोदन मिळाल्यानंतर सदर प्रस्तावहि नियमबाह्य आहे असें सुचविण्यांत आलें. पण अध्यक्षांनीं ही नियमबाह्यतेची सूचना मान्य केली नाहीं. वरील प्रस्तावावर अनुकूल प्रतिकूल चर्चा झाल्यावर सदर प्रस्ताव मोठ्या बहुमतानें पसार झाला असें अध्यक्षांनीं घोषित केलें.

त्याप्रमाणें या पंचवीस सभासदांनीं आपले राजीनामे परत घेतले. बाकीच्या आठ सभासदांवरहि सभेचा विश्वास असल्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यावर त्यांनींहि आपले राजीनामे परत घेतले.

यानंतर 'प्रकाश' नांवाच्या वर्तमानपत्रांत 'राष्ट्रीय ब्राह्मण' या नांवानें नोव्हेंबर व डिसेंबर १९३९ मध्यें दोन लेख प्रसिद्ध झाले. या लेखांत अध्यक्षांच्या निर्णयाचा पाठपुरावा करण्यांत येऊन विरोधकांवर बरीच टीका करण्यांत आली होती. हें प्रकरण येथेंच थांबलें.

(१२) ब्राह्मण भगिनी समाज

ब्राह्मण समाजांतील चारहि संस्थांचें एकीकरण झाल्यानंतर ब्रा. सभेनें उत्सवसमारंभादि जे कार्यक्रम आंखले त्यांतील कांहीं केवळ स्त्रियांसाठीं असे असत. अशा कार्यक्रमांची व्यवस्थाहि स्त्रियाच करीत असत. वासंतिक व मकर संक्रांतीनिमित्त हळदीकुंकूं आणि गणेशोत्सवांतील कांहीं खास कार्यक्रम हे स्त्रियांचे असे विशेष कार्यक्रम असत. तसेंच संमेलनादि कार्यक्रमांत पुरुषवर्गाला कार्यकर्त्या भगिनींची चांगली मदत होत असे. ब्रा. सभेनें १९२५ सालीं शंकरवाडी खरेदी करून तींत योग्य ती दुरुस्ती केल्यानंतर सभेच्या प्रशस्त दिवाणखान्यांत १९२६ व १९२७ या दोन सालीं सौ. इंदिराबाई लिमये, सौ. जानकीबाई साठे, सौ. सत्यभामाबाई वैद्य व सौ. राधाबाई केळकर यांनीं महालक्ष्मी उत्सवसमारंभ साजरा केला. या दोन्ही उत्सवांत सौ. इंदिराबाई लिमये यांच्या मातुःश्री सौ. सावित्रीबाई अभ्यंकर यांची फार मदत झाली होती. या दोन्ही समारंभांचा लाभ भगिनीवर्गानें फार मोठ्या प्रमाणावर घेतला. या उत्सवसमारंभाची खर्चवजा जाऊन जी शिल्लक राहिली ती त्या भगिनींनीं ब्रा. सभेकडेच जमा केली. या उत्सवाची आवश्यकता व यशस्विता पटल्यामुळें १९२८ सालापासून तो ब्रा. सभेमार्फतच होऊं लागला. पण सभेच्या नियमाप्रमाणें या उत्सवाचीं हस्तपत्रकें ब्रा. सभेच्या कार्यवाहांच्या स्वाक्षरीनें न काढतां

तीं कार्यकर्त्या भगिनींच्याच नांवानें काढण्यांत येत. अशांपैकींच एका निमंत्रणपत्रिकेवर 'ब्राह्मण भगिनी समाज' असें नांव दिलें गेलें होतें.

सौ. कमला नेहरु यांस मेजवानी

दि. ५-४-१९३१ ला सौ. कमलादेवी नेहरु यांना ब्राह्मण भगिनी समाजाच्या विद्यमानें ब्रा. सभेच्या हरि केशव गोखले सभागृहांत एक थाटाची मेजवानी देण्यांत आली होती. स्त्रियांनीं आपल्या जबाबदारीवर अगदीं आधुनिक पद्धतीनें एका थोर विदुषीचा सत्कारसमारंभ विशेष थाटामाटानें व पाहुण्यांच्या दर्जाला शोभेल अशा प्रकारें पार पाडण्याचा हा पहिलाच समारंभ होता.

या समारंभाची मूळ कल्पना सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख यांची होती व त्यासाठीं झालेला सर्व खर्च (रु. ५०० हून अधिक) त्यांनीं स्वतःच केला. त्यांनीं ब्रा. सभेकडे जागा व सभेकडून स्त्रियांसाठीं होणाऱ्या कार्यक्रमांत ज्या भगिनी भाग घेतात त्यांचें सहकार्य या समारंभासाठीं मागितलें.

ब्राह्मण भगिनी समाजाची स्थापना

समारंभ आटोपल्यानंतर ज्या भगिनींनीं या समारंभांत सहकार्य केलें होतें त्यांचा श्री. पुणतांबेकर यांनीं सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख यांस परिचय करून दिला. हा समारंभ 'भगिनी समाजा' च्या वतीनें घडवून आणण्यांत आला होता. म्हणून उपस्थित भगिनींपैकीं एकीनें, 'हा भगिनी समाज कुठला?' असा कुतूहलानें प्रश्न केला. त्याला, 'तुम्हीच त्या भगिनी व तुमचा एकत्र झालेला हाच समाज' असें सौ. अन्नपूर्णाबाईनीं उत्तर दिलें. यावर श्री. पुणतांबेकर यांनीं 'आजच्याच सुमुहूर्तावर ब्राह्मण भगिनी समाज स्थापन करा' अशी विनंती केली व उपस्थित भगिनींनीं या विनंतीस आपली संमति दिली. त्याप्रमाणें सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख यांच्याच नेतृत्वाखालीं 'ब्राह्मण भगिनी

समाज ' ही संस्था स्थापन होऊन अध्यक्षस्थानीं सर्वानुमतें त्यांचीच निवड झाली. सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख, सौ. यशोदाबाई भाटवडेकर, सौ. विठाबाई म्हसकर, सौ. इंदिराबाई खानविलकर, श्रीमती द्वारकाबाई रबडे, सौ. कमलाबाई भावे, सौ. सरस्वतीबाई कावनईकर, सौ. मथुराबाई दुगल, सौ. रमाबाई महाजन, सौ. पार्वतीबाई बोडस इ. भगिनींचें एक कार्यकारी मंडळहि स्थापण्यांत आलें. यानंतर ब्राह्मण सभेमार्फत स्त्रियांसाठीं म्हणून जे नित्य व नैमित्तिक कार्यक्रम होत असत ते सर्व ब्राह्मण भगिनी समाजामार्फत व्हावे असें ठरलें असल्याचें १९३०-३१ च्या अहवालांत नमूद केलें आहे. त्याप्रमाणें अशा विशिष्ट कार्यक्रमासाठीं दहा वर्षांत झालेला खर्च (रु. ५००० पर्यंत) ब्राह्मण भगिनी समाजानेंच केला. १९३१ व १९३२ या दोन वर्षांत दीपावलीचे वेळीं ब्राह्मण भगिनी समाजांतील भगिनींनीं घरोघर फिरून भाऊबीज म्हणून रु. १०००० चा निधि जमा करून म्हसकर सूतिकागृहाकरितां डॉ. म्हसकर यांना श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या हस्तें अर्पण केला. ब्रा. सभेप्रमाणेंच ब्रा. भगिनी समाजाच्या सभासदांचें वर्गीकरण होतें. सभासदांकडून देणग्या व वर्गणी जमविण्याचें काम समाजाच्या स्वयंसेविका करीत असत. समाजाच्या कार्यकारी मंडळाची निवड दर दोन वर्षांनीं होत असे व या कार्यकारी मंडळातर्फेंच भगिनी समाजाचें सर्व कार्य चाले. ब्रा. स. व्य. मंडळ भगिनी समाजाच्या कार्यकारी मंडळाला मार्गदर्शन करी.

संघटना-चातुर्य

यानंतर ब्रा. सभा व ब्राह्मण भगिनी समाज यांचे संबंध काय व कसे असावेत यासंबंधींचा विचार सुरू झाला व दि. ३-४-३२ ला ब्राह्मण भगिनी समाजाचें पत्र ब्रां. सभेला आलें. त्या पत्रांत ब्राह्मण भगिनी समाज ब्रा. सभेशीं संलग्न करून घेण्याबद्दल विनंती करण्यांत आली

होती. ब्रा. सभा व्य. मं. नें दि. २१-८-३२ ला या पत्राचा विचार करून आपला अहवाल सादर करण्यासाठीं एक समिति नेमली. ब्रा. सभेमार्फत यापूर्वी स्त्रियांकरितां शिक्षणकामाचा वर्ग चालू होता तोहि यापुढें ब्राह्मण भगिनी समाजानेंच चालविला. शिवाय स्त्रियांसाठीं इंग्रजी, मराठी व व्यायामशिक्षणाचे वर्ग ब्राह्मण भगिनी समाजानें सुरू केले. मकरसंक्रांत, वासंतिक हळदीकुंकूं हे समारंभ तर होतेच पण त्याबरोबर दर एकादशीला स्त्रियांसाठीं कीर्तनाचा कार्यक्रमहि सुरू करण्यांत आला. स्त्रियांसाठीं कांहीं वेळां करमणुकीचे कार्यक्रम आंखण्यांत येत व कधीं कधीं भगिनींच्या सफरीहि निघत. एकादशीनिमित्त होणाऱ्या कीर्तनाबरोबर निबंधवाचनाचा उपक्रमहि सुरू करण्यांत आला. या उपक्रमाप्रमाणें विविध विषयांवरील २५।३० निबंध वाचण्यांत आले. कांहीं सत्कारसमारंभहि ब्राह्मण भगिनी समाजानें यशस्वी रीतीनें पार पाडून दाखविले. दादरच्या सौ. इंदिराबाई जोशी यांनीं एका चोराला केंसाला धरून पकडून ठेवण्यांत जें धैर्य दाखविलें त्याबद्दल ब्राह्मण भगिनी समाजानें त्यांचा गौरवसमारंभ घडवून आणला. सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख मुंबई प्रांताच्या कायदे-मंडळांत निवडून आल्याबद्दल या संस्थेच्या तर्फे त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. त्या निवडणुकीच्या वेळीं २०० स्वयंसेविकांचें दल भगिनी समाजाकडून उभारलें गेलें होतें व त्या सर्व स्वयंसेविकांना एकरंगी पातळें व पोलकीं सौ. अन्नपूर्णाबाईंनीं स्वखर्चानें दिलीं होतीं. त्यावेळीं भगिनींच्या आत्मविश्वासाचा व संघटनाचातुर्याचा चांगल्या प्रकारें प्रत्यय आला.

श्रीमहालक्ष्मी उत्सवाचें सर्व कार्य भगिनी समाजच करी व खर्च वजा जातां राहिलेलें उत्पन्न ब्राह्मण सभेकडे जमा होई. दर वर्षीं गोकुळाष्टमीला व्यायामशाळेंतील मुलांना दूध व पेढे देण्याचा उपक्रम भगिनी समाजानें सुरू केला. याप्रीत्यर्थ सुमारें ५० रुपये खर्च करण्यांत येत.

संस्था कीं शाखा ?

ब्राह्मण भगिनी समाजाचें आणखी एक पत्र दि. २४–७–३४ ला ब्रा. सभेकडे आलें आणि ब्राह्मण सभा नियम ३ अ प्रमाणें ब्राह्मण भगिनी समाज ही संस्था ब्राह्मण सभेची संलग्न शाखा समजावी असा प्रस्ताव दि. १०–८–३४ ला संमत झाला.

ब्राह्मण भगिनी समाज हा स्वतःला एक संस्था समजत होता व ब्रा. सभेचा ३ अ नियम पुढील प्रमाणें होता. "ब्राह्मण सभेच्या शाखा काढणें व असलेल्या शाखा ब्राह्मण सभेशीं संलग्न करून घेणें." या नियमांत 'असलेल्या शाखा' हा शब्दप्रयोग चुकीनें पडलेला होता आणि त्या चुकीची दुरुस्ती १९३६ सालीं सर्व नियमांची दुरुस्ती झाली त्यावेळीं झाली; व नवीन नियम ६६ पोटनियम ८ हा पुढीलप्रमाणें झाला. "ब्राह्मण सभेच्या शाखा काढणें व असलेल्या संस्था ब्रा. सभेशीं संलग्न करून घेणें."

शाखा व संस्था यांतील फरक

दि. १०–८–३४ ला व्यवस्थापक मंडळानें त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या नियमाप्रमाणें ब्राह्मण भगिनी समाज ही संस्था ब्राह्मण सभेची संलग्न शाखा समजावी असें म्हटलें. ब्रा. सभेच्या व्यवस्थेंत शाखा या शब्दाला विशिष्ट अर्थ आहे व तो अर्थ ब्राह्मण सभेचा जुना नियम ३ अ यामधील पहिल्यानें योजलेल्या 'शाखा' या शब्दानें व्यक्त होतो. दुसऱ्या वेळीं चुकीनें योजलेल्या 'शाखा'*(व पुढें नियमदुरुस्तीच्या वेळीं त्या शब्दाऐवजीं योजलेल्या 'संस्था') या शब्दाप्रमाणें आपणांस संलग्न 'शाखा' न समजतां संलग्न 'संस्था' समजावें असा ब्राह्मण भगिनी समाजानें आग्रह धरला. त्यावेळीं ब्रा. स. व्य. मं. नें नियम-दुरुस्ती समिति नेमली होती व त्या समितीकडे या नियमाच्या दुरुस्तीचें काम सोंपविण्यांत आलें. नियमदुरुस्तीचें काम पुढें दोन

वर्षांहून अधिक काळ चाललें. अर्थात् तोंपर्यंत ब्राह्मण भगिनी समाजाला संलग्न करून घेण्याचा प्रश्नहि लांबणीवर पडला. यानंतर ब्रा. स. व्य. मंडळ व ब्राह्मण भगिनी समाज यांचा बराच पत्रव्यवहार झाला व संलग्न संस्था म्हणजे स्वतंत्र संस्था नव्हे असें व्य. मं. कडून प्रतिपादण्यांत आलें. 'शाखा' होण्यानें आपलें स्वातंत्र्य हिरावलें जात आहे अशी भगिनी समाजाची समजूत झाली व दुसऱ्या संस्थेला आपल्या हुकमतीखालीं काम करण्यास भाग पाडण्याचें धोरण व्यवस्थापक मंडळास रुचेना. ब्रा. सभा व ब्राह्मण भगिनी समाज यांचे आपसांतील मतभेद वाढूं लागले. त्यामुळें ब्राह्मण भगिनी समाज ब्रा. सभेशीं संलग्न होण्याचें काम लांबणीवर पडत चाललें.

गरसमज कोणाचा ?

दि. ३०-३-४१ ला ब्राह्मण सभेची वार्षिक साधारण सभा होती. त्याच दिवशीं ब्राह्मण भगिनी समाजानें आपला वासंतिक हळदी-कुंकवाचा समारंभ ठरविला होता. त्यामुळें बरीच गैरसोय झाल्याचें दिसून आलें म्हणून साधारण सभेचे अध्यक्ष, व्य. मं. चे अध्यक्ष, व्य. मं. चे चिटणीस व व्य. मं. चे कांहीं सभासद यांच्यांत विचार-विनिमय होऊन ब्राह्मण भगिनी समाजाला कोणताहि कार्यक्रम करणें असल्यास ब्रा. सभेच्या चिटणीसांची त्यासाठीं आगाऊ संमति घेण्यांत आली पाहिजे असें ब्राह्मण भगिनी समाजास कळविण्यांत आलें. या पत्राप्रमाणें कोणत्याहि नैमित्तिक कार्यक्रमास ब्रा. सभेच्या चिटणीसांची आगाऊ संमति मिळविली पाहिजे पण नित्य कार्यक्रमास अशा आगाऊ संमतीची कांहीं जरूरी नाहीं असें भगिनी समाजास वाटलें. एकादशीनिमित्त कीर्तन हा त्या समाजाचा नित्याचा कार्यक्रम होता. दि. ८-४-४१ ला एकादशीनिमित्त कीर्तनाचा कार्यक्रम भगिनी समाजानें नेहमींप्रमाणें आंखला. सभेच्या चिटणीसांची आगाऊ संमति घेतली

पाहिजे असें स्पष्ट कळविलें असतांहि अशी संमति न घेतां ब्राह्मण भगिनी समाजानें तो कार्यक्रम धरला म्हणून ब्रा. सभेची जागा समाजास नाकारण्यांत आली. यामुळें ब्रा. सभा व ब्राह्मण भगिनी समाज यांमधील मतभेदाला तीव्र स्वरूप आलें.

तडजोडीचा प्रयत्न

या दोघांत तडजोड घडावी म्हणून साधारण सभेचे अध्यक्ष श्री. श्रीपाद यशवंत अभ्यंकर यांनीं ब्रा. स. व्य. मं. चे सदस्य व ब्रा. भगिनी समाजाचें कार्यकारी मंडळ यांची एक सभा दि. २८-८-४१ ला बोलावली. सभेंत बराच विचारविनिमय झाला व तडजोडीचा एक प्रस्ताव तयार करण्यांत येऊन त्यावर उपस्थितांच्या स्वाक्षऱ्या घेण्यांत आल्या. हा वाद आतां थांबला अशी कल्पना होती. कारण व्य. मं. नें दि. ७-१२-४० ला "ब्राह्मण भगिनी समाज म्हणून काम करीत असलेली संस्था जर ब्राह्मण सभेशीं संलग्न होत असेल तर तोच समाज ब्राह्मण सभेची स्त्रीशाखा म्हणून समजावा" असा प्रस्ताव संमत केला होता. या प्रस्तावामुळें झालेले गैरसमज दूर होऊन ब्रा. भगिनी समाज ही संस्था ब्रा. सभेशीं संलग्न होईल व ब्रा. स. व्य. मंडळ या संस्थेकडून स्त्रीशाखेनें करावयाचीं कामें करून घेईल अशी कल्पना होणें साहजिक होतें. दि. २१-९-४१ च्या व्य. मं. च्या सभेंत महिलाशाखा काढावयाची असल्यास दि. ७-१२-४० च्या ठरावास बाध येत नाहीं असें ठरलें.

या वादविवादांत तात्त्विक मतभेद असा कोठेंहि दिसून येत नाहीं. तसेंच, ब्रा. स. व्य. मं. च्या धोरणाशीं ब्राह्मण भगिनी समाजाचें विसंगत वर्तन झालें आहे असेंहि कोठें दिसून येत नाहीं. वरील तडजोडीच्या प्रस्तावाचा ब्रा. स. व्य. मं. नें केलेला अर्थ दि. ५-११-४१ च्या "ब्राह्मण सभेच्या 'महिला शाखे' विषयीं अधिकृत खुलासा" या हस्तपत्रकांत दिला आहे. हें हस्तपत्रक प्रसिद्ध झाल्या-

नंतर ब्रा. भगिनी समाजानें 'ब्राह्मण भगिनी समाजाची कैफियत' या शीर्षकाखालीं आपलें म्हणणें प्रसिद्ध केलें. हीं दोन्ही हस्तपत्रकें पाहून ज्यांच्या मार्गदर्शनाखालीं ही सर्व मंडळी एके ठिकाणीं जमली होती त्या साधारण सभेच्या अध्यक्षांनीं 'फक्त सभासदांकरितां' असें एक पत्र छापलें व तें सभासदांकडे पाठविलें. या तिन्ही पत्रकांतील महत्त्वाचा भाग असाः—

ब्रा. स. व्य. मं. चे अध्यक्ष व चिटणीस आपल्या निवेदनांत म्हणतात, "या वादासंबंधीं तडजोड व्हावी अशी ब्रा. स. व्य. मंडळ व ब्रा. भगिनी समाज या उभयतांची प्रबल इच्छा असल्यानें व्य. मं. चे सोळा सभासद व भगिनी समाजाचे दहा सभासद यांची सभा अध्यक्षांचे घरीं दि. २८-८-४१ ला झाली. त्यावेळीं सर्वांनीं खालील प्रस्ताव एकमतानें मान्य करून त्याखालीं आपापल्या स्वाक्षऱ्या केल्या. 'दि. ८-४-४१ ला जो प्रकार झाला तो अप्रशस्त झाला असें येथें जमलेल्या आम्हां सर्वांना वाटतें व त्याबद्दल सर्वांस खेद वाटतो. ब्रा. सभा तसेंच भगिनी समाज या दोन्ही संस्थांच्या हिताच्या दृष्टीनें एकमेकांविषयीं असलेले गैरसमज विसरून जाऊन परस्परांनीं आपापलीं पत्रें ब्रा. सभेच्या अध्यक्षांना कळवून परत घ्यावीं.'"

स्वतंत्र संसार

ब्रा. स. व्य. मं. च्या म्हणण्याप्रमाणें सर्वांनीं हा प्रस्ताव एकमतानें मान्य करून त्याखालीं आपापल्या स्वाक्षऱ्या केल्या. भगिनी समाजातर्फे असें निवेदन करण्यांत आलें कीं, दि. ८-४-४१ ला झालेल्या प्रकारांत भगिनी समाजाकडून आगळीक झाली नाहीं आणि त्या दिवशींच्या प्रकाराबद्दल खुलासा म्हणून व्य. मं. वरील सोळा सभासदांनीं वरील प्रस्ताव लिहिला व त्यावर आपल्या स्वाक्षऱ्या केल्या; आणि तो आपणांस मान्य असल्याचें निदर्शक म्हणून दहा भगिनींनीं

त्यावर आपल्या स्वाक्षऱ्या केल्या. मात्र 'वरील प्रस्तावानें आमचें समाधान झालें' असें वाक्य लिहिलें गेलें नाहीं. अशा रीतीनें ब्रा. स. व्य. मंडळ व ब्रा. भगिनी समाज यांच्यामध्यें मतभेद निर्माण झाल्यामुळें यासंबंधीं आपला खुलासा करतांना साधारण सभेचे अध्यक्ष आपल्या निवेदनांत म्हणतात कीं, 'ब्राह्मण भगिनी समाज व ब्रा. स. व्य. मंडळ यांमध्यें मतभेद होऊन तो विकोपाला गेला व परस्परांनीं कांहीं पत्रव्यवहार केला. व्य. मं. नें केलेल्या पत्रव्यवहारांतील भाषा असमाधानकारक असल्याचें ब्रा. भगिनी समाजानें ब्रा. स. व्य. मं. स लिहिलें व बरीच वाटाघाट होऊन दि. १८-८-४१ ला ब्रा. सभेच्या व्य. मंडळापैकीं सोळा गृहस्थांनीं वरील प्रस्ताव केला.'

अध्यक्ष श्री. श्रीपाद यशवंत अभ्यंकर यांनीं याप्रमाणें निवेदन प्रसिद्ध केल्यानंतरहि ब्राह्मण भगिनी समाज व ब्रा. स. व्य. मंडळ यांच्यामधील मतभेद दूर न होतां ते विकोपाला गेले व ब्रा. भगिनी समाजानें दहा वर्षांहून अधिक काळपर्यंत ब्रा. सभेशीं असलेलें आपलें सहकार्याचें धोरण बदललें व ब्राह्मण भगिनी समाज ही संस्था इतरत्र स्वतंत्र रीतीनें आपलें कार्य करूं लागली.

(१३) ब्राह्मण महिला शाखा

ब्राह्मण भगिनी समाजास ब्राह्मण सभेची संलग्न संस्था म्हणूनच राहावयास पाहिजे होतें, शाखेचें परावलंबित्व नको होतें. शाखा होण्यानें आपलें स्वातंत्र्य हिरावलें जात आहे अशी ब्रा. भगिनी समाजाची समजूत झाली व ब्रा. स. व्य. मं. स आपल्या हुकमतीखालीं काम करणाऱ्या महिलाशाखेची अत्यंत जरुरी वाटूं लागली. शिवाय सभेच्या वाढत्या प्रमाणांत असलेल्या स्त्रीसभासदांबाबत काय करावें (त्या वेळीं सुमारें ३०० स्त्रिया सभासद होत्या) हा प्रश्न व्यवस्थापक मंडळापुढें होताच. स्त्रीवर्गासाठीं कोणतीहि गोष्ट करण्याची सभेच्या चालकांस इच्छा झाल्यास ती त्यांना भगिनी समाजापुढें मांडावी लागे व त्यानंतर भगिनी समाजाकडून कार्य व्हावयाचें म्हणजे कालापव्यय होणें अपरिहार्य होतें. स्त्रियांचीं संमेलनें, त्यांचे कार्यक्रम व निरनिराळे उपक्रम सुसंघटितपणें करण्यासाठीं ब्रा. स. व्य. मं. नें दि. २–१०–४१ ला महिला शाखा काढण्याचा उपक्रम केला. असें करण्यांत कोणतेंहि नवें तंत्र व्य. मं. नें घुसडलें नसून कामाच्या सोईसाठीं इतर शाखांप्रमाणें ही पोटशाखा सुरू केली व हिचे पोटनियमहि या दृष्टीनें केलेले आहेत. दि. ४–१०–४१ ला कोजागिरीच्या मुहूर्तावर सौ. कमलाबाई जोशी, बी. ए., बी. टी., यांच्या अध्यक्षतेखालीं शाखेचा उद्घाटनसमारंभ झाला.

त्यावर आपल्या स्वाक्षऱ्या केल्या. मात्र 'वरील प्रस्तावानें आमचें समाधान झालें' असें वाक्य लिहिलें गेलें नाहीं. अशा रीतीनें ब्रा. स. व्य. मंडळ व ब्रा. भगिनी समाज यांच्यामध्यें मतभेद निर्माण झाल्यामुळें यासंबंधीं आपला खुलासा करतांना साधारण सभेचे अध्यक्ष आपल्या निवेदनांत म्हणतात कीं, 'ब्राह्मण भगिनी समाज व ब्रा. स. व्य. मंडळ यांमध्यें मतभेद होऊन तो विकोपाला गेला व परस्परांनीं कांहीं पत्रव्यवहार केला. व्य. मं. नें केलेल्या पत्रव्यवहारांतील भाषा असमाधानकारक असल्याचें ब्रा. भगिनी समाजानें ब्रा. स. व्य. मं. स लिहिलें व बरीच वाटाघाट होऊन दि. १८-८-४१ ला ब्रा. सभेच्या व्य. मंडळापैकीं सोळा गृहस्थांनीं वरील प्रस्ताव केला.'

अध्यक्ष श्री. श्रीपाद यशवंत अभ्यंकर यांनीं याप्रमाणें निवेदन प्रसिद्ध केल्यानंतरहि ब्राह्मण भगिनी समाज व ब्रा. स. व्य. मंडळ यांच्यामधील मतभेद दूर न होतां ते विकोपाला गेले व ब्रा. भगिनी समाजानें दहा वर्षांहून अधिक काळपर्यंत ब्रा. सभेशीं असलेलें आपलें सहकार्याचें धोरण बदललें व ब्राह्मण भगिनी समाज ही संस्था इतरत्र स्वतंत्र रीतीनें आपलें कार्य करूं लागली.

(१३) ब्राह्मण महिला शाखा

ब्राह्मण भगिनी समाजास ब्राह्मण सभेची संलग्न संस्था म्हणूनच राहावयास पाहिजे होतें, शाखेचें परावलंबित्व नको होतें.' शाखा होण्यानें आपलें स्वातंत्र्य हिरावलें जात आहे अशी ब्रा. भगिनी समाजाची समजूत झाली व ब्रा. स. व्य. मं. स आपल्या हुकमतीखालीं काम करणाऱ्या महिलाशाखेची अत्यंत जरुरी वाटूं लागली. शिवाय सभेच्या वाढत्या प्रमाणांत असलेल्या स्त्रीसभासदां-बाबत काय करावें (त्या वेळीं सुमारें ३०० स्त्रिया सभासद होत्या) हा प्रश्न व्यवस्थापक मंडळापुढें होताच. स्त्रीवर्गासाठीं कोणतीहि गोष्ट करण्याची सभेच्या चालकांस इच्छा झाल्यास ती त्यांना भगिनी समाजापुढें मांडावी लागे व त्यानंतर भगिनी समाजाकडून कार्य व्हावयाचें म्हणजे कालापव्यय होणें अपरिहार्य होतें. स्त्रियांचीं संमेलनें, त्यांचे कार्यक्रम व निरनिराळे उपक्रम सुसंघटितपणें करण्यासाठीं ब्रा. स. व्य. मं. नें दि. २–१०–४१ ला महिला शाखा काढण्याचा उपक्रम केला. असें करण्यांत कोणतेंहि नवें तंत्र व्य. मं. नें घुसडलें नसून कामाच्या सोईसाठीं इतर शाखांप्रमाणें ही पोटशाखा सुरू केली व हिचे पोटनियमहि या दृष्टीनें केलेले आहेत. दि. ४–१०–४१ ला कोजागिरीच्या मुहूर्तावर सौ. कमलाबाई जोशी, बी. ए., बी. टी., यांच्या अध्यक्षतेखालीं शाखेचा उद्घाटनसमारंभ झाला.

ब्रा. स. व्य. मं. नें महिला शाखा काढली म्हणून बरेच मतभेद निर्माण झाले व त्याचें पर्यवसान दि. १६-११-४१ ला जादा साधारण सभा भरविण्यांत झालें. या सभेंत, 'ब्राह्मणसभेची महिला शाखा काढणें व्यवस्थापक मंडळाच्या (एकट्याच्या) अधिकारांत आहे किंवा नाहीं याबद्दल अध्यक्षांनीं निर्णय द्यावा' या प्रस्तावावर अनुकूल व प्रतिकूल भाषणें झालीं. प्रस्ताव मतास टाकण्यांत आला व बहुमतानें हा अधिकार व्य. मं. स आहे या मताचा विजय झाल्याचें दिसून आलें. यानंतर अध्यक्षांनीं सभेचें काम तहकूब केलें. ही तहकूब झालेली जादा साधारण सभा दि. ३०–११–४१ ला झाली. त्या सभेंत, 'ज्या-अर्थी ब्राह्मण भगिनी समाज ही संस्था ब्राह्मण सभेशीं संलग्न झाली आहे आणि ज्या अर्थी ती संस्था सभेचें काम, पूर्वीप्रमाणें करण्यास तयार आहे त्या अर्थी ब्रा. सभेच्या स्त्रीशाखेचें सर्व काम ब्रा. भगिनी समाजानें करावें,' अशा अर्थाचा प्रस्ताव मांडण्यांत आला. या प्रस्तावावर अनुकूल प्रतिकूल भाषणें झाल्यावर शेवटीं बराच गोंधळ झाल्यामुळें, या प्रस्तावावरील मतें बॅलट पद्धतीनें घ्यावींत असें ठरलें; व अशा तऱ्हेनें मतें घेतां वरील प्रस्ताव अमान्य झाला आणि व्य. मं. नें सुरू केलेल्या महिला शाखेस ब्रा. सभेच्या साधारण सभेची संमति मिळाली नि या शाखेचें काम सभेच्या नियमांप्रमाणें सुरू झालें.

या शाखेमार्फत भरतकाम, विणकाम, इंग्रजी व हिंदी वर्ग चालू करण्यांत आले. तसेंच मकरसंक्रांत, श्रीगौरी हळदीकुंकूं, आषाढी व कार्तिकी एकादशी, लोकमान्य पुण्यतिथि व देवी अहिल्याबाई पुण्य-तिथि इ. कार्यक्रम शाखेमार्फत होऊं लागले. श्रीमहालक्ष्मीचा उत्सवहि आतां याच शाखेमार्फत करण्यांत येऊं लागला.

महिला शाखेचा पहिला वाढदिवस डॉ. सौ. वत्सलाबाई करंज-गांवकर यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

या शाखेतर्फे जे निरनिराळे वर्ग सुरू होते त्यांत पुढील भगिनींची शाखेला बहुमोलाची मदत झाली. श्रीमती मेहेंदळे (शिवणकाम), सौ. ताराबाई अभ्यंकर (हिंदी), कु. अभ्यंकर व कु. नमू ओक व व त्यांच्यानंतर सौ. उमाबाई ओक व सौ. कमलाबाई मायदेव (भरतकाम).

या सर्व भगिनींनीं आपापले वर्ग विनावेतन चालविले व ब्राह्मण समाजांतील भगिनीवर्गांत त्या त्या विषयाची गोडी उत्पन्न केली.

(१४) २ ऱ्या द्वादशवार्षिक वृत्तान्ताचें समालोचन

१९३० ते १९४१

१९३० ते १९४१ हा काळ ब्राह्मण सभेच्या दृष्टीनें पुष्कळच महत्त्वाचा व एका दृष्टीनें क्रांतीचा होता असें म्हणावयास हरकत नाहीं. १९१८ सालीं ज्या कार्यकर्त्यांनीं या ब्राह्मण सभेच्या कार्यास प्रारंभ केला आणि त्यांत जीवन व चैतन्य निर्माण केलें त्यांची कार्य करण्याची शक्ति वयोमानाप्रमाणें कमी झालेली असणें साहजिकच होतें. अर्थात् या कालखंडाच्या अखेरीस नवे कार्यकर्ते पुढें येऊं लागले होते. या बारा वर्षांच्या काळांत सभेच्या कार्याचा व्याप बराच वाढला. सभेच्या या वाढत्या कार्याकडे पाहिलें तर सभेची प्रगति अभिमानास्पद वाटल्याशिवाय रहात नाहीं. शंकरवाडीगृह व त्यावरील सर्व इमारती सर्वस्वीं ब्राह्मण सभेच्या मालकीच्या झाल्या असून त्यांवर एक पैहि कर्ज नाहीं. या इमारतींची व आंतील सामानाची किंमत या बारा वर्षांच्या काळाच्या अखेरीला सुमारें १॥। लाख रुपये होती. स्वयंसेवकांमार्फत होणारें वर्गणीवसुलीचें कार्य अधिकाधिक उत्साहानें चाललेलें दिसून येतें. या बारा वर्षांत स्वयंसेवक शाखेतर्फे सभेकडे रु. ६२१८५-४-० जमा झाले. शिक्षणशाखेनेंहि

बरीच प्रगति केल्याचें दिसून येतें. या काळांत सभेनें रु. ४६००० वर शिष्यवृत्त्यांच्या रूपानें दिले. परतफेडीच्या रूपानें जमा झालेली रक्कमहि पहिल्या बारा वर्षांपेक्षां पुष्कळच अधिक आहे. या काळाच्या अखेरीला परतफेडीच्या रूपानें यावयाची रक्कम रु. ३११२८-१४-६ इतकी असल्याचें दिसतें. समारंभ शाखेनेंहि या अवधींत फार मोठें काम केल्याचें दिसून येतें. निरनिराळे उद्घाटन समारंभ, श्री. पुण-तांबेकरांसारख्यांचे सत्कारसमारंभ इ. अनेक समारंभ या शाखेनें मोठ्या थाटानें पार पाडले. व्यायामशाळेचें कामहि बऱ्या प्रकारें चाल-ल्याचें दिसून येतें. पोटसंघांचें विलीनीकरण व महाराष्ट्रांतील ब्राह्मण संस्थांचें एकसूत्रीकरण करण्याचा प्रयत्न या काळांत झाला. त्यांत जरी इच्छित यश मिळालें नसलें तरी परिस्थिति कांहीं अगदींच निराश्ा-जनक नाहीं. अस्पृश्यतानिवारणाच्या प्रयत्नांत ब्राह्मण सभेच्या मार्गांत जो एक गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण झाला त्याचाहि निर्णय योग्य काळ येतांच लागेल अशा प्रकारचें अनुकूल वातावरण या काळाच्या अखेरीला निर्माण झालेलें दिसून येतें. ब्राह्मण भगिनी समाजाला ब्राह्मण सभेशीं असलेला आपला संबंध सोडावा लागला ही दुर्दैवी घटना होय.

४

(१) व्यवस्थापक सभा

१९४२ नंतर

१९३८-३९ सालीं निर्माण झालेलें वादळ कांहीं तसें एकदम शांत झालें नव्हतें. त्यानें १९४० सालचा बराच भाग व्यापला होता इतकेंच नव्हे तर त्याचे प्रतिध्वनी १९४१ साल अखेरपर्यंत अधून मधून उमटत होते. त्यानंतर मात्र ब्राह्मण सभेला थोडी फार शांतता लाभली. १९३९ च्या अध्यक्षांच्या निर्णयामुळें निर्माण झालेल्या विचित्र परिस्थितीमुळें व्य. मं. तील ज्या २५ सदस्यांनीं, अशा परिस्थितींत ब्राह्मण सभेच्या कार्याशीं स्वतःला निगडित करून घेणें अशक्य आहे असें जाहीर करून, आपल्या सदस्यत्वाचीं त्यागपत्रें दिलीं त्यांनाहि आतां पुन्हा विचार करून आपलें धोरण निश्चित करण्यास अवसर मिळाला. अशीं त्यागपत्रें दिलेल्या गृहस्थांतील प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर, डॉ. चिं. रा. आठवले, श्री. का. वि. खानविलकर, श्री. न. वि. भावे, श्री. वा. रा. गुळवणे इ. आठ मंडळींना ब्राह्मण सभेच्या कार्यापासून अलिप्त रहाण्याचें पूर्ण विचारांतीं ठरविलेलें धोरणच बरोबर वाटलें तर डॉ. सी. का. गोखले, डॉ. वि. ज. भिडे, डॉ. का. ल. ओक, श्री. कृ. सी. पिटकर, श्री. मा. र. सप्रे इ. १३ गृहस्थांना फेरविचारानंतर ब्राह्मण सभेच्या कार्यापासून अलिप्त राहण्याचें धोरण

श्री. के. व. जोशी

श्री. कृ. सी. पिटकर

श्री. द. मो. सहस्रबुद्धे

श्री. भा. ज्ञ. आठवले

श्री. म. रा. कुळकर्णी

कै. श्री. वि. वा. सप्रे

श्री. दादा पेंडसे

श्री. गो. वा. नामजोशी

अनिष्ट वाटलें म्हणून ते व्यवस्थापक मंडळाच्या निवडणुकीस उभे राहिले आणि त्यांत यशस्वीहि झाले. डॉ. कृ. श्री. म्हसकर, श्री. पां. वा. काणे व श्री. अं. गो. पुणतांबेकर हे व्य. मं. चे आजीव सभासद असल्यामुळें ते ब्राह्मण सभेच्या कार्यापासून अलिप्त रहाणें शक्य नव्हतें.

नवें कार्यकारी मंडळ

१९४६-४७ च्या अहवालांत 'जुनी' म्हणून उल्लेख करण्यांत आलेली अमदानी १९४० च्या मध्यांतच संपली असें गृहीत धरलें तरी पुढील दीड वर्ष संक्रमणावस्थेंतच गेल्यामुळें 'नवीन' अमदानीला १९४२ पासून सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. सन १९४२-४३ या द्विवार्षिक काळाकरितां श्री. श्रीपाद यशवंत अभ्यंकर हेच साधारण सभेचे अध्यक्ष झाले. उपाध्यक्षांपैकीं एक श्री. बाळ गंगाधर खेर हे सल्लागार मंडळाचे सदस्य झाले व श्री. ना. बा. काळे, श्री. ना. म. काळे व श्री. ग. ह. पेठे हे तीन गृहस्थ उपाध्यक्ष झाले. प्रा. गजेंद्रगडकरांनीं अलिप्त रहाण्याचें ठरविल्यामुळें १९४०-४१ सालीं व्य. मं. चे अध्यक्ष म्हणून निवड झालेले श्री. मो. भा. भाटवडेकर यांचीच १९४२-४३ च्या प्रारंभीं व्य. मं. चे अध्यक्ष म्हणून निवड झाली. डॉ. वि. ज. भिडे उपाध्यक्ष होऊन कोषाध्यक्षाच्या जागीं श्री. प. पां. महाजन यांच्या बरोबर श्री. कृ. सी. पिटकर यांची योजना झाली. बॅ. वि. वि. ओक आणि श्री. ज. न. भिडे यांची चिटणीस म्हणून निवड झाली.

विश्वस्तांची निवडणूक दर सहा वर्षांनीं व्हावयाची ती १९४४ मध्यें झाली. श्री. पां. वा. काणे, श्री. ग. गो. नवरे व श्री. ग. वि. साळवेकर यांनीं ब्रा. सभेचें जें कार्य केलें त्याची जाणीव असल्यामुळें पुढील सहा वर्षांकरितां विश्वस्त म्हणून त्यांचीच निवड झाली.

१९४४-४५ सालाकरितां साधारण सभेच्या अध्यक्षस्थानीं डॉ. वि.

कृ. डोंगरे यांची निवड होऊन उपाध्यक्षांच्या जागीं रावसाहेब ना. म. काळे, श्री. अ. बा. मावळंकर, श्री. कृष्णराव हणमंत कबूर व श्री. बा. वि. तांबे हे निवडून आले. व्य. मं. चे अध्यक्ष म्हणून श्री. मो. भा. भाटवडेकर हेच पुन्हां निवडून आले. उपाध्यक्षपद बॅ. वि. वि. ओक यांचेकडे गेलें. कोषाध्यक्ष पूर्वींचेच कायम राहिले तर चिटणीसांचे जागीं सॉ. गं. वि. गोखले व श्री. ज. न. भिडे यांची निवड झाली.

१९४६–४७ सालाकरितां ब्रा. सभेच्या साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून ले. क. अ. बा. गजेंद्रगडकर यांची निवड झाली. उपाध्यक्षाचे जागीं पूर्वींचे रा. सा. ना. म. काळे व श्री. अ. बा. मावळंकर यांच्या बरोबर श्री. शं. ग. पटवर्धन व न्या. मू. रंगाचार्य अप्पाचार्य जहागीरदार यांची निवड झाली. व्य. मं. चें अध्यक्षपद बॅ. वि. वि. ओक यांचेकडे गेलें, उपाध्यक्ष म्हणून श्री. द. शं. देवधर यांची निवड झाली, कोषाध्यक्ष व चिटणीस म्हणून पूर्वींचेच गृहस्थ कायम झाले.

रा. सा. ना. म. काळे

ले. क. प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर हे दि. ८-११-४७ ला हृदयविकारानें एकाएकीं कालवश झाले. तेव्हां त्यांच्या जागीं रा. सा. नागेश महादेव काळे यांची साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. रा. सा. काळे हे मुंबई विश्वविद्यालयाचे उच्च पदवीधर असून अध्यापन हें आपलें जीवनकार्य त्यांनीं ठरविलें आहे. परळ येथील महाराष्ट्र हायस्कूलचे ते मुख्याध्यापक आहेत. अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध असून कोणतेंहि सार्वजनिक कार्य निष्ठेनें व अत्यंत काळजीपूर्वक करणें हा त्यांचा बाणा आहे. त्यांचें कार्य व ही त्यांची वृत्ति पाहून त्यांना सरकारनें रावसाहेब ही बहुमानाची पदवी देऊन शिवाय त्यांना जे. पी. हि केलें आहे.

त्यांनीं सहा वर्षें उपाध्यक्षाचें काम करून अनेक सभा यशस्वी रीतीनें चालविल्या होत्या. ब्रा. सभेचें सुदैव हें कीं, तिला अध्यक्ष म्हणून ज्ञातींतील उत्तमोत्तम माणसें सतत साठ वर्षें लाभलीं आहेत.

श्री. श्रीपाद यशवंत ऊर्फ नानासाहेब अभ्यंकर हे दि. २१-८-३८ पासून १९४३ अखेरपर्यंत साधारण सभेचे अध्यक्ष होते. ते मुंबई हायकोर्टांतील प्रमुख वकिलांपैकीं एक असून वृत्तीनें सत्त्वस्थ, आचरणांत परंपरेचे अभिमानी व विचारानें पुरोगामी मताचे आहेत. कोणालाहि न दुखवितां, क्वचित् प्रसंगीं अधिकउणें उत्तर सहन करूनहि, त्यांनीं अनेक सभांचीं कामें चालविलेलीं आहेत.

डॉ. वि. कृ. डोंगरे १९४४-४५ सालांकरितां साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. निवडणुकीच्या पूर्वी ते थोडेसे आजारी होते. त्यांची प्रकृति सुधारून ते सभेचें कार्य करूं शकतील ही आशा फोल ठरली. त्यांची प्रकृति या दोन वर्षांच्या अवधींत सुधारूं शकली नाहीं. ते व त्यांचे बंधु श्री. तात्यासाहेब यांनीं रु. १०००० ची देणगी सभेला दिलेली आहे. सभेच्या कामांत ते बारकाईनें लक्ष घालीत व कार्यकर्त्यांविषयींचा आपला आदर वेळोवेळीं प्रकट करीत. ते सभेचे दहा वर्षें उपाध्यक्ष होते.

ले. क. प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर

ले. क. प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर हे दि. ८-११-४७ ला स्वर्गस्थ झाले. प्रा. गजेंद्रगडकर यांचें घराणें संस्कृत भाषेच्या अध्ययनाच्या बाबतींत अखिल महाराष्ट्रांत महशूर होतें. या घराण्यांत सतत पांचसहा पिढ्या एकाहून एक विद्वान शास्त्री निर्माण झाले. संस्कृत भाषेच्या अध्ययनाबरोबर आंग्ल भाषेचाहि अभ्यास करणारे प्रा. गजेंद्रगडकर हे या घराण्यांतील पहिलेच गृहस्थ होत. मॅट्रिकपासून एम्. ए. पर्यंत संस्कृतचीं बहुतेक पारितोषकें त्यांनीं मिळविलीं. एल्फिन्स्टन कॉलेजांत

ते संस्कृतचे प्राध्यापक होते. त्यानंतर ते सिद्धार्थ कॉलेजचे प्राचार्य झाले. ब्रा. सभेच्या व्य. मं. त येण्यापूर्वीहि ब्रा. सभेच्या कार्यांत ते बारकाईनें लक्ष घालीत. ते साधारण सभेचे दोन वर्षें व व्य. मं. चेहि दोन वर्षें अध्यक्ष व सहा वर्षें उपाध्यक्ष होते. व्य. मं. चे सदस्य म्हणून त्यांनीं १४ वर्षें काम केलें. आपल्या ज्ञातींतील ज्या गृहस्थांकडे ब्राह्मण समाजानें अभिमानानें बोट दाखवावें अशा गृहस्थांत प्रा. गजेंद्रगडकरांचें स्थान पहिल्या श्रेणींतील होतें. अभ्यासानें त्यांनीं संस्कृत भाषेंत प्रावीण्य मिळविलें पण त्यांच्या मनाचा नैसर्गिक ओढा लष्करी शिक्षणाकडे होता. त्यांना आधुनिक काळांतील द्रोणाचार्य असें म्हणायला कांहींच हरकत नाहीं. प्रत्येक तरुण तेजस्वी दिसला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. मुंबई विश्वविद्यालयाच्या लष्करी पथकांत ते चढत चढत लेफ्टनंट कर्नलच्या हुद्द्यापर्यंत गेले. व्य. मं. चे व साधारण सभेचे अध्यक्ष या नात्यानें सभा चालविण्याचें त्यांचें कौशल्य कौतुकास्पद होतें. त्यांची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण असून ग्रंथप्रामाण्यापेक्षां बुद्धिप्रामाण्यावर त्यांचा जास्त विश्वास होता. अगदीं सनातनी घराण्यांत जन्म झाला असूनहि ते पुरोगामी मताचे व परिवर्तनवादी होते. अन्यायापुढें मान वांकविण्याचा विचारहि त्यांना सहन होत नसे. सभेचें काम शांतपणें व अगदीं त्वरित आटोपण्याची त्यांची हातोटी कौतुकास्पद अशीच होती. दि. ८–१२–४६ ला ब्रा. सभेच्या साधारण सभेंत, १९३९ सालीं साधारण सभेच्या अध्यक्षांनीं जो निर्णय दिला होता तो रद्द करून ब्राह्मण सभेंतील गणेशोत्सवांत अस्पृश्यांना उपस्थित रहातां यावें अशा अर्थाच्या आलेल्या ठरावावर, त्यांनीं जो निर्णय दिला तो ब्राह्मण सभेच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखाच आहे. इतर समाजांच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटल्याखेरीज ब्राह्मण ज्ञातीची उन्नति होणें शक्य नाहीं असें त्यांचें निश्चित मत होतें. समाजाचें कल्याण खरोखर कशांत आहे हें अत्यंत नम्रपणें समाजांतील

घटकांच्या नजरेस आणावें पण त्यांतील हट्टाग्रही लोक जर आपल्या दुराग्रहालाच घट्ट कवटाळून बसत असले तर त्यांना वैचारिक धक्के देऊन प्रगतिपथावर नेणेंच योग्य होय अशी त्यांच्या मनाची ठाम भूमिका होती.

श्री. अं. गो. पुणतांबेकर हे दि. ६–११–४७ ला कालवश झाले. आदर्श स्वयंसेवक कसा असावा याचें ब्राह्मण समाजाला त्यांनीं उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें. त्यांचें जीवनचरित्र अन्यत्र दिलेलेंच आहे.

श्री. ज. न. भिडे

१९४२ ते १९४७ या सहा वर्षांच्या कालखंडांत श्री. जनार्दन नरसिंह भिडे यांनीं प्रत्यक्ष कार्यवाहाचें काम शांतपणें, समतोल विचारानें, पूर्वापार पद्धतीनें आणि ब्रा. समेचें ध्येय नजरेसमोरून हालूं न देतां केलेलें असून १९४८–४९ सालासाठींहि त्यांचीच चिटणीस म्हणून निवड झालेली आहे. नौकेचा कर्णधार नौकेवरील अगदीं एका कोपऱ्यांत बसून नौका योग्य दिशेनें चालू ठेवण्याचें काम करतो त्याप्रमाणें श्री. जनूभाऊ भिडे हे यत्किंचितहि गाजावाजा न करतां ब्राह्मण समेची नौका व्यवस्थित रीतीनें चालविण्याचें कार्य करीत आहेत.

इतर पदाधिकारी

डॉ. का. ल. ओक हेहि एक तळमळीचे कार्यकर्ते आहेत. ब्रा. समेचे कोषाध्यक्ष या नात्यानें त्यांनीं काम केलेलें असून सूतिकागृहाच्या चिटणीसाचें काम ते सातआठ वर्षें अत्यंत परिश्रमपूर्वक करीत आहेत.

श्री. दामोदर हरि टिळक, श्री. भास्कर सखाराम गद्रे व श्री. शंकर हरि केळकर हे तीन गृहस्थ व्य. मं. स लाभले असून ते तिघेहि मोठे उत्साही कार्यकर्ते आहेत. त्यांच्याच चिकाटीमुळें व परिश्रमांमुळें ब्रा. समेला

आपल्या कार्यक्षेत्रांत एक नवीन दालन उघडतां आलें. श्री. टिळक हे शिक्षणशाखेच्या चिटणीसाचेंहि काम अतिशय कळकळीनें करीत असतात.

भगिनींसाठीं शिष्यवृत्त्या

श्री. ग. रा. हवालदार यांनीं आपल्या मातुःश्री श्रीमती मथुराबाई व पत्नी सौ. गंगाबाई यांच्या नांवानें अनुक्रमें रु. १००० व रु. ४०० अशा देणग्या विद्यार्थिनींना विनापरतफेड शिष्यवृत्त्या देण्यासाठीं सभेला दिलेल्या आहेत. मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृत विषयांत पहिल्या क्रमांकाचे गुण मिळविणाऱ्या भगिनीला मथुराबाई शिष्यवृत्ति देण्यांत येत असून त्याच परीक्षेंतील मराठी भाषाविषयांत पहिला नंबर मिळविणाऱ्या भगिनीला गंगाबाई शिष्य-वृत्ति मिळत असते. या शिष्यवृत्त्या देण्याचें काम ब्रा. स. व्य. मं. नें महिला शाखेकडे सोंपविलेलें आहे.

(२) सत्कारसमारंभ

१९४२ व नंतर

मेजर ए. व्ही. पराडकर या ब्राह्मण वीरानें प्रत्यक्ष रणभूमीवर तोफखान्यांत जो पराक्रम गाजविला तो त्याला स्वतःला व ब्राह्मण ज्ञातीला भूषणास्पद असाच आहे. ब्राह्मणांतील क्षात्रतेज लुप्त झालेलें नाहीं फक्त त्यावर धुरळा सांठलेला आहे हें या वीरानें जगाच्या निदर्शनाला आणून दिलें. श्री. पराडकर यांनीं साध्या सैनिकापासून सुरुवात करून मेजरचा हुद्दा गांठला—आणि तोहि परकीय सरकारच्या कारकीर्दींत—याबद्दल ब्राह्मण सभेनें त्यांचा दि. १९-१-४४ ला श्रीमंत जगन्नाथ महाराज यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार केला.

देवल सर्कसची माहिती नाहीं असा मनुष्य भरतखंडांत विरळाच. या सर्कशीची मालकी सध्यां देवल बंधूंकडे आहे. त्यांनीं १९४२ व ४३ या दोन सालीं आपल्या सर्कशीचे दोन प्रयोग ब्रा. सभेच्या म्हसकर सूतिकागृहाच्या मदतीसाठीं दिले. दि. १६-४-४४ ला त्यांनीं ब्रा. सभेस भेट दिली तेव्हां सभेमार्फत त्यांचा सत्कार करण्यांत आला.

नटसम्राट् नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांस मुंबईस झालेल्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाचें अध्यक्षस्थान देण्यांत आलेलें होतें.

दि. २९–५–४४ ला श्रीमंत नानासाहेब पुराणिक यांच्या अध्यक्षते- खालीं ब्राह्मण सभेनें त्यांचा सत्कार केला.

रँग्लर र. पु. परांजपे यांस हिंदुस्थान सरकारनें ऑस्ट्रेलियाचे पहिले हाय कमिशनर नेमलें म्हणून त्यांचा सत्कारसमारंभ दि. १७–१०–४४ ला हिंदुस्थान सरकारचे ब्रह्मदेशाचे प्रतिनिधि बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला.

ब्रा. सभेचे आजीव सभासद श्री. प्रल्हादाचार्य बाळाचार्य गजेंद्र-गडकर यांना मुंबईच्या वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश म्हणून नेमण्यांत आलें याबद्दल श्री. श्रीपाद यशवंत अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. न्या. मू. गजेंद्रगडकर यांचें ब्रा. सभेच्या कार्याकडे अगदीं बारकाईनें लक्ष असे व त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा सभेस वेळोवेळीं मिळत असे. १९३९ मध्यें ब्रा. सभेच्या साधारण सभेच्या अध्यक्षांनीं अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न नियमबाह्य ठरविल्यामुळें ब्राह्मण सभेंत मतभेद झाले व त्या मतभेदांच्या खडकावर ब्रा. स. व्य. मं. चें तारूं फुटतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. अध्यक्षांचा निर्णय व व्य. मं. चें मत या दुहेरी अडचणींतून मोठ्या युक्तीनें वाट काढून ब्रा. सभेंत ज्यांनीं स्थिरता निर्माण केली त्यांमध्यें न्या. मू. गजेंद्रगडकर हे सर्वांत प्रमुख होते. ब्रा. सभेच्या अध्यक्षांचा हा नियमबाह्यतेचा निर्णय किती चुकीचा आहे हें दाखविण्याकरितां मुंबईंतील पांच सुप्रसिद्ध ब्राह्मण वकिलांनीं जें हस्तपत्रक काढलें त्यांतहि हेच प्रमुख होते. या समारंभांत न्याय-मूर्तींच्या गुणगौरवपर भाषणें झालीं व न्यायमूर्तींनीं सदसद्विवेकबुद्धीला स्मरून योग्य वाटेल तो निर्णय देण्याचा प्रयत्न आपणाकडून होईल असें आश्वासन दिलें.

डॉ. रा. गो. धायगुडे, एम्. डी., यांना जी. एस्. मेडिकल कॉलेजचे

डीन नेमण्यांत आल्याबद्दल, श्री. ब. द. बेळवी, बी. ए., एल्एल्. बी., यांना प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटची जागा मिळाल्याबद्दल आणि प्रा. रा. पु. पटवर्धन, एम्. ए., यांची शिक्षणखात्याच्या मुख्याचे जागीं नेमणूक झाल्याबद्दल दि. २–१२–४५ ला संयुक्त सत्कार करण्यांत आला. या सत्कारसमारंभाचें अध्यक्षस्थान दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनीं भूषविलें होतें.

श्री. ग. वि. ऊर्फ दादासाहेब मावळंकर, श्रीमंत विंचूरकर व डॉ. गो. वि. देशमुख हे मध्यविधिमंडळांत निवडून आल्याबद्दल प्रकट सभेंत त्यांचा गौरव करण्यांत आला.

मुंबईतील सुप्रसिद्ध वकील श्री. य. वि. दीक्षित यांची हायकोर्टाच्या न्यायाधीशाचे जागीं नेमणूक झाली याबद्दल श्री. ना. वि. मोडक यांच्या अध्यक्षतेखालीं सभेतर्फे त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें.

म. म. पांडुरंग वामन काणे यांस अलाहाबाद विद्यालयानें 'डॉक्टर' ही बहुमानाची पदवी दिल्याबद्दल व मुंबई सरकारनें त्यांस मुंबई विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु नेमल्याबद्दल आणि सुप्रसिद्ध वकील श्री. रं. अ. जहागीरदार यांना येथील हायकोर्टाचे न्यायाधीश नेमल्याबद्दल त्यांचा सत्कार श्री. नानासाहेब चाफेकर यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला.

सभेंतील माननीयांचा सन्मान

म. म. पांडुरंग वामन काणे, श्री. मो. भा. भाटवडेकर आणि श्री. प. पां. महाजन यांनीं ब्रा. सभेच्या व्य. मं. चे सदस्य म्हणून सतत वीस वर्षांहून अधिक निरपेक्ष सेवा केली व म्हणून या त्रिवर्गांचीं तैलचित्रें ब्रा. सभेच्या हरि केशव गोखले सभागृहांत ठेवावीं असें ब्रा. स. व्य. मं. नें ठरविलें. या तैलचित्रांचा अनावरणसमारंभ मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर यांच्या हस्तें दि. २१–७–४७ ला झाला.

या त्रिवर्गाच्या गुणवर्णनपर भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं तैलचित्रांचें अनावरण केलें आणि हीं तैलचित्रें ठेवण्यांत सभेनें किती स्वारस्य दाखविलें आहे हें सांगितलें.

श्री. अण्णासाहेब काणे म्हणजे ब्राह्मणसभा असें समीकरण आहे. ब्रा. सभेला जें उच्च स्थान लाभलें आहे त्याचें मुख्य श्रेय त्यांनाच आहे यांत मुळींच शंका नाहीं.

श्री. मो. भा. भाटवडेकर

श्री. मोरेश्वर भालचंद्र भाटवडेकर हे मुंबई विश्वविद्यालयाचे एम्. ए. होते. भाटवडेकर घराण्याची जनसेवेची परंपरा त्यांनीं आपले पूज्य वडील सर भालचंद्र यांच्या पश्चात् चालू ठेवली. ब्रा. सभेच्या कार्यांत बौद्धिक, शारीरिक व आर्थिक भाग घेऊन त्यांनीं सभेला स्थैर्य व प्रतिष्ठा मिळवून दिली. सनातन धर्मावरील त्यांची श्रद्धा अढळ असून त्यांचा आचारहि त्या श्रद्धेला अनुसरूनच होता. आपल्या मताचा अभिमान ते ब्रा. सभेच्या कार्याच्या आड येऊं देत नसत. १९३० सालीं ते व्य. मं. चे अध्यक्ष झाले व हें काम त्यांनीं आठ वर्षें केलें. त्यानंतरचीं दोन वर्षेंहि ते व्य. मं. चे सदस्य होते. १९३९ सालीं अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न पुन्हा जोरानें पुढें आला आणि त्यावर पुन्हा तीव्र मतभेद माजले. १९४० सालीं ते पुन्हा व्य. मं. चे अध्यक्ष झाले. श्रीशंकरवाडीगृहाची सुधारणा व पुनर्रचना त्यांनीं स्वतःच्या देखरेखीखालीं करून घेतली. तसेंच, शंकरवाडी-गृहाच्या खरेदीच्या वेळीं त्यांनीं दिलेलें प्रोत्साहन व घेतलेले श्रम यांची जाणीव ब्रा. सभेस सदैव राहील.

श्री. परशुरामभाऊ महाजन

श्री. परशुराम पांडुरंग ऊर्फ भाऊसाहेब महाजन कांहीं तरी उद्योग करावा किंवा एखादी कला संपादन करावी अशा उद्देशानें मुंबईस

आले. घड्याळें दुरुस्त करण्यांत अत्यंत वाकबगार म्हणून ख्याति मिळविलेले श्री. राईलकर यांनीं परशुरामभाऊंना त्या कलेंत चांगलेंच निष्णात केलें. कोल्हापूरच्या राजवाड्याच्या टॉवरमधील मोठ्या घड्याळाच्या दुरुस्तीचें काम श्री. परशुरामभाऊंनींच केलेलें आहे. हें काम कांहीं काळ केल्यावर त्यांनीं माधवाश्रमाच्या व्यवस्थेचें काम पहाण्यास सुरवात केली. आज माधवाश्रमाला जें भव्य स्वरूप प्राप्त झालेलें दिसत आहे त्याचें सर्व श्रेय परशुरामभाऊंनाच आहे. १९२८ च्या प्रारंभीं त्यांना ब्रा. स. व्य. मं. वर घेण्यांत आलें. त्यांची निरलस व निर्वैर वृत्ति आणि सर्वांशीं मिळतें घेऊन काम करण्याची हातोटी या त्यांच्या गुणांमुळें सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटतो. पक्षातीत रहाण्याच्या त्यांच्या सद्गुणाचा सभेच्या कार्याला फार उपयोग झालेला आहे. १९३९ अखेर पर्यंत व्य. मं. त त्यांना संयोजित करून घेण्यांत येत असे. १९४० च्या निवडणुकींत ते निवडून आले व त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकींत ते निवडून आलेले आहेत. ब्राह्मण सभेच्या कोषाध्यक्षाचें काम त्यांनीं सोळा वर्षें केलेलें आहे. ब्राह्मण समाजांत त्यांनीं एक प्रकारचें जें मानाचें स्थान मिळविलेलें आहे त्याकडे पाहून ब्राह्मण सभेचे एक विश्वस्त म्हणून १९४८ च्या प्रारंभीं त्यांना निवडण्यांत आलें आहे.

(३) स्वयंसेवक शाखा

१९४२ व नंतर

या शाखेंत श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. मामा मराठे यांची प्रथा पुढें यशस्वीपणें चाललेली दिसते. पण या प्रथेला, इच्छा असो वा नसो, थोडीफार तरी प्रसिद्धि मिळाल्याशिवाय रहात नाहीं. पण श्री. वि. भि. निवर्गी यांची प्रथा मात्र खरोखरच कसोटीची आहे. कारण या प्रथेला प्रसिद्धीचें पूर्ण वावडें आहे. श्री. निवर्गी यांची प्रथा श्री. कृ. ग. पणशीकर, श्री. म. वि. नामजोशी, श्री. स. म. देशपांडे, श्री. द. कृ. निमकर, श्री. वा. रा. गुळवणे व श्री. आ. अ. मावळंकर या स्वयंसेवकांनीं बऱ्याच प्रमाणांत चालविली. ब्रा. सभेच्या इतिहासांत एक काळ असा होता कीं, जेव्हां सभेचीं सर्व कामें स्वयंसेवकीय वृत्तीनेंच चालत असत. सभेच्या मालकीची जागा नव्हती त्यावेळीं बिछायती उत्सवस्थळीं नेणें, गायनाच्या कार्यक्रमाच्या वेळीं कॉफी तयार करणें, कॉफीपानानंतर सर्व उपकरणीं साफ करणें इत्यादि सर्व कामें स्वयंसेवकच करीत. आनंदाची गोष्ट ही कीं, श्री. निवर्गी यांची प्रथा कमी झाली असली तरी अजिबात नष्ट मात्र झालेली नाहीं.

वर्गणीवसुलींत प्रगति

१९४२ ते १९४७ या सहा वर्षांच्या अवधींत वर्गणीवसुलीचें काम वाढत्या उत्साहानें झालेलें दिसून येतें. १९४६ सालीं वार्षिक वर्गणी-वसुलीचा आंकडा पहिल्यानेंच रु. ८००० वर गेला; व पुढें हें प्रमाण वाढतेंच राहिलें. या सहा वर्षांत रु. ४३०१६ वर्गणीरूपानें जमा करण्यांत आले. अर्थात् हें काम स्वयंसेवकांनीं केलेलें असल्यामुळें त्यासाठीं सभेला एका पैचाहि खर्च आलेला नाहीं. स्वयंसेवक म्हणजे शुद्ध पाण्याचा झरा म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. १९४७ अखेर सभेच्या पटावर १३७ आश्रयदाते, १९ सन्मान्य आश्रयदाते, ७९५ आजीव सभासद व ३१५० वर्गणीदार सभासद असल्याचें दिसतें.

सन्मान्य आश्रयदाते

१४९३ सालीं श्री. म. रा. कुळकर्णी, श्री. के. ब. जोशी, श्री. कृ. सी. पिटकर, श्री. द. मो. सहस्रबुद्धे व श्री. भा. ज. आठवले हे सभेचे सन्मान्य आश्रयदाते झाले. श्री. म. रा. कुळकर्णी हे १९२७ सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. ते २०–२५ सभासदांची वर्गणी वसूल करीत. शिवाय व्य. मं. चा वृत्तान्त लिहिण्याचें कामहि ते बरींच वर्षें करीत. श्री. के. बी. जोशी १९२७ सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. ते २५–३० सभासदांची वर्गणी जमा करीत. श्री. कृ. सी. पिटकर हे १९२६ सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. सुरुवातीला २५ व पुढें पुढें १५० ते २०० सभासदांची वर्गणी ते जमा करीत. स्वयंसेवक शाखेचे ते दोन वर्षें अध्यक्ष होते. श्री. द. भो. सहस्रबुद्धे हे १९२८ सालीं सभेचे स्वयंसेवक झाले. ते प्रथम २० व कांहीं वर्षांनंतर ७५ ते १०० सभासदांची वर्गणी वसूल करीत असत. चार वर्षें ते शाखेचे चिटणीस होते. व्या. सभेच्या गणेशोत्सवादि कार्यक्रमांच्या वेळीं लाऊड स्पीकर्सची व्यवस्था ते करीत

असतात. श्री. भा. ज. आठवले सुमारें ४० सभासदांच्या वर्गणी-वसुलीचें काम करीत. चार वर्षें ते शाखेचे अध्यक्ष होते.

स्वयंसेवकांची नवी कामगिरी

१९४२–४३ या काळांत श्री. द. कृ. निमकर स्वयंसेवक शाखेचे अध्यक्ष व श्री. द. मो. सहस्रबुद्धे आणि श्री. पां. अ. वेलणकर हे चिटणीस होते. या दोन वर्षांत वर्गणीरूपानें रु. १३१२७ जमा झाले. उत्सवसमारंभाच्या वेळीं व्यवस्था ठेवणें, सभेमार्फत प्रसिद्ध होणारीं हस्तपत्रकें व विनंतीपत्रकें वाटणें इत्यादि कामें स्वयंसेवक करीत. सिनेतारका कु. शांता आपटे यांच्या गायनाच्या कार्यक्रमाचीं तिकिटें खपवून त्या कार्यक्रमाची व्यवस्था ठेवण्याचें काम स्वयंसेवकांनींच केलें. धान्यवांटप–पद्धति सुरू झाल्यावर ब्रा. सभेनें धान्यपुरवठा दुकान सुरू केलें त्यावेळीं सुरवातीला गिऱ्हाइकांना धान्य देणें, पावत्या लिहिणें, विक्रीच्या पैशांचा हिशेब ठेवणें हीं सर्व कामें ही शाखाच विनामूल्य करीत असे.

१९४४–४५ सालीं या शाखेचे अध्यक्ष म्हणून श्री. भा. ज. आठवले व चिटणीस म्हणून श्री. मा. र. सप्रे व श्री. गो. वा. नामजोशी यांची निवड झाली. या दोन वर्षांत वर्गणीरूपानें रु. १३५४८ जमा झाले.

एका स्वयंसेवकाचा विक्रम

१९४६–४७ सालीं श्री. भा. ज. आठवले हेच अध्यक्ष म्हणून राहिले व चिटणीस म्हणून श्री. द. मो. सहस्रबुद्धे व श्री. शं. वि. बर्वे हे आले. या दोन वर्षांत वर्गणीरूपानें रु. १६३४१ जमा झाले. १९४७ सालीं श्री. अ. भा. मराठे या स्वयंसेवकानें एकट्यानें रु. १००० वर्गणीरूपानें जमा केले. त्या स्वयंसेवकाची ही कामगिरी त्यालाच नव्हे तर सबंध स्वयंसेवक शाखेला भूषणावह आहे यांत कांहींच शंका नाहीं. या स्वयंसेवकाच्या या कर्तृत्वाकडे पाहिलें म्हणजे

कै. चिंतामण जनार्दन खेर या स्वयंसेवकाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

स्वयंसेवकाची आर्थिक देणगी

ज्यांना मोठ्या प्रमाणांत ब्रा. सभेला आर्थिक साहाय्य करतां येत नाहीं, पण आपल्या हातून सभेची कांहीं तरी सेवा घडावी अशी तीव्र इच्छा ज्यांच्या अंतःकरणांत वास करीत असते तेच ब्रा. सभेचे स्वयंसेवक होतात. पण अशा स्वयंसेवकाची आर्थिक परिस्थिति सुदैवानें सुधारली तर सभेला आर्थिक साह्य करण्यासहि तो चुकत नाहीं याचें एक उदाहरण म्हणजे श्री. विठ्ठल वासुदेव सप्रे यांचें होय. हे ब्रा. सभेचे अगदीं मितभाषी पण निष्ठावंत स्वयंसेवक होते. ते दि. ३-६-४६ ला दिवंगत झाले तेव्हां त्यांच्या वडिलांनीं त्यांच्या स्मरणार्थ रोख रु. १००० ची देणगी सभेला दिली. दरवर्षीं मुंबई व उपनगर या भागांतून मराठी सातवीच्या परीक्षेंत पहिला नंबर मिळविणाऱ्या ब्राह्मण विद्यार्थिनीला या देणगीच्या व्याजांतून 'सप्रे पारितोषक' सदर देणगीच्या अटीला अनुसरून देण्यांत येतें. हें पारितोषक देण्याचें काम व्य. मं. नें महिला-शाखेकडे सोंपविलें आहे.

(४) श्रीशंकरवाडी

१९४२ व नंतर

१९२५ सालीं शंकरवाडी गृह खरेदी करण्यांत येऊन १९३९ अखेर सुमारें १।।। लक्ष रुपये किंमतीचें श्रीशंकरवाडी गृह त्यांतील सर्व इमारतींसह ब्राह्मण सभेच्या पूर्ण मालकीचें झालें त्याचा इतिहास पर्वी येऊन गेलाच आहे.

शंकरवाडीसाठीं आणखी एक इमारत

ही जागा व तिच्यावरील इमारती ब्रा. सभेच्या वाढत्या व्यापाला अपुऱ्या पडूं लागल्या. त्यामुळें कांहीं कामें इच्छा असूनहि स्थगित ठेवण्याचा प्रसंग येऊं लागला. युद्धाच्या धुमश्चक्रीमुळें जागांच्या व घरांच्या किंमती भरमसाट वाढल्या. अशा स्थितींत शंकरवाडीच्या पश्चिमेकडील जागा व तिच्यावरील इमारत विक्रीसाठीं निघाली असल्याचें ब्रा. सभेस समजलें.

शंकरवाडीच्या दोन्ही बाजूंना सार्वजनिक रस्ते व एका बाजूला जैन मंदिर असल्यामुळें त्या जागीं इमारत वाढविण्याची सोयच नव्हती. त्यामुळें ही आलेली संधि दवडावयाची नाहीं असा ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांनीं निश्चय केला.



१९४०-४१ चें कार्यकारी मंडळ

ब्राह्मण सभा इमारत नं. २ चा उद्घाटन समारंभ
(श्रीमंत सौ. सोनूताई कब्बूर यांच्या हस्तें)

पूर्वीच्या दुप्पट किंमत

१९३२ सालीं हीच इमारत विक्रीला निघालेली होती व ब्रा. सभेच्या स्थापत्यविशारदांनीं त्यावेळीं तिची किंमत रु. ५५००० ठरविली होती. पण तेवढ्या रकमेंत सौदा पटेना म्हणून ब्रा. स. व्य. मं. नें रु. ६५००० पर्यंत ती इमारत खरेदी करण्याची तयारी दर्शविली. पण त्या वेळीं सभेला यश आलें नाहीं आणि ती इमारत दि प्रेसिडेन्सी प्रॉव्हिडंट अँड जनरल इं. कं. नें विकत घेतली. नंतर त्या कंपनीनें ती जागा व इमारत सुरतेचे रहिवासी श्री. प्राणलाल भगवानदास यांना रु. ११४००० ला विकण्याचें ठरविलें. ब्रा. सभेनें शेट प्राणलाल यांना रु. १०००० अधिक देऊन ही इमारत रु. १२४००० घ्यावयाचें ठरविलें आणि त्याप्रमाणें साटेंखतहि झालें.

श्रीमंत नवरे यांचें आश्वासन

इतिहासाची पुनरावृत्ति होते त्याप्रमाणें १९२५ सालच्या शंकरवाडी गृह खरेदीचीच यावेळीं जवळ जवळ पुनरावृत्ति झाली. १९२५ सालीं ब्रा. सभेला आश्वासन देणारे श्री. गणेश गोविंद ऊर्फ अण्णासाहेब नवरे हेच याहि वेळीं पुन्हा पुढें आले. साटेंखत झाल्यापासून सहा महिन्यांच्या अवधींत ब्रा. सभेला सर्व रक्कम उभी करावयाची होती. 'शिकस्तीचे प्रयत्न करा म्हणजे ही रक्कम जमेल व न जमल्यास कमी पडणारी रक्कम आपण पुढें करूं' असें सभेच्या कार्यकर्त्यांस श्री. नवरे यांनीं याहि वेळीं आश्वासन दिलें.

इमारतखरेदीचा संकल्प

दि. २३–४–४३ ला या घरासंबंधींचा प्रश्न व्य. मं. पुढें आला. सभेच्या स्थापत्यविशारदांना सभेची जागेसंबंधींची अडचण सांगण्यांत आली. त्या वेळीं महायुद्ध अगदीं निकरावर आलेलें होतें. विजयश्री कोणाला माळ घालणार याचा अंदाज कोणालाच बांधतां येणें शक्य

नव्हतें. देशाची परिस्थितीहि विचित्र झालेली होती. अशा वेळीं एखादी मोठी योजना हातीं घेणें धोक्याचें होतें. अशा वेळीं लाख दीड लाखाची जबाबदारी ब्रा. सभेनें अंगावर घेणें हें धाडसच होतें. त्या वेळच्या ब्राह्मणवर्गाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करतांनाहि उत्साह वाटण्यास फारशी जागा नव्हती. १९३२ सालींच जरा अधिक धाडस केलें असतें तर बरें झालें असतें असें या वेळीं कांहीं कार्यकर्त्यांना वाटूं लागलें. पण त्या वेळीं रु. ६५००० हीच रक्कम त्या इमारतीच्या मानानें अधिक वाटत होती. त्यानंतर आतां दहा वर्षांनीं त्याच इमारतीला दुप्पट किंमत द्यावी लागणार होती. पण आतांहि आपण स्वस्थ बसलों तर आणखी दहा वर्षांनीं काय परिस्थिति येणार आहे कोणाला ठाऊक, असाहि प्रश्न त्यांच्या मनांत उभा राहूं लागला. शेट प्राणलाल हे या घरासंबंधानें अनेक लोकांशीं बोलणें करीत होते. ही बातमी ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांनाहि समजलेली होती. या सर्व परिस्थितीची जाणीव स्थापत्यविशारदांना करून देण्यांत आली. ब्रा. सभेचें काम कांटेकोरपणानें पहाणारे श्री. भाऊसाहेब तांबे यांनाहि आपलें पूर्वीचें मत बदलणें भाग पडलें आणि त्यांनींहि या व्यवहारास आपली संमति दिली. यामुळें व्य. मं. स धीर आला आणि पुढील मार्ग सुकर झाला. पराकाष्ठेचे प्रयत्न करूनहि नियमित वेळांत एवढी रक्कम जमविणें कठीण होतें. तेव्हां कांहीं तरी अन्य उपायांचा अवलंब करणें भाग होतें. पण तशी कांहीं योजना करावयाची तर सभेच्या नियमांची तटबंदी उभी होती. या तटबंदींतून, लहानसा का होईना, रस्ता काढतां आल्यास हा व्यवहार पुरा करतां येईल अशी आशा वाटत होती. पण एखाद्या मोठ्या तटांतून पाण्याच्या लहानशा धारेला जायला अवसर मिळाला कीं, कांहीं काळानें त्या तटाला मोठें भगदाड पडल्याशिवाय रहात नाहीं. त्याप्रमाणें एकदां व्य. मं. स कर्ज काढण्यास मोकळीक मिळाली कीं, व्य. मं. च्या हातून याचा दुरुपयोग

होणार नाहीं कशावरून, अशीहि शंका कित्येकांना वाटूं लागली. अशा बिकट परिस्थितींतून व्यवस्थापक मंडळाला मार्ग काढावयाचा होता.

एक नवी व्यवस्था

व्य. मंडळ हा निधि जमविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करणार होतेंच. पण आणखी एक सावधगिरी म्हणून ब्रा. सभेजवळ असलेल्या गंगाजळीचा या घरखरेदीच्या कामीं उपयोग करून घेण्याची साधारण सभेकडून परवानगी मिळवून ठेवणें किंवा विश्वस्त पत्रकाप्रमाणें सभेजवळ जे रोखे आहेत ते विकून त्या पैशांचा उपयोग या कामासाठीं करणें हे दोन मार्ग कार्यकर्त्यांपुढें होते. दुसऱ्या उपायाचा अवलंब करावयाचा म्हणजे सदर विश्वस्तपत्राप्रमाणें असलेली रक्कम विश्वस्त हेतूंची वाढ करण्यासाठींच वापरली जाईल अशी खात्री पटवून हायकोर्टाची परवानगी मिळविणें भाग होतें आणि तेथें कसा निकाल लागेल हें अनिश्चित असल्यामुळें हा दिरंगाईचा मार्ग अवलंबिल्यास हातीं आलेला मोका जाईल अशी व्य. मं. स भीति वाटत होती. व्य. मं. नें पूर्ण विचारांतीं व बऱ्याचशा वादविवादानंतर, 'सभेच्या उद्देशांपैकीं एक किंवा अनेक उद्देश साध्य करण्याकरितां या संस्थेला परतफेडीच्या करारानें बिनव्याजी अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारण्याचा अधिकार साधारण सभेस आहे व त्यासंबंधीं पुढील तजवीज करण्याचा अधिकार साधारण सभेनें व्य. मं. स द्यावा,' अशी एक नियमांची पुस्ती मूळ नियमाला जोडावी असें ठरविलें. दि. ८-८-४३ च्या साधारण सभेंत ही नियमदुरुस्ती पास झाली. याप्रमाणें व्य. मं. ला आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर या कामीं पुढें पाऊल टाकण्याचा अधिकार मिळाला.

या नियमदुरुस्तीनें व्य. मं. वर आलेली जबाबदारी लक्षांत घेऊन व्य. मं. नें हें घर खरेदी करण्याचें निश्चित केलें व पूर्वी ठरल्याप्रमाणें एक हस्तपत्रकहि काढण्यांत आलें. हें घर खरेदी करणें ब्रा. सभेला कां आवश्यक

वाटतें याचीं कारणें देऊन या कामीं सर्व सभासदांनीं सभेला आर्थिक साहाय्य करावें अशी या हस्तपत्रकांत विनंती करण्यांत आलेली होती.

कार्यकर्ते मोहिमेवर निघाले

श्री. पां. वा. काणे, श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. बापूसाहेब भाटवडेकर, डॉ. सी. का. गोखले, श्री. प. पां. महाजन, सौ. गं. वि. गोखले, श्री. ज. न. भिडे व श्री. मा. रा. नवांगुळे यांनीं नियमितपणें शिष्टमंडळांतून जाण्याचें ठरविलें व त्यांना श्री. ग. गो. नवरे व श्रीमंत दि. कृ. डोंगरे यांनीं शक्य तें साहाय्य करण्याचें ठरविलें. तसेंच, श्री. आ. अ. मावळंकर, श्री, भा. ज. आठवले, श्री. कृ. सी. पिटकर, श्री. मराठे, श्री. टिल्लू, श्री. नामजोशी इत्यादि मंडळींनींहि आपल्या प्रयत्नांची शिकस्त करण्याचा चंग बांधला.

शुभ शकुन

सुरुवातीलाच सभेचे सल्लागार श्रीमंत वामन श्रीधर ऊर्फ तात्यासाहेब आपटे यांच्या सुशील पत्नी सौ. यमुनाबाई आपटे यांनीं एकरकमी रु. १०००१ ची देणगी देऊन या शुभ कार्याला प्रारंभ करून दिला. या देणगीमुळें कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

स्वयंसेवकांची कामगिरी

वर लिहिल्याप्रमाणें या घराची मूळ किंमत म्हणून रु. १२४००० द्यावे लागले. त्याशिवाय दलाली व कायदेशीर कागदपत्र पुरे करण्यासाठीं म्हणून रु. ६९६८–१४–० इतका खर्च आला. म्हणजे या इमारतीप्रीत्यर्थ एकंदर रु. १३०९६८–१४–० खर्च आला. व्यवस्थापक मंडळ व सर्व स्वयंसेवक यांनीं अविश्रांत श्रम करून रु. ४५६०९ या कार्यासाठीं जमविले. याच सुमारास कु. शांता आपटे यांच्या गायनाचा कार्यक्रम श्रीमंत दि. कृ. डोंगरे यांच्या मदतीनें या कार्याच्या साहाय्यार्थ करण्यांत आला. त्याचें उत्पन्न रु. ३९८६–१०–० इतकें झालें. म्हणजे व्य. मं. स या कार्याप्रीत्यर्थ एकंदर रु. ४९५९५–१०–० इतके मिळाले.

बिनव्याजी अल्प मुदतीच्या ठेवी

पण एवढ्यानें काम कसें भागणार ? ब्रा. सभेजवळ असलेल्या सूतिकागृह, विद्यार्थी शाखा, साळवेकर व्यायामशाळा व औषधालय यांच्या निधींतून रु. ५४००० या कामासाठीं घेण्याचें व त्याबद्दल या नवीन इमारतीचें जें भाडें येईल त्यांतून ३॥ टक्के दरानें होणारें व्याज त्या त्या शाखांना द्यावयाचें व्यवस्थापक मंडळानें ठरविलें. या दोन्ही रकमा मिळूनहि इमारतीची किंमत पुरी होईना. म्हणून १९ गृहस्थांनीं प्रत्येकीं एक हजार याप्रमाणें बिनव्याजी व अल्प मुदतीच्या ठेवी म्हणून रु. १९००० ब्राह्मण सभेच्या हवालीं केले. तेव्हां किरकोळ कमी पडलेली रक्कम ब्राह्मण सभेच्या चालू निधींतून घेऊन आलेल्या सर्व खर्चाची व्यवस्था व्य. मं. नें केली व याप्रीत्यर्थ देणग्या मिळविण्याची योजना आंखली. त्याप्रमाणें १९४४ सालीं रु.१२६७१,१९४५ सालीं रु. ६२९८, १९४६ सालीं रु. ३०२७ व १९४७ सालीं रु. १४११ अशी एकंदर रु. २३४०७ इतकी रक्कम जमा झाली. या नवीन इमारतीच्या भाड्यांतून आवश्यक ते खर्च वजा जातां जी रक्कम उरते त्या रकमेंतून बिनव्याजी घेतलेल्या रकमा परत करण्यांत आल्या व शाखावार घेतलेली रक्कम योग्य प्रमाणांत परत करण्यांत येऊं लागली.

१९४७ अखेर इमारत नं. २ प्रीत्यर्थ झालेल्या खर्चापैकीं म्हसकर सूतिकागृहाचे रु. ३२००० व साळवेकर व्यायाम शाळेचे रु. ६००० असे रु. ३८०००० ब्रा. सभेस देणें आहे. स्थापत्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें कमींत कमी शेंकडा एक याप्रमाणें घसारा म्हणून नियमितपणें कांहीं रक्कम बाजूला ठेवणें अवश्य असतें. अशा घसाऱ्याची रक्कम रु. २५८३६-१०-० आहे. यापैकीं फक्त रु. ४४०१-१४-० एवढी रक्कम सेव्हिंग बँकेमध्यें ठेवलेली असून बाकीचे रु. २१४३४-१२-० हे या दुसऱ्या इमारतीप्रीत्यर्थ वापरले गेले आहेत. म्हणजे १९४७ अखेर

या नवीन खरेदी केलेल्या इमारतीप्रीयर्थ एकंदर रु. ५९४३४-१२-० इतकी रक्कम अजून सभेला मिळविणें आवश्यक आहे. इमारत नं. २ चें भाडें म्हणून दर वर्षीं रु. ८७७५-१३-० येतात व नगरपालिका कर, रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्त्या, तसेंच सूतिकागृह व व्यायामशाळा यांना देण्यांत येणारें व्याज धरून रु. ५१९५-०-६ खर्च होतात. यांत घसाऱ्याचे रु. ३९५-६-० मिळविल्यास बाकी रु. ३१८५-४-६ राहते व या रकमेंतून या इमारतीप्रीत्यर्थ झालेल्या कर्जाची फेड करतां येते.

उद्घाटनसमारंभ

या इमारत नं. २ चा उद्घाटनसमारंभ दि. ७-११-४२ ला रंगाचे सुप्रसिद्ध व्यापारी श्री. कबूर यांच्या पत्नी श्री. सौ. सोनूताई कबूर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्या प्रसंगीं श्री. पां. वा. काणे यांनीं या इमारतखरेदीचा सर्व इतिहास सांगितला व सभेच्या एकंदर कार्याचीहि माहिती दिली. तसेंच, ब्राह्मण समाजांतील तरुणांना औद्योगिक व शास्त्रीय शिक्षण मिळणें कसें आवश्यक आहे याचें विवरण करून त्यासाठीं विद्यार्थ्यांना परदेशीं पाठविण्यासाठीं कमींत कमी दोन लक्ष रुपयांचा निधि जमविण्याची जरुरी असल्याचें सांगितलें. श्री. सौ. कबूर यांनीं ब्रा. सभेच्या कार्याबद्दल आपली सहानुभूति व्यक्त केली व या सभेच्या कार्यांत शक्य तें साहाय्य करण्यास कबूर कुटुंब मागेंपुढें पहाणार नाहीं असें आश्वासन दिलें.

१९४७ अखेर ब्रा. सभेच्या दोन्ही इमारतींची जागेसह किंमत रु. ३०६३५२-१-५ इतकी असून यापैकीं सूतिकागृह व साळवेकर व्यायामशाळा यांच्या कायमनिधींतील रु. ३८००० इमारत नं. २ करितां वापरले असून घसाऱ्याची रक्कम रु. २१४३४-१२-० या इमारतीप्रीत्यर्थ खर्च झाली आहे. मिळून रु. ५९४३४-१२-० या इमारतीप्रीत्यर्थ सभेस अद्यापि देणें आहे.

(५) शिक्षणशाखा

१९४२ व नंतर

ब्रा. सभेच्या शिक्षणशाखेकडे शिष्यवृत्त्यांसाठीं जे अर्ज येतात त्यांपैकीं साधारणपणें निम्या विद्यार्थ्यांनाच शाखा मदत करूं शकत असल्याचें दिसतें. शाखेजवळ पुरेसा पैसा नाहीं हेंच त्याचें कारण होय. शिष्यवृत्त्या देण्यासाठीं या शाखेच्या हिशेबीं जी रक्कम असते तेवढ्या रकमेंतच शाखेला हें काम भागवावयाचें असतें. सन १९४२ ते १९४७ या सहा वर्षांच्या काळांत उच्च शिक्षणाप्रीत्यर्थ देण्यांत आलेली मदत पुढीलप्रमाणें आहे:—

साल	म्हसकरनिधि	सर्वसाधारण	एकूण
१९४२	रु. १३७५	१६२६	३००१
१९४३	रु. ८७०	१३९०	२२६०
१९४४	रु. ५६०	२१८५	२७४५
१९४५	रु. १०५०	२६२५	३६७५
१९४६	रु. ७२५	२३६५	३०९०
१९४७	रु. ८८०	२५४०	३४२०
	रु. ५४६०	१२७३१	१८१९१

इंग्रजी ४ थी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना विनापरतफेड मदत पुढीलप्रमाणें देण्यांत आली :—

साल	रक्कम
१९४२	रु. १२७९–३–०
१९४३	रु. १५६६–०–०
१९४४	रु. १४१८–०–०
१९४५	रु. १३०६–०–०
१९४६	रु. १६५३–०–०
१९४७	रु. १४८८–०–०
	रु. ८७१०–३–०

याप्रमाणें या सहा वर्षांच्या काळांत उच्च व शालेय शिक्षणाकरितां मिळून रु. २६९०१–३–० या शाखेनें शिष्यवृत्त्यांच्या रूपानें दिले. शिवाय लष्करी व वैमानिक शिक्षणासाठीं देण्यांत येणारी 'आपटे शिष्यवृत्ति' पुढीलप्रमाणें देण्यांत आली :—

साल	विद्यार्थी	रक्कम
१९४२	२	रु. १०७२
१९४३	२	रु. ४८२९
१९४६	१	रु. १०००
१९४७	१	रु. १०००
	६	रु. ७९०१

या विद्यार्थ्यांकडून या रकमेची परतफेड झाल्यावर तिचा उपयोग दुसऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याच्या कामीं होईल.

स्तुत्य पण हृदयद्रावक प्रकार

या सहा वर्षांच्या काळांत एक स्तुत्य, अनुकरणीय परंतु हृदय-द्रावक असा एक प्रकार घडून आला. विद्यार्थी भालचंद्र काशीनाथ

गायनाचार्य भास्करबुवा बखले यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ

(अध्यक्ष नेक नामदार बाबासाहेब जयकर)

ब्राह्मण सभा महिला शाखेचा शिवणकामाचा वर्ग

दातार याला डफरिन बोटीवर नाविक शिक्षण घेण्यासाठीं रु. ८११ परतफेडीच्या अटीवर सभेनें दिले होते. दुर्दैवानें तो विद्यार्थी मेंदूच्या विकारानें कालवश झाला. परंतु त्याचे वडील श्री. का. ना. दातार यांनीं मुलाच्या मृत्यूनंतर दहा दिवसांच्या आंत ही सर्व रक्कम सभेकडे पाठवून दिली व मुलाला ऋणमुक्त केलें. यावरून श्री. दातार यांचें थोर अंतःकरण व सभेविषयीं त्यांना वाटत असलेली कळकळ दिसून येते.

विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होऊन ते नोकरीधंदा करूं लागल्यावर त्यांच्याकडून परतफेड होते कीं नाहीं हें शिक्षणशाखेला काळजीपूर्वक पहावें लागतें. या सहा वर्षांच्या काळांत परतफेडीच्या रूपानें पुढील-प्रमाणें रक्कम शाखेकडे जमा झाली:—

१९४२–४३	रु. ६८६३–८–०
१९४४–४५	रु. ७१५८–०–०
१९४६–४७	रु. ६८४१–०–०
	रु. २०८६२–८–०

'विश्वविद्यालयाच्या गिरणींतून वाङ्मयीन पदव्या घेऊन बाहेर पडणारीं यंत्रें' असें या शाखेमार्फत मदत घेऊन शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचें वर्णन कांहीं लोक उपहासानें करतात. पण ब्रा. सभा या बाबतींत किती काळजी घेते हें १९४५, १९४६ व १९४७ या तीन वर्षांत दिलेल्या शिष्यवृत्त्यांची यादी पाहिल्यास दिसून येईल.

शिष्यवृत्त्यांची वर्गवारी

या तीन वर्षांत उच्च शिक्षण घेणाऱ्या १२४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. त्यांपैकीं २१ वाङ्मयीन, ४७ शास्त्रीय, ८ वैद्यकीय, १९ औद्योगिक व व्यापारी, २२ स्थापत्य, ६ सर्वसाधारण व १ शेतकी असें शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत. यांशिवाय नाविक, लष्करी व वैमानिक शिक्षण घेणारे विद्यार्थी सहा आहेत. अशा प्रकारें

१३० विद्यार्थ्यांना ब्रा. सभा मदत करूं शकली. ब्रा. सभा शिष्यवृत्त्या देतांना वाङ्मयीन शिक्षणापेक्षां इतर शिक्षणाकडेच अधिक लक्ष पुरविते हें यावरून सहज दिसून येतें.

शिक्षणशाखेमार्फत श्रीगणेशोत्सवांत धार्मिक विषयांची परीक्षा घेण्यांत येऊन त्यांतील पहिल्या पांच नंबरांना बक्षिसें देण्यांत येतात. तसेंच, या उत्सवांत वक्तृत्वाच्या चढाओढी ठेवून त्यांतील पहिल्या पांच नंबरांना बक्षिसें देण्याचा उपक्रमहि सुरू करण्यांत आलेला आहे.

१९४२ ते १९४७ या सहा वर्षांच्या कालखंडाकडे पाहिल्यास शाखेनें दिलेल्या शिष्यवृत्त्या व परतफेडीच्या रूपानें शाखेकडे झालेली जमा यांत पुष्कळच प्रगति झाल्याचें दिसून येतें.

(६) उत्सवसमारंभ शाखा

१९४२ व नंतर

राष्ट्रांतील थोर पुरुषांचें स्मरण व्हावें, देशाच्या कल्याणासाठीं कोणाचे काय प्रयत्न चालले आहेत याची माहिती मिळावी, लोकांच्या बुद्धीला चालना मिळून निरनिराळ्या विचारप्रवाहांचें त्यांस सम्यक् ज्ञान व्हावें अशा हेतूंनींच श्रीगणेशोत्सवाचा कार्यक्रम ब्रा. सभेकडून आंखण्यांत येतो. देशांत कितीहि पक्षोपपक्ष असोत व त्यांचीं आपापसांत वाटेल तितकीं रणें माजोत, ब्रा. सभेचें व्यासपीठ सर्वांना खुलें असतें. ब्रा. सभेची ही प्रथा १९१८ पासून १९४७ पर्यंत सतत चालू राहिलेली दिसते.

१९४२ सालीं महायुद्धाची अवस्था अगदीं निकरावर आली असल्यामुळें, केवळ खंड पडूं द्यावयाचा नाहीं, इतक्याच बेतानें ब्रा. सभेनें श्रीगणेशोत्सव साजरा केला.

१९४३–४७ हीं पांच वर्षें मात्र ब्रा. सभेचा श्रीगणेशोत्सव नेहमींच्या उत्साही वातावरणांत साजरा करण्यांत आला. या अवधींत ना. डॉ.खरे, श्री. ल. ब. भोपटकर, भाई श्री. अ. डांगे, श्री. चिमणलाल सेटलवाड, श्री. न. चिं. केळकर, डॉ. त्र्यं. रा. नरवणे, सौ. यमुनाबाई हेर्लेकर, भाई सरदेसाई, महर्षि धों. के. कर्वे, डॉ. ए. जी. तेंडुलकर, भालाकार

१३० विद्यार्थ्यांना ब्रा. सभा मदत करूं शकली. ब्रा. सभा शिष्यवृत्त्या देतांना वाङ्मयीन शिक्षणापेक्षां इतर शिक्षणाकडेच अधिक लक्ष पुरविते हें यावरून सहज दिसून येतें.

शिक्षणशाखेमार्फत श्रीगणेशोत्सवांत धार्मिक विषयांची परीक्षा घेण्यांत येऊन त्यांतील पहिल्या पांच नंबरांना बक्षिसें देण्यांत येतात. तसेंच, या उत्सवांत वक्तृत्वाच्या चढाओढी ठेवून त्यांतील पहिल्या पांच नंबरांना बक्षिसें देण्याचा उपक्रमहि सुरू करण्यांत आलेला आहे.

१९४२ ते १९४७ या सहा वर्षांच्या कालखंडाकडे पाहिल्यास शाखेनें दिलेल्या शिष्यवृत्त्या व परतफेडीच्या रूपानें शाखेकडे झालेली जमा यांत पुष्कळच प्रगति झाल्याचें दिसून येतें.

(६) उत्सवसमारंभ शाखा

१९४२ व नंतर

राष्ट्रांतील थोर पुरुषांचें स्मरण व्हावें, देशाच्या कल्याणासाठीं कोणाचे काय प्रयत्न चालले आहेत याची माहिती मिळावी, लोकांच्या बुद्धीला चालना मिळून निरनिराळ्या विचारप्रवाहांचें त्यांस सम्यक् ज्ञान व्हावें अशा हेतूंनींच श्रीगणेशोत्सवाचा कार्यक्रम ब्रा. सभेकडून आंखण्यांत येतो. देशांत कितीहि पक्षोपपक्ष असोत व त्यांचीं आपापसांत वाटेल तितकीं रणें माजोत, ब्रा. सभेचें व्यासपीठ सर्वांना खुलें असतें. ब्रा. सभेची ही प्रथा १९१८ पासून १९४७ पर्यंत सतत चालू राहिलेली दिसते.

१९४२ सालीं महायुद्धाची अवस्था अगदीं निकरावर आली असल्यामुळें, केवळ खंड पडूं द्यावयाचा नाहीं, इतक्याच बेतानें ब्रा. सभेनें श्रीगणेशोत्सव साजरा केला.

१९४३–४७ हीं पांच वर्षें मात्र ब्रा. सभेचा श्रीगणेशोत्सव नेहमींच्या उत्साही वातावरणांत साजरा करण्यांत आला. या अवधींत ना. डॉ.खरे, श्री. ल. ब. भोपटकर, भाई श्री. अ. डांगे, श्री. चिमणलाल सेटलवाड, श्री. न. चिं. केळकर, डॉ. त्र्यं. रा. नरवणे, सौ. यमुनाबाई हेर्लेकर, भाई सरदेसाई, महर्षि धों. के. कर्वे, डॉ. ए. जी. तेंडुलकर, भालाकार

श्री. भा. ब. भोपटकर, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, प्रा. जी. डी. पारख, श्री. विनायकराव आपटे, डॉ. शं. ह. मराठे, श्री. नानासाहेब कुंटे, डॉ. ग. य. चिटणीस, श्री. मामासाहेब वरेरकर, श्री. पु. रा. लेले, प्रा. न. र. फाटक, श्री. प. चिं. गद्रे इ. व्याख्यात्यांचीं त्यांच्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर व्याख्यानें झालीं.

या अवधींत केवळ स्त्रियांसाठीं म्हणून सौ. चंद्रकलाबाई हाटे, सौ. कृष्णाबाई चरेगांवकर, सौ. सुधाबाई लिमये इत्यादि विदुषींचीं व्याख्यानें, श्री. सोपानदेव चौधरी यांचें काव्यगायन, शाहीर खाडीलकर यांचे पोवाडे, राजकवि यशवंत यांचें काव्यगायन इ. कार्यक्रम झाले.

मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, मा. मनोहर बर्वे, श्री. प्रल्हादबुवा जोशी या लोकप्रिय गायकांचे गाण्याचे कार्यक्रम करण्यांत आले.

१९४७ सालीं वे. शा. सं. महादेवशास्त्री दिवेकर यांच्या प्रवचनांचा एक सप्ताह झाला. तसेंच, डॉ. पटवर्धन यांच्या कीर्तनांचेहि अनेक कार्यक्रम झाले.

म. म. काणे यांचीं प्रवचनें

त्याच सालीं म. म. पां. वा. ऊर्फ अण्णासाहेब काणे यांचीं चातुर्मास्यांतील प्रत्येक शनिवारीं सायंकाळीं उपनिषदावर प्रवचनें झालीं. उपनिषदाच्या ज्या भागावर त्या दिवशीं प्रवचन व्हावयाचें असेल तो भाग श्रोत्यांना आगाऊ छापून दिला जात असे.

दि. १५-८-४७ हा दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखा आहे. दीडशें वर्षें ब्रिटिशांनीं लादलेल्या पारतंत्र्यांत असलेली आपली ही भरतभूमि स्वतंत्र झाल्याबद्दल आबालवृद्धांना आनंद वाटणें स्वाभाविक होतें. हें स्वातंत्र्य चिरकाल टिकण्यासाठीं त्या दिवशीं परमेश्वराची प्रार्थना करण्यांत आली व तिरंगी राष्ट्रीय निशाण पुष्पहारांनीं मंडित करून सभेच्या दर्शनी भागीं उभारण्यांत आलें.

ब्राह्मण सभेच्या नेहमींच्या प्रथेस अनुसरून या काळांतहि निरनिराळीं स्तोत्रें म्हणणें, वक्तृत्वाच्या व श्रीसूर्यनमस्कारांच्या चढाओढी इत्यादि कार्यक्रम केवळ मुलांसाठीं ठेवण्यांत आले होते व ते नेहमींप्रमाणेंच यशस्वी झाले.

(७) महिला शाखा

१९४२ व नंतर

निरनिराळ्या कामांसाठीं शाखा काढण्याचा अधिकार ब्रा. स. व्य. मं. स आहे. दि. ४–१०–४१ ला ब्रा. स. व्य. मं. नें 'महिला शाखा' सुरू केली. या शाखेंत व्य. मं. वर निवडून आलेल्या महिला, संयोजित सदस्य म्हणून व्य. मं. नें मतदार संघांतून घेतलेल्या महिला, पोटसमित्यांसाठीं तज्ज्ञ म्हणून घेतलेल्या महिला, व अधिकारपरत्वें ब्रा. स. व्य. मं. चे अध्यक्ष व दोन चिटणीस इतक्यांचा या शाखेंत अंतर्भाव होतो.

ब्रा. सभा श्रीमहालक्ष्मी उत्सव साजरा करीत असे. पूर्वी सभेला या कामीं ब्राह्मण भगिनी समाजाचें सहकार्य लाभत असे. दि. २९–११–४२ च्या व्य. मं. च्या प्रस्तावाप्रमाणें १९४३ पासून हा उत्सव महिला शाखेतर्फे साजरा करण्यांत यावा व त्याप्रीत्यर्थ होणारी जमा व लागणारा खर्च त्या शाखेच्या जमाखर्चांत दाखवावा असें ठरलें.

महिला शाखेनें आपला वाढदिवस साजरा करण्याची प्रथा सुरू केली आहे. त्याप्रमाणें १९४२ ते ४७ पर्यंतचे शाखेचे वाढदिवस अनुक्रमें डॉ. सौ. वत्सलाबाई करंजगांवकर, सौ. अवन्तिकाबाई गोखले, सौ. मालिनीबाई परांजपे, श्री. रमाबाई साठे, सौ. सुमतिबाई

गोरे व सौ. रमाबाई फडके यांच्या अध्यक्षतेखालीं साजरे करण्यांत आले.

या शाखेमार्फत शिवणकाम, भरतकाम व हिंदी वर्ग चालू असून त्या वर्गांना अल्पशी फीहि ठेवण्यांत आलेली आहे. त्या फीचा विनियोग त्या त्या वर्गाच्या खर्चाकरितां करण्यांत येतो.

मकरसंक्रांत, श्रीगौरीचें हळदीकुंकू, देवी अहिल्याबाई पुण्यतिथि, आषाढी व कार्तिकी एकादशी इत्यादि प्रसंगीं या शाखेतर्फे समारंभ करण्यांत येतात. श्रीगणेशोत्सवांत केवळ स्त्रियांसाठीं म्हणून जे स्वतंत्र कार्यक्रम असतात त्यांची सर्व व्यवस्था या शाखेमार्फतच ठेवण्यांत येते.

हस्तकौशल्याचें प्रदर्शन

सन १९४४ च्या प्रारंभीं या शाखेतर्फे स्त्रियांच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें तेव्हां १३१ महिलांनीं तयार केलेल्या वस्तू या प्रदर्शनांत ठेवण्यांत आल्या होत्या. या प्रदर्शनाचा उद्घाटन-समारंभ औंधच्या राजकन्या सौ. अक्कासाहेब पंडित यांच्या हस्तें झाला. या प्रदर्शनाचा बक्षीससमारंभ सौ. पार्वतीबाई जोशी यांच्या हस्तें होऊन ४२ भगिनींना गुणानुक्रमानें रोख बक्षिसें देण्यांत आलीं.

शाखेतर्फे सफरी

१९४५ सालीं या शाखेच्या भगिनी श्री. एस्. व्ही. सोवनी यांचा कारखाना व बर्फाची गिरणी पहाण्यास गेल्या होत्या. याच वर्षीं या शाखेच्या भगिनींनीं 'विजय ग्लास वर्क्स' या कारखान्यालाहि भेट दिली होती.

रांगोळ्यांचें प्रदर्शन

१९४७ सालीं या शाखेतर्फे रांगोळ्यांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें. प्रदर्शनांतील ज्या रांगोळ्या उत्कृष्ट ठरल्या त्या काढणाऱ्या भगिनींना बक्षिसें देण्यांत आलीं. या बक्षीससमारंभाचें अध्यक्षस्थान सौ. लीलाबाई भागवत, बी. ए. यांनीं स्वीकारलें होतें.

पारितोषकें मिळविणाऱ्या भगिनी

हवालदार व सप्रे पारितोषकें या शाखेमार्फत दिलीं जावींत असें व्य. मं. नें ठरविलें होतें. त्याप्रमाणें १९४४–४५ सालीं कु. कुसुम केतकर, कु. उषा सहस्रबुद्धे, १९४६-४७ सालीं कु. सुशीला आगाशे व कु. शशिकला जोग यांना हवालदार पारितोषकें देण्यांत येऊन कै. वि. वा. सप्रे पारितोषक कु. नलिनी गोडबोले यांस देण्यांत आलें.

या शाखेतर्फे होणाऱ्या निरनिराळ्या उत्सवप्रसंगीं व्याख्यानें, कीर्तनें व गायनाचे कार्यक्रम झाले. चवथ्या वाढदिवसानिमित्त 'मायेच्या मुली' या नाटिकेचा प्रयोग शाखेंतील भगिनींनीं यशस्वी रीतीनें करून दाखविला.

जमाखर्चाचा तपशील

श्रीमहालक्ष्मी उत्सवाच्या वेळीं खर्च वजा जातां जी रक्कम उरते ती ब्रा. सभा या शाखेला देते. पण तेवढ्याच रकमेंत या शाखेचा खर्च भागत नसल्यामुळें सभेला आणखीहि कांहीं रक्कम शाखेला द्यावी लागते. १९४२–४७ या अवधींत शाखेला किती खर्च आला व त्यापैकीं ब्रा. सभेनें प्रत्यक्ष किती दिला याचा तपशील पुढील-प्रमाणें आहे :—

साल	एकंदर खर्च	ब्रा. सभेची देणगी
१९४२	रु. ३७०-१३-०	१०४–८–०
१९४३	रु. ६५३–२–०	२६७–१–०
१९४४	रु. ५८९–६–६	१८२–०–०
१९४५	रु. ६२३–०–९	१४९-१३-६
१९४६	रु. ५१७–७–९	११३–०–९
१९४७	रु. ७५६–७–०	२३६–३–३
	रु. ३५१०–५–०	१०५२-१०-६



१९४४-४५ चें कार्यकारी मंडळ



नेक नामदार पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेलें सभेच्या कार्यकर्त्यांचें स्नेहसंमेलन

(८) म्हसकर सूतिकागृह व औषधालय

१९४२ व नंतर

सन १९४२ च्या प्रारंभीं हवाई हल्ल्याच्या भीतीनें मुंबईतील बहुतेक भगिनींना बाहेरगांवीं पाठविण्यांत आलें होतें. त्यामुळें ज्या म्हसकर सूतिकागृहांत व औषधालयांत नेहमीं गर्दी असावयाची तेथें जवळ जवळ शुकशुकाट झाला. परंतु हवाई हल्ल्याची भीति दूर होऊन भगिनी पुन्हा मुंबईंत आल्यावर या दोन्ही ठिकाणीं इतकी बेसुमार गर्दी झाली कीं, भगिनींची सोय करतां करतां पुरेवाट झाली !

औषधांच्या किंमतींत इतकी बेसुमार वाढ झाली कीं, नोंद फी रु. १५ ऐवजीं रु. २० करावी लागली व या नव्या योजनेस साधारण सभेची मान्यता मिळाली.

कित्येक भगिनींना ही नोंद फी देणें अशक्य होतें; त्यांस ती पुढीलप्रमाणें माफ करण्यांत आली:—

१९४२–४३	रु. ६७७
१९४४–४५	रु. ८५७
१९४६–४७	रु. ८७५

सूतिकागृहांत आलेले व मंजूर झालेले अर्ज पुढीलप्रमाणें आहेत :—

साल	अर्ज आले	मंजूर झाले
१९४२	३८२	३८२
१९४३	७३५	६७३
१९४४–४५	१५१७	१२०३
१९४६–४७	१३०८	११६४

औषधालयांतहि औषधासाठीं येणारांची संख्या वाढत्या प्रमाणावर दिसते. एखाद्या व्यक्तीनें औषध घेण्यास सुरुवात केली आणि मध्यें कांहीं दिवस खंड पाडून ती पुन्हा औषध घेऊं लागली तर ती संख्या दोन अशी धरून पुढीलप्रमाणें व्यक्तींनीं या औषधालयाचा लाभ करून घेतला असल्याचें दिसून येतें:—

१९४२–४३	३५०००
१९४४–४५	६५०००
१९४६–४७	५०७३२

देवल बंधूंची देणगी

१९४२ सालीं देवल सर्कस मुंबईंत आलेली असतांना देवल बंधूंनीं दादर व मुंबई येथील आपला एकेक प्रयोग सूतिकागृहाच्या मदतीसाठीं ब्राह्मण सभेस दिला. दोन्ही प्रयोगांचें मिळून खर्च वजा जातां उत्पन्न रु. ५०८५ झालें. औषधें व वैद्यकीय उपकरणीं जोंपर्यंत महाग आहेत व ज्ञातीची आर्थिक परिस्थिति निकृष्ट आहे तोंपर्यंत सूतिकागृहाचें कार्य चालवितांना तूट येणें अपरिहार्य आहे.

रु. ३१०० ची देणगी

कुर्ला येथील रंगांचे व रसायनांचे व्यापारी श्री. सीताराम कृष्ण रानडे यांनीं सूतिकागृहाच्या उपयोगाकरितां एक अँब्युलन्स घेण्याकरितां रु. ३१०० ची प्रशंसनीय देणगी दिली.

इतर देणग्या

१९४७ सालीं करमणूक शाखेनें एक लहानसा नाट्योत्सव साजरा केला. त्याच्या उत्पन्नापैकीं रु. ९५१ ची रक्कम त्या शाखेनें चालू खर्चांत येणारी तूट भरून काढण्यासाठीं सूतिकागृहास देणगी म्हणून दिली. त्याच सालीं महिला शाखेनें मिळविलेल्या देणग्या व भाऊबीज आणि स्वयंसेवकांनीं जमा केलेल्या देणग्या मिळून रु. ४०६२ सूतिकागृहाला देण्यांत आले.

सूतिकागृह व औषधालय यांच्या १९४२ ते १९४५ पर्यंतच्या जमाखर्चाकडे पाहिल्यास पुढीलप्रमाणें परिस्थिति दिसून येते:—

साल	जमा	खर्च	तूट	वाढ
१९४२	रु. २९१९३-१४-६	३२२६२-१०-६	३०६८-१२—०	—
१९४३	रु. ५०८९६—२-७	५३१४३-१५-५	२२४७-१२-१०	—
१९४४	रु. ५७८६७-११-६	५९१६४—९-०	१२९६-१३—६	—
१९४५	रु. ६१०५०—२-५	६०८१४—२-९	—	२३५-१५-८

सूतिकागृह व औषधालय यांच्या १९४६-४७ च्या जमाखर्चाकडे पाहिलें तर औषधालयांत बचत होते पण ती बचत सूतिकागृहाकडे उपयोगांत आणली तरी सूतिकागृहांत येणारी तूट भरून येत नसल्याचें दिसतें.

औषधालय

	जमा	खर्च	वाढ
१९४६	रु. २९९६८-१४-३	२२२७२-११-०	७६९६-३-३
१९४७	रु. ३०१७५—६-६	२५२०३-१२-०	४९७१-१०-६

सूतिकागृह

	जमा	खर्च	तूट
१९४६	रु. ४७६८७-१-१	५३६४३-३-३	५९५६-२-२
१९४७	रु. ४४४७२-८-५	५३४०६-२-६	८९३३-१०-१

प्रसूतिशास्त्राची माहिती ब्राह्मण समाजांतील स्त्रियांना व्हावी या उद्देशानें मिड्वाइफ्रीचा वर्ग सूतिकागृहातर्फे चालविण्यांत येत असतो. त्यांतून सन १९४३ अखेर ७० विद्यार्थिनी सदर परीक्षेंत पास झाल्या. या वर्गाच्या परीक्षेचा निकाल जवळ जवळ शंभर टक्के लागतो हें पाहून बॉंबे प्रेसिडेन्सी नर्सिंग कौन्सिलनें या वर्गांत दहा ऐवजीं पंधरा विद्यार्थिनी घेण्याची खास परवानगी दिली आहे. या सहा वर्षांत शिक्षकाचें काम डॉ. कृ. श्री. म्हसकर, डॉ. सौ. काशीबाई साठे व डॉ. शं. ज. जोगळेकर हे करीत असत. प्रसूतिशास्त्राचें शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थिनींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था विनामूल्य करण्यांत येते.

सूतिकागृह व औषधालय डॉ. म्हसकर यांच्याच देखरेखीखालीं चालतात. या काळांतील पहिलीं चार वर्षें डॉ. सौ. शांता बापट यांची सूतिकागृहास विनामूल्य मदत मिळत होती. डॉ. सौ. शांताबाई दोशी (सप्तर्षि) या आपुलकीच्या भावनेनें औषधालयास व सूतिकागृहास मदत करीत असतात.

म्हसकर सूतिकागृहांत आपुलकीनें काम करणाऱ्या डॉ. शांताबाई दोशी (सप्तर्षि) यांच्याविषयीं येथें थोडीशी माहिती देणें अवश्य आहे.

डॉ. शांताबाई दोशी (सप्तर्षि)

डॉ. शांताबाई दोशी १९३५ च्या जानेवारींत एम्. बी., बी. एस्. झाल्या. त्यानंतर एक वर्ष त्यांनीं कामा हॉस्पिटलमध्यें हाऊस सर्जनचें काम केलें. नंतर त्यांनीं जे. जे. हॉस्पिटलमध्यें पोस्टग्रॅज्युएटचा सहा महिन्यांचा कोर्स पुरा केला. डॉक्टरीचें उच्च ज्ञान संपादन करण्यासाठीं १९३६ च्या सप्टेंबर महिन्यांत त्या परदेशीं गेल्या. एडिंबरो येथें एक वर्ष राहून त्यांनीं एफ्. आर. सी. एस्. ची पदवी मिळविली. नंतर त्यांनीं लंडनमधील एका मोठ्या हॉस्पिटलमध्यें कांहीं महिने काम केलें. नंतर कांहीं महिने त्या व्हिएन्ना येथें होत्या. फ्रान्स, जर्मनी, इटाली,

स्वित्झर्लंड वगैरे देशांतील इस्पितळें पाहून १९३८ च्या एप्रिलला त्या हिंदुस्थानांत परत आल्या. त्यावेळीं ब्रा. सभेतर्फे त्यांचा यथोचित सन्मान करण्यांत आला. तेव्हांपासूनच त्या म्हसकर सूतिकागृहांत अगदीं आपुलकीच्या भावनेनें काम करूं लागल्या. ब्रा. सभेजवळच असलेल्या स्वतःच्या मालकीच्या हॉस्पिटलचें किती तरी काम असतांना म्हसकर सूतिकागृहांतील भगिनींचे कष्ट दूर करण्यासाठीं रात्रीचा दिवस करण्यासहि त्या मागेंपुढें पहात नाहींत हें त्यांस खात्रीनें भूषणास्पद आहे. दर सोमवारीं सायंकाळीं ३॥ ते ५ म्हसकर सूतिकागृहांत त्या स्त्रियांना विनामूल्य तपासतात. अशा विद्वान, निरलस व प्रेमळ डॉक्टरीणबाईंचा सहकार लाभला हें म्हसकर सूतिकागृहाचें थोर भाग्य होय.

डॉ. सौ. बापट या १९४६ सालीं बाहेरगांवीं गेल्यामुळें त्यांचें कार्य डॉ. कु. मालती धैर्यवान यांनीं सुमारें नऊ महिने केलें व त्यानंतर डॉ. कु. सरस्वतीबाई वेदान्त या वैद्यकीय तपासणीचें काम करीत असत. हें काम हल्लीं डॉ. कु. ताराबाई ओक या करीत असतात.

डॉ. पी. व्ही. टिळक रक्तदान वगैरेंची अमोल मदत करीत असून डॉ. ह. वि. टिळक, डॉ. रा. गो. मोडक व डॉ. मा. वि. भाजेकर यांचीहि सूतिकागृहास फार मदत होते. डॉ. सौ. काशीबाई साठे यांचा या संस्थेस फार मोठा आधार आहे.

श्री. दुर्गाबाई पेंडसे

सूतिकागृहाच्या स्थापनेपासून तेथें मेट्रन या नात्यानें श्री. दुर्गाबाई पेंडसे या काम करीत असतात. सर्वांशीं प्रेमानें व आदरानें वागून सर्व सूतिकांच्या मनांत सूतिकागृहाविषयीं आपलेपणाची भावना निर्माण करण्याचें कार्य त्यांच्याकडून उत्कृष्टपणें होत असतें. सूतिकागृहांतील टापटीप, स्वच्छता व व्यवस्था यांचें बहुतेक श्रेय त्यांनाच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

(९) म्हसकर सूतिकागृह—अँब्युलन्स

म्हसकर सूतिकागृहाचा व्याप जसजसा वाढत गेला तसतशा त्यांत अनेक सुधारणा कराव्या लागल्या. निरनिराळ्या अनेक उपयुक्त साधनांची त्यांत भर घालावी लागली. म्हसकर सूतिकागृहाला तर अँब्युलन्सची अत्यंत आवश्यकता वाटत होतीच पण अशी एक गाडी समाजासाठीं असावी असें ब्राह्मणवर्गालाहि तीव्रतेनें वाटत होतें. अशी गाडी मिळालीच तर ती सतत कार्यक्षम राहील अशा स्थितींत ठेवणें हेंहि कांहीं खर्चाचें व जिकिरीचें काम होतें.

सरदार बिवलकरांची देणगी

श्री. कृ. सी. रानडे यांनीं या कार्याप्रीत्यर्थ दिलेली रु. ३१०० ची रक्कम सभेजवळ होतीच. सभेनेंहि या कामासाठीं रु. ८००० चा निधि जमविला. पण एवढी रक्कमहि या कामाला पुरेशी नव्हती. श्रीमंत सरदार विनायक धुंडिराज तथा बाबासाहेब बिवलकर, व्य. मं. चे सदस्य डॉ. का. ल. ओक व श्री. भा. स. गद्रे आणि गिरगांव गराजिसचे मालक श्री. दत्तोपंत जोगळेकर यांचें सूतिकागृहाच्या या आवश्यकतेसंबंधीं बोलणें झालें. श्रीमंतांना सूतिकागृहानें चालविलेल्या अत्यंत उपयुक्त कार्याची माहिती होतीच. त्यांनीं 'डॉज' मेकची नवी अँब्युलन्स सूतिकागृहास विनामूल्य देण्याचें आश्वासन दिलें आणि लौकरच ती सभेच्या हवालीहि केली. दिं. १४–२–४९ च्या व्य. मं. च्या

सभेंत या देणगीचा साभार स्वीकार करण्यांत आला. या गाडीची किंमत रु. १०००० हून अधिक आहे.

श्रीमंतांच्या या थोर देणगीमुळें ब्राह्मण ज्ञातीची एक मोठी गैरसोय दूर झाली. परंपरागत चालत आलेल्या धोरणाप्रमाणें या गाडीचा उपयोग ब्राह्मण ज्ञातीस तर होईलच पण दुसऱ्याची उन्नति केल्या-खेरीज आपली उन्नति होणार नाहीं हें ब्रीदवाक्य ब्राह्मण सभेनें हृदयाशीं बाळगलें असल्यामुळें व वेळोवेळीं हें तत्त्व प्रत्यक्ष अंमलांत आणलें असल्यामुळें या गाडीचा उपयोग प्रसंगविशेषीं इतर समाजांनाहि करून देण्यांत ब्राह्मण सभेला आनंदच वाटेल. या गाडींत मुंबईंतील इस्पितळांच्या नियमाप्रमाणें आवश्यक त्या दुरुस्त्याहि करून घेण्यांत आलेल्या आहेत. ब्रा. सभेस मिळालेली ही गाडी व ती सुसज्ज ठेवण्याच्या दृष्टीनें येणारा खर्च यांचा बिचार करतां या कामा-साठीं सभेकडे जमा झालेला निधि अपुराच वाटतो. ही अडचण दूर करण्याच्या दृष्टीनें सभेचे प्रयत्न चालू असून या गाडीचें काम लौकरच धूमधडाक्यानें सुरू होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

(१०) साळवेकर व्यायामशाळा

१९४२ व नंतर

सर्व उपकरणांनीं सुसज्ज अशी ही व्यायामशाळा ब्रा. सभेनें सुरू केली.

१९४२ सालच्या चमत्कारिक परिस्थितीमुळें विद्यार्थ्यांच्या अभावीं या व्यायामशाळेचें काम बंदच पडल्यासारखें झालें होतें. १९४३ सालीं व्यायामशाळेंत येणाऱ्या मुलांच्या संख्येंत वाढ व्हावी म्हणून व्यायाम-शाळेचीं सर्व सूत्रें सुप्रसिद्ध व्यायामपटु रा. धोंडो सखाराम ऊर्फ अण्णा कोपर्डेकर यांच्या स्वाधीन करण्यांत आली. उघड्या जागेची व्यवस्था अद्यापिहि होऊं न शकल्यामुळें व्यायामशाळेची प्रगति फारशी होऊं शकली नाहीं. १९४६ च्या अखेरीस श्री. कोपर्डेकर यांनीं आपला सर्व वेळ दुसऱ्या एका संस्थेस देण्याचें ठरविल्यामुळें सुप्रसिद्ध व्यायामपटु श्री. अच्युतराव तळवलकर व अखिल भारतीय सामन्यांत मल्लखांबावरील प्रावीण्याबद्दल पारितोषक मिळविलेले श्री. मोहिनीराज यांना व्यायामशाळेंत शिक्षक म्हणून नेमण्यांत आलें. पण या नामांकित शिक्षकांच्या शिक्षणाचा लाभ जितके विद्यार्थी घेतील अशी अपेक्षा होती तितक्या विद्यार्थ्यांनीं तो घेतलेला दिसत नाहीं. धकाधकीच्या मामल्यांत टिकून राहून आपल्या स्वत्वाचें रक्षण करावयाचें असेल तर त्याला बुद्धिबलाइतकीच शरीरबलाचीहि आवश्य-कता आहे हें ब्राह्मण समाजाला अजून तितकेंसें पटलेलें दिसत नाहीं.



श्री. गं. वि. गोखले (उपाध्यक्ष, व्य. मं.), श्री. मा. र. सप्रे (खजिनदार), श्री. ज. न. भिडे (कार्यवाह), श्री. प. पां. महाजन (विश्वस्त)
श्री. ब. गं. दाबके (विश्वस्त), डॉ. सी. का. गोखले (विश्वस्त), डॉ. पां. वा. काणे, श्री. ग. गो. नवरे (विश्वस्त), श्री. ना. म. काळे (अध्यक्ष)

श्री. अ. बा. मावळंकर

श्री. ग. शि. रानडे

श्री. ग. रा. गोरे

श्री. के. ग. जोशी

(११) पोटसंघांचें एकीकरण

दि. ९–३–४१ ला मुंबई व उपनगरांतील ब्राह्मणसभांच्या प्रतिनिधींची सभा होऊन एकसूत्रीकरणाची आवश्यकता प्रतिनिधींना पटली व तशा अर्थाचा प्रस्ताव संमत होऊन तो निरनिराळ्या संस्थांच्या व्य. मं. च्या मान्यतेकरितां सर्व संस्थांकडे पाठविण्यांतहि आला. या प्रयत्नाचा जितक्या तांतडीनें विचार होणें आवश्यक होतें तितक्या त्वरेनें तो न झाल्यामुळें तें काम तेथेंच स्थगित झालें.

पोटसंघांच्या एकीकरणाच्या बाबतींत पुन्हा एकदां प्रयत्न करून पहावा म्हणून दि. २५–२–४८ ला ब्रा. सभा व इतर पोटसंघ यांच्या प्रतिनिधींची एक सभा घेण्यांत आली. बऱ्याचशा विचारविनिमयानंतर सर्व पोटसंघांचें एकीकरण व सदृश संस्थांचें एकसूत्रीकरण करणें अत्यंत जरुरीचें आहे या तत्त्वाला सर्व पोटसंघांनीं मान्यता द्यावी असा प्रस्ताव या सभेंत संमत होऊन तो मतप्रदर्शनार्थ प्रत्येक पोटसंघाकडे पाठविण्यांतहि आला. पण त्यापुढें या संबंधांत अधिक प्रगति झाल्याचें दिसत नाहीं. पोटसंघांकडून वरील प्रस्तावाला रीतसर संमति अद्यापि मिळालेली नाहीं याचा अर्थ ब्राह्मण समाजाला सद्यःस्थितीची पुरेपूर जाणीव झालेली दिसत नाहीं असाच करावा लागेल.

(१२) धान्यपुरवठा योजना

१९४२ सालीं महायुद्ध ऐन जोरांत आलें होतें. अन्नधान्याची व वस्त्रप्रावरणांची भयंकर टंचाई भासूं लागली होती. तिप्पट नि चौपट पैसे देऊनसुद्धां रोजच्या गरजेच्या वस्तू मिळण्याची पंचाईत पडूं लागली. साध्या साखरेसारख्या वस्तूसाठीं तासन् तास उन्हातान्हांत उभें रहावें आणि अर्धी रांग संपण्यापूर्वीच दुकानदारानें साखर संपल्याच्या सबबीखालीं दुकानाचें दार बंद करून टाकावें अशीं केंविलवाणीं दृश्यें मुंबईत प्रत्यहीं दिसूं लागलीं. सरकारनें कांहीं आवश्यक वस्तूंवर नियंत्रणें बसविलीं पण नफेबाजीला ऊत आला. तेव्हां १९४२ सालच्या ऑगस्टच्या सुमारास त्यावेळच्या सरकारनें सामाजिक काम करणाऱ्या सार्वजनिक संस्थांनीं सहकारी तत्त्वावर दुकानें काढून योग्य किंमतीला जिन्नसांची विक्री करावी असें जाहीर रीतीनें सुचविलें. दुकानांवर देखरेख रहाणें इष्ट वाटल्यावरून घाऊक व किरकोळ विक्रीचीं दुकानें असे दोन प्रकारचे परवाने सरकारकडून ठेवण्यांत आले होते.

अशा वेळीं आपल्या समाजांतील बंधुभगिनींचे हाल चुकविण्याकरितां या बाबतींत जें कांहीं करतां येणें शक्य असेल तें करण्याचा आ. सभेनें निश्चय केला.

धान्यपुरवठ्याचें दुकान

ब्रा. स. व्य. मं. नें दि. २३, २५ व ३० ऑगस्टला या प्रश्नाची चर्चा केली व धान्यपुरवठ्याचें दुकान काढावयाचें ठरलें. दि. ६-९-४२ च्या साधारण सभेंत व्य. मं. चा 'धान्यपुरवठ्याचें दुकान सुरू करावें व त्यासाठीं रु. १०००० मंजूर करावे' हा प्रस्ताव बहुमतानें संमत झाला.

परशुराम पॉटरी वर्क्सचे मालक श्री. प. ब. गणपुले यांनीं आपल्या कारखान्यांतील दुकानाची हकीकत सांगितली आणि असें दुकान काढण्याच्या योजनेस जोराचा पाठिंबा दिला.

दि. १३-९-४२ च्या व्य. मं. च्या सभेंत स्वस्त धान्यदुकाना-संबंधीं सर्व व्यवस्था करण्याकरितां एक पोटसमिति नेमण्यांत आली व घाऊक आणि किरकोळ असे दोन्ही प्रकारचे परवाने घेण्यांत येऊन या दुकानाच्या उद्घाटनाचा समारंभ दि. २३-९-४२ ला झाला.

त्यावेळीं सरकारनें शिधापद्धति अंमलांत आणलेली नव्हती. पनवेल, कल्याण, भिवंडी वगैरे ठिकाणांहून तांदुळांच्या गोणी शेंकड्यांनीं खरेदी करण्यांत आल्या. साखर मात्र अशा मोठ्या प्रमाणांत मिळेचना. तांदूळ, सर्व प्रकारच्या डाळी, पोहे, गूळ, कांहीं प्रमाणांत साखर वगैरे आवश्यक वस्तू दुकानांत ठेवण्यांत येऊन त्या व्यवस्थेशीर वाटण्याचें काम सुरू झालें. ब्रा. सभेनें समाजसेवेचा एक नवा उपक्रम चालू केला.

कमिटी नेमली

या कामीं त्या वेळचे चिटणीस सॉ. गं. वि. गोखले व श्री. कृ. सी. पिटकर यांनीं कसून मेहनत घेतली व या कामासाठीं एक कमिटी स्थापन केली. या कमिटींत श्री. रघुनाथराव आपटे, श्री. ज. स. करंदीकर, श्री. त्र्यं. सी. गोखले, श्री. ना. वि. वेलणकर, श्री. वा. ना. बापट,

श्री. वा. ह. लेले, श्री. ना. कृ. शहाणे, श्री. ह. ज. वेलणकर, श्री. वि. भि. लळित; श्री. पु. म. भागवत व श्री. ग. धों. बोडस ही मंडळी होती.

ही समिति फार मोठी असल्यामुळें विचारविनिमयाच्या वेळीं थोडीफार अडचण पडूं लागली. म्हणून यांतीलच जीं माणसें प्रत्यक्ष मेहनत करूं शकतील अशांची एक लहानशी पोटसमिति नेमण्यांत आली; व कांहीं झालें तरी दोनतीन महिने दुकान चालवून त्यांत तोटा आल्यास तो आपणच आपसांत भरून काढूं अशा निश्चयानें त्या समितीनें आपलें काम जोरांत सुरू केलें. त्यावेळीं ब्राह्मण समाजांतील व्यापारी मंडळीनेंहि चांगलें सहकार्य केलें.

तात्यासाहेब डोंगरे यांचें साहाय्य

सॉ. गोखले, श्री. कृ. सी. पिटकर व श्री. राजाभाऊ गोरे यांनीं फारच परिश्रम घेऊन दुकान चालविण्याच्या कामीं विलक्षण चिकाटी दाखविली आणि त्यामुळें ही योजना यशस्वी झाली. या कामीं स्वयंसेवक शाखेनेंहि योग्य तो भाग उचलला. धा. पु. योजना दुकानाचें काम लोकांस पटून तें दिवसेंदिवस वाढत आहे असें पाहून ब्राह्मण समाजांतील श्रीमंत मंडळीहि निःस्वार्थ बुद्धीनें यांत भाग घेऊं लागली. श्रीमंत दि. कृ. ऊर्फ तात्यासाहेब डोंगरे यांनीं आपली मोटार या कामासाठीं फुकट वापरण्यास दिली इतकेंच नव्हे तर ते स्वतःहि या कामांत स्वयंसेवकांच्या बरोबरीनें खपूं लागले. त्यानंतर सरकारदरबारीं व व्यापारीवर्गांत जेथें जेथें त्यांचा उपयोग होण्यासारखा होता तेथें तेथें त्यांनीं उत्तम प्रकारची मदत केली.

हिशेबाची नवी पद्धत

दुकानाच्या कामाचा पसारा ज्या मानानें वाढूं लागला त्या मानानें हिशेब लिहिण्याचें वगैरे कामहि अधिक कठीण होऊं लागलें.

या कामाला तज्ज्ञ मनुष्यच हवा होता. पण सुदैवानें ही अडचणहि दूर झाली. गिरगांव रस्त्यावरील मेसर्स पी. आर. जोशी कंपनीच्चे मालक श्री. केशव रामचंद्र जोशी यांनीं ही गोष्ट मनावर घेतली व तेव्हांपासून ते या दुकानांच्या हिशेबांचें काम वेळचे वेळीं बिनचूक करीत असतात. त्यांच्या जमाखर्चाच्या पद्धतींत विशेष हा कीं, या दुकानाच्या खरेदी विक्री खर्च वगैरे व्यवहाराचा आढावा वर्षअखेर काढण्याऐवजीं दरमहा काढला जात असे. त्यामुळें दुकानाची सांपत्तिक परिस्थिति काय आहे हें दर महिन्याला समजूं लागलें.

या शाखेचा पहिला वाढदिवससमारंभ दि. ७–११–४३ ला श्री. ब. शं. दाबके यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. वर्षाअखेरीला दुकानांत जो फायदा झालेला दिसला त्यांतील कांहीं रक्कम कायम निधि म्हणून बाजूला काढण्यांत येऊन बाकीची रक्कम चालू खर्चासाठीं उपयोगांत आणण्याचें ठरलें.

शिधापद्धतीनंतर

त्यानंतर सरकारनें शिधापद्धति अंमलांत आणली त्यावेळीं या दुकानांत ३५२ कार्डें नोंदलीं गेलीं. पुढें हें कामहि दुकान अत्यंत व्यवस्थित रीतीनें करतें हें पाहिल्यावर कार्डांची संख्या वाढूं लागून अखेर ती १४००–१५०० पर्यंत गेली व तीं सर्व आजतागायत चालू आहेत.

दक्षतेचें फळ

दि. ६–९–४२ च्या साधारण सभेंत धा. पु. दुकानाकरितां रु. १०००० ची मंजुरी मागण्यांत आली त्यावेळीं श्री. पां. वा. काणे यांनीं या कामासाठीं रु. ५००० हून अधिक रक्कम लागणार नाहीं व तेवढ्याच रकमेला सभेची मंजुरी घ्यावी असें सुचविलें होतें; आणि हाच त्यांचा कयास बरोबर ठरला. साधारण सभेनें या कामासाठीं रु. १०००० गुंतविण्याची परवानगी दिली पण दुकानांत रु. ५००० पेक्षां अधिक

भांडवल गुंतविण्याची गरज पडली नाहीं. अर्थात् याचें श्रेय दुकानाच्या चालकांच्या दक्षतेलाच आहे. आतां तर दुकानाचें कायम भांडवल रु. ५००० व फिरतें भांडवल रु. ५००० असें स्वतःचें झालेलें आहे.

शिधापद्धतींत अंतर्भूत झालेल्या वस्तूंच्या विक्रीचें काम व्यवस्थितपणें चालू झाल्यावर इतर वस्तूहि चांगल्या व स्वस्त विकण्याचें काम सुरू करण्यांत आलें.

मोबदल्याची व्यवस्था

धा. पु. योजना दुकानासाठीं ब्रा. सभेच्या 'शंकरवाडीची जागा वापरली जाई व रक्कम विद्यार्थी सहाय्यक शाखेची उपयोगांत येई. याचा मोबदला म्हणून पुढीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली:—

'दुकानामुळें सभेला भरावा लागणारा नगरपालिकेचा कर, दिवाबत्ती खर्च, दुकानाच्या जागेला कराव्या लागणाऱ्या तेलाच्या रंगाचा खर्च, व इतर जागेला होणारा साध्या रंगाचा खर्च या सर्व गोष्टी दुकानांत होणाऱ्या नफ्यांतून भागवाव्या. विद्यार्थी सहाय्यक शाखेची रक्कम दुकानासाठीं वापरण्यांत आली म्हणून त्या शाखेला त्या रकमेवर दरसाल दर शेंकडा सहा रुपयेप्रमाणें व्याज दुकानांत होणाऱ्या नफ्यांतून द्यावें.'

भाजेकर हॉस्पिटल, म्हसकर सूतिकागृह, डॉ. सप्तर्षि हॉस्पिटल, टिळक–कैकिणी हॉस्पिटल, डॉ. काशीबाई साठे हॉस्पिटल यांचीं कार्डें या दुकानांतच आहेत. या दुकानाचें काम अत्यंत समाधानकारक आहे असे शेरे रेशनिंग इन्स्पेक्टर्स व ऑफिसर्स यांच्याकडून वेळोवेळीं मिळालेले आहेत.

दुकानाच्या मालकीचें भांडवल

या शाखेच्या सभा वर्षांतून निदान आठदहा तरी होतात. या शाखेनें खरेदीविक्री समिति नेमली असून त्यांतील तीनचार सभासदांवर

दुकानाचें सर्व काम सोंपविलें आहे व तें आजतागायत व्यवस्थितपणें चालू आहे. १९४७ अखेर या शाखेनें सभेकडून घेतलेलें कर्ज व्याजासह फेडून स्वतःचें पांचसहा हजारांचें भांडवल केलेलें दिसतें.

१९४२ च्या ऑक्टोबरपासून सन १९४८ डिसेंबर अखेर रु. ३७१४११ इतका दुकानाचा व्यवहार झाला. त्यापैकीं रु. १५३५२ खर्च झाला व रु. ९२८२ मालरूपानें व रोख मिळून शिलकीं पडले. खर्च रु. १५३५२ पैकीं दरसालचा नगरपालिकेचा कर, दिवाबत्ती खर्च, रंगरंगोटीचा खर्च व स्वतःचें असें भांडवल होईपर्यंत सभेच्या रकमेवरील व्याज मिळून धा. पु. योजना दुकानाकडून रु. ३२७० ब्रा. सभेला मिळाले.

ब्राह्मण सभा प्रसंग पडेल त्याप्रमाणें समाजाची सेवा करण्यास तयार असते हें या धान्यपुरवठा योजनेमुळें पुन्हा एकदां सिद्ध झालें.

(१३) राजाराम भास्कर पानवलकर ग्रंथालय

ज्ञानप्राप्ति होऊन ज्ञानप्रसार व्हावा असा ब्रा. सभेच्या उद्देशांतील एक भाग आहे. ज्ञानप्राप्ति व ज्ञानप्रसार यांचें एक साधन म्हणून एक सुंदर वाचनालय व ग्रंथालय असावें, विशेषतः भरत-खंडाची कीर्ति ज्या तत्त्वज्ञानाबद्दल आजसुद्धां अखिल जगांत दुमदुमत आहे त्या तत्त्वज्ञानासंबंधींचे ग्रंथ अशा ग्रंथालयांत असावेत ही ब्राह्मण सभेची फार वर्षांपासून इच्छा होती. श्रीशंकरवाडीच्या मागील बाजूस असलेली चारमजली इमारत बांधावयाची ठरली तेव्हां व्यायाम-शाळेसाठीं तळ मजला व तत्त्वज्ञानमंदिरासाठीं पहिला मजला अशी आंखणी करण्यांत आलेली होती, व त्याप्रमाणें पहिल्या मजल्यावर विशेष प्रकारच्या लादीचाहि उपयोग करण्यांत आला होता. श्री. ग. वि. तथा बाबूराव साळवेकर यांनीं सभेला रु. १५००० ची देणगी आपल्या पूज्य वडिलांचे स्मरणार्थ देऊं केली त्यापैकीं रु. १०००० व्यायामशाळेसाठीं दिले व बाकीच्या रकमेबद्दल त्यांच्या व व्य. मं. च्या संमतीनें निराळी योजना आंखण्यांत यावी असें ठरलें. मात्र धर्म व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथालयाच्या मदतीकरितां दुसऱ्या कोणाचें नांव देण्याचा प्रश्न आल्यास आपणाला प्रथम तसें कळविण्यांत यावें व मगच त्याबद्दल काय तें पक्कें ठरवावें असें श्री. बाबूराव साळवेकर यांनीं व्य. मं. स सुचवून ठेवलें होतें. ब्रा. सभेनें हातीं घेतलेल्या

सौ. मालती सप्रे, सौ. शकुंतलाबाई जोशी, सौ. रमाबाई साठे

श्री. वा. भा. जोशी

श्री. अ. भा. मराठे

कै. सौ. यमुनाबाई आपटे श्रीमंत वामन श्रीधर आपटे

कै. रावबहादुर वा. प. करंदीकर

कै. श्री. रा. भि. पानवलकर

अनेक निकडीच्या कामांमुळें तत्त्वज्ञानमंदिराचें काम लांबणीवर पडत चाललें आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं, कांहीं कालावधीनंतर श्री. बाबूराव साळवेकर हे निधन पावले.

तत्त्वज्ञानमंदिरासाठीं म्हणून जी जागा बांधण्यांत आली होती तिचा उपयोग प्रथम व्यायामशाळेंतील मुलांसाठीं करण्यांत येत असे. त्यानंतर त्या जागेंतील निम्मा भाग औषधालयाच्या उपयोगासाठीं द्यावा असें व्य. मं. नें ठरविलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं ही बहुतेक जागा सूतिकागृह, औषधालय व तदनुषंगिक कार्यासाठीं वापरण्यांत येऊं लागल्यामुळें ग्रंथालयाचें काल्पनिक स्थान करंदीकर सभागृहांत योजण्यांत आलें.

श्री. दादासाहेब पानवलकर

श्री. राजाराम भास्कर तथा दादासाहेब पानवलकर यांचा ब्रा. सभेवर अतिशय लोभ होता. ब्रा. सभेंतील श्री. अं. गो. पुणतांबेकर, श्री. का. वि. खानविलकर इ. कार्यकर्त्यांशीं त्यांचा अकृत्रिम स्नेह होता. श्री. दादासाहेब मोठे उद्योगी, प्रसिद्धिपराङ्मुख व उदारमतवादी गृहस्थ होते. त्यांनीं यूरोप–अमेरिकेचा प्रवास केलेला होता. आपल्या 'ऑनेस्टी' कंपनीला त्यांनीं मानाचें स्थान मिळवून दिलेलें होतें. ते सार्वजनिक कार्याला सढळ हातानें मदत करीत असत. ते जसे उद्योगी तसेच जिज्ञासु वाचक होते. स्वतःच्या आवडीच्या अनेक ग्रंथांचा संग्रह त्यांनीं केलेला होता. आपल्या पश्चात् सदर ग्रंथसंग्रह ज्यास्तींत जास्त लोकांच्या उपयोगीं पडावा अशी इच्छा त्यांनीं दर्शविली होती व तसें त्यांनीं श्री. पुणतांबेकर यांचेजवळ बोलूनहि दाखविलें होतें. हें समजल्याबरोबर ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळानें त्यांची भेट घेतली व हा ग्रंथसंग्रह ब्रा. सभेस मिळाल्यास त्याचा किती अमोल उपयोग होईल याचें त्यांनीं त्यांच्याशीं विवरण केलें. दुर्दैवानें पुढें लौकरच श्री. दादासाहेब कालवश झाले.

ग्रंथांची देणगी

कै. दादासाहेबांचे जामात श्री. गोपाळकृष्ण विनायक चिरमुले व पुतण्ये श्री. मनमोहन रामचंद्र पानवलकर यांनीं दादासाहेबांच्या पत्नीच्या अनुमतीनें दि. २०-५-४७ ला ब्रा. सभेस पत्र लिहून कै. दादासाहेबांच्या स्मरणार्थ त्यांचा मौल्यवान ग्रंथसंग्रह देणगी म्हणून सभेच्या स्वाधीन करण्याची इच्छा प्रकट केली. व्य. मं. च्या दि. २४-५-४७ च्या सभेंत ही देणगी साभार स्वीकारण्यांत आली व हा मौल्यवान ग्रंथसंग्रह ग्रंथालय चालविण्यासाठीं श्री. गोपाळकृष्ण विनायक चिरमुले यांनीं ब्रा. सभेच्या स्वाधीन केला. या संग्रहांत निवडक नाटकें, कादंबऱ्या, चरित्रपर ग्रंथ यांबरोबर औद्योगिक व शास्त्रीय ग्रंथांचा भरणाहि भरपूर होता. हे सर्व ग्रंथ व्यवस्थित लावून ग्रंथालय प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत कांहीं काळ लोटणें अपरिहार्य होतें.

उद्घाटनसमारंभ व देणगी

ब्रा. स. व्य. मं. नें एक ग्रंथालयसमिति नेमली व या ग्रंथालयाचा उद्घाटनसमारंभ दि. ४-७-१९४८ ला सुप्रसिद्ध विद्वान म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या हस्तें करण्यांत आला. या दिवशींचें वैशिष्ट्य म्हणून श्री. गोपाळकृष्ण विनायक चिरमुले यांनीं ब्रा. सभेस रु. ५००० ची देणगी दिली. या समारंभाच्या वेळीं प्रा. न. र. फाटक व म. म. अण्णासाहेब काणे यांचीं भाषणें झालीं. ब्राह्मण्य ही एक संस्कृति आहे आणि प्रागतिक विचारांचें स्वागत करून समाजचक्राला गति देण्याचें काम वेळोवेळीं ब्राह्मणवर्गाच्या नेत्यांनीं केलेलें आहे असें प्रा. फाटक यांनीं सांगितलें. म. म. काणे म्हणाले कीं, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिक्य हीं ब्राह्मणाचीं कर्में आहेत आणि ग्रंथालय हें एक विश्वविद्यालय आहे. अध्यक्ष म. म. दत्तो वामन पोतदार यांनीं आपल्या स्फूर्तिदायक भाषणांत सांगितलें कीं, वाण्याची निशाणी

जशी तराजू तशी ब्राह्मणाची निशाणी पुस्तक आहे. ब्राह्मणत्व हें सत्त्व आहे. पूर्वीचे निर्बंध आणि प्रतिबंध सोडून ब्राह्मणत्व व्यापक झालें पाहिजे. विद्या हा ब्राह्मणाचा आत्मा आहे. विद्येचा हा अग्नि सतत तेवत ठेवावा. संकटें येतील व जातील परंतु या अग्नींतून सदैव तेजच उत्पन्न होत राहील.

यानंतर या ग्रंथालयाचें ' राजाराम भास्कर पानवलकर औद्योगिक ग्रंथालय ' हें नांव घोषित करून अध्यक्षांनीं कै. दादासाहेबांच्या तैल-चित्राचें अनावरण केलें.

(१४) ब्राह्मणसभा हीरकमहोत्सव

१९३८ सालीं ब्राह्मण सभेला ५० वर्षें पूर्ण झालीं म्हणून सुवर्णमहोत्सव साजरा करावयाचें ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें आराखडाहि तयार करण्यांत आला. पण यूरोपांतील महायुद्ध सुरू झालें आणि ही कल्पना स्थगित करण्यांत आली.

१९४८ सालीं ब्रा. सभेला साठ वर्षें पूर्ण होत असल्यामुळें सभेचा हीरकमहोत्सव मोठ्या थाटामाटानें साजरा करावा अशा अर्थाचें व्य. मं. च्या श्री. द. शं. देवधर आदिकरून पांच सदस्यांचें पत्र दि. ४–१०–४५ ला व्य. मं. स आलें. त्यावर विचार होऊन व्य. मं. नें एक समिति नेमली. या समितीनें निरनिराळ्या सदस्यांकडून आलेल्या सूचनांचा विचार करून एक अहवाल तयार केला.

१०५ जणांची समिति

दि. १–१२–४६ च्या व्य. मं. च्या सभेंत या अहवालाचा व व्य. मं. वरील सदस्यांच्या वैयक्तिक पत्रांचा विचार झाला व एक हीरकमहोत्सव समिति नेमण्यांत आली. हीरकमहोत्सवास साधारण सभेची मान्यता मिळविण्यासाठीं दि. ५–१–४७ ला साधारण सभा भरविण्यांत आली. या सभेंत व्य. मं. ची योजना पसार झाली आणि हीरक महोत्सव समितीवर काम करण्यासाठीं आणखी कांहीं नांवें सुचविण्यांत आलीं.

व्य. मं. नें त्या नांवांस आपली मान्यता दिली. हीरक महोत्सव समितीवर आतां १०५ नांवें दाखल झालीं आणि या समितीचे चिटणीस म्हणून श्री. मा. रा. नवांगुळे यांची निवड झाली. दि. १४–२–४७ ला या समितीची पहिली सभा झाली व त्या सभेंत मुंबईतील ब्राह्मण समाजाची पहाणी करावी व त्याप्रीत्यर्थ रु. २००० खर्च करावे असें ठरलें. दुसऱ्या एका ठरावानें सभेचा साठ वर्षांचा इतिहास लिहिण्याची श्री. अण्णासाहेब काणे यांस विनंति करावी, माहिती संकलित करण्याचें काम श्री. मा. रा. नवांगुळे, श्री. अं. गो. पुणतांबेकर व श्री. वा. रा. गुळवणे यांनीं करावें व या ग्रंथाप्रीत्यर्थ रु. २००० खर्च करावा असें ठरलें.

निरनिराळ्या समित्या

याशिवाय रुग्णालयाप्रीत्यर्थ एक लक्षाचा निधि जमवावा, ब्राह्मण संस्थांचें एकसूत्रीकरण करावें आणि एक औद्योगिक वाचनालय स्थापन करावें अशा सूचना पसार होऊन पुढील विविध समित्या नेमण्यांत आल्या. त्या त्या समित्यांच्या चिटणीसांचीं नांवें कंसांत दिलीं असून त्या समितींतील सदस्यांची संख्याहि त्याच कंसांत देण्यांत आलेली आहे.

(१) देखरेख समिति (श्री. मा. रा. नवांगुळे व श्री. प्र. पां. जोशी; संख्या ११) (२) निधि समिति (श्री. भा. वि. गोडबोले व श्री. एस्. जे. जोगळेकर; संख्या १९) (३) प्रसिद्धि समिति (श्री. ज. न. मिडे; संख्या ६) (४) पहाणी समिति (श्री. वि. वा. जोशी, श्री. न्यं. ल. गटणे व श्री. मा. र. सप्रे; संख्या १९) (५) इतिहास समिति (श्री. मा. रा. नवांगुळे; संख्या ९) (६) पोटसंघ एकीकरण समिति (श्री. मा. रा. नवांगुळे; संख्या १०) (७) व्यायाम समिति (श्री. भ. द. सोहनी; संख्या ११) (८) इमारत समिति (श्री. मा. रा. नवांगुळे; संख्या १६) (९) औद्योगिक समिति (श्री. वि. स. पालकर

व श्री. त्र्यं. य. फडके; संख्या २२) (१०) रुग्णालय समिति (श्री. मा. रा. नवांगुळे; संख्या १६) (११) पतपेढी समिति (श्री. वि. स. पालकर व श्री. त्र्यं. य. फडके; संख्या १२) (१२) शिक्षण समिति (श्री. प्र. स. जोशी व श्री. कृ. मो. भाटवडेकर; संख्या १८)

त्यानंतर सर्व समित्यांनीं कामास त्वरित प्रारंभ करावा व देखरेख समितीनें सर्व समित्यांच्या कामावर नजर ठेवावी आणि एखाद्या समितीचें काम मंदावलेलें दिसलें तर त्या समितीला चालना देण्याचें काम करावें असें ठरलें. हीरक महोत्सव समितीवरील सदस्यांची संख्या फार मोठी असल्यामुळें त्या समितीच्या सभा बोलावणें व निर्णय घेणें यांत काळाचा अपव्यय होईल म्हणून त्या समितीचें सर्व काम देखरेख समितीनेंच करावें असें ठरलें.

दि. १९–२–१९४७ व दि. १४–११–१९४८ या दोन दिवशीं हीरक महोत्सव समितीच्या सभा झाल्या. पहाणी–समितीच्याहि कांहीं सभा होऊन त्या समितीच्या कामास सुरुवातहि झाली. दि. २४-१-४८ ला देखरेख समितीची सभा झाली. त्या सभेंत, हीरक महोत्सवाचें काम अधिक उत्साहानें करावें असें ठरलें.

१९४७ अखेर सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन खालील कामासाठीं विशेष योजना करण्यांत आल्याचें व्य. मं. नें आपल्या इतिवृत्तांत नमूद केलें आहे.

ब्रा. सभेचा साठ वर्षांचा इतिहास लिहिण्याचें काम श्री. वा. रा. गुळवणे यांनीं करावें व या कामीं त्यांना श्री. वा. वा. गद्रे व श्री. वि. कृ. जोशी यांनीं मदत करावी असें ठरलें.

डॉ. मा. वि. भाजेकर यांची देणगी

परदेशशिक्षण निधि मोठ्या प्रमाणांत जमा करावा व या निधींतून उत्साही व होतकरू विद्यार्थ्यांना परदेशीं पाठवून शास्त्रीय, धंदेविषयक

वगैरे शिक्षण मिळविण्याकरितां त्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत याव्या. औद्योगिक शिक्षण देशांतल्या देशांतहि मिळणें शक्य आहे व त्यासाठींहि एक मोठा निधि जमविण्यांत यावा. (डॉ. मा. वि. भाजेकर यांस ही योजना पसंत पडली व त्यांनीं आपल्या वडिलांचे स्मरणार्थ रु. ५००० ची देणगी देऊन या अत्यंत उपयुक्त अशा कामाचा शुभारंभ केला.)

रुग्णालयासंबंधींचे प्रयत्न चालू आहेत.

ब्राह्मण संस्थांचें एकसूत्रीकरण करण्याची योजना तयार करण्यांत आली असून ती मान्य करण्यांत आल्यास हें कार्य यशस्वी होईल असा भरंवसा वाटतो.

समाजाची पहाणी करण्याचें काम अपरिहार्य अडचणीमुळें स्थगित करण्यांत आलें आहे.

(१५) अस्पृश्यतानिवारण

अस्पृश्यतेचा प्रश्न हाताळावयाचा तर ब्रा. सभेपुढें तीन मार्ग होते.

एक मार्ग म्हणजे ज्या अध्यक्षांनीं अस्पृश्यतेसंबंधींचा ठराव नियमबाह्य ठरविला त्यांच्याविरुद्ध निंदाव्यंजक ठराव साधारण सभेंत पसार करून घेणें. दुसरा मार्ग न्यायालयांत जाऊन हा प्रश्न धसाला लावणें आणि तिसरा मार्ग म्हणजे साधारण सभेच्या दुसऱ्या एखाद्या अध्यक्षाकडून तो नियमबाह्यतेचा निर्णय बदलून घेणें. यांपैकीं तिसऱ्या मार्गाचा अवलंब करणेंच श्रेयस्कर होय असें अध्यक्षांचा तो नियमबाह्यतेचा निर्णय चुकीचा आहे असें समजणाऱ्या श्री. मा. र. सप्रे प्रभृति मंडळींनीं ठरविलें. जुलै १९४६ मध्यें प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांची साधारण सभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. ही योग्य संधि मिळतांच श्री. वा. रा. गुळवणे यांनीं अस्पृश्यांसंबंधींचा प्रस्ताव आपण १९४६ च्या डिसेंबर महिन्यांत होणाऱ्या साधारण सभेंत मांडणार असल्याची रीतसर सूचना ब्रा. स. व्य. मं.स दिली. व्य. मं. नें आपल्या दि. ८–१२–४६ च्या सभेंत या सूचनेचा विचार केला आणि कोणत्याहि प्रकारें आपलें मत व्यक्त न करतां हा प्रश्न साधारण सभेकडे सोंपवावा असें ठरविलें.

ही साधारण सभा दि. २२–१२–४६ ला झाली. सभेपुढील कामें पहातां या महत्त्वाच्या प्रस्तावाची चर्चा अगोदर होणें इष्ट व आवश्यक

कै. ले. क. अ. वा. गजेंद्रगडकर

श्री. मा. र. सप्रे

सॉ. गं. वि. गोखले

श्री. मा. रा. नवांगुळे

श्री. द. शं. देवधर

आहे म्हणून हा प्रस्ताव अगोदर मांडण्याची परवानगी द्यावी अशी श्री. गुळवणे यांनीं अध्यक्षांना विनंती केली. अध्यक्षांनीं उपस्थित सभासदांचीं मतें घेऊन बहुमतानें दिलेल्या निर्णयाप्रमाणें श्री. गुळवणे यांना आपला प्रस्ताव सभेपुढें मांडण्यास सांगितलें. श्री. गुळवणे यांनीं पुढील प्रस्ताव सभेपुढें मांडला :—

"खालील नियम, नियम ६ अ समजावा :—

"नियम ६ अ–ब्राह्मण सभेमार्फत होणाऱ्या सार्वजनिक उत्सवसमारंभ, व्याख्यान, वगैरे प्रसंगीं ब्राह्मणेतर अखिल हिंदुसमाजास उच्चनीच, स्पृश्यास्पृश्य इत्यादि भेदभाव न मानतां, उपस्थित रहाण्यास मोकळीक राहील."

ब्राह्मण लोकांत ऐक्य व प्रेम वाढावें व ज्ञातिहिताचीं कामें करावीं अशा उद्देशानें निघालेल्या सभेला अशा प्रस्तावाचा विचार करतां येतो काय ? तसेंच, या प्रस्तावानें ब्राह्मण सभेच्या चिटणीसांस नियमान्वयें दिल्या गेलेल्या अधिकारांवर अतिक्रमण होत नाहीं काय ? अशा अर्थाचा पॉइंट ऑफ ऑर्डर श्री. द. शं. देवधर व सॉ. गं. वि. गोखले यांनीं उपस्थित केला. अध्यक्षांनीं ब्राह्मण सभेची घटना, उद्देश व नियम, तसेंच, १९२७ व १९३९ या वर्षीं असेच प्रश्न उपस्थित झाले असतांना त्या वेळच्या अध्यक्षांनीं दिलेले निर्णय व त्यावेळीं झालेल्या साधारण सभांचीं इतिवृत्तें या सर्वांचा साकल्यानें विचार केला आणि खालीलप्रमाणें आपला निर्णय दिला व हा प्रस्ताव ब्रा. सभेची घटना, उद्देश व नियम यांना धरून आहे असें जाहीर केलें.

प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर यांचा निर्णय

"सदर ठराव ब्राह्मण सभेच्या उद्देशांशीं किंवा हेतूंशीं विरोधी नाहीं इतकेंच नव्हे तर तो सभेच्या उद्देशांत अंतर्भूत आहे. अशा अर्थाचा ठराव दि. २८–८–१९२७ व दि. ९–९–१९२७ या दोन

जादा साधारण सभांत मांडला गेला होता. यावरून हा विषय आपल्या कक्षेंत येतो असाच साधारण सभेचा निर्णय असल्याचें सिद्ध होतें. पैकीं दि. २८-८-२७ च्या सभेचे अध्यक्ष श्री. माधवराव भट यांनींहि 'हा प्रश्न नियमांत येतो' असा आधला निर्णय दिला होता, हें, मी त्यांच्या अगदीं जवळच बसलों असल्यामुळें मला नक्की माहीत आहे. त्या अध्यक्षांचा तो निर्णय मी मान्य करतों. दि. ८-१०-२९ च्या जादा साधारण सभेचे अध्यक्ष श्री. श्री. य. अभ्यंकर यांनीं 'अशा प्रकारचा ठराव नियमबाह्य आहे' असा निर्णय दिला होता. तो निर्णय प्रमादित असल्यामुळें आजच्या माझ्या निर्णयानें त्यांचा तो निर्णय मी रद्द करीत आहें. सभेच्या घटनेंत '३ उद्देश या सदराखालीं 'परस्परांस व इतरांस' यांपैकीं 'इतरांस' म्हणजे 'सर्व ब्राह्मणेतरांस' असाच माझा अभिप्राय आहे. या कारणास्तव सदर ठराव नियमांतर्भूत आहे, नियमबाह्य नाहीं, असा माझा निर्णय आहे."

या निर्णयामुळें १९२९ सालीं त्या वेळच्या साधारण सभेच्या अध्यक्षांनीं दिलेला निर्णय रद्द झाला व श्री. गुळवणे यांच्या प्रस्तावावर विचार सुरू झाला.

श्री. पां. वा. काणे यांनीं श्री. गुळवणे यांच्या प्रस्तावास खालील-प्रमाणें उपसूचना मांडली. "'वगैरे प्रसंगीं' या शब्दापुढील शब्दा-पासून ते 'उच्चनीच' या शब्दापर्यंत सर्व शब्द गाळावे व त्याऐवजीं (केवळ सभासदांसाठीं जाहीर झालेले समारंभ वगळून) 'अखिल हिंदु समाजास' हे शब्द घालावे."

श्री. गुळवणे यांनीं ही उपसूचना मान्य केली व त्या उपसूचनेसह झालेला खालील प्रस्ताव सभेपुढें मांडला.

"ब्राह्मण सभेमार्फत होणाऱ्या उत्सवसमारंभ, व्याख्यान वगैरे प्रसंगीं (केवळ सभासदांसाठींच जाहीर झालेले समारंभ वगळून)

अखिल हिंदु समाजास स्पृश्यास्पृश्य इत्यादि भेदभाव न मानतां उपस्थित रहाण्यास मोकळीक राहील. "

बऱ्याच वादविवादानंतर हा प्रस्ताव फक्त पांच मतें विरुद्ध पडून प्रचंड बहुमतानें पसार झाला व अशा रीतीनें सुमारें वीस वर्षें चाललेल्या या विवाद्य विषयाचा शेवट समाधानकारक झाला. हा निर्णय ब्रा. सभेस व तिच्या सहस्रावधि सभासदांस भूषणास्पद असाच आहे. ज्ञातीची संघटना करावी व आपापसांत प्रेम व ऐक्यभाव उत्पन्न करावा या ब्रा. सभेच्या ध्येयाबरोबरच इतर ज्ञातींशीं ब्रा. सभेचे संबंध प्रेमाचे असावे आणि ब्राह्मण व इतर ज्ञाती यांची एकी व्हावी व परस्परांत ऐक्य व प्रेम वाढावें व हरएक प्रसंगीं परस्परांस साह्य करतां येऊन दोघांचीहि उन्नति व्हावी हाहि ब्रा. सभेचा एक उद्देश आहे हें या निर्णयानें पुन्हा एकदां चांगल्या प्रकारें सिद्ध झालें.

(१६) करमणूक शाखा

१९४२ व नंतर

उत्सवप्रियता हा माणसाचा स्वभावधर्म आहे हें ओळखूनच ब्राह्मण सभेनें ही करमणूक शाखा काढलेली आहे. १९४२ ते १९४७ या काळांत या शाखेमार्फत बुद्धिबळें, पिंगपाँग, कॉन्ट्रॅक्ट ब्रिज, कॅरम, बिझिक इ. खेळांची व्यवस्था करण्यांत आलेली दिसते. या शाखेचे सदस्य रोज सायंकाळीं साधारणपणें ६ ते ८ पर्यंत करमणुकीसाठीं जमतात. सुट्टीच्या दिवशीं मात्र दुपारपासून रात्रीं ८ वाजेपर्यंत निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळण्यांत येतात. या शाखेच्या सदस्यांची रोजची उपस्थिति साधारणपणें बारापंधरा असून सुट्टीच्या दिवशीं मात्र ही संख्या बरीच वाढते. या शाखेचे शंभराहून अधिक सभासद असल्याचें दिसतें.

या शाखेतर्फे १९४२ सालीं श्री. ओंकारनाथ यांचे धनुर्विद्येचे प्रयोग करण्यांत आले. १९४३ सालीं श्री. नारायणगांवकर यांच्या गायनाचा कार्यक्रम होऊन एक नाट्यप्रयोगहि करण्यांत आला.

१९४४–४५ या दोन वर्षांत या शाखेतर्फे बॅडमिंटन व कॉंट्रॅक्ट ब्रिज यांचे सामने करण्यांत येऊन विजयी खेळाडूंना बक्षिसें देण्यांत आलीं. कॉंट्रॅक्ट ब्रिजच्या सामन्यांसाठीं श्री. मि. शा. गोरे यांनीं

शाखेला एक ट्रॉफी देऊन ठेवलेली आहे. १९४६–४७ या दोन्ही वर्षींहि या दोन्ही खेळांचे सामने करण्यांत आले.

दि. १०–११–४५ ला सुप्रसिद्ध गायनाचार्य भास्करबुवा बखले यांच्या तैलचित्राचा अनावरणसमारंभ डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या हस्तें करण्यांत आला.

करमणूक शाखेची देणगी

१९४६–४७ सालीं शाखेनें केलेल्या नाट्योत्सवाच्या उत्पन्नापैकीं रु. ९०१ या शाखेनें सूतिकागृहाची चालू खर्चाची तूट भरून काढण्यासाठीं ब्रा. सभेस दिले व ही शाखा वेळप्रसंगीं इतर शाखांनाहि साह्य करूं शकते हें प्रत्यक्ष कृतीनें सिद्ध करून दाखविलें.

नाट्य–चढाओढी झाल्या त्यावेळीं निव्वळ स्त्रीभूमिका असलेलें 'पारध' हें नाटक जगन्नाथाच्या चाळींतील भगिनींनीं करून दाखविलें. या नाट्य–चढाओढी सुप्रसिद्ध नाट्यपंडित श्री. बाळासाहेब वर्तक यांच्या अध्यक्षतेखालीं झाल्या.

दि. २९–३–४७ ला मुलांच्या गायनाच्या चढाओढी ठेवण्यांत आल्या होत्या. यशस्वी मुलांमुलींना प्रो. देवधर यांच्या हस्तें बक्षिसें देण्यांत आलीं.

या शाखेमार्फत होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचा खर्च या शाखेच्या सभासदांच्या वर्गणींतूनच करण्यांत येतो. त्यासाठीं ब्राह्मण सभेला कोणत्याहि प्रकारची तोशीस लागत नाहीं.

(१७) षड्वार्षिक इतिहास समालोचन

१९४२ ते १९४७

सन १९४० च्या मध्याच्या सुमारास ब्रा. स. व्य. मं. ची जी निवडणूक झाली तींत, ब्राह्मण समाजांत चैतन्य निर्माण करून ब्राह्मण सभेच्या कार्याला शून्यापासून प्रारंभ करून त्या सभेला मान्यतेचें स्थान ज्यांनीं मिळवून दिलें, अशा अनेक कार्यकर्त्यांनीं भाग घेतला नाहीं. त्या सालीं निवडून आलेल्या सदस्यांत पुरोगामी मताचे सदस्य बहुसंख्य होते पण त्या पक्षानें आपलें कर्णधारित्व सनातनी मताच्या सदस्याकडे सोंपविलें होतें. शक्य तितकें मिळतें घेऊन प्रगति करावयाची असें या पक्षानें आपलें धोरण आंखलें. प्रगति होणें अशक्यच वाटलें तर निदान आपल्या जागीं स्थिर रहावयाचें पण प्रतिगामित्व मात्र स्वीकारावयाचें नाहींच नाहीं असा या पक्षानें निश्चय केला होता.

स्वयंसेवक शाखेचें काम अधिकाधिक उत्साहानें चालू होतें. या सहा वर्षांत या शाखेनें वर्गणीरूपानें रु. ४३००६ जमा केले.

मागील द्वादशवार्षिकं इतिहासाच्या शेवटीं श्रीशंकरवाडीप्रीत्यर्थ जवळ जवळ १।।। लक्ष रुपये खर्च झाल्याचें लिहिलें होतें. ती इमारत तदंगवस्तुसहित ब्रा. सभेच्या पूर्ण मालकीची झाली. या सहा

वर्षांच्या काळांत रु. १३०००० ची इमारत नं. २ सभेनें खरेदी केली व तीप्रीत्यर्थ देणगीरूपानें रु. ५०१२७–२-० मिळविले.

शिक्षणशाखेनें या सहा वर्षांत रु. २६८९१-३-० शिष्यवृत्त्यांच्या रूपानें दिले. याशिवाय आपटे शिष्यवृत्ति म्हणून रु. ७९०१ दिले ते निराळेच.

सुमारें वीस वर्षें भिजत पडलेला अस्पृश्यतेचा प्रश्न या काळांतच समाधानकारक रीतीनें सुटला. या काळांतील सर्व उत्सवसमारंभ पूर्वीच्याच उत्साहानें साजरे करण्यांत आले. करमणूक शाखाहि फेनिक्स पक्ष्याप्रमाणें सतेज स्वरूप धारण करून आपलें कार्य करूं लागलेली दिसते.

ग्रंथालय व अँब्युलन्स या दोन्ही कल्पनांना या काळांतच विशेष चालना मिळाली.

ब्राह्मण भगिनी समाज अलग झाल्यामुळें त्या समाजाचें कार्य ब्रा. सभेची महिला शाखा करूं लागली.

१९१८ नंतरच्या तीस वर्षांच्या अवधींत ब्राह्मण सभेनें सर्व बाजूंनीं जी कौतुकास्पद प्रगति केली ती पहातां ध्येयाच्या पूर्ततेच्या दृष्टीनें तिनें बराच मोठा पल्ला गांठल्याचें दिसून येतें आणि यशापयश व आशा-निराशा या झगड्यांत मिळालेलें यश पाहून भावी महत्तम यशाबद्दल आशा—नव्हे, खात्री—वाटल्याशिवाय रहात नाहीं.

समारोप

पुण्याहून निघालेल्या लहानशा रेल्वे रस्त्यावर सातारा स्टेशनपासून ७ पूर्वेस रेल्वे रस्त्याशीं समांतर अशी लांबच लांब पण अगदीं वृक्षहीन अशी डोंगराची ओळ आहे. या डोंगरांच्या ओळीच्या दक्षिणेस एक मोठा फोंडा माळ आहे. या ठिकाणीं पूर्वी कुंडल रोड स्टेशन होतें. या माळावर कित्येक वर्षांपूर्वी बांधलेलें एक लहानसें नाथाचें देऊळ व त्या भोंवतीं शेरताटी होती. या भागांतून प्रवास करतांना कोणी उन्हानें करपून निघाला तर त्याला सांवली देण्यास एखादा वृक्ष नव्हता कीं तहानेनें त्याचे प्राण कंठाशीं आले तर त्याच्या तोंडांत पाण्याचे दोन थेंब पडतील अशी आशा करायला जागा नव्हती. बेळगांवला सायकलचें दुकान असणारे श्री. किर्लोस्कर त्या ठिकाणीं आले. पंतप्रतिनिधींच्या साहाय्यानें त्यांनीं एक अगदीं लहानसा कारखाना सुरू केला. जवळच भूमीच्या अंतरंगांत त्यांना उत्तम गोड पाण्याचा झरा मिळाला. त्या लहानशा दुरुस्ती-दुकानास हळुहळू भव्य कारखान्याचें स्वरूप प्राप्त झालें आणि आज त्या ठिकाणीं महाराष्ट्रानें जिचा अभिमान बाळगावा अशी उद्योगभूमि झाली असून पांच हजारांहून अधिक लोकांना त्या ठिकाणीं उद्योग मिळत आहे आणि तेथें दहाबारा हजार वस्तीचा मोठा गांव वसला आहे. या गांवाचेंच नांव किर्लोस्करवाडी होय. वीज, टेलिफोन, रेडिओ वगैरे अद्यावत् सुखसोईंनीं परिपूर्ण असा तो गांव आज आपल्याला दिसत आहे.

कै. श्री. म. वा. भट

कै. सॉ. के. रा. दिवेकर

श्री. श्री. य. अभ्यंकर

रावसाहेब ना. म. काळे

खाडीलकर-कळकर

श्री. बाळ गंगाधर खेर

बॅ. वि. वि. ओक

श्री. शं. वि. सोवनी

साठ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या ब्राह्मण सभेची स्थिति पहिलीं तीस वर्षें त्या माळावरील नाथाचें मंदिर व ती शेरताटी यांच्यासारखीच होती. ब्राह्मण सभा या संस्थेचा आणि तिच्या वैशिष्ट्याचा ब्राह्मण समाजालाच काय पण तिच्या सभेच्या सभासदांनाहि विसर पडलेला होता. अग्निस्फुलिंग राखेनें व्यापल्याबर निस्तेज दिसतो तशीच कांहींशी स्थिति ब्रा. सभेची झालेली होती. ती रक्षा फुंकरून आंतील अग्नि प्रदीप्त करणारे म्हणजेंच हृदय, बुद्धि व चैतन्यशक्तीला चालना देणारे नाशिकचे श्री. अं. गो. पुणतांबेकर, दापोलीचे श्री. पां. वा. काणे, मिरजेचे डॉ. भडकमकर, रत्नागिरीचे श्री. मामा मराठे व श्री. ज. ना. वैद्य, मलकापूरचे श्री. चिं. ज. खेर, चिकोडीचे श्री. निवर्गी, साताऱ्याचे श्री. वा. रा. गुळवणे हे सर्व एकत्र आले त्यामुळें विझत चाललेला अग्नि प्रज्वलित झाला. जवळच स्वार्थत्यागी व प्रसिद्धिपराङ्मुख स्वयंसेवकीय कार्याचा शुद्ध व गोड्या पाण्याचा झरा मिळाला आणि गिरगांवांतील प्रसिद्ध रस्त्यावर सुंदर इमारत होऊन त्या ठिकाणीं ज्ञातिहिताचींच नव्हे तर अनेक जनहिताचीं कामें सुरू झालीं. 'प्रयत्नांतीं परमेश्वर' या म्हणीचें प्रत्यंतर आलें.

१८८८ च्या पूर्वी या अफाट मुंबई शहरांत प्रसंगविशेषीं तरी ब्राह्मण समाजाला एकत्र जमून आपलें अधिकृत मत प्रदर्शित करतां येईल अशी एकहि संस्था अस्तित्वांत नव्हती. ब्राह्मण समाजाची परिस्थिति सर्व प्रकारें बिकट झालेली होती. ब्राह्मण ज्ञातीची उन्नति व्हावी म्हणून तशाहि स्थितींत मोठ्या परिश्रमानें १८८८ सालीं 'ब्राह्मण सभा' ही संस्था स्थापन करण्यांत आली. पण परिस्थितीचे चटके सुसह्य झाल्याबरोबर लाभलेल्या थोड्याशा शांततेचा उपयोग आत्म-निरीक्षण करून आपल्यांतील दोष काढून टाकावयाचे, आपल्यांतील सुप्त गुण जागृत करण्याच्या प्रयत्नाला लागावयाचें, समाजाची संघटना करण्याचा उद्योग आरंभावयाचा, अशा चांगल्या गोष्टींत करण्या-ऐवजीं थोडाफार ऐषआराम करण्याकडेच माणसाच्या मनाचा कल

झुकतो. माणसांचाच नियम संस्थांनाहि बऱ्याचशा प्रमाणांत लागू पडतो. ब्राह्मण सभेच्या स्थापनेमुळें ब्राह्मण समाजांतील घटकांना एकत्र जमतां येईल अशी सोय झाली. पण त्या सभेला प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त होण्यासाठीं जे श्रम करावयास पाहिजे होते ते करण्यास मात्र कोणी पुढें होईना. किंबहुना असे श्रम करावे लागतात याची कोणाला जाणीवच नव्हती असेंहि म्हटलें तरी चालेल. श्री. काशीनाथ त्र्यंबक खरे यांच्यासारखा एखादा गृहस्थ कांहीं धडपड करूं लागला तर त्याला कांहीं लोकांची सहानुभूति मिळे पण ती केवळ शाब्दिक ! असलीं कामें नुसत्या शाब्दिक सहानुभूतीनें होत नाहींत, त्यासाठीं त्याग करावा लागतो, ही कोणाला कल्पनाच नव्हती.

'शंकरवाडी' साठीं १८९८ सालीं शिकस्तीचे प्रयत्न होऊनहि निधीचा आंकडा आठ हजारांच्या वर जाऊं शकला नाहीं. विद्यार्जनाच्या कामीं मोठ्या प्रमाणांत निधि जमा झाल्याशिवाय ब्राह्मण समाजांतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आपलें विद्यार्जनाचें कार्य पुढें चालविणें अशक्य आहे याची पूर्ण जाणीव असूनहि एक वर्षाच्या अवधींत या कार्यासाठीं साठ रुपयांपेक्षां अधिक रक्कम जमूं शकली नाहीं ! यावरून हें अगदीं स्पष्ट होतें कीं, आपल्या प्रांतींतील अल्पसा तरी भाग समाज-हितासाठीं आपण दिला पाहिजे याची कोणाला जाणीवच नव्हती. तीस वर्षें जवळ जवळ अशा स्थितींत गेलीं असें म्हणावयास हरकत नाहीं.

आपल्या नोकरीचा किंवा उद्योगधंद्याचा वेळ सोडून उरलेल्या वेळांतील कांहीं तरी भाग सार्वजनिक कामासाठीं लावला पाहिजे आणि आपल्या प्रांतींतील थोड्या तरी भागावर आपल्या कुटुंबीयांप्रमाणेंच आपल्या ज्ञातिबांधवांचा किंबहुना सर्व जनतेचा कांहीं अंशीं तरी हक्क आहे ही शिकवण लोकांना दिल्याखेरीज आणि ती त्यांच्या पचनीं पडल्याखेरीज कोणतेंहि सामाजिक कार्य यशस्वी होणें कधींहि शक्य नाहीं.

ही जाणीव समाजांत उत्पन्न करण्यासाठीं ब्रा. वि. स. मंडळानें स्वयंसेवक निर्माण केले आणि ब्राह्मण हितवर्धिनी सभेनें लोकजागृति करून ब्राह्मण समाजांत एक प्रकारची वैचारिक खळबळ उडवून दिली. चार संस्थांचें एकीकरण झाल्यानंतर त्या संयुक्त ब्राह्मण सभेचे उद्देश निश्चित करण्यांत आले.

ब्राह्मण लोकांत प्रेम व ऐक्य वाढावें, ज्ञानप्राप्ति व ज्ञानप्रसार व्हावा, हरएक प्रसंगीं परस्परांस व इतरांस साह्य करतां येऊन ज्ञातीची उन्नति करतां यावी असा या सभेच्या उद्देशांतील एक प्रमुख भाग आहे. हें प्रेम व ऐक्य वाढवावयाचें म्हणजे ज्ञातिबांधवांकडून या ध्येयाला मान्यता मिळवावयाची, त्यांना जास्तींत जास्त संख्येनें सभेचे सभासद करून द्यावयाचे आणि सुस्थितींत असलेल्यांकडून सभेसाठीं देणग्याहि मिळवावयाच्या.

वाईटांतूनहि कधीं कधीं चांगलें निर्माण होतें म्हणतात. त्याचें प्रत्यंतर १९१८ सालच्या इन्फ्लुएन्झाच्या सांथींत आलें. ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांची त्या वेळी खरी कसोटी लागली. हा ताप संसर्गजन्य आहे हें माहीत असूनहि आपल्या जिवांची पर्वा न करतां ज्ञातिसेवेचें व आपल्या मगदुराप्रमाणें जनसेवेचेंहि कार्य त्या वेळीं ब्रा. सभेच्या कार्यकर्त्यांनीं केलें. या त्यांच्या बहुमोल कार्यामुळें ज्ञातिबांधवांचीं मनें ब्राह्मण सभेकडे आकर्षिलीं गेलीं आणि सभेच्या सभासदांची संख्या झपाट्यानें वाढूं लागली.

सभेसाठीं सभासद मिळविण्याच्या कार्याबरोबरच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करून त्यांना शिष्यवृत्त्यांच्या रूपानें मदत करणें, आपल्या गुणानें पुढें आलेल्या गुणी माणसाचा गौरव करून त्याचें उदाहरण भावी पिढीपुढें ठेवण्याचा योग आणणें, ब्राह्मण ज्ञातीचीं संमेलनें वेळोवेळीं भरविणें, व्याख्याते,

शास्त्री, हरिदास, पुराणिक व इतर हुन्नरी मंडळी यांचा पुरस्कार करणें, ब्राह्मण ज्ञातीसाठीं आरोग्यभुवनें, रुग्णालयें, औषधालयें वगैरे सुरू करणें, ज्ञातीच्या उन्नतीसाठीं वेळोवेळीं निर्माण होणारीं कामें करणें इत्यादि गोष्टींचा समावेश सभेच्या विधायक कार्यक्रमांत करण्यांत आलेला होता आणि हीं सर्व कामें, अल्प प्रमाणांत कां होईना, सुरूहि झालेलीं होतीं.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या म्हणून द्यावयाच्या रकमेला दरसाल दोन हजारांपासून सुरुवात झाली आणि तीच आतां पांच हजारांपर्यंत वाढविण्यांत आलेली आहे. नाविक वगैरे शिक्षणाप्रीत्यर्थ आपटे शिष्यवृत्ति देण्यांत येते ती निराळीच.

या शिष्यवृत्त्यांना कांहीं माणसें 'खैरात' म्हणून हिणवतात. पण या शिष्यवृत्त्या खैरात म्हणून केव्हांहि दिल्या जात नाहींत. विद्यार्थ्यांची लायकी आणि परिस्थिति पाहूनच त्या दिल्या जातात. कांहीं अपवाद सोडल्यास विद्यार्थ्यांकडून परतफेडहि नियमित वेळीं होते. वास्तविक आपल्या ब्राह्मण ज्ञातींत गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची संख्या इतकी मोठी आहे कीं, निदान शेंकडा ४'५ मार्क मिळविणारांस मदतीची अपेक्षा असते. पण द्रव्याच्या अभावीं आलेल्या अर्जांपैकीं निम्मे अधिक विद्यार्थ्यांस मदत देतां येत नाहीं. प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशी असतांना, सभा करीत असलेल्या तुटपुंज्या मदतीला कोणीहि सहृदय मनुष्य 'खैरात' म्हणेल असें वाटत नाहीं. सवड झाली त्या त्या वेळीं मॅट्रिकच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां संस्कृत, इंग्रजी वगैरे विषयांचे विशेष वर्ग ब्रा. सभेनें चालविले आणि ब्राह्मणांप्रमाणेंच इतर ज्ञातींतील विद्यार्थ्यांनाहि त्यांचा लाभ घेतां आला.

ब्राह्मण समाजाची आर्थिक परिस्थिति तेव्हां स्पृहणीय नव्हती आणि आतांहि नाहीं. या समाजांतील मध्यमवर्गीयांना तर शैक्षणिक खर्चाचा भार अगदीं असह्य झालेला आहे आणि त्यामुळें कित्येक

होतकरू विद्यार्थ्यांना विद्यार्जनाला मुकावें लागून उदरनिर्वाहाच्या मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. ब्राह्मण समाजाच्या गरजेच्या मानानें ब्राह्मण सभेकडून होणारें हें कार्य अगदींच अल्प आहे आणि सभेलाहि याची पूर्ण जाणीव आहे. सभेनें गेल्या तीस वर्षांत सुमारें रु. १२५००० शिष्यवृत्त्यांच्या रूपानें दिले. ब्राह्मण समाजाच्या गरजेच्या मानानें पाहिल्यास ही रक्कम अगदींच अल्प आहे असेंच म्हणावें लागतें. आतां तर विद्यार्जनाचें आणखी एक नवीन क्षेत्र निर्माण झालेलें आहे. स्वतंत्र झालेल्या आपल्या या मातृभूमीला जर वैभवसंपन्न करावयाचें असेल तर परदेशांत जाऊन अनेक विद्या संपादन करून त्यांचा उपयोग आपल्या मातृभूमीच्या उन्नतीप्रीत्यर्थ करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मार्ग सुकर करणें अत्यंत आवश्यक असून या कार्याकरितां निदान रुपये दोन लक्षांच्या निधीची जरूरी आहे. विश्वविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना वाङ्मयीन यंत्रें म्हणून हिणविणारांना ही सुवर्णसंधि प्राप्त झालेली आहे. ब्रा. समाजांत जिज्ञासु, अभ्यासू पण गरजू असे विद्यार्थी अनेक आहेत. हें राष्ट्रपोषक द्रव्य फुकट जाणार कीं काय अशी भीति उत्पन्न झालेली आहे. या कार्याची ब्राह्मण सभेला नितांत तळमळ असून ती आज समाजांतील धनिकांकडे मोठ्या आशेनें डोळे लावून राहिलेली आहे.

एकीकरणानंतर ब्राह्मण सभेमार्फत एक रुग्णालय सुरू करण्यांत आलेलें होतें. हें रुग्णालय ब्राह्मण ज्ञातीसाठीं तर होतेंच पण शक्य तर इतर ज्ञातींनाहि त्याचा उपयोग व्हावा अशीच ब्राह्मण सभेची इच्छा होती; आणि बऱ्याच अंशीं सभेची ही इच्छा सफलहि झाली. पण पुरेशा द्रव्य-बलाच्या अभावीं कालांतरानें हें रुग्णालयाचें काम स्थगित करावें लागलें.

ज्ञातींतील व ज्ञातीबाहेरीलहि गुणी माणसांना मुद्दाम निमंत्रण देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्याची ब्राह्मण सभेची प्रथा आहे.

उत्सवसमारंभांची आंखणीहि ब्रा. सभेकडून एका विशिष्ट प्रकारानें करण्यांत येते. कोणाहि व्याख्यात्याचीं वैयक्तिक मतें कांहींहि असलीं तरी ब्रा. सभेच्या व्यासपीठावर त्याला स्थान मिळूं शकतें आणि सभागृहांतील श्रोते त्याचे विचार शांतपणें ऐकून घेतात. ब्राह्मण सभेंतील व्यासपीठाचा लौकिक ब्राह्मण सभेनें अत्यंत जागरूकपणें आणि दक्षतेनें आजपर्यंत सांभाळलेला आहे. सभा प्रगमनशील विचारांचा नेहमींच पुरस्कार करीत असून सभेच्या जागीं चाललेल्या ज्ञानसत्रांत कोणत्याहि प्रकारचा भेदभाव करण्यांत येत नाहीं. सभेमार्फत प्रतिवर्षीं कीर्तनें व प्रवचनें यांचेहि अनेक कार्यक्रम होतात.

ब्रा. सभेचा मतपरिवर्तनावर विश्वास असल्यामुळें समाजाशीं फटकून न वागतां व कोणावर कसल्याहि प्रकारची जबरदस्ती होणार नाहीं अशी दक्षता घेऊनच ब्रा. सभेकडून निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम आंखले जातात. दि. ब. राजा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचींहि व्याख्यानें ब्रा. सभेमार्फत नसलीं तरी ब्रा. सभेच्या सभागृहांत होऊं देण्यांत सभेच्या कार्यकर्त्यांची दूरदृष्टीच दिसून येते.

एखादें सत्कार्य निरलसपणें आणि परिश्रमपूर्वक करीत राहिल्यास समाजावर त्याचा केव्हां ना केव्हांतरी परिणाम होतोच होतो आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून त्याच्याकडून उदार हस्तानें साहाय्यहि मिळूं लागतें याचें उत्तम उदाहरण म्हणजे 'श्रीशंकरवाडी' होय. श्रीशंकरवाडीगृह झाल्यापासून असा एकहि मुहूर्त किंवा शुभ दिवस गेला नाहीं कीं ज्या दिवशीं गृहाची जागा रिकामी राहिली. ज्ञातिबांधवांना शंकरवाडीचा उपयोग करून देतांना उत्पन्नाच्या बाबीपेक्षां लोकांच्या सुखसोयींकडेच अधिक लक्ष पुरविण्यांत येतें. शंकरवाडीचा उपयोग करून घेणारांसाठीं जे नियम केले आहेत त्या नियमांन्वयें कोणाहि सार्वजनिक संस्थेला अगदीं अल्प मोबदल्यांत सभागृहें देण्यांत येतात. आतांपर्यंत अनेक

सार्वजनिक संस्थांनीं या सभागृहांचा उपयोग करून घेतलेला आहे. या सार्वजनिक संस्थांचे सदस्य कोणत्या ज्ञातीचे आहेत हें पहाण्यांत येत नसल्यामुळें शंकरवाडीचा उपयोग ब्राह्मण ज्ञातीइतकाच इतर ज्ञातींतील नागरिकांनाहि झालेला आहे. विद्यार्थी वसतिगृह व अभ्यागतगृह यांची व्यवस्था करण्याचा ब्रा. सभेचा संकल्प आहे.

स्वयंसेवक शाखा ही ब्रा. सभेची खरी शक्ति आहे. श्रीशंकरवाडीच्या इमारतीकडे पाहिल्याबरोबर एकावर एक असलेले मजले व त्यांना शोभा आणणारी रंगरंगोटी कोणाच्याहि नजरेंत चटकन भरते पण इमारतीच्या पायांत खचलेले दगड व चकचकीत भिंतींच्या आंत असलेल्या विटा कांहीं कोणाला दिसत नाहींत. ब्रा. सभा हीच एक इमारत आहे अशी कल्पना केली तर व्यवस्थापक मंडळाचें कार्य म्हणजे या इमारतीला भक्कमपणा आणण्यासाठीं उपयोगांत आणलेले सिमेंट कॉंक्रीटचे खांब व तिला शोभा आणण्यासाठीं करण्यांत आलेली रंगरंगोटी असून स्वयंसेवकांचें कार्य म्हणजे पायांतील दगड व भिंतींच्या विटा यांच्यासारखें आहे असेंच म्हणावें लागेल. ब्रा. सभेचें आजचें हें भव्य स्वरूप तिला एकाएकीं प्राप्त झालेलें नाहीं. अनेक कार्यकर्त्यांचा त्याग, त्यांचें निरलस प्रेम, त्यांची प्रसिद्धिपराङ्मुखता आणि त्यांचे परिश्रम या सर्वांच्या मिलाफानें ब्रा. सभेला आजचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. सभेचा प्रचार सतत एकनिष्ठेनें चालू असून सभेला सदस्य मिळविण्याचें कार्यहि प्रगतिपथानें चाललेलें आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. दसरी किंवा सभेंतील कांहीं श्रमांचीं कामें करण्याची प्रथा अधिक जोरानें सुरू झाल्यास सभेचा फारच फायदा होईल.

बौद्धिक शिक्षणाच्या बाबतींत साहाय्य करण्याचें कार्य शिक्षणशाखा करते तर शरीर सतेज व सुदृढ ठेवण्याच्या कामीं साळवेकर व्यायामशाळेचा उपयोग होतो. विद्यार्जन जसें कांहीं वयापर्यंतच होऊं शकतें

तसें शरीर सतेज व सुदृढ करण्याचें कामहि विशिष्ट वयोमर्यादेंतच करावें लागतें. साळवेकर व्यायामशाळेचा लाभ समाजानें ज्या प्रमाणांत घ्यावा त्या प्रमाणांत तो घेतला जात नाहीं ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे. या व्यायामशाळेस उघड्या जागेची अत्यंत जरुरी आहे. या व्यायामशाळेचा समाजानें जर अधिक प्रमाणांत उपयोग करून घेतला असता तर ब्रा. सभेलाहि उघड्या जागेची व्यवस्था करणें भाग पडलें असतें. सांगलीचे सुप्रसिद्ध कुस्तीगीर श्री. व्यंकप्पा बुरूड यांनीं ही व्यायामशाळा पाहून समाधान व्यक्त केलें होतें.

समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या भेटीचे योग नेहमीं यावे, परस्परांचा परिचय वाढून स्नेह निर्माण व्हावा, विचारविनिमय होऊन सांसारिक अडचणींचा तेवढ्यापुरता तरी विसर पडावा आणि करमणूक व्हावी अशाच उद्देशानें ब्रा. सभेनें करमणूक शाखा काढली असून तिचा लाभ सभेचे बरेच सभासद घेतात. खेळांतील प्रावीण्य प्रकट करणारांना पारितोषकें देण्यांत येतात. खेळ खेळतांना होणाऱ्या चर्चेतूनहि कांहीं अत्यंत उपयुक्त अशीं कार्यें निर्माण होतात. ब्रा. सभेमार्फत नवीनच चालू करण्यांत आलेलें कापडाचें दुकान हें याचें उत्कृष्ट उदाहरण होय.

ब्रा. सभेचें एक तत्त्वज्ञानमंदिर असावें व या मंदिरांत उत्कृष्ट ग्रंथांचा संग्रह असावा अशी सभेची फारा वर्षांपासून इच्छा होती. पानवलकर ग्रंथालयानें सभेची ही इच्छा कांहीं-नव्हे, बऱ्याच-अंशीं पूर्ण केली. या ग्रंथालयांत ललित विषयांवरील ग्रंथांप्रमाणें औद्योगिक, शास्त्रीय व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथहि आहेत. या ग्रंथालयाची वाढ करून तें एक संदर्भग्रंथाचें स्थान व्हावें व अभ्यासूंना त्याचा चांगला उपयोग व्हावा अशी सभेची इच्छा आहे. या ठिकाणीं कै. बाबूराव साळवेकर यांचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. पानवलकर



१९४९ चें कार्यकारी मंडळ



ब्राह्मण सभा स्वयंसेवक शाखा, १९४८-४९

ग्रंथालयानें ब्रा. सभेंत एक नवीन दालन उघडलेलें त्यांनीं पाहिलें असतें तर त्याच्या जोडीला तत्त्वज्ञानमंदिर सुरू करण्याच्या कामीं त्यांनीं अवश्य साहाय्य केलें असतें. अजूनहि या कल्पनेला मूर्तस्वरूप येईल असा ब्रा. सभेस भरंवसा वाटत आहे.

ब्रा. सभा म्हसकर सूतिकागृह व औषधालय हें तर सभेचें अनुपमेय असें कार्य आहे. सूतिकागृहांत कोणतीहि उणीव राहूं नये हा डॉ. म्हसकर यांचा कटाक्ष आहे. अवश्य असणारी प्रत्येक वस्तु इतकी महाग झालेली आहे कीं, सूतिकागृहाच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें अशक्य होतें. या सूतिकागृहाच्या जोडीला रुग्णालयाची आवश्यकता अत्यंत तीव्रतेनें भासत असून आज ना उद्यां तीहि अडचण दूर झाल्याशिवाय रहाणार नाहीं असा सभेला विश्वास वाटत आहे. सूतिकागृहांतहि आवश्यक अशा कांहीं सुधारणा अद्यापि करावयाच्या आहेत. डॉ. बापूसाहेब म्हसकर यांनीं सूतिकागृहाचें कार्य हें आपलें जीवितकार्य म्हणून चालविलें असून त्यासाठीं वाटेल तो त्याग करण्यास व कितीहि परिश्रम घेण्यास ते सदैव तयार असतात.

ब्रा. सभेच्या कार्यक्रमांत केवळ स्त्रियांसाठीं असे कांहीं विशिष्ट कार्यक्रम असतात. अगदीं प्रारंभीं कांहीं भगिनी आपण होऊन पुढें येऊन अशा कार्यक्रमांची व्यवस्था करीत. यानंतर ब्राह्मण भगिनी समाज स्थापन झाला आणि ब्रा. स. व्य. मं. च्या मार्गदर्शनाखालीं त्यानें आपलें काम सुरू केलें. अशा प्रकारें दहा वर्षें काम केल्यावर भगिनी समाजाच्या संलग्नतेसंबंधानें मतभेद निर्माण होऊन ब्रा. स. व्य. मं. ला आपल्या नियंत्रणाखालीं काम करणारी महिला शाखा असावी असें वाटूं लागलें. ब्राह्मण भगिनी समाजाला ब्रा. सभेशीं असलेला आपला संबंध सोडावा लागला पण अजूनहि त्या संस्थेचें ब्रा. सभेशीं पूर्ववत् सहकार्य होणें अशक्य नाहीं. भगिनी समाजानंतर

महिला शाखेची स्थापना करण्यांत आली. महिला शाखा आपल्या परीनें उत्कृष्ट कार्य करीत आहे.

ब्राह्मण लोकांचें आपसांत व इतरांशीं प्रेम व ऐक्य वाढावें हा ब्रा. सभेचा एक उद्देश आहे. हें ऐक्य व प्रेम समाजाचे सर्व घटक समान पातळीवर आल्याशिवाय निर्माण होणें शक्य नाहीं असें ब्रा. सभेचें मत असल्यामुळें ती उच्चनीच भेद मानीत नाहीं.

ब्राह्मण समाज हा अखिल समाजाचा एक घटक असल्यामुळें भारताच्या उन्नतीप्रीत्यर्थ होणाऱ्या प्रयत्नांत ब्राह्मण ज्ञातीनें योग्य तो भाग उचललाच पाहिजे; आणि भारताच्या उन्नतीला समाजाच्या सर्व घटकांत प्रेम व ऐक्य निर्माण होणें अत्यंत आवश्यक असल्यामुळें ब्राह्मण सभा त्या दृष्टीनें प्रयत्न करीत असते.

दुर्दैवानें ब्राह्मण समाजांतील कांहीं लोकांना निरनिराळे पोटसंघ असावेसें वाटूं लागलें आणि असे पोटसंघ मुंबईंत अस्तित्वांतहि आले. पोटसंघांचें एकीकरण करण्याची ब्राह्मण सभेची इच्छा सफल होईल तो सुदिन होय.

आज ब्राह्मण सभेंत ७५ स्वयंसेवक काम करीत असून सभेच्या सभासदांची संख्या ४१०० हून अधिक आहे.

'ब्राह्मण सभेनें आपल्या बाल्यावस्थेंतहि आकुंचित दृष्टि ठेवलेली नव्हती. नव्या काळाला अनुसरून नवीं कार्यें करण्यास हुरूप येण्याला या इतिहासकथनाचा उपयोग होण्यासारखा आहे' अशी आशा या इतिहासकथनाच्या प्रारंभीं प्रकट केली होती. ती कितपत यशस्वी झाली हें पहाण्याचें काम वाचकांचें आहे. भारतवर्षाचा एक काळ असा होता कीं, प्रत्येक मनुष्याला त्याच्या गुणकर्मानुसार समाजांत श्रेष्ठ अगर कनिष्ठ स्थान मिळे. असें व्हावें अशीच ब्राह्मण सभेची इच्छा आहे. या प्रचंड कार्यास सुरुवात कोठून करावयाची हा कदा-

चित् मतभेदाचा प्रश्न होईल आणि सर्व समाजाला श्रेष्ठता मिळवून देणाऱ्या शिडीच्या अगदीं खालच्या एक दोन पायऱ्यांवरच ब्राह्मण सभा असेल पण शिडीच्या अगदीं वरच्या पायरीवर नजर ठेवून हळुहळू एकेक पायरी चढून जाण्याचा प्रयत्न करण्यांत ब्राह्मण सभेकडून कसूर होणार नाहीं. प्रस्तुतकाळीं अखिल भारतीय समाज एका मोठ्या दिव्यांतून जात आहे. अशा वेळीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या खालील शब्दांत हें इतिहासकथन समाप्त करणें बरें.

' जे खळाची व्यंकटी सांडो ।
ते या सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो ।
मैत्र जीवाचें ॥
दुरितांचें तिमिर जावो ।
विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो ।
प्राणिजात ॥ '

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



REFBK-0007242

म. ग्रं. सं. ठाणें
विषय आपटेकाका
सं. क्र. १९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

महाकुंभाचे मराठी वाङ्मय
ठ.२.१९८.को.सं.२५.२३१५

REFBK-0002884
REFBK-0002884

मं. क्र. ५५

विदर्भ-साहित्य-संघ माला पुष्प १ ले

महानुभावीय मराठी वाङ्मय

लेखक:—

यशवंत खुशाल देशपांडे

एम्. ए. एल्एल्. बी.

यवतमाळ, वऱ्हाड

आवृत्ति १ ली

किंमत १ रुपया

हरिकिशोर प्रेस यवतमाळ